ग्रा. मा. १५।११

…वारी. (वर्षाची वर्गणी १८३ ट. खर्चासह. फुटकळ अंकास

# केरळकोकिळ.

वर्षारंभ जानेवारी.

पु० १२] [अं० १

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्तवापराधः ।
सहकारतरौ चकार यस्ते सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

पांडुरंग महादेव गुजर बुकसेलर आणि पब्लिशर
रामवाडी
मुंबई.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

वैद्य.

विषयांची अनुक्रमणिका.


| | पृष्ठ. | | |
|---|---|---|---|
| नूतन संवत्सरारंभीं आमच्या वाचकांस दोन शब्द. ... | १ | द्वादश वार्षिक—परमेश्वर सज्जन यांची—प्रार्थना. ... | १० |
| निग्रो लोक... ... ... | ५ | राजयोग, प्रकरण पहिलें. ... | ११ |


## पोंच.

१ निर्णयसागरची डायरी.—प्रतिवर्षाप्रमाणेंच सुरेख माहितीनें भरलेली आहे.

२ एम्प्रेसची डायरी.—हीहि चांगली असून माहितीनें भरलेली आहे. एम्प्रेस-कंपनीचा शाईचा कारखाना असून त्यांची शाई घेणारास ही डायरी फुकट देतात. उत्तेजनाचा मार्ग चांगला आहे.

३ घोरपडे यांची डायरी.—हिच्या मुखपृष्ठावर त्यांची स्वतःची तसबीर ठशानें उठविलेली आहे. घोरपडे हे शाईचे प्रथमचे कारखानदार असून प्रसिद्धच आहेत. त्यांच्या उद्योगाबद्दल आह्मास अभिमान वाटतो.

सदरहू पुस्तकें पाठविणारांचे आह्मी फार फार आभार मानतों.

शिलकीच्या पुस्तकांची पोंच, पत्रव्यवहारास उत्तरें वगैरे मागाहून.


# हरएकप्रकारचा माल.

मुंबईंत मिळणारा, व्यापारी व ग्राहक यांस रोख पैसे आल्यास पाठवूं.

**नियम व माहिती अर्धा आणा आल्यास पाठवूं.**

व्यापारी व ग्राहक ह्यांकरितां. **हरएक प्रकारचा माल मुंबईंत** मिळणारा वक्तशीर बाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय.

D. K. SANDU,
RAMWADI, BOMBAY.



**दत्तात्रेय कृष्ण सांडू** ह्यांचें हरएक प्रकारचा माल मिळणारें, आणि माफक **अडत** घेऊन माल रवाना होणारें दुकान:—

रामवाडी, मुंबई.

**खरा हस्तिदंती माल**—फण्या ०८ ते ३ रु., कंगवे ०८ ते ०१२ आ., फांसे जोड २ ते ७॥ रु., नाटाचे फांसे ०६ ते ०१२ आणे.

वा. कृ. सांडू, दुकानदार—रामवाडी, मुंबई.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

आर्यमहौषधालय मु० आंजलें.

या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊंच व त्याशिवाय त्यांच्या आरोग्यार्थ एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकटच देऊं.

# मदनविलासामृतसंजीविनी.

## वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहक, बुद्धि-कांतिवर्धक व धातुपौष्टिक सुवर्णमाक्षिक मौक्तिक कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्त्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्वभागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, छातींतील रोग, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, वातरोग, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, हात, पाय, मूत्रमार्ग, व शरीर यांचा दाह, व अरुचि, इ० अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास नवीन किंवा जुनाट असले तरी खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस शारीरिक व मानसिक श्रम फार पडतात, त्या सर्वांच्या आंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो व सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें. कोष्ठशुद्धि होते. या अप्रतिम गुटिका अत्यंत शोधानें केल्या असून त्यांच्या अप्रतिम गुणका-

रित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं, असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व टपालखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सुद्धा आणे पडेल. एकदम ३२ गोळ्यांस १ रु. ७० गोळयांस २ रु. १६० गोळ्यांस ४ रु. २६० गोळ्यांस ६ रु. ५२० गोळयांस १० रु.

**थंडगार नेत्रांजन**—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार, तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

**विशेष सूचना.**—अलीकडे आंजर्लें व मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या पुष्कळच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष संभव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें **"कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य, मु० आंजर्लें, ता० दापोली, जि० रत्नागिरी."** याच पत्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपानपत्रक सोबत असतेंच.

१–१२]

# नूतन संवत्सरारंभीं
## आमच्या वाचकांस दोन शब्द.

परमेश्वरकृपेनें येवढें साल पुरें झालें, ह्मणजे आमच्या लोकसेवेचें एक तप पुरें होईल. आणि तप ह्मटलें कीं, त्यांत हजारों विघ्नांनीं येऊन आपल्याकडून होईल तितका व्यत्यय आणावयाचा, हें युगायुगांतरीं ठरलेलेंच आहे. त्याप्रमाणें ह्या शेवटच्या वर्षांत आह्मांवर त्यांनीं गहजब करून सोडला. त्यांतून आजच्या इतकी तरी आमची स्थिति कायम राहिली, ह्यांतच आह्मी आपणांस मोठे भाग्यवान् समजतों, व परमेश्वराचे आभार मानतों. दुर्मुखसंवत्सरानें आपल्या नांवाप्रमाणें जें आपलें शौर्य गाजविलें, त्यांत ज्याच्या तोंडचें पाणी पळालें नाहीं, ज्यास त्राहि त्राहि झालें नाहीं, ज्यानें हाय हाय केलें नाहीं, असा कोण आहे ! महामारी, जलप्रलय, दुष्काळ, भूकंप, अशीं किती ह्मणून संकटें वर्णन करावींत; त्यांत प्लेग महाराजांनीं तर दुःखाचा कळस करून सोडला, व अद्यापही ती साडेसाती संपली असें नाहीं. तिनें सर्वांस धायी धायी मोकलावयास लावलें. क्वारेंटाईन, सेग्रिगेशन, गंधकाचें पाणी इत्यादि छलमूर्तींचें स्मरण झालें कीं, अद्यापही अंग थरारतें, व डोळ्यांस घेरी येते. अरेरे! ह्या भरतखंडाची इतकी दुर्दशा मागेंही झाली नसेल, व पुढेंही कदाचित् होईल किंवा नाहीं, ह्याचा जबरदस्त संशयच आहे. मुंबईसारख्या फुललेल्या, व इंग्रजासारख्या दक्ष सरकारच्या सत्तेमध्यें, राजधानीस कुलपें पडावींत, ही गोष्ट खरोखरच अश्रुतपूर्व, अतएव जगाच्या इतिहासांत लिहिण्यासारखीच झाली, ह्यांत संशय नाहीं.

छापखाने बंद; रस्ते बंद; दुकानें बंद; इतका जेथें अनर्थपात घडला, तेथें केरळकोकिळानें आपली सेवा चुकली ह्मणून तळमळून तरी उपयोग काय ? शिवाय कोकिळावर जे इतर मनस्तापाचे प्रसंग आले, ते तर कांहीं विलक्षणच होते. इतक्यांसही त्यानें मीठ घातलें नसतें, परंतु प्रत्यक्ष मनुष्यहानि, आणि त्यांतूनही हृदयभेद करणारें ममत्व, अशावरच प्रसंग आला, ह्मणजे—संसारांत राहणाराच्या—वेदांतिक गोष्टी, व गहन विचार डळमळून जातात. हें अनुभविक वाचकांस कांहीं सांगितलें पाहिजे असें नाहीं.

असो; इतका विस्तार करण्याचें कारण, आमच्या वाचकांच्याही सकृद्दर्शनींच मनांत आल्यावांचून राहणार नाहीं. 'केरळकोकिळाचा' गेल्या जुलई महिन्यापा-

सून जो अस्त झाला होता, तो ह्या नव्या वर्षांत उदय झाला, हें होय. पण एक शंका सहजींच उत्पन्न होणार कीं, हा अंक तर जानेवारीचा आहे. तेव्हां पूर्वीच्या चार पांच अंकांची वाट काय? ते गिळंकृत केले कीं कसें? ह्याचें उत्तर असें आहे कीं, ते अंक इतर बंधूंनीं वर्षेंच्या वर्षे गाळून टाकलीं, तसे अजी गाळून टाकावयाचे नाहींत, तर पुढील ह्या वर्षाच्या अंकाबरोबरच, सवडीसवडीनें पाठवून ती खांच भरून काढण्याचा बेत आहे, व तो पूर्ण करण्याचा भार सर्वस्वीं जगदीश्वरावर आहे. 'केरळकोकिळा'ची नियमितपणाबद्दल आज दहा अकरा वर्षे अनेक लोक तारीफ करीत आले; असें असून ह्या अपरिहार्य ईश्वरी क्षोभांत त्याचाही कांहीं काल व्रतभंग झाला, व त्याबद्दल त्याच्या जिवांस अरण लागली आहे, काळजास घरे पडले आहेत; परंतु करणार काय? निरुपाय झाला. ह्याकरितां वाचकांनीं ह्या सर्व गोष्टी मनांत आणून आपल्या पुरातन कोकिळावर रुष्ट न होतां पूर्ववत् प्रेम ठेवावें, इतकीच शेवटची प्रार्थना आहे. ती सफल होवो.

आतां विषयरचनेच्या संबंधानें दोन शब्द सांगूं. केरळकोकिळानें पुष्कळ दिवस तोंड चुकविलें होतें, ह्मणून त्याच्या नाडी आंखडल्या, त्याची तरतरी गेली, त्याची हिंमत खचली, असा जर कोणाचा समज झाला असेल, तर तो अजिबात काढून टाकावा. झाड खच्ची केलें ह्मणजे तें जसें पुन्हा पहिल्यापेक्षांही भरारतें, त्याप्रमाणें त्याचा जोम, त्याचा दम, व त्याची हिंमत ताजी झाली आहे, ह्मणून खचित समजावें; व त्याबद्दल आह्मी सृष्टिकर्त्यास सहस्रशः प्रणाम करून आमच्या वाचकांपुढेंही लीन होतों. असो.

पूर्वीच्या वर्षांत शास्त्रीय विषयांपैकीं मुख्य व मनोरम विषय 'विद्युन्मानसशास्त्र' हा पुरा केला. आतां त्याच्या ऐवजीं कोणता काढावा, ही मोठी विवंचना होती, परंतु ईश्वराची करणी अगाध. तो दीनांचा पाठीराखा. मग आमचीच पाठ तो कां सोडील? आह्मांस त्याहूनही चढ असा विषय सांपडला. तो कोणता? तर ज्या विद्वद्वर्यानें आपल्या वाक्चातुर्यानें, व अप्रतिम ज्ञानानें अमेरिकेसारखे व इंग्लंदासारखे देश केवळ तन्मय करून सोडले, त्या श्रीमद्विवेकानंद स्वामींचीं योगशास्त्रावरील व्याख्यानें. हीं व्याख्यानें इतकीं रसभरित, अनुभविक, ज्ञानप्रचुर आहेत कीं, त्यांचें वर्णन करणें केवळ अशक्य होय. त्यांचा मराठी वाचकांस सवडीसवडीनें लाभ करून द्यावा, असें योजिलें आहे. ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग व राजयोग, इतकीं पुस्तकें आह्मांस उपलब्ध झालीं आहेत, व तीं हातांतून खालीं ठेववत नाहींत, इतकीं रसभरित आहेत. त्यांत

राजयोगाविषयीं तर बोलणेंच नाहीं. तो खराच राजयोग. ह्मणून तोच प्रथम हातीं घेऊन आजच्या अंकीं उपोद्घाताचें पहिलें प्रकरण आह्मीं संपविलें आहे. त्यावरून पुढील विषयाचीही वाचकांस बरीच कल्पना करतां येईल.

ह्याशिवाय, सचित्रवर्णनें, कविता, व पुस्तकपरीक्षा पूर्वींप्रमाणें जोमदार येत जातील. तरी सर्व वाचकांनीं सेवेंत अंतर पडल्याचें विसरून पूर्वप्रेमाचें रोंप वाढीस लावावें. सेवाचोर झाल्याबद्दल केरळकोकिळ आपल्या मनांत अतिशय खट्टू झाल्यामुळें, आपल्या वाचकांच्या दर्शनासाठीं, व सेवेसाठीं फार फार भुकेला आहे. त्याच प्रेमानें त्याच्या आश्रयदात्यांनींही त्याचें मुख कुरवाळून त्यास पदरीं घेऊन सुखी करावें, येवढीच प्रार्थना. ह्याहून अधिक काय सांगावें.

सर्वांनीं आपला ह्मटलेला,

**केरळकोकिळ.**

रित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं, असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व टपालखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा खर्च आणे पडेल. एकदम ३२ गोळ्यांस १ रु. ७० गोळ्यांस २ रु. १६० गोळ्यांस ४ रु. २६० गोळ्यांस ६ रु. ५२० गोळ्यांस १० रु.

**थंडगार नेत्रांजन**—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, मोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार, तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

**विशेष सूचना.**—अलीकडे आंजर्लें व मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या पुष्कळच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष संभव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें **“कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य, मु० आंजर्लें, ता० दापोली, जि० रत्नागिरी.”** या पत्त्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपानपत्रक सोबत असतेंच.

१-१२]

# नूतन संवत्सरारंभीं

## आमच्या वाचकांस दोन शब्द.

परमेश्वरकृपेनें येवढें साल पुरें झालें, म्हणजे आमच्या लोकसेवेचें एक तप पुरें होईल. आणि तप म्हटलें कीं, त्यांत हजारों विघ्नांनीं येऊन आपल्याकडून होईल तितका व्यत्यय आणावयाचा, हें युगायुगांतरीं ठरलेलेंच आहे. त्याप्रमाणें ह्या शेवटच्या वर्षांत आम्हांवर त्यांनीं गहजब करून सोडला. त्यांतून आजच्या इतकी तरी आमची स्थिति कायम राहिली, ह्यांतच आम्ही आपणांस मोठे भाग्यवान् समजतों, व परमेश्वराचे आभार मानतों. दुर्मुखसंवत्सरानें आपल्या नांवाप्रमाणें जें आपलें शौर्य गाजविलें, त्यांत ज्याच्या तोंडचें पाणी पळालें नाहीं, ज्यास त्राहि त्राहि झालें नाहीं, ज्यानें हाय हाय केलें नाहीं, असा कोण आहे! महामारी, जलप्रलय, दुष्काळ, भूकंप, अशीं किती म्हणून संकटें वर्णन करावींत; त्यांत प्लेग महाराजांनीं तर दुःखाचा कळस करून सोडला, व अद्यापही ती साडेसाती संपली असें नाहीं. तिनें सर्वांस धायी धायी मोकलावयास लावलें. क्वारेंटाईन, सेग्रिगेशन, गंधकाचें पाणी इत्यादि छलमूर्तींचें स्मरण झालें कीं, अद्यापही अंग थरारतें, व डोळ्यांस घेरी येते. अरेरे! ह्या भरतखंडाची इतकी दुर्दशा मागेंही झाली नसेल, व पुढेंही कदाचित् होईल किंवा नाहीं, ह्याचा जबरदस्त संशयच आहे. मुंबईसारख्या फुललेल्या, व इंग्रजासारख्या दक्ष सरकारच्या सत्तेमध्यें, राजधानीस कुलपें पडावींत, ही गोष्ट खरोखरच अश्रुतपूर्व, अतएव जगाच्या इतिहासांत लिहिण्यासारखीच झाली, ह्यांत संशय नाहीं.

छापखाने बंद; रस्ते बंद; दुकानें बंद; इतका जेथें अनर्थपात घडला, तेथें केरळकोकिळानें आपली सेवा चुकली म्हणून तळमळून तरी उपयोग काय? शिवाय कोकिळावर जे इतर मनस्तापाचे प्रसंग आले, ते तर कांहीं विलक्षणच होते. इतक्यांसही त्यानें मीठ घातलें नसतें, परंतु प्रत्यक्ष मनुष्यहानि, आणि त्यांतूनही हृदयभेद करणारें ममत्व, अशावरच प्रसंग आला, म्हणजे—संसारांत राहणाऱ्याच्या—वेदांतिक गोष्टी, व गहन विचार डळमळून जातात. हें अनुभविक वाचकांस कांहीं सांगितलें पाहिजे असें नाहीं.

असो; इतका विस्तार करण्याचें कारण, आमच्या वाचकांच्याही सकृद्दर्शनींच मनांत आल्यावांचून राहणार नाहीं. 'केरळकोकिळाचा' गेल्या जुलई महिन्यापा-

सून जो अस्त झाला होता, तो ह्या नव्या वर्षांत उदय झाला, हें होय. पण एक शंका सहजींच उत्पन्न होणार कीं, हा अंक तर जानेवारीचा आहे. तेव्हां पूर्वींच्या चार पांच अंकांची वाट काय? ते गिळंकृत केले कीं कसें? ह्याचें उत्तर असें आहे कीं, ते अंक इतर बंधूंनीं वर्षेंच्या वर्षें गाळून टाकलीं, तसे अजी गाळून टाकावयाचे नाहींत, तर पुढील ह्या वर्षाच्या अंकाबरोबरच, सवडीसवडीनें पांठवून ती खांच भरून काढण्याचा बेत आहे, व तो पूर्ण करण्याचा भार सर्वस्वीं जगदीश्वरावर आहे. 'केरळकोकिळा'ची नियमितपणाबद्दल आज दहा अकरा वर्षें अनेक लोक तारीफ करीत आले; असें असून ह्या अपरिहार्य ईश्वरी क्षोभांत त्याचाही कांहीं काल व्रतभंग झाला, व त्याबद्दल त्याच्या जिवास अरण लागली आहे, काळजास घरे पडले आहेत; परंतु करणार काय? निरुपाय झाला. ह्याकरितां वाचकांनीं ह्या सर्व गोष्टी मनांत आणून आपल्या पुरातन कोकिळावर रुष्ट न होतां पूर्ववत् प्रेम ठेवावें, इतकीच शेवटची प्रार्थना आहे. ती सफल होवो.

आतां विषयरचनेच्या संबंधानें दोन शब्द सांगूं. केरळकोकिळानें पुष्कळ दिवस तोंड चुकविलें होतें, ह्मणून त्याच्या नाडी आंखडल्या, त्याची तरतरी गेली, त्याची हिंमत खचली, असा जर कोणाचा समज झाला असेल, तर तो अजिबात काढून टाकावा. झाड खच्ची केलें ह्मणजे तें जसें पुन्हा पहिल्यापेक्षांही भरारतें, त्याप्रमाणें त्याचा जोम, त्याचा दम, व त्याची हिंमत ताजी झाली आहे, ह्मणून खचित समजावें; व त्याबद्दल आह्मी सृष्टिकर्त्यास सहस्रशः प्रणाम करून आमच्या वाचकांपुढेंही लीन होतों. असो.

पूर्वींच्या वर्षांत शास्त्रीय विषयांपैकीं मुख्य व मनोरम विषय 'विद्युन्मानसशास्त्र' हा पुरा केला. आतां त्याच्या ऐवजीं कोणता काढावा, ही मोठी विवंचना होती, परंतु ईश्वराची करणी अगाध. तो दीनांचा पाठीराखा. मग आमचीच पाठ तो कां सोडील? आह्मांस त्याहूनही चढ असा विषय सांपडला. तो कोणता? तर ज्या विद्वद्वर्यानें आपल्या वाक्चातुर्यानें, व अप्रतिम ज्ञानानें अमेरिकेसारखे व इंग्लंदासारखे देश केवळ तन्मय करून सोडले, त्या श्रीमद्विवेकानंद स्वामींचीं योगशास्त्रावरील व्याख्यानें. हीं व्याख्यानें इतकीं रसभरित, अनुभविक, ज्ञानप्रचुर आहेत कीं, त्यांचें वर्णन करणें केवळ अशक्य होय. त्यांचा मराठी वाचकांस सवडीसवडीनें लाभ करून द्यावा, असें योजिलें आहे. ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग व राजयोग, इतकीं पुस्तकें आह्मांस उपलब्ध झालीं आहेत, व तीं हातांतून खालीं ठेववत नाहींत, इतकीं रसभरित आहेत. त्यांत

राजयोगाविषयीं तर बोलणेंच नाहीं. तो खराच राजयोग. ह्मणून तोच प्रथम हातीं घेऊन आजच्या अंकीं उपोद्घाताचें पहिलें प्रकरण आह्मीं संपविलें आहे. त्यावरून पुढील विषयाचीही वाचकांस बरीच कल्पना करतां येईल.

ह्याशिवाय, सचित्रवर्णनें, कविता, व पुस्तकपरीक्षा पूर्वींप्रमाणें जोमदार येत जातील. तरी सर्व वाचकांनीं सेवेंत अंतर पडल्याचें विसरून पूर्वप्रेमाचें रोंप वाढीस लावावें. सेवाचोर झाल्याबद्दल केरळकोकिळ आपल्या मनांत अतिशय खट्टू झाल्यामुळें, आपल्या वाचकांच्या दर्शनासाठीं, व सेवेसाठीं फार फार भुकेला आहे. त्याच प्रेमानें त्याच्या आश्रयदात्यांनींही त्याचें मुख कुरवाळून त्यास पदरीं घेऊन सुखी करावें, येवढीच प्रार्थना. ह्याहून अधिक काय सांगावें.

सर्वांनीं आपला ह्मटलेला,

**केरळकोकिळ.**

# केरळकोकिळ.

पु० १२ ] [अं० १

## निग्रो लोक.



पुष्कळ शोधक व तत्त्ववेत्त्यांचें असें मत आहे कीं, जगांतील मनुष्य-जात उत्तरोत्तर अशक्त, ठेंगू, नाजूक व स्वरूपसंपन्न होत चालली आहे. अतिशय उष्ण प्रदेशांतील मनुष्यें जशीं काळसर, सशक्त, उंच व धिप्पाड असतात तशींच कुरूपही असतात, असा अनुभव आहे. आणि पृथ्वी ही आपल्या बाल्यदशेंत अतिशय तप्त असून कालांतरानें निवत निवत गेलेली आहे. इत्यादि कारणांवरून पूर्वयुगांतील मनुष्यें अतिशय उंच, भेसूर, धिप्पाड व बेढब असावींत, असें पुष्कळ लोकांचें अनुमान आहे. हें अनुमान खरें असो, कीं कसेंही असो. सध्या पृथ्वीच्या पृष्ठभागावरील कितीएक मनुष्यजाति बऱ्याच आद्यस्थितींतील आढळतात; व त्यांची शरीररचना, स्वभावभिन्नत्व, शृंगारवैचित्र्य,

प्रपंचरहाटी, धर्मसमजूत हीं पाहून चित्तास मोठा विस्मय होतो. अशा ज्या कांहीं जाति आहेत, त्यांपैकींच मध्यआफ्रिकेंतील 'निग्रो' लोक होत. ह्मणून त्यांची थोडीशी सचित्र माहिती आमच्या वाचकांचें ब-रेंच मनरंजन करील.

**निग्रो** हा शब्द **नामगार** ह्मणजे काळा ह्या शब्दापासून झालेला आहे. अर्थात् **निग्रो** ह्मणजे काळे लोक. ह्यांसच आह्मी 'शिद्दी' असें ह्मणतों. हे लोक इतके काळे असतात कीं, खरोखर 'कोळशांतील मा-णिक' ही ह्मण त्यांनाच अक्षरशः लागू पडते. ह्यांचा वर्ण निखालस काळा असतो; इतकेंच नव्हे, तर त्यांत कळकटपणा इतका मिश्र असतो कीं, त्यांना पहातांच आमच्या लोकांस शिसारी आल्यावांचून रहात नाहीं. ह्यांचें नाक फेंपाणें, जबडा रुंद, ओंठ निबर आणि जाड आणि त्यांच्यामध्यें पांढरे तक्क दांत, गालांचीं हाडें मोठीं, आणि केंस सारे कुरळ—तसूच्यावर लांबी नाहीं. ते दिसण्यांत जळल्यासारखे दिसतात. मात्र ह्यांची हाडकाठी बळकट असते. **आफ्रिकेंत** राहणाऱ्या जेवढ्या ह्मणून जाति आहेत, तेवढ्या साऱ्यांचें **निग्रो** जातीशीं साम्य आहे. उ-दाहरणार्थ—**सिन्याम** जातीच्या रीतिभाती, भाषा, शरीररचना, ह्यां-च्याशीं **न्यूबियन** लोक व **अबिसीनियन** लोक ह्यांचें पुष्कळ अंशीं साम्य आहे. हे लोक सर्द हवेंत समुद्राच्या सपाटीपेक्षां खोलींत रा-हतात, तरी त्यांचा बांधा पश्चिम**आफ्रिकें**तील **निग्रो** लोकांसारखाच असतो. आणि मध्य**आफ्रिके**मध्यें नीलनदीच्या सरोवराभोंवतीं रा-हणाऱ्या लोकांशींही साम्य असतें. हे लोक अस्सल **निग्रो** नव्हेत. तरी ते दक्षिण**आफ्रिकें**तील पूर्वी सांगितलेल्या **निग्रो** जातींतही मोडतात. डाक्टर **लिव्हिंग्स्टन** ह्मणून एक मोठा बुद्धिमान् पुरुष होऊन गेला. त्यानें मध्य**आफ्रिकें**तील **मांगानजा** नांवाच्या जातीचें मोठें रसभरित वर्णन केलें आहे. ही जात **झांबोशी**च्या किनाऱ्यावर राहते. हिलाच **'शायरे'** असेंही दुसरें नांव आहे. **स्वीडिश** राज्याप्रमाणें त्यांचें राज्य एकजुटीचें आहे; तथापि त्यांतील प्रत्येक परगाणा किंवा **'रंडो'** आपल्या शेजारच्या परगण्यापासून अगदीं स्वतंत्र असतो. आणि त्या सर्वांवर सार्वभौम राजासारखा कोणी प्रभूही नसतो. **रंडोवर** मुख-त्यारी किंवा अधिकार स्त्रीही करूं शकते. हे लोक मके वाटून त्यांची

एक प्रकारची दारू तयार करतात. तीस '**मांवची** दारू' असें नांव आहे. ही दारू उकळी फुटलेल्या चिखलासारखी दिसते. ह्याशिवाय, ते केळापासूनही एका जातीची दारू तयार करतात. ही दारू फार दिवस टिकत नसल्यामुळें, होईल तितक्या लौकरच ते तिचा फन्ना पाडतात. केसांची शुश्रूषा करण्याकडे व त्यांस सजविण्याकडे त्यांचें लक्ष्य विशेष असतें. हे लोक आपल्या मस्तकावर शिंगासारखे दोन कातड्याचे उभे तुकडे लावतात. स्त्रिया आपल्या तोंडाजवळ एक '**पिलेल**' ह्या नांवाची मुदनी किंवा कडें घालीत असतात. ही **पिलेल** हस्तिदंताची किंवा बांबूची केलेली असते. ह्या **पिलेल**चा किंवा कड्याचा व्यास बावीस इंच असतो[१] !!! आणि तें वरच्या ओठांत बसविलेलें असतें. शिरोभागीं जें चित्र दिलें आहे, तें, अशा **पिलेल** घातलेल्याच एका स्त्रीचें आहे. ह्या विलक्षण पद्धतीमुळें पुरुषांच्या आवाजापेक्षां बायकांचा आवाज फार भिन्न निघतो. त्यांच्या घाणेऱ्या आणि मलिन वागणुकीमुळें त्यांस नेहेमीं खरजेसारखे त्वग्रोग भोगीत बसणें भाग पडतें.

**मांब**ची दारू पिण्यांत एक वस्ताद जात आहे. तीस '**वीज**' असें ह्मणतात. ही जात मध्य**आफ्रिके**तील सर्व जातींपेक्षां फारच इष्कीबाज असते. हे लोक प्रवास कंठणारे फार दांडगे आहेत. **बोल्यान्डो** ही जात गुरेंढोरें पाळण्याविषयीं प्रख्यात आहे. हे लोक इतके धर्मनिष्ठ असतात कीं, परक्या मनुष्यानें शिजविलेल्या अन्नाला ते शिवतही नाहींत. तरी ह्या-जातीपैकीं एकीची मजल नरमांस भक्षण करण्यापर्यंत पोंचलेली आहे. हे लोक, जंगली जनावरें खातात, पण पाळलेल्या जनावरांस स्पर्श करीत नाहींत. **वीज** राष्ट्रशिष्टाचाराविषयीं फार प्रख्यात आहे. ह्यांच्या स्त्रिया नेहेमीं तृप्त असतात, आणि त्या आपल्या नवऱ्यांस फार पूज्य मानतात. त्यांना पुरुषांप्रमाणेंच पोषाख करणें आवडतें, आणि पुरुषांप्रमाणेंच त्यांना मर्दानी बाण्याचा

---

१ The Human race ह्या नांवाच्या इंग्रजी पुस्तकांतून हा उतारा घेतलेला आहे. परंतु पिलेलचा व्यास २२ इंच असणें केवळ असंभाव्य दिसतें, व शिरोभागीं दिलेल्या चित्रावरून पाहतां येवढें मोठें कडें ओंठांत बसवितां येणेंही अशक्यच. मग ह्या लेखांत कांहीं नजरचूक राहिली आहे कीं काय नकळे? ह्या पिलेलचा व्यास फार तर दोन किंवा चार इंच असूं शकेल.

शोक असतो. ते मिळून मिसळून राहतात. त्यांच्या खेडेगांवांतही एकादें भोजनगृह असतें. तेथें ते सुधारलेल्या देशाप्रमाणें एकत्र जमतात, खातात, पितात, खेळतात व मजा मारतात. **व्यांगोडो** ह्मणून एक संस्थान आहे. तें एका अत्यंत क्रूर व जुलमी राजाच्या सत्तेखालीं आहे. तेथील प्रजेला तो राजा अतोनात छळतो. त्याला 'राजाधिराज,' 'प्रभु' अशा शब्दांशिवाय चकारशब्द बोलतां कामा नये. तो क्षुल्लक अपराधालाही देहांतशासन करतो. दागदागिने व वस्त्रेंपात्रें कोणीं कोणीं कसकशीं घ्यावीं, ह्याविषयीं त्या सरकारचे कायदे फार कडक आहेत. परदेशांतील मणी, पोत, काच, पितळेचे वगैरे दागदागिने अगदीं वर्ज्य आहेत. तसें कोणी घालून मिरविल्यास मोठा अक्षम्य गुन्हा समजला जातो. तेथील साधारण शिक्षा ह्मणजे तापलेल्या लोखंडी दांड्यानें गुन्हेगाराच्या अंगास भोंकें पाडणें! कोणाचे अवयव छिन्नभिन्न करणें तर, चाकूनें वगैरे तोडावयाचे नाहींत; तर एका जातीच्या खरबरीत गवताच्या पानानें हळू हळू कापून काढावयाचे! मारेकऱ्यांचें किंवा शिरच्छेद करणारांचें आफिस ह्मणजे ह्या गुलामबंद्या लोकांस केवळ हायकोर्टाप्रमाणें पूज्य वाटतें!

**बनयानि** राष्ट्र **झांबोशी**च्या दक्षिणकिनाऱ्यावर वसलेलें आहे. हे लोक शिकारी असून एका निवड केलेल्या राजाच्या अमलाखालीं राहतात. राजा निवडणें तो, आपल्या जातीपैकींच असून पूर्वींच्या राजाचा भाचा, पुतण्या किंवा तसाच कोणी दुसरा जवळचा नातलग निवडतात. **आवास** ही जात अक्षांश ४°, ९९′ व रेखांश ३१°, ४६′ वर राहतात. ह्यांच्या कितीएक रीति अगदीं घाणेच्या असतात. हे लोक बहुतेक नागवे उघडेच असतात. कांहीं बायका मात्र दोरांची किंवा चामड्याची झालर कमरेभोंवतीं वेढून घेतात. मस्तकावरील केंस शृंगारण्याकडे त्यांचें विशेष लक्ष्य असतें. एखादा माणूस मरण पावला ह्मणजे त्याचा वारस त्याचे केंस काढतो, व ते आपल्या केंसांस चिकटवितो. त्यामुळें कितीएकांचीं मस्तकें पाटीसारखीं होऊन जातात! हे लोक आपल्या आंगभर झेब्र्याच्या आंगासारखे तांबडे, पिंवळे पट्टे ओढतात. पांढरे मात्र कामाचे नाहींत. ह्यांच्यामध्यें **किचेस** ह्मणून

एक जात आहे. ती इतकी किरकोळ असते कीं, **सर एम्. बेकर** ह्या ग्रंथकारानें त्यांस 'जीवंत सांपळ्यांचा पुंज' असें नांव दिलें आहे. त्यांचें मुख्य खाणें ह्मणजे पांढऱ्या कमळाचें बीं. **वानू** ही जात मुसलमानी असून बरीच सुधारलेली आहे. हे लोक पश्चिमकिनाऱ्यावर **टोहाड** सरोवराच्या कांठीं राहतात. ह्यांच्या राज्यांत बारा तेरा मोठमोठालीं शहरें आहेत. पूर्वींपासून ह्यांची सत्ता जरी सेनापतीच्या स्वाधीन असते तरी, ते सर्व मिळून एका सुलतानाच्या ताब्यांत राहतात. ह्या जातीमध्यें अशी एक चाल असलेली सांगतात कीं, पुरुषानें बाहेर पडावयाच्या वेळेस घरांत असतील नसतील तेवढीं सारीं चिरगुटें अंगावर घेऊन बाहेर पडावयाचें. तें अशाकरितां कीं, आपण केवढे श्रीमंत आहों, हें लोकांस कळावें. मध्य**आफ्रिके**मध्यें नरमांस भक्षण करणाऱ्या जाति बऱ्याच असाव्यात, निदान दोन तरी खास आहेतच. **न्याम् न्याम्** लोकांची शत्रूंचीं प्रेतें खाण्याविषयीं तर प्रसिद्धीच आहे. ही जात, आलीकडेच त्यांच्या राजानें आपल्या दरबारांत एक येमू जातीचा खुषमस्कऱ्या ठेवल्यापासून पुढें आली आहे. कारण, हा खुषमस्कऱ्या फार चतुर व राजकारणी होता. ही जात इतकी ठेंगू आहे कीं, एका **युरोपियन** डाक्टरास ह्यांपैकीं कांहीं लोक भेटले, त्या वेळेस त्यास असा भास झाला कीं, ती एक लहान मुलांची टोळीच आहे! ह्यांच्या अस्थींची रचना मोठी विलक्षण असते. ह्यांची सर्वांत मोठी उंची ह्मणजे फार तर चार फूट साडेचार फूट. **न्याम् न्याम्**जवळच **बाबुला** ह्मणून एक जात आहे, तीही नरमांसभक्षक आहे. **म्याकारियास** ह्मणून दुसरी एक जात आहे, ही **गोसेकोरो**पासून सुमारें २०० मैलांवर पश्चिमेस राहते. ही जात गुलामगिरीचा व्यापार करून राहते. हे लोक परकी मनुष्यांसच खाऊन राहतात असें नाहीं, तर जन्मापासून पाळलेलीं लेंकरेंही चिरून त्यांची मेजवानी करण्यास चुकत नाहींत! **अन्योरोस** ही जात गाडगीं घडण्यांत फार पटाईत आहे.

---

# द्वादश वार्षिक.

## परमेश्वर व सज्जन यांची प्रार्थना.

### आर्या.

तारा प्रभो उदारा जगदोद्धारा करूनियां प्रणती ।
ह्मणती भक्त सदा जे कोण तयांची करील हो गणती ॥ १ ॥
त्यांतचि आस धरोनी नमितो हा दास खास मतिमंद ।
छंद तव स्मरणाचा देतो तरि ह्या मनासि आनंद ॥ २ ॥
भवनिधि खवळे ढवळे न वळे हें चित्त वित्त टाकाया ।
राखाया कोण दुजा प्रभुजी काढावया तटाका या ॥ ३ ॥
दीनांसा बघतां या सदया डोळे भरून अंत कसा ।
संत कसा उचित नव्हे ग्रासाया काळ सिद्ध अंतकसा ॥ ४ ॥
बुडतों बुडतों धांवा सुखकरसा वरदहस्त लावा जी ।
पावा जीव न वांचे सजवा कीं पक्षिराज तव वाजी ॥ ५ ॥
कामक्रोधादिक हे टपले टोंचावया जणों काक ।
धाक मनीं वाटतसे होइन केव्हां कळे न मी खाक ॥ ६ ॥
मी कोण कोठचा हें बघतां चित्तांत होय गुंग मती ।
श्रमती अखंड कवि परि रविसन्मुख काजवे तसे गमती ॥ ७ ॥
येती प्रसंग दुर्धर समयविशेषीं जगांत लोकांस ।
शोकासि होय थारा परि आश्रय देतसे तुझी कास ॥ ८ ॥
दुर्मुख संवत्सर हा कैसा फळला जनांस हें ठावें ।
रेटावें कार्य पुन्हा प्रेमानें वाचकांसि भेटावें ॥ ९ ॥
तिळभरि आशा नव्हती परि फळली ही तुझी कृपा मातें ।
आह्मातें तूंचि धनी येइल वा अन्य कोण कामातें ॥ १० ॥
दुर्दैवानें माझ्या आलीं विघ्नें जरी तपाला ह्या ।
बापा तुझ्या प्रसादें फुटल्या त्यांच्या अनेकविध लाह्या ॥ ११ ॥
देशी सुखदुःखें कां कां करिशी गरिब आणि श्रीमंत ।
अंत न लागे प्रभुजी ह्मणुनी ह्मणती अनंत ते संत ॥ १२ ॥
लागे अजि वर्ष नवें ह्या केरळकोकिळासि बारावें ।
वारावे सकल मनस्ताप सदन कीर्तिचें उभारावें ॥ १३ ॥

नव कोकिलदर्शन अजि घेतांना वाचकांसि यो भरतें ।
भर तेंवि पडो प्रेमा रामाच्या पाडिली जशी भरतें ॥ १४ ॥
करितां सज्जनसेवा झालेंसे जवळ एक तप आजी ।
ताजी उमेद धरुनी सेवक त्याला पुन्हा असे राजी ॥ १५ ॥
ध्या ती गोड करोनी सांगा उघडी असेल जी खोड ।
कोड सदा पुरवावें द्यावी दासासि येवढी जोड ॥ १६ ॥
वर्णित होते कोकिल नियमितपण फार फार सांभाळीं ।
भाळीं उलटचि आली ऐकायाची मलाच कीं पाळी ॥ १७ ॥
काय करूं औदास्यें खुंटुनि पडले समस्त व्यवसाय ।
घाय महद्दुःखाचे येउनि झाला खराच निरुपाय ॥ १८ ॥
जाणुनि सारे वाचक धरितिल न कधीं मनामधें वीट ।
धीटपणा धरिल्यावरि होइल सारें पुन्हाहि हें नीट ॥ १९ ॥
ह्याहुन विशेष येथें सांगायाला धजे तुह्मां न मन ।
नमन करोनी विनयें पुढती कोकिळ करीतसे गमन ॥ २० ॥

---

# राजयोग.

## प्रकरण पहिलें.

### उपोद्घात.

आमचें यच्चयावत् ज्ञान अनुभवाच्या पायावर उभारलेलें असतें. ज्याला आपण अनुमान असें ह्मणतों, आणि ज्याच्या योगें आपण क्षुल्लकापासून तों सामान्यापर्यंत, व सामान्यापासून तों विशिष्टापर्यंत जाऊन पोंचतों, त्यालाही अनुभवाचाच पाया आहे. सिद्धशास्त्रें असें ज्यांना नांव आहे, त्यांतून लोकांना सहजरीतीनें सत्य काढतां येतें. कारण, तीं प्रत्येक मनुष्यप्राण्याला अनुभवांची साक्ष देतात. शास्त्रज्ञ मनुष्य कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवा असें आपणांस सांगत नाहीं; तर त्याला स्वतःला जे अनुभव आलेले असतात, त्यांवरून तो कांहीं सिद्धांत ठरवितो. आणि त्या अनुभवांवर विचार करून तो जेव्हां आपणांस आपल्या सिद्धांतावर विश्वास ठेवण्याविषयीं सांगूं लागतो, तेव्हां तो सर्वव्यापी मानवी अनुभवाची थोडी तरी साक्ष देतोच. प्रत्येक सिद्ध-

शास्त्राला एक सर्वसाधारण पाया असतो, आणि तो सर्व मानवजातीला व्यापून असतो. असा कीं, त्या सिद्धांतापासून सत्यत्व किंवा मिथ्यत्व आपणास काढतां येतें. तेव्हां आतां असा प्रश्न उद्भवतो कीं, अशा प्रकारचा पाया धर्माला आहे किंवा नाहीं? ह्याचें उत्तर मी अनुकूल आणि प्रतिकूल असें दोन्हीही तऱ्हेनें देईन. धर्म हा, साधारपणें ज्या अर्थीं सर्व जगावर शिकविला जातो, त्या अर्थीं तो भक्ति व श्रद्धा ह्याच पायावर आहे, असें ह्मणतां येईल. असें असतांही हे सारे धर्म परस्परांशीं भांडत असतात. ह्याचें कारण, त्यांच्या उपपत्ति वेगवेगळ्या असतात येवढेंच. पण ह्या उपपत्तीही श्रद्धेच्याच पायावर उभारलेल्या असतात. कोणी ह्मणतो 'एक परमेश्वर अंतरिक्षांत बसून तो अखिल ब्रह्मांडांवर सत्ता चालवितो; आणि ह्या माझ्या खात्रीवरच तुह्मी त्याच्यावर विश्वास ठेवा.' अशा रीतीनेंच मी इतरांना माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवा ह्मणूं लागलों, तर माझ्याही कल्पना त्याच तोडीच्या होतील. आणि त्याचें कारण जर त्यांनीं विचारिलें, तर मला कांहींच सांगतां येणार नाहीं. धर्म आणि अध्यात्मविद्या ह्यांच्या नांवाला आजकाल जो कलंक लागलेला दिसतो, त्याला हें एक कारण आहे. प्रत्येक विद्वान् मनुष्य असें ह्मणतांना आढळतो कीं "अहो! ज्यांचा निर्णय करतां येत नाहीं, अशा उपपत्तींचें—सिद्धांतांचें—धर्म हें एक पातडें आहे. जो तो आपल्या आवडत्या कल्पनाच गृहित धरून जगाला उपदेश करीत सुटतो." पण ह्या वेळीं मला हें सांगितलें पाहिजे कीं, धर्मामध्यें सर्वव्यापक किंवा सर्वसाधारण श्रद्धेचें मूळ असतें. आणि त्याची ह्या निरनिराळ्या उपपत्तींवर सत्ता असते. निरनिराळ्या देशांतील निरनिराळ्या मनुष्यपंथांच्या निरनिराळ्या कल्पना असतात. त्यांच्या मूळाशीं गेलें तर, त्या सुद्धां सर्वव्यापी अनुभवाच्या पायावरच उभारलेल्या आहेत असें आढळून येईल.

प्रथमतः जगांतील एकून एक भिन्नभिन्न धर्मांचा आपण विचार करावा. ह्मणजे त्यांचे दोन वर्ग आहेत असें आपणांस दिसून येईल. कांहींना ग्रंथांचा आधार आहे, आणि कांहीं ग्रंथाधाराशिवायच आहेत. ग्रंथाधारानें चालणारे आहेत, ते अतिशय भक्कम आहेत, आणि त्यांच्या अनुयायांची संख्या फार मोठी आहे. ग्रंथाधाराशिवाय जे धर्म आहेत,

त्यांपैकीं बहुतेक लयास गेले आहेत, आणि थोडेबहुत जे नवे आहेत, त्यांचे अनुयायी फारच थोडे आहेत. तथापि त्यांमध्येंही एक मेळ दिसून येईल, तो हा कीं, ते ज्या सत्यसिद्धांतांचा उपदेश करतात, ते विशिष्ट पुरुषांच्या अनुभवांचेच परिणाम असतात. ख्रिस्ती लोकांचें ह्मणणें 'आपल्या धर्मावर विश्वास ठेवा; ख्रिस्तावर विश्वास ठेवा; तो ईश्वराचा अवतार आहे असें माना; ईश्वरावर, आत्म्यावर आणि त्याच्या उन्नतीवर विश्वास ठेवा.' ह्याला आधार काय ह्मणून त्यांना प्रश्न केला तर तो ह्मणतो 'कांहीं नाहीं. तो केवळ माझा विश्वास.' परंतु आपण जर ख्रिस्ती धर्माच्या मूळांत शिरलों, तर आपणांस आढळून येईल कीं, तो अनुभवाच्याच पायावर रचलेला आहे. ख्रिस्त ह्मणाला, मी ईश्वरास भेटलों; शिष्य ह्मणतात आह्मी ईश्वरास ओळखलें; इत्यादि. बौद्धधर्मांतही तसेंच. त्यांत बुद्धाचा अनुभव आहे. त्यानें कांहीं सत्य गोष्टींचा अनुभव घेतला; त्याला तो अनुसरला; त्यांचा उपभोग अनुभवला; आणि मग त्यांचा सर्व जगास उपदेश केला. तीच गोष्ट हिंदूंची. त्यांच्या ग्रंथांत, ग्रंथ लिहिणारे जे ऋषी—किंवा तत्त्वज्ञानी—त्यांनीं कित्येक सत्तत्त्वांची ओळख करून घेतली, आणि त्यांचाच त्यांनीं उपदेश केला. ह्यावरून हें उघड आहे कीं, जगांतील झाडून सारे धर्म ह्या आमच्या सर्वव्यापी व परिपूर्णज्ञानाच्या—प्रत्यक्षानुभवाच्या—अभेद्य पायावर उभारलेले आहेत. साऱ्या धर्मगुरूंनीं परमेश्वराचें दर्शन घेतलें होतें; त्यांनीं आपले आत्मे पाहिले होते; त्यांनीं आपली शाश्वति ओळखली होती; त्यांनीं पुढील भवितव्य जाणलें होतें; आणि ज्याचा त्यांनीं अनुभव घेतला, त्याचा जगास उपदेश केला. भेद ह्मणून इतकाच कीं, ह्यांतील बहुतेक धर्मांवर—विशेषेंकरून ह्या अर्वाचीन कालांत—एक विलक्षण आरोप आमच्यापुढें येतो. तो आरोप असा कीं, ते अनुभव हल्लींच्या मन्वंतरांत प्रत्ययास येणें दुरापास्त आहेत. अगोदर ते होते, तेही थोड्यांसच होते. ह्मणजे ज्यांनीं प्रथम धर्मस्थापना करून आपलें नांव अजरामर करून सोडलें, अशा लोकांसच ते होते. ते अनुभव हल्लींच्या काळांत अगदींच लुप्त झाले आहेत. ह्मणून सांप्रतकालीं धर्म हा केवळ विश्वासावरच आहे, असें ह्मणणें, हें मला अगदीं मान्य नाहीं. ह्या जगामध्यें ज्ञानाच्या कोणत्याही विशिष्ट शाखेकडून एखादी अनुभविक

गोष्ट घडून आली, तर ती पुन्हा खचित घडेल. कारण, तो अनुभव लक्षावधि वेळां आधीं आलेला असेल, व पुढेंही अनेक वेळां येईल. 'साम्यता' हा सृष्टीचा एक मोठा कडकडीत नियम आहे. जी गोष्ट एकदा घडली, ती पुनःपुनः घडणें शक्य आहे.

ह्मणूनच योगशास्त्र शिकविणारे लोक प्रतिपादन करतात कीं, धर्म हा प्राचीनकालच्या अनुभवाच्याच पायावर उभारलेला आहे, असें नाहीं; तर मनुष्य हा स्वतःच तसा ज्ञानी व अनुभवी होईपर्यंत धार्मिक होऊं शकणार नाहीं. ही परिपूर्णता कशी प्राप्त करून घ्यावी, हें योगशास्त्र शिकवितें. कोणीही अनुभव घेतल्यावांचून धर्माबद्दल वादविवाद करणें निष्फळ होय. परमेश्वराच्या नांवांत इतका मतभेद, इतका तंटाबखेडा, व इतकी हमरीतुमरी कां? ईश्वराच्या नांवाबद्दल जितके रक्तपात झाले आहेत, तितके इतर कारणांनीं थोडेच झाले असतील! ते गतानुगतिक ह्या न्यायानें आपल्या पूर्वजांच्या चालीरीतींस अनुसरूनच समाधान मानून घेत. आणि इतरांनींही तोच मार्ग स्वीकारावा, अशी त्यांची दृढतर इच्छा असे. ह्याचें कारण, ते लोक मुळाकडे कधींही गेले नाहींत. आत्मा जर दिसत नाहीं, तर तो मनुष्याला आहे ह्मणण्याला, किंवा परमेश्वर जर दिसत नाहीं, तर तो तरी आहे ह्मणण्याला, मनुष्याला तरी काय हक्क आहे? परमेश्वर असेल तर तो आह्मांला दिसला पाहिजे; आत्मा असेल तर तो आमच्या दृष्टीसमोर आला पाहिजे. नाहींतर त्याजवर विश्वास न ठेवणेंच बरें. ढोंगी होण्यापेक्षां उघडपणें नास्तिकपणा पतकरलेला बरा. एका बाजूनें आलीकडील विद्वानांची कल्पना अशी आहे कीं, धर्म, अध्यात्मविद्या आणि परमेश्वराविषयींच्या साऱ्या कल्पना झूट आहेत. दुसरी बाजू ह्मणजे अर्धेमुर्धे शिकलेले लोक. ह्यांची कल्पना अशी दिसते कीं, ह्या गोष्टींना खरोखर पाया—किंवा आधार—असा कांहींच नाहीं. तथापि त्यांची किंमत इतक्याच गोष्टीवरून ध्यावयाची कीं, जगाचें कल्याण करण्याचें त्यांच्या आंगीं उत्तम सामर्थ्य आहे. मनुष्यांनीं परमेश्वरावर भरंवसा ठेवला ह्मणजे तीं सुजन होतात; नीतिमान् होतात; आणि तेणेंकरून समाज उत्तम चालतो. त्यांच्या अशा प्रकारच्या कल्पना असल्या ह्मणून आमच्यानें त्यांस दोषही देववत नाहीं. कारण, त्यांना असेंच शिक्षण मिळालेलें असतें कीं,

दुसऱ्या कोणत्याही गोष्टींकडे लक्ष्य न देतां शब्दांच्या वाचाळतेवरच अखंड विश्वास ठेवावा. शब्दांचा कोटिक्रम झाला ह्मणजे बस्स्; आमचें भागलें. असें तरी त्यांच्यानें होईल काय? होत असेल तर, मनुष्यस्वभावाला मला मुळींच महत्त्व देतां येणार नाहीं. मनुष्याला सत्य पाहिजे; त्याला स्वतःला त्या सत्याचा अनुभव पाहिजे; तें त्याच्या मनांत बिंबलें पाहिजे; त्याचा उपयोग करायला पाहिजे; आणि त्याचा अंतःकरणांत प्रकाश पडला पाहिजे. ह्याबद्दलची खात्री एक वेदच करील; साऱ्या संशयांचा उच्छेद होईल; अज्ञानांधकार लयास जाईल; आणि कुत्सित कल्पना सर्व ताळ्यावर येतील. तो ह्मणतो "हे मृत्युलोकच्या मुलांनो! आणि अत्त्युच्च लोकांत वास्तव्य करणारांनो! तुह्मांला सुद्धां एक मार्ग आहे. ह्या अंधकारांतून मुक्त होण्याला तुह्मांलाहीं एक युक्ति आहे. ती ही कीं, ह्या अंधकाराच्या जो अतीत आहे त्याला पाहणें. त्याला दुसरा ह्मणून मार्ग नाहीं."

राजयोगशास्त्र हें, मनुष्यजातीस त्याला पोंचण्याचा अनुभविक आणि शास्त्रीय पद्धतीनें तयार केलेला मार्ग दाखवून देतें. कोणत्याही शास्त्राची माहिती मिळविण्याला आधीं एक ठरीव रस्ता असावा लागतो. आपल्याला ज्योतिषशास्त्री बनणें आहे; आणि आपण 'ज्योतिष! ज्योतिष!' ह्मणून ओरडत बसलों, किंवा कंठशोष केला, तर तें कांहीं प्राप्त व्हावयाचें नाहीं. रसायनशास्त्राची गोष्टही तशीच. त्याचा कोणता तरी एक ठरीव मार्ग धरला पाहिजे. आपण रसायनशालेंत गेलें पाहिजे; निरनिराळे पदार्थ घेतले पाहिजेत; त्यांचें मिश्रण केलें पाहिजे; त्यांचा मिलाफ झाला पाहिजे; त्यांचे प्रयोग करून पाहिले पाहिजेत; तरच रसायनशास्त्राचें ज्ञान प्राप्त होईल. आपणाला ज्योतिषी बनायाचें असेल तर, वेदशाळेंत गेलें पाहिजे; दुर्बीण घेतली पाहिजे; ग्रहांचे व उपग्रहांचे वेध घेतले पाहिजेत, ह्मणजे मग आह्मी ज्योतिषी बनूं. प्रत्येक शास्त्राला त्याचे त्यांचे मार्ग आहेत. मी आपणाला हजारों व्याख्यानें देईन, पण त्यांच्या योगानें आधीं त्या मार्गाचा अभ्यास केल्याशिवाय, आपणास कांहीं धार्मिक होतां येणार नाहीं. हे सर्व देशांतील तत्त्ववेत्ते, साधु, महानुभाव, विरक्त, जगाच्या कल्याणाशिवाय दुसरें ज्यांचें जगांत कर्तव्यच नाहीं, अशा सर्व जगांतील सत्पुरुषांचे सार्वकालचे सिद्धांत आहेत.

साधारण ज्ञानानें जे अनुभव येतात, त्यापेक्षां कांहीं उच्चप्रतीचे अनुभव आपल्यास आलेले आहेत, असें ते प्रतिपादन करतात, आणि त्यांची प्रचीति दाखविण्यास ते तयारही असतात. ते आपणांस सांगतात कीं, उक्त मार्गानें जाऊन खऱ्या रीतीनें अभ्यास करा; आणि मग जर हे उच्चप्रतीचे सिद्धांत अनुभवास न येतील, तर मात्र तुह्मांस ह्मणण्यास हक्क पोंचेल कीं, 'ह्यांच्या बोलण्यांत कांही तथ्यांश नाहीं.' पण तें करावयाच्या आधींच त्या सत्यसिद्धांताला नांवें ठेवणें सयुक्तिक नव्हे. ह्याकरितां त्यांनीं सांगितलेल्या पद्धतीप्रमाणें आपण बिनचूक अभ्यास केला पाहिजे. ह्मणजे अनुभवाचा प्रकाश पडेल.

आपण नेहेमीं ज्ञान प्राप्त करून घेणें तें साधारण नियमावरून करून घेतों. आणि ते नियम प्रत्यक्षप्रमाणाच्या पायावर रचलेले असतात. आधीं आह्मी खऱ्या गोष्टी प्रत्यक्ष पाहतों, आणि मग सर्वसाधारण असे नियम बांधतों. आणखी, सिद्धांत किंवा तत्त्व जें काय काढावयाचें तें मग काढतों. प्रत्यक्षानुभवाचें सामर्थ्य आंत उत्पन्न झाल्याशिवाय मनाचें, मनुष्याच्या अंतस्थस्वभावाचें, व विचाराचें ज्ञान कधींही होऊं शकत नाहीं. बाह्य जगांतील सत्यता पाहणें फार सोपें आहे. आणि जगद्धर्माच्या प्रत्येक गोष्टीचा अनुभव घेण्याला हजारों साधनेंही आहेत; परंतु अंतर्विश्वांतील—अंतःकरणांतील—सूक्ष्मसृष्टींतील—अदृश्यव्यापारांतील—गोष्टी कळण्याच्या कामीं साह्य करण्याला आह्मांस कांहीं साधन नाहीं. तरी खरें शास्त्र समजण्याला तीं आह्मांस पाहिलीं पाहिजेत, हें आह्मांस माहीत आहे. शास्त्रांतील प्रत्येक भाग नीट समजल्याशिवाय, केवळ उपपत्तीनेंच शास्त्राचें ज्ञान होणें मुष्किलीची गोष्ट आहे. आणि ह्मणूनच अनादिकालापासून ज्या थोड्यांनीं अनुभव घेतलेला आहे, ते खेरीज करून—मानसिकशास्त्रवेत्ते आपआपसांत भांडत बसले आहेत.

राजयोगशास्त्र हें मुख्यत्वेंकरून अंतःस्थितीचें—सूक्ष्मव्यापाराचें—अवलोकन करण्यास साधनें देण्याचें कबूल करतें. आणि तें साधन मन हेंच होय. मनाच्या एकाग्रतेचें सामर्थ्य योग्य रीतीनें मार्गास लावलें, आणि अंतर्विश्वाकडे—सूक्ष्मसृष्टीकडे—त्यास वळविलें, तर तें मनाचेंच पृथक्करण करतें, आणि आह्मांस सत्य गोष्टीचा प्रकाश देतें. मनाच्या शक्ति प्रकाशकिरणाप्रमाणेंच विकास पावतात. त्या एकत्र झाल्या तर, प्रत्येक

गोष्ट सुप्रभ दिसते. आमच्यापाशीं ज्ञानाचा झरा ह्मणून जो काय आहे तो येवढाच. प्रत्येक जण जडसृष्टीमध्यें, व सूक्ष्मसृष्टीमध्यें त्याचा उपयोग करून घेतो. पण हें सूक्ष्मावलोकन जडशास्त्रज्ञ बाह्यसृष्टीमध्यें खर्च करतो, आणि मानसशास्त्रज्ञाला तें सूक्ष्मसृष्टींत खर्च करावें लागतें, आणि त्याला मोठा अभ्यास लागतो. आमच्या बालपणापासून आह्मांला बाह्यसृष्टीवरच लक्ष्य देण्यास शिकविलेलें असतें. सूक्ष्मसृष्टीवर आमचें मुळींच लक्ष्य असत नाहीं. त्यामुळें आमच्यांतील बहुतेकांच्या अंतस्थ यंत्ररचना पाहण्याच्या सामर्थ्याचा लोपच होऊन गेलेला असतो. मनाला अंतर्मुख करणें, बाहेर जाण्याचें बंद करणें, त्याचें सकल सामर्थ्य एकवटून त्याचा मनावरच प्रयोग करणें—तो असा कीं त्यानें आपले गुणधर्म ओळखावेत; आपल्या स्वरूपाची ओळख करून घ्यावी; त्याच्या प्रत्येक धर्माची त्याला माहिती व्हावी—हें कठीण काम आहे. तथापि, कोणत्याही विषयाचा शास्त्रीय पद्धतीनें पल्ला पोचविण्याला येवढाच मार्ग आहे.

आतां, अशा प्रकारच्या ज्ञानाचा उपयोग काय? असा प्रश्न होईल. तर सर्वांत मोठा उपयोग हा कीं, ज्ञान हें स्वतःच ज्ञानाचें उत्तम फल आहे. आणि त्याहून दुसरा मोठा फायदा हा कीं, तें आमचीं सर्व दुःखें लयास नेतें. मनुष्य जेव्हां आपल्या मनाचें पृथक्करण करतो, प्रत्येक मनुष्य निरखून पाहतो, तेव्हां कित्येक वस्तु कधींच नाश पावत नाहींत; कित्येक वस्तु स्वभावगत्याच अखंड, परिपूर्ण आणि सोज्वळ असतात, असें त्यास आढळून येतें, आणि मग त्याला दुःख होत नाहीं, व खेदही होत नाहीं. दुःखें हीं सारीं भीतीपासून आणि इच्छेच्या असमाधानापासून प्राप्त होतात. मनुष्याला जर असें समजून आलें कीं, आपण कधीं मृत्यु पावत नाहीं, तर त्याला मृत्यूचें येवढें मोठें भय वाटेनासें होतें. आपण परिपूर्ण आहों, अशी त्याची खात्री झाली ह्मणजे पोकळ इच्छा तो करीनासा होतो. ह्या दोन गोष्टी बंद पडल्या ह्मणजे मग दुःख नाहीं. मग तो ह्या देहांत असला तरी त्याला ब्रह्मानंदच आहे.

हें ज्ञान मिळविण्याला एकच मार्ग आहे. त्याला एकाग्रता असें ह्मणतात. रसायनशास्त्रवेत्ते आपल्या कारखान्यामध्यें, आपले सर्व मनोत्साह एकत्र करून ते ज्या पदार्थांचें पृथक्करण करीत असतात, त्यात्याकडे लावतात. तेव्हांच त्यांतील गुप्त गोष्टी त्यांस कळतात. ज्योतिषी

आपल्या मनाचे सर्व भाव एकत्र करून ते दुर्बिणीच्या द्वारें आकाशाकडे लावतात, तेव्हांच तारे, सूर्य, चंद्र इत्यादिक आपला गुप्तपणा त्यांस कळवितात. मी जो विषय आपणांपुढें बोलत आहें, त्याच्याकडे माझे सर्व विचार एकाग्रतेनें मला लावतां येतील, तर त्याचा मला अधिक ठसा उठवितां येईल. तुह्मी माझें भाषण ऐकत आहां, आणि आपलें सारें लक्ष्य माझ्याकडेच लावाल, तर मी जें काय सांगतों आहें, तें अधिक स्पष्ट रीतीनें ग्रहण कराल.

ह्या ज्ञानाच्या साऱ्या गोष्टी, मनःसामर्थ्याच्या एकाग्रतेवांचून कशा प्राप्त होतील? विश्व हें आपल्या जिवाशीं ठेवलेली गुप्त ठेव हवालीं करण्याला नेहमीं तयार असतें. मात्र त्याला एक बरोबर लागेल अशी थप्पड देण्याचें आपल्याला ज्ञान पाहिजे. ती थप्पड देण्याला बळ आणि हिम्मत एकाग्रतेनें प्राप्त होते. मनुष्याच्या मनःसामर्थ्याला मर्यादा नाहीं. अधिक एकाग्रता ह्मणजे कोणत्याही गोष्टींत अधिक प्रवेश होणें, आणि अधिक प्रवेश होणें तेंच गुप्त.

बाह्य वस्तूवर एकाग्रता होणें फार सोपें आहे. मन हें स्वभावतःच बाहेर जात असतें; परंतु धर्म, मानसशास्त्र, किंवा अध्यात्मविद्या अशासारख्यांमध्यें पाहणारा, आणि पाहण्याची वस्तु, हीं दोन्हींही एकच असतात. सूक्ष्म तत्त्व—किंवा अंतस्थ वस्तु—ती कोणती? तर स्वतः मन हीच. त्या मनाचा अभ्यास करणें जरूर आहे; ह्मणून मनच मनाचा अभ्यास करतें. मनाची एक शक्ति आपणास माहित आहे; तिलाच 'चिंतन' किंवा 'मन' असें ह्मणतात. मी तुमच्याबरोबर बोलत असतों, आणि त्याच वेळेस दुसरा मनुष्य बाजूस उभा राहून मी काय बोलतों तें ऐकत असतो, व विचार करीत असतो. आपण एकाच वेळीं काम करतों, आणि विचारही करतों. आणि आपल्या मनाचा दुसरा एक अंश, बाजूस उभा राहून तुह्मी कोणता विचार करीत आहां तें पाहतों. मनस्सामर्थ्याची एकाग्रता करून ती मनाकडेच वळवावी, ह्मणजे सूर्याचे किरण विकसित होण्यापूर्वींच आंधार जसा आपला गुप्तपणा सोडीत जातो, त्याप्रमाणें एकाग्र मन आपल्यांतील गूढ हृद्यें व्यक्त करीत सुटतें. ह्याप्रमाणें आपण पुनः विश्वासाच्या पायावर येऊं. तो पाया सत्य आणि निर्दोष धर्म हाच. आपण आपल्या ठिकाणींच पाहूंया, कीं आत्मे

आहेत किंवा नाहींत ? आयुष्य हें दोन दिवसांचें आहे, कीं शाश्वतचें आहे ? जगामध्यें परमेश्वर आहे का नाहीं ? एकाग्रता, हें आपल्याला सारें उघडें करून देईल. राजयोग जें काय शिकविणार ह्मणतो तें हेंच. मनाची एकाग्रता कशी करावी ? आपल्या मनामध्यें सत्य गोष्ट कशी शोधून काढावी ? आणि मग त्या गोष्टी सर्वत्र कशा पसराव्यात ? आणि त्यापासून आपल्या सिद्धांताला कसें स्वरूप आणावें ? हें सर्व राजयोगशिक्षणाचें फल आहे. ह्मणून तो, तुमचा धर्म कोणता ? हा प्रश्नच करीत नाहीं. नास्तिक असो; आस्तिक असो; ख्रिस्ती असो; यहुदी असो; कीं बौद्धधर्मी असो; आह्मी मनुष्यप्राणी असलों ह्मणजे वस्स्. प्रत्येक मनुष्यप्राण्याला धर्माचा शोध करण्याचें सामर्थ्य आहे, आणि हक्कही आहे. प्रत्येक मनुष्यप्राण्याला कारण काय तें विचार करण्याचा हक्क आहे. आणि त्यानें थोडेसे श्रम घेतले कीं पुरे, त्याच्या प्रश्नाचें उत्तर त्यालाच देतां येण्यासारखें आहे.

ह्यावरून आपणांस कळून येतें कीं, राजयोगाच्या अभ्यासाला विश्वासाची किंवा श्रद्धेची कांहीं आवश्यकता नाहीं. आपली आपल्याला ओळख पटल्याशिवाय विश्वास हा व्यर्थ आहे. तो जें काय शिकवितो तें हें. आपल्याला उभें राहण्यासाठीं सत्य कांहीं काठी मागत नाहीं. जागृतावस्थेमध्यें खरोखर ज्या गोष्टी घडतात, त्या सिद्ध करावयाला कांहीं स्वप्नांचा किंवा कल्पनांचा पुरावा पाहिजे, असें आपण कधीं ह्मणाल काय ? खचित ह्मणणार नाहीं. राजयोगाचा अभ्यास बराच काल करावा लागतो, व त्याला सतत परिश्रमाची गरज असते. ह्याच्या अभ्यासांत शारीरिक अभ्यासाचाही एक भाग आहे; परंतु मुख्य भाग मानसिक अभ्यासाचा आहे. थोडासा विचार केला तर, आपल्या शरीराशीं मनाचा किती निकट संबंध आहे, हें ध्यानांत येईल. मन हें देहाचा एक श्रेष्ठ भाग असून, तें देहावर सत्ता करतें, असें जर आपण मानलें, तर त्याचप्रमाणें देहही मनावर सत्ता करतो असें होतें. शरीर व्याधिग्रस्त असलें, तर मनालाही व्याधि असते. शरीर निकोप असलें, तर मनही निकोप आणि मजबूत असतें. शरीर क्षुब्ध झालें, तर मनाचीही चलबिचल होते. आणि मनाची चलबिचल झालेली असते, तेव्हां शरीरांतही चलबिचल होते. मनुष्यांच्या अधिक पक्षाचें मन देहाच्या

सत्तेखालीं असतें. ह्मणून त्याला प्रगल्भ दशा फारच थोडी. मनुष्यांचा पुष्कळ समाज—आपण मेहरबानी करून मला क्षमा करावी—पशूंपेक्षां फारच थोडा भिन्न असतो. इतकेंच नव्हे, तर पुष्कळ उदाहरणांत ही सत्ता हलक्या पशूंपेक्षां कांहीं अधिक नसते. आपल्या मनावर आपला दाब फारच थोडा असतो. ह्याकरितां, ती सत्ता वाढविण्यासाठीं, ती मनावर आणि देहावर ठेवण्यासाठीं, आह्मांला कांहीं शारीरिक सहाय्य-ही घेतलें पाहिजे. आणि शरीरावर पुरेशी सत्ता चालूं लागली ह्मणजे मग, मनाला कह्यांत आणण्याचा प्रयत्न करतां येतो. मनोधारणेच्या योगानें मनाला आपल्या ताब्यांत आणतां येतें; त्याजकडून आपल्या इच्छेप्रमाणें काम करवितां येतें; आणि इच्छेप्रमाणें त्याची एकाग्रताही करतां येते.

राजयोगाच्या मताप्रमाणें हें सारें दृश्य विश्व अदृश्याचा किंवा सूक्ष्माचा विस्तार आहे. सूक्ष्म तत्त्व हें नेहेमींचें कारण, आणि जड किंवा दृश्य हें त्याचें कार्य होय. ह्मणून दृश्यजन हें कार्य, आणि सूक्ष्म हें कारण. ह्यावरून दृश्यशक्ति हा फक्त जड भाग, आणि सूक्ष्मशक्ति ह्या श्रेष्ठ होत. त्या ज्याला सांपडतील, त्यांना जो धरून राहील, त्याच्या ताब्यांत सारें विश्व आलें ह्मणून समजावें. योगी आपल्याला साऱ्या विश्वावर सत्ता करणाऱ्या प्रभूपेक्षां कांहीं कमी समजत नाहीं. विश्वाचे नियम असें ज्यास आपण ह्मणतों, त्यांचा देखील जेथें अंमल चालत नाहीं, अशा ठिकाणीं तो पोचलेला असतो, आणि तेथें त्याला ह्या सर्वांच्या पलीकडचें जें काय तें मिळालेलें असतें. तो दृश्य आणि अदृश्य ह्या दोन्ही विश्वांचा धनी होतो. मनुष्याची सुधारणा आणि प्रगति ह्याच ह्या साऱ्या विश्वाला ताब्यांत आणतात.

निरनिराळ्या लोकांच्या तऱ्हा निरनिराळ्या असतात. कित्येकांचें मत दृश्य भागावर अंमल असावा, कित्येकांचें मत अदृश्य भागावर अंमल असावा. ह्मणून मनुष्यजातींपैकीं कित्येक लोकांस दृश्य भागावर अंमल असावासा वाटतो, व कित्येकांस अदृश्य भागावर अंमल असावासा वाटतो. कांहींचें ह्मणणें सूक्ष्मावर अंमल बसला कीं, प्रत्येक गोष्ट आपल्या हातांत आली. कांहींचें ह्मणणें जडावर अंमल बसला कीं, प्रत्येक गोष्ट आपल्या हातांत आली. शेवट पाहूं गेलें तर दोन्हीही गोष्टी खऱ्याच आहेत. कारण, मूळामध्यें सूक्ष्म आणि जड

हीं दोन्हींही नाहींत. जी मर्यादा कधींच दृष्टीं पडत नाहीं, ती खोटी असली पाहिजे. जडाभिमानी आणि सूक्ष्माभिमानी हे आपआपल्या ज्ञानाच्या शिखरास पोचले ह्मणजे एक ठिकाणीं मिळावेत, हें ठरलेलेंच आहे. जसें, एखाद्या वैद्याचें ज्ञान अगदीं शिखरास पोचलें ह्मणजे मग अध्यात्मविषयांत त्याचें अगदीं पाणी होऊन जातें, त्याचप्रमाणें अध्यात्मज्ञान्यालाही कळून येतें कीं, ज्याला आपण मन व जड असें ह्मणत होतों, त्यांत जो भेद आहे तोही खरोखर टिकणारा नव्हे. सर्व शास्त्रांचा रोंख व पल्ला पाहूं गेलें तर एकच आहे. तो हा कीं, ह्या साऱ्या अनंत वस्तु एकी वस्तूच्याच बनलेल्या आहेत. तें एकच अनेकत्वें करून वास्तव्य करतें. राजयोग अंतर्विश्वांतून निघून सूक्ष्मसृष्टीचा अभ्यास करावयास सांगतो. आणि त्याच्या द्वारें दृश्यावर आणि अदृश्यावरही आपली सत्ता चालवावी ह्मणतो. हा प्रयत्न प्राचीनकालापासून आहे. हिंदुस्थानाला तर तो गच्च मिठी मारून बसलाच आहे, पण इतर राष्ट्रांनींही त्याविषयीं खटपट केलेली होती. पाश्चात्य लोकांना मात्र त्या गोष्टीचें वैषम्य वाटलें. जे लोक ह्या अभ्यासास लागले, त्यांना चेटकी किंवा जादूगार असें समजून त्यांनीं उभे जाळले व ठार मारले. आणि हिंदुस्थानांत तरी तो, अनेक कारणांनीं, शेंकडा ९० अंश ज्ञानाची ज्यांनीं माती करून सोडली आहे, व जे त्याला नेहेमीं गुप्त ठेवून त्याचा बाऊ करून दाखविण्याचा प्रयत्न करून दाखवितात, अशांच्या हातीं पडला आहे. पण ह्या हिंदुस्थानाच्या स्थितीपेक्षांही, अर्वाचीनकाळांत—अलीकडे—गुरु—धर्माध्यक्ष ह्मणविणारे लोक जे उदयास आले आहेत, त्यांनीं फारच मातेरें करून सोडलें आहे. कारण, पूर्वी सांगितलेल्या लोकांना थोडेंतरी त्यासंबंधीं कळत असे; पण ह्या आलीकडच्या विघातक लोकांना त्यापैकीं कांहींच कळत नाहीं.

ह्या योगपद्धतीमध्यें जो गुप्तपणा व रहस्य असेल, तें एकदम काढून टाकलें पाहिजे. आयुष्यामध्यें मुख्य गोष्ट शक्ति. धर्मांत दुसऱ्या कोणत्याही गोष्टीप्रमाणें—अशक्तता आणणारे कोणतेही भाग, जे आपल्याला क्षीण करतात, त्यांचा त्याग केला पाहिजे. त्यांच्यांशीं आपणाला कांहींच कर्तव्य नाहीं. सारें गौप्य ठेवल्यानें मनुष्याच्या मेंदूस क्षीणत्व येतें. ह्यांच्या योगानें ह्या योगशास्त्राचा बराच नाश झाला

आहे. तरी शास्त्रांतील ती एक मोठी गुरुकिल्ली आहे. ती उघडी असण्याचा काल ४००० वर्षांच्याही पूर्वींचा होता. त्या वेळीं तो हिंदुस्थानांत उत्तम रीतीनें शिकवीत, प्रतिपादन करीत, आणि अनुभवही दाखवीत; परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, आलीकडचे पुष्कळ टीकाकार त्यासंबंधानें फार मोठमोठाल्या चुका करतात. ह्या विषयावर लिहिणारा जितका जितका जुना असतो, तितका तितका सयुक्तिक असतो. आलीकडचे भाराभर लेखक त्याच्या गुप्तत्वाविषयींच परोपरीनें बोलत असतात. असें गुपित राखणारे जे थोडे लोक आहेत, त्यांच्याच हातांत तें पडलें आहे. त्यावर दिवसाचा झगझगीत प्रकाश, व चिंतनाचे किरण पडण्याऐवजीं ते त्यावर झांकणच घालतात. जणूं काय, त्यांतील सर्व शक्ति ह्यांच्याजवळ आहेतच!

मी सांगणार ह्यांत गुप्त असें कांहींच नाहीं. मला जें कांहीं थोडें बहुत समजतें, तें मी तुह्मांस कळविणार. त्याचीं कारणें जेथपर्यंत मला सांगतां येतील, तेथपर्यंत सांगेन; पण मला जेव्हां समजेनासें होईल, तेव्हां मीं ग्रंथामध्यें असें ह्मटलेलें आहे, येवढेंच ह्मणेन. अंधन्यायानें विश्वास ठेवणें गैर आहे. आपण आपल्याशींच विचार करून निर्णय ठरविला पाहिजे. आपण अभ्यास केला पाहिजे; आणि ह्या गोष्टी घडतात किंवा नाहींत तें पाहिलें पाहिजे. जडधर्माचें शास्त्र जसें आपण शिकावयास प्रारंभ करतों, त्याच रीतीनें ह्याही शास्त्राचा अभ्यास केला पाहिजे. ह्यांत गुप्त किंवा अनर्थाचें असें कांहीं नाहीं. हें जोंपर्यंत खरें आहे, तोंपर्यंत भर रस्त्यावर आणि दिवसाढवळ्याही खुशाल प्रतिपादन करावें. ह्या गोष्टी छपविण्याचा प्रयत्न केला, तर मात्र अनर्थ होईल.

प्रथमतः राजयोग ज्याच्या पायावर उभारला आहे, त्या सांख्यशास्त्राचीही मी थोडीशी माहिती सांगतों. ह्या शास्त्राप्रमाणें ज्ञान होणें तें अवयवांच्या द्वारें होतें. उदाहरणः—डोळे ज्ञानाला इंद्रियांपर्यंत नेतात; इंद्रियें मनापर्यंत पोचवितात, मन बुद्धीपर्यंत पोचवितें; तेथून तें **पुरुष** (आत्मा) ग्रहण करतो, आणि परत काय हुकूम करावयाचा तो करतो. अशा रीतीनें इतर ज्ञानही पायरीपायरीनेंच प्राप्त होतें. **पुरुष** खेरीज करून बाकीचीं हीं सारीं इंद्रियें जड आहेत. परंतु मन हें दृश्यपदार्थापेक्षां फारच सूक्ष्मपदार्थाचें आहे. मन हें ज्या तत्त्वाचें

बनलें आहे, तें तत्त्व जड होतें. तें जड झालें ह्मणजे त्याला **तन्मात्रा** असें ह्मणतात. त्याहूनही घट्ट झालें ह्मणजे त्यास दृश्याकार येऊन तें जड बनतें. हेंच सांख्यशास्त्रांतील मुख्य तत्त्व आहे. ह्यावरून बुद्धि आणि बाहेरचा जड तत्त्वाचा भाग, ह्यांमध्यें फक्त एक पायरीचें अंतर राहतें. **पुरुष** येवढीच काय ती एक शाश्वतची वस्तु आहे. मन हें एक आयुध असून तें आत्म्याच्या हातांत आहे. त्याच्या द्वारें आत्मा हा बाह्यपदार्थांचें ग्रहण करतो. हें मन वारंवार चंचल होतें, आणि त्यापासून तरंग उत्पन्न होतात. तें एखाद्या इंद्रियाला, किंवा अनेक इंद्रियांना चिकटून राहूं शकतें, अथवा सोडूं शकतें. उदाहरणार्थः— मी जर घड्याळाचे ठोके लक्ष्यपूर्वक ऐकूं लागलों, तर डोळे उघडे असतांनाही मला कदाचित् दुसरें कांहीं दिसणार नाहीं, आणि त्यावरून माझें मन त्या वेळीं श्रवणेंद्रियाला चिकटलें होतें, आणि नेत्रेंद्रियाला चिकटलें नव्हतें असें दिसून येईल. अशा रीतीनें मनाला सर्व इंद्रियांशीं एककालींच चिकटून राहतां येतें. ह्या मनाच्या अंगीं आपल्यांत शिरून गतगोष्टीही पाहण्याची शक्ति आहे. ही गतगोष्टी जाणण्याची शक्तिच काय ती योग्यास मिळवावयाची असते. आपली एकाग्रशक्ति एकत्र करून त्या आंत घालून आंत काय घडतें तें तो शोधून काढतो. हें केवळ विश्वासानेंच खरें मानावयाचें असें नाहीं, तर कितीएक तत्त्ववेत्त्यांनींच ही फोड केलेली आहे. आलीकडचे शारीरशास्त्रवेत्ते आपणांस सांगतात कीं, नेत्र हें कांहीं दृश्येंद्रिय नव्हे; तर दृश्येंद्रिय जें आहे तें मेंदूमध्ये ज्ञानतंतूंच्या मध्यें आहे, आणि इतर ज्ञानेंद्रियेंही तशींच आहेत. हीं इंद्रियेंही, ज्या पदार्थांचा मेंदू बनलेला आहे, त्याच पदार्थांचीं आहेत. सांख्यशास्त्रही आपणांस हेंच सांगतें. पण एकाचें सांगणें शारीरिक बाजूनें, आणि दुसऱ्याचें सांगणें मानसिक बाजूनें. तरी दोहोंचेंही ह्मणणें एकच आहे. आह्माला त्या पलीकडे जावयाचें आहे.

ह्या सर्व गोष्टी पाहतां येतील, जाणतां येतील, अशा उत्तम ज्ञानाची स्थिति मिळविण्याविषयीं योगी खटपट करीत असतो. ज्ञान कसें चालतें? त्याला मन कसें ग्रहण करतें ? तें सत्याचा निर्णय कसा करतें ? आणि पुरुषाला कसें देतें ? इत्यादि गोष्टी आपणास पहातां येतील. हरएक शास्त्राला कांहीं तरी सिद्धता लागतात. प्रत्येक शास्त्राला त्याचा एक

ठरीव मार्ग असतो. त्याला अनुसरल्यावांचून त्या शास्त्राचें आपणास ज्ञान होत नाहीं. तशीच गोष्ट राजयोगाची आहे.

कित्येक नियमितपणाप्रमाणें अन्नालाही कांहीं नियम असणें जरूर आहे. आपण जें अन्न खाणार तें असें असलें पाहिजे कीं, त्याच्या योगानें आपलें मन अत्यंत पवित्र होईल. आपण पशुसंग्रहामध्यें गेलों तर ह्याची साक्ष तेव्हांच पटते. हत्ती हा प्राणी प्रचंड असूनही तो शांत व स्थिर असा आढळतो. आणि आपण सिंहाच्या व वाघाच्या पिंजऱ्याकडे गेलों तर, त्यांना एक क्षणही स्वस्थता नाहीं, असें आढळतें. ह्यावरून अन्नाच्या योगानें केवढा भेद होतो, हें सहज ध्यानांत येईल. आपल्या शरीरामध्यें ज्या ज्या शक्ति चालतात, त्या त्या सर्व अन्नापासून उत्पन्न होतात, हें आपण प्रत्यहीं पाहतों. आपण उपास करूं लागलों, तर आधीं आपलें शरीर सुकूं लागतें, नंतर शरीराला व्याधि जडते, नंतर थोड्या दिवसांनीं मानसिक शक्तीलाही दुःख भोगावें लागतें. पहिल्या प्रथम स्मरणशक्ति नाहींशी होते; नंतर त्याच्या पुढची पायरी ही कीं, आपणांस विचार करतां येत नाहीं, आणि मग चिंतन करण्याचा मार्ग खुंटतो. ह्याकरितां आपण जें अन्न खातों तें कसें असावें, ह्याबद्दल प्रथमच काळजी घेतली पाहिजे. आपणास पुरेशी शक्ति आली, आपला अभ्यास बराच वाढला, ह्मणजे मग ह्या बाबतींत विशेष काळजी करणें नको. रोपा लावला ह्मणजे त्याच्या भोंवतीं कुंपण पाहिजे; नाहींतर तो जाया होईल. पण त्याचें झाड बनलें ह्मणजे कुंपण काढून घेतात. त्याप्रमाणें सर्वोपरी अनुभव घडला, ह्मणजे मग त्याला मजबुती आली ह्मणून समजावें.

योग्यानें ऐषआराम किंवा शरीरक्लेश यांचा अतिशयपणा वर्ज्य केला पाहिजे. त्यानें उपोषणें करतां कामा नये, किंवा शरीराला जाळतांही कामा नये. असें करील तो योगी होणार नाहीं, असें गीतेंत सांगितलें आहे. जो उपास काढतो, जो जागरण करतो, जो फार निजतो, जो जीवापलीकडे कष्ट करतो, जो मुळींच काम करीत नाहीं, तो कधींही योगी होणार नाहीं.

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar at JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

BY SPECIAL APPOINTMENT TO

H. H. MAHARAJA SIR SHAHU CHHATRAPATI, G. C. S. I., KOLHAPUR.


PATRONISED BY

H. H. MAHARAJA SIR KRISHNARAJ WADIAR BAHADUR G. C. S. I., MYSOR.

AND

MOST OF THE PRINCES AND CHIEFS OF INDIA.

SPECIAL FOR INDIA.




# स्वधर्माभिमानी यांकरितां हिंदु वॉचेस.

हीं वॉचेस दिखाऊ, मजबूत, वजनांत हलकीं, मध्यम आकार, बरोबर वेळ दाखविणारीं, पांढरी मिन्याचे प्लेटवर सुंदर प्रेक्षणीय हिंदु पूज्य दैवतांचीं चित्रें वगैरे. हें वॉच एकवार घेतल्यास १०,२० वर्षें दुसरें घ्यावयास नको.

**हिंदु युनिव्हर्सल वॉच.**

ग्यारंटी ३ ते ६ वर्षें. रोमन आंकडे असून मध्यभागीं फक्त शंकरपार्वती व गजानन. निकलसिल्व्हर वॉच किं. रु. १६. चांदीचें वॉच किं. रु. ३०. सोन्याचें वॉच किं. रु. २५०.

**हिंदु प्राईज वॉच**—ग्यारंटी २ ते ५ वर्षें. मराठी व रोमन आंकडे असून चित्रें १६ आणि मध्यभागीं श्रीमहादेवपार्वती.

**निकल सिल्व्हर वॉच**—किं. रु. १५, चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३०, सोन्याचें किं. रु. १५०.

**हिंदु प्रिन्सलन्स वॉच**—ग्यारंटी १ वर्ष ते ४ वर्षेपर्यंत—डबल आंकडे, चित्रें १५ असून मध्यभागीं दरबारी थाटानें श्री. शिवाजी छत्रपतिमहाराज. नि. सि. वॉच किं. १०, १५. चांदीचें किं. रु. २५-३०.

**हिंदु आर्मी वॉच**—डबल आंकडे असून चित्रें २२. मध्यभागीं श्री. शिवाजी महाराज घोड्यावर बसलेले. निकल सिल्व्हर वॉच किं. रु. १० ते १५. चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३०. शिवाय वेस्टंड रिलायन्स ऑन ग्यारेल, कुरवायझर वगैरे प्रसिद्ध मेकरचीं लहानमोठीं वॉचेस आमचेकडे विकत मिळतील.

प्याकिंग पोस्टेज निराळें, वॉचबरोबर एक शेडा, पेटी, काच आणि स्प्रिंग मिळेल. व्ही. पी. पार्सलनें पाठवूं.

सर्व प्रकारचे वॉचेसचीं दुरुस्तीकामें माफक आकारानें ग्यारंटीसह करून देऊं.

सचित्र क्याटलाग फुकट. [१-१२

जी. बी. नाईक आणि कंपनी,

भायखळा, मुंबई आणि पुणें.

---

# धि इंडियन म्यारेज ऍण्ड डेथ बेनिफिट फंड लिमिटेड, मुंबई.

डिरेक्टर्स.

रावसाहेब दलपतराम प्राणजीवन खक्कर जे. पी.

बद्रुद्दिन अब्दुल्ला कूर एस्कायर जे. पी.

रुस्तम बी. पेमास्तर एस्कायर बी. ए. एल्. एल्. बी.

धनजीशा फ्रामजी चिनाय एस्कायर.

विष्णु नारायण परुळकर एस्कायर ( एक्स आफिशिओ. )

मध्यम स्थितींतील मनुष्यांस आपल्या मुलांमुलींच्या लग्नाचे वेळीं व आपल्या मरणानंतर आपल्या वारसाकरितां पैशाचा संग्रह करून ठेवितां यावा म्हणून हा फंड १८९४ मध्यें स्थापन झाला आहे. इतक्या अवधींत ३००० पेक्षां जास्त मेंबर झाले असून सरासरी १५० मेंबरांस फायदा मिळाला आहे. लग्नफंडाचीं वर्गणी दर महिन्यास १। पासून ६। रु. पर्यंत आहे.

**मरणफंडाची वर्गणी फक्त १ रुपया आहे.**

व या मरणफंडांतील मेंबरांच्या पश्चात् त्यांच्या वारसास २००० रुपयेपर्यंतची रक्कम फायद्यादाखल मिळेल. जास्त माहिती खालील पत्त्यावर एक आण्याचें तिकिट पाठविल्यानें मिळेल.

[१२-४

आफीस—५
कावसजी पटेल स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई.

परुळकर ऍण्ड कं०
एजंट्स.

धनुर्धारीकृत पुस्तक.

# प्रौढप्रतापनिधि माधवराव.

किंमत ०५ आणे. ट. ख. ०॥.

जनार्दन महादेव गुर्जर,

रामवाडी—मुंबई.

यांचा कदाचित् गुण नच आल्यास पैसे परत देऊंच.

## मंत्रसिद्ध ताईत व दोरे.

हिमालयावरील एका महान् तपस्वी (सिद्ध) पुरुषानें आमच्या निःसीम भक्तीस तुष्ट होऊन आपला अत्यंत उपयोगी असा जो पिशाचबाधा व दुसरे अनेक विकार दूर होणारा अद्भुत मंत्र तो ताईत व दोरे मंत्रून देण्यास शिकविला आहे. व त्या योगानें खालील विकार फार त्वरित बरे होतात. पिशाचादि पीडेनें मुलें, स्त्रिया किंवा पुरुष झोपेंत अगर जागृतावस्थेंत घाबरतात, कंप सुटतो, वेड लागतें, दांतओंठ चावतात, दचकून उठतात, व कधीं ज्वरादि विकार उत्पन्न होतात आणि कित्येक प्रसंगीं अपस्मार, भ्रम वगैरे अत्यंत वाईट रोग उत्पन्न होतात. कित्येक स्त्रियांस पिशाचादि पीडेनें संतती होत नसते व झालीच तर वांचत नसते. कित्येकांस स्वप्नामध्यें स्त्रीचा भास होऊन धातुपात होतो; कित्येक स्त्रीपुरुषांमध्यें व कित्येक मित्रांमध्यें वैमनस्यें उत्पन्न होतात, इत्यादि अनेक विकार या आमच्या अद्भुत मंत्रसिद्ध ताईत व दोरे यांनीं फार त्वरित खात्रीनें बरे होतात. गुणाबद्दल हजारों सर्टिफिकिटा मिळाल्या व मिळत आहेत. थोड्याच काळांत याचे अपूर्व गुण या देशाच्या आसमंताद्भागीं ब्रह्मदेश, सिलोन, बनारस, पंजाब, मद्रास, मुंबई, कानडा, इत्यादि ठिकाणीं अतिशय पसरले आहेत; सबब जास्त वर्णन करीत नाहीं. सिद्धमंत्र खोटे ह्मणणारांनीं एकवार अनुभव घेऊन पहावा, ह्मणजे ते नेहमींच ग्राहक बनतील. पुरुषांचे विकारांस दोरा, किं० ८ आणे. स्त्रियांचे विकारांस ताईत १ रु०; रुप्याचा २ रु०; सोन्याचा ६; कित्येक रोगांस दोन वस्तू घ्याव्या लागतील. दोन वस्तू घेणारास ४ आणे, टपालखर्च माफ. एकवार अनुभवानेंच पूर्ण खात्री होईल. माहितीखर्डा सोबत पाठविला जाईल. व्ही. पी.नें पाठवूं. पत्ता स्पष्ट व पूर्ण लिहावा.

विष्णुबोवा सिद्धमांत्रिक,

पत्ता—पोष्ट हर्णै, जिल्हा रत्नागिरी.

१—१२]

## केरळकोकिळचित्रविद्यालय.

# फोटोग्राफचा कारखाना.

आमच्या कारखान्यांत अगदीं नवीन तऱ्हेचीं तलख यंत्रें विलायतेहून आणविलेलीं आहेत.

ह्यांच्या योगानें $\frac{1}{100}$ सेकंदांत तसबीर निघते. ह्यामुळें लहान मुलांच्या व जनावरांच्या सुद्धां तसविरी काढण्यांत येतात.

झिलईकाम फारच मनोहर—केवळ काच लाविली आहे, असा भ्रम होतो.

## विक्रीस तयार असलेल्या तसविरा.

जगत्प्रसिद्ध भिंवा सुताराच्या हातचें रामपंचायतन; वनवासी[1] राम, आनंदभुवन, राजा रविवर्म्यांच्या तसविरा, श्री० बाळासाहेब पंतप्रतिनिधि बी. ए. ह्यांच्या हातच्या शंकरपार्वती, गणपति, महाविष्णु, शिवाय दत्तात्रय, गजेंद्रलक्ष्मी इत्यादि देवतांच्या, साधुपुरुषांच्या, श्रीमन्महाराज छत्रपति शाहूमहाराज कोल्हापूर इत्यादि राजेरजवाड्यांच्या, दुष्काळग्रस्त लोकांच्या, स्त्रियांच्या, लहान लहान गोजिरवाण्या मुलांच्या, मोठमोठ्या इमारतींच्या व देखाव्यांच्या, कारागिरीच्या उत्तम पदार्थांच्या, इंडियन क्यारेक्टर्स—हिंदुस्थानांतील लोकांच्या रीतीभातींच्या तसबिरा, व त्यांचीं सुंदर सुंदर आल्बमूस—बुकें विक्रीस तयार आहेत.

नमुने समक्ष पहावयास मिळतील. क्याटलॉग लवकरच तयार होईल.

### किंमती.

कार्डसाईज ।– क्याबिनेट ।।– फूलसाईझ १।। रु.

ह्याशिवाय क्रिस्टोलियम् पेंटिंगचे नमुने हेही आमचे येथें आहेत.

नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. उत्तरास तिकिट आल्याशिवाय उत्तर मिळणार नाहीं; व **आगाऊ पैसे** किंवा **व्ही. पी.** नें माल मागितल्याशिवाय मागणीकडे लक्ष दिलें जाणार नाहीं.


**आठल्ये आणि सन्स,**
फोटोग्राफर्स व आर्टिस्टस्.

**विशेष सूचना**—वरील फोटो **दत्तात्रेय कृष्ण सांडू,** दुकान रामवाडी, मुंबई, यांजकडेही मिळतील.

---

१ कोल्हापूर येथील शास्त्रीय प्रदर्शनाचे देखावे—जसें 'वायुशास्त्र,' 'पदार्थविज्ञानशास्त्र' 'जलशास्त्र,' 'रिक्तनळ्या,' 'उष्णता,' इत्यादि. तसेंच नव्या शोधाप्रमाणें एक्सरेज्नें काटलेले जीवंत मनुष्याच्या हाडांचे फोटोही येथें विक्रीस तयार आहेत. तसेंच सिंह, हत्ती, उंट, ओऱ्यांगओट्यांग, हिपोपोट्यामस वगैरे चित्रें त्यांच्या संक्षिप्त वर्णनासुद्धां विक्रीस तयार आहेत.

फेब्रुवारी. (वर्षाची वर्गणी १०३ ट. खर्चासह. फुटकळ अंकास ०४.) १८९८.



# केरळकोकिळ.

वर्षारंभ जानेवारी.

पु० १२] [अं० २

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्तवापराधः ।
सहकारतरौ चकार यस्ते सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

रामवाडी
मुंबई.

सर्व हक्क राखून ठेविले आहेत.

विषयांची अनुक्रमणिका.


| | पृष्ठ. | | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| नॉटिलस अथवा शिडें उभारून जाणारें जलचर. ... | २५ | राजयोग, प्रकरण दुसरें. ... | २८ |
| | | पुस्तकपरीक्षा ... ... | ३९ |



## आमचा नवा क्याटलॉग मागवावा.

मिळणारीं सर्व प्रकारचीं पुस्तकें आमचे दुकानांतून व्ही. पी. नें रवाना होतील.

रामवाडी–मुंबई.

आमचीं फक्त खासगी पुस्तकें खालील पत्त्यावरूनही रवाना होतील.

मु० पार्पुंड पोष्ट पनवेल,

जि० कुलावा.

**जनार्दन महादेव गुर्जर.**

## हरएक प्रकारचा माल

मुंबईंत मिळणारा, व्यापारी व ग्राहक यांस रोख पैसे आल्यास पाठवूं.

**नियम व माहिती अर्धा आणा आल्यास मिळेल.**

व्यापारी व ग्राहक यांकरितां. **हरएक प्रकारचा माल** मुंबईंत मिळणारा बक्षशीर बाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय.

D. K. SANDU,
RAMWADI, BOMBAY.



**दत्तात्रेय कृष्ण सांडू** यांचें हरएक प्रकारचा माल मिळणारें, आणि माफक **अडत** घेऊन माल रवाना होणारें दुकानः—

रामवाडी, मुंबई.

**खरा हस्तिदंती माल**–फण्या ८८ ते ३ रु., **कंगवे** ८८ ते ८१२ आ., **फांसे जोड** २ ते ७॥ रु., **नाटाचे फांसे** ८६ ते ८१२ आणे.

वा. कृ. सांडू, दुकानदार—रामवाडी, मुंबई.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

: आर्यमहौषधालय मु० आंजलें.

या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊंच व त्याशिवाय त्यांच्या आरोग्यार्थ एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकटच देऊं.

# मदनविलासामृतसंजीविनी.

## वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहक, बुद्धि-कांतिवर्धक व धातुपौष्टिक सुवर्णमाक्षिक मौक्तिक कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्त्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्वभागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, छातींतील रोग, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, वातरोग, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, हात, पाय, मूत्रमार्ग, व शरीर यांचा दाह, व अरुचि, इ० अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास नवीन किंवा जुनाट असले तरी खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचे त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस शारीरिक व मानसिक श्रम फार पडतात, त्या सर्वांच्या आंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो व सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें. कोष्ठशुद्धि होते. या अप्रतिम गुटिका अत्यंत शोधानें केल्या असून त्यांच्या अप्रतिम गुणका-

रित्याबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं, असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस वंगीचा सर्व टपालखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळ्यांस १ रु. ७० गोळ्यांस २ रु. १६० गोळ्यांस ४ रु. २६० गोळ्यांस ६ रु. ५२० गोळ्यांस १० रु.

**थंडगार नेत्रांजन**—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार, तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

**विशेष सूचना.**—अलीकडे आंजर्लें व मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या बऱ्याच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष संभव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें "**कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य, मु० आंजर्लें, ता० दापोली, जि० रत्नागिरी.**" याच पत्त्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपानपत्रक सोबत असतेंच.

२-१२]


केरळकोकिळ.

पु० १२ ] [अं० २

# नॉटिलस

## अथवा

## शिडें उभारून जाणारें जलचर.



कोणाकारणें हें जालेंसे निर्माण ।
देवाचें कारण देव जाणे ॥ १ ॥

**तुकाराम.**

सृष्टींतील जीवकोटीच्या नानाविध व अद्भुत चमत्कारांची नोंद करावयास, अखंड, अवाढव्य व सर्वोत्कृष्ट भांडार काय तें महासागरच होय. त्याच्या जगड्वाळ उदरांतील प्राणिसंचयाची परिमिती कोणाच्यानें करवेल ? नानाप्रकारच्या मत्स्यांचें, कीटकांचें, कूर्मांचें व जलस्थ चतुष्पादांचें जग काय तें तेंच. त्यांत किती, केवढे व कसे, अपूर्व व लोकोत्तर प्राणी वास्तव्य करीत असतील, ह्याची नुसती कल्पना होणें कठीण. मग ते कां उत्पन्न झाले, त्यांचा जगतांत उपयोग काय, ह्याचा थांग मानवी प्राण्याला कोठून लागणार ? त्यांचीं कारणें उकलावयास मूर्तिमंत सृष्टिकर्ताच पाहिजे. कोट्यवधि अगम्य जीवजंतूंचा सांठा सर्व तेथें खचलेला आहे. त्यांत कित्येक जलचर भूचरांशीं साम्य पावणारे आहेत. कांहीं तर मानवी प्राण्यांची प्रतिबिंबें आहेत, असा भास होतो. जणू काय

एखाद्या मठवाशानेंच पेहराव करावा, असा दिसणारा 'मंकसील' अथवा 'जोगीमत्स्य'[1], युरोपांतील धर्माधिकाऱ्यांसारखी उंच सुळक्याची टोपी मस्तकावर धारण करून, तशीच निम्मी छाटलेली दाढी लवून, तसाच झगा चढविल्यासारखा दिसणारा 'बिशप्सील'[2], आणि एखाद्या उत्तम स्त्रीप्रमाणें दिसणारा अर्धांगसुंदर मत्स्य 'सिरेन' अथवा 'जलदेवता'[3] हीं ह्या गोष्टीचीं प्रत्यक्ष उदाहरणें होत. अशा प्रकारचीं प्राणिवैचित्र्यें महासागरांत असंख्य सांपडतील. आजवर चित्रांत दिलेला 'नॉटिलस' नांवाचा प्राणी अशांपैकींच एक होय.

हा प्राणी फार विलक्षण आहे. नॉटिलस ह्या शब्दाचा अर्थ नौका असा होतो. ह्यास दुसरेंही एक नांव देतात. तें अर्गोनॉट होय. ह्यांतील 'अर्गो' ह्याचाही अर्थ जहाज असा होतो. ह्यास स्वयंसिद्ध व सजीव तारूं ह्मटल्यास शोभण्यासारखें आहे. ह्या प्राण्याविषयीं भाराभर दंतकथा लोकांत पसरल्या आहेत. त्यावरूनच, ह्या प्राण्याचें अनुकरण करून, मानव जातीनें जहाजाची कल्पना काढली असावी, असें ह्मणतात. नॉटिलस ही सर्वोत्कृष्ट आदिनौका होय, असा समज आहे. पाश्चात्य कवींचा तर हा एक आवडता विषयच होऊन बसला आहे. स्मिथ्, मॉन्टगामेरी, डॉ. बर्नार्ड वगैरे मंडळींनीं ह्याच्यावर बरींच काव्यकुसुमें वाहिलीं आहेत. हा प्राणी, त्यांतही विशेषेंकरून पेपर नॉटिलस नामेंकरून जी एक ह्याची जात आहे, ती पाहतांच कोणीही मनुष्य तल्लीन होऊन जाईल, इतकी ती सुंदर असते.

भूमध्यसमुद्रांत व हिंदीमहासागरांत हे प्राणी विपुल सांपडतात. नॉटिलस शंखांत राहतो. शंखांत राहणाऱ्या इतर सर्व प्राण्यांत ह्याचें कवच सर्वोत्कृष्ट असतें. तें अतिशय पातळ—नाजूक, फारच सफेत व तजेलदार, असतें. त्याजवरील पृष्ठभागाकडे वळलेले दांडोरे, किंवा शिरा उत्तमोत्तम असतात. हवेंत गारवा आला कीं ही स्वारी पाण्याच्या सपाटीवर आलीच ह्मणून समजावें. आणि आपलीं लहान लहान अंतस्त्वचाभूत अवजारें वायूच्या लहरींत फडकावीत सोडून, पायांचीं वल्हीं मारमारून, नॉटिलस मोठ्या डौलानें पाण्यांत इकडे तिकडे भ्रमण करूं

---

१ पु. ८ अं. ३ मध्यें पहा. २ ह्या प्राण्याचें सचित्र वर्णन पुढें केव्हां तरी देण्यांत येईल. ३ पु. ५ अं. ३ मध्यें वर्णन पहा.

लागतो. केव्हां केव्हां तो फक्त आपलीं अवजारें पसरून, आपल्या आठ भुजा किंवा तंतु, आपल्या अंगभूत नौकेच्या कठड्यावर लोंबकळत ठेवतो. किंवा प्रसंगविशेषीं ते तंतु सुकाणू फिरविण्याच्या कामीं योजितो. सुकाणू धरतो तें कसें पण, अगदीं एखादा कसलेला हुशार दर्यावर्दीच जसा कांहीं; फक्त गाणें काय तें कमी.

वुड्च्या 'झूग्राफींत'—प्राणिवर्णनांत—येणेंप्रमाणें लिहिलें आहे:—"नॉटिलस जेव्हां महासागराचा ठाव सोडून, पाण्याच्या सपाटीवर येऊं लागतो, तेव्हां तो आपल्या कवचांतून पाण्याचा धोतच्याधोत बाहेर सोडतो. त्यामुळें त्यास परिवेष्टित पृष्ठभागापेक्षां अधिक तेज चढतें. आणि मग तो अर्थातच, नौकेप्रमाणें पाण्यावर फिरण्याकरितां वर येतो. ह्या प्राण्याचे थवेच्याथवे समुद्रांतून मनःपूत जलविहार करीत, इतस्ततः संचरत असलेले दृष्टीस पडतात. परंतु जर कदाचित् एखादा संकटसमय प्राप्त झाला, किंवा वारा जरा सोसाट्याचा सुटूं लागला, तर ते झरकन आपलीं अवजारें पाडतात, आणि शंखांत आपलें अंग चिरमुटून घेऊन, तब्बडतोब समुद्रतळीं दडी मारतात. त्यांच्या ह्या अमर्याद भित्रेपणाची, मजल केव्हां केव्हां इतक्या लांब जाऊन पोंचते कीं, त्यांस आपला प्राण वांचवितां वांचवितां बेजार होऊन जावें लागतें. कारण खलाशी लोक नेहमीं त्यांच्या पाठीस लागतात. आतां नॉटिलसही कांहीं सावध कमी नसतो. मनुष्य त्यास धरावयास लांब हात पसरतो न पसरतो, तोंच तो कांहीं अंतरावर आहे, असें पाहून, हा समुद्रांत पटकन बुडी मारतो, व मानवी दृष्टीच्या आड होतो."

नराची लांबी एक इंच असते. मादी मात्र त्याजहून बरीच मोठी असते. तिच्यावरचें कवच फार सुंदर असून, तें अगदीं सुटें असतें. पण ते बदकाच्या पायांसारखे सांधलेले त्याचे तंतु पाठीकडे वळलेले असतात. आणि त्या कवचाच्या कण्याकडे एक 'फनेल' किंवा नाळकें असतें. तो त्या नाळक्यानें पाण्याचे फवारे उडवीत सर्व समुद्रभर डुबकत असतो. आणि आपलें घर पाठीवर घेऊन, मस्तकाचा भाग खालतीं करून, सरपटत जातो.

पर्ली— मौक्तिकवत्—नॉटिलस ह्मणून ह्याची एक जात आहे. त्याच्या कवचांत लहान लहान दालनें असतात. ह्याचें कवच नागमोडीसारखें

वेंटाळलेलें असतें, आणि कवचाच्याच घड्याघड्या पडून, त्याचे खण बनतात, व त्यांच्याच जणू काय भिंती होऊन, पुष्कळअंशीं दालनें झालेलीं असतात. आणि त्या कवचाच्या मध्यभागीं एक आरपार अंतस्त्वचेची नळी असते. त्या कवचांतील निरनिराळीं दालनें वायूनें भरून गेलेलीं असतात. आणि अंगाभोंवतालच्या पाण्यापेक्षां कवचाचें विशेष वजन कमी करून ताफ्यासारखें तरंगतां यावें, एवढ्याकरतांच त्याचा उपयोग त्या प्राण्यास करितां येतोसें दिसतें. त्या दालनांतील सर्वांत मोठें व शेवटचें जें दालन असेल, त्यांतच तो वास्तव्य करतो. त्यांतून त्यास पाहिजे तेव्हां डोकें बाहेर काढतां येतें.

ह्या प्राण्यास आठ, दहा किंवा अकरापर्यंत तंतु असतात. ते बरेच लांब वाढलेले असून, कवचभर पसरलेले असतात. कवचाच्या कंगोऱ्यास ते चिकटलेले असल्याकारणानें, त्यास त्याचें चांगलेंच आच्छादन होतें. हे वर सांगितलेले तंतु हीं त्याचीं अवजारें नव्हत. त्याच्या कवचाच्या वाढीकरतां तो एक प्रकारचा चूर्णधर्मक रस बाहेर टाकतो, आणि तो रस ज्या ज्या इंद्रियांतून बाहेर पडतो, तीं तीं इंद्रियें त्याचीं अवजारें–किंवा अवजारांसारखीं दिसणारीं–होत. नॉटिलस हा जवळ जवळ माशासारखा—समुद्रफेण माशासारखा–एक कवड्यांत राहणारा प्राणी आहे. आतां ह्याचें उपजीविकेचें साधन काय? साधन तें काय असावयाचें; एवढा थोरला समुद्र भरला असल्यावर आणखी काय पाहिजे? त्यांतील खळमळ हेंच त्याचें जीवन! त्यांतील क्षारोदक हीच त्याची उदरतृप्ति! आणि त्यांतील चिखल हेंच त्याचें शय्यास्थान!

---

# राजयोग.

## प्रकरण दुसरें.

### आद्यस्थिति.

राजयोगाच्या आठ पायऱ्या केलेल्या आहेत. पहिली **यम**–हींत अहिंसा, सत्य, अनपहार, ब्रह्मचर्य आणि निस्पृहता ह्यांचा अंतर्भाव

---

१ पु. ११ अं. ३ पहा.

होतो. दुसरी **नियम**—हींत पवित्रता, समाधान, सहनशीलता, अभ्यास आणि तद्रूपता ह्यांचा अंतर्भाव होतो. नंतर **आसन** किंवा मुद्रा; **प्रत्याहार** किंवा मनाची अंतर्मुखता; **धारणा** किंवा निग्रह; **ध्यान** किंवा एकाग्रता; व **समाधि** किंवा आत्मस्वरूपज्ञान. आमच्या मतें **यम** व **नियम** हे नीतिशिक्षणाचे भाग होत. पण तोच पाया असल्यामुळें त्याच्याशिवाय योगाभ्यासाची सिद्धि होणार नाहीं. ह्या शक्ति अंगांत भिनल्या, तरच योग्यालम्र त्याच्या अभ्यासाचीं फळें मिळूं लागतात. ह्याच्याशिवाय त्यास फळ मिळणार-नाहीं. कोणालाही कृतीनें किंवा शब्दानें दुखवावयाचें योग्यानें मनांत सुद्धां आणूं नये; आणि ही गोष्ट एका मनुष्यप्राण्यालाच लागू आहे असें समजूं नये, तर सर्व प्राणिमात्रांसही तोच नियम लागू असावा. दया ही कांहीं एका मनुष्यजातीकरतांच केलेली नाहीं, तर तिनें त्याच्याही पलीकडे जाऊन सर्व जगास व्यापून टाकलें पाहिजे.

दुसरी पायरी आसन किंवा मुद्रा. हा शारीरिक व मानसिक अभ्यास कांहीं उच्च प्रतींच्या स्थिति प्राप्त होईपर्यंत प्रत्येक दिवशीं चालवावा लागतो. ह्मणून आपणास मुद्रा शोधून काढणें ती अशी काढली पाहिजे कीं, तिच्यामध्यें आपणांस दीर्घ कालपर्यंत राहतां येईल. आपणांस अगदीं साहजिकपणें करतां येईल तीच मुद्रा आपण केली पाहिजे. एखादी ठरीव मुद्रा एखाद्याला सोपी वाटेल, पण तीच दुसऱ्याला अतिशय कठीण वाटेल. शिवाय ह्या मानसिक स्थितीच्या अभ्यासामध्यें शरीरावर अनेक परिणाम घडतात असें आढळून येतें. ज्ञानरसाचा प्रवाह भ्रष्ट होऊन त्या ठिकाणीं निराळाच मार्ग तयार होतो. निराळ्याच तऱ्हेचे तरंग उठण्यास सुरवात होते, आणि प्रकृतीची सारी रचनाच नवी होऊन जाते. चैतन्याचा सारा भाग पाठीच्या कण्यावर येऊन राहतो. कारण, मुद्रेमध्यें पाठीचा कणा मोकळा धरणें, अगदीं ताठ बसणें, छाती, मस्तक, आणि मान हे तीन भाग एका रेषेंत येतील असे ठेवणें हें मुख्य कर्तव्य असतें. देहाचा सारा भाग पाठीच्या कण्यावर पाडावा, ह्मणजे आपणांस पाठीचा कणा सरळ होण्यासारखी मुद्रा सहज करतां येते. कोणताही गहन विचार करणें तो छाती वांकवून कधींच करतां येत नाहीं, ही गोष्ट नेहेमींच्या अनुभवांतील आहे. हा भाग कांहीं अंशीं हठयोगासारखा आहे, आणि तो फक्त जडदेहापुरताच आहे.

दृश्य शरीराला मजबुती आणावी, एवढाच त्याचा उद्देश. ह्या ठिकाणीं त्याच्याशीं आपल्याला कांहीं कर्तव्य नाहीं. कारण, त्याचा अभ्यास फार कठीण आहे. तो एक दोन दिवसांत होण्यासारखा नाहीं. आणि सर्वांत मोठी गोष्ट ही कीं, त्यापासून आत्मोन्नति अशी कांहींच नाहीं. **देलसाते** आणि इतर धर्मगुरु ह्यांच्यांमध्यें हे असले अभ्यास अनेक प्रकारचे आपणांस आढळून येतात. हे लोक आपलें शरीर अनेक प्रकारच्या मुद्रेमध्यें ठेवीत असत; परंतु त्यांचा उद्देश फक्त शारीरिक कार्याकडे लावण्याचा असतो. मानसिक कार्याचा नसतो. ज्याच्यावर मनुष्याची सत्ता चालत नाहीं, असा देहामध्यें एकही स्नायु नाहीं. तो हृदयाला सुद्धां चालवूं शकतो, किंवा थांबवूं शकतो. आणि त्याच रीतीनें तो आपल्या अवयवांच्या कोणत्याही भागाकडून आपल्या हुकमाप्रमाणें कोणतेंही काम करवितो.

योगाच्या ह्या भागाच्या योगेंकरून मनुष्यें पाहिजे तितके दिवस वांचूं शकतात. अंगीं आरोग्यता आणणें, हें हठयोग्याचें मुख्य लक्षण आहे. आपण कधीं आजारी पडावयाचें नाहीं, हा त्याचा कृतनिश्चय असतो; व त्याप्रमाणें तो पडतही नाहीं. तो दीर्घायुषी होतो. शंभर वर्षें हीं त्याच्या खिसगणतींत नाहींत. तो दीडशें वर्षांच्या वयाचा असतां, अगदीं तरणा बांड असतो. त्याचा एक केंस पिकत नाहीं, कीं दांत पडत नाहीं. इतर गोष्टीही तशाच. वटवृक्षही कधीं कधीं ५००० वर्षें वांचतो; पण किती केलें तरी तो वटवृक्षच. त्याची योग्यता अधिक नाहीं. तसें, मनुष्य दीर्घायु झाला, तर तो फक्त धट्टाकट्टा होईल येवढेंच. तथापि हठयोगांतील एक दोन साधारण गोष्टी—कृति—फार उपयोगाच्या आहेत. उदाहरणार्थः—कपाळ दुखूं लागलें तर, होईल तितकें जलद नाकानें उदक प्राशन करणें ही गोष्ट फार चांगली आहे, व ती कितीएकांनीं पाहिलीही असेल. तसें केल्यानें मस्तक थंड आणि शांत राहील, आणि पुन्हा आपणांस थंडीही होणार नाहीं. ही कृति फार सोपी आहे. आपलें नाक पाण्यामध्यें घालावें, आणि गळ्यामध्यें बंबासारखा वायु आकर्षण करून तें शोषून घ्यावें.

निश्चल बसतां आलें ह्मणजे मग 'ज्ञानतंतूंचें पवित्रीकरण' असें **ज्याला** ह्मणतात, त्याचा अभ्यास, एखाद्या शाळेंत शिकल्याप्रमाणें करून

त्यांत प्रवीण झालें पाहिजे. कित्येकांचें ह्मणणें असें आहे कीं, हा भाग राजयोगांतील नव्हे. परंतु **शंकराचार्यां**सारखे महात्मे जर तो सांगत आहेत, तर मलाही सांगणें उचित होय. ह्मणून **श्वेताश्व उपनिषदां**-वरील त्यांच्याच टीकेंतील माहिती येथें देतों. "प्राणायामाच्या योगानें मनाचा मल निघून जाऊन तें पवित्र झालें ह्मणजे तें ब्रह्माच्या ठिकाणीं स्थीर होतें; ह्मणून प्राणायाम हा मार्गदर्शक आहे. प्रथम ज्ञानतंतु शुद्ध करावेत, तेव्हां प्राणायामाच्या अभ्यासाची शक्ति येते. उजवी नाकपुडी आंगठ्यानें दाबून, डावी नाकपुडी—ज्याच्या त्याच्या शक्तीप्रमाणें—वायूनें भरावी. नंतर मध्यें अवकाश न करतां, डावी नाकपुडी बंद करून उजवींतून उच्छ्वास सोडावा. पुन्हा उजव्या नाकपुडींतून श्वास घेऊन तो डावींतून—ज्याच्या त्याच्या शक्तीप्रमाणें—सोडावा. हा अभ्यास दिवसांतून तीन चार किंवा पांच वेळां करावा. उजाडण्यापूर्वीं; मध्यान्हकाळीं; सायंकाळीं; आणि मध्यरात्रीं. ह्याप्रमाणें पंधरा दिवस किंवा एक महिना अभ्यास केला ह्मणजे ज्ञानतंतूंची शुद्धि होते. मग प्राणायामास आरंभ करावा."

ह्यामध्यें अभ्यासाचीच आवश्यकता मोठी आहे. आपण माझ्याजवळ बसून एक एक तास जरी रोज भाषण ऐकलें, आणि, आपण जर अभ्यास केला नाहीं, तर लवमात्रही आपणांस पुढें जाववणार नाहीं. हें सारें अभ्यासावर अवलंबून आहे. ह्या गोष्टींचा अनुभव घडल्यावांचून, ह्यांपैकीं एकही गोष्ट आपणांस समजणार नाहीं. त्या आपल्या स्वतःला समजल्या पाहिजेत, व स्वतःलाच त्यांचा अनुभव आला पाहिजे. त्यांचीं व्याख्यानें आणि उपपत्ति ऐकल्यानेंच कांहीं होणार नाहीं. अभ्यासाला अनेक विघ्नें असतात. पहिलें विघ्न ह्मणजे शरीराच्या आरोग्यतेचा अभाव. शरीर जर योग्य स्थितींत नसलें, तर अभ्यासाची परिसमाप्ति होणार नाहीं. ह्मणून आपण आधीं आपलें शरीर आरोग्यस्थितींत ठेवलें पाहिजे. आपल्या खाण्यापिण्याविषयीं, किंवा आपण जें काय करतों त्याविषयीं फार काळजी घेतली पाहिजे. "शरीर निरोगी ठेवा" ही जी **ख्रिस्ती** शास्त्रांतील ह्मण आहे, ती नेहेमीं मनांत बाळगावी. त्यांत सर्व कांहीं आलें. शरीराविषयीं आणखी कांहीं राहिलें नाहीं. तरी, फलप्राप्तीचें साधन कांहीं आरोग्यता नव्हे, हें लक्ष्यांत ठेवावें. आरोग्यता हीच

जर इतिकर्तव्यता मानली, तर आह्मी जनावरांसारखे होऊं. आरोग्यता नसणारीं जनावरें क्वचितच आढळतात.

संशय हें दुसरें विघ्न आहे. ज्या ज्या वस्तूविषयीं आमच्या मनांत संशय उत्पन्न होईल, त्या त्या वस्तु आह्मांला पहावयाला मिळणार नाहींत. मनुष्य बोलण्याचा जरी प्रयत्न करीत असतो तरी, शब्दपांडित्यावरच त्याचें कांहीं भागत नाहीं. ह्मणूनच एखाद्या गोष्टीमध्यें कांहीं खरेपणा आहे किंवा नाहीं, ह्याचा आह्मांला संशय उत्पन्न होतो. कधीं कधीं तर आमच्यापैकीं चांगले चांगले लोक सुद्धां संशयांत पडतात. पण थोड्याच दिवसांच्या अभ्यासानें अनुभवाची झांक नजरेस येते, आणि तेवढा अनुभव आपल्या आशेला आणि धैर्याला पुरतो. योगशास्त्रावरील एक टीकाकार ह्मणतो "एका गोष्टीचा अनुभव आला;—मग तो थोडा कां असेना—तेवढ्यानें योगशास्त्राचें शिक्षण घेण्यास विश्वास उत्पन्न होतो." उदाहरणार्थः—कांहीं महिने शिक्षण घेतलें, आणि अभ्यास केला तर, दुसऱ्याच्या मनांतील विचार आपणांस सांगतां येतात. आणि ते आपल्या डोळ्यांपुढें स्पष्ट रेखल्यासारखे दिसूं लागतात. आपण जर मनाची एकाग्रता केली, आणि त्या प्रयत्नास लागलों, तर कदाचित् दूर अंतरावर बोललेलेंही आपणांस ऐकूं येईल. असे अनुभव अगदीं थोडे जरी अनुभवास आले, तरी आपल्या विश्वासाला, निश्चयाला व आशेला पुरे. उदाहरणार्थः—आपण आपल्या विचाराची आपल्या नासिकाग्रावर जर एकाग्रता केली, तर थोड्याच दिवसांत आपणांला एक उत्तम प्रतीचा सुगंध येऊं लागतो. आणि तेवढ्यावरून आपली खात्री होते कीं, दृश्यपदार्थांच्या संयोगावांचून प्राप्त होणारें, ह्यांत एक विलक्षण ज्ञान आपणांस मिळतें; तरी आपण सदासर्वकाल हें मनांत वागविलें पाहिजे कीं, हीं फक्त साधनें आहेत. ह्या शिक्षणाचा रोख, पल्ला, आणि फळ हें कीं, आत्म्याची मुक्तता—सृष्टीवर परिपूर्ण सत्ता—त्यांत लेशमात्र कमतरता नाहीं. हा त्याचा परिणाम झाला पाहिजे. आपणांला विश्वच होऊन राहावयाचें नाहीं, तर विश्वाचे धनी बनावयाचें आहे. देह किंवा मन हे कांहीं आमचे धनी नव्हेत. आणि आह्मांला हेंही विसरतां कामा नये कीं, शरीर माझें आहे, आणि मी शरीराचा नव्हे.

एकदां एक राक्षस आणि एक देव असे दोघे आत्मस्वरूपाची ओ-

ळख करून घेण्याकरितां एका गुरूपाशीं गेले. आणि त्यांनीं त्याच्या-पाशीं बहुत काल अभ्यास केला. अखेर त्या तत्त्ववेत्त्यानें त्यांस सांगितलें कीं "तुह्मी ज्याचा शोध करतां तें तत्त्व तुह्मी स्वतःच आहां." तेव्हां त्या दोघांसही वाटलें कीं, आमचीं शरीरें आहेत, हेंच आमचें आत्मस्वरूप; आतां आह्मांस सर्व कांहीं प्राप्त झालें आणि ते परत जाऊन आपल्या लोकांस ह्मणाले, "शिकण्यासारखें जें जें ह्मणून कांहीं होतें, तें तें सर्व आह्मी शिकलों. खावें, प्यावें आणि मजा मारावी. आह्मी हेच परमेश्वर आहों. आमच्या पलीकडे कांहीं नाहीं." राक्षसाचा स्वभाव अडाणी आणि अज्ञानमय असा होता. ह्मणून त्यानें ह्यापुढें कांहींच विचार केला नाहीं. परमेश्वर तो मीच, अशी त्यानें आपल्या मनाची समजूत केली. आणि आपण ह्मणजे शरीर असें त्यानें गृहित धरलें होतें, परंतु देव हा शुद्ध अंतःकरणाचा होता. त्याच्या विचारांत-ही प्रथमतः चुकी झाली, ती अशी कीं "मी-हें माझें शरीर—ब्रह्म आहे, ह्मणून तें बळकट आणि निरोगी ठेवावें; त्याला नीट नेटकें सजवावें; आणि त्याला ऐषआराम सर्व द्यावेत" असें त्यास वाटलें. पण थोड्याच दिवसांत त्याच्या मनांत कल्पना आली कीं, आपला गुरु जो तत्त्ववेत्ता त्याच्या सांगण्याचा अर्थ हा नसावा. त्यांत कांहीं तरी विशेष असलें पाहिजे. असा विचार करून तो पुन्हा त्या गुरूकडे परत गेला आणि ह्मणाला "महाराज! शरीर हाच परमात्मा असें आपण मला शिकविलें काय? तसें असेल तर शरीराला मृत्यु आहे, हें मी प्रत्यक्ष पाहतों आणि परमेश्वराला तर कधीं मरण नाहीं." गुरु ह्मणाला, "नीट शोध करून पहा, ह्मणजे तोही तूंच आहेस." तेव्हां देवानें विचार केला कीं, गुरूनीं जें सांगितलें त्याचा अर्थ देहास चालविणाऱ्या ज्या जीवनशक्ति त्या, असा असावा. पण त्यालाही थोडा काल लोटल्यावर त्यास असें आढळून आलें कीं, आपण जर खाल्लें तर ह्या जीवनशक्ति मजबूत होतात, आणि आपण उपास केले तर, त्या क्षीण होत जातात, तेव्हां तो देव पुन्हा गुरूकडे जाऊन ह्मणाला, "महाराज! आपलें ह्मणणें जीवनशक्ति ह्मणजेच परमेश्वर होय?" गुरूनीं उत्तर केलें "तुझा तूंच विचार कर. तो स्वतः तूंच आहेस." देव पुन्हा गेला आणि त्यानें विचार केला कीं, त्याचा अर्थ मन असावा. कदाचित् तोच परमेश्वर असेल. पण त्यासही थोडे

दिवस होऊन गेले नाहींत, तोंच त्याच्या लक्ष्यांत येऊन चुकलें कीं, विचार नाना प्रकारचे आहेत. घटकेंत चांगले, घटकेंत वाईट. मन हें फार चंचल आहे, तें परमेश्वर कसें होईल? ह्मणून तो पुन्हा गुरूकडे जाऊन ह्मणाला, "महाराज! मला नाहीं वाटत कीं मन हेंच परमेश्वर. आपलें मत तसें आहे काय?" गुरु ह्मणाले, "छे! तो तूं आहेस. तुझ्या ठिकाणींच तूं विचार कर ह्मणजे झालें." देव माघारा गेला. आणि अखेर त्यास समजलें कीं, सर्व विचारांच्या जो पलीकडे आहे, तो मी. आणि तोच परमेश्वर. ज्याला जन्म नाहीं व मृत्यु नाहीं; तरवारीनें ज्याचे तुकडे होत नाहींत; अग्नि ज्याला जाळूं शकत नाहीं; वायु ज्याला सुकवीत नाहीं, कीं पाणी विरवूं शकत नाहीं. जो आदि, अज, अचल, अस्पर्श, सर्वज्ञ, आणि सर्वशक्तिमान्—तो शरीरही नव्हे किंवा मनही नव्हे. तो ह्या सर्वांच्या पलीकडचा. तेव्हां त्याचें समाधान झालें. पण राक्षस बिचारा देहाभिमानी असल्यामुळें, त्यास खरें कांहींच कळलें नाहीं.

अशा असुरी स्वभावाचे लोक ह्या जगांत पुष्कळ असतात, पण तसेच त्यांत कांहीं दैवी स्वभावाचेही असतात. कोणी एखाद्यानें ज्ञानसामर्थ्य वाढविण्याकरितां एखाद्या शास्त्राचें शिक्षण देण्याचें मनांत आणलें, तर तीं त्याला हजारों तयार सांपडतील. आणि एखाद्यानें जर मनुष्यजातीला उत्तम परिणाम दाखविण्याचें मनावर घेतलें, तर तीं त्याची पर्वा करणार नाहींत. उच्चप्रतीला पोंचण्याचें सामर्थ्य थोड्यांसच असतें. आणि तें प्राप्त करून घेण्याचें धैर्य तर फारच थोड्यांस असतें. हजारों वर्षें वांचलें तरी, शेवट एकच; हें तत्त्व जाणणारेही थोडेच असतात. ज्या शक्ति एकत्र धारण केलेल्या असतात, त्या निघून गेल्या कीं शरीर पडलेंच. एक क्षणभर तरी आपल्या शरीरांतील हालचाल बंद करूं शकेल, असा आजपर्यंत एकही मनुष्य जन्मास आलेला नाहीं. हालचालीचें कार्य, ह्याचेंच नांव शरीर. "नदींत ज्याप्रमाणें पाण्याचे लोंढे आपल्यापुढें क्षणोक्षणीं बदलून तेथें नवे लोंढे येतात, तरी आकार असतो तसाच असतो, बदलत नाहीं, तशीच गोष्ट शरीराची आहे." तथापि, शरीर हें आपल्यापाशीं एक उत्तम साधन आहे. ह्यास्तव तें निरोगी आणि मजबूत राखलें पाहिजे.

मनुष्यदेह हा सर्व ब्रह्मांडामध्यें अतिशय मोठा आहे, आणि मनु-

ष्यप्राणी हा सर्व प्राण्यांमध्यें अतिशय मोठा प्राणी आहे. मनुष्य हा सर्व प्राण्यांपेक्षां यक्षगंधर्वांपेक्षांही उच्च प्रतीचा आहे. मनुष्यापेक्षां मोठा कोणी नाहीं. मुक्ति मिळविण्यासाठीं देवांना सुद्धां पुनः खालीं–मृत्युलोकावर–जन्म घेऊन नरदेह धारण करावा लागतो. मनुष्याला एकट्यालाच परिपूर्णता प्राप्त होते. ती देवांनाही प्राप्त होत नाहीं. यहुदी लोकांच्या आणि मुसलमान लोकांच्या मताप्रमाणें देवदूत वगैरे सर्व इतर वस्तु उत्पन्न केल्यानंतर परमेश्वरानें मनुष्य निर्माण केला. आणि मग त्यानें देवदूतास येऊन त्यास नमस्कार करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें इब्लिश शिवाय करून बाकीच्यांनीं नमस्कार केला. ह्मणून परमेश्वरानें त्यास शाप दिला आणि तो सैतान झाला. पण ह्या गतकालिन कथेपेक्षांही आमचा नरजन्म जो आह्मांस प्राप्त झाला आहे, तो सर्व जन्मांहून श्रेष्ठ जन्म आहे, हेंच विशेष सत्य आहे. क्षुद्र जाती, पशू हे मतिमंद असून ते फारकरून तामसप्रकृतीपासून उत्पन्न झालेले असतात. पशूंना मोठमोठे गहन विचार करतां येत नाहींत. त्याचप्रमाणें, देवांना किंवा गंधर्वांनाही नरजन्म घेतल्याशिवाय मुक्ति मिळत नाहीं. तसेंच, लोकसमाजामध्यें अतिशय संपत्ति किंवा अतिशय दारिद्य हें आमच्या उन्नतीस एक मोठें विघ्न आहे. हीं विघ्नें जगामध्यें मोठ्या प्रमाणानें असणाऱ्या मध्यम प्रतीच्या वर्गाला फार येतात. तशा ठिकाणीं सर्व शक्ति एकत्र जमून अगदीं समतोल होऊन राहिलेल्या असतात.

आतां पुन्हा आपल्या विषयाकडे, ह्मणजे श्वासोच्छ्वासावर सत्ता ठेवण्याकडे, अर्थात् प्राणायामाकडे वळावयाचें. मनाची एकाग्रता करण्याला, ह्याचें काम काय? ह्या देहरूप यंत्रामध्यें श्वासोच्छ्वास हें उड्डाणचक्र आहे. मोठ्या एंजिनामध्यें उड्डाणचक्र प्रथम फिरूं लागतें, आणि मग ती गति हळू हळू बारीक बारीक यंत्रांत शिरत जाते. अशा रीतीनें यंत्रांतील अत्यंत सूक्ष्म भागासही तें आपलीच गति देऊन सोडतें. श्वासोच्छ्वास हें एक उड्डाणचक्र असून तें ह्या शरीरांतील हरएक शक्तीला चलन देण्यास व नियमित राखण्यास साधनीभूत आहे.

एका मोठ्या राजाच्या पदरीं एक प्रधान होता. त्याच्यावर एकवेळ राजाची मर्जी खप्पा होऊन, त्यानें त्यास एका उंच मनोऱ्याच्या कळ-

सावर नेऊन अडकविण्याविषयीं हुकूम केला. आणि तत्काल त्या हुकमाची अंमलबजावणी होऊन, तो बिचारा प्रधान मरणाच्या द्वारीं बसला. त्या प्रधानाची स्त्री मोठी साध्वी होती. ती रात्रीच्या वेळीं त्या मनोऱ्याखालीं गेली, आणि तिनें आपल्या पतीस विचारलें कीं, मजकडून आपणास कांहीं मदत होण्यासारखी आहे काय? त्यानें वरून तीस सांगितलें कीं, तूं येथें उद्यां रात्रीं येशील, तेव्हां बरोबर एक सोल, एक जाड सुतळी, एक दोऱ्यांचा जुडगा, एक रेशमी धागा, एक जींवंत माशी व थोडासा मध घेऊन ये. तिला ह्याचें मोठें आश्चर्य वाटलें. तरी त्या सुशील स्त्रियेनें ती आपल्या पतीची आज्ञा मान्य केली आणि दुसऱ्या दिवशीं रात्रीं तिनें ते सर्व पदार्थ तेथें नेले. तेव्हां तिच्या नवऱ्यानें तिला सांगितलें कीं, प्रथम त्या माशीला रेशमाचा धागा घट्ट बांध. नंतर मधाचा एक थेंब घेऊन त्या माशीच्या शिंगांना त्याचा वास लाव. आणि मग त्या माशीचें तोंड मनोऱ्याच्या शिखराकडे करून मनोऱ्यावर मोकळी सोडून दे. त्याप्रमाणें तिनें सर्व बरोबर केलें, आणि माशीनेंही तो पल्ला गांठला. मधाचा वास पुढें येत असल्यामुळें तो आपणास लौकरच प्राप्त होईल ह्या लालचीनें ती वरवरच जाऊं लागली. आणि अखेर ती त्या मनोऱ्याच्या शिखरावर पोंचली. तेव्हां त्या प्रधानानें ती धरली आणि तिला बांधलेला रेशमाचा धागा घेतला. नंतर त्यानें आपल्या पत्नीस त्या रेशमी धाग्याच्या दुसऱ्या टोंकास ह्मणजे खालच्या अंगास दोऱ्यांचा जुडगा बांधावयास सांगितलें. आणि रेशमी धाग्याच्या सहाय्यानें तोही वर ओढून घेतला. नंतर पुन्हा त्यास त्यानें सुतळी लावून घेतली, आणि शेवटीं तें सोलही वर घेतलें. तेव्हां अर्थातच सुटका होण्याला फार सुलभ झालें. त्या सोलाच्या आधारानें तो प्रधान त्या मनोऱ्यावरून खालीं उतरला, आणि जीवावरच्या संकटांतून मुक्त झाला. ह्या आमच्या देहांत श्वासोच्छ्वासाची क्रिया ही रेशमाचा धागा आहे. त्याला धरून, त्याला आपल्या ताब्यांत घेऊन, ज्ञानतंतूंच्या प्रवाहरूपी दोऱ्यांचा जुडगा हातांत घ्यावयाचा, आणि त्यापासून विचाररूपी जाड सुतळी हस्तगत करून घ्यावयाची, आणि शेवटीं प्राणांचें दोरखंड जें हस्तगत झालें असतां आह्मी मुक्त होऊं—त्यास गांठ घालावयाची.

आमच्या शरीरांतील आह्मांस कांहींएक माहिती नाहीं, आणि ती करूनही पण घेतां यावयाची नाहीं. फार तर एखादें प्रेत घेऊन तें फाडतां येईल, किंवा कितीएक लोक जीवंत पशु घेऊन तो कापूं शकतील, व आंत काय आहे तें पहातील. पण तेवढ्यावरून स्वतःच्या शरीरांतील कांहींच कळणार नाहीं. त्याच्याविषयीं आपणाला फारच थोडी माहिती असते. ती कां असूं नये? ह्याचें कारण, अंतःकरणांत चालणाऱ्या ज्या अत्यंत सूक्ष्म हालचाली, त्या ग्रहण करून त्यांतील भेद समजण्याइतकें आपलें लक्ष्य नसतें. आह्मांला इतकेंच ठाऊक आहे कीं, ह्या हालचाली ह्मणजे मन. तें शरीरांत प्रवेश करतें, आणि तें अत्यंत सूक्ष्म असतें. हें सूक्ष्म ज्ञान मिळविण्याला आह्मी जड ज्ञानानेंच प्रारंभ करतों. ह्मणून सर्व यंत्र चालू ठेवणाऱ्या शक्तीलाच आह्मांला हात घातला पाहिजे. ती शक्ति ह्मणजे प्राण. आणि ह्या प्राणांचें अगदीं उघडें उघडें स्वरूप ह्मणजे श्वासोच्छ्वास. त्या श्वासोच्छ्वासांबरोबर आह्मी हळू हळू शरीरांत शिरतों, आणि तो प्रवेश ह्या सूक्ष्म शक्तींचें आह्मांस ज्ञान करून देण्यास समर्थ होतो. सर्व शरीरावर ज्ञानरसाचा प्रवाह कसा खेळतो, हें जितकें जितकें लौकर आह्मांस कळूं लागेल, तितकें तितकें लौकर त्याचें ज्ञान आह्मांस प्राप्त होतें. आणि मग आपण त्याच्यावर आणि शरीरावरही अंमल बसवूं शकतों. ह्या ज्ञानरसाच्या निरनिराळ्या प्रवाहाच्या योगानें मनासही गति देतां येते. ह्मणून सरतेशेवटीं आह्मी मनावर आणि सर्व शरीरावर अंमल बसविणें, त्यांस आपले सेवक करून सोडणें, इतक्या स्थितीप्रत येऊन पोंचतों. ज्ञान ही एक शक्ति आहे. ती आपणांस मिळवावयाची असते. ह्मणून आपण आरंभ करणें तो प्राणायाम—प्राणाला ताब्यांत ठेवणें—येथपासूनच करावा. प्राणायाम हा विषय फार मोठा आहे. आणि तो पूर्णपणें स्पष्ट करण्याला कितीएक भाग पाहिजेत. ह्याकरितां आपणही त्याचा भागाभागानेंच विचार करूं.

शरीरांतील हालचाल कोणत्या शक्तीकडून घडते, आणि प्रत्येक हालचालीचें कारण काय तें आपण हळू हळू पाहूंया. ह्या सर्व गोष्टी आपणांस कळतील, पण त्याला अभ्यास पाहिजे. अभ्यासानेंच त्यांचा अनुभव येईल. मी कितीही कारणें सांगितलीं तरी, तुमची स्वतःची

खात्री पटल्याशिवाय तुमचा भरंवसा बसणार नाहीं. ह्या प्रवाहाची गति सर्व देहावर चालूं लागली कीं, तुमचे सर्व संशय नाहींसे होतील. पण त्याला प्रत्येक दिवशीं बिनचूक अभ्यास केला पाहिजे. आपण दिवसांतून निदान दोन वेळां तरी अभ्यास करावा. आणि त्याला उत्तम वेळा ह्मटल्या ह्मणजे सकाळ आणि संध्याकाळ. रात्र संपून दिवस उगवणें आणि दिवस संपून रात्र सुरू होणें, ह्या वेळा स्वयमेव शांततेच्या असतात. आणि त्या वेळेच्या स्वाभावानुसार आपल्या आंगींही शांतता येते. ह्या स्वाभाविक गोष्टीचा आपण फायदा घेऊन ह्याच वेळीं आपण अभ्यासास लागावें. अभ्यास झाल्याशिवाय कांहींएक खावयाचें नाहीं असा नियम करावा. ह्मणजे भुकेचा वेग तुमचा सारा आळस झाडून टाकील. हिंदुस्थानामध्यें हा प्राणायामाचा अभ्यास केल्याशिवाय, पूजा वगैरे झाल्याशिवाय, मुलांनीं कांहींएक खाऊं नये, असें त्यांस शिकविलेलें असतें. त्यांत कांहीं काल गेला ह्मणजे तेंच त्यांच्या आंगवळणी पडून जातें. आणि स्नान करून पूजा वगैरे झाल्याशिवाय त्यांस भूक लागली असें वाटतच नाहीं.

हा अभ्यास करण्यासाठीं एखादी एकांताची खोली मिळण्यासारखी असेल तर मिळवावी हें उत्तम. त्या खोलीमध्यें कोणी निजूं नये. ती शुद्ध ठेवावी. स्नान केल्याशिवाय, मन व देह शुद्ध केल्याशिवाय, त्या खोलींत पाय ठेवूं नये. त्या खोलींत नेहेमीं फुलें भरून ठेवावीं. तीं सभोंवार असणें हें योग्यास फार चांगलें. तसेंच तेथें उत्तमोत्तम तसबिरा असणें हेंही उत्तम. सकाळ संध्याकाळ तेथें धूप जाळावा. त्या खोलीमध्यें कलह, राग, घाणेरे विचार येऊं नयेत. आपल्याप्रमाणेंच ज्याचे विचार असतील, अशा पुरुषासच त्या खोलींत येऊं द्यावें. असें केलें ह्मणजे, उत्तरोत्तर त्या खोलींतील हवा सुद्धां पवित्रतेनें भरून जाईल. आणि जेव्हां जेव्हां उदासीनता प्राप्त होईल, दुःख उत्पन्न होईल, मन संशयांत पडेल, किंवा त्याची चलबिचल होईल, अशा वेळीं त्या खोलींत गेलें असतां आपणांस खचित शांतता मिळेल. देवालयें, मठ, ह्यांचेही हेतु हेच आहेत. आणि कित्येक देवालयांत अद्यापही ह्याचा अनुभव दृष्टीस पडतो. परंतु पुष्कळ लोकांच्या मनांतून ही कल्पना अजीबात नाहींशी झालेली आहे. अशा रीतीनें—ह्मणजे वातावरण पवित्र

राखल्याच्या योगानें ती सर्व जागाच दिव्य होऊन राहते. ज्यांना अशी स्वतंत्र खोली मिळण्याजोगी नसेल, त्यांनीं कोठेंही अभ्यास केला तरी चालेल. सरळ रेषात्मक मुद्रेनें—ताठ—बसावें. नंतर पहिली गोष्ट ही कीं, सृष्ट पदार्थांवर पवित्र विचारांचा प्रवाह सोडावा. मनांत असा जप करावा कीं, "सर्व प्राणिमात्रांना सुख व्हावें; हरएक प्राण्याला शांतता असावी; सर्व प्राणिमात्र आनंदांत असावेत." पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर ह्या सर्व ठिकाणीं असाच भाव धरावा. ही इच्छा जितकी जितकी अधिक धरावी, तितकी तितकी आपणांस अधिक सुखप्राप्ति होते. सर्वांस आरोग्यता असावी असें जों जों आपण मनांत आणावें, तों तों आपणांस अधिकाधिकच आरोग्यता येऊं लागते. आणि हें तर अगदीं सोपें आहे कीं, दुसरे लोक सुखी असावेत अशी दृढतर इच्छा बाळगली तर, आपण सहजच सुखी होऊं लागतों. हें झालें ह्मणजे जे कोणी परमेश्वरावर भरंवसा ठेवीत असतील त्यांनीं प्रार्थना करावी; ती पैशाकरितां नसावी, आरोग्याकरितां नसावी, किंवा स्वर्गप्राप्तीकरितांही नसावी. तर आपण प्रार्थना करणें ती ज्ञान आणि प्रकाश प्राप्त होण्याकरितांच करावी. ह्यांशिवाय इतर कोणत्याही ज्या प्रार्थना त्या स्वार्थाकरितां होत. नंतर आपल्या स्वतःच्या शरीराचा विचार करावयाचा ही दुसरी गोष्ट; कारण तें आपणाजवळ एक उत्तम साधन आहे. ह्मणून तें मजबूत आणि निरोगी असावें. ह्याकरितां मनांत असें आणावें कीं, 'आपलें शरीर वज्रासारखें असून त्याच्या साह्यानें आपणास हा जन्मसागर तरून जावयाचें आहे. अशक्ततेकडून कधींही मुक्ति मिळावयाची नाहीं. ह्मणून साऱ्या अशक्तता दूर झुगारून द्याव्यात. आपल्या शरीराला सांगावें कीं तूं मजबूत आहेस; मनाला सांगावें कीं तूं धट्टें कट्टें आहेस; आणि आपल्या मनामध्यें दृढतर आशा व अढळ विश्वास हीं कायम करावींत.'

## पुस्तकपरीक्षा.

**सुधारकवारणांकुश**—हें पद्यात्मक पुस्तक रा. रा. **केशव सदाशिव रिसबुड,** ऊर्फ **के. स. रि.** ह्यांनीं तयार करून तें आह्मांस परमादरानें नजर

केलें त्याबद्दल उपकार मानून व विलंबाबद्दल क्षमा मागून त्यांतील गुणदोषांचें विवेचन करतों. आमच्या लोकांत पाश्चात्यविद्येचा प्रसार झाल्यापासून विद्वत्समाजांतील कित्येक व्यक्तींच्या ध्यानांत आमच्या प्राचीनकालच्या रीतीभातींतील दोष दिसूं लागून ते घालविण्याविषयीं त्यांचे प्रयत्न चालू आहेत. त्यांस सुधारक असें ह्मणतात. त्यांच्या प्रयत्नांचें किंवा फाजीलपणाचें खंडण करावें, व आपल्या पूर्वापार चालींचें मंडन करावें, असा ह्या पुस्तककर्त्याचा उद्देश आहे. हें ह्या पुस्तकाच्या ऐटदार नांवावरूनच कळून येण्यासारखें आहे. व 'सुधारकवारणांकुश' येवढ्या एका शब्दावरूनच त्याच्या अंतःकरणांतील अहंभावाची फुगवटी, व हट्टाची चिकाटी ही सहज व्यक्त होण्यासारखी आहे. सुधारकांचा व दुर्धारकांचा वाक्संग्राम आलीकडे किती हातघाईवर आलेला आहे, हें सर्वविश्रुतच आहे. आणखी असे दोन पक्ष जेव्हां अभिमानास किंवा दुराग्रहास पेटतात, तेव्हां समुद्रमंथनांतील वासुकीप्रमाणें सत्याची ओढाताण चाललेली असते. एकाच्या हातांत त्याचें शेंपूट असतें, आणि दुसऱ्याच्या हातांत त्याचें मस्तक असतें. मस्तक धरणारे ह्मणतात आह्मी मोठे; आणि पुच्छवाहक ह्मणतात आह्मी मोठे. पण खरोखर त्याच्या देहाचा विळखा असतो तो दोहोंच्याहूनही निराळा असतो. घुसळणारांपैकीं एका पक्षाला गरळानळ भाजून काढीत असतो, आणि दुसऱ्या पक्षाला शेपटाचे तडाके खावे लागतात, किंवा प्रसंग गुदरला तर, मलमूत्राचें सचैल स्नान घडतें. ह्या पलीकडे कांहीं नाहीं. अशोधित धातूप्रमाणें सत्याचे रजःकण, आणि असत्याचा रेंदा, दोहोंतही कमीजास्ती प्रमाणानें संयुक्त झालेला असतो. अशा स्थितींत संशोधनांचें काम करणें हें एक सत्कृत्य आहे. पण तेवढी योग्यता व कुशलता अंगीं असली पाहिजे. हें पृथक्करण करण्याचें तादृश ज्ञान नसतां, एक धड ना भाराभर चिंध्या जमा करणारा, किंवा 'Jack of all trades and master of none' ह्या इंग्रजी ह्मणीसारखा सर्वज्ञतेचा आव आणणारा तुटपुंजा मनुष्य पुढें सरसावून रिकामी भट्टी लावून आग पेटवील, तर सुवर्णाचा एकही रजःकण बाहेर न निघतां, तें वितळून मृत्तिकेशीं मात्र एकजीव होऊन राहील! असाच प्रकार, ह्या नामधारी **के. स. रि.** कवीच्या हातून घडला आहे, हें कळविण्यास सुद्धां आह्मांस वाईट वाटतें. छंदःशास्त्राची मुंडी मुरगळण्यांत, कवित्वाची पायमल्ली करण्यांत, वाग्देवतेची विटंबना करण्यांत, सभ्यपणावरून बोळा फिरविण्यांत, ह्या वयोवृद्ध कवीस कोणता पुरुषार्थ वाटला परमेश्वर जाणें! ही नाहीं ती उठाठेव करण्यांत,

व यथेच्छ तोंडसुख घेऊन आपल्या मनाचा हलकेपणा व्यक्त करण्यांत हेतु कोणता हेंच आह्मांस आधीं कळत नाहीं. खरोखरच जर पाश्चात्यानुकरणाची आमच्या के. स. रि. स किळस होती, व वडिलोपार्जित धर्माची बळकट कास धरावयाची होती, तर त्यानें कृतीवरून जगास उदाहरण घालून दिलें असतें, तर ते स्वत: जगास वंद्य होऊन, ह्या घाणेऱ्या चोपड्यांपेक्षां शतपट कार्यकारी झाले असते. हलकट शब्दांनीं निर्भर्त्सना केली; यथेच्छ तोंडसुख घेतलें; मनसोक्त निंदा केली; टवाळी करून हशा पिकविला; इंग्रजी शब्द घालून चऱ्हाट सजविलें; ह्मणजे ब्राह्मणधर्माचें संरक्षण झालें काय? 'चत्वारि वेदां'मध्यें ब्राह्मणांचीं कर्मे हींच सांगितलीं आहेतशीं दिसतें! वाद करण्याचें, खंडनमंडन करण्याचें कर्म फार कठीण आहे. ह्मणूनच 'वक्ता दशसहस्रेषु' असे प्राचीन कवींनीं उद्गार काढले आहेत. शंकराचार्यादिकांनीं, मंडणमिश्रांसारख्यांनीं वाद कसे केले? खंडन ह्मणजे काय? मंडन ह्मणजे काय? आधार कशाला ह्मणतात? ह्याचा, कविवर्गांत बळेंच मुसंडी देऊं पाहणाऱ्या आमच्या के. स. रि. नें यत्किंचित् जरी विचार केला असता, तरी त्याच्या हातून येवढें भयंकर धाष्टर्य खचित झालें नसतें. केवळ 'पूर्वपक्ष', 'उत्तरपक्ष', 'भाग', 'विभाग', 'स्वकर्मभंगता(!)' इत्यादि शब्दावलि नमूद केल्यानेंच कांहीं मशाल विझत नसते. पण कवित्वाच्या गर्दींत हे विचार सुचावेत कोठून? सुधारकांस वेडेवांकडे व घाणेरे शब्द बोलून, जुन्या व हटवादी पक्षाकडून पाठच जर थोपटून घ्यावयाची होती, तर 'अपशब्दलाखोलीचें' एक मजेदार सहस्रनामस्तोत्र करून छापलें असतें, तरी थोडक्यांत काम भागण्यासारखें होतें, व अर्धबोबड्या मंडळीच्या नित्यपाठास तेवढें आमच्या मतें बस्स झालें असतें. सुधारकवारणवृंद केवढा आहे ह्याची कल्पना मनांत न आणतां, त्याच्या शक्तीचा व हेतूचा तिळमात्र विचार न करतां, त्याच्या पुढाऱ्याच्या गंडस्थळाची शोभा, दांतांचा भव्यपणा, दृष्टीचा रोंख, स्वभावाची प्रौढी लवमात्र न पाहतां, हा आमचा छोटा के. स. रि. उतावळपणानें अंकुश घेऊन बेलाशक त्याच्या अंगावर तुटून पडला! आपण खरोखर कोण? आपणास अयाल आहे किंवा लोंकर आहे? आपलें पुच्छ अधोमुखी आहे कां ऊर्ध्वमुखी आहे? आपलीं नखें गजगंड विदारण्याइतकीं तीक्ष्ण आहेत, कां मांजरासारखीं लेचींपेचीं आहेत? ह्याचा त्यानें तिळमात्रही विचार केला नाहीं. विनाकारण वेडी हौस पूर्ण करून आपला उच्छृंखलपणा जगापुढें मांडला आहे. ह्या आमच्या ह्मणण्याची साक्ष पटण्यासाठीं आतां कांहीं कांहीं गोष्टींचा उल्लेख करूं.

सदरहू पुस्तकांत पद्य आहे; गद्य आहे; संस्कृत श्लोक आहेत; इंग्रजी उतारे आहेत; नीतिवचनें आहेत; सर्व कांहीं आहे. पूर्वउत्तरपक्ष किंवा मंडन व खंडन यांचा मात्र पत्ता नाहीं, इतकेंच! केवळ हलक्या शब्दांनीं प्रतिपक्षावर भडिमार केला, ह्मणजे कांहीं मुद्यांचें खंडन होत नाहीं! आधीं पूर्वपक्ष ह्मणून जो केला आहे, त्यांत सुधारकांचे सर्वमान्य मुद्दे असे मुळींच नाहींत. मद्यप्राशनासारखे एकदेशीय मुद्दे घेतले आहेत, आणि सर्वमान्य मुद्दे मुळींच वेगळे आहेत. उदाहरणार्थ—पुनर्विवाह व केशवपन हा सुधारकांचा पहिला मुद्दा आहे; पण हा छोटा के. स. रि. त्याच्याकडे डोळा उघडून पहातो कशाला? जणू काय दृश्येंद्रियाप्रमाणें ज्ञानेंद्रियेंही स्थानभ्रष्टच झालीं! फाल्गुन आला ह्मणजे वात्रट मुलांच्या वाचेला जसा चेव येतो, तशींच ह्या पुस्तकासंबंधानें आमच्या के. स. रि. ची स्थिति झाली आहे. 'शेषं कोपेन पूरयेत्' वाद करितांना खंडन करतां येईनासें झालें, ह्मणजे अपशब्दांनीं घसरावयाचें, असा साधारण नियम आहे. पण के. स. रि.जवळ कांहीं मुद्दल असेल तर, शेषापर्यंत मजल येईल कीं नाहीं? आमच्या कवीनें गणपतिपूजनापासूनच पुष्पांजलीस सुरवात केली आहे. कारण, पुष्पांशिवाय पूजेची सामग्री बिचाऱ्याजवळ दुसरी कांहींच दिसत नाहीं. के. स. रि. ला सुधारकांचे तीन वर्ग 'ठावे झाले' आहेत, ते असे:—

**त्रिविध सुधारकमंडळ ऐसें के. स. रि. ला झालें ठावें।**
**प्रमुख सुधारकहि बगलबच्चे हंडिबाग ज्यांचीं नांवें ॥ १ ॥**

के. स. रि.सारख्या जुन्या, वयातीत व अनुभविक कवीनें सभ्यपणाला अशा प्रकारें गाडून टाकावें, ही केवढी दुःखाची गोष्ट! आँग्लविन्निपुर्ण पुरुष ते **'प्रमुख'**; मोठ्या कष्टानें पी. ई. ची मजल आक्रमण करतात, ते **'बगलबच्चे'** आणि म्याट्रिक्युलेशनच्या सीमोल्लंघनापलीकडे ज्यांस जाववत नाहीं, ते **'हंडिबाग'**. आपल्या मताशीं कोणी विरुद्ध बोलला, कोणी आपल्या समाजाच्या उलट कल्पना काढूं लागला, ह्मणून वाद करणारानें—खंडन करण्याचें कंकण बांधणाऱ्यानें अशी कुत्सितपणें निंदा करावी हें उचित आहे काय? **केरूनाना छत्रे, धाकटे चिपळूणकर, टिळक,** इत्यादि मंडळी 'आँग्लविन्निपुण' असतांही कोणत्या पक्षाची होती, व आहे हें के. स. रि. स माहित नाहीं काय? आणि वेदांत आगगाडी आहे ह्मणून प्रतिपादन करून 'पुरोहिता'स एंजिन बनवून, पुजारी 'ए तो पूजेका अरी है' ह्मणून समास करणारे, व भरसभेंत—प्रत्यक्ष देवालयांत—'पुजारी बोलते के ये दूध प्यौ. ये तो विचारा फत्तर! ओ क्या खाते, और क्या पीते?' असे

गर्जना करणारे बडे धेंड—दयानंद सरस्वती—ह्यांस 'ऑंग्लविन्निपुणते'चा गंधही नव्हता हेंही के. स. रि. स माहित असलें पाहिजे. मग सुधारणेचें खापर बिचाऱ्या ऑंग्लभाषेवरच फोडण्यांत अर्थ कोणता? पण कवित्वासाठीं हापापलेल्या आमच्या या कुळास पूर्वापार संबंध कांहीं ठेवावयाचा असेल तेव्हां कीं नाहीं साऱ्या गोष्टी? संगीत पौर्णिमाच साजरी करण्याचें ज्यानें व्रत घेतलें, त्यास पर्वा ती कशाची? खालचें विधान किती मजेचें आहे पहाः—

**आर्या.—बोधुनि जनां सुधारक "ऋष्यंगीकृतपथा न अवलंबा"।**
**शिरती समाजपंथीं; ते पुजितिल काय अंब हेरंबा ॥ १ ॥**
**ह्मणवुनि देशसुधारक करिती नास्तिकपणेंच उपदेश।**
**आशा नको अशांच्या हातुनि पावेल उन्नतिस देश ॥ २ ॥**

सुधारक समाजपंथांत शिरतात, ह्मणून नास्तिकपणानें उपदेश करतात! समाजपंथ आणि नास्तिकपणा ह्यांतील भेद जेथें दिसत नाहीं, तेथें काय बोलावें?

प्रथमतः स्त्रीशिक्षणावर कवीनें जो गहजब केला आहे, तो तर पुसूंच नये. एक सबंधच्या सबंध कडवें तर,—रंगी, चिंगी, लुंगी, झुंगी, रमा, उमा, भिमा, प्रलापिका, गोपिका, वारी, धारी अशा नामावळींतच संपविलें आहे. बरें; नांवें घालावयाचीं तीं तरी प्रचारांतील असावींत? लुंगी, झुंगी नांवाच्या मुली असतात काय? ह्यांच्यापुढें आणखी भृंगी, शृंगी, कुरंगी, मुंगी आणि शिंगी घातलें असतें, तरी सुद्धां अनुप्रासाची गर्दी उडाली असती. पण के.स.रि.चा एक जबरदस्त सिद्धांतच आहे कीं, अक्षरसाम्य व मात्रासाम्य ह्याची रेलचेल उडवून कवितावधू सजवावयाची. शब्दांकडे मुळीं ढुंकून पहावयाचें नाहीं. तो शब्द मराठी भाषेंत असो कीं नसो, कोशांत सांपडो वा न सांपडो, त्याची पर्वा नाहीं; हें तर काय, पण जगांतील कोणत्याही भाषेंत त्याचें अस्तित्व नसलें तरी चालतें. यमकें पहाः—

**"ज्यानें मोठी भरतक्षितिची मारुनि हिल्लर, वृद्धपणें मग होऊनि झिल्लर, जाउनि बैसे संप्रति जो इंग्लंडीं स्थिल्लर, असा वेदपुरुष मोक्षमुल्लर वाहुन पुष्पातक्षता सुचंदन, सद्भावें आह्मी द्विजनंदन, करितों तत्पादद्वय वंदन,"**

हा त्या पाश्चात्य वेदोभारायणास नमस्कार झाला. ह्यावरून यमकाच्या जडणीविषयीं वाचकांस बहुतेक अंशीं कल्पना होईलच. आणखी मासलेः—

पति पदव्या मिळवुनि झरझर ॥ वाई फटकारुनी पदर ॥
सहज कुठें गेल्यास गजर ॥ पुढें शिपाई गडी हजर ॥ १ ॥

इकानें नरतुल्य नारिहि अशा होवोनी ईर्ष्यावती ।
स्वातंत्र्या वरितील निश्चयबळें, तेव्हांच देशोन्नती ॥ २ ॥
बाहेरून । बहु दुरुन । येतां किदरून । गृहपति निजमंदिरीं ।
ह्मणे न आली । कां स्कुलवाली । अझुनि सखी सुंदरी ? ॥ ध्रृ० ॥

आतां प्रत्यक्ष धुळवडीचाच समारंभ पहाणें असेल तर खालचा फटका पहाः—

कलीचा पाया ही तेरावी सद्दी । वयातीत वृद्ध झाले रद्दी ॥ ध्रृ० ॥
पतीला पाणी ती लाथेनें दावी । माजकर ह्मैस तोडि दावीं ॥
सून सासूच्या आज्ञेंत न नांदावी । चहाटाळ पोरें फांदावी ॥
लज्जा अब्रू । ही काय तिच्या गांवीं । दांडग्यांमध्येंच वागावी ॥
करितसे गर्दी । ती खर पाहुनि गद्धी । वयातीत वृद्ध झाले रद्दी ॥ ध्रृ० ॥

इशिशीशी ! कोण घाण ही ? ह्या आपल्या 'नारी' सिद्धि विनायकाप्रमाणें 'अग्र-पूजेच्या अधिकारी' आहेत ह्मणून ज्या तोंडानें प्रतिपादन केलें, त्याच तोंडानें त्या अबलेला 'मारकी ह्मैस' आणि 'गर्दी करणारी गद्धी' ह्मणावें ना ? शिव शिव शिव ! केवढी शरमेची गोष्ट ! मनुष्याच्या मनांत एकदां कां पोकळ फुशारकीचें वारें भरलें, तर तो कोणीकडे वहावत सुटेल, व तो कोणत्या उकिरड्यांत जाऊन पडेल ह्याचा कांहीं नेम नाहीं.

'ट' स 'ट' आला, कीं आमच्या कवीच्या प्रासाची भरपाई झाली. मग त्यांत कसलीही उपमा असो, आणि कसलाही विजोड समास होवो. खालची उपमा पहा कशी मारू आहे तीः—

अबला गृहशिक्षणेंच, सगळ्या गृहव्यवस्थेच्या सरणित !
राहुनि, मुरल्या जावोत सतत जसें लोणचें तें बरणित ॥ ध्रृ० ॥
संसारांतिल देवघेविचे व्यवहारा पुरतेंच गणित ।
हें सच्छिक्षण परंपरेनें मिळे मुलींना गृहगिरणिंत ॥ १ ॥

वरील 'गृहगिरणिंत' तयार झालेल्या लोणच्याच्या बरणीची करणी कशी आहे ? त्याचा वाचकांनींच विचार करावा. 'च'चा किंवा 'हो'चा ठेपा दिल्याशिवाय आमच्या कवीच्या पद्याचा एक चरण धरघरील तर शपत ! पहाः—

लिहाया वाचाया शिकुनि, सवडीनेंहि कशिदा,
शिके काढाया ती, विणकरहि कामें तशि कदा ॥
सुपुष्पां गुंफोनी करुनि गजरा हारहि तुरा,
पतीला दे. त्याचें जडवुनिचि घे प्रेम चतुरा ॥ १॥"

पण असे सटरफटर दोषच आह्मी दाखवीत बसलों, तर आमची लोहलेखणी

थोंथट होऊन हातही कदाचित् भारावेल. ह्याकरितां मुख्य विषय जो 'उत्तर-पक्ष' ह्याचेच एक दोन अपूर्व नमुने वाचकांसाठीं पुढें करूं. कवीनें आपलें शौर्य जें दाखविलें आहे, तें स्त्रीशिक्षणाच्या किल्लयावर हल्ला करतांना; पण त्या बिचाऱ्याची कपरीही निखळली नाहीं. तोफेंत एकादी तरी गोळी असेल तर ना निखळणार! के.स.रि.चे बार सारेच वांझे! आणि दारू सारी सरदलेली. मग रंजक पिण्याशिवाय, दुसरा देखावा तो काय दृष्टीस पडणार? 'पगडी'वरील पूर्वपक्ष उत्तरपक्षाचा मासला. कवि ह्मणतातः–पूर्वपक्षः—

**"पागोटें हें मोठें अप्पटपोटें असून त्यापासून फार तोटे आहेत. त्याला आधीं किंमत फार; शिवाय तें सांभाळतां सांभाळतां मनुष्य बेजार होतो. मारवाडांत पाणी काढण्याला रशीच्या ऐवजीं मात्र त्याचा खासा उपयोग होईल."**

हा पूर्वपक्षांतील सारांश, किंवा सुधारकांच्या अंतःकरणाची मीमांसा झाली. आतां उत्तरपक्ष, किंवा कवीचें हृद्गत ऊर्फ खंडन ऐका:—

**पागोट्याची किति कथूं बहादुरकी । कांपले रिपुगण थरथर कीं ॥**
**पगडीवाला नृप छत्रपति शिवाजी । सिंहसा रिपुदंतिसमाजीं ॥**
**पगडिधर पहिला पेशवाराव बाजी । स्वशौर्यानलें रिपुस भाजी ॥**
**बापु गोखले पगडिधर महा गाजी । तसा शिंदाहि महादाजी ॥**
**केसरि बोलें पगडिची बघुनि फिरकी। कांपले रिपुगण थरथर कीं,**

ह्या उत्तरपक्षांत थोडेथोडके नव्हेत—तर अनेक चमत्कार दृष्टीस पडतात. 'पगडी' पाहिली कीं, शत्रु थरथर कांपत सुटतात! हा काय सामान्य प्रभाव! सांप्रत वायव्येच्या सरहद्दीवर जी येवढी धुमाकूळ माजली आहे, व पाण्यासारखा पैसा खर्चां पडतो आहे, त्याचें खरोखरच कांहीं कारण नाहीं. आमच्या के. स. रि.च्या पगडीची एक फिरकी पाठविली कीं बस्स ! कृष्णाच्या सुदर्शनाप्रमाणें सारे शत्रु रसातळास पोंचतील ! पागोट्याच्या आंगीं शौर्य आहे असें सांगून सुधारकांचीं तोंडें मिटण्याची आशा बाळगणें हा केवढा खुळेपणा ? पहिला बाजिराव पगडी घालीत होता आणि दुसरा घालीत नव्हता काय ? मग ती 'रिपुगणास' थरथर कांपविणारी के.स.रि. समशेर कां उलथून पडली?'छत्रपति शिवाजी पगडी घालीत होते' हें वाक्य सांप्रत उपलब्ध झालेल्या त्यांच्या तसबिरीकडे पाहून मग तरी लिहावयाचें होतें! पण हो! अरेरे! आमचे के.स.रि. पहाणार कशानें! पण छे! आंगरख्याच्या उत्तरपक्षानें ह्याच्याही वर कडी ठेवून दिली आहे. ऐका, ऐकाः—

फटका—(अहो राव या चालीवर).

**असुनि आंगरखा बहुगुणी थोर पुरुष, कसें त्या मानितसां आर्ष ?॥ध्रु.॥**
**स्वरूपें सरसा बहु सुंदर सुकुमार, वैभवें केवळ सरदार ॥**
**स्वभावें नलसा कर्णसा महोदार। देइ मोकळी हवा फार ॥**
**मनें शुकमुनिसा जो सदा निर्विकार। भरी रंभेसहि न हुंकार ॥**
**प्रतापें जयसा हिंदुचा सिंधुपार। उभारी राज्यध्वज थोर ॥**
**विलोकुनि त्याला के.स.रि.स होय हर्ष, कसें त्या मानितसां आर्ष ? ध्रु.**

आह्मी पुष्कळ विचार केला, परंतु ह्या पद्यांतील अर्थ कांहींच उकलेना. आंगरखा बहुगुणी थोर पुरुष, तो कसा काय ? आणि आर्ष तो कसा मानावयाचा ? वैभवानें तो ह्मणे सरदार! कर्णासारखा ह्मणे उदार! स्वभावानें काय तर ह्मणे नळासारखा! येवढेंच नव्हे, तर शुकासारखा निर्विकार! रंभेसही हुंकार भरणारा नव्हे! (हुंकार तें काय ?) आंगरख्याला जर शुकाचें 'सरटिफिकिट' द्यावयाचें, तर बाकीच्या जड पदार्थांनीं कोठेंसा बदफैलीपणा केला ? हें पुस्तक कवीनें स्वप्नांत लिहिलें का भ्रांतींत लिहिलें ? आह्मांस तर कांहीं कल्पनाच होत नाहीं. ह्याच विषयावरील आर्येचा हा एक मासला:—

**द्विजराज्य विक्रमध्वज आटकपर्यंत ज्या द्विवसनांहीं।**
**फडकविला; त्या निंदिति शंका न कशी सुधारकां नाहीं॥ १ ॥**
**पगडीवाला बघतां टोपीवालाहि जाहला लीन।**
**मात्र तशी पगडीची आज उरे चटकदार लाली न ॥ २ ॥**

अटकेपर्यंत झेंडा लावला तो ह्या दोन वस्त्रांनीं—ह्मणजे आंगरख्यानें आणि पागोट्यानें! आंतील व्यक्तीनें कांहींच केलें नाहीं! कारण, शूर, सरदार, काय तो आंगरखा! राघोबादादांचीं, पहिल्या बाजिरावांचीं आजपर्यंत जीं सारीं नांवें घेतात तीं व्यर्थ! ह्या नव्या शोधाबद्दल इतिहासप्रिय लोकांनीं के.स.रि.चे खरोखरच आभार मानले पाहिजेत! पगडीवाल्याला पहातांच टोपीवाला सुद्धां नरम आला! मात्र आतां इतकेंच झालें कीं, ती पगडी विटली, आणि तिची ती चटकदार लाली मोडली! आणि त्यामुळें घोडें अडलें. आतां एका रंगाऱ्याकडून नवा डूब दिला कीं, टोपीवर पाय द्यायाला मोकळीक झाली!! पदरावर आणि जाकिटावर कवीनें जी उतरड रचली आहे, ती तर फारच प्रेक्षणीय! पूर्वपक्ष पहा.

**पदर सांवरितां वरचेवरी। टिकुन राहि न तो तुमच्या शिरीं ॥**
**लडवडूनि सदैव मधें मधें। सरळ एकहि काम करूं न दे ॥ १ ॥**

**पडुनि तो उपयोगिं न कोणच्या । उघड दावितसे तुमच्या कुचा॥ पदर नित्य अशी फजिती करी । तरिहि तो रुचतोच तुह्मां शिरीं२**

आतां उत्तरपक्षाची साखळी:—

**स्त्री पृष्ठोदर झांकून । उरीं वांकून । उभा ठाकून । शिरीं साजून । ना मुखा लागुं देऊन । हवा देऊन । आदिपासून । जो असा जून । कोणीहि पुढें आलिया । सहज लीलया । हरी स्त्री भया । न क्रोमेजून । कामांत पुरी हतवटी । दावि चोकटी । स्त्रियांच्या कटी । हात खोंवून । त्या होतां घामाघूम । मारुनी धूम । निवारी घाम । व्यजन होऊन । यच्छक्तिपराक्रम धैर्य । तेज अनिवार्य । शौर्य औदार्य । जगीं गाजून । पाहुनी जयाचें रूप । फांकडें खूप । बैसती चूप । इतर लाजून ॥ इ. इ.**

एवढा असंबद्ध प्रलाप केल्यावर सुधारणावारण ची ची करीत जाईल ह्यांत आश्चर्य तें कोणतें? जून पदर तो कसला? आणि कोंवळा पदर तो कसला? आणखी तो कसा? तर कामांत पुरी चोख हातवटी दाखविणारा; ज्याची शक्ति,पराक्रम, धैर्य अनिवार बरें! शौर्य काय? औदार्य काय? पदराचें सारें जगांत गाजून राहिलें आहे! रूप काय ह्मणे फांकडें! तें पाहून सर्व चूप बसतात! हा काय उत्तरपक्ष? कां उत्तरक्रिया? काय समजावयाचें? असाच प्रकार सारा! चोळीवर काय? जाकिटावर काय? सारी शुष्क बडबड. कोश आणि व्याकरण हीं तर काय कवीच्या घरचीं. के.स.रि. घालील तो शब्द; लावील तो अर्थ; करील तें रूप आणि जुळवील तो प्रास. ह्मणजे शेतांत घातलेली ताल, आणि आगरांत रचलेला गडगा, ह्यापेक्षां कवितेची मातब्बरी कांहीं अधिक नाहीं. उदाहरणार्थ खालील शब्दांचें टिपण पहा.

**'पंती' 'कारिक' 'कारीचा दगड' 'फिऱ्या' 'कचरिपु' 'पंग्वाधावविता' 'राकामीं' गृहनार' 'गृहगिराणित' 'निःशंकून' 'विकलवुनि' 'सगार्टर'**

काल, देश, वर्तमान ह्यांस अनुसरून प्रत्येक गोष्टीमध्यें फेरफार होत असतात, व तसें व्हावयाचेंच. मग आचारविचारांत झाले, तर त्यांत विशेष तें काय? आतां त्यांत उतावळ्या सुधारकांकडून पुष्कळ घाई होते—फाजिलपणा होतो, ही गोष्ट खरी आहे. परंतु त्याची नफानुकसानी, हितअहित दाखवावयाचें तें सयुक्तिक, सप्रमाण व सभ्यपणानें दाखविलें पाहिजे. टवाळी किंवा हमरीतुमरी करण्यांत पुरुषार्थ तो कोणता? के.स.रि.नें हलक्यासलक्या क्षुद्र गोष्टी-

वरही चऱ्हाट वळलें आहे. अलीकडे नांव लिहिणें तें आद्याक्षरांनीं संक्षिप्त लिहिण्याचा प्रघात पडला आहे. ह्या शुष्क बाबतीवरही आमच्या कवीनें कशीं वाक्सुमनें ओवलीं आहेत तीं पहा के.स.रि. ह्मणतात:—

**कथि के.स.रि. संक्षेपहि करुनि निजनांवीं ।**
**इंग्रजानुकरणें सोंग जगाला दावी ॥ ध्रु० ॥**

के.स.रि. मात्र आपल्या नांवाचा संक्षेप करून जगाला सोंग दाखवितो. आणि इतर लोक जो संक्षेप करतात तो मात्र सोंग नव्हे! ही सबब खाशी! आतां ह्यावरील विधानावर ग्रंथकर्त्यांची टीप पहा:—

**श्लोक.–श्रद्धालु त्यांत निपजूनि सुपुत्र कोणी ।**
**तो श्राद्धपक्ष करण्यास मनांत आणी ॥**
**तत्तात सिम्नलर होउनि जाय, तो कीं ।**
**"जी. डब्ल्यु." हीच अभिधा मिरवूनि लोकीं ॥ १ ॥**
**ही आंग्ल पद्धति सुता पितरत्रयाचीं ।**
**नांवें सबंध तरि जाणविते कशाचीं? ॥**
**एकाक्षरेंचि मग तो स्वपितृत्रयांतें ।**
**उच्चारुनी तनय दे पितृपिंड हातें ॥ २ ॥**

स्वतः तोच दोष करून दुसऱ्याची टवाळी करणें हा कोण बाष्कळपणा? के.स.रि.चे छाव्यास मागेंपुढें पिंड देण्याचा प्रसंग येईल, तेव्हां कोणती पितरत्रयी उच्चारावयाची? के. स. रि. हीच ना? आपल्या नाकाला शेंबुड ठेवून लोकांस हांसावयाला कवीच्या मनाला यत्किंचित्‌ही दिकत वाटली नाहीं ही किती आश्चर्याची गोष्ट?

असो. ह्यापेक्षां अधिक चर्चा करण्यांत कांहीं हाशिल नाहीं. आजपर्यंत के. स.रि. कवि हे पोक्त अशी आमची समजूत होती, व आमच्यावर त्यांची श्रद्धा मोठी, असें मोठमोठ्यांच्या तोंडांतून आमच्या कानावर आलेलें होतें. असें असून आजवर त्यांच्यावर अगदीं उलट लिहिण्याचा प्रसंग आला. तेव्हां ते कदाचित् आह्मांसही सुधारकवारणांच्या कळपांत ढकलतील. मग ते आह्मांस 'हंडिबाग' बनवितात, कां 'बगलबच्चे' बनवितात तें पहावें! कांहीं कां करीनात? आह्मांस जें वाटलें, तें आह्मी बेधडक कळविलें आहे. आणि पुनरपि त्यांनीं अशा भानगडींत व्यर्थ आपला मेंदू घालूं नये, अशीही त्यांस विनयाची सूचना आहे. आतां त्यांच्या दुसऱ्या चांगल्या विषयाकडे पुनरपि वळावयाचें आहे, तें थोडेंसें फुरसदीवर ठेवूं.

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar at JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

BY SPECIAL APPOINTMENT TO

H. H. MAHARAJA SIR SHAHU CHHATRAPATI, G. C. S. I., KOLHAPUR.


PATRONISED BY

H. H. MAHARAJA SIR KRISHNARAJ WADIAR BAHADUR G. C. S. I., MYSOR.

AND

MOST OF THE PRINCES AND CHIEFS OF INDIA.

SPECIAL FOR INDIA.




# स्वधर्माभिमानी यांकरितां

## हिंदु वॉचेस.

हीं वॉचेस दिखाऊ, मजबूत, वजनांत हलकीं, मध्यम आकार, बरोबर वेळ दाखविणारीं, पांढरी मिन्याचे प्लेटवर सुंदर प्रेक्षणीय हिंदु पूज्य दैवतांचीं चित्रें वगैरे.

हें वॉच एकवार घेतल्यास १०,२० वर्षे दुसरें घ्यावयास नको.

### हिंदु युनिव्हर्सल वॉच.

ग्यारंटी ३ ते ६ वर्षें. रोमन आंकडे असून मध्यभागीं फक्त शंकरपार्वती व गजानन. निकलसिल्व्हर वॉच किं. रु. १६. चांदीचें वॉच किं. रु. ३०. सोन्याचें वॉच किं. रु. २५०.

**हिंदु प्राईज वाच**—ग्यारंटी २ ते ५ वर्षे. मराठी व रोमन आंकडे असून चित्रें १६ आणि मध्यभागीं श्रीमहादेवपार्वती.

**निकल सिल्व्हर वॉच**—किं. रु. १५, चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३०, सोन्याचें किं. रु. १५०.

**हिंदु प्रिन्हलन्स वॉच**—ग्यारंटी १ वर्ष ते ४ वर्षेपर्यंत–डबल आंकडे, चित्रें १५ असून मध्यभागीं दरबारी थाटानें श्री. शिवाजी छत्रपतिमहाराज. नि. सि. वॉच किं. १०, १५. चांदीचें किं. रु. २५-३०.

**हिंदु आर्मी वॉच**—डबल आंकडे असून चित्रें २२. मध्यभागीं श्री. शिवाजी महाराज घोड्यावर बसलेले. निकल सिल्व्हर वॉच किं. रु. १० ते १५. चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३०. शिवाय वेस्टंड रिलायन्स जॉन ब्यारेल, फुरवायझर वगैरे प्रसिद्ध मेकरचीं लहानमोठीं वॉचेस आमचेकडे विकत मिळतील.

प्याकिंग पोस्टेज निराळें, वॉचबरोबर एक शेडा, पेटी, काच आणि स्प्रिंग मिळेल. व्ही. पी. पार्सलनें पाठवूं.

सर्व प्रकारचे वॉचेसचीं दुरुस्तीकामें माफक आकारानें ग्यारंटीसह करून देऊं.

सचित्र क्याटलाग फुकट. [२–१२

जी. बी. नाईक आणि कंपनी,

भायखळा, मुंबई आणि पुणें.

# धि इंडियन म्यारेज ऍण्ड डेथ बेनिफिट फंड लिमिटेड, मुंबई.

डिरेक्टर्स.

रावसाहेब दलपतराम प्राणजीवन खक्कर जे. पी.
बद्रुद्दिन अब्दुल्ला कूर एस्कायर जे. पी.
रुसतम बी. पेमास्तर एस्कायर बी. ए. एल्. एल्. बी.
धनजीशा फ्रामजी चिनाय एस्कायर.
विष्णु नारायण परुळकर एस्कायर ( एक्स आफिशिओ. )

मध्यम स्थितींतील मनुष्यांस आपल्या मुलांमुलींच्या लग्नाचे वेळीं व आपल्या मरणानंतर आपल्या वारसाकरितां पैशाचा संग्रह करून ठेवितां यावा म्हणून हा फंड १८९४ मध्यें स्थापन झाला आहे. इतक्या अवधींत ३००० पेक्षां जास्त मेंबर झाले असून सरासरी १५० मेंबरांस फायदा मिळाला आहे. लग्नफंडाची वर्गणी दर महिन्यास १। पासून ६। रु. पर्यंत आहे.

**मरणफंडाची वर्गणी फक्त १ रुपया आहे.**

व या मरणफंडांतील मेंबरांच्या पश्चात् त्यांच्या वारसास २००० रुपयेपर्यंतची रक्कम फायद्यादाखल मिळेल. जास्त माहिती खालील पत्त्यावर एक आण्याचें तिकिट पाठविल्यानें मिळेल.

[१२–५

आफीस—५
कावसजी पटेल स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई.

परुळकर ऍण्ड कं०
एजंट्स.

धनुर्धारीकृत पुस्तक.

# प्रौढप्रतापनिधि माधवराव.

किंमत ८५ आणे. ट. ख. ८॥.

जनार्दन महादेव गुर्जर,

रामवाडी–मुंबई.

यांचा कदाचित् गुण नच आल्यास पैसे परत देऊंच.

# मंत्रसिद्ध ताईत व दोरे.

हिमालयावरील एका महान् तपस्वी (सिद्ध) पुरुषानें आमच्या निःसीम भक्तीस तुष्ट होऊन आपला अत्यंत उपयोगी असा जो पिशाचबाधा व दुसरे अनेक विकार दूर होणारा अद्भुत मंत्र तो ताईत व दोरे मंत्रून देण्यास शिकविला आहे. व त्या योगानें खालील विकार फार त्वरित बरे होतात. पिशाचादि पीडेनें मुलें, स्त्रिया किंवा पुरुष झोंपेंत अगर जागृतावस्थेंत घाबरतात, कंप सुटतो, वेड लागतें, दांतओंठ चावतात, दचकून उठतात, व कधीं ज्वरादि विकार उत्पन्न होतात आणि कित्येक प्रसंगीं अपस्मार, भ्रम वगैरे अत्यंत वाईट रोग उत्पन्न होतात. कित्येक स्त्रियांस पिशाचादि पीडेनें संतती होत नसते व झालीच तर वांचत नसते. कित्येकांस स्वप्नामध्यें स्त्रीचा भास होऊन धातुपात होतो; कित्येक स्त्रीपुरुषांमध्यें व कित्येक मित्रांमध्यें वैमनस्यें उत्पन्न होतात, इत्यादि अनेक विकार या आमच्या अद्भुत मंत्रसिद्ध ताईत व दोरे यांनीं फार त्वरित खात्रीनें बरे होतात. गुणाबद्दल हजारों सर्टिफिकिटां मिळाल्या व मिळत आहेत. थोड्याच काळांत याचे अपूर्व गुण या देशाच्या आसमंताद्भागीं ब्रह्मदेश, सिलोन, बनारस, पंजाब, मद्रास, मुंबई, कानडा, इत्यादि ठिकाणीं अतिशय पसरले आहेत; सबब जास्त वर्णन करीत नाहीं. सिद्धमंत्र खोटे ह्मणणारांनीं एकवार अनुभव घेऊन पहावा, ह्मणजे ते नेहमींच ग्राहक बनतील. पुरुषांचे विकारांस दोरा, किं० ८ आणे. स्त्रियांचे विकारांस ताईत १ रु०; रुप्याचा २ रु०; सोन्याचा ६; कित्येक रोगांस दोन वस्तू घ्याव्या लागतील. दोन वस्तू घेणारास ४ आणे, टपालखर्च माफ. एकवार अनुभवानेंच पूर्ण खात्री होईल. माहितीखर्डा मोफत पाठविला जाईल. व्ही. पी.नें पाठवूं. पत्ता स्पष्ट व पूर्ण लिहावा.

विष्णुबोवा सिद्धमांत्रिक,

२–१२] पत्ता—पोष्ट हर्णै, जिल्हा रत्नागिरी.

## केरळकोकिळचित्रविद्यालय.

# फोटोग्राफचा कारखाना.

आमच्या कारखान्यांत अगदीं नवीन नऱ्हेचीं तऱ्हेचीं यंत्रें विलायतेहून आणविलेलीं आहेत.

ह्यांच्या योगानें $\frac{१}{१००}$ सेकंदांत तसवीर निघते. ह्यामुळें लहान मुलांच्या व जनावरांच्या सुद्धां तसविरी काढण्यांत येतात.

झिल्हईकाम फारच मनोहर—केवळ काच लाविली आहे, असा भ्रम होतो.

## विक्रीस तयार असलेल्या तसबिरा.

जगत्प्रसिद्ध भिंवा सुताराच्या हातचें रामपंचायतन; वनवासी राम, आनंदभुवन, राजा रविवर्म्याच्या तसबिरा, श्री० बाळासाहेब पंतप्रतिनिधि बी. ए. ह्यांच्या हातच्या शंकरपार्वती, गणपति, महाविष्णु, शिवाय दत्तात्रय, गजेंद्रलक्ष्मी इत्यादि देवतांच्या, साधुपुरुषांच्या, श्रीमन्महाराज छत्रपति शाहूमहाराज कोल्हापूर इत्यादि राजेरजवाड्यांच्या, दुष्काळग्रस्त लोकांच्या, स्त्रियांच्या, लहान लहान गोजिरवाण्या मुलांच्या, मोठमोठ्या इमारतींच्या व देखाव्यांच्या, कायगिरीच्या उत्तम पदार्थांच्या, इंडियन क्यारेक्टर्स—हिंदुस्थानांतील लोकांच्या रीतीभातींच्या तसबिरा, व त्यांचीं सुंदर सुंदर आल्बमस–बुकें विक्रीस तयार आहेत.

नमुने समक्ष पहावयास मिळतील. क्याटलॉग लवकरच तयार होईल.

### किंमती.

कार्डसाईज ।– क्याबिनेट ॥– फूलसाईझ १॥ रु.

ह्याशिवाय क्रिस्टोलियम् पेंटिंगचे नमुने देखील आमचे येथें आहेत.

नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. उत्तरास तिकिट आल्याशिवाय उत्तर मिळणार नाहीं; व आगाऊ पैसे किंवा व्ही. पी. नें माल मागितल्याशिवाय मागणीकडे लक्ष दिलें जाणार नाहीं.

**आठल्ये आणि सन्स,**
फोटोग्राफर्स व आर्टिस्ट्स.

विशेष सूचना—वरील फोटो दत्तात्रेय कृष्ण सांडू, दुकान रामवाडी, मुंबई, यांजकडेही मिळतील.

१ कोल्हापूर येथील शास्त्रीय प्रदर्शनाचे देखावे—जसें 'वायुशास्त्र,' 'पदार्थविज्ञानशास्त्र' 'जलशास्त्र,' 'रिक्तनळ्या,' 'उष्णता,' इत्यादि. तसेंच नव्या शोधाप्रमाणें एक्सरेज्‌नें काढलेले जीवंत मनुष्याच्या हाडांचे फोटोही येथें विक्रीस तयार आहेत. तसेंच सिंह, हत्ती, उंट, ओऱ्यांगओट्यांग, हिपोपोट्यामस वगैरे चित्रें त्यांच्या संक्षिप्त वर्णनासुद्धां विक्रीस तयार आहेत.

मार्च. (वर्षाची वर्गणी १८३ ट खर्चासह. फुटकळ अंकास ८४.) १८९८.

# केरळकोकिळ.

वर्षारंभ जानेवारी.

पु० १२] [अं० ३

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्तवापराधः ।
सहकारतरौ चकार यस्ते सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

रामवाडी
मुंबई.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

विषयांची अनुक्रमणिका.


| | पृष्ठ. | | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| भासमान किनारा. ... | ... ४९ | बोलके पक्षी. ... | ... ५६ |
| कोकिळाचा पाठपुरावा. | ... ५३ | पुस्तकपरीक्षा. ... | ... ६२ |



# आमचा नवा क्याटलॉग मागवावा.

मिळणारीं सर्व प्रकारचीं पुस्तकें आमचे दुकानांतून व्ही. पी. नें रवाना होतील.

रामवाडी–मुंबई,

आमचीं फक्त खासगी पुस्तकें खालील पत्त्यावरूनही रवाना होतील.

मु० पार्पुंड पोष्ट पनवेल,

जि० कुलाबा.

**जनार्दन महादेव गुर्जर.**

# हरएक प्रकारचा माल

मुंबईंत मिळणारा, व्यापारी व ग्राहक यांस रोख पैसे आल्यास पाठवूं.

**नियम व माहिती अर्धा आणा आल्यास मिळेल.**

व्यापारी व ग्राहक ह्यांकरितां. **हरएक प्रकारचा माल** मुंबईंत मिळणारा वक्तशीर वाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय.

D. K. SANDU,
RAMWADI, BOMBAY.



**दत्तात्रेय कृष्ण सांडू** त्यांचें हरएक प्रकारचा माल मिळणारें, आणि माफक अडत घेऊन माल रवाना होणारें दुकानः—

रामवाडी, मुंबई.

**खरा हस्तिदंती माल**–फण्या ॥८ ते १ रु., कंगवे ॥८ ते ॥१२ आ., फांसे जोड २ ते ७॥ रु., **नाटाचे फांसे** ॥६ ते ॥१२ आणे.

वा. कृ. सांडू, दुकानदार—रामवाडी, मुंबई.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

आर्यमहौषधालय मु० आंजलें.

या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊंच व त्याशिवाय त्यांच्या आरोग्यार्थ एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकटच देऊं.

# मदनविलासामृतसंजीविनी.

## वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहक, बुद्धि-कांतिवर्धक व धातुपौष्टिक सुवर्णमाक्षिक मौक्तिक कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्त्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्वभागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, छातींतील रोग, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, वातरोग, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, हात, पाय, मूत्रमार्ग, व शरीर यांचा दाह, व अरुचि, इ० अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास नवीन किंवा जुनाट असले तरी खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस शारीरिक व मानसिक श्रम फार पडतात, त्या सर्वांच्या आंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो व सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें. कोष्ठशुद्धि होते. या अप्रतिम गुटिका अत्यंत शोधानें केल्या असून त्यांच्या अप्रतिम गुणका-

रित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं, असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी इटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळया रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळया घेणारांस बंगींचा सर्व टपालखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळयांस १ रु. ७० गोळयांस २ रु. १६० गोळयांस ४ रु. २६० गोळयांस ६ रु. ५२० गोळयांस १० रु.

**थंडगार नेत्रांजन**—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार, तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळयांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

**विशेष सूचना.**—अलीकडे आंजर्लें व मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या बऱ्याच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष संभव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें **"कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य, मु० आंजर्लें, ता० दापोली, जि० रत्नागिरी."** याच पत्त्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपानपत्रक सोबत असतेंच.


३–१२]

# केरळकोकिळ.

पु० १२] [अं० ३


## लोकोत्तर चमत्कार.

### भासमान किनारा.



केव्हां केव्हां सृष्टिवैचित्र्याच्या अशा कांहीं अद्वितीय व अद्भुत गोष्टी घडून येतात कीं, त्या पाहतांच, हें काय गौडबंगाल आहे? कां ह्या कांहीं भूतचेष्टा आहेत? कां हें कांहीं चेटूक आहे? आहे तरी काय? असे कल्पनातरंग मनुष्याच्या मनांत उठूं लागून, तो अगदीं गोंधळून जातो. परंतु बंगाली विद्या; चेटूक, भूतचेष्टा, व छांछूंचे प्रकार हीं सर्व थोतांडें होत. वातावरणांत कांहीं विशिष्ट फेरफार होऊन, जगांतील दृश्यमान वस्तूंचा हुबेहुब देखावा दृष्टीस पडतो. पाण्यासारखें पाणी, तलावासारखा तलाव, समुद्रांतील जहाजासारखें जहाज, इतकेंच नव्हे, तर कि-

लँचासारखे किल्लेही केव्हां केव्हां दिसतात, आणि त्यांतही विशेषेंकरून भर मध्यान्हाच्या वेळीं, एखाद्या ओसाड माळावरून जातांना, अशा प्रकारचा एखादा लहानसा देखावा बहुतेक दृष्टीस पडतो. अशाच प्रकारचें आमच्या इकडे ज्यास 'मृगजल' असें ह्मणतात, तें होय. तो केवळ दृग्भ्रम होय. आमच्या 'कोकिळांत' मागें अशा तऱ्हेची बरीच माहिती येऊन गेली आहे, ती बहुतेक वाचकांस स्मरत असेलच. नसेल तर ती पुन्हां एकदां पहावी, ह्मणजे वरील गोष्टी चांगल्या प्रकारें कळून येतील. आज आह्मीं जी माहिती देण्याचें योजिलें आहे, तीही अशाच प्रकारची आहे. **फ्रान्स**चा समुद्रकिनारा एकदां अशा प्रकारच्या भासमान देखाव्यांत दृष्टीं पडला होता. त्याची हकीकत चार दोन ओळींत मागें एकदां दिली आहे. परंतु तशाच प्रकारचें वर्णन सचित्र व सविस्तर दुसरीकडे आढळल्यावरून, आज आह्मी वाचकांस सादर करीत आहों.

इ० स० १८२० त **ग्रीनलंड**च्या किनाऱ्यावर क्याप्टन **स्कोर्स्बी**[२] नामक एका दर्यावर्दी गृहस्थानें हा किनाऱ्याचा चमत्कार पाहिला. त्या वेळीं दाट धुकें पसरलें होतें. त्या अज्ञात किनाऱ्याजवळ तो गेला, तेव्हां त्याच्या मनांत आलें कीं, ह्या देखाव्याचा एक नकाशा उतरून घ्यावा. पण पाहतो तों तो किनारा क्षणाक्षणांत हालत आहे, असा भास होई. तेव्हां तो मोठ्या बुचकळ्यांत पडला. पुढें तो किनारा दुर्बीण लावून पाहिला, तों तो एका अति प्राचीन शहराचा देखावा आहे, असें दृष्टीस पडलें. कोठें जमीनदोस्त होत आलेले किल्ले, कोठें स्तंभ, कोठें देवालयें, कोठें थडगीं, शिवाय कोठें भल्या टोलेजंग व ठळक इमारती वगैरे त्या शहरांत रगड पडलीं असावींत असें दिसत होतें. टेंकड्या ज्या दिसत होत्या, त्या तर काय? कांहींवर मनोरेच चढलेले दिसत तर कांहींवर माऱ्याचे बुरूजच दिसत; कांहींवर सुळकेच दिसत, तर कांहींवर नुसतीं शिखरेंच दिसत, असें कोठें कांहीं, कोठें कांहीं असल्याकारणानें शोभायमान दिसत होत्या. आणखी कांहींवर एक किंवा दोन परावर्तनाचे संस्कार घडून, त्या ज्या पर्वतालगत होत्या, त्याच्या वास्तविक उंचीपेक्षांही किती तरी पट उंचीवर, शिळांचे जंगी

---

१ पु. ६ अं. ९ मधील 'मृगजलांतील अद्भुत देखावे' हें सदर पहा. २ ह्या गृहस्थाचीही बरीच हकीकत वरील पुस्तकाच्या त्याच अंकांत आली आहे.

ढीगच्या ढीग वातावरणांत अधांतरीं लोंबकळत असलेले दिसत. तो स-बंध देखावा पाहतांच वाटे कीं, हा एक अद्भुत जादूचा खेळच आहे. त्या प्रांतांत अशा प्रकारचे दृग्भ्रमाचे खेळ—देखावे हरहमेशा पहावयास मिळतात.

दुसऱ्या एका गृहस्थानें इ० स० १७४० त, दुसराच एक अपूर्व देखावा पाहिला. ह्या गृहस्थाचें नांव **जॉनरेन्** होय. हा **सूटरफेल-**(कंबरलंड) मधील, **विल्टनहॉल**चा राहणारा. एके दिवशीं हा व ह्याचा एक चाकर, **डॅनियल स्ट्रिकेट,** असे दोघे आपल्या दरवाजांत बसले असतां, त्यांस समोर एक मनुष्याची आकृति दिसली. त्या मनुष्याबरो-बर एक कुत्रा होता; तो **सूटरफेल**च्या पलीकडे कांहीं घोड्यांच्या पा-ठीस लागला होतासा दिसला. ती जागा अशी अडचणीची होती कीं, त्या घोड्यांस जन्मजन्मांतरीं देखील चढतां आलें नसतें. कारण तिथें अगदीं सरळसोट सुळका होता. ह्मणजे तेथें कोणीही धांवत गेला अ-सता तरी ठार झाला असता. त्या आकृति क्षितिजाखालीं जाऊन दि-सतनाशा होईपर्यंत, एकसारख्या अशा कांहीं विलक्षण शीघ्रगतीनें धांवत सुटल्या होत्या कीं, ती गती पाहतांच अंतःकरण थक्क होऊन जाईल. दुसरे दिवशीं सकाळीं, **स्ट्रिकेट** व तो त्याचा धनी हे दोघेजण त्या सुळक्यावर चढले. आतां तो कालचा मनुष्य आपणास मृत होऊन पडलेला दिसेल, आणि ते घोडे जे इतके विलक्षण भरधांव सुटले होते, त्यांचे पळतांना खालीं पडलेले नाल एकूण एक गोळा करावयास सांप-डतील, असे असे विचारतरंग वेगानें उसळूं लागून, ते मनोराज्यांतील बिनमोल हवा खाण्यांत दंग झाले होते. पण त्यांना वाटलें होतें, त्या ठिकाणीं येऊन पहातात तों, त्या सुक्या विचारतरंगांच्या अभावाचा भोंपळा फुटला. तिथें कशाचाही मागमूस नव्हता. एक मनुष्याचें पाऊल उम-टलें नव्हतें, कीं इवलीशी रेषा उमटली नव्हती, कीं घोड्याची उगीच एक टांपही उठली नव्हती. जागा जशीच्या तशीच साफ. एक देखील घोड्याच्या खुराचें चिन्ह नाहीं. कां? कशा आहेत दृग्भ्रमाच्या अद्भुत चेष्टा! अशा प्रकारचे देखावे सरोवराच्या किनाऱ्यावर व फ्रान्सच्या किनाऱ्यापर्यंत बहुधा हरहमेश दिसतात. तरी त्या दोहोंमध्यें पन्नास

मैल अंतर आहे. हेस्टिंग्जपासून **फ्रान्स**च्या किनाऱ्यापर्यंत एखादी सरळ रेषा काढली तर ती समुद्रामधून जाईल. कारण पृथ्वीची बहिर्वक्रता असल्यामुळें असें होतें.

अशाच प्रकारचा सृष्टिवैचित्र्याचा अपूर्व देखावा, **केंब्रिज्**चे राहणारे प्रोफेसर **व्हिन्स** नामक गृहस्थांनीं व इतर सभ्य गृहस्थांनीं, इ० स० १८०६ त आगष्ट महिन्याच्या ६ व्या तारखेस **रामस्गेट** येथें पाहिला. त्या दिवशीं **डाव्हर** किल्ल्याचे बुरूज एका टेंकडीवर तरंगतांना दिसले. ह्याची माहिती 'कोकिळांत' पूर्वी आलेलीच आहे. तेव्हां तिचा पुनरुल्लेख करणें प्रशस्त नव्हे. परंतु पुढें त्याच ठिकाणीं एक फारच मनोहर आणि अप्रतिम मृगजळाचा चमत्कार घडून आला, तो सांगून आजचा हा विषय आटोपता घेऊं.

ह्या चमत्काराचें गूढ पुष्कळ दिवसपावेतों कोणास उकललें नव्हतें. ज्या दिवशीं हा घडला, त्या दिवशीं सर्व दिवसभर समुद्रावरील वातावरणांत कांहीं विलक्षण बदल झाली होती. आणि त्यांत **डौन्स**मध्यें नांगरलेलीं कैक जहाजें परावर्तन पावलेलीं होतीं; व ज्याचे त्याचे खालचे–पाण्यांतले भाग–वरील भागापेक्षां–मुख्य भागापेक्षां–तिप्पट वाढलेले दिसत होते. समुद्रांत आंत आंत असलेलीं सर्व जहाजें अंतराळीं तरंगत असलेलीं दिसत होतीं, आणि बाकीचीं ह्मणजे किनाऱ्याजवळचीं उलटीं–ह्मणजे खालीं शिडें व वर जहाज उपडें–अशीं स्थितींत असलेलीं भासत. **गुडविन् सँडस्**च्या अगदीं थेट दक्षिण किनाऱ्याच्या पश्चिमेस ह्याहीपेक्षां एक अलौलिक देखावा दृष्टीस पडला होता. तो एका जहाजाचाच होता. परंतु त्या जहाजाचीं किरणें दोनदां परावर्तन पावलीं होतीं. ह्यामुळें मोठाच चमत्कार झाला. ह्मणजे एकच जहाज दोन ठिकाणीं निरनिराळें दिसत होतें.

तसाच **फ्रान्स**च्या किनाऱ्यावर एक अति आश्चर्यकारक देखावा दृष्टीस पडला होता. क्षितिजावर कांहीं उंचीवर बर्फाच्छादित टेंकड्या आहेतशा दिसल्या. मात्र तीं प्रतिबिंबें उलटीं परावर्तन पावलीं होतीं. पण त्या इतक्या कांहीं जवळ आहेतशा भासल्या कीं, कांहीं सांगून सोय नाहीं. रात्र झाल्यानंतर पाहतात तों **क्याले, ग्रिनेझ, ग्रेव्हलिन्स,**

आणि डंकर्क येथील दीपगृहें झकाकलेलीं दिसूं लागलीं. ह्याचें कारण असें दिसून आलें कीं, ह्या प्रांतांत जरी असें होण्याचें कांहीं चिन्ह नव्हतें, तथापि त्या वेळीं इतर ठिकाणीं तुफानें पसरलीं असल्यामुळें, वातावरणांत कांहीं विशेष फेरफार होत होता. त्यामुळें हा अत्यद्भुत देखावा दृष्टीस पडला. असो.

ह्या सर्व भ्रामक सृष्टचमत्कारांच्या उदाहरणांवरून, भासमान गोष्टींचा त्याग करून, सत्यदेवतेचें मूळपीठ धुंडाळावें, ह्या पूर्वापार चालत आलेल्या ज्ञात्यांच्या अनुभविक सिद्धांताचा—तत्वाचा—पूर्णपणें बोध घेण्यासारखा आहे.

---

# कोकिळाचा पाठपुरावा.

## ( [१]आर्या. )

वा! कोकिळा! गुणज्ञा! मधुरस्वर गायका किती गाती ।
सद्गुणमंडित, पंडित, कीर्ति अखंडित अशी तुझी गा ती ॥ १ ॥
ज्ञानामृतपर्जन्यें, सुजनमनोवाटिका कशा फुलती ।
भुलती, खुलती, वाचक, हर्षभरें सुगुण पाहुनी डुलती ॥ २ ॥
लेखनकौशल्य तुझें निरुपम म्यां काय आज वानावें ।
वर्णन कर्णमनोहर, बहुधा ठेवील कोण त्या नांवें ॥ ३ ॥
कविता रसाळ नाना, मधुराम्रफलासि काय ती गोडी ।
बहुधा सुधाहि रुचिला कमती होईल वाटते थोडी ॥ ४ ॥
रचना सरळ, मनोहर, भरली सुगमार्थता प्रसाद भला ।
झाली प्रसन्न तूतें, वाग्देवि ह्मणोनि लाभ हा घडला ॥ ५ ॥

---

१ सदरहू कविता आमचे परम हितचिंतक "पोतक" यांजकडून आल्या आहेत; व कोकिळास परोपरीनें यथाशक्ति साहाय्य करण्याचा त्यांचा दृढतर मनोदय आहे. शिवाय, त्यांची कवित्वशक्तिही चित्ताकर्षक असल्याचें दिसून आल्यावरून आह्मींही आदरानें त्यास स्थळ दिलें आहे.

ए० के० को०—

ज्ञानप्रद, सत्यप्रद, बोधप्रद विषय देशि जे सगळे ।
मधुमक्षिका–गृहांतुनि वाटे मधुबिंदु अमृतसाच गळे ॥ ६ ॥
वर्षं होउनि गेलीं, सुखद किती आक्रमोनि ही वाट ।
घालिशि काय सुदैवें, आज गड्या तूं तपासही गांठ ॥ ७ ॥
परि शेवटीं असा कां, लुप्तस्थिति पावशी सख्या सांग ।
गात्रें शिथिल पडोनी, जीर्ण गमे जाहलें तुझें आंग ॥ ८ ॥
परिमिति सोडुनि मागें, पांच सहा पावलें अहा पडशी ।
कां साहित्य सरोनी, ठेविशि सहजीं दुज्या स्थळीं पडशी ॥ ९ ॥
योग्य न बसती ठोके, होय ढिलें, देहचक्र लंबकसें ।
कीं क्षण झांकी रविला, येउनियां आड चंद्रबिंब कसें? ॥ १० ॥
कां तूं स्वेच्छाचारी, हा तरु सोडोनि पाहसी दुसरा ।
लोकप्रिय तिळगुळ कां सोडुनि तो गोड वाटतो दसरा ॥ ११ ॥
बापा! विचारशीला, त्वां न वृथा हातपाय गाळावे ।
चंदन गंध सुटाया, अधिकाधिक लागतें उगाळावें ॥ १२ ॥
कैशी गुप्त जहाली, हा! हा! तव साह्यकारिणी महिला ।
महिला भूषित केली, ह्मणुनी ठेविन टिपून मी वहिला ॥ १३ ॥
कोठें किरात गेला, संधान चुकोनि आड राज्यांत ।
हात ढिला पडला कीं, न्यून गमे रम्य, गोड गानांत ॥ १४ ॥
त्वद्दर्शनोत्सुक सदां, तव वाचकवृंद काय कीं रुसला ।
कीं हर्षसागरीं, हा विरह तुझा भूशिरापरी घुसला ॥ १५ ॥
आश्रय देणें तुजला हीच कृपा सुखित सर्व दात्यांची ।
परि अढळ, कृपाघन तो, जगदीश्वर, एक सर्वदा त्याची ॥१६॥
आश्रयदाते वाचक, तुह्मीही हातभार लावा हो! ।
पाहों रम्य पिकातें, ज्ञानाचा शुद्धसा झरा वाहो ॥ १७ ॥
चारा वेळोवेळीं देत असावा तुह्मींहि नेमानें ।
प्रेमानें कुरवाळुनि, त्यास करा सज्जनां जसें माने ॥ १८ ॥

विघ्नें अनेक दिसती, कोसळलीं एक दोन सालांत ।
सांत तशांत भयंकर, खात सुटे सर्व, चावुनी दांत ॥ १९ ॥
हें जाणुनि वाचक हो! होउं नका कोकिळावरी रुष्ट ।
पुष्ट करा प्रिय कोकिळ, होउनि त्यावरि सदैव संतुष्ट ॥ २० ॥
नेटानें काम पुन्हां रेटावें, नित्य नीट धीटपणें ।
वीट ह्मणे कोणीही, आला न ह्मणोनियां अधीटपणें ॥ २१ ॥
मागें अंक पडोनी, बापा तुजला कलंक जो लागे ।
रागें सकल धुवोनी, कीर्तितरुवरी बसोनि झोला घे ॥ २२ ॥
वाटो श्रमलव न तुला, तव जिवलग काय तूज तो सोडी ।
जोडीं लक्षगुणें तूं, सुयश जगीं सर्वथा नसो खोडी ॥ २३ ॥
मीही साह्य कराया, आश्वासन देउनी पुढें सरतों ।
भरतों सरस कृतीला, पाडावी ह्मणुनि यत्नही करतों ॥ २४ ॥
नानारूपें गुप्त, प्रकट, तुला धरुनि नित्य भेटेन ।
नेटें न काय होतें, तुजकडुनी घालवील खेटे न ॥ २५ ॥
स्वीकारीं रुचतां तुज जें जें होईल माझिया हातें ।
त्वद्गायनामृताशीं, इक्षुरसासम गमे अहाहा तें ॥ २६ ॥
थोरांच्या सहवासें, कां न परि घडेल लाभ इतरांशीं ।
मृत्स्नापुष्पन्यायें, सुगुणांच्या लोटती अमित राशी ॥ २७ ॥
हें जाणुनि नीरस परि तुज मत्कृति सत्य नित्य दावीन ।
होइल तुझिया हातें, सरस, तरी कोण दोष लावी न ॥ २८ ॥
आनंदें, उत्साहें, प्रेमपुरःसर करीन सेवा जी ।
ठेवा जीव तियेवरि, कोकिळवाचक अखंड सेवा जी ॥ २९ ॥
हा पोत कपोत जणों, मधुर पिकासम मुखें निघे रव न ।
भवन महादोषांचें, मानुनि घ्यावें तथापि हें कवन ॥ ३० ॥

( पोतक. )

# बोलके पक्षी.

**साळुंकी ती कैसी बोले मंजुळ वाणी ।**
**शिकविता धणी वेगळाची ॥ १ ॥**

( तुकाराम. )

पोपटपंची हा शब्द जो प्रचारांत आला, त्याचें कारण एवढेंच कीं, पोपट हा बोलका पक्षी आहे. त्यास आपण बोलावयास शिकविलें, शीळ घालावयास शिकविलें, रागांत गावयास शिकविलें तर तो शिकतो. ह्मणजे परानुकरण त्यास करतां येतें. परंतु आपण त्यास विठ्ठल विठ्ठल ह्मणावयास शिकवितों, किंवा निरनिराळ्या तऱ्हेचे व निरनिराळ्या देशचे लोक, निरनिराळीं वाक्यें पोपटास ह्मणावयास शिकवितात, कोची मलबारास 'कीरू कोट्याबिट्या व तोरे' असें शिकवितात; तें तो शिकतो. रागांत शीळ घालावयास शिकविलें, तर तेंही तो शिकतो. पण त्यास तितका स्पष्ट उच्चार करावयास येत नाहीं, व अर्थहि पण समजत नाहीं. ह्मणजे त्यांत त्याची लटपट उडते. तरी पण कां होईना, बोलक्या पक्ष्यांत त्याची गणना करतां येईल. दुसरे बोलके पक्षी ह्मटलें ह्मणजे मैना अथवा साळुंकी. साळुंकी 'मंजुळ' स्वर काढते हें तर सर्वत्र

---

१ 'श्रीमच्छंकराचार्यचरित्रां'त मंडण पंडिताच्या गृहद्वारांत पिंजऱ्यांतील कीरांगना (मैना) वेदवाक्यांविषयीं वादविवाद करीत असल्याचें पंडिताच्या दासींनीं आचार्यांस सांगितलें आहे. त्याचे चार श्लोक आहेत. ते असे:—

दासी आचार्यांस मंडण पंडितांचें घर कोणतें, त्याची खूण सांगतात—ज्याच्या गृहद्वारांत पिंजरस्थ कीरांगना वेदवाक्यांविषयीं वाद घालीत आहेत कीं:—

स्वतः प्रमाणं, परतः प्रमाणं । कीरांगना यत्र गिरं गिरन्ति ।
द्वारस्थनीडांतरसंनिरुद्धा । जानीहि तन्मंडणपण्डितौकः ॥ १ ॥
फलप्रदं कर्मफलप्रदोऽजः । कीरांगना यत्र……… ।
……………… । ……………………… ॥ २ ॥
जगद्ध्रुवं स्यात् जगदध्रुवं स्यात् । कीरांगना यत्र……… ।
……………… । ……………………… ॥ ३ ॥

"यांचें तात्पर्य असें आहे कीं, वेदवाक्य स्वतः प्रमाण आहे किंवा परतः प्रमाण आहे. तसेंच सुखदुःखाचें फल कर्म देतें किंवा सर्व शक्तिमान् सर्वज्ञ असा परमेश्वर देतो. तसेंच जगत् ध्रुव आहे किंवा अध्रुव आहे. हा विचार ज्याचे द्वारामध्यें पिं-

आहे. कोकिळ पक्षीही पंचमस्वरांत गातो अशी लोकप्रसिद्धी आहे, किंवा कविसंकेत, हवें तें ह्मणा. मात्र बोलक्या पक्ष्यांत गाणारे पक्षीही येतात. आज आह्मीं जी बोलक्या पक्ष्यांविषयीं माहिती देण्याचें योजिलें आहे, त्यांत बोलके व गाणारे त्या दोन्ही तऱ्हेच्या पक्ष्यांचाही समावेश केला आहे.

आतां गाणारे पक्षी व बोलके पक्षी, त्या दोहोंतला भेदही आपणांस कळला पाहिजे. नाहीं तर 'काव काव' करून आपल्या दीर्घस्वरानें कानांत किर्र करून सोडणारा कावळा, घनदाट कुंजांत बसून आपल्या 'घू घू घू' स्वरानें काळीज् थर्र करून सोडणारें कर्कश दिवाभीत, धान्यकण टपटप टिपून 'घुडघुड घुम' करून घुमणारा पारवा, आणि आपल्या चिमुकल्या 'चिंवचिंव' स्वरानें किलबिलाट करून सोडणाऱ्या चिमाबाई देखील त्यांतच येणार. बोलके पक्षी ह्मणजे काय हें पोपटाच्या पहिल्या प्रतिपादनावरून समजलेंच आहे. आतां गाणारे पक्षी ते हेच कीं, ज्यांचा स्वभावसिद्ध रंगेल स्वर, आपण—सर्व तऱ्हेचे लोक— ज्याप्रमाणें नेहमीं बोलतों, शीळ घालतों किंवा रागांत गायन करतों, जवळ जवळ तशाच तऱ्हेच्या धर्तीवर विशिष्ट प्रकारानें कानावर पडून, आपल्या मनुष्यप्राण्याच्या मनावर, त्या त्या प्रकारच्या विकारांचा ठसा उमटतो, अशा तऱ्हेचे शब्दसूर काढणारे पक्षी.

त्या प्रकारचे पक्षी आपल्या घरांभोंवतीं उंच वृक्षाच्या डाहळीवर बसून उच्च स्वरांत, मोठ्या रंगेलपणांत येऊन, गात असतात, ते मध्येंच उंच स्वर काय काढतात, मध्येंच बारका काय काढतात, मध्येंच गंभीर ध्वनी काय करतात, मध्येंच बारीक मोठी शीळ काय घालतात, नाना तऱ्हा करतात कीं तें ऐकून आपणांस मौज वाटते; पण आह्मीं कधीं त्यांचें नांवगांव, ठावठिकाण, त्यांचे गुणधर्म, त्यांची जात व तऱ्हा शोधून काढण्याचा प्रयत्न करतों का? छे! नांव नको. सारा जन्म,

---

अऱ्यांत असणाऱ्या कीरांगनाही (मैना) करितात; तें मंडण पंडिताचें घर असें आपण समजावें."

ह्यावरून हें एक मैना उत्तमप्रतीच्या बोलक्या होतात, ह्या विषयींचें पुरातनकाळचें उत्कृष्ट उदाहरण आहे.

ह्या अप्रतिम मानवी शरीराची खराबी करून घेण्यांत गेला व देह धुळीस मिळाला तरी बेहेत्तर, पण शोधकपणा स्वीकारावयाचा नाहीं; हा आमच्या कित्येक लोकांचा बाणा. आतां तसेही कांहीं महात्मे आहेत; पण खंडींत पाव रती. तेच परके लोक पहा. शोधकपणांत त्यांचा पहिला पाय. ज्यांनीं हजारों प्राण्यांचे शोध लावून, प्राणिधर्मशास्त्रास जीवन दिलें, ते पक्षिगणाचा शोध लावल्यावांचून, राहिले असतील काय? नाहीं. तेव्हां त्यांच्या कडूनच आह्मांस आजची माहिती घेणें भाग आहे. असो.

खचरशोधकांनीं अनेक वेळीं निरनिराळया जातींच्या पक्ष्यांचे तऱ्हेतऱ्हेचे स्वर, यथापद्धति शोधून ठेविले आहेत. कांहीं पक्षी असे आहेत कीं, त्यांस शिकवावयास लागलें तर, इतर पक्ष्यांहूनही ते अधिक शिकण्यालायख असतात असें आढळून येतें. अशा नमुन्याच्या पक्ष्यांनाच पोपटपंचीचा गुण लागू पडतो.

ब्लुमेनूव्याच् नांवाचा एक उत्तम शीळ घालणारा पक्षी आहे. तसाच बुलफिंच ह्मणून दुसरा एक आहे. त्यास पढविलें तर, तो शीळ घालावयास, रागरागिणींत गावयास, लकेऱ्यांवर लकेऱ्या झोडण्यास, आणि थोडकेसे शब्द उच्चारण्यास देखील शिकतो. १८९८ त सोदरबाय नामक गृहस्थानें ब्रिटिशम्युझियमचे डाक्तर ग्रे नामक गृहस्थास पत्र लिहिलें होतें. त्यांत एका क्यानरी नांवाच्या पक्ष्याचें वर्णन दिलें होतें. त्या पक्ष्याच्या मातापितरांस अगोदर बरींच पिलें झालीं, परंतु ३ वर्षांपूर्वी त्याच्या आईनें चार आंडीं घातलीं. पैकीं एकच फुटून पिलूं बाहेर पडलें. परंतु प्रथमतः त्या जोड्यानें त्या अंड्यावर, त्यांत कांहीं जीव नाहीं ह्मणून, आणखी एक घरटें बांधावयास सुरवात केली, आणि त्याची वाट लावून टाकली. तदनंतर तें बिचारें घर न फुटलेलें व अनाथ दुबळें पांखरूं, तेथें केवळ मरणोन्मुख स्थितींत पडलेलें आढळून आलें. त्यास तेथून उचलून, एका फ्लानेलच्या तुकड्यांत गुंडाळून विस्तवापाशीं धगीला शेकत ठेविलें. बरेच उपचार केल्यानंतर व काळजी घेतल्यानंतर, त्यास ऊब आली—जीव आला—तें सावध झालें, आणि त्यास स्वहस्तें लहानाचें थोर केलें. अशा रीतीनें उपचार चालवून व त्याची दूक सांभाळून, इतर पक्ष्यांच्या सहवासाव्यतिरिक्त त्यास ठेवलें होतें. तें पांखरूं, त्याला जे चारा घालीत असत, त्यांच्याच संवयीचें

झालें होतें. तेव्हां अर्थातच त्याचा प्रथम गायनस्वर क्यानरी पक्ष्याचे नेहमींचे स्वर जसे असावयाचे, त्यांहून अगदीं ९९ हिशांनीं भिन्न तऱ्हेचा असे. तो सारा तीन महिन्यांचा असतांनाच त्यास वरचेवर बोलवीत असत. तेव्हां त्याची धनीण त्याच्याशीं बोलतांना, ती जे 'किसी किसी' इत्यादि आवडते शब्दांनीं त्यास बोलवी, तेच शब्द तो तत्सूचक स्वरानें तोंडपाठ ह्मणे, त्या योगेंकरून तीस मोठें आश्चर्य–कौतुक–वाटे; हें तर नेहमींचें असेच. शिवाय तो वेळोवेळीं दुसरे शब्दही काढी; आणि तसेंच पक्ष्यांचे पंख गळून पडण्याचा जो ऋतु येतो, तो पालटला ह्मणजे त्याची मोठी बहार चालत असे. तो घटकेघटकेला, आपल्या चैनीनें व मनोदेवता वाहे तशी, लकेऱ्यांवर लकेऱ्या मारून, ऐकणारांस तल्लीन करून सोडी आणि स्वर काढी तो देखील इतक्या खड्या सुरांत असे कीं, जणूं काय एखाद्या मनुष्याचाच स्वर कांहीं शब्दांना सांधला आहे, असें वाटे. त्या पक्ष्याचा नेहमींचा गायनस्वर बुलबुल पक्ष्याहूनही उत्तम असे. घरांतील माणसें कुत्र्यास बोलावतांना, ज्या प्रकारची शीळ घालतात, तशासारखाच आवाज मध्यें मध्यें मिश्र झालेला, असाही तो केव्हां केव्हां सूर काढी. "God save the Queen" 'परमेश्वर राज्ञीस सुखी राखो' हें वाक्यही तो शीळ घालून स्पष्ट ह्मणे.

कित्येक पक्ष्यांना बोलण्याची, वांकुल्या दाखविण्याची, आणि चमत्कारिक स्वरांची हुबेहूब नक्कल करण्याची शक्ति असते. 'मॉकिंग बर्ड' किंवा 'नकल्या पक्षी', 'लाफिंग बर्ड' अथवा 'हसणारा पक्षी' हे दोन ह्या गोष्टींचे मूर्तिमंत दाखले होत. त्यांतील पहिला नकल्या पक्षी ह्या सर्व गुणांनीं संपन्न असतो. चिनी स्टार्लिंग नांवाचा पक्षी पाळून, पिंजऱ्यांत बंदिस्त ठेवून, शिक्षा दिली तर, तो शब्दांची हुबेहूब नक्कल करण्यांत व शीळ घालण्यांत मोठा पटाईत होतो. 'पायपिंग क्रो'–पांवा वाजविणारा कावळा–नांवाचा एक पक्षी आहे. हा गडी इतका रंगेल असतो कीं, सांगून सोय नाहीं. इतर पक्ष्यांची तेव्हांच्या तेव्हांच नक्कल करून दाखविणें, हें तर ह्याचें हातखंडा काम आणि ह्याच ह्याच्या गुणावरून, ह्यास वरील नांव प्राप्त झालें आहे; आणि गालांतल्या गालांत मितहास्य

---

१ के. को. पु. ८ अं. १२ "नकल्या पक्षी" वर्णन पहा.

करून दाखविणें, कोंबडीसारखें क्कक्, क्कक्, क्कक् करून दाखविणें, कोंबड्यासारखें आरवणें, ह्या नकला तर त्याचे ठायीं पूर्ण रीतीनें वास करतात. 'ट्रंपेट बर्ड'–'तुतार पक्षी' नांवाचा एक पक्षी आहे. त्याचा सूर मोठा घोगरा असतो. मि० वॉलेसनामक साहेबांनीं हा पक्षी ॲमेझान नदीच्या कांठीं पाहिला. तेव्हांपासून ह्या पक्ष्यास हें नांव मिळालें. 'क्राउन्ड क्रेन'–'किरीटधारी करकोंचा'–नांवाचा एक पक्षी आहे. त्याचाही आवाज तसाच असतो. आस्ट्रेलियांत एक 'बुचर बर्ड'–'खाटिक पक्षी' नामक पक्षी असतो. ह्याची चोंच भली भक्कम व लांबलचक असते. हा इतर कांहीं पक्ष्यांच्या स्वरांची नक्कल करतो, आणि अशा प्रकारें मधाचें बोट दाखवून, आषुकमाषुकांस फशीं पाडतो. 'लाफिंग गूज' 'हसता हंस' नामक पक्ष्याचा स्वर कांहींसा मनुष्याच्या हसत्या स्वरासारखा येतो. ह्मणून त्यास 'हसता हंस' पक्षी हें नांव प्राप्त झालें आहे. 'स्क्रीई आउल्' ह्मणून एक घुबडाच्या जातीचा पक्षी आहे, तो मनुष्याचें धाबें दणाणून जाईल, इतका भयंकर सूर काढतो. एखादा मनुष्य मोठ्या घनघोर संकटांत सांपडून अपळापविपळाप करीत असावा, अशासारखाच कांहींसा त्याचा तो सूर भेसूर वाटतो. व्हर्जीनिया देशांत 'ईगल आउल' ह्मणून तसाच घुबडाच्याच वर्गांतला मोठा पक्षी असतो. त्याचा स्वाभाविक स्वर, कांहींसा बेदम झालेल्या मनुष्याच्या अर्ध्यामुर्ध्या खोल खोल जात चाललेल्या किंकाळ्यांसारखा असतो.

पोपटांचीं बोलकेपणाचीं उदाहरणें पुष्कळ आढळून येतात. तसेंच त्यांचें कित्येक ठिकाणीं शहाणपणही दिसून येतें. कित्येक पोपटांनीं पहांट होऊन तांबड फुटलें कीं, पिंजऱ्यांतून "उठा, उठा, दिवस आला, रामा, विठू, भाऊ, दादा, उठा, उठा," अशा तऱ्हेची नामावळी उच्चारून हांका मारून माणसांस जागें केल्याचीं व तसेंच कित्येकांनीं तोफेस बत्ती लावल्याचीं उदाहरणें आहेत. "विठ्ठल, विठ्ठल" हें नेहमींचें पोटभरणीचें साधन आहेच. पण कित्येकांनीं शीळ घालून सप्तसूर ह्मटलेले, रागरागिणींत लकेऱ्या मारलेल्याही ऐकण्यांत येतात. पाश्चात्य देशांत एका राघूचें एक उदाहरण आहे. त्याची परस्वरानुकरणबुद्धि अश्रुतपूर्व गणण्यासारखी होती. इतर देशांतून तिकडे भाराभर पोपट जात असतात. डेनिस् ऑक्ले नांवाचा एक गृहस्थ होता. त्यास काउंट ऑक्ले

ह्मणत. त्यानें तो पोपट इ० स० १७७२ त विकत घेतला. वेस्ट इंडियाहून ब्रिस्टल्ला एक जहाज आलें होतें, त्यावर तो होता. कोणी ह्मणतात ९० गिनींला, कोणी ह्मणतात १०० गिनींला घेतला. हा पोपट नुसतीं भाराभर वाक्यें उच्चारून व प्रश्नांचीं उत्तरें देऊनच रहात नसे, तर त्यास शीळही घालतां येई. ती अगदीं कशी पण स्वच्छ आणि ठसठसीत. १०४ थें स्तोत्र "The banks of Dee" "God save the King," वगैरे वाक्यें, आणि इतर आवडीचीं गाणीं ह्मणे, आणि चुकून एखादे वेळीं, त्याची धाटणी थोडीशी बिघडली, तर पुनः 'येरे माझ्या मागल्या' ह्या ह्मणीप्रमाणें 'मूळपदावर' ह्मणजे जेथें चूक झाली असेल, तेथें येई. आणि नंतर मोठ्या सफाईनें–टापटिपीनें–ताणा तोडून सर्व दिशा मधुर स्वरानें दुमदुमून सोडीं. ह्या पक्ष्याला पायाशुद्ध शिक्षण होतें, आणि धारणाशक्तिही तरतरीत पक्ष्याच्या योग्यतेची होती. १७८७ त ऑक्ले मरण पावला. आणि त्याच्या सहवासांतला तो अपूर्व रावा त्याच्या विधवा पत्नीच्या दिमतीखालीं राहिला, व धन्यापाठीमागें त्यानें पंधरा वर्षें काढिलीं, व तीस वर्षें त्याच्या कुटुंबांत राहून, १८०२ मध्यें चांगला ह्मातारा होऊन, कर्नलची पूर्वींची रहाण्याची जागा, हाक्मन् स्ट्रीट, पिक्याडिली, येथें मरण पावला. त्या कर्नलनें, तो पक्षी ज्यांना सार्वजनिक प्रदर्शनांत मांडण्याची इच्छा होती, त्यांना वारंवार ९०० गिनी दिल्या. परंतु हा आपला लाडका–गळ्यांतला ताईत मात्र कधींही देण्याचें कबूल केलें नाहीं. त्याचें चिमुकलें शरीर फाडलें, तेव्हां कंठाचे स्नायु पाहतात तों गाण्याच्या संवईनें फारच भक्कम झाले होते. परंतु पक्ष्याच्या मरणाचें स्पष्ट कारण कांहीं बाहेर पडलें नाहीं.

असेंच बोलक्या पोपटाचें दुसरें एक उदाहरण हल्लीं उपलब्ध आहे. आणि तेंही आमच्या दयाळू चक्रवर्तिनी महाराणीसाहेब, ह्यांच्यापाशीं एक पोपट आहे, त्याचें होय. तें न्यायसिंधूंत (ता० २४ ज्यानेवारी १८९८) वर्ष ३२, अंक २१ मध्यें दिलें आहे. तें जसेंच्या तसेंच येथें देतों. (महाराणी व्हिक्टोरिया व एक पोपट) हें त्याचें सदर.

"लंडनमधील एका पांखरें विकणाऱ्या मोठ्या व्यापाऱ्यानें आपणाकडून एक उत्तम राघू महाराणीसाहेबांनीं नजर घ्यावा, अशाबद्दल पुष्कळ खटपट केली. महाराणीसाहेबांस पांखरें फार आवडत असल्यामुळें

त्यांनीं तो त्याचा नजराणा स्वीकारून त्यास आनंद दिला. हा राघू फारच चांगला बोलका असे, अशी त्याची ख्याति होती. त्यामुळें महाराणीसाहेबांनीं त्यास आपले जवळ घेऊन त्यानें बोलावें ह्मणून बरीच खटपट केली; पण तो राघू कांहीं केल्या बोलेना. त्याला खाण्याची, पिण्याची, गोड गोड बोलण्याची, सगळ्या कांहीं लालुची दाखविल्या, परंतु व्यर्थ; तो आपलें तोंड मुळीं सुद्धां उघडीना. शेवटीं महाराणीसाहेब अगदीं कंटाळल्या, व आतां कांहीं बोलत नाहीं असें वाटून निराश होऊन त्यांनीं पिंजरा दूर सारून तो उचलून नेण्याची आज्ञा केली. परंतु त्यांची पाठ फिरतांच तो राघू एकदम ह्मणतो, "तुह्मीं माझ्या धन्याला आतांच्या आतां वीस पौंड पाठविले नाहींत, तर मी आपला परत जाईन पहा." हें तो इतक्या स्पष्टपणें बोलला कीं, महाराणीसाहेबांस त्या मागणीबद्दल राग येण्याचें लांबच राहून उलट चटकन् त्यांनीं आपल्या खाजगी कारभाऱ्यास "आतांच्या आतां ह्या पोपटाच्या मालकाकडे वीस पौंड पाठवून द्या," ह्मणून हुकूम केला. तेव्हांपासून तो पोपट चांगला पुष्कळसें बोलूं लागला."

---

# पुस्तकपरीक्षा.

**प्रणयकोप**—'फर्डे एडिटर' 'बगले वकील' 'फाटकी गोधडी' 'मारवाडी' वगैरे कवितांचे कर्ते यांनीं रचलेलें हें 'नवीन काव्य (:)' आह्मांकडे प्रकाशकांकडून येऊन बरेच दिवस झाले. तें कसें काय वठलें गेलें आहे, हें आज पहावयाचें आहे. प्रस्तुत कवीची पुढील कृति कशीही असो, पण निदान घमेंडी मारण्यांत तरी त्यांनीं जगन्नाथरायाच्या वर ताण करून सोडली आहे. कित्येक पुस्तककर्त्यांना ही मोठी वाईट संवय असते. त्यांत त्यांना कोणता पुरुषार्थ वाटत असेल परमेश्वर जाणे! प्रस्तुत काव्याची प्रस्तावना फार वाचण्यासारखी आहे. तिच्यांतील उद्दामपणाचा मासला फार अपूर्व असल्यामुळें ती वाचकांसाठीं आह्मी मुद्दाम खालीं देतों. कोणी केवढाही ग्रंथकर्ता असो तो आपल्या वाचकांस निदान 'अहो' 'जाहो' येवढें बोलून तरी सभ्यपणा कायम राखील; पण आमचे हे 'प्रणयकोपा'नें व्यास झालेले कवि श्रीगणेशापासूनच कशी 'अरे' 'तुरे' शीं गांठ घालतात, पहा:—

"वाचक अवश्य वाच !"

अरसिकेषु कवित्वनिवेदनं ॥
शिरसि मा लिख मा लिख मा लिख ॥

"प्रणयकोप हें नवीन प्रकारचें काव्य पाहून सबंध वाचण्यापूर्वी ठाम मत ठोकून देण्याचे भरीस पडूं नको. (**नाहीं महाराज! सबंध काव्य एक वेळच नव्हे, तर अनेक वेळ वाचून ठाम मत देण्याकरितां कलम उचललें आहे बरें, काळजी नसावी.**) आंत वर्णिलेल्या शुद्ध शृंगारास दोषी ठरवून ढोंगी सभ्यपणाचा आव घालूं नको. (**काव्याचीं पानें पुन्हां पुन्हां परतल्यामुळें सारा शृंगार ढवळला गेला, आणि शुद्ध शृंगार मुळीं हातालाच लागला नाहीं. ही कमनशिबाची गोष्ट!**) भिन्न व्यक्तींचे विचारही भिन्न असावयाचेच, हें लक्षांत ठेवून एखादी गोष्ट विरुद्ध वाटल्यास ती तुझ्या निंदेस पात्र आहे, असें मात्र मानूं नको. (**छे! मुळींच मानीत नाहीं. मलबारामध्यें मदनपात्रस्थित मधुचोष्यक्रियेची सुद्धां आह्मी मनापासून तारीफच करतों! मग आपल्यासारख्या पवित्र शृंगाराची निंदा? नांव नको.**) मानवी कृति निर्दोष वठलीच पाहिजे, अशी खोटी कल्पना करून यांतील ऱ्हस्वदीर्घादिक नजरचुका काढीत बसून वेळ फुकट घालूं नको. (**नाहीं, नाहीं, माफ! माफ! अगदीं माफ! ऱ्हस्वदीर्घापर्यंत जाण्याइतका पल्ला गांठणार कसा? मुळींच नाहीं. मानवी कृति निर्दोष वठलीच पाहिजे अशी कल्पना करूनच आह्मीं प्रस्तुतकाव्य वाचलें हें खरें; पण चमत्कार हा! ती खोटी कल्पनाच अक्षरशः खरी ठरली!**) तूं टीकाकार असल्यास खऱ्या दोषांचें त्याप्रमाणें गुणलवाचेंही दिग्दर्शन कर, नाहींतर स्वतःचे आकुंचित मनाचें व कोत्या विचारांचें प्रदर्शन करण्याचें धाडस करूं नको." (**अलबत करीन. कधीं चुकणार नाहीं, पण गुणलव असेल तर अं!**)

प्रस्तुत कवि अगदीं अरेतुरेवर येऊन वारंवार चापून एवढा अरेरावीपणा कोणाला दाखवितात? आजपर्यंत बऱ्याच काव्यांचें आह्मीं परीक्षण केलें खरें, पण आधींच एवढा तग्रउग्र झालेला कवि कोणीच आढळला नाहीं. तेव्हां प्रस्तुतचें काव्य जरी नवें नसलें, तरी बाजीरावीपणा मात्र नवा आहे खरा. असो, पण अशा गुरकावणीला यत्किंचित्‌ही न डगमगतां आमचें कर्तव्य आह्मी करतोंच.

'प्रणयकोप' हें सारें काव्य पृथ्वीवृत्तांत गुंफलें असून त्यांत पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. एकाची तरुण स्त्री, आपली स्तुति ऐकण्यासाठीं रुसून बसली. तेव्हां तिच्या पतीनें तिची स्तुति केली. ती ऐकून तिनें आपला राग सोडला, व मोठ्या प्रेमानें 'आश्लेषून' तुह्मांला 'मीं अशा रीतीनें उगाच ठकविलें,' असें ह्मणाली. हा पूर्वार्ध. उत्तरार्धांत पतिराजांनीं तिचें उसनें फेडण्याकरितां आपणही रागाचा आव आणिला. तेव्हां तिनें त्यांची स्तुति केली. तेव्हां तेही उठले आणि त्यांनीं तीस 'आश्लेषून' फराळ केला. हें ह्या प्रणयकोपाचें मूळ आहे, आणि 'टीकाकार असेल' त्यानें ह्यांतील ऱ्हस्वदीर्घादि चुका पाहूं नयेत, अशी कवीची अट आहे. तेव्हां हें सर्व सांभाळून 'शुद्धशृंगारांत' बुडी मारावयाची, आणि मग अनंगमहाराज कशी काय कृपा करतात तें पहावयाचें. पहा, मंगलाचेच पहिले दोन श्लोकः—

अतर्क्य महिमा तुझा सकल देव वा दानव।
जयें सहज जिंकिले मग टिके कसा मानव ॥
सुधीर रणवीर हीर जन दीन केले जयें।
अनङ्ग कविचीं हरो सकल संकटें वा भयें ॥ १
सदैव किति कल्पना सुचति ग्रंथकारांसही।
यदीय पदिं लीन हीन बहु दीन झाली मही ॥
**स्वभावभिरु** कामिनी **रमणधीर** केल्या जयें।
अनङ्ग कविचीं हरो सकल संकटें वा भयें ॥ २

नवरा मुलगा पहावयास गेले तर त्यांस बसावयाला सतरंजी आणावयाची ती शेजाऱ्याची उसनी आणली ह्मणजे घरांतील संपत्तीचा आकार समजतो. त्याचप्रमाणें ह्या दोन श्लोकांवरून कविहृदयभांडारांतील प्रसादसंपत्तीचें बहुतेक अनुमान होतें. 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' ह्या न्यायानें 'अतर्क्य महिमा तुझा' ह्या प्रथम चरणालाच मुळीं प्रस्तुत कवीला मयूरकवीकडे 'भिक्षां देहि' करावें लागलें! आणि 'संकटें वा भयें' हरण्यासाठीं तेहतीस कोटी देवांपैकीं एकही देव न सांपडतां 'वसिष्ठही ब्रह्मनिष्ठ कसला, परी स्नुषेचा लोभ धराया मनीं नच तो विटला,' असा ज्याचा प्रभाव, त्या अनंगमूर्तीकडे धांव घ्यावी लागली! कां? तर शुद्धशृंगाररसाच्या स्नानपानानें सारें जग पुनीत व्हावें ह्मणून. पृथ्वीचा अंत लागणें कठीण आहे, पण पृथ्वीछंदाचा अंत लागणें कांहीं कठीण नाहीं. परंतु प्रस्तुत कुरेंबाज कवींनीं तेवढ्याची सुद्धां यथातथ्य माहिती करून

घेतली नाहीं. यति ह्मणजे काय? ह्मणून जर प्रस्तुत कवीस प्रश्न केला, तर त्याची मजल संन्याशाच्या पुढें कधीं जाईल असें वाटत नाहीं. अशी जेथें वस्तुस्थिति आहे, तेथें पदोपदीं यतिभंग झाला, तर आश्चर्य तें कोणतें? धीर, वीर, हीर, लीन, हीन, दीन, अशा सुंदर चिरेबंदी यमकांच्या जोडीच्या तोडींत यतीस समाधि मिळणें, हें तरी त्याच्या पुण्याचेंच लक्षण ह्मटलें पाहिजे!

आतां अर्थासंबंधानें विचार. पूर्वोक्त दोन पद्यांत कवि हे आपल्या आवडत्या दैवताचा पराक्रम सांगतात 'जेणें देवदानव सहज जिंकिले' 'जयें सुधीर रण वीर हीर दीन केले' 'जयें स्वभावभिरु कामिनी रमणधीर केल्या.' जयेचें ह्या शब्दाचें जणों काय बीळच उघडलें आहे! 'स्वभावभिरु' फार ध्यानांत ठेवण्यासारखा शब्द! पण हाच ध्यानांत ठेवावयाला कशाला पाहिजे? बाकी रेलचेल काय कमी आहे? 'रमणधीर' ह्मणजे काय? आणखी 'ग्रंथकारांसही सदैव किति कल्पना सूचति' ह्याचा संबंध कोणीकडे लावावयाचा? ग्रंथकारांवर अनुस्वार आहे त्या अर्थी त्यांत सर्व ग्रंथकारांचा समावेश करणें भाग आहे. आणि प्रस्तुत कवीच्या हृदयमीमांसेप्रमाणें कामदेवाच्या कल्पनाच जर प्रत्येक ग्रंथकाराच्या मनांत घोळत असतील, तर मग काय सारी दुनिया गोकुळवृंदावनच बनून जिकडे तिकडे कृष्णमयच होऊन राहील! मग काय सवाईद्वापारयुग पुन्हा अवतीर्ण झालें ह्मणावयाचें! पण पुढें शुद्ध व निवळ शंखशृंगारांत थोडासा तरी विहार करावयाचा असल्यामुळें, घाटाच्या पहिल्याच पायरीवर खेळत बसणें नको.

प्रस्तुत कवीचें साम्राज्य मात्र अगदीं निष्कंटक—अकुतोभय—आहे. रामराज्याहूनही त्याची सत्ता अधिक. छंद आडवा यावयाचा नाहीं; यति कांहीं बोलावयाचा नाहीं; व्याकरण वर डोकें करावयाचें नाहीं; विभक्ति डाव्या डोळ्यानें पहावयाची नाहीं; अर्थ तर काय ताटाखालचें मांजर होऊन रहावयाचा. असा ह्यांचा दरारा सर्वत्र सारखा असल्यामुळें ते करतील ती पूर्वदिशा अशी सर्वत्र स्थिति आढळते. त्यांनीं आपल्या सत्तेच्या जोरावर केवळ झोटिंगबादशाही माजविली आहे. अर्थाच्या गळ्याला तर तांत लावून कुत्र्यासारखा ओढित आणला आहे. क्रियापद बनविण्याची हातोटी तर कांहीं अपूर्व आहे. कोणताही एखादा शब्द—मग तो प्राकृत असो, संस्कृत असो, प्रसिद्ध असो, अप्रसिद्ध असो;—त्यास ला—ली—लें, प्रत्यय लाविले कीं झालें क्रियापद. अशीं गमतीचीं क्रियापदें खालीं दिलेल्या चरणांत मोठ्या अक्षरांनीं दाखविलीं आहेत:—

करीन तरि काय मी ह्मणुनि पाहण्या लोभली ।
वदा न गमते कुणा करियली अहो ती स्तुती ।
करीं क्वणति कंकणें, रुणति मेखळा त्या कटीं ।
पदीं झुणति नूपुरें, दिससि तूं बरी गोमटी ।
रवीकर मही, लता सरळ वृक्ष आश्लेषति ।
तसें तुजसि मी सखे हृदिं मदीय आंदोलिलें ।
दिसे नयनिं घूर्णितां सकल देह रोमाञ्चला ।
नसे सुचत तेधवां विरहिला मला उद्यम ।
जलप्रलयकालिचें अनल वा सुखें चाहवें ।
ठसाउनिच कंकणें जरि करांतलीं माझिया ।
धरोनि करपंकजा हंसत तीस आश्लेषिलें ।

ही निरनिराळ्या दोषांची खिचडी आहे हेंही वाचकांस सांगितलें पाहिजे असें नाहीं. ती, त्या, तो, च, ही हे निरर्थक शब्द वेंचीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. फक्त क्रियापदांचे नमुने पाहून कल्पना बांधण्याचें काम येथें केलें ह्मणजे पुरे. सदरहू काव्यांतील दोषरूप पीक इतकें कांहीं सवंगसुकाळ होऊन गेलें आहे कीं, त्याच्या राशी कशा पाडाव्यात, व मापाचा अंदाज कसा करावा, ह्याची मोठी पंचाईत पडली आहे. क्रियापदांचा मासला वर दाखविला. आतां कांहीं शब्दांचा मासला:—

प्रहृष्ट मन होतसे निरखितां विधाताकृति ।

'विधाताकृती' ह्मणजे काय?

तुझी कमलकान्ति हो, कमलपुष्पसे श्वासही ।
सखे कुमुदसुंदरी मुखिं तुझ्या तसे वासही ॥

सखे! तुझे श्वास सुद्धां कमळासारखे बरें? अहाहा! काय पण उपमा-चातुर्य! आणखी तुझ्या मुखामध्यें वासही तसेच! इतके कवि आजपर्यंत झाले खरे, पण असें नवीन काव्य एकास तरी साधावयाचें होतें? आणखी उपमेचा मासला:—

पयोधवल भाल हें सुचिर इंदुखंडापरी ।

भाल कसें? पयोधवल बरें. प्रियसखीला कोड भरलें होतें कीं काय? आणखी प्रिये! तुझ्या आंगची अपूर्व कला:—

तुवां मजसि दृष्टितें चुकवुनी सदा पाहिलें ।

मला तूं दृष्टि चुकवून पाहिलेंस? आणखी काय पाहिजे?

तया कुपित होउनी करिसि रक्त आतां किती ।

आतां कोपायमान होऊन त्यांना रक्त (!) किती करतीस? बोलणारा मोठा चतुर खरा!

सरस्वतिचि वा बृहस्पतिचि बुद्धि वाटे कमी ।

प्रस्तुत चरणाची रचना पाहिली म्हणजे खरोखर तसें वाटतें खरें! कारण, 'चि' ची चिरेबंदी तशीच प्रेक्षणीय आहे ह्यांत संशय नाहीं. आतां पतिराजांच्या गृहिणीच्या विनयाचा, उद्योगशीलतेचा व पतिसेवातत्पर असण्याचा मासला:—

पदार्थ अति मिष्टसे करुनि नित्य नानाविध ।
सखे मजसि **वाढवीस** बसुनी सदा सन्निध ॥
चुण्या करुनि वस्त्र तूं विमल **धौतसें** ठेविलें ।
तुवां हळुच तांबुला करिं दिलें तया सेविलें ॥ १६ ॥

यांत आधीं 'वाढवीस' इत्यादि शब्दांत यतिभंगादि दोष आहेत. पण छे! ह्मणा 'विष्णवे नमः.' तसल्या दोषांचें नांव सुद्धां काढावयाचें नाहीं. समजलांतना? तर चला पुढें. प्रियसखी पदार्थ कसे करीत होती? तर अगदीं अति मिष्ट. ह्मणजे तोंडांत घातला न घातला तों मिठी बसलीच. आणखी खुबी काय? पदार्थ स्वतः करावयाचे, पण नवऱ्याला आपण स्वतः चुकून देखीळ एक दिवस वाढावयाला जावयाचें नाहीं. तर सर्वकाल सन्निध बसून वाढवावयाचे! 'विमल' आणि 'धौत' तें काय? विमल आणि धौत वस्त्राच्या चुण्या करून ठेवावयाच्या. तांबूल द्यावयाचा तो मात्र हळुच! इतर स्त्रियांसारखा वाजत गाजत कधींच दिला नाहीं. आणि त्याला मग मीं सेवन करावयाचें! केवढें हें अर्थगांभीर्य! आणि केवढी ही कविकल्पना! अतर्क्य खरी! आतां आमचे वाचक समजतील कीं, पतिराज ज्या अर्थी वेत्रासनावर बसत होते, हातांत पुस्तकें घेत होते, त्या अर्थी ते श्रीमान् असतील, व ह्याही नाजूक, पाटावरून ताटावर, व ताटावरून पाटावर बसणाऱ्या बाईसाहेब असतील. तेव्हां त्यांच्यानें पतीला वाढण्याइतकें काबाडकष्टांचें काम कसें निभणार? पण त्या कांहीं इतक्या नाजूकही नव्हत्या व आळशीही नव्हत्या. पतिराज त्यांचा आणखी नित्य व्यवसाय सांगतातः—

गुरांस जल वैरणें निशिदिनीं स्वतां घालिसी ।
तयांवरुनि मक्षिका निजकरें कशी वारिसी ॥
करांत नव पल्लवी धरुनि वासरां चारिसी ।
घरांत दुभतें तुझ्या विपुल नित्यशा राखिसी ॥ ६३ ॥

सखी कांहीं आळशी नव्हती. ती रात्रंदिवस गुरांना 'जल वैरणें' (!) स्वतः घालून माशा हांकवीत होती, आणि वासरांना 'नव पल्लवी' चारित होती बरें. 'जल वैरणें' 'नव पल्लवी'! काय नवीन काव्यांतील नवीन शब्द शोधून काढण्याची ढब! रात्रंदिवस स्वतः गुरांना वैरण घालून माशा हांकवीत बसून नवऱ्याला एकही पदार्थ स्वतः वाढणार नाहीं म्हणून शपथ घेणारी बायको आह्मी तरी निदान कृतघ्न—नव्हे पक्की कृतघ्न समजतों. मग नवरोपंतांना सद्गुणी म्हणून लाळ घोटणें असेल तर खुशाल घोटूंद्यात. आमची मनाई नाहीं. आतां शुद्ध शृंगाराच्या मुख्य प्रवाहाकडे वळूं या. पतिराज रतिपर्यवसानाच्या वेळींची आपल्या प्रियेची स्थिति किती सभ्य रीतीनें सांगतात ती पहा:—

रतान्तसमयीं सखे गलितगात्र होसी सदा ।
कशी मिटुनि नेत्र गे पडसि पुष्पशेजीं तदा ॥
फुलें प्रसरलीं तसे विखुरले मुखीं केशही ।
नुरे मुळिच रंग तो अधरिं गालिं वा लेशही ॥ ३४ ॥
तुझी फिटली कंचुकी गळुनी मेखला चालली ।
तुटे सकल हार मूक पदिं नूपुरें जाहलीं ॥
तदा कबरिही सुटे पडत भार अंसांवरी ।
अगे शयनशोभिनी करिं न कोप माझ्यावरी ॥ ३५ ॥
अहा वसन वेष्टण्या तुज उरे न तें त्राणही ।
निचेष्ट पडसी तुला नुरति वाटतें प्राणही ॥
तदा व्रण शरीरिंचे उठुनि दर्पणीं पाहसी ।
अगे प्रणयिनी अशी मजवरी कशी क्षोभसी ॥ ३६ ॥

स्वतः पतिराजांचें सामर्थ्य किती असेल तें कोण जाणे? पण निदान शब्दपांडित्यांत तरी त्यांनीं आपल्या 'शयनशोभिनी'ची अगदीं घाबरगुंडी उडवून दिली खरी. काय बिचारीची दशा! गलितगात्र झाली; नेत्र मिटुनी पुष्पशेजेवर तर पडली; फुलें प्रसरलीं;—पसरलीं नव्हे अं!—कारण तसा प्राकृत शब्द घातला तर छंदाचा भंग होणार नाहीं! कंचुकी फिटली; (कवीची जन्मभाषा

तरी कोणती ? कानडी, मलबारी, तर नव्हे ना ? कारण, मराठी असती तर अशा हास्यकारक चुका झाल्या नसत्या. कंचुकी फिटत असते काय ? पण विसरलों. कारण, हा नवीन शोध आहे. ) मेखला घालणारी ही बायको जातीची तरी कोण ? प्रस्तुत मन्वंतरांत तर ती चाल कोठें ऐकिवांत नाहीं. आणखी सारा हार तुटला; पदांतील नूपुरें मूक झालीं; कबरीही सुटे; अंसांवरी भार पडला; खांद्यावर ह्मटलें तर चालावयाचें नाहीं. आणि विद्वत्ताही दृष्टी पडावयाची नाहीं. लुगडें गुंडाळावयासही ताकद उरली नाहीं; केवळ बेशुद्ध होऊन पडलीस. प्राण सुद्धां गेला असें वाटलें. तरी पण बायको मोठी सावध अं ! तशांतूनही पट्‌कन् उठली. उठली नव्हे, उभी राहून आरशांत आधीं पाहूं लागली. काय ? शरीरावरचे वण ! इशिशीशी ! कोण घाणही ? अशुद्धें, ऱ्हस्व, दीर्घ, यतिभंग, छंदोभंग, हें माफीचें कलम. अंहः ! अगदीं नांव काढावयाचें नाहीं. अहाहा ! शृंगार अगदीं शुद्धच खरा ! पण पवित्र लोंढा तो अद्याप पुढेंच आहे. खालचा एकच चरणः—

विचित्रितहि आसनें चतुरशीति भित्तीवरी ।

बाईसाहेब ह्मणतात ' विचित्रित–चित्रित नव्हेत, विशेष चित्रित अशीं काय ? तर **आसनें**, तीं कसलीं, तर 'चतुरशीति,' भित्तीवरी–भिंतीवर नव्हेत–कारण, तसें केलें तर संस्कृतत्व लयास जाईल. **आसनें** ह्याचा अर्थ करणें ह्मणजे खातेऱ्यांत तोंड खुपसणें आहे. तें काम कवींनीं केलें तेवढें बस्स्. आमच्यानें रेटत नाहीं. अशी लीला करणारे पति, आणि त्यांचे गुणानुवाद वर्णन करणारी ही पत्नी; ह्मणजे उभयतां जोडप्यावरही त्यांच्या किंवा कवीच्या कुलदैवताचा वरदहस्त खराच ! आणि हा काय ह्मणे तर ' शुद्ध शृंगार ! ' शुद्ध नव्हे, विशुद्ध ह्मटलें ह्मणून तरी काय बिघडतें ? आतां पुनरुक्त दोष ऊर्फ चर्वित चर्वण पहाणें असल्यास खालील चरण पहावेतः—

वडील जन आलिया बसुनियां न तूं राहसी ।
सखे गुरुजनांपुढें कधिं न तूं उभी राहसी ॥

हे दोन श्लोकांतील दोन चरण असून ह्यांतील अर्थच एक आहे असें नव्हे, तर यमक, प्रास, शब्द सुद्धां एक ! दोन जिवांचें ऐक्य व्हावें, ह्याचेंच नांव कामदेवाची कृपा ! आतां थोडासा अनुप्रासाचा आणि शब्दलालित्याचा मासलाः—

समक्ष तव लक्ष दक्ष अससि सर्व काळीं गृहीं ।

यजमान ह्मणतात " प्रिये ! तूं सदासर्वकाल घरामध्यें समक्ष असून दक्ष असतीस बरें. " प्रिया खरोखरच मोठी गुणवती खरी. नाहीं तर इतर स्त्रियांसारखा तिनें आपला सारा दिवस मुखत्यार वकीलच यजमानाच्या तैनातीला दिला असता, तर घेतां काय ? पण ' तव लक्ष ' हें कोणीकडे लावावयाचें ? तें तूर्त अमानत खात्यास ठेवून पुढील मुक्काम गांठावा तेंच बरें. ह्या चरणांत एक अक्षर अधिक आहे. ती गोष्ट निराळी !

इतका वेळपर्यंत यजमानांनीं आपल्या प्रियपात्राचें गुणवर्णन केलें. आतां बाईसाहेब यजमानांच्या लीलेचें वर्णन करतात. त्यांतील थोडासा भागः—

करीं धरुनि घागरी उदक सिंचितां आंगणीं ।
कुणी जवळ नाहिंसें बघुनियां तुह्मीं तत्क्षणीं ॥
हळु जवळ येउनी **पद–रवास** सांभाळिलें ।
करें **मिटलिं पृष्ठतः** सहज **माझिं** नेत्रोत्पलें ॥ १८ ॥

अशा कविलाला हासूं नये तर काय करावें ? ' पद–रवास ' सांभाळावयाचें तें कसें काय ? ' मिटलिं ' ' माझिं ' इत्यादि विभक्तिरूपें तर कवीच्या आंगवळणींच पडलेलीं ! त्यांत विशेष असें कांहींच नाहीं. पण सर्वांमध्यें 'पृष्ठतः'ची खुबी मात्र अवर्णनीय खरी. प्रस्तुत कवीला ' वाकळे कवि ' ह्मणून जर कोणी नांव देईल तर तें यथायोग्य होईल. वाकळेंत सुद्धां एक शिस्त असते. तांबड्या चिंध्यांचा एक चौकोन करतात; काळ्यांचा दुसरा करतात. अशी त्यांतल्या त्यांत शोभा आणण्याची खटपट केलेली दिसून येते. प्रस्तुत कवीची शालजोडी त्यांतच; घोंगडी त्यांतच; सतरंजी त्यांत; पटकुर त्यांत; बुरणुस त्यांत; तट्ट्या त्यांत; हंतरी त्यांत; तरट त्यांत; चामडें त्यांत; सर्व कांहीं त्यांत. तेव्हां ही वाकळ मासलेवाईक व अपूर्वच समजली पाहिजे. परंतु आपण आतां असे कडेकडेला न डुबतां मुख्य प्रवाहांत दोन बुचकळ्या मारूं या. बाईसाहेब पूर्वलीला कथन करतात:—

मला न समजूत ती तशि न मी ऋतुस्नात वा ।
तुह्मी न चुकलां विनोद करण्या तरी तेधवां ॥
कधीं पदर ओढिला कधिं मला खडा मारिला ।
कधीं उडविलें जला दडुनियां कधीं राहिलां ॥ २२ ॥

मी ऋतुस्नात नव्हतें, तेव्हां सुद्धां तुह्मी विनोद करण्यांत चुकलां नाहींत हो ! अहा ! काय पण पोक्त भाषण ! आणि काय पण शुद्ध श्रृंगार ! पुढें:—

दिला हळुच आणुनि सतत गोड मेवा तरी ।
तुह्मां न रति वाटली भिति तदा कसी अंतरीं ॥
दिलीं भगिनिच्या मिषें मजसि नित्य वेण्याफुलें ।
असें सुखविलें मला परि न इंगिता जाणलें ॥ २३ ॥

'तुह्मी हळूच नेहेमीं गोड मेवा आणून दिलात, तरी तुह्मांला 'रतिभिति' वाटली नाहीं !' केवढें हें शब्दलालित्य ! 'रतिभिति' तें काय ? 'मला नित्य वेण्याफुलें दिलीं' वेण्या कशा काय द्यावयाच्या ? 'भगिनीच्या मिषें ह्मणजे ? भगिनी समजून कीं काय ! 'पण इंगित जाणलें नाहीं बरें !' इंगिताचा ठेवा मात्र अगदीं गुप्त खरा. असो. पुढें जरा जारीचा प्रवाहः—

यदा कलश घेउनी जल भरोनि मी येतसें ।
दिशा बघुनि निर्जना अडविलें मला हो कसें ॥
करोनि मन धीट घेत मग साखरेचा कसा ।
कुठें कुणि हि खोकतां पळुनियां तुह्मी जातसां ॥ २४ ॥

हा साखरेचा झाला. आतां खव्याचा पटकावण्याची चतुराईः—

अहो जरि नणंद ती जवळ माझिया बैसली ।
तिचीं नयनपंकजें मिटुनियां मला चुंबिली ॥

असल्या 'विशुद्ध' श्रृंगारास काय ह्मणावें ? आतां फक्त एकच बुडी मारून तळांतील थोडासा रेंदा वर काढून मग कविराजांना साष्टांग दंडवत घालूं. कांहीं केल्यानेंही पतिराजांची समजूत पटेना. आतां सामादामानें कांहीं प्रकरण ताळ्यावर येत नाहीं असें वाटलें, तेव्हां बाईसाहेब दंड ठोकून प्रतिज्ञा करतातः—

पुन्हा मजसि वाटतें भुजलता गळां घालुनी ।
सकोप हृदयास या मम कुचाचलीं नेउनी ॥
ठसायुनिच कंकणें जरि करांतलीं माझिया ।
पराभव करीन मी तरीच ही खरी त्वत्प्रिया ॥ ५३ ॥

'दर्पका'चा दर्प घेतांना वाचकांनाही बहुतकरून नाक धरण्याचा प्रसंग आला असेल. ह्याकरितां आह्मीही आपला हात आतां आखडून घेतों. बाई

मोठी विनयसंपन्न खरी. आणि पतिराज तरी काय ? उभयतांही एका माळेंत ओंवण्यासारखींच आहेत ! एकंदरींत मुंबईच्या गटारांत स्नान केलेलें पुरवेल, पण ह्या नूतन कवीच्या ह्या शुद्ध शृंगाराचें दर्शन सुद्धां नको. आणखी, प्रकाशक कळवितात कीं, हल्लीं हे कवि लोकप्रिय होत चालले आहेत. तसें असेल तर आमचा हा देश कामभक्त आणि अरसिक प्राण्यांचें एक वारुळच बनतो आहे असें ह्मटले पाहिजे ! नशीब बिचाऱ्याचें !

सरतेशेवटीं एक मुद्द्याची गोष्ट राहिली. ती ही कीं, ह्यांतील 'गुणलवांचें' दिग्दर्शन करावयाचें. पण त्याची वासलात प्रस्तुत कवीस त्यांच्याच शब्दांनीं सांगून हें प्रकरण आटोपतों. " कवी ! अवश्य ऐक. मी तर टीकाकार असून तुझें सबंध काव्य वाचून हा अभिप्राय दिला आहे. तूं जर कवि असशील, किंवा कवि होऊं इच्छित असशील, तर तो निरभिमानपणें स्वीकार करून त्याचें नीट मनन कर. छंद, व्याकरण, यति, ह्यांची अगदींच पायमल्ली करूं नको. तुझ्या ह्मणण्याप्रमाणें गुणलव धुंडावयासाठीं पुष्कळ खटपट केली; कोपरान् कोपरा धुंडला; पण मला त्याचा कोठें गंधही सांपडेना रे. काय करूं ? छंद पाहिला घाण; यति पाहिला घाण; व्याकरण पाहिलें घाण; अर्थ पाहिला घाण; कोठें क्षणभर पाउल ठेवीन ह्मटलें तरी जागा नाहीं. ह्याकरितां मजवर एवढी कृपा कर, आणि तुझा गुणलव तूंच मला कोठें आहे तो दाखीव. ह्मणजे मी उपकार मानीन. पण तूं काय ? नाकावरं माशी सुद्धां बसूं देत नाहींस. तूं टीका करावयाच्या आधींच साऱ्या वाचकांवर व टीकाकारांवर अरेतुरेला आलास. आतां तर मी टीका करून मोकळा झालों आहें. तेव्हां दुसऱ्या लेखांत तुझी मजल त्याच्याही पुढें जाऊन पोंचेल, ह्यांत शंका नाहीं. आमच्याकडूनही मुभा आहे." कारण, " अंगुष्ठोदकमात्रेण शफरी फर्फरायते " असा एका संस्कृत कवीचाच न्याय आहे.

---

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar at JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

BY SPECIAL APPOINTMENT TO


H. H. MAHARAJA SIR SHAHU CHHATRAPATI, G. C. S. I., KOLHAPUR.

PATRONISED BY

H. H. MAHARAJA SIR KRISHNARAJ WADIAR BAHADUR G. C. S. I., MYSOR.

AND

MOST OF THE PRINCES AND CHIEFS OF INDIA.




# स्वधर्माभिमानी यांकरितां

# हिंदु वॉचेस.

हीं वॉचेस दिखाऊ, मजबूत, वजनांत हलकीं, मध्यम आकार, बरोबर वेळ दाखविणारीं, पांढरी मिन्याचे प्लेटवर सुंदर प्रेक्षणीय हिंदु पूज्य दैवतांचीं चित्रें वगैरे. हें वॉच एकवार घेतल्यास १०,२० वर्षें दुसरें घ्यावयास नको.

**हिंदु युनिव्हर्सल वॉच.**

ग्यारंटी ३ ते ६ वर्षें. रोमन आंकडे असून मध्यभागीं फक्त शंकरपार्वती व गजानन. निकलसिल्व्हर वॉच किं. रु. १६. चांदीचें वॉच किं. रु. ३०. सोन्याचें वॉच किं. रु. २५०.

**हिंदु प्राईज वॉच**—ग्यारंटी २ ते ५ वर्षें. मराठी व रोमन आंकडे असून चित्रें १६ आणि मध्यभागीं **श्रीमहादेवपार्वती**.

**निकल सिल्व्हर वॉच**—किं. रु. १५, चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३०, सोन्याचें किं. रु. १५०.

**हिंदु प्रिव्हलन्स वॉच**—ग्यारंटी १ वर्ष ते ४ वर्षेंपर्यंत–डबल आंकडे, चित्रें १५ असून मध्यभागीं दरबारी थाटानें **श्री. शिवाजी छत्रपतिमहाराज.** नि. सि. वॉच किं. १०, १५. चांदीचें किं. रु. २५-३०.

**हिंदु आर्मी वॉच**—डबल आंकडे असून चित्रें २२. मध्यभागीं **श्री. शिवाजी महाराज** घोड्यावर बसलेले. निकल सिल्व्हर वॉच किं. रु. १० ते १५. चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३०. शिवाय **वेस्टंड रिलायन्स जॉन ब्यारेल, कुरवायझर** वगैरे प्रसिद्ध मेकरचीं लहानमोठीं वॉचेस आमचेकडे विकत मिळतील.

प्याकिंग पोस्टेज निराळें, वॉचबरोबर एक शेडा, पेटी, काच आणि स्प्रिंग मिळेल. व्ही. पी. पार्सलनें पाठवूं.

सर्व प्रकारचे वॉचेसचीं दुरुस्तीकामें माफक आकारानें ग्यारंटीसह करून देऊं.

सचित्र क्याटलाग फुकट. [३–१२

**जी. बी. नाईक आणि कंपनी,**

भायखळा, मुंबई आणि पुणें.

# धि इंडियन म्यारेज ऍण्ड डेथ बेनिफिट फंड लिमिटेड, मुंबई.

**डिरेक्टर्स.**

रावसाहेब दलपतराम प्राणजीवन खक्कर जे. पी.

बद्रुद्दिन अब्दुल्ला कूर एस्कायर जे. पी.

रुसतम बी. पेमास्तर एस्कायर बी. ए. एल्. एल्. बी.

धनजीशा फ्रामजी चिनाय एस्कायर.

विष्णु नारायण परुळकर एस्कायर ( एक्स आफिशिओ. )

मध्यम स्थितींतील मनुष्यांस आपल्या मुलांमुलींच्या लग्नाचे वेळीं व आपल्या मरणानंतर आपल्या वारसाकरितां पैशाचा संग्रह करून ठेवितां यावा ह्मणून हा फंड १८९४ मध्यें स्थापन झाला आहे. इतक्या अवधींत ३००० पेक्षां जास्त मेंबर झाले असून सरासरी १५० मेंबरांस फायदा मिळाला आहे. लग्नफंडाची वर्गणी दर महिन्यास १। पासून ६। रु. पर्यंत आहे.

**मरणफंडाची वर्गणी फक्त १ रुपया आहे.**

व या मरणफंडांतील मेंबरांच्या पश्चात् त्यांच्या वारसास २००० रुपयेपर्यंतची रक्कम फायद्यादाखल मिळेल. जास्त माहिती खालील पत्त्यावर एक आण्याचें तिकिट पाठविल्यानें मिळेल. [६–१२

आफीस–५
कावसजी पटेल स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई.

**परुळकर ऍण्ड कं०**
एजंट्स.

धनुर्धारीकृत पुस्तक.

# प्रौढप्रतापनिधि माधवराव.

किंमत ०५ आणे. ट. ख. ०॥.

जनार्दन महादेव गुर्जर,

रामवाडी–मुंबई.

यांचा कदाचित् गुण नच आल्यास पैसे परत देऊंच.

# मंत्रसिद्ध ताईत व दोरे.

हिमालयावरील एका महान् तपस्वी (सिद्ध) पुरुषानें आमच्या निःसीम भक्तीस तुष्ट होऊन आपला अत्यंत उपयोगी असा जो पिशाचबाधा व दुसरे अनेक विकार दूर होणारा अद्‌भुत मंत्र तो ताईत व दोरे मंत्रून देण्यास शिकविला आहे. व त्या योगानें खालील विकार फार त्वरित बरे होतात. पिशाचादि पीडेनें मुलें, स्त्रिया किंवा पुरुष झोपेंत अगर जागृतावस्थेंत घाबरतात, कंप सुटतो, वेड लागतें, दांतओंठ चावतात, दचकून उठतात, व कधीं ज्वरादि विकार उत्पन्न होतात आणि कित्येक प्रसंगीं अपस्मार, भ्रम वगैरे अत्यंत वाईट रोग उत्पन्न होतात. कित्येक स्त्रियांस पिशाचादि पीडेनें संतती होत नसते व झालीच तर वांचत नसते. कित्येकांस स्वप्नामध्यें स्त्रीचा भास होऊन धातुपात होतो; कित्येक स्त्रीपुरुषांमध्यें व कित्येक मित्रांमध्यें वैमनस्यें उत्पन्न होतात, इत्यादि अनेक विकार या आमच्या अद्‌भुत मंत्रसिद्ध ताईत व दोरे यांनीं फार त्वरित खात्रीनें बरे होतात. गुणाबद्दल हजारों सर्टिफिकिटा मिळाल्या व मिळत आहेत. थोड्याच काळांत याचे अपूर्व गुण या देशाच्या आसमंताद्भागीं ब्रह्मदेश, सिलोन, बनारस, पंजाब, मद्रास, मुंबई, कानडा, इत्यादि ठिकाणीं अतिशय पसरले आहेत; सबब जास्त वर्णन करीत नाहीं. सिद्धमंत्र खोटे ह्मणणारांनीं एकवार अनुभव घेऊन पहावा, ह्मणजे ते नेहमींच ग्राहक बनतील. पुरुषांचे विकारांस दोरा, किं० ८ आणे. स्त्रियांचे विकारांस ताईत १ रु०; रुप्याचा २ रु०; सोन्याचा ६; कित्येक रोगांस दोन वस्तू घ्याव्या लागतील. दोन वस्तू घेणारास ४ आणे, टपालखर्च माफ. एकवार अनुभवानेंच पूर्ण खात्री होईल. माहितीखर्डा सोबत पाठविला जाईल. व्ही. पी.नें पाठवूं. पत्ता स्पष्ट व पूर्ण लिहावा.

विष्णुबोवा सिद्धमांत्रिक,

पत्ता—पोष्ट हर्णै, जिल्हा रत्नागिरी.

३–१२]

## केरळकोकिळचित्रविद्यालय.

# फोटोग्राफचा कारखाना.

आमच्या कारखान्यांत अगदीं नवीन तऱ्हेचीं तलख यंत्रें विलायतेहून आणविलेलीं आहेत.

ह्यांच्या योगानें [illegible] सेकंदांत तसबीर निघते. ह्यामुळें लहान मुलांच्या व जनावरांच्या सुद्धां तसबिरी काढण्यांत येतात.

झिल्हईकाम फारच मनोहर—केवळ कांच लाविली आहे, असा भ्रम होतो.

## विक्रीस तयार असलेल्या तसबिरा.

जगत्प्रसिद्ध भिवा सुताराच्या हातचें रामपंचायतन; वनवासी राम, आनंदभुवन, राजा रविवर्म्याच्या तसबिरा, श्री० बाळासाहेब पंतप्रतिनिधि बी. ए. ह्यांच्या हातच्या शंकरपार्वती, गणपति, महाविष्णु, शिवाय दत्तात्रय, गजेंद्र लक्ष्मी इत्यादि देवतांच्या, साधुपुरुषांच्या, श्रीमन्महाराज छत्रपति शाहूमहाराज कोल्हापूर इत्यादि राजेरजवाड्यांच्या, दुष्काळग्रस्त लोकांच्या, स्त्रियांच्या, लहान लहान गोजिरवाण्या मुलांच्या, मोठमोठ्या इमारतींच्या व देखाव्यांच्या, कारागिरीच्या उत्तम पदार्थांच्या, इंडियन क्यारेक्टर्स—हिंदुस्थानांतील लोकांच्या रीतीभातींच्या तसबिरा, व त्यांचीं सुंदर सुंदर आल्बमूस–बुकें विक्रीस तयार आहेत.

नमुने समक्ष पहावयास मिळतील. क्याटलॉग लवकरच तयार होईल.

### किंमती.

कार्डसाईज ।– क्याबिनेट ॥– फूलसाईझ १॥ रु.

ह्याशिवाय क्रिस्टोलियम् पेंटिंगचे नमुने देही आमचे येथें आहेत.

नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. उत्तरास तिकिट आल्याशिवाय उत्तर मिळणार नाहीं; व आगाऊ पैसे किंवा व्ही. पी. नें माल मागितल्याशिवाय मागणीकडे लक्ष दिलें जाणार नाहीं.

**आठल्ये आणि सन्स,**
फोटोग्राफर्स व आर्टिस्ट्स.

वि[illegible] दत्तात्रेय कृष्ण सांडू, दुकान रामवाडी, मुंबई, [illegible] ील.

[illegible] शास्त्रीय प्रदर्शनाचे देखावे—जसें 'वायुशास्त्र,' 'पदार्थविज्ञान:' [illegible] 'रिक्तनळ्या,' 'उष्णता,' इत्यादि. तसेंच नव्या शोधाप्रमाणें एक्सरे: [illegible] त मनुष्याच्या हाडांचे फोटोही येथें विकीस तयार आहेत. तसेंच [illegible] ओऱ्यांगओट्यांग, हिपोपोट्यामस वगैरे चित्रें त्यांच्या संक्षिप्त वर्णनासुद्धां विक्रीस तयार आहेत.

एप्रिल. मे. जून. (वर्षाची वर्गणी १॥ रु. खर्चासह.) १८९८.

# केरळकोकिळ.

वर्षारंभ जानेवारी.

पु० १२] [अं० ४।५।६

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्तवापराधः ।
सहकारतरौ चकार यस्ते सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

महादेव गुर्जर बुकसेलर आणि पब्लिशर
रामवाडी
मुंबई.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

## एप्रिल, मे, जून या अंकांतील विषयांची अनुक्रमणिका.


**एप्रिल.** — पृष्ठ.

याकुत लोक. ... ... ७३
व्याजोपदेश (कविता). ... ७८
लोकोत्तर चमत्कार (हालचाल करणारीं यांत्रिक चित्रें.) ८०
राजयोग–प्रकरण तिसरें (प्राण). ८५
प्रश्न. ... ... ... ९६

**मे.**

लोकोत्तर चमत्कार (ऱ्होड्सचा पुतळा.... ... ... ९७
मलबारवर्णन (कोची येथील तिरुमल देवस्थानाचें हायस्कूल.) ... ... १०१
कोची येथील तिरुमल देवसमच्या हायस्कुलांतील बक्षीससमारंभाच्या वेळीं (त्रावणकोर व कोचीनचे रेसिडेंट नामदार रीससाहेब ह्यांनीं केलेलें भाषण). ... १०७
पुस्तकपरीक्षा. ... ... १११
मागील अंकांतील प्रश्नाचें उ० : १२०

**जून.**

ढेंकूण. ... ... ... १२१
जीवितौघ (कविता). ... १२५
लोकोत्तर चमत्कार (लुटारूंचा प्रसाद !) ... १३०
जलचरांची महाभयंकर वाढ. १३४
पुस्तकपरीक्षा. ... ... १३५
राजयोग. ... ... ... १४२



# हरएक प्रकारचा माल

मुंबईंत मिळणारा, व्यापारी व ग्राहक यांस रोख पैसे आल्यास पाठवूं.

**नियम व माहिती अर्धा आणा आल्यास मिळेल.**

व्यापारी व ग्राहक ह्यांकरितां. **हरएक प्रकारचा माल** मुंबईंत मिळणारा बक्तशीर बाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय.

D. K. SANDU,
RAMWADI, BOMBAY.



**दत्तात्रेय कृष्ण सांडू** ह्यांचें हरएक प्रकारचा माल मिळणारें, आणि माफक अडत घेऊन माल रवाना होणारें दुकानः—

रामवाडी, मुंबई.

**खरा हस्तिदंती माल**–फण्या ८ते ३ रु., कंगवे ८ ते १२ आ., फांसे जोड २ ते ७॥ रु., नाटाचे फांसे ६ ते १२ आणे.

वा. कृ. सांडू, दुकानदार—रामवाडी, मुंबई.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

आर्यमहौषधालय मु० आंजलें.

या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊंच व त्याशिवाय त्यांच्या आरोग्यार्थ एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकटच देऊं.

# मदनविलासामृतसंजीविनी.

## वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहक, बुद्धि–कांतिवर्धक व धातुपौष्टिक सुवर्णमाक्षिक मौक्तिक कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्त्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्वभागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, छातींतील रोग, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, वातरोग, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, हात, पाय, मूत्रमार्ग, व शरीर यांचा दाह, व अरुचि, इ० अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास नवीन किंवा जुनाट असले तरी खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस शारीरिक व मानसिक श्रम फार पडतात, त्या सर्वांच्या आंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो व सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें. कोष्ठशुद्धि होते. या अप्रतिम गुटिका अत्यंत शोधानें केल्या असून त्यांच्या अप्रतिम गुणका-

रित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं, असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व टपालखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळ्यांस १ रु. ७० गोळ्यांस २ रु. १६० गोळ्यांस ४ रु. २६० गोळ्यांस ६ रु. ५२० गोळ्यांस १० रु.

**थंडगार नेत्रांजन**—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार, तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

**विशेष सूचना.**—अलीकडे आंजर्लें व मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या बऱ्याच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष संभव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें **“कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य, मु० आंजर्लें, ता० दापोली, जि० रत्नागिरी”** याच पत्त्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपानपत्रक सोबत असतेंच.

४–१२]

केरळकोकिळ.

पु० १२] [अं० ४

# याकुत लोक.



ह्या लोकांची वसाहात सैबेरिया प्रांतास लागून आहे व रशियन

सरकारचा ह्यांच्यावर अंमल आहे. मोंगोलियन जातीचे अनेक भेद आहेत, त्यांपैकींच हाही एक भेद होय. याकुत देशाचे दोन निरनिराळे भाग आहेत. त्याच्या दक्षिणेस मोठमोठाले पर्वत आहेत. पश्चिमेस व उत्तरेस मोठमोठालीं मैदानें असून त्यांत लहान लहान झुडुपें दाटलेलीं आहेत. मधूनमधून मोठमोठाल्या अनेक नद्या व ओढे वहात असतात. त्यांतून पार जाण्यासाठीं तिकडील लोक, झाडांच्या सालींच्या व लांकडाच्या लहान लहान होड्या तयार करितात. त्या होड्या इतक्या लहान असतात कीं, त्यांत दोन किंवा तीन मनुष्यें बसलीं ह्मणजे फार झालें. रेनदीर ह्मणून एक हरणाची किंवा सांबराची जात आहे. तें याकुत लोकांचें फार उपयोगी जनावर. ह्या देशांतील थंडी फार कडक असते. सैबेरियांतील कोणत्याही प्रांतापेक्षां येथील थंडीचा अंमल विशेष असतो. याकुत लोकांची वस्ती २००००० पेक्षां अधिक नाहीं. याकुत लोकांची उंची साधारणच असते. तरी ते मोठे मजबूत व हाडकाठीनें बळकट असतात. त्यांची छाती पसरट असून नाक फेंफाणें असतें. डोळे काळे व घारे दोन्हीही प्रकारचे असतात. त्यांच्या आंगाचा वर्ण साधारणपणें गोरा व काळा ह्यांच्या मधोमध असून त्यांत एक विशेष चमत्कार आहे. तो हा कीं, तो रंग वर्षांतून तीन वेळ किंवा चार वेळ बदलतो. पर्जन्यकालांतील वातावरणानें तो तांबडसर होतो. उन्हाळयांतील उन्हानें तो काळसर होतो; आणि हिंवाळयांतील थंडीनें आणि त्यांच्या आगट्यांनीं त्याच्यावर पिंवळी झांक मारते! याकुत लोकांच्या आंगीं शिपाईबाणा नाहीं. कारण, त्यांचा शांत स्वभाव त्यांस युद्धापासून नेहमीं परावृत्त करित असतो. तरी ते मोठे चपळ, ममताळू, व बुद्धिमान् असे असतात. त्यांच्याकडे कोणीही पाहुणा कीं अतिथी जावो, त्याचा ते उत्तम रीतीनें आदरसत्कार करतात. तो आठवडाभर राहो कीं महिनाभर राहो, त्यास व त्याच्या घोड्यासही ते कांहींएक कमी पडूं देत नाहींत. उलट अधिक आदरानें देतात. ते दारूचे आणि तंबाखूचे मोठे भक्त आहेत. उपास काढण्याच्या कामांत त्यांच्यासारखे दुसरे लोक आढळावयाचे नाहींत. तीनतीन दिवस किंवा चारचार दिवस अन्नपाण्यावांचून काम करणें ह्यांत त्यांना कांहींच क्षिति

वाटत नाहीं. त्यांचे लांब आणि काळेभोर केंस स्वाभाविकपणेंच त्यांच्या मस्तकाभोंवतीं उडत असतात. पण तोंडावर बहुतकरून मुळींच केंस नसतात ह्मटलें तरी चालेल. ते आपल्या केंसांतील एक बट भली लांब राखतात; आणि त्यांचें धनुष्य जेव्हां सुकें राखावयाचें असेल तेव्हां तें त्या बटेस बांधून ठेवून, प्रवासांत किंवा शिकारीला वगैरे जातांना केवढीही मोठी नदी मध्यें येवो, तींतून ते पोंहून पार होतात. ह्यांचा देश इतका विस्तृत आहे कीं, त्यांतील निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या हवा असून त्यांच्यांत फार मोठी तफावत असते. उदाहरणार्थ, अल्कमिंक येथें गहूं उत्तम पिकतात. कारण, तेथें पांढरें दंव पडतें, तें फार उशीरानें पडतें. आणि उलट पक्षीं डिगान्स येथें नेहमीं दोन हात खोलीपर्यंत जमीन थिजलेली असते; आणि तेथें आगस्ट महिन्यांतच बर्फ पडण्यास प्रारंभ होतो. अर्थात् तेथील जमीन केवळ निरुपयोगी होय. याकुत लोकांपैकीं बहुतेक लोक बाप्तिस्मा घेऊन रशियन धर्मांत गेले आहेत. नाहींत असे २०० सांपडण्याची सुद्धां मारामार पडेल. ते धर्माध्यक्षांची आज्ञा पाळतात. देवळामध्यें प्रार्थनेस जातात; परंतु धर्मविधींचें फारसें बंड माजवीत नाहींत. जितके होतील तितके थोडे विधि करण्याचा त्यांचा प्रघात असतो. देवाचें स्मरण केल्याशिवाय ते लोक कधीं घराबाहेर पडावयाचे नाहींत, किंवा निजावयास जावयाचे नाहींत. कोणतीही गोष्ट घडो, ते लागलीच परमेश्वराची प्रार्थना करतात. एखाद्यावर दुर्दैवाचा घाला येऊन पडला, तर आपल्यास घडलेल्या पातकाची परमेश्वरानें शिक्षा केली असें समजून धैर्य न सोडतां परमेश्वर कृपा करील तर पुन्हाही चांगले दिवस येतील अशी आशा धरून बसतात. भूतांखेतांना सुद्धां नमस्कार घालण्यामध्यें त्यांची विलक्षण श्रद्धा दिसून येते. मोठें दुखणें बाणें आलें तर ते लोक नवस करतात, व विवक्षित रंगाचा पशु बळी देतात.

याकुत लोक घरांतील वडील माणसांस अतिशय मान देतात; त्यांच्या सल्ल्याप्रमाणें वागतात; आणि चांगलें कोणतें आणि वाईट कोणतें ह्याचा नीटपणें विचार करतात. एखाद्याला अधिक मुलें असलीं, तर तो त्यांचीं एकामागून एक लग्नें करून देतो; निरनिराळीं घरें बांधून देतो; व

वांटणीप्रमाणें आपल्या इष्टेटीपैकीं गुरेंढोरेंही त्यांस देतो. मुलें वेगळीं वेगळीं राहिलीं तरी बापाची आज्ञा उल्लंघन करीत नाहींत. एखाद्या बापाला एकच मुलगा असला तर मात्र तो त्याला आपल्या जवळच ठेवतो. पण पहिली बायको मरून तो दुसरें लग्न करील, आणि त्या दुसऱ्या बायकोला मुलें होतील, तर मात्र तो पहिला मुलगा वेगळा सरतो.

याकुत लोकांच्या संपत्तीचें अनुमान, त्यांच्या गुरांढोरांच्या संख्येवरून करतात. गुरांढोरांची सुधारणा करणें आणि तीं वाढविणें हें त्यांचें पहिलें काम असतें. आपल्या मालमत्तेचा रोकड पैसा करण्याची ते कधींच इच्छा करीत नाहींत. राग हा मनुष्यमात्रांत सर्वसाधारणच आहे. त्याप्रमाणें याकुत लोकांतही आहे. तथापि ते दीर्घद्वेष असा कोणाचाच धरीत नाहींत. लौकरच विसरतात, व ज्याची चुकी झाली असेल, तो प्रांजळपणें ती आपल्या पदरांत घेतो.

याकुती लोकांत एक दोष आहे; पण तोही स्वभावसिद्ध आहे असें नाहीं. तो दोष ह्मणजे हा कीं, त्यांच्यांतील कितीएक लोक गुरेंढोरें चोरून त्यावर आपला निर्वाह करतात. पण तोही अगदीं निरुपाय झाला ह्मणजे. पण त्यांतही एक मौज असते ती अशी कीं, चोरल्या पशूच्या मांसाचे जे काय दोनतीन तुकडे आपणांस पाहिजेत तेवढेच ते कापून घेतात, व बाकीचें मांस फेंकून देतात! ह्यावरून दिसून येतें कीं, तें कृत्य केवळ त्यांच्या पोटाच्या आगीकरतां असतें, आणि ती भूक तरी अशी कीं, कित्येक महिने किंवा कित्येक वर्षें मेलेली! शिवाय चोर जेव्हां पकडतात, तेव्हां त्यांचे राजे त्यांस त्यांच्या पूर्वापार पद्धतीप्रमाणें फटके मारतात. आणि ते प्रत्येक मनुष्याच्या पुढें! ते फटके असे असतात कीं, त्या बिचाऱ्यास त्यांची जन्मभर याद राहते. अशा आरोपीचा पुरावा वगैरे कांहींएक घेत नाहींत; त्याचें ह्मणणें ऐकत नाहींत; व मंडळीमध्यें त्याच्या शब्दाला वजनही मिळत नाहीं. ह्यावरून याकुत लोकांत चोरीचा धंदा असा मुळींच नाहीं ह्मटलें तरी चालेल. चोराला शिक्षा होते येवढेंच नव्हे, तर तो पुन्हा अब्रूला ह्मणून चढावयाचाच नाहीं.

याकुत लोकांतील कोणत्याही मनुष्यानें एखादा धंदा करण्याचें मनावर घेतलें, तर त्यांत तो अगदीं पटाईत होऊन राहतो. तो एकाच वेळीं जवाहिऱ्या, लोहार, तांबट, चांभार सुद्धां बनतो. त्याला बंदुकीचें सामान करतां येतें; हस्तीदंत कोरतां येतो; आणि थोडक्या अभ्यासानें तो पाहिजे ती कला साध्य करूं शकतो. परंतु त्यांना उच्च प्रतीचें शिक्षण मिळण्याला कांहीं मार्ग नाहीं, ही मोठी शोचनीय गोष्ट होय.

हे लोक पहिल्या प्रतीचे गोलंदाज आहेत. थंडी असो, पाऊस असो, भूक असो, थकवा असो; पक्ष्याचा किंवा पशूचा पाठलाग ते सोडीत नाहींत. कोल्ह्याचा किंवा सशाचा ते लोक पाठलाग करूं लागले ह्मणजे दोनदोन दिवस सारखे पळत सुटतात. आपल्या किंवा आपल्या घोड्याच्या जिवाकडे सुद्धां पहात नाहींत.

व्यापारांतही याकुत लोक मोठे तरबेज आहेत. ते सशाचीं व कोल्ह्याचीं कातडीं इतकीं जमवितात, व तीं अशीं कमवितात कीं त्यांचें त्यांना चांगलेंच मोल येतें. ते बंदुका करतात; फण्या करतात; व त्या उत्तम असतात. त्यांनीं तयार केलेले कातड्याचे बुधले तर इतके उत्तम असतात कीं, त्यांत १०।१० वर्षें पातळ पदार्थ ठेवला तर एक टिपूस बाहेर यावयाचा नाहीं!

शिरोभागीं दिलेलें चित्र एका याकुत जातीच्या स्त्रीचें आहे. ह्यांच्यांतील पुष्कळ बायका रूपानें सुंदर असतात. त्या पुरुषांपेक्षा निर्मळ असून त्यांस पुरुषाप्रमाणेंच पोषाख करणें आवडतें. त्या आंगरखा घालतात, व डोक्यास टोपी घालतात. त्या टोपीला दोन चामड्याचीं शिंगें लावण्याची चाल आहे! व तोंडावर रंगारंगांचे पट्टे काढतात! त्यामुळें त्यांच्या मूळच्या सौंदर्याला बराच उणेपणा येतो. त्यांना इतर स्त्रियांप्रमाणें चांगल्याचांगल्या वस्तूंचा फार शोक असतो. मोह हा सर्वत्रांना आहेच, तसा परमेश्वरानें त्यांच्या पाठीमागेंही लावलेला आहे. तरी त्या वाईट, नीच, हलकट अशा कधींही होत नाहींत. त्या आपल्या आईबापांना व सासूसासऱ्यांना केवळ देवाप्रमाणें पूज्य मानितात. त्या आपले पाय आणि डोकें कधीं कोणास दिसूं देत नाहींत. त्यांच्यांत आणखी एक विलक्षण चाल आहे. ती ही कीं, त्या चुलीला

उजवें घालून कधीं जावयाच्या नाहींत. सासऱ्याच्या कोणत्याही माणसाचें नांव घेत नाहींत. ही मर्यादा जी स्त्री पाळीत नाहीं, तिला रानटी किंवा पशूप्रमाणें समजतात. आणि नवरा तर तिला निखालस कपाळकरंटी समजतो. असे पृथ्वीच्या पाठीवर अनेक भिन्नभिन्न जातीचे, भिन्नभिन्न रिवाजाचे, व भिन्नभिन्न रुचीचे लोक आहेत.

---

# व्याजोपदेश.

## श्लोक.

वाटे चोरीचहाडी करुनि गुरुवरा दुष्पथा आक्रमावें
होवोनी मत्तचित्त प्रचुरतर परस्त्रीसिं वाटे रमावें ।
धर्मा देऊनि टाळा मम मन करवी सर्वदां दुष्ट चाळा
तेंही बापा सुखानें करिं परि कथितों मार्ग तूतें निराळा ॥ १ ॥
कोठें सद्गुणरत्नरास झळके कोठें खरी वैखरी
कोठें शांति उदारता विलसते कोठें सुधी अंतरीं ।
राहोनी बहु दक्ष लक्ष पुरवीं वृत्ती बकाची धरीं
चित्तीं हा दिन रात्र ही न ह्मणतां ह्यांचीच चोरी करीं ॥ २ ॥
भक्तीनें भगवंतभक्तभजनीं दासाहिपेक्षां खपे
येतां, तोच कृपाळ, काळ उलटा मातेहुनीही जपे ।
हाकी स्यंदन चंदनास झिजवी उर्ष्टींहि काढी करीं
कानीं लागुनि नित्य तूं सकलिकां ह्याच्या चहाड्या करीं ॥ ३ ॥
साधीं सत्कुलजा विरक्ति विधवा आहे तुला नोवरी
लावीं शीघ्र पुनर्विवाह तिजशीं संसार हा आवरीं ।
पोटीं घाल दया क्षमा खचुनि तूं प्राशीं सुबोधामृत
कोणाच्या जवळी असो ह्मणुं नको हा शूद्र कीं हा मृत ॥ ४ ॥
रूपें निर्मळ रम्य सुंदरवपू गंगेपरी गोमटी
ऐशी ईश्वरभक्ति पाहुनि गड्या तूं घट्ट घालीं मिठी ।

झोंबें तीस अखंड दंड धरुनी ती आपलीशी करीं
आली सोडुं नको शिकार कधिंही हा प्राण गेला तरी ॥ ५ ॥
हातीं नित्य विवेकशस्त्र धरुनी खासें तया पाजळीं
काढीं कापुन षड्रिपूंतुनि पुढें येईल जो जो बळी ।
क्रोधाचें विष सत्य नाश करितें डोळ्यावरीही चढे
त्याचा अंत करावया बघुं नको केव्हांच मागें पुढें ॥ ६ ॥

लावोनीयां हृदयसदना दांडगेंसें कुलूप
वैराग्याचें झडकरि घरीं ओतुनी शुद्धतूप ।
अग्नी लावीं भय न धरितां कोंडुनी त्यांत काम
पोरां बाळां सकट ह्मणुं दे अक्षयीं रामराम ॥ ७ ॥

अहंता तंबाखू मुरडुनि करीं सुंदर विडी
भरीं केव्हां केव्हां सहज विनयाची गुरंगुडी ।
दमानें एका तूं प्रबळ झुरका एक चढवीं
प्रबोधाग्निज्वाला प्रगट करुनी राख उडवीं ॥ ८ ॥

सदा वैराग्याची पिउनि मदिरा धुंद हृदयें
निजानंदीं राहें भ्रमत भुलुनी ज्ञानउदयें ।
धुळीमध्यें लोळें वमुनि दुरितें साधुचरणीं
नुरो संसाराचें स्मरण अथवा लोकसरणी ॥ ९ ॥

बांधीं सारे जन उपकृती-रज्जुनें घट्ट फार
सद्बोधाचे प्रखर फटके त्यावरी नित्य मार ।
सद्भक्तीची दृढतर अशी शृंखळा ठोक पायीं
सत्सेवेला निशिदिनिं तया लाव नाना उपायीं ॥ १० ॥

ठेवी मानीं प्रभुवर जसा बंदिमाजी स्त्रियांना
जाणोनीयां अवखळ तशीं ठेव तूं इंद्रियांना ।
ऐशीं आणीं वठणिस जणूं वेसणीचेचि पाडे
खालीं माना करुनि नियमें ओढिती नीट गाडे ॥ ११ ॥

मानाचीं थोर पानें चघळुनि बरवीं फोड भीती सुपारी
जाळोनी गर्व सारा धवलवरि चुना कात हा स्वार्थ भारी।
तृष्णेचे वेलदोडे घमघमित जरी नित्य तांबूल खाशी
कांती वाढे मुखाची परिमळ पसरे पार नाहीं सुखाशीं ॥ १२ ॥
मांडोनी पुरुषार्थ चार पगडीं संसारमायापटीं
फांसे टाकुनि नीट तीन गुण हे मारीं बरीं सोंगटीं।
मोठे घातक पातकी विषय हे आणोनि लावीं पणा
सोडीं नागवुनी धरोनि बसले पोटांत जो मीपणा ॥ १३ ॥
भूमी ही उंच शय्या गगनवर भला चांदवा रत्नयुक्त
घालीती गोड वारा तुजशि दशदिशा सन्मती भोगभुक्त।
पृथ्वीचा वायु वेगें परिमळ पसरीं ज्ञान लावीं मशाल
चंद्रीं लावोनि तंद्री मनन करित तूं लोळ बापा खुशाल ॥१४॥
बाबा दुर्व्यसनें तुला न सुटती ही युक्ति त्याला भली
प्राणाहूनि जपून ठेव हृदयीं दैवें तुला लाभली।
श्रद्धा ठेवुनि वाग राग न धरीं चालें पुढें ह्या रितीं
सारें विश्व तुझेंच होउनि गड्या तोषेल लक्ष्मीपती ॥ १५ ॥

# लोकोत्तर चमत्कार.

## हालचाल करणारीं यांत्रिक चित्रें.

प्राण्यांचीं हुबेहुब चित्रें काढण्याची व करण्याची कला, प्राचीन कालापासून प्रत्येक देशांत थोड्याबहुत प्रमाणानें आहेच. आमचा देश आजमितीस जरी सर्वतोपरी मागसला आहे, गतवैभव झाला आहे, तरी त्यांत सुद्धां कलाकौशल्याच्या कांहींना कांहीतरी चिजा दृष्टीस पडतातच. ह्याला उदाहरण आपल्या महाराष्ट्र देशांतील लहानशा एका गोकाक शहराचेंच पुरें आहे. ह्यांतील लांकडी फळफळावळ व चित्रें पाहून सर्व जगांतील लोक सुद्धां तोंडांत बोट घाल-

तात! ऊंस, आंबे, पेरू, मिरच्या, भेंड्या इत्यादिकांनीं फसला जाणार नाहीं, असा कोणता मनुष्य? व कबूतरें, उंदीर, सर्प, इत्यादिकांस फसला जाणार नाहीं असा कोणता प्राणी? ही आपल्या महाराष्ट्रदेशाची गोष्ट झाली. युरोपखंड तर सर्वच गोष्टींत आजकाल अघाडी मारतें आहे. तेव्हां तें चित्रकलेंत तरी मागें कसें राहणार? फोटोग्राफ, ऑइलपेंटिंग, पुतळे इत्यादि जिन्नस तर त्या देशांत अगदीं पहिल्या प्रतीचे होतात.

तेव्हां अर्थातच हुबेहुब चित्रें काढणें व करणें ह्यांत लोकांस कांहीं विशेष वाटेनासें झालें आहे. कारण, ती विद्या आतां बहुतेक करतलामलकवत् झाल्यासारखीच बहुतेक झाली आहे. तेव्हां तींत आणखी विशेष कांहींतरी नवी टूम काढण्याकडे लोकांचें—कारागिरांचें—लक्ष्य लागावें हें साहजिकच आहे, व तसें लागलेंही पण आहे. ही नवी टूम ह्मणजे अर्थात् चित्रामध्यें हालचाल उत्पन्न व्हावी ही होय. थोड्या दिवसांपूर्वीं 'भिओटोग्राफ' नामक हालचाल करणाऱ्या चित्रांची माहिती आमच्या कोकिळांत दिलेली वाचकांच्या स्मरणांत असेलच, व ती कला लौकरच सर्वसाधारण होईल ह्यांत शंका नाहीं. पण ती काढलेल्या चित्रांची हालचाल झाली. केलेल्या चित्रांत परिपूर्ण हालचाल दाखविण्याच्या कामांत अद्याप कोणताही कारागीर यशस्वी झालेला नाहीं.

तरी, प्राचीन कालापासून तयार केलेल्या पुतळ्यांत किंवा चित्रांत हालचाल उत्पन्न करण्याविषयीं बऱ्याच कुशल पुरुषांनीं यत्न केले होते असें इतिहासावरून दिसून येतें. आणि त्यांतील कितीएकांस विलक्षण तऱ्हेचें यशही पण आलेलें होतें. टारेनटम येथें राहणारा अर्चिटास ह्या नांवाचा कारागीर इ. स. पूर्वीं ४०० वर्षें होऊन गेला. त्यानें एक कबूतर तयार केलें होतें. तें आपल्या पंखांनीं भरकन् उडून जावें अशी त्यांत कळ साधली होती. पण तें परत येण्याला, किंवा त्याची ती गति बंद होण्याला कांहीं मार्ग नव्हता. पण त्याच्या आलीकडचें एक उदाहरण फारच अद्भुत असून त्याची माहिती विशेष भरंवशाची आहे. जॉन मुल्लर ह्मणून जर्मनी देशांत एक मोठा कुशल कारागीर होता. त्यानें एक कळसूत्री गरुड तयार केला होता. तो मैल मैल लांब भरारी मारी; आणि विशेष चमत्काराची गोष्ट ही कीं, तो परत निघाल्या ठिकाणीं येत असे. नारेमबर्गचा बादशहा एक वेळ म्याक्सिमिलियनास

भेटावयास गेला होता. तेव्हां त्यास हा कृत्रिम गरुड एक मैल सामोरा गेला होता, व बादशहाची स्वारी लव्याजम्यानिशीं वेशीपाशीं येत आहे तों, हे पक्षिराज सर्वांआधीं परत येऊन महाद्वारावर येऊन स्वागत करण्याकरितां तिष्ठत बसले होते ! तो चमत्कार पाहून बादशहा फार खूष झाला, आणि त्यानें त्या कारागिरास मोठें बक्षिस दिलें. ह्याच मुल्लरनें एक लोखंडी माशी तयार केली होती. ती त्याच्या हातांतून उडे, आणि आसोपास बरीच मोठी चक्कर मारून पुन्हा परत त्याच्या हातावर येऊन बसत असे. ह्या गोष्टीवरही कोठें आक्षेप ऐकूं येतात; परंतु खालची माहिती तर अगदीं निर्विवाद खरी आहे.

वेस्ट इंडीज बेटांमध्यें 'सेंट ख्रिस्तोपर' ह्मणून फ्रेंच लोकांच्या कांहीं वसाहती आहेत. त्यांच्या तर्फेनें इ. स. १६८८ मध्यें कर्नल डी.जेनिस ह्या गृहस्थानें इंग्लिश लोकांशीं टक्कर देऊन मोठा जय संपादन केला. हा गृहस्थ यांत्रिककलेमध्यें निष्णात असल्याबद्दल फार ख्याति आहे. ह्यानें एक मोर केला होता. त्याच्या पोटांत अशी कांहीं चमत्कारिक यंत्ररचना भरली होती कीं, तिच्या साधनानें तो मोर जिवंत मोराप्रमाणें खुशाल हिकडेतिकडे फिरत असे. येवढेंच नव्हे, तर तो आपला पिसारा उभारी; मनोरम नृत्य करी; आपल्या चोंचीनें दाणे टिपी; ते गिळी; आणि ते कोठ्यांत पचवून मयूरपक्ष्याप्रमाणें हुबेहुब मलद्वारांतून बाहेर शीट टाकित असे! तेव्हां त्या कारागिराचें कसब किती अप्रतिम! आणि बुद्धि केवढी अचाट!

परंतु थोड्याच दिवसांत हेंही कसब मागें पडलें. कारण, पुढें फ्रेंच कारागीर हाकिनसन ह्यानें एक राजहंस तयार केला. त्याच्या रचनेंतील चातुर्य ह्याहूनही अगाध होतें. हा राजहंस आकारानें खऱ्या राजहंसायेवढा असून दिसण्यांत तर केवळ तत्सदृश केलेला होता. हा पक्षी इ. स. १७३८ मध्यें पारिस शहरांतील लोकांस दाखविण्यांत आला. त्या वेळेस सर्वांची अगदीं चकभूल झाली. कित्येकांस तर हा खरोखर जिवंत पक्षीच असावा अशीही भ्रांति पडल्यावांचून राहिली नाहीं. त्याच्या पंखांला व शरीराला खऱ्या राजहंसाचींच पिसें फार कुशलतेनें लावलेलीं होतीं. आंतील हाडांची रचना सुद्धां अगदीं यथाशास्त्र व यथाप्रमाण केलेली होती. त्यास किल्ली दिली ह्मणजे तो

हुबेहुब हंसाच्या ढबीप्रमाणेंच डुलतडुलत चालत असे. तो आपले पंख हालवी, खाई, पिई, आणि सर्वांत अपूर्वतेची गोष्ट ही कीं, कोणत्याही कृत्यांत त्याची स्वाभाविक ढब सुटत नसे. त्याच्या पक्वाशयांत रसायनिक द्रव्यांचें संमेलन केलेलें असे. त्यामुळें तो जें जें खाई त्याचें जिवंत पक्ष्याप्रमाणेंच पचन होई. तो हंसाप्रमाणेंच अगदीं हुबेहुब 'क्याक् क्याक्" असा ओरडे. आणि तो शब्द कृत्रिम आहे ही गोष्ट अगदीं मनांत सुद्धां येत नसे. पण ह्या सर्वांपेक्षां त्या कारागिराचें त्यांतील एक कसब विशेष तारिफ करण्यासारखें होतें. त्यावरून आपल्यांतील भोजकालिदासांच्या . एका आख्यायिकेचें स्मरण झाल्यावांचून रहात नाहीं. भोज राजाच्या सभेंत एका चतुर सोंगाड्यानें एकदां एका नंदीबैलाचें सोंग आणलें होतें. तें इतकें हुबेहुब होतें कीं, तें पाहून भोज राजानें शालजोडी वगैरे मोठें बक्षिस दिलें. त्या वेळीं हजारों लोक जमले होते. त्यांत एक घोंगडें पांघरलेलें गुराखी पोर होतें. त्यानें हळूच एक जमिनीवरचा खडा उचलून तो त्या बैलाच्या पाठीवर टाकला. तो खडा पडतांच त्या कृत्रिम बैलानें तत्काल भोंवरा केला. तो पाहून तो मुलगा फार खूष झाला, आणि त्यानें आपल्या आंगावरचें पटकूर मोठ्या आनंदानें त्या बहुरुप्याच्या आंगावर फेंकून दिलें. बहुरुप्यानेंही त्या अल्प देणगीचा परम आदरानें स्वीकार केला, आणि मोठ्या नम्रत्वानें सर्वांदेखत त्या गुराख्यास मुजरा करून मोठे आभार मानिले; व ह्यानेंच माझ्या कसबाची खरी पारख केली असें ह्मणाला. राजानेंही त्या गुराख्याची समयसूचकता व गुणग्राहकता जाणून आपल्या आश्रयास ठेवला, व तोच पुढें कालिदास ह्या नांवानें विख्यात पंडित झाला. अशी ही एक जुनी आख्यायिका आहे. अशीच एक खुबी वरील कारागिरानें आपल्या कृत्रिम राजहंसामध्यें ठेवून दिली होती. बदकें व राजहंस हीं एका वर्गातील होत, हेंही वाचकांस फार करून माहित असेलच. ह्या वर्गातील पक्षी पाणी वगैरे पितांना 'मचामचा' अशा एक प्रकारच्या मिटक्या मारतात, आणि आपल्या चंचूच्या अग्रानें पाण्यास अशी कांहीं गति देतात कीं, तेणेंकरून तेथील पाण्यास एकामागून एक भोंवरे पडत जातात. हा सर्व प्रकार वर सांगितलेला

कृतीचा राजहंस बरोबर करित असे. मग पाहणारांस खऱ्या राजहंसाचा भ्रम पडावा, ह्यांत नवल तें कोणतें?

बेकमन ह्मणून एक गृहस्थ होता. तो इ. स. १७६४ मध्यें रशियामध्यें प्रवास करीत हिंडत होता. तेव्हां त्यास सेंटपिटर्सबर्गेजवळ झास्कोसिलोच्या राजवाड्यांत एक यांत्रिकचित्रांचा संग्रह दृष्टीस पडला. हीं चित्रें व्हान् कानूसन्पासून विकत घेतलेलीं होतीं. तीं चित्रें त्यानें सरकारापासून घेतलीं आणि सर्व युरोपखंडभर दाखवीत फिरूं लागला. वर सांगितलेला राजहंस हा त्यांमध्येंच होता. तो खात असे, पीत असे व चालत असे, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. कांहीं दिवसांनीं त्याच्या फांसळ्यावरचीं पिसें निघून आंतील रचना उघडी पडली. ती पाहणारा एक मनुष्य ह्मणतो कीं आंत एक फिरणारा रूळ असून बारीकबारीक सांखळ्यांनीं त्यांत गति उत्पन्न केलेली असे. ही आंतील सर्व रचना खिशांतील घड्याळाप्रमाणें होती. त्याचे पाय खरोखर हंसाच्या पायायेवढे असून त्यांतून सर्व यंत्रें सुरू होत.

व्हान् कानूसन् ह्यानें असाच एक मुरलीधर तयार केला होता. तो बारा चालींवर मुरली वाजवी. ही मुरली जर्मनी तऱ्हेची असून ती वाजवितांना त्याच्या तोंडांतून वारा निघत असे, आणि स्वराच्या उच्चनीचतेप्रमाणें तो आपल्या बोटांनीं पाहिजे तीं भोंकें बंद करी व उघडीं सोडी. प्रोफेसर बेकमननें व्हान् कानूसन्चीं जीं चित्रें पाहिलीं, त्यांत हेंही एक होतें. पण पुढें तें बिघडून त्यांतून कांहीं थोडेसे सूर मात्र निघत, आणि तेही अस्पष्ट असत.

पण मुरली वाजविण्याच्या चित्रांत पुढें ह्याहूनही सुधारणा झाली. कांहीं वर्षांपूर्वीं लंडनांतील ओडलेड ग्यालरीमध्यें एक चमत्कारिक पदार्थांचें प्रदर्शन झालें. त्यांत दोन मुरली वाजविणाऱ्या स्त्रिया ठेवल्या होत्या. त्या नाना प्रकारच्या गति व पद्यें वगैरे सुस्वर वाजवित. तरी ते स्वर कांहींसे रुक्ष व भणभणीत असत, आणि मूर्ति निर्जीवशा भासत. ती यंत्ररचना पुष्कळ वर्षांच्या पूर्वींची असल्यांमुळें, आणि ती नादुरुस्त स्थितींत असल्यामुळें, तसें दिसणें साहजिकच आहे.

# राजयोग.

## प्रकरण तिसरें.

### प्राण.

पुष्कळ लोकांस असें वाटतें कीं, प्राण हा श्वासोच्छ्वासांपैकींच कसला तरी एक भेद आहे. पण ती त्यांची चुकी होय. श्वासोच्छ्वासाशीं त्याचा संबंध असला तर तो फारच थोडा असला पाहिजे. खऱ्या प्राणायामापर्यंत पोंचण्याचे जे अनेक मार्ग आहेत, त्यांपैकीं श्वासोच्छ्वास हा फक्त एक मार्ग आहे. प्राणायाम ह्मणजे प्राणावर सत्ता चालविणें, त्याला आपल्या ताब्यांत आणणें. भरतखंडांतील तत्त्वज्ञान्यांच्या मताप्रमाणें, हें सर्व ब्रह्मांड दोनच तत्त्वांचें बनलेलें असून, त्यांतील एकास आकाश असें ह्मणतात. तें सर्व व्यापक असून दरोबस्त दृश्य पदार्थांत शिरून राहिलेलें आहे. प्रत्येक आकारास आलेली वस्तु, ह्या आकाशाचीच बनलेली आहे. हवा, पातळ पदार्थ, घन पदार्थ हीं सर्व आकाशाचींच बनतात. सूर्य, पृथ्वी, चंद्र, तारे, धूमकेतु हे सर्व आकाशाचेच बनतात. प्रत्येक जड पदार्थ, पाणी, वनस्पती, प्रत्येक दृष्टिगोचर होणारा आकार, प्रत्येक ज्ञान होणारा पदार्थ, प्रत्येक अस्तित्वांत असलेला पदार्थ आकाशाचाच बनतो. आकाश हें स्वत: दृष्टिगोचर होऊं शकत नाहीं. तें इतकें सूक्ष्म आहे कीं, सर्वसाधारण पदार्थांच्या अगदीं पलीकडे. हें ज्या वेळेस घन होतें, आकार धारण करतें, त्याच वेळेस दृग्गोचर होतें. सृष्टि निर्माण होण्याच्या प्रारंभीं हें आकाश मात्र असतें; आणि प्रळयकाळाच्या वेळीं घन पदार्थ, पातळ पदार्थ, आणि सारे वायु, हे पुन्हा ह्या आकाशांतच वितळून जातात; आणि पुन्हा तशीच नवी सृष्टिही ह्या आकाशापासूनच उत्पन्न होते.

ह्या आकाशापासून हें ब्रह्मांड कोणत्या सामर्थ्यानें उत्पन्न होतें ? तर प्राणाच्या सामर्थ्यानें. आकाश हें जसें मूळ, सर्वव्यापी, ह्या ब्रह्मांडाचें घटकावयव आहे, त्याप्रमाणेंच प्राण हेंही मूळ, सर्वव्यापी, ह्या ब्रह्मांडास उत्पन्न करणारें तत्त्व आहे. सृष्टि निर्माण होण्याच्या वेळीं आणि लय पावण्याच्या वेळीं प्रत्येक वस्तु आकाशरूप होते. आणि सर्व ब्रह्मांडांत प्रचलित असणाऱ्या दरोबस्त शक्ति परत प्राणामध्यें लय पावतात. आणखी दुसरा कल्प सुरूं होण्याच्या वेळीं ज्या प्रत्येकीला आह्मी चेतना ह्मणतों, शक्ति ह्मणतों, त्या प्राण्याच्याच बनतात.

चैतन्याच्या ज्या ज्या ह्मणून क्रिया तो तो प्राण. पृथ्वी आकर्षण करणें, लोहचुंबग्राहक शक्ति उत्पन्न होणें, हींही प्राणाचींच स्वरूपें होत. शरीराचें चलनवलन, ज्ञानतंतूंचा प्रवाह, विचारशक्ति इत्यादि उत्पन्न होणें ह्यांचेंही नांव प्राण. विचार करण्यापासून तों अगदीं खालच्या शारीरिक चलनवलनापर्यंत ज्या कृति त्या सर्व प्राणाच्या होत. ब्रह्मांडांतील यच्चयावत् मानसिक किंवा शारीरिक शक्ति पुन्हा जेव्हां मूळ स्वरूपांत लय पावतात, तेव्हां त्यास प्राण असें ह्मणतात. "ज्या वेळेस हेंही नसतें, आणि तेंही नसतें, आंधारच आंधाराला आच्छादून असतो, त्या वेळेस असतें तरी काय?" तर अचल असें आकाश. प्राणाची शारीरिक शक्तिही लयास जाते, परंतु तो अस्तित्वांत आला कीं, त्यास ती पुन्हा पूर्ववत् प्राप्त होते. सर्व प्रकारच्या प्रवृत्ति, ज्या ब्रह्मांडामध्यें प्रगट झालेल्या दिसतात, त्या अर्वाचीन शास्त्राप्रमाणें अविकृत अशा आहेत. एक कल्प समाप्त झाला कीं, झाडून साऱ्या प्रवृत्ति, अशा प्रकारें अगदीं लयास जाऊन स्तब्ध होतात. आणि दुसऱ्या कल्पाच्या प्रारंभीं त्या पुन्हा उठून आकाशाला चेतवितात. आणि त्यामुळें आकाशापासून हे नानाप्रकारचे आकार उत्पन्न होतात. आकाशाचें जसें रूपांतर होतें, तसें प्राणाचेंही रूपांतर होऊन ह्या सर्व प्रवृत्तींचीं स्वरूपें व्यक्त होतात. त्या प्राणाचें ज्ञान करून घेणें, आणि त्यावर सत्ता चालविणें, हेंच काय तें खरोखर प्राणायामानें साधावयाचें असतें.

त्याच्याच योगानें आह्मांस अपरिमित सामर्थ्याचें द्वार खुलें होतें. उदाहरणार्थ समजा कीं, एखाद्याला प्राण ह्मणजे काय तें समजलें, आणि त्यावर परिपूर्ण सत्ताही चालवितां येऊं लागली, तर जगावर अशी कोणती गोष्ट आहे कीं, ती त्याच्या ताब्यांत येणार नाहीं! त्याला सूर्य किंवा तारेही, त्यांच्या त्यांच्या स्थानापासून हालवितां येतील. ब्रह्मांडांतील एखाद्या सूक्ष्म परमाणूपासून तों तहत सूर्यासारख्या प्रचंड वस्तूवरही तो सत्ता चालवील. कारण, त्याच्या आंगीं प्राणावर सत्ता चालविण्याचें सामर्थ्य असतें. प्राणायामाचा उद्देश आणि फळ हेंच आहे. योगी पूर्णावस्थेस पोंचला ह्मणजे त्याच्या ताब्यांत न चालणारी अशी एकही वस्तु ब्रह्मांडामध्यें नाहीं. त्यानें देवांना जर 'या' ह्मणून आज्ञा केली, तर ते आज्ञेबरोबर हजर होतील. त्यानें मृतांना येण्याविषयीं हुकूम केला तर, तेहीं दत्त करून पुढें उभे राहतील. सृष्टींतील दरोबस्त शक्ति, त्याच्या गुलामाप्रमाणें आज्ञाधारक होऊन राहतील. हें योग्याचें सामर्थ्य एखाद्या वेळीं जेव्हां अज्ञान्यांच्या दृष्टीस पडतें, तेव्हां ते त्यास अद्भुत चमत्कार असें ह्मणतात. आर्य लोकांच्या मनाची एक वि-

शेष गोष्ट आहे ती ही कीं, तें नेहमीं मूळ सिद्धांताला गांठ घालतें. बारीक सारीक भेदाकडे तें आधीं पहातच नाहीं. वेदामध्यें असा एक प्रश्न केलेला आहे कीं, "प्रत्येक गोष्ट आपल्याला समजेल असें ज्ञान कोणतें?"; आणि ह्याला अनुसरूनच त्यांचे सारे ग्रंथ व शास्त्रें लिहिलीं गेलीं आहेत. त्यांत प्रत्येक गोष्ट जिच्या योगानें समजेल अशा एका गोष्टीचें प्रतिपादन केलें आहे. विश्वाचा खडान्खडा आपणास समजावा, असें जर एखाद्या मनुष्यानें मनांत आणलें, तर त्याला प्रत्येक प्राण्याची, दरोबस्त वाळूच्या कणांची सुद्धां माहिती झाली पाहिजे; आणि त्याला तर अनंत कालही पुरावयाचा नाहीं, आणि तें सारें त्याला समजणेंही शक्य नाहीं. तर तें ज्ञान व्हावें कसें? ही सारी माहिती त्याला समजण्याचा संभव तरी आहे का? योगी असें ह्मणतो कीं, ह्या विशेष स्वरूपांच्या पलीकडे एक सर्वसाधारण स्वरूप आहे; ह्या विशिष्ट कल्पनांच्याही पलीकडे एक गूढतत्त्व आहे. तें तुह्मी समजून घ्या; ह्मणजे सर्व कांहीं तुह्मांस समजेल. वेदांत सांगितलें आहे कीं, अखंड अस्तित्वांत राहणारें एकच तत्त्व आहे. त्याच्याच योगानें हें सर्व ब्रह्मांड चालतें. त्या पूर्णतत्वाचें—परब्रह्माचें—ज्यास ज्ञान झालें, त्यास सर्व ब्रह्मांडाचें ज्ञान झालें. तशाच प्रकारें ह्या प्राणापासून सर्व शक्ति उत्पन्न झाल्या आहेत. ज्याला प्राणाचें ज्ञान झालें, त्याला ब्रह्मांडांतील सर्व शक्तींचें ज्ञान झालें ह्मणून समजावें. मग त्या शक्ति शारीरिक असोत कीं मानसिक असोत. ज्यानें प्राणावर अंमल बसविला, त्यानें आपल्या स्वतःच्या मनावर आणि अस्तित्वांत असलेल्या इतर मनावरही अंमल बसविला ह्मणून समजावें. ज्यानें प्राणावर अंमल बसविला त्यानें आपल्या शरीरावर आणि अस्तित्वांत असणाऱ्या सर्व देहावर अंमल बसविला. कारण, प्राण हेंच शक्तींचें मूळ रूप आहे.

प्राणावर अंमल कसा बसवावा—त्यावर कशी सत्ता चालवावी—ह्याला प्राणायाम हें एक साधन आहे. सारे अभ्यास आणि शिक्षणें तेवढ्याकरितांच आहेत. ह्मणून प्रत्येक मनुष्य ज्या स्थितींत असतो, त्याच स्थितींत त्यानें अभ्यास सुरू केला पाहिजे. आणखी, आपल्या अगदीं जवळच्या ज्या ज्या वस्तु असतील, त्यांच्या त्यांच्यावर सत्ता चालविण्यास शिकलें पाहिजे. आपल्याला अगदीं जवळची वस्तु ह्मणजे हें शरीर. ब्रह्मांडांतील कोणत्याही वस्तूपेक्षां जवळची वस्तु तीच, आणि मन हें सर्वांहून जवळचें. आणि आपल्या मनावर व देहावर कार्य करणारा प्राण, हा ब्रह्मांडांतील इतर सर्व प्राणांहून फार जवळचा आहे. ही लहान प्राणलहरी, जी आपल्याला स्वतःची मानसिक आणि शारीरिक प्रवृत्ति

दाखविते, ती अफाट प्राणसमुद्रांतील आपल्याला अगदीं जवळची लाट आहे. आणि प्रथमतः ह्या लहानशा लाटेवर जर आपला अंमल बसेल, तर आपणा एकट्यालाही सर्व प्राणांवर अंमल बसण्याची आशा आहे. पूर्णत्वाप्रत पोंचलेला योगी, हें सर्व करूं शकतो. त्याच्या प्रभूलाही त्याहून अधिक सामर्थ्य असत नाहीं. तो बहुतेक सर्व शक्तिमान् आणि सर्वज्ञ असा होतो. प्राणावर सत्ता करण्याचा प्रयत्न करणारे पंथ प्रत्येक देशांत असतात. ह्या ( अमेरिका ) देशांतही मानसिक प्रयोग करणारे, विश्वास उत्पन्न करणारे, अध्यात्मज्ञान सांगणारे, ख्रिस्ती शास्त्रास अनुसरणारे, मेसमेरिझम करणारे वगैरे पंथ आहेत. त्या सर्व पंथांचा विचार केला तर, प्रत्येकाच्या मुळाशीं प्राणावर सत्ता चालविणें हेंच तत्त्व आहे. मग तो त्याला माहित असो वा नसो. त्या सर्वांच्या उपपत्ति गाळून काढल्या, तर तळाशीं हेंच शिल्लक राहील. ते ह्याच शक्तीचा उपयोग करितात, पण न जाणतां त्यांना सहजगत्या—चिंतामणीला अडखळल्याप्रमाणें ही शक्ती अकस्मात् प्राप्त होते. पण तिच्यांतील तत्त्व कळत नाहीं. तरी ते, योगी ज्या शक्तीचा उपयोग करतात, त्याच शक्तीचा उपयोग न कळतां सहजगत्या—करतात. ही शक्ति ही प्राणापासूनच उद्भवते.

प्रत्येक प्राणिमात्रामध्यें जीवनशक्ति तो प्राण होय. आणि त्याची अत्युत्कृष्ट व उच्च क्रिया, तो विचार होय; आणि विचाराविषयींच पुन्हा आपण विचार करूं लागलों तर असें दिसून येतें कीं, त्यांतही पुन्हा भेद आहेतच. विचारांमध्येंही जे अगदीं प्राणाच्या मंदक्रियेचे झालेले असतात, त्यांस आपण उपजत किंवा स्वाभाविक विचार असें ह्मणतों. आपल्याला एखादा डांस चावला, तर कोणताही विचार केल्याशिवाय आमचा हात त्याला आपोआप मारतो. हाही एक विचाराचाच खालचा प्रकार आहे. शरीरांतील स्वाभाविक होणाऱ्या ज्या क्रिया, त्या ह्या प्रकारच्या विचारानें चालतात. ह्याच्या पुढें दुसरी एक विचाराची उच्च प्रत आहे. ती जाणिवानें करावयाची असते. मी मनन करतों; मी विचार करतों; कोणत्याही गोष्टीचीं साधक बाधक प्रमाणें मला समजतात. परंतु मनन करण्याला तरी एक मर्यादा आहे, हें आपणांस माहित आहे. त्याला एक ठरींव मर्यादा आहे, व तेथपर्यंत विचार जाऊं शकतो. तिच्या पलीकडे त्याला जातां येत नाहीं. ज्या मंडळांत तो धांव घेतो, तें मंडळ खरोखर फारफार संकुचित आहे. तरीही कित्येक सत्य गोष्टी आह्मांस ह्याच मंडळांत सांपडतात. धूमकेतूप्रमाणें कांहीं गोष्टी ह्या मंडळामध्यें अकस्मात् येतात. आमचें चित्त तर

मर्यादेच्या पलीकडे जात नाहीं, आणि त्या तर मर्यादेच्या बाहेरच्या असतात हेंही खचित आहे. ह्या एवढ्याशा मर्यादेंतील जे अद्भुत चमत्कार असतात, त्यांचीं कारणें, ह्या मर्यादेच्या बाहेरचीं असतात. विचार आणि बुद्धि त्यांच्या-पर्यंत पोंचत नाहींत. पण योगी ह्मणतो कीं, हें कांहींच नाहीं. मन ह्याच्याही पेक्षां उच्चपदावर–श्रेष्ठ ज्ञानावर–जाऊं शकतें. ह्या स्थितीला मन येऊन पोंचलें ह्मणजे त्याला समाधि असें ह्मणतात. पूर्ण एकाग्रता–परमज्ञान–ह्यामध्यें मन हें विचार-मर्यादेच्याही पलीकडे जातें. आणि ज्या गोष्टी विचारानें, किंवा उपजत बुद्धीनें कळणाऱ्या नव्हेत, त्या त्याच्यापुढें प्रत्यक्ष येऊन उभ्या राहतात. शरीरांतील सूक्ष्म-शक्ती नीट रीतीनें उपयोगांत आणिल्या आणि प्राणांच्या निरनिराळ्या स्वरूपांना जर नीट वळण लावलें, तर तीं मनाला पुढें ढकलतात, आणि तें मग उच्च स्था-नावर चढतें, आणि तेथें शुद्ध ज्ञानास पोंचून तेथून सर्व कार्यें करतें.

ह्या ब्रह्मांडामध्यें प्रत्येक व्यक्तीचा आपआपल्या कोटीशीं अखंड संबंध असतो. बाह्यात्कारदृष्टया सारें ब्रह्मांड एकच आहे. आपल्यामध्यें आणि सू-र्यामध्यें कांहीं भेद नाहीं. ह्याच्या उलट बोललें तर, शास्त्रज्ञ लोक त्याला कांहीं तरी भाकड कथा ह्मणेल. तसेंच टेबल आणि मी, ह्यांच्या मध्येंही खरोखर कांहीं भेद नाहीं. टेबल हा जडत्वाचा बिंदु आणि माझा देह हा दुसरा बिंदु आहे इतकेंच. हे सर्व आकार, जडतत्वांच्या अफाट समुद्रांतील भोंवऱ्याप्रमाणें दिस-तात, आणि तसेच ते अस्थिर असतात. ज्याप्रमाणें एखाद्या नदीच्या प्रवाहांत लक्षावधि भोंवरे फिरत असावेत आणि तो प्रत्येक भोंवरा गर गर गर फिरून प्रतिक्षणीं नवा बनतो, आणि दुसऱ्या बाजूनें बाहेर पडतो व नवे पाण्याचे परमाणू आंत घुसतात, त्याप्रमाणें हें ब्रह्मांड प्रतिक्षणीं जडतत्वें बदलित असतें. त्यांपैकींच आह्मी हे लहानसे भोंवरे आहोंत. जडतत्वांचा समुदाय आह्मांमध्यें शिरतो; गर गर गर फिरतो; थोडा काल मनुष्यदेहांत गिरकी खातो; आणि मग पुन्हा बदलून दुसऱ्याच आकारानें–समजा पशू–फिरून खनिज पदार्थांच्या गोळ्याच्या रूपानें पुन्हा भोंवरा होतो. हा नित्याचाच फेरफार आहे. एकही शरीर शाश्वतचें नाहीं. शाश्वतची अशी कोणतीच वस्तु नाहीं. माझें शरीर, तु-मचें शरीर हा सारा शाब्दिक प्रकार. हे फक्त जड पदार्थांचे एक एक गोळे आहेत. चंद्र, सूर्य, मनुष्य, पृथ्वी, वृक्ष, धातु हे सुद्धां एक एक गोळे होत, पण ह्यांतील एकही शाश्वतचें नव्हे. तर प्रत्येक पदार्थ बदलतो आहे. रूपां-तर होतें आहे. जड द्रव्याचा नेहमीं संयोग आणि पृथक्करण चालू असतें.

मनाची गोष्टही तशीच. प्रत्येक जड पदार्थ ईथरचा बनलेला असतो. जड पदार्थांवर प्राणांची क्रिया झाल्यावर त्यांचेच निरनिराळे पदार्थ बनतात हें सांगितलेंच आहे. हीच क्रिया अति सूक्ष्म रीतीनें व अति वेगानें होऊं लागली म्हणजे त्याच ईथरचें मन बनतें, व म्हणून ह्या मनाचा प्रत्येक विश्वांतील पदार्थाशीं (जड पदार्थ तितके ईथरचेच असल्यानें) संबंध असतोच. ती सूक्ष्म क्रिया यत्किंचित् जरी तुम्हांस प्राप्त होईल, तरी तुम्हांला समजेल व वाटेल कीं, हें सर्व ब्रह्मांड त्याच सूक्ष्म चलनानें बनलेलें आहे. कधीं कधीं कांहीं औषधांच्या आंगीं असा गुण आढळून येतो कीं, त्याच्या योगानें ज्ञानमार्गाच्या द्वारें आम्हांस त्या स्थितीला पोंचतां येतें. आपल्या पैकीं पुष्कळांना सर हम्फ्रे डेव्ही ह्याच्या प्रयोगाची आठवण असेलच. तो वाजवीपेक्षां फाजील हास्यजनक वायु पोटांत जाऊन व्याख्यान देतांना मूर्च्छा येऊन पडला, आणि सावध झाल्यावर म्हणाला कीं 'सारें ब्रह्मांड कल्पनामयच होऊन गेलें होतें.' कारण, तेवढ्या वेळांत जड लहरी बंद पडल्या होत्या, आणि सूक्ष्म लहरी ज्यांना त्यानें मन असें म्हटलें; तेवढेंच ठिकाणावर होतें. त्याच्या सभोंवार असलेल्या सूक्ष्म लहरी मात्र त्याला दिसत होत्या. प्रत्येक वस्तूला विचार आहे. आणि सर्व ब्रह्मांड हें विचाराचा समुद्र आहे. तो किंवा दुसरा कोणीही थोड्याशा विचाराच्या भोंवऱ्यांत सांपडतोच.

अशा प्रकारें विचारब्रह्मांडामध्यें आपणांस ऐक्य दिसून येतें, आणि सरतेशेवटीं आम्ही जेव्हां मूळ स्वरूपास पोंचतों, तेव्हां आपणांस कळून चुकतें कीं, आत्मस्वरूप (व्यक्तिमात्रांत काय तो भेद पण आत्मा एकच) हेंही एकत्र असूं शकतें. चैतन्याच्या पलीकडे आहे असा काय तो एक. व्यक्त झालेल्या चैतन्यामध्यें सुद्धां एक ऐक्य असतेंच. ह्या सत्य गोष्टी कधींही लयास जावयाच्या नाहींत. कारण, अर्वाचीन शास्त्रांनीं त्या सप्रमाण सिद्ध केल्या आहेत. अर्वाचीन पदार्थविज्ञानानें सुद्धां असें सिद्ध करून दिलें आहे कीं, ब्रह्मांडांतील यच्चयावत् व्यक्त व अव्यक्त शक्तींची गोळाबेरीज ही ठरींव असते म्हणजे कधीं बदलत नाहीं. त्यानें असें सिद्ध केलें आहे कीं, झाडून साऱ्या शक्ती दोन प्रकारच्या असतात. एकदां ती आच्छादलेली, संकुचित आणि स्तब्ध अशी असते, आणि पुन्हा ती क्रियारूपानें व्यक्त होते. अशा प्रकारें अनंत कालपर्यंत त्या व्यक्त व अव्यक्त होत असतात. ह्या प्राणावर पूर्वी सांगितल्याप्रमाणें अंमल चालविणें ह्यालाच प्राणायाम असें म्हणतात.

प्राण ताब्यांत ठेवण्याची संवय लावणें, ह्याशिवाय श्वासोच्छ्वासाशीं प्राणायामाला कांहींच कर्तव्य नाहीं. मनुष्यदेहांत प्राणाचें अतिशय स्पष्ट स्वरूप ह्मटलें ह्मणजे फुप्पुसाची हालचाल हें होय. ती आटपली कीं, देह आटोपला; ही थांबली कीं, शरीरांतील शक्तींचीं स्वरूपेंही थांबलींच. कितीएकांनीं अशाही रीतीचा अभ्यास केलेला असतो कीं, ही हालचाल थांबली तरी शरीर वांचतें. कितीएक लोक असे आहेत कीं, ते कितीएक महिने आपणा स्वतांला पुरून घेतात, आणि श्वासोच्छ्वासावांचूनही जगतात. परंतु साधारण मनुष्यांच्या शरीरामध्यें ही फुप्पुसांची गति मुख्य आहे. अत्यंत सूक्ष्मपणाला पोंचावयाचें, तर आपणांस अधिक जडाची मदत घेतली पाहिजे. आणि मग आह्मांला आपला अतिसूक्ष्माचा पल्ला गांठीपर्यंत, हळू हळू प्रवास केला पाहिजे. शरीरांतील सर्व शक्तींमध्यें प्रमुख शक्ति ह्मटली ह्मणजे फुप्पुसाची व तीच इतर सर्वभागांस चालू ठेवणारें उड्डाणचक्र होय. खरोखर प्राणायाम ह्मणजे ही फुप्पुसाची शक्ति आपल्या सत्तेखालीं आणणें. ह्या शक्तीचा श्वासोच्छ्वासाशीं संबंध असतो. श्वासोच्छ्वास कांहीं ती शक्ति उत्पन्न करीत नाहीं. तर उलट तिच्यापासून मात्र श्वासोच्छ्वास उत्पन्न होतो. ही गति बंबाच्या कृतीनें हवा आंत ओढून घेते. प्राण फुप्पुसें हालवितो, आणि फुप्पुसाची गति हवा आंत ओढून घेते. ह्मणून प्राणायाम हा कांहीं श्वासोच्छ्वास नव्हे. तर फुप्पुसाला हालविणाऱ्या स्नायूंच्या शक्तीवर सत्ता चालविणें; आणि जी ज्ञानतंतूच्या द्वारें स्नायूंत शिरते; स्नायूंतून फुप्पुसांत जाते, आणि त्यांना एका विवक्षित रीतीनें हालविते, ती स्नायूची शक्ति हाच प्राण. तो प्राणायामाचा अभ्यास करून आह्मांस ताब्यांत आणला पाहिजे. हा जेव्हां ताब्यांत येतो, तेव्हां आपणांस लागलेंच कळून येतें कीं, शरीरांतील इतर सर्व प्राणांच्या क्रिया हळू हळू आपल्या ताब्यांत येऊं लागतील. मीं स्वतः असे मनुष्य पाहिलेले आहेत कीं, त्यांनीं शरीरांतील सर्व स्नायु आपल्या ताब्यांत आणलेले होते. आणि कां येऊं नयेत? एखाद्या विवक्षित स्नायूवर जर मला सत्ता चालवितां येते, तर शरीरांतील प्रत्येक स्नायूवर व सर्व ज्ञानतंतूवर ती कां चालू नये? ह्यांत असंभाव्य तें काय? सांप्रत ती सत्ता नाहींशी झाली आहे आणि गतिही कुंठित झाली आहे. आमच्या इच्छेप्रमाणें आह्मांस कान हालवितां येत नाहींत. पण जनावरांना ते हालवितां येतात. ती शक्ति आह्मांला नाहीं. कारण, आह्मी त्याचा अभ्यास करीत नाहीं. कुलसांसर्ग ह्मणतात तें ह्यालाच.

आणखी आपणांस माहीत आहे कीं, गुप्तशक्ति असते ती परत व्यक्त रूपास आणतां येते. अतिशय परिश्रमानें आणि अभ्यासानें शरीरांतील कितीएक अतिशय गुप्त असणाऱ्या शक्ती परत सत्तेमध्यें आणतां येतात. अशा रीतीनें विचार केला तर त्यांत असंभाव्य असें कांहीं नाहीं असें आढळून येतें. इतकेंच नव्हे तर, शरीरांतील हरएक भाग, पूर्णपणें आपल्या सत्तेंत आणतां येतो. हें योगी, प्राणायामाच्या योगेंकरून करतो. आपणांपैकीं कित्येकांनीं कदाचित् अशा ग्रंथांतून वाचलेंच असेल कीं, प्राणायामामध्यें श्वास आंत घेतांना आपण आपलें सर्व शरीर प्राणानें भरलें पाहिजे; आणि इंग्रजी भाषांतरामध्यें प्राण ह्मणजे श्वासोच्छ्वास असें ह्मटलें आहे. तेव्हां हें कसें करावयाचें? अशी आपणांस शंका येईल असें आपण विचाराल, पण तो दोष भाषांतरकर्त्याचा आहे. शरीराचा प्रत्येक भाग, प्राणानें—ह्या जीवतत्त्वानें—भरतां येतो. तें आपणांस येऊं लागलें ह्मणजे सर्व शरीरावरही सत्ता करतां येते. शरीरांत असलेल्या सर्व व्याधि व दुःखें ह्यांजवर पूर्ण रीतीनें सत्ता चालवितां येते. इतकेंच नव्हे, तर दुसऱ्याच्या देहांतील व्याधि व दुःखें ह्यांवरही पूर्ण रीतीनें सत्ता चालवितां येते. जगांतील प्रत्येक वस्तु सांसर्गिक आहे. मग ती चांगली असो किंवा वाईट असो. तुमचें शरीर जर एखाद्या विकारानें व्याप्त झालेलें असेल, तर तोच विकार दुसऱ्याच्या देहामध्यें उत्पन्न करण्याचा त्यास धर्म येईल. तुह्मी जर धट्टेकट्टे व निरोगी असाल, तर तुमच्या जवळ असणारे सुद्धां धट्टेकट्टे व निरोगी होऊं शकतील. तसेंच तुह्मी जर अजारी व अशक्त असाल, तर तुमच्या सभोंवतीं असणारेही तसेच होतील. तुमची आरोग्याची लहरच जणूं काय तुह्मीं दुसऱ्याच्या शरीरांत घातल्यासारखें होईल. एक मनुष्य दुसऱ्या मनुष्यास आरोग्य करण्याचा प्रयत्न करील, तर पहिलें काम हें कीं फक्त आपली आरोग्यता त्यांत घालावी. निरोगी होण्याचा पहिला प्रकार हा आहे. जाणून ह्मणा, किंवा न जाणून ह्मणा, आरोग्यतेची अदलाबदल करतां येते. अतिशय सशक्त मनुष्य जर अशक्ताच्या सहवासाला राहील, तर तो पहिल्यापेक्षां सशक्त होईल. मग तें त्याला कळो वा न कळो. कळून होईल तर, ती क्रिया लौकर आणि विशेष चांगली होईल. आणखी दुसरा एक प्रकार आहे. त्यामध्यें एखादा मनुष्य स्वतः मोठा धट्टाकट्टा असतो असें नाहीं. तरी तो दुसऱ्याची प्रकृति चांगली आरोग्य करीत असलेला आपण पहातों. असें असतें तेव्हां पहिल्या मनुष्याची प्राणावर सत्ता अधिक असते, ह्मणून तो त्या वेळीं आपल्या प्राणाला ह्या विवक्षित हलकाव्याच्या स्थितीपर्यंत आणतो, आणि मग ती स्थिती तो दुसऱ्याला देतो.

कितीएक प्रयोग असेही झालेले आहेत कीं, ते बऱ्याच अंतरावरून होतात. कारण, मध्यें मुळींच खंड नसल्यामुळें अंतर असून नसल्यासारखेंच होतें. खंड पडलेलें असें अंतर आहे कोठें? सूर्यामध्यें आणि तुमच्यामध्यें कांहीं खंड–तूट आहे काय? जडतत्त्वाची भली मोठी एक रास आहे. तिच्या एका टोंकाला सूर्य आहे, आणि दुसऱ्या टोंकाला तुह्मी आहां. नदीच्या एका भागामध्यें आणि दुसऱ्या भागामध्यें कधीं खंड असतो काय? मग एखाद्या शक्तीनें तरी प्रवास कां करूं नये? तसें होण्याला विरुद्ध प्रमाण कांहीं दिसत नाहीं. हा प्राण पाहिजे.तितक्या अंतरावरून प्रवास करूं शकतो, ह्या गोष्टी अगदीं सत्य आहेत. पण एक गोष्ट खरी असल्यास त्यांत शेंकडो खोट्या असतात. ही गोष्ट जितकी सोपी वाटते, तितकी सोपी नाहीं; बरें करण्याच्या प्रकारामध्यें हें दिसून येतें कीं, बरें करणारे लोक नेहमीं स्वाभाविक शरीरस्वास्थ्याचा फायदा घेतात. जगामध्यें असा कोणताही रोग नाहीं कीं, जो दरोबस्त मनुष्यांचा फडशा पाडील. महामारीसारख्या सांतीमध्यें सुद्धां प्रथम प्रथम शेंकडा ६० मरतात. मग तें मान कमी होत होत ३०।२० वर येऊन बसतें, आणि बाकीचे बरे होतात. एखादा आलोपाथिक डाक्टर येऊन त्याला पाहतो; आणि तो त्यास आपलें औषध देतो. होमोपाथिक येतो, आणि तो आपलें देतो, आणि तो पुष्कळांस सहज बरें करतो. कारण, होमोपाथिक पद्धत ही रोग्याची ढवळाढवळ करीत नाहीं. तर त्याला स्वाभाविक रीत्या बरें होऊं देते. तसेंच श्रद्धा उत्पन्न करून बरा करणारा त्याहूनही पुष्कळांस बरें करील. तो तें सोसण्याला मनाला अधिक शक्ति देईल, आणि रोग्यामध्यें गुप्त असलेला प्राण, श्रद्धेच्या द्वारानें उन्नतीस येईल.

परंतु श्रद्धा बसवून बरें करणारे लोक नेहमीं एक चूक करीत असतात. त्यांना असें वाटतें कीं, विश्वास हाच स्वतः मनुष्याला बरें करतो. त्याच्या एकट्यानें सारें काम झेंपत नाहीं. कांहीं रोगांचीं लक्षणें अतिशय वाइट असतात. तीं हीं कीं, रोग्याला तो रोग झाला आहे असें वाटतच नाहीं. अशी दृढतर रोग्याची श्रद्धा हाच एक रोग व हीच बहुतकरून लवकर मृत्यूची सूचना असते. अशा प्रसंगीं श्रद्धेच्या योगानें गुण येत नाहीं. अशा सर्व प्रसंगांतूनही आपण पार पडूं अशी श्रद्धा उत्पन्न होईल तर, रोगीही बरे होतील. हें सर्व ह्या प्राणानें होऊन खरा गुण प्राप्त होतो. ह्या प्राणावर सत्ता करणाऱ्या पवित्र मनुष्याला त्यास एका विवक्षित हेलकाव्यांत आणतां येतें; आणि त्याला तेच हेलकावे दुसऱ्यांत उत्पन्न करून दुसऱ्यांत पोंचवितां येतो. ही गोष्ट रोजच्या

क्रियेमध्येंही आपल्यास दृष्टिगोचर होते. मी तुमच्याशीं बोलत असतों; तेव्हां मी कोण ह्मणजे मी खरोखर काय करीत असतों? असें ह्मटलें तर चालेल कीं, माझें मन एका विवक्षित हेलकाव्यांत मी आणतों, आणि, त्या स्थितींत आणण्यांत जितकें अधिक मला यश मिळेल, तितका मी ह्मणतों त्याचा गुण तुह्मांवर अधिक होईल. आपणां सर्वांस माहित आहे कीं, मी ज्या दिवशीं अधिक आवेशांत येईन, त्या दिवशीं तुह्मांला अधिक आनंद होईल आणि मी जेव्हां कमी आवेशांत असेन, तेव्हां तितकी तुह्मांस मजा वाटणार नाहीं.

इच्छामात्रेंकरून जगाची घडामोड करणारे असे महात्मे ह्मणजे जगांतील मोठमोठ्या इच्छाशक्तीच होत. ह्यांना आपले प्राण अत्युच्च तऱ्हेच्या हेलकाव्यापर्यंत आणण्याची शक्ती असते; आणि ती इतकी विशाळ आणि बलवत्तर असते कीं, ती एका क्षणांत दुसऱ्यालाही कबजांत आणते. तिच्याकडे हजारों प्राण ओढले जातात, आणि अर्धे जग ते जें काय करतात, त्याचा विचार करीत राहतें. जगांतील मोठमोठ्या भविष्यवाद्यांना प्राणावर सत्ता चालविण्याची अत्यद्भुत शक्ति असते. ती त्यांना विलक्षण इच्छाशक्तीपासून प्राप्त होते. त्यांनीं आपला प्राण गतीच्या उच्चस्थितीला आणलेला असतो. सर्व जगावर अंमल करण्याची जी शक्ति दिलेली असते ती हीच. शक्तींचीं सर्व स्वरूपें ह्याच सत्तेपासून उत्पन्न होतात. त्यांतल्या गुरुकिल्ल्या मनुष्यांस समजत नाहींत; पण ह्याशिवाय दुसऱ्या कोणतेही रीतीनें वर लिहिलेल्या गोष्टींचा उलगडा होत नाहीं. कधीं कधीं तुमच्या स्वतःच्या शरीरांमध्यें प्राणांचा पुरवठा कमी किंवा अधिक होतो आणि समतोलपणा बिघडतो. हा प्राणांचा समतोलपणा ढळला कीं, आपण ज्यास रोग ह्मणतों तो उद्भवतो. त्या ठिकाणाचा अधिक झालेला प्राण कमी केला, किंवा कमी असेल तेथें नवा सामील केला ह्मणजे रोग बरा होतो. शरीरांतील कोणत्या भागावर प्राण प्रमाणाबाहेर जास्त किंवा कमी झाला आहे हें जाणणें ह्याचेंच नांव प्राणायाम. त्या वेळीं ज्ञान हें इतकें सूक्ष्म होतें कीं, मनाला, एखाद्या पायाच्या किंवा हाताच्या बोटावर प्राण कमी आहे कीं अधिक आहे, हें सुद्धां समजतें, आणि तेथें कमजास्ती पुरवठा करण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें. प्राणायामांतील अनेक गुणांपैकीं हेही गुण होत ते क्रमाक्रमानें आणि हळू हळू शिकले पाहिजेत. खरोखर, साऱ्या राजयोगाचा मुख्य उद्देश हा कीं, प्राणाच्या निरनिराळ्या पायऱ्यांतील भेद आणि त्यावर सत्ता करण्यास शिकविणें.

एखाद्या मनुष्यानें आपल्या शक्ती एकत्र केल्या कीं तो आपल्या देहांतील प्राणांचा धनी होतो. जो मनुष्य ध्यान करतो, तोही प्राण एकत्र करूं शकतो.

समुद्राच्या मध्यावर पर्वतासारख्या मोटमोठ्या लाटा असतात. पुढें पुढें लहान लहान लाटा असतात, आणि त्याच्यापुढें त्याहून लहान होत होत, अगदीं सूक्ष्म बुडबुडे झालेले असतात; पण त्या सर्वांना आश्रय एकच अफाट समुद्र. बुडबुडा हा अफाट समुद्राच्या एका टोंकाला जोडलेला असतो, आणि मोठी लाट दुसऱ्या बाजूला जोडलेली असते. त्याप्रमाणें एखादा मोठा भव्य मनुष्य असूं द्या, आणि दुसरा अगदीं लहान बुडबुडा असूं द्या. तरी ते प्रत्येक अफाट चैतन्यसागराला जोडलेलेच आहेत. आणि हाच हक्क जन्मतःच प्रत्येक प्राण्याला मिळालेला आहे. जेथें जेथें ह्मणून जन्म आहे, तेथें तेथें त्याच्या भोंवतीं अफाट चैतन्याचें कोठार भरलेलें आहेच. कांहीं परमाणू—अगदीं सूक्ष्म—फक्त सूक्ष्मदर्शक यंत्रानेंच दिसणारे असे बारिक बारिक बुडबुडे, त्या अफाट चैतन्यसागरांतून सारखे ओढीत, व पहिला आकार बदलीत बदलीत कालांतरानें वनस्पति, मग जनावर, मग मनुष्य आणि सरतेशेवटीं परमेश्वर बनतात. हें प्राप्त व्हावयाला लक्षावधि युगें लागतात; पण युगें ह्मणजे तरी काय ? वेग वाढविला; हालचाल वाढविली; ह्मणजे कालाचें अंतर जोडतां येतें. योगी ह्मणतो कीं, साहजिक जी गोष्ट व्हावयाला दीर्घ काल लागतो, तो क्रियेच्या झपाट्यानें कमी करतां येतो. एखादा मनुष्य ब्रह्मांडांत अस्तित्वांत असलेलें अफाट जडत्वसमुद्रांतील हें चैतन्य हळू हळू आकर्षण करीत करीत जाऊं लागला तर, देव व्हावयाला कदाचित् शेंकडो हजारों वर्षें लागतील; आणि त्याची वरची पायरी होण्याला ५०० सहस्र वर्षें लागतील; आणि पूर्णत्वास पोंचण्याला कदाचित् ५० लक्ष वर्षेंही लागतील. पण त्याचीच वाढ केली तर, हा काल कमी होऊन जाईल मग पाहिजे तितका प्रयत्न केला तर, तीच परिपूर्णता सहा महिन्यांत किंवा सहा वर्षांत प्राप्त होण्याचा संभव कां असूं नये ? त्याला कांहीं मोजमाप नाहीं. तें विचारानें समजतें. एखादें एंजिन अमुक कोळसे घातले असतां, तासांत दोन मैल जातें, तर त्यांत आणखी कोळसा घातला तर त्याहून लौकर जाईल. तशाच रीतीनें आत्मा तरी आपली क्रिया वाढवून ह्याच जन्मांत तरी तेवढा पल्ला कां न गांठील ? सरतेशेवटीं एकूनएक प्राणी ती परिपूर्णता मिळविणार हें आह्मांस माहित आहे. पण हीं लक्षावधि युगें वाट पहात बसणार कोण; तें तत्काल,

ह्याच देहांत, ह्याच मनुष्ययोनींत कां मिळूं नये? तें अपार ज्ञान, आणि अगाध शक्ति आतांच कां आह्मांस मिळूं नये?

योग्याच्या दृष्टीनें जन्माचें सार्थक्य काय तें हेंच, व साऱ्या योगशास्त्राचा रोंख ह्याकडेच आहे. आणि योगशास्त्र हेंच शिकवितें कीं, शक्ती वाढवून काल कमी कसा करावा, सदृश होण्याची शक्ति कशी वाढवावी, आणि तेणेंकरून हळू हळू ह्या टोंकापासून त्या टोंकास जाईपर्यंत आणि सर्व मनुष्यजातीबरोबर आपण परिपूर्ण होण्याची वाट पाहण्याऐवजीं परिपूर्णतेस पोंचण्याचा वेळ कमी करतें. प्राचीन कालचे मोठमोठाले सारे भविष्यवादी, योगी, आणि साधु हे कोण? मनुष्यपणामध्यें राहणारें जें त्यांचें वीतभर आयुष्य, तेवढ्यांत साधारण साधारण मनुष्याला परिपूर्ण स्थितीला पोंचण्याला जो दीर्घ काल लागावयाचा, तो ते नाहींसा करून टाकतात. ह्या जन्मांतच ते स्वतः परिपूर्ण असतात; त्यांना दुसरा कसलाही विचार नसतो. दुसऱ्या कशाकरितांही त्यांना जगावयाचें नसतें. दुसरी कल्पना मनांत आणण्याकरितां एक क्षणही प्राण धरावयाचा नसतो. अशा प्रकारें ते आपला मुक्काम जवळ आणतात. एकाग्रता केल्यानें, सदृशता किंवा क्रिया वाढविल्यानें अशा प्रकारें रस्ता आंखूड होतो, आणि एकाग्रतेनें शक्ति कशी प्राप्त करून घ्यावी, हें राजयोग आपणांस शिकवितो.

पुढें चालू.

---

## प्रश्न.

**गाइस नमुनि रोज तूप साखर सातु चारा. तुज दुःख काय चुकतें? वेग दे. चिनि गाणें मारु. दिवे वात लावा.**

ह्या वाक्यांतील हवीं तीं अक्षरें मागेंपुढें करून मोरोपंतांची एक प्रसिद्ध आर्या करा.

---


PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar at JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

# केरळकोकिळ.

पु० १२] [अं० ५

## लोकोत्तर चमत्कार.

### ऱ्होड्सचा पुतळा.



भूमध्य समुद्रांतील ग्रीक बेटांच्या समुदायामध्यें ऱ्होड्स हें एक अतिशय सुंदर बेट असून त्यांत प्राचीन कालीं नामांकित व्यापारी लोकांची मोठी वस्ती असे. फिजिशियन लोक खेरीज करून ह्यांच्या व्यापाराचा व दर्यावर्दीपणाचा विस्तार फार अवाढव्य होता. प्राचीन कालीं हें बेट ग्रीसच्या राज्यसत्तेखालीं होतें. ग्रीसचें राष्ट्र लयास गेल्यानंतर हीं हल्लींचीं लहानलहान राज्यें त्याचींच झालेलीं आहेत. प्राचीन ग्रीक लोकांचीं शास्त्रें, विद्या आणि कला इतक्या पूर्णावस्थेस आ-

लेल्या होत्या कीं, सांप्रत सर्व युरोप खंडांत पसरलेल्या सर्व विद्यांचा व कलांचा पाया तोच आहे. त्यांचीच विद्या हल्लीं युरोपांतील मुलांस शिकविली जाते; आणि प्रौढ मनुष्यास ती पाहून आनंद होतो. त्यांचे देव कवींना काव्यें करावयाला विषय होतात. त्यांचीं वर्णनें, इतिहास, इमारती हीं लेखकांचें, वक्त्यांचें आणि कुशल लोकांचें साहित्य करतात. त्यांच्या खेळांचे नियम हीच मूळ नाटकाची रचना आहे. तेथील तत्वज्ञान तर परिपक्क दशेस आलेलें होतें. त्यांच्या चित्रकलेचीं कामें हल्लीं फारशीं उपलब्ध नाहींत. तरी, जीं कांहीं थोडींबहुत आढळतात, तीं पाहून हल्लींचे युरोपांतील सुधारलेले शिल्पशास्त्रज्ञही तोंडांत बोट घालतात.

मग ऱ्होड्स बेटावरील लोकांचीं कामें काय विचारावींत? ते लोक इतके शहाणे व कुशल होते कीं त्याची कल्पना होणें सुद्धां अशक्य आहे. त्यांचे दर्यावर्दीपणाचे नियम इतके उत्तम होते कीं, त्यांतील कांहीं कांहींच गोष्टी घेऊन रोमन लोक राहिले नाहींत; तर, त्यांनीं त्या कामांत त्यांचें दरोबस्त अनुकरण केलें. आणि अर्वाचीन लोकांनीं त्यांचाच कित्ता वळविला. ह्या संस्थानची वसाहत सुमारें वीस मैलांची असून त्यांतील बऱ्याच भागांत व्यापारी लोक राहत असल्यामुळें, तेवढा प्रदेश त्यांनीं आपल्या सोयीप्रमाणेंच तयार केला होता. बंदर सुद्धां सर्व समुद्रांतील बंदरांपेक्षां सोयीचें व उंचें होतें. त्याचा आकार दोन शिंगें एकत्र मिळाल्याप्रमाणें असल्यामुळें, त्याचें उत्तम प्रकारें संरक्षण होत असे.

व्यापारामध्यें त्यांची किफायतही फार मोठी होती. ह्यामुळें तेथील लोक फार सुखी असत. पण तत्कालीन श्रीमंत लोकांस निष्काळजी राहण्याचें काम मात्र मोठें कठीण होतें. ह्या एकोणिसाव्या शतकाप्रमाणें मात्र त्या वेळेची स्थिति नव्हती. लढाया, लुटी, दरोडे ह्या तुफानांत नेहमीं गटकळ्या खाव्या लागत. त्या वेळेचा असा एक लेख आढळतो कीं, डिमेट्रियस ह्यानें ह्या ऱ्होड्स लोकांवर हल्ला करून पुष्कळ दिवस त्राहित्राहि करून सोडलें होतें. तत्प्रीत्यर्थ अगणित द्रव्य खर्चीं पडलें, व उभय पक्षांकडेही मनस्वी रक्तपात झाले. त्या संकटसमयीं गरीब अनाथ लोकांस बचावण्याच्या कामीं तेथील श्रीमान् लोकांनीं

बहुत औदार्य दाखविलें. त्याची स्थीरस्थावर झाल्यानंतर पुतळे करण्याचा परिपाठ सुरू झाला, व गुणी मनुष्यांची चहा होऊं लागली. ह्या बंदराच्या आकाराच्या सोयीचें आम्हीं वर्णन केलें खरें; पण ह्या आकार स्वाभाविकापेक्षां त्यांनीं कारागिरांकडून कृत्रिम रीतीनेंच आणलेला फार होता. प्रथम हे दोन खाडीचे फाटे इतके जवळ जवळ आलेले होते कीं, त्यांतून गलबत जाण्याची सुद्धां मारामार पडे. त्याची सर्व त्यांनीं दुरुस्ती केली. ह्याप्रमाणें सर्व स्वस्थता होऊन लोक सुखानें नांदूं लागले, तेव्हां लोकांस पुतळे करण्याचा नाद लागला. त्या कालीं तेथें ३००० शोभायमान मूर्ति व १०० च्यावर मोठमोठाले पुतळे तयार झाले असें सांगतात. ह्याच वेळीं ह्मणजे इ. स. पूर्वी २४४ व्या वर्षी ऱ्होड्स नांवाचा वरील अवाढव्य पुतळा करण्याची कल्पना त्यांच्या मनांत आली. आणि त्याप्रमाणें त्यांनीं तो उभारून जगांतील सप्तचमत्कारांस भर घातली.

हा पुतळा तयार करण्यास जो शिल्पी नेमला होता, त्याचें नांव चार्लेस. हा लिंडस येथील राहणारा. हें शहर त्या वेळीं फार प्रख्यात होतें. हा लिसिप्पस ह्मणून जो प्रसिद्ध विद्वान् होता, त्याचा विद्यार्थी. ह्याच्या बुद्धिकौशल्याचें दुसरें कोणतेंही काम उपलब्ध नाहीं. तरी ह्या एका कामावरूनही त्याच्या बुद्धिमत्तेची सहज कल्पना होते. हा पुतळा त्यांच्यांतील अपोलो देवासारखा होता. पण त्याचा आकार फारच अवाढव्य! ग्रीस लोकांच्या देवतांचीं जीं लक्षणें सांगितलेलीं आहेत, तितक्या लक्षणांनीं तो युक्त होता. खाडीच्या तोंडावर दोहोंकडे ह्मणजे दोन्ही तीरांवर दोन पाय ठेवून त्यास उभें केलें होतें. आकारानें हा पुतळा जरी इतका विशाळ होता तरी, त्याच्यांतील अवयव अगदीं यथाप्रमाण--केवळ रेखल्यासारखे-- होते. त्याची अजस्त्र छाया, समुद्रांतील पाण्यावर एखाद्या प्रचंड राक्षसासारखी कितीतरी मैल लांब पडत असे. ह्या पुतळ्याच्या पाठीवर धनुष्य बांधलेलें होतें. डाव्या हातांत पिसारा लावलेला एक बाण होता, व उजव्या हातांत पेटलेली एक धुपार्ती होती. त्याच्या मस्तकावर सुंदर जटा पसरलेल्या असून गिरिशिखरावर सूर्यकिरण पसरल्याप्रमाणें पाकळ्या विस्तारलेल्या होत्या. हा पुतळा उत्तम जातीच्या पितळेचे पत्रेपत्रे जोडून पो-

कळ तयार केला होता. ह्याची पायापासून मस्तकापर्यंत उंची १०५ फूट होती! त्याच्या दोन्ही पायांतून शिडें न उतरतां, खुशाल गलबतें जात येत असत. ह्या पुतळ्याला सुमारें ७००००० रुपयांचें नुसतें पितळ लागलें! आणि आरंभ केल्यापासून तें सर्व काम शेवटास जावयाला बारा वर्षें लागलीं.

ह्या पुतळ्याच्या उंचीचें साधारण अनुमान ह्मणजे त्याच्या पुढें मुंबईंतील मोठमोठाल्या इमारती सुद्धां कांहीं नव्हेत. ह्यावरून -होड्स बेटावरील अपोलोची कल्पना करावी. हा पुतळा आंतून पोकळ असून त्यांत वर चढण्यासाठीं जिना केलेला होता. त्यावरून त्याच्या मस्तकावरही जातां येत असे. त्याच्या गळयाभोंवतीं आरसे बांधलेले होते. त्यांतून सूर्याचे किरण फार दूरदूर अंतरावर परावर्तन होत, आणि लांबीच्या गलबतासही ह्या पुतळ्याचा बोध होत असे.

ह्यास उभारून छप्पन्न वर्षेंही झालीं नाहींत, तोंच मोठा भूकंप होऊन हा पुतळा उलथून पडला. आणि पुष्कळ अवयव मोडून छिन्नभिन्न झाले. तरी ९०० वर्षें त्याच स्थितींत तो होता. तेव्हां त्याच्या हातांपायांतून जाणें ही सुद्धां पहाणारांस करमणूक होत असे. त्याच्या पायाचा एक आंगठा मोडला होता. ती एक मोठी गुहाच आहे असें वाटे. आणि त्यांत दगडाचे व मातीचे ढीग पडलेले दिसत. नंतर रोमन लोकांनीं -होड्स बेट जेव्हां आपल्या ताब्यांत घेतलें, तेव्हां मोडतोड होऊन राहिलेल्या पुतळ्याचें वजन ७२०००० पौंड होतें. तें ओढिसाच्या एका यहुदी व्यापाऱ्यानें ३६००० पौंडांला विकत घेतलें. मध्यंतरीं हा पुतळा दुरुस्त करण्याचें तेथील रहिवाशांनीं मनांत आणून रक्कमही जमविली होती. परंतु ती लफंग्या मनुष्याच्या हातांत पडल्यामुळें तो बेत रहित झाला. आणि तो मोडतोड झालेला पुतळा शेवटीं, वर सांगितलेल्या यहुदी व्यापाऱ्यास विकावा लागला. तें सर्व पितळ नेण्यास, ह्या व्यापाऱ्यास ९९० उंटें लागलीं!!! अशा ह्या अकटोविकट कामापुढें हल्लींचीं हीं तखलोपीं कामें काय होत?

# मलबारवर्णन.

## कोची येथील तिरुमल देवस्थानाचें हायस्कूल.

**मातेव रक्षति पितेव हिते नियुंक्ते**
**कांतेव चाभिरमयत्यपनीय खेदम् ।**
**लक्ष्मीं तनोति वितनोति च दिक्षु कीर्तिं**
**किं किं न साधयति कल्पलतेव विद्या ॥ १ ॥***

पुण्यपत्तनासारख्या विद्यापीठांत, व सुशिक्षित समाजांत 'न्यू इंग्लिश स्कूलासारख्या,' किंवा 'फर्ग्युसन' कॉलेजासारख्या संस्था व्यवस्थित रीतीनें चालल्या, तर त्यांत मोठेंसें नवल नाहीं. परंतु मलबारासारख्या परकीयस्थळीं, मागसलेल्या एका जातीनें अशी संस्था चालविणें, आणि साहेबलोकांना सुद्धां, जिची तरतरी पाहून तोंडांत बोट घालावयास लावणें, ही गोष्ट सामान्य नव्हे, तर खरोखरच तारीफ करण्यासारखी व धन्यवाद गाण्यासारखीच आहे.

कोचीमध्यें जी लोकसंख्या आहे, तींत गौडसारस्वत—किंवा कोंकणी लोक ह्मणून ज्यांस ह्मणतात, त्यांचा भरणा विशेष आहे. हे लोक सुमारें पांचशें वर्षांपूर्वीं, गोमांतकांत पोर्तुगीज लोकांनीं राज्यक्रांति करून बलात्कारानें लोकांस धर्मभ्रष्ट करूं लागले, त्या वेळेस छळाला त्रासून कोची सरकारच्या आश्रयास येऊन राहिले. तेव्हां अर्थातच ह्यांची जन्मभाषा मराठी आहे. पण ती अगदींच प्राचीन आहे. हल्लींच्या गोमांतकांतील भाषेहून ही फार भिन्न. तिला व्याकरण वगैरे कांहींएक नाहीं. केवळ नामशेष मात्र राहिली आहे. पुण्यांतील एखाद्या गृहस्थानें एक वाक्य ऐकिलें तरी, तोंडाकडेच बघण्याची पाळी यावयाची ! ह्मणजे गोमांतकांतील भाषा ही, महाराष्ट्रदेश जवळ असल्यानें कांहींशी सुधरली आहे. आणि ही प्रथमपासून असंस्कृतच राहिलेली आहे. तरी तिच्यांत ज्ञानेश्वरीपैकीं पुष्कळ शब्द व रूपें आढळतात.

---

* मातेप्रमाणें संरक्षण करते; पित्याप्रमाणें हित कथन करते; पत्नीप्रमाणें दुःख हरण करून मनाला रमविते; द्रव्य देते; दाही दिशांला कीर्ति पसरते; अशी ही विद्या, कल्पवल्लीप्रमाणें कायकाय ह्मणून देत नाहीं ?

हे कोंकणीलोक, कोचींत येऊन स्थाईक झाल्यानंतर, त्यांनीं आपल्या अश्रांत श्रमानें व व्यवहारचातुर्यानें चांगला पैसा संपादन करून संपन्न बनले. व त्यांनीं कोची येथें श्रीव्यंकटेशाचें ऊर्फ बालाजीचें देवस्थान स्थापन केलें. ह्यासच 'तिरुमल देवसम्' असें ह्मणतात. 'तिरुमल' हें 'श्रीमत्' ह्याचें रूपांतर आहे. मलबारी भाषेमध्यें 'श्री' च्या ऐवजीं 'तिरु' ह्मणतात, आणि 'मत्' प्रत्ययाचा उच्चार नेहेमीं 'मल्' असा करतात. 'देवसम्' ह्मणजे देवस्थान. तेव्हां अर्थातच 'तिरुमल देवसम्' ह्याचा अर्थ 'श्रीमान् देवस्थान' असा आहे. हें देवस्थान ह्मणजे एक लहानसें राज्यच असून तेथील कारभार एखाद्या राज्यपद्धतीप्रमाणेंच चालतो. शिवाय देवाची गंगाजळीही चांगली संतोषकारक आहे. चार हजारांची नुसती घांट आहे. देवालय बांधण्याचें काम अर्धें झालें आहे; त्यासच दोन कोटि रुपये खर्च होऊन गेला. शिखराला सुवर्णाचे नऊ कळस, सबंध पाचेचा कोरलेला तांब्या; एकलक्ष रुपयांचा सोन्याचा गरुड; लक्षावधि रुपये भांडारांत इत्यादि गोष्टीवरून येथील संपत्तीची बरीच कल्पना मनांत येण्यासारखी आहे. ह्या देवस्थानचा विस्तृत व मनोरंजक इतिहास पूर्वीं केरळकोकिळामध्यें दिला आहे. व त्यांत ह्यासंबंधी बरीच माहिती आलेली आहे. तेव्हां अधिक सांगत बसण्याचें कारण नाहीं.

ह्या देवालयाचें काम चालविण्यास अष्टाधिकारी आहेत. त्यांत श्रीमंत रा. रा. हरी शनै हे एक मुख्य आहेत. त्यांच्याच तंत्रानें सर्व कारभार चालतो. शनै ह्यांस उच्च प्रतीचें शिक्षण मिळालेलें नाहीं, तथापि ते समंजस, सुस्वभावी व शांत वृत्तीचे आहेत. त्यांच्या हाताखालीं रा. रा. नरशिंग प्रभु हे देवस्थानचे म्यानेजर आहेत. हे आपल्या कामांत फार दक्ष असून समाजाच्या उन्नतीकडे ह्यांचें फारच लक्ष्य असतें. ह्यांना महाराष्ट्र आणि मलबारी ह्या दोन भाषा उत्तम प्रकारें अवगत असून कायदेकानूंतही हे मोठे वाकबगार आहेत. ह्मणजे एकंदरींत चतुरस्रता, कारस्थानपणा आणि समाजाची कळकळ, हे सर्वमान्य गुण त्यांच्या अंगीं वसत आहेत. तसेंच रा. रा. जोग पै, वकील ह्मणून एक मोठे सुशील व सत्वस्थ गृहस्थ आहेत. हे इंग्रजी भाषानिपुण असून आपलें काम उत्तम रीतीनें चालवितात.

ह्या वरील त्रिवर्गाच्या मनांत प्रथमतः अशी कल्पना आली कीं, आह्मी जातीनें ब्राह्मण असून आमच्या जातीला दिवसेंदिवस अशी दशा प्राप्त झाली आहे कीं, कित्येक विपद्ग्रस्त लोक हमालीचें काम करून तांदळाचे मुडे, गवताचे भारे व लांकडांचीं ओझीं सुद्धां वाहतात, ही अत्यंत लांछनास्पद गोष्ट आहे. हा सर्व परिणाम आपली जात, विद्येच्या कामीं मागसल्याचा आहे. ह्यासाठीं आपल्या जातींत शिक्षणाचा प्रसार, व विद्येचें दान अगोदर झालें पाहिजे. देवस्थानांतून निरंतर यथेच्छ अन्नदान देऊन सहस्रावधि ब्राह्मणांचा समुदाय पोसला जातो, पण विद्यादानाकडे कोणीच लक्ष्य पुरवीत नाहीं, हें ठीक नाहीं. हा विचार मनांत आणून अशा प्रकारचें एक 'ॲंग्लो-व्हर्न्याक्युलर' स्कूल आपल्या विशिष्ट जातीकरितां स्थापन करावें, अशा विचारास लागले. ह्या लोकोपयोगी कार्याला देवस्थानांतून मदत होईल हें खरें; पण त्यास फंडाचेंही सहाय पाहिजे. तेव्हां फंड जमा करणें हीच काय ती मोठी गोष्ट. जे लोक विद्येंत मागसलेले असतात, त्यांस विद्येची अभिरुचि नसते. ते धर्मभोळेपणानें ह्मणा–किंवा चैनीखातर ह्मणा–भलत्याच कामाकडे हजारों रुपये उधळून टाकतील, पण शिक्षणप्रसारासारख्या सत्कार्याकडे एक दमडी खर्च करावयाचे नाहींत. तेव्हां अशा लोकांचीं मर्मे वळविण्याचें काम किती चतुराईचें आहे हें सांगणें नकोच. परंतु ह्या त्रिवर्ग सद्गृहस्थांनीं महत्प्रयासानें तेंही काम तडीस नेऊन फंड उभारला, आणि लहानशी शाळा, एका लहानशा इमारतींत सुरू केली; व रा. रा. जोग पै ह्यांस तिचे म्यानेजर नेमलें. हे गृहस्थ त्या संस्थेचें बाल्यावस्थेंतील कामही, आपलें काम सांभाळून व्यवस्थित रीतीनें व परोपकारबुद्धीनें पहात असत.

अशा रीतीनें सारस्वतांनीं प्रथमतः सरस्वतीरूप कल्पवृक्षाचें बीजारोपण केलें. त्यास आजमितीस सुमारें पांच सहा वर्षे झालीं. तो उत्तरोत्तर जोमास लागून त्यास कोमल पालवी फुटूं लागली. व ह्या वर्षीत तर त्यास फुलोरा येऊन मोहर गजबरला आहे. त्याच्या शीतल छायेचा उपयोग अनेक लोक घेत आहेत; व त्याचा कीर्तिसुगंध दशदिशांला भरत चालला आहे. कोणत्याही संस्थेची स्थापना सुमुहूर्तावर झाली, ह्मणजे तिला अनुकूल असे योगायोग आपोआप जुळून येतात. त्या-

प्रमाणेंच ह्या शाळेची गोष्ट झाली. प्रथमतः ही शाळा एका लहानशाच इमारतींत असून तींत सुमारें शंभराच्या अदमासानें मुलें असत, व चारपांचच शिक्षक असत; व तेही सामान्यच इंग्रजी ज्ञानाचे असत. मागच्या वर्षी डाक्टर अप्पाराव ह्या नांवाचे त्यांच्याच जातीचे एक विद्वान् गृहस्थ कलिकोटाहून कोचीस खासगी डिस्पेन्सरी काढावी ह्या उद्देशानें आले. त्यांची हुषारी व तरतरी पाहून श्री. हरी शनै व नरशिंग प्रभु ह्यांनीं 'आपण आपलें वैद्यकीय काम सांभाळून आमच्या देवस्थानच्या शाळेच्या व्यवस्थेचें काम सांभाळावें' ह्मणून विनंति केली. ती विनंति त्यांनीं मोठ्या आनंदानें मान्य करून ते काम पहावयास लागले.

मिस्तर अप्पाराव हे ह्या शाळेचे म्यानेजर झाल्यापासून तिचें स्वरूप अगदींच बदलून गेलें. ज्या शाळेंत पूर्वी शंभर मुलें होतीं, त्याच शाळेंत मुलांचा नंबर हल्लीं २९१ ह्मणजे तीनशेंच्या जवळ जवळ झाला आहे. ज्या शाळेंत पूर्वी अवघे तीन चार शिक्षक होते, तेथें आतां १७ शिक्षक आहेत. त्यांपैकीं ४ म्याट्रिक्युलेशनच्या वरचे ह्मणजे एफ्. ए., इंटरमिजियट अशांपैकीं आहेत. पांच म्याट्रिक्युलेट आहेत, व बाकीचे त्यांच्या खालचे आहेत. न्यू इंग्लिश स्कुलाप्रमाणेंच येथील अभ्यासही मोठा झपाट्यानें चालत आहे. ह्या शाळेला सुमारें २५००० रुपये खर्चून फार सुरेख इमारत बांधली आहे, व तींत क्लासांना योग्य अशा सोयी केल्या आहेत. हेड मास्तर, व म्यानेजर ह्यांच्यासाठीं प्रायव्हेट रूम्स केलेल्या आहेत. रसायनशास्त्र शिकविण्यासाठीं हजार पंधराशें रुपयांचीं ऑपरेटस्, केमिकल्स वगैरे आणवून ठेवलीं आहेत. लायब्ररींत सुमारें आठशें रुपयांचे उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. शिवाय मुलांकरितां पशुसंग्रहाचीं चित्रें, नकाशे, ड्रॉइंगचे मॉडेल्स वगैरे विपुल सामानाचा संग्रह केलेला आहे. कपाटें, बांकें, खुर्च्या, फळे, टेबलें वगैरे सामान उत्तम प्रतीच्या सागवानाचें असून सुरेख मांडलेलें असतें. शाळेचें किरकोळ काम करण्यासाठीं तीन शिपायी ठेवलेले आहेत.

डाक्टर अप्पाराव हे म्यानेजरचें काम पाहून शिवाय रसायनशास्त्र शिकवितात, व इतर मास्तर बाकीचे विषय शिकवितात. ड्रॉइंग शिकविण्याचें काम हेड मास्तर करतात. अप्पारावांनीं घालून दिलेले नि-

यम फारच पद्धतवार आहेत. त्यामुळें एकंदर शाळेची शिस्त फार उत्तम दिसते. प्रत्येक शिक्षक आपआपलें काम फार काळजीनें करीत असतो. मिस्तर रंगाप्पा शनै हे हेड मास्तरच्या जागीं आहेत. हेही मोठे चलाख, मेहनती व हुषार आहेत. शाळेंतील एकंदर टापटीप विशेष तारीफ करण्यासारखी असते. कोठें मलिनपणा, अव्यवस्थितपणा, असभ्यता वगैरे बिलकुल दृष्टीस पडत नाहीं. तालीम करण्याची, क्रिकेट, ल्यांटेनीस वगैरे खेळण्याची सोय लगतच केलेली आहे, व ती विशेष सोयीकर करण्याचाही लौकरच विचार आहे. ह्मणजे एकंदरींत ह्या शाळेंतील किंवा हाय्रस्कुलांतील व्यवस्था व अभ्यास ब्रिटिश राज्यांतील सरकारी हायस्कुलाप्रमाणें बरोबर, किंवा त्याहून कांकणभर अधिक व्यवस्थित चालला आहे. ह्मणून त्याबद्दल अभिमान व भूषण वाटणें हें अगदीं साहजिकच आहे.

प्रस्तुत विद्यालयांत आमच्या मतानें एक मात्र उणीव आहे. ती ही कीं, ह्या सारस्वत जातीची जन्मभाषा मराठी असून, तिच्यांतील एक शुद्ध वाक्य त्यांस बोलतां येऊं नये, व कळूं नये, व त्या भाषेंत अपरंपार ग्रंथसंग्रह भरलेला असतां, त्यांतील रसास्वाद यत्किंचित्-ही त्यांस चाखावयाचें सामर्थ्य असूं नये ही अत्यंत दिलगिरीची गोष्ट आहे. मोरोपंत, वामन, रामदास, तुकाराम, ह्यांची किंवा त्यांच्या अद्भुत काव्यचातुर्याची त्यांस कल्पनाही नाहीं. प्रस्तुतकालीं त्यांच्या स्वभाषेची स्थिति ह्मणजे 'एक धड ना भाराभर त्या चिंध्या' अशापैकींच आहे. इंग्रजी भाषेमध्यें कितीही आपले मनुष्य प्रवीण झाले, तरी ती त्यांस जन्मभाषेप्रमाणें येणें दुरापास्तच होय. मलबारी भाषा ही परकी असून शिवाय अपुर्ती; आणि जन्मभाषा जी त्यांची मराठी, तिचा आणि त्यांचा छत्तिसाचा आंकडा! तेव्हां त्यांस सहजच 'धड ऐल ती-र ना पैलतीर' असें होऊन गेलें आहे. त्यांस जर एक वेळ महाराष्ट्र क-वींच्या काव्यामृताची गोडी लावून दिली, तर ते हांहां ह्मणतां त्यांत प्रवीण होतील; आणि इतकें करण्याला फारसे श्रमही नकोत. शाळेंत शुद्ध महाराष्ट्र भाषेचें प्रत्यहीं तास किंवा दोन तास शिक्षण दिलें ह्मणजे रग्गड होईल. श्री. रा. हरी शनै, व रा. रा. नरशिंग प्रभु ह्यांच्या म-नांत हा विचार पूर्वीपासून असल्याचें आह्मांस माहित आहे. मग तो

हलींच कां मागें पडला समजत नाहीं. हलींचे म्यानेजर डाक्टर अप्पाराव तरी ह्या गोष्टीचा नीट विचार करून महाराष्ट्र भाषेवर कृपा करतील अशी दृढतर आशा आहे.

असो. ह्या हायस्कुलचा वार्षिक बक्षिससमारंभ गेल्या मे महिन्याच्या ३० तारखेस मोठ्या थाटानें झाला. नामदार जे. डी. रीस, सी. एस्. त्रावणकोर व कोचीचे रेसिडेंट ह्यांनीं अध्यक्षस्थान सुशोभित करून स्वहस्तें मोठ्या आनंदानें मुलांस बक्षिसें वांटलीं. आदल्या दिवशीं गांवांतील श्रीमान्, विद्वान् व सभ्य गृहस्थांस म्यानेजर साहेबांकडून छापील निमंत्रणचिठ्या गेल्या होत्या. त्याप्रमाणें सर्व मंडळी मोठ्या थाटानें विद्यालयांत जमूं लागली. विद्यालयामध्यें सर्व तयारी उत्तम प्रतीची केली होती. सर्व शिपाई लोक पट्टे वगैरे घालून तयार होते. मुलें नवे पोषाख घालून आपआपल्या स्थानांवर उत्सुकतेनें वाट पहात बसलीं होतीं. म्यानेजर साहेब, हेड मास्तर, व इतर शिक्षक लोकही "फुल्ड्रेस" करून व्यवस्था ठेवण्यांत, स्वागत करण्यांत गुंतले होते. सायंकाळीं सहा वाजण्याच्या सुमारास नामदार रेसिडेंट साहेबांची स्वारी येऊन दाखल झाली. प्रथमतः म्यानेजर साहेबांनीं दाखविलेली शाळेची इमारत, रसायनशाळा, लायब्ररी वगैरे पाहून साहेब बहादुर फार खुष झाले. नंतर स्वारी येऊन स्वस्थानापन्न झाली. तेव्हां सर्वांनीं आनंदाचा जयघोष केला. त्या आनंदाच्या भरांतच सभेच्या कामास सुरवात झाली. प्रथमतः म्यानेजर अप्पाराव ह्यांनीं भाषणास सुरवात केली. त्यांत त्यांनीं गौड सारस्वत ब्राह्मणांचें मूलस्थान बंगाल्यांतील 'त्रिहोत्रपूर' हें होय. ह्यासच हलीं 'तीरहट्ट' असें ह्मणतात. तेथून परशुरामांनीं त्यांस वसाहत करण्यासाठीं गोमांतकांत बोलावून आणलें. पोर्तुगीज लोकांची राज्यक्रांति होईपर्यंत ते तेथेंच होते. पुढें पोर्तुगीज लोकांच्या धर्मभ्रष्टपणास त्रासून सुमारें पांचशें वर्षांपूर्वी ते कोचीच्या महाराजांच्या आश्रयाखालीं कोचीस वसाहत करून राहिले; व आपल्या निढळच्या घामाच्या पैशावर उदयास येऊन त्यांनीं हें देवस्थान स्थापन केलें. परंतु पाश्चात्य विद्येमध्यें ते आजपर्यंत मागसलेले आहेत. त्यांची उन्नति करावी ह्यासाठीं ह्या संस्थेची स्थापना झालेली आहे; इत्यादि पीठिका निवेदन केली. त्याच्या अभिनंदनार्थ सर्वांनीं टा-

ळ्यांचा गजर केला. नंतर हेड मास्तर मि. रंगाप्पा शनै हे उठले; व त्यांनीं शाळेचा रिपोर्ट वाचून दाखवून तिची प्रगति व इत्थंभूत स्थिति ह्यांचें वर्णन केलें, व पुढें तिचा रोंख कोणीकडे वळविला जाईल हेंही सांगितलें. त्यांचा रिपोर्ट वाचून झाल्यावर त्यांसही सर्वांनीं आनंदाच्या टाळ्या दिल्या. नंतर साहेब बहादुरांनीं स्वहस्तें मुलांस परमादरानें बक्षिसें वांटलीं, व उत्तेजनपर असें सुरस भाषण केलें. त्याचें समग्र भाषांतर पुढें दिलेंच आहे. अध्यक्षांचें भाषण पुरें झाल्यावर टाळ्यांचा मोठा गजर करून सर्वांनीं मोठा जयजयकार प्रदर्शित केला. नंतर हार, तुरे, गजरे, पानसुपारी, अत्तरगुलाब, होऊन साहेबांची स्वारी ठळक ठळक सभ्य गृहस्थांसमवेत विद्यालयांतून बाहेर पडली. अशा रीतीनें हा समारंभ उत्तम प्रकारें साजरा झाला.

सरतेशेवटीं श्रीव्यंकटेश्वराच्या कृपेंकरून ह्या हायस्कुलाची उत्तरोत्तर भरभराट होवो, व त्याचें कॉलेज झालेलें लोकांच्या दृष्टीस पडो, व त्यांतील विद्वद्रत्नांनीं त्यांचा समाज भूषणभूत होवो, येवढी अपेक्षा बाळगून ह्या लेखाची परिसमाप्ति करतों.

---

# कोची येथील तिरुमल देवसमच्या हायस्कुलांतील बक्षीससमारंभाच्या वेळीं

## त्रावणकोर व कोचीनचे रेसिडेंट नामदार रीससाहेब ह्यांनीं केलेलें भाषण.

मुख्याध्यापक, आणि सभ्य गृहस्थहो,

प्रथमत: आज आपणांस मजकरितां येथें तिष्ठत बसावें लागलें, ह्याबद्दल फार हळहळ वाटते; पण त्या कामीं माझा अगदींच निरुपाय झाला. आपणांस माहितच आहे कीं, महाराणी सरकारच्या हुकुमाप्रमाणें आज दरबार भरून त्यांत येथील महाराजांस पदवीदान केलें जाईल, अशी मला आशा होती; परंतु दुर्दैवानें महाराजांची प्रकृति अस्वस्थ झाल्यामुळें, राजेसाहेबांच्या भेटीकरितां मला राजवाड्यांत जाणें भाग पडलें, आणि आपणांस मजसाठीं खोळंबून बसण्याची

तसदी पडली. पण त्यांत माझा दोष नाहीं. कारण, दुसऱ्या कोणत्या तरी गृहस्थाकडून बक्षिसें वांटाल तर बरें, असें मी आपणांस सांगूनही पाठविलें होतें. तरी, महाराजांची प्रकृति पुष्कळ प्रकारें सुधरत चालली आहे, आणि त्यांची अस्वस्थताही अल्पकालीन आहे, ही एक त्यांतल्या त्यांत आनंदाची गोष्ट आहे. ह्मणून मला जरी थोडा उशीर झाला तरी, मी ही आनंदाची बातमी आणल्यामुळें सुसमयींच आलों असें ह्मटलें पाहिजे. (टाळ्या.) मी जेव्हां ह्या शाळेकडे जाणार ह्मणून राजेसाहेबांस कळविलें, तेव्हां ते ह्मणाले कीं 'ती शाळा चांगली चालली आहे.' आणि तेथील बक्षीससमारंभ मी साजरा करणार हें ऐकून तर त्यांस फार आनंद झाला. त्यांच्या राज्यांत सत्कृत्य करणारे जे जे लोक आहेत, त्यांस ते नेहेमीं उत्तम रीतीनें पारखून ठेवतात; आणि आज माझ्यापाशीं जे त्यांनीं उद्गार काढले, त्यांवरून तर माझी खात्री आहे कीं, त्यांच्या कानावर ह्या विद्यालयाची सत्कीर्ति गेलेली आहे आणि त्याच्यावर त्यांची चांगली कृपादृष्टीहि आहे. तथापि आणखी एक आजच्या ह्या दिवशीं, मी मोठी आनंदाची बजावलेली कामगिरीही आपणांस निदित केली पाहिजे. ती ही कीं, महाराजांच्या पदरीं असलेले संस्कृत पंडित ह्या सद्गृहस्थांस व्हाइसरायसाहेबांकडून आलेली 'महामहोपाध्याय' ही सन्मान्य पदवी, पागोटें, आंगरखा, आणि एक रत्न हें मीं त्यांस आज अर्पण केलें. प्राचीन विद्या शिकण्याची महाराजांस फार आवड आहे; आणि ह्या सन्मानाला त्यांनीं पंडितांचीच निवड केली, हाही त्या गोष्टीचा आणखी एक पुरावा होय. ह्या पुरातन कालापासून चालत आलेल्या कोचीच्या राज्यामध्यें प्राचीन विद्या शिकण्याकडेच पहिल्यापासून विशेष लक्ष्य आहे. तसेंच वास्को डी गामानें येथें पाय ठेवल्यापासून, युरोपियन लोकांचा ममतेनें आदरसत्कार करण्याविषयींही तें प्रसिद्ध आहे. जें जें ह्मणून चांगलें व महत्त्वाचें आहे, तें तें जतन करण्याविषयीं त्यांची कमी उत्सुकता आहे असें कधींच नाहीं. आणखी प्राचीन विद्या व संस्था ह्या त्यांपैकींच होत. सांप्रत धनाढ्य देवस्थानांतील पैसा शिक्षणासारख्या लोकोपयोगी कामांत खर्चीं पडत असलेला दृष्टीस पडूं लागला, ही फारच समाधानाची गोष्ट होय. मला वाटतें सारीं—किंवा निदान त्यांतील बहुतेक—देवस्थानें तरी, अशा स्तुत्य रीतीनें त्यांतील फंडाचा पैसा खर्चीं घालतील तर, धर्मसंपत्तीच्या सद्व्ययाबद्दल घोळत असलेल्या बिकट प्रश्नाचा पुष्कळ अंशानें उलगडा होईल. माझे मित्र नामदार आनंदा चार्लू हे व मी, गव्हरनरजनरलच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें बरोबर काम करित असतांना, जें त्यांचें धर्मसंस्थेबद्-

लचें बील गेल्या वर्षी कौंसिलपुढें आलें होतें, त्याच्या पूर्वींच ते ह्या संबंधानें नेहेमीं बोलत, आणि त्यासंबंधीं बोलून बोलून आह्मीं पुष्कळच वाटाघाट केलेली आहे. त्यांत त्यांचें मतही माझ्याप्रमाणेंच पडे. धार्मिक संस्थेच्या पैशाचा सद्व्यय होत नाहीं, फंडाच्या पैशाची अव्यवस्था होते, येवढेंच नव्हे, तर तो कधीं कधीं भलत्याच कामाकडे खर्च करण्यांत येतो; ही ओरड साऱ्या हिंदुस्थानभर ऐकावयास येते. ह्मणून येथील फंडाचा पैसा समाजांतील लोकांच्या उन्नतीकडे आणि शिक्षणाकडे लागलेला पाहून अतिशय समाधान वाटतें.

रिपोर्टावरून मला असें समजून येतें कीं, ह्या शाळेंत ह्या वर्षीं २९१ हून कमी मुलें नव्हतीं; आणि ही संस्था नीट रीतीनें चालण्यासाठीं, देवस्थानाच्या फंडांतून दरमहा ३०० रुपयांपेक्षां कमी नाहीं, इतका खर्च करण्यांत आला. इतकी सुधारणा किंवा प्रगति कोचीच्या राज्यांत झाली हें निर्विवाद आहे.

ही संस्था मुलांना केवळ शिक्षण देते, येवढेंच नव्हे, तर कित्येक वेळां जरूर पडल्यास त्यांना वाचावयास पुस्तकें देते; घालावयास कपडे देते; आणि खावयास अन्न सुद्धां देते. (टाळ्या) सांप्रतकालीं ह्यापेक्षां अधिक तर्तूद ठेवणें, कोणत्याही संस्थेला कठीणच आहे. आपणांपैकीं पुष्कळ लोक शाळेमध्यें होते; त्या शाळा आपणांकरितांच केलेल्या होत्या; पण दरोबस्त वस्तु पुरविण्याचा कांहीं कधीं त्यांनीं मक्ता घेतलेला नव्हता. (हशा.) आणि मला वाटतें, सर्वसाधारण पद्धत हीच आहे.

मिस्तर अप्पाराव, हे आपला पुष्कळ वेळ खर्च करून, व आपल्या नेहेमींच्या धंद्याला खार लावून घेऊन, ह्या शाळेच्या उन्नतीकडे आणि क्रमाकडे लक्ष्य पुरवितात, असें दिसून येतें. तेव्हां अशा सुप्रसंगीं, त्यांच्या परिश्रमाचेंही अभिनंदन करणें योग्य आहे. (टाळ्या.)

ह्या शाळेंत बहुतकरून हायस्कुलासारखेच वर्ग शिकविले जातात. तेव्हां त्यांतील विद्यार्थी कांहीं दिवसांनीं निःसंशय म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेस पाठवितां येतील. मिस्तर अप्पाराव, आणि त्यांचे सहकारी, ह्यांचीही निःसंशय अशीच आशा असेल. पण म्याट्रिक्युलेशनसाठीं मुलें आज तयार झालीं नाहींत ह्मणून वाईटही वाटावयास नको. कारण, पुष्कळ शाळा अशा आहेत, आणि त्यांतून अनेक उमेदवार परीक्षेसही जातात. ह्मणून आपल्याला ज्या चांगल्या ह्मणून शाळा पाहिजे आहेत, त्या प्राथमिक शिक्षणाच्याच पाहिजे आहेत. बुद्धिमान् आणि चलाख मुलांना शिकविणें सोपें आहे. पण समाजांतील अज्ञानपणा समूळ काढून टाकून त्यांस एफ्. ए., बी. ए. आणि म्याट्रिक्युलेशनसारख्या परीक्षेंत पास

करवून थोरपणास चढविणें, हें अत्यंत लोकोपयोगी, परोपकाराचें आणि दुर्घट असें काम आहे.

देवस्थानाच्या फंडांतून चाललेल्या शाळांमधून संस्कृत अभ्यासाची हयगय न होणें ही गोष्ट स्वाभाविकच आहे. आणि ज्याला हिंदुस्थानांतील प्राचीन भाषांची आवड आहे, आणि जो आपल्याभोंवतीं संस्कृतज्ञ लोक पारखून ठेवतो, अशा राजाच्या कारकीर्दींत त्याच्या राज्यामध्यें त्याची भरभराट व्हावी हेंही साहजिक आहे; आणि मला वाटतें, आपणांपैकीं पुष्कळांस हेंही स्मरण असेल कीं, नामदार गव्हरनरसाहेब कोचीस आले होते, त्या वेळीं श्रीमन्महाराजांच्या अर्न्याकोलमच्या कॉलेजमध्यें त्यांनीं जें भाषण केलें त्यांत, प्राचीन शिक्षणाविषयीं दुर्लक्ष्य केलें नव्हतें, इतकेंच नव्हे, तर संस्कृत अभ्यासाबद्दल फार संतोष प्रदर्शित केला होता. त्यांच्यापेक्षां अधिकारानें पुष्कळ कमी, परंतु तितक्याच निश्चयानें मीही समाधान मानतों. ह्या शाळेचा असलेला उत्तम पुस्तकसंग्रह व तींत शिकविलेलें ड्राइंग, हें पाहूनही मला फार संतोष झाला. ही विद्यालयाची सुंदर इमारत बांधण्यालाही, देवस्थानाच्या फंडांतूनच रक्कम खर्च झालेली आहे. ह्मणून ही संस्था सर्वेच तऱ्हेनें लोकोपयोगीपणांत आणि यशस्वीपणांत आपला झेंडा पुढें फडकावील हें उघड आहे.

आतां शेंकडा किती मुलें पास झालीं वगैरे किरकोळ गोष्टींचा मी विचार करीत नाहीं. ही शाळा ईर्ष्येची असल्यामुळें, तिच्यांतील कामही ईर्ष्येनेंच चालतें. ह्या संस्थेचा मुख्य हेतु, शिक्षणाच्या योगेंकरून एका विशिष्ट जातीची उन्नति करण्याचा, आणि तिचा अनुत्साह घालविण्याचा आहे. ही जात ह्मणजे गौड सारस्वत, किंवा मला जी कोंकणी ब्राह्मण ह्या नांवानें अधिक परिचित ती. हें जातीचें नांव सरस्वतीपासून प्राप्त झालें खरें, पण तें आजपर्यंत निरर्थकच झालें असें दिसतें. कारण, तींतील लोकांनीं उच्च प्रतीच्या शिक्षणा-संबंधानें निरुत्साह दाखविला होता; किंवा ह्या बाबतींत ते मागें पडले होते. पण ते ज्या अर्थीं ह्या पदवीचा उपभोग घेत आहेत, त्या अर्थीं ह्यापुढें तरी त्यांनीं विद्यादेवीचीं श्रेष्ठ मुलें होण्यासाठीं प्रयत्न केला पाहिजे; आणि ह्या संस्थेसारख्या संस्थांच्या मदतीनें ते पुढें आपल्या नामाची सार्थकता करतील अशी आह्मी फार आशा करितों. ही जशी माझी दृढतर इच्छा आहे; तशीच ज्या श्रीमन्महा-राजांना मी नुकताच भेटून ह्या चित्तवेधक समारंभास हजर झालों, त्यांचीही असल्याबद्दल माझी खात्री आहे.

# पुस्तकपरीक्षा.

**अहल्याचरितकाव्य**—हें राव० **हरि मोरेश्वर,** प्रिन्सिपाल, ट्रेनिंग कॉलेज, अकोला, ह्यांनीं करून तें परमादरानें आमच्याकडे पाठविलें, ह्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानून त्यांतील गुणदोषविवेचनास प्रारंभ करतों. 'ग्रंथकाररूपानें लोकांपुढें येण्याचा' प्रस्तुत कवीचा हा 'पहिलाच प्रसंग आहे.' आणि 'संस्कृताचें कांहीं मिश्रण असल्यावांचून काव्याच्या प्रौढपणास किंवा गांभीर्यास किंचित् न्यूनता' येते; व 'यावनी शब्द' मराठी भाषेचेच होऊन बसलेले 'शुद्ध मराठी काव्यांत येण्यास हरकत नाहीं' असें कवीचें मत आहे. शुद्धलेखनासंबंधानें पुरातन कवींनीं जी मोकळीक घेतली आहे, तिचेंच त्यांनीं न्यूनाधिक्येंकरून अनुकरण केलें आहे. ह्यावरून पुढील काव्याची बऱ्याच अंशानें वाचकांस कल्पना होण्यासारखी आहे; आणि हें जुन्या लोकांस तरी प्रिय होईल अशी त्यांस मोठी आशा आहे.

आपलें काम सांभाळून कांहींतरी लोकसेवा करणें, आपल्या जन्मभाषेंतील ग्रंथांत भर घालणें, कवितेसारख्या विषयास हात घालणें, श्रीमती अहल्याबाईसारख्या राजकार्यधुरंधर, साध्वी व पवित्र स्त्रियेच्या चरित्राची निवड करणें इतक्या गोष्टी प्रशंसेस पात्र होत, ह्यांत तिळमात्र शंका नाहीं; व त्याबद्दल प्रिन्सिपालसाहेबांचें आह्मी सर्व महाराष्ट्रीयांनीं अभिनंदन करणेंही योग्यच आहे, व त्याप्रमाणें आह्मी करतोंही.

'शब्द'हीं एक प्रकारचीं पुष्पें आहेत, व 'काव्य' हा त्या पुष्पांचा गुंफलेला हार होय. तो रमणीय होण्याला पुष्कळ गोष्टींकडे लक्ष्य पुरवावें लागतें. पुष्पें नानाप्रकारचीं असतात. कांहीं तांबडीं असतात; कांहीं पांढरीं असतात; व कांहीं पिंवळीं असतात. त्यांची योजना फार शिस्तवारीनें करावी लागते. अर्धा हार सबंध पांढऱ्या फुलांचा, व अर्धा हार सबंध तांबड्या फुलांचा केला, तर विशोभित दिसतो. तींच फुलें कांहीं विवक्षित क्रमानें दोहों बाजूंस सारखीं ओवलीं, तर त्यांची शोभा वृद्धिंगत होते. तसेंच कितीएक फुलांचे देंठ व रचना ही मौजेची असते. उदाहरणार्थ, पारिजातक किंवा बकुळ. ह्या फुलांचे पदर पदर ओवून त्यांचा एकत्र हार केला, तर तो कंठीप्रमाणें शोभतो. कित्येक फुलांचा आकार लांबट असतो, त्यांची योजनाही यथोचित ठिकाणींच करावी लागते. गुलछबूचीं फुलें असलीं तर त्यांचा झुबका हाराच्या मध्यभागावरच आणणें योग्य. तुळशीच्या मंजिऱ्या, पाचेच्या मंजिऱ्या ह्यांची व्यवस्थाही

अशीच. गुलाबाच्या किंवा मोगऱ्यासारख्या नाजुक फुलांच्या हारांत मध्येंच जर एखादें धोतऱ्याचें किंवा भोपळीचें फूल—तेंही फुलाच्याच जातीचें—झाडांपासूनच उत्पन्न झालेलें—येवढ्याच सबबीवर मध्येंच खुपसून दिलें, तर त्या हाराची शोभा काय विचारावी ! हार करतांना दुसरी एक महत्त्वाची गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, फुलें गुंफतांना त्यांच्या आंगास ढका लावतां कामा नये. त्यांचे अवयव—पाकळ्या—छिन्नविच्छिन्न होऊन त्यांतील मुळचें सौंदर्य व सुवास कमी होतां कामा नये. नाहींतर नुसत्या फुलांपेक्षां हारामध्यें सौंदर्य वाढावयाचें एका बाजूस राहून उलट विद्रूपता मात्र यावयाची. फुलें आधीं हातानें पायानें चुरमुडून मग तीं ओवलीं, किंवा तीं उभीं आडवीं कशींतरी ओवलीं तर उपयोग काय ? किंवा मोगऱ्याच्या फुलांमध्यें गुलछबूचीं पुष्पें नीट रीतीनें बसविण्यासाठीं लांब होतात ह्मणून त्यांच्या पाकळ्या छाटून काढल्या तर त्या हाराची बहार काय विचारावी ? हीच सावधगिरी शब्दांसंबंधानें काव्यांत ठेवावी लागते, आणि त्यांतच कवीची कुशलता दृष्टोत्पत्तीस येते.

प्रस्तुत काव्यांत विशेषेंकरून ह्या शब्दरचनेच्या संबंधानें अतिशयच हेळसांड झालेली आहे, हें कळविण्यास मोठी दिलगिरी वाटते. खरें ह्मटलें तर, ग्रंथकर्ते रावसाहेब हे ट्रेनिंग कॉलेजासारख्या महाविद्यालयावर मुख्याध्यापक आहेत. तेव्हां मराठी काव्यांशीं त्यांचा चांगलाच परिचय असला पाहिजे; व्याकरणशास्त्र त्यांस उत्तम अवगत असलें पाहिजे; ते स्वतः रसिक असले पाहिजेत; अलंकारशास्त्राची व शब्दशास्त्राची त्यांस विशेष माहिती असली पाहिजे. असें असतां त्यांचें अपत्य राजबिंडें कां निपजूं नये ? तें तर विद्रूप व अशक्त निपजलें आहे. असें कां ? ह्याबद्दल कांहीं कल्पना चालत नाहीं.

अहिल्याचरितकाव्याची स्फूर्ति, प्रस्तुत कवीस मयूरपंतांच्या केकावलिस्तोत्रावरून झाल्याचें, 'पृथ्वीवृत्ता'वरून व शेवटीं 'मयूरसुत याचितो' ह्या त्यांनीं घातलेल्या संकेतावरून स्पष्ट होत आहे. पण तो भक्तिरसानें थबथबलेला, भाषणचातुर्यानें पक्कदशेस आलेला, शब्दसाहित्यानें रंगास चढलेला द्राक्षांचा घोस कोणीकडे, आणि हा आंबट, चिकानें भरलेला, अर्धकच्चा करवंदांचा घड कोणीकडे ? दोहोंत साम्य ह्मटलें तर अंजीर आणि उंबर इतकेंच आहे. ह्या काव्यांत काठिण्य हा दोष प्रमुखत्वेंकरून भरलेला आहे; आणि तो विशेषेंकरून शब्दार्थांच्या विपर्यासामुळें आणि रूपाच्या बेरूपामुळें किंवा मनसोक्त दडपादडपीनें आलेला आहे; आणि आमच्या मतें हा दोष तर कविप्रसादास केवळ प्रतिकूल

होय. सरळपणा आणि सोपेपणा, हे कवितेचे मुख्य गुण होत. ते प्रस्तुत काव्यांत बहुतेक लुप्तच झाल्यासारखे आहेत. 'कित्येक मित्रांच्या सूचनेवरून कवींनीं 'अर्थनिर्णायक टीपा दिल्या' हें तरी सुदैवच समजावयाचें. नाहींतर 'शाळेंतील अल्प शिकलेलीं मुलें' व 'सामान्य वाचकचसे' काय, पण ह्या काव्याची अर्थमीमासा करणारे विशेष वाचक सुद्धां मिळण्याची पंचाईतच झाली असती.

प्रारंभींचें नमनच पहा बुद्धीला कसें गुंगवून सोडतें तें:—

**अजा धवल लोहिता–सितमयैक माहेश्वरी**
**सरूप विविधा प्रजा उपजवूनि सृष्टी करी ॥**
**तियेस अज एकतो भजभजे न सोडी परी**
**नमोस्तु अपरा अजा तिस न भुक्तभोगे वरी ॥ १ ॥**

कवीच्या अर्थनिर्णायक टीपांच्या साह्यावांचून ह्या श्लोकांतील अर्थाच्या संशोधनाचें काम कोणता बहाद्दर करील तो करो ! हें ह्मणे एका वेदांतील ऋचेचें भाषांतर आहे. ह्मणून त्यास सुलभ करावें, कां सवाई वेद बनवून सोडावें ? 'सरूप' 'भजभजे' 'भुक्तभोगे' इत्यादि पदें, व शेवटच्या 'चरणांतील वाक्यरचना फारच ध्यानांत ठेवण्यासारखी आहे ! आतां उपमाचातुर्याचा मासला:—

**नका पुसुं किमर्थ हो त्यजुनि सार्वभौमा नृपा**
**स्तवाच अबला बळें कुटिल मांडलीकाधिपा ।**
**हल्या स्तविति कीं वदा जरि असे भला लठ्ठ तो**
**परी सुरभि वानिती पिउनि दुग्ध आकंठ तों ॥ ५ ॥**

सार्वभौम नृपतीला 'भल्या लठ्ठ हल्याची' उपमा ! कवीची कल्पना विशालच खरी ! आणखी शेवटच्या चरणांतील 'तों' चा संदर्भ कोणीकडे लावावयाचा,

---

१ प्रस्तुत काव्याची एका दृष्टीनें मात्र फारच मोठी उपयुक्तता आहे. ती ही कीं 'काव्यप्रकाश' ग्रंथाप्रमाणें महाराष्ट्र काव्यांतील दोषविवेचनात्मक ग्रंथ जर कोणीं तयार केला, तर त्यास संस्कृतांतील 'काव्यप्रकाश–' काराप्रमाणें निरनिराळया दोषांचीं उदाहरणें शोधून काढावयास निरनिराळे ग्रंथ पहावयाची तसदी नको. ते सारे दोष ह्या एका 'अहिल्याचरितकाव्यां'त सढळ प्रमाणानें आढळून येतील. ह्याबद्दल तरी राव० शेवड्यांचे कांहीं थोडे उपकार नाहींत ! वर सार्वभौमाला दिलेल्या 'हल्या' च्या उपमेला काव्यप्रकाशामध्यें 'अनुचितार्थत्वदोष' असें ह्मटलें आहे. त्याचें लक्षण 'उपमायां उपमानस्य जातिप्रमाणगतन्यूनत्वं अधिकता वा तादृशी अनुचितार्थत्वं दोषः.' ह्याचें उदाहरण:—

तो ईश्वरास माहित. ! पण कवीची टीप तर पहाः—"पर्यंत, किंवा या शब्दाचा अन्वय 'सुरभि' शब्दांशीं करून याचा 'तर' असा अर्थ करावा." ठीक आहे. मग 'परी'ची नेमणूक कोणीकडे ?

आतां अहल्याबाईंनीं पतीबरोबर सहगमन करण्याची इच्छा दर्शविली, त्या वेळीं सासऱ्याच्या विनवणीचा मासलाः—

**पतीसह करावया गमन चित्त चिंती तिचें॰**
**परी वच न मोडवे श्वशुर दीन मल्हारिचें॰**
**गळां पडुनि तो तिच्या रडुनि गायसा हंबरे**
**बये करिसि उष्णता मज ग वार्धकीं हूँ बरें ॥ ५० ॥**

सुनेच्या 'गळां पडुनि' 'रडुनि' 'गायीसारखा हंबरडा फोडून' सासरे ह्मणतात "बये! ग! मज वार्धकीं उष्णता करिसि बरें हूँ!" केवढा हा करुणरसाचा लोंढा! वार्धक्यामध्यें उष्णता ती कशी काय करावयाची? पण उष्णता करणें ह्मणजे काय, ते ग्रंथकार सांगतात 'सुखदायक थंडी घेऊन जाणें.' 'करावया' ह्या शब्दानें सहगमनामध्यें 'खो' घातला हेही कांहीं सामान्य उपकार नाहींत! सासू व सासरा आणखी करुणा भाकतातः—

आह्मी उभयतां असूं जरठ पांढरीं ताकशीं।

आह्मी 'ताकासारखीं पांढरीं सफेत आहोंत' बरें! ह्मणूनः—

**दया करिं आह्मांवरी सकळिकांस तूं आसरा।**

आणि जगांतील नियम सांगतात—

**सुनेविण कुठें कधीं कवण शोभला सासरा ॥ ५२ ॥**

किती अप्रतिम भाषणशैली ही! पुढेंः—

**तुझेवरि तुझ्यापरी मम शिरीं हि दुःखाचल।**
**बलिष्ठ विभुलालसा शरण तीस जाईं चल।**

तुझ्यापरी तुझ्यावर आणि (माझ्यापरी) माझ्या मस्तकावरही दुःखाचा पर्वत (कोसळला आहे). ह्याकरितां विभु-देवाची-लालसा-इच्छा-बलिष्ठ ह्म॰ बलवान्

---

**चण्डालैरिव युष्माभिः साहसं परमं कृतम्।**
**वन्हिस्फुलिंग इव भानुरयं चकास्ति ॥**

"आपण तर काय बुवा मोठें चांडाळाप्रमाणें साहस केलेंत!! आणि हा सूर्य तर काय अगदीं एखाद्या कोलतीप्रमाणें चकाकतो आहे!"

आहे तिला शरण होईं. होईं ह्मणजे जा. चल, हो पुढें! बसलीस कां आतां? केव्हांही सांगावयाचें तें सरळ शब्दांनीं सांगावयाचें नाहीं. वांकड्या-तिकड्या रस्त्यानें व अपरिचित शब्दांनीं सांगावयाचें, हा ह्या कवीचा नैसर्गिकच गुण आहे! होळकर आणखी सांगतात:—

**न मी असुख भोगण्या क्षणहि राहिं मागें तव।**

ह्मणजे दुःखाला शब्द घालावयाचा तर दुःख घालावयाचा नाहीं, असुख घालावयाचा! पुण पुढील दृष्टांत पहा:—

**प्रसूनगति माळियाविण बरी न बागेंत व॥ ५३॥**

कारण माळ्यावांचून बागेंतील फुलांची स्थिति बरी रहात नाहीं! आतां 'व' ह्मणजे काय? येवढाच प्रश्न राहिला. वाचक सहज ह्मणतील कीं ह्यांत काय अधिक आहे? व ह्मणजे 'आणि' हें ठाऊकच आहे. आतां असा शब्द कवितेंत घालीत नाहींत ती गोष्ट स्वतंत्र आहे, पण नाहीं. अर्थ सुद्धां चुकला. त्याचा अर्थ कवि सांगतात. व ह्मणजे 'अग.'!! कवींनीं आपल्या मनांतील अर्थाच्या टीपा दिल्या, हे फारच मोठे उपकार केले. कारण ते अर्थ दुसऱ्या कोणत्याही कोशांत सांपडावयाचे ह्मणून नाहींतच. ह्या काव्यांत विशेष चमत्कार काय तो शब्दपांडित्याचाच आहे. ह्यास्तव त्याचा वेगळा कोश पुढें देऊंच. तूर्त उपमेची मजा पहा:—

**रविश्वशुर मावळे अवचित प्रवासीं, तशी**
**तदंसिं पडली भली शकटधूर घाली तशी।**
**निजासन तये क्षणीं सुधृतिशक्तिला शोक दे**
**पळे न मुकटा कसा त्वरित पाहिला कीं कदें॥ ६९॥**

ह्या पद्यांत कवीला श्वशुराला सूर्याची उपमा द्यावयाची होती. परंतु समासावरून अर्थ मात्र अगदीं उलट झाला. ह्मणजे रवि हाच कोणी एक श्वशुर! 'तदंसिं' ह्मणजे तिच्या खांद्यावर 'शकटधूर' ह्या गंगाजमनी समासाचें किती ह्मणून वर्णन करावें? शकट ह्मणजे गाडा, हा संस्कृत शब्द; आणि धूर हा आहे निवळ प्राकृत शब्द. ह्या दोहोंचा समास करतां कामा नये. बरें घटकाभर मानलें कीं, गाड्याची धूर तिच्या खांद्यावर भली मोठी पडली; तरी 'राज्य-शकट' अशा तऱ्हेचा कांहीं उल्लेख नको काय? 'घाली तशी' ह्या पदाचा अर्थ कवि सांगतात—"जबरदस्तीनें घातल्यासारखी." हा अर्थ कोणास कळेल? आणि कोणत्या कोशांत सांपडेल? तिसऱ्या चरणांतील स्वारस्याचा माग काढ-

ण्याची मुष्कील पडल्यामुळें, कविनिर्मित टीपेच्या आधारानेंच अर्थ लागतो. तो असा. "आपली जागा त्या क्षणींच धैर्यानें आलेल्या मोठ्या शक्तीला शोक देती झाली." ती कशी? "कदानें पाहिल्यावर मुकटा लगबगीनें कसा बरें पळणार नाहीं?" व:! काय पण दृष्टांत. मारूच खरा! एके दिवशीं आमच्या घरीं सहज एक कद आला, तों सारे मुगटे पळत सुटले, आणि एक जीर्ण होता तो तर मध्यें अडखळूनच पडला! तों त्यानें त्यास आपला उचलून तोंडांत टाकलें, आणि चट्टामट्टा करून सोडला!! खरोखर कदाइतके हिंसक, आणि मुकट्या-इतके भित्रे प्राणी जगांत कोणीही नसतील!! असो. पुढें:-

**सती श्वशुर जीवतां बहुल कारभारा बघी**
**ह्मणूनि नच घाबरे; विपुल संग्रहीं राब-घी ।**
**अहो! हृदयिं हें धरा दुहितृमातृभार्यादिकां**
**सुशिक्षणगदेस द्या; समयिं भीतिला घेति कां? ॥ ७० ॥**

ह्यांत **'बघी'** हें क्रियापदाचें रूप मुळीं चुकीचें आहे. **'बघे'** असें पाहिजे. येवढा द्राविडी प्राणायाम कशाकरितां? तर **'राब–घी'** शब्दांचा यमक साधण्याकरितां! **'राब'** आणि **'घी'** काय पण शब्द! गुलदस्तांतलेच खरे! कठोर, मृदु, परिचित, अपरिचित, स्वभाषा, परभाषा ह्यांचा कांहीं विचार? संस्कृत शब्दांशिवाय जसें गांभीर्य येत नाहीं, तसें यावनी शब्दांवाचून झण-झणीतपणाही येत नाहीं, असें कवीचें मत दिसतें. बरें; "सासरा जिवंत असतांना ती साध्वी पुष्कळ कारभार पहात असे, ह्मणून घाबरत नव्हती. आणि तिच्या संग्रहास हवी तितकी काकवी आणि तूप होतें!" ह्या वर्णनांत खुबी ती काय? पण कवि ह्मणतात:—

'राब–घी' हे शब्द 'संपत्तीचे उपलक्षणभूत होत! उपलक्षणभूत नव्हे, प्रत्यक्ष भूत होत! ह्मणून कवि ह्मणतात–" अहो! मनांत हें धरा कीं, आपली मुलगी, आई, पत्नी वगैरेंच्या हातांत सुशिक्षणगदा द्या ह्मणजे मग प्रसंग पडला असतां त्या भितील काय?" खरोखरच भिणार नाहींत. आह्मी ह्मणतों चिरंजी-

१ ह्या दोषाला 'काव्यप्रकाशा–' मध्यें 'प्रसिद्धिविरुद्धता' असें नांव दिलें आहे. त्याचें लक्षण:—" तथाहि अनुप्रासस्य प्रसिद्ध्यभावो वैफल्यं वृत्तिविरोध इति ये त्रयो दोषाः, ते प्रसिद्धिविरुद्धतां अपुष्टार्थतां प्रतिकूलवर्णतां च यथाक्रमं न व्यतिक्रामन्ति तत्स्वभावत्वात् क्रमेणोदाहरणम्:......"

वांनीं मातोश्रीला गदादान करण्यापूर्वीं नातवांनीं आजीबाईवर आधीं प्रयोग करावा तो बरा! अशा अशा कल्पना, असा असा उपदेश, असे असे दृष्टांत ज्या मस्तकांतून बाहेर पडले, तें मस्तक खरोखरच जाडें असलें पाहिजे. अहल्याबाईवरून स्त्रीशिक्षणाचा नियम काढून मातोश्रींना गदा देण्यास सांगणें, हें तर्कशास्त्र खरोखरच लोकोत्तर आहे, ह्यांत शंका नाहीं.

खालच्या श्लोकार्धांत फारच मौज आहे:—

**सुताधिकृति मानुनी वसन सार्वभौमें दिलें**
**तयें चिर न भोगिलें सुकृतभोग्य भौमेंदिलें ॥**

एक चमत्कार सांगावयास निघावें, तों दुसरेच वाटेवर अडिवतात. असा ह्या काव्यांतला गुण आहे. राज्याधिकाराचीं वस्त्रें, आणि तीं बहुतकरून साडेतीन मिळण्याचा परिपाठ असून प्रिन्सिपालसाहेबांनीं एकच वस्त्रावर बिचाऱ्याची बोळवण केली आहे! इतकें रिडक्शन, व इतराजी कां? तर दुसऱ्या वस्त्राला मात्रागण आपल्या जातींत घेईनात ह्मणून! 'तयें' ही विभक्ति कोण? हें असो. पण '**भौमेंदिलें**' हा प्रॉब्लेम आमच्या वाचकांतील बुद्धिबळवंतांनीं जर सोडविला, तर त्यांची शामत खरी. पण तो प्रत्यक्ष कवीच्या हृदयांत शिरल्यावांचून सुटणार कसा? कवीचें प्रस्तुत शब्दावरील भाष्य पहा कसें मौजेचें आहे तें:—'या शब्दांत 'र' व 'ल' हे सवर्ण असल्यामुळें 'रे'बद्दल 'ले' घातला आहे, 'भौमेंदिरा' ह्मणजे राज्यलक्ष्मी! प्रस्तुत कवींना ग्रंथकाररूपानें लोकांपुढें येण्याचा दुसरा प्रसंग आल्यास त्यांनीं आधीं स्वकपोलकल्पित एक कोश, भाष्य, व्याकरण इत्यादि स्वार पुढें पाठवून मागाहून खासास्वारी बाहेर पडेल तर बरें! नाहींतर टीपारूपी भालदार, चोपदार, प्रत्येक ठिकाणीं खांच, खळगा दाखवितांना किती ह्मणून कंठशोष करतील! ज्या काव्यांत मौजेशिवाय एक चरणही शापतेला सांपडत नाहीं, त्याचे उतारे तरी किती ह्मणून द्यावेत? ह्याकरितां उपमेचेच एक दोन मासले ह्मणून कांहीं चरणांवरच भागिवतों:—

**इजा मग बिजा तिजा जनिं अशी असे वाग् निकी।**
**'करा हरण राज्य हें' मसलती करी राघुशीं।**
**सुगुप्त परि वृत्त तें प्रकटिलें कसें ही घुशीं।**
**न कैक धनदापरी ऋण ह्मणून मागे धना।**

**स्वपाक करण्यास कां बुध सजो विणें इंधना?**
**निसर्ग कुटिला रुचे कवण साधुला ही स्थिती?**
**नको कुतरड्यापरी चघळुरे बुधा अस्थि तीं।**
**समर्थ जरि साह्य ना करिति खास रंग्या फसे।**

राघोबादादाला ठिकठिकाणीं 'राघु' ह्मणणें, नारोपंतांना नारु ह्मणणें, व रंगनाथस्वामींना 'रंग्या' ह्मणण्यांत 'गांभीर्या'ला 'किंचत्‌ही' 'न्यूनता' आलेली नाहीं. कारण, संस्कृत शब्द घातले ह्मणजे झाले! 'प्रकटिलें किती हो ग्रुशीं!' वः! किती सुंदर दृष्टांत हा! आणि वाक्यरचना तरी काय? 'स्वपाक करण्यास कां बुध सजो **विणें इंधना** ?' ह्यांत तर काय बोलणेंच नाहीं. स्वपाक ह्मणजे स्वयंपाक. 'विणें इंधना' ही कोटि त्याहून अजब! आधीं प्रत्यय आणि मागाहून नाम! त्यांत काय आहे? प्रसंगवशात् आगगाडीचें एंजिन मागें जोडतात, पुढें जोडतात, किंवा खंडाळ्यासारख्या बिकट घांटांतून मागें व पुढें दोहींकडेही एंजिनें असतात!! हें सारें चढउतारावर अवलंबून आहे. ह्यांतील फक्त शेवटची 'कुतरड्याची' उपमा लक्ष्यांत ठेवून दुसरी करमणूक हातांत घेऊं.

सामान्य कवि, छंदोभंग करतात, पण तो नजरचुकीनें करतात. इतकें मात्र ह्मणतां येण्यासारखें आहे कीं, चुक्या अगदीं–नियमसूद किंवा यथाशास्त्र व सांगून सवरून केलेल्या आहेत. येवढा धाडसी कवि जुन्या कवींतही कोणी आह्मांस आढळलेला नाहीं! पहा:—

पण हें पडलें जाडें प्रकरण. तेव्हां ह्यांतील सत्ता कांहीं अपूर्व आहे.

**किंवा कवण साधुची सफल पुण्य आशी गणा।**
**किंवा जग विशाल हें सकल रंगभूमी ह्मणा।**

'किंवा' ह्यांतील दोन्हीं अक्षरें दीर्घ आहेत. आणि पृथ्वीवृत्ताला पहिला जगण पाहिजे. त्याचें आद्यक्षर ऱ्हस्व पाहिजे. प्रस्तुत कवीनें तर तो शब्द खेंचून भरलाच. आणि तो देखील एक वेळ नव्हे, पुनःपुन्हा! पण तो तेथें ह्मणतां यावा कसा? ह्याची पडली पंचाईत. ह्यावर रावसाहेब शेवडे युक्ति सांगतात–"सफाईच्या बोलण्यांत जसा उच्चार होतो, तसा करावा." 'किंवा'-ची सफाई ती कशी काय करावयाची? 'किवा' करावयाची होय? पण येवढें

सांगेपर्यंत 'किंवा' शब्द घालावयाला मानेवर कोणीं दगड का ठेवला होता ?

एकंदरींत ह्या काव्यांत कवीचें मनसोक्त वर्तन फारच ध्यानांत ठेवण्यासारखें आहे; आणि तें शब्दरचनेंत फारच उत्कृष्ट रीतीनें स्पष्ट होतें. तें वाचकांस कळण्यासाठीं आह्मांस बराच लांब कोश द्यावा लागणार व तो वाचकांस वाचावा लागणार. तरी त्यांत विशेष करमणूक असल्यामुळें वाचक अव्हेर करणार नाहींत अशी आशा आहे.

प्रथमत: 'जुन्या कवींच्या धर्तीवर' मूळरूपाप्रमाणें शब्द किती शुद्ध आहेत त्यांची मालिका:—

कसुटीस, अजी मित्तिला, वीहिरी, मीरवी, पीशव्या, तीळ, अकल, अमलदार, दखा, गौगावा, दीसे, भृकूटी, घरीति, मूकति, इ० इ० इ०. आतां कांहीं विचित्र रूपांतराचे चमत्कार:—

१ पौष्पीं मर्घीं=फुलांतील मधामध्यें.
२ मिथ्य=मिथ्या.
३ उभ=उभयतां.
४ वासरी=कालवड.
५ ताविज=ताईत.
६ सला=सल्ला.
७ बारमा=बारमाहे.
८ सहूनि=साहून.
९ बुढा=बुड्ढा.
१० स्वका= आपल्या.
११ घोट=घोडे.
१२ कृतिता=कुशलता.
१३ व्यर्थक=व्यर्थ.
१४ गौगवा=गवगवा.
१५ सुत्रधारी=सूत्रधार.
१६ कति=किती.
१७ मुगल=मोंगल.
१८ टकर=टक्कर.
१९ युधर्थे=युद्धासाठीं.
२० लढवय्य=लढवय्या.

आतां तिसऱ्या जातीचे शब्द ह्मणजे ज्यांचा अर्थ कवीच्या हृदयभांडाराखेरीज दुसऱ्या कोठेंही आढळावयाचा नाहीं असे:—

लुटति=लोळतात. लुट् हा मूळ संस्कृत शब्द; त्याला 'ति' हा मराठी प्रत्यय लावला! ह्मणजे सरकारी पांचव्या पुस्तकांतील 'वीर गच्छले सैन्य घेउनी!' ह्यांतील 'गच्छले' शब्दाला जोडी मिळाली! तोच मासला 'शुगद्रि'=शोकाचा पर्वत. ह्यापेक्षां 'शुचद्रि' ह्मटलें असतें तर कांहीं तरी शोभतें. तनू=थोडा, याबूखरा=घोडा किंवा गाढव. 'बुधतांस' ह्या शब्दाची फोड कवि सांगतात. "बुधता ह्मणजे विद्या. या शब्दास सामान्यनाम समजून अनेक प्रकारच्या विद्या या अर्थीं बहुवचन केलें आहे." वः! इतका सरळ अर्थ असल्यावर

आणखी काय पाहिजे? **कृतिता** ह्म०कुशलता. **प्रवसितां** ह्म०प्रवास करित असतां. **रणीं** ह्म० वादविवाद करावयाला!! **पीसती** ह्म० दळतात. **करार** ह्म० आजचें काम उद्यांवर लोटणें. **माशकें** ह्म० सुंदर स्त्रीच्या योगानें. मूळशब्द माशुक. **सुरभी** ह्म० वसंत. **सुनीं**=सुनेवर. **दार**=बाहेरचीं कामें. **सोदत्या**=ह्मणजे शोध करणाऱ्याला. **सप्राणता**=जिवंतपण. **प्राणतीं**=श्वासोच्छ्वास करितांना. **यौक्तिक**=शहाणा पुरुष. **भव्य**=कल्याण; **सातू**=सातवाचें पीठ! **गाकरी**=पानग्यानें. ह्यापेक्षां भाकरी ह्मटलें असतें तर! पण तसा सरळ अर्थ आणल्यावर मग भारदस्तपणा येणार कसा? **पर राखुना**=दुसऱ्यापासून.

बस्स झालें. येवढ्यावरून वाचकांस प्रस्तुत काव्याची पुष्कळ अंशानें कल्पना होईल. ह्मणजे एकंदरींत रावसाहेब शेवड्यांसारख्यांच्या हातून जितपत तें वठलें जावयाला पाहिजे होतें, तितकें वठलें गेलें नाहीं, असें ह्मणणें भाग पडतें. विषय चांगला; वर्णन करण्याची शैलीही बरी आहे; तथापि शब्दयोजनेमध्यें 'मनःपूत' सत्ता चालविल्यामुळें एकंदर काव्याचा रसभंग होऊन नीरस काव्याच्या पंक्तीस बसण्यासारखें झालें आहे. मयूरकवीनें स्तोत्र केलें, ह्मणून 'मयूरसुतानें'ही केलें. परंतु मयूर तो मयूर आणि सुत तें सूतच! असो. **रावसाहेब शेवडे** हे ह्या आमच्या ह्मणण्याचा शांतपणानें विचार करून पुढील कृतींत तरी सावधगिरी ठेवतील, व महाराष्ट्रकविमंडळांत उत्तरोत्तर आपलें नांव पुढें आणतील, अशी आशा करून आपला अभिप्राय संपवितों.

---

# मागिल अंकांतील प्रश्नाचें उत्तर.

## मोरोपंतांची आर्या.

**तूं सागर करुणेचा देवा तुजलाचि दुःख सांगावें।**
**तुजवांचुनि इतरांतें दिनमुख पसरोनि काय मागावें ॥ १ ॥**


---

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar at JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

केरळकोकिळ.

पु० १२ ] [ अंक ६

# ढेंकूण.



*कमले कमला शेते हरः शेते हिमालये ।
क्षीराब्धौ च हरिः शेते मन्ये मत्कुणशंकया ॥ १ ॥

ढेंकणाच्या प्रसादांतून सुटलेला असा मनुष्यप्राणी विरळाच आढळेल. ह्या प्राण्याचा प्रभाव—अर्थात् उपद्रव—फार प्राचीन कालापासून आहे असें दिसतें. कारण, शिरोलेखांत लिहिलेला विनोदपर श्लोक तरी, त्या संस्कृत कवीनें अनुभवावांचून लिहिलेला नाहीं, हें उघड आहे. कवीचा ध्वनितार्थ असा कीं, ह्या मत्कुणराजांना मनुष्य तर काय, पण देवसुद्धां भिऊन थरथर कांपतात! असा रात्रभर तळमळत ठेवणारा जो क्षुद्र जंतु, त्याचीही थोडीबहुत माहिती आपणांस असावी, ह्मणून सूक्ष्मदर्शक यंत्रांतून दिसणारें त्याचें स्वरूप व अंडें ह्यांचें चित्र वर दिलें आहे. व खालीं त्याचें वर्णन देऊं.

ढेंकूण हा प्राणी अतिशय त्रासदायक व दंश करणारा आहे. हा गलिच्छ घरांत विशेषेंकरून मोठमोठ्या शहरांत फार असतो. उष्ण प्रदेशांत तर ह्याची वस्ती दांडगी. बिछाने, लांकडाच्या व भिंतीच्या फटी, जुने कागदपत्र व ग्रंथ हीं ह्याचीं राहण्याचीं आवडतीं स्थळें.

* लक्ष्मी कमलामध्यें शयन करते; शंकर हिमालयावर निजतात; विष्णु क्षीराब्धीमध्यें शयन करतात. असें कां? तर ढेंकणाच्या भयामुळें!!

त्याला राहतां येत नाहीं, अशी लांकडाची कोणतीच फट नाहीं. हा प्राणी रात्रिंचर आहे. उजेडांत फारसा बाहेर पडत नाहीं. ह्याचें शरीर बदामी आकाराचें असून त्याची लांबी सुमारें $\frac{?}{?}$ इंच असते. तें मृदु, चपटें असून तपकिरी रंगाचें असतें. आणखी, त्यावर बारीक बारीक केंस असतात. ह्याच्या मस्तकावर दोन मिशांसारखे केंस, व काळेभोर वाटोळे असे दोन डोळे असतात. पुढच्या बाजूस एक चोंचीसारखा अवयव असून, तो मानेखालीं मुरडलेला असतो. ह्या चोंचीला तीन सांधे, व पातळ, सरळ आणि तीक्ष्ण असे चार केंस असतात. गळा बाजूस फुगीर असतो. पोटास आंठ करकोचें असून तें भात्यासारखें फुगलेलें असतें, व बोटानें चिरडलें तर तेव्हांच चिरडलें जातें.

जळूप्रमाणें ह्या प्राण्यास प्रत्यक्ष रीतीनें रक्त शोषून घेण्याची शक्ति नाहीं. तर, त्याच्या चोंचीला किंवा नांगीला जे केंस असतात, त्यांनांच कांहीं एका प्रकारची विशेष हालचाल उत्पन्न होऊन तें रक्त, बंबांत पाणी चढल्याप्रमाणें त्या चोंचीपासून निघून कोठ्यांत जाऊन पडतें. ढेंकूण रक्त काढण्यासाठीं शरीराचें जें चामडें फाडतो, त्यापासून आग होऊं लागते, व ती जागा किंचित् तांबडसर रंगावरून ओळखतां येते. तिच्या मध्यावर दंशाच्या ठिकाणीं एक काळसर ठिपका असतो. कापलेल्या ठिकाणीं बहुतकरून गांद उठते. व पुष्कळ ढेंकूण चावलेले असतील तर धोदरच्या धोदर उठतो. मे महिन्याच्या सुमारास हे प्राणी आंडीं घालतात. आंड्याचा आकार वरील चित्रांत दाखविलाच आहे. त्याच्या एका बाजूस तोंड असतें. त्यांतून पोर बाहेर पडतें. त्याचा रंग मोठ्या ढेंकणाहून फार भिन्न, ह्मणजे पिंवळसर किंवा तांबडसर असतो. युरोपांतही सर्वत्र ढेंकूण आहेत. कांहीं उत्तरेकडील भागांत मात्र कमी आहेत. मध्ययुरोपांतील मोठमोठ्या शहरांत तर त्यांना काय ऊत आलेला आढळतो. सेंटपिटर्समध्यें तर, ह्या चिमुकल्या प्राण्यांचा अगदीं प्रळय आहे असें ह्मणतात. स्कॉटलंडमध्येंही ह्यांचें पीक कांहीं कमी नाहीं. दक्षिणयुरोपांत ह्यांचा उपद्रव बराच कमी आहे. इतालीदेशांत मुळींच ढेंकूण नाहींतच ह्मटलें तरी चालेल. पण त्यांच्या ऐवजीं तेथें दुसरे ह्याहूनही त्रासदायक जंतु आहेत.

असें ह्मणतात कीं, युरोपांत प्रथम ढेंकूण आले ते अमेरिकेंतून

आले. परंतु अरिस्टॉटल, प्लिनी वगैरे तत्त्वज्ञान्यांनीं आपल्या ह्यातींत ढेंकूण असल्याचें लिहिलें आहे. तरी येवढें खचित कीं, पंधराव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत इंग्लदामध्यें मात्र ढेंकूण कसले ते माहित नव्हते. एक प्रसिद्ध प्रवासी स्प्यानिश प्राणिशास्त्रवेत्ता अझारा ह्या नांवाचा होऊन गेला. त्यानें असें सिद्ध केलें आहे कीं, रानटी स्थितीमध्यें ढेंकणांस मनुष्याचें रक्त पिण्याचें माहित नसतें. आणि त्यावरून त्यानें असें अनुमान काढलें आहे कीं, मनुष्यप्राणी निर्माण झाल्यानंतर बहुत कालानें ढेंकणांची उत्पत्ति झाली असावी. मनुष्यांचीं शहरें, समाज वगैरे जमूं लागल्यानंतर ढेंकूण झाले असावेत. आमच्या प्राचीन मताप्रमाणें ढेंकणांची गणना स्वेदज प्राण्यांमध्यें आहे. घामापासून उत्पन्न होणारे जे प्राणी, त्यांना स्वेदज असें ह्मणतात. परंतु ते होतात कसे, हें पहाण्यास मिळत नाहीं, व त्याबद्दल कोठें उल्लेखही केलेला आढळत नाहीं.

ढेंकणाला मनुष्याच्या रक्ताशिवाय दुसरा कोणताही भक्ष्य नाहीं. तो अतिशय भुकेला ह्मणजे मग कोणत्याही प्राण्यावर हल्ला करतो. परंतु मनुष्याइतकी पातळ त्वचा कोणत्याच प्राण्याची नसल्यामुळें, त्यास त्याचा फारसा उपयोग होत नाहीं. ढेंकूण जितका अधाशी आहे, तितकाच तो सोशीकही आहे. कधीं कधीं एक किंवा दोन वर्षेंही तो भक्ष्यावांचून राहूं शकतो! ही अद्भुत गोष्ट पृथ्वीवरील इतर कोणत्याही प्राण्यांत आढळणार नाहीं!!*

ज्या घरांत मुळींच ढेंकूण नाहींत, असें घर बहुधा विरळाच. ह्यास्तव त्यांचा उपद्रव दुःसह झाला ह्मणजे त्यांच्या नाशाला निरनिराळे लोक निरनिराळ्या उपायांची योजना करतात. तरी भिंतीच्या व लाकडाच्या फटींतून, कागदाच्या रुमालांतून त्यांस हाकून लावण्याचें काम कठीणच असतें. साधारणपणें तीक्ष्ण दर्पानें हे प्राणी मरतात. ह्यास्तव

* ही गोष्ट "The Insect world" by Lonis Figuier ह्या पुस्तकांत नमुद केलेली आहे. परंतु ती अशक्यशी दिसते. ग्लासामध्यें रात्रीं टाकून ठेवलेले ढेंकूण दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशीं मरतात हा अनुभव आहे. पण ते खाण्यावांचून मरतात, किंवा दुसऱ्या कशानें मरतात, हें कांहीं खात्रीनें सांगतां येत नाहीं.

तंबाकूचा धूर, एसेन्स ऑफ् टरपेंटाइन, गंधकाची धुरी इत्यादिक औषधांची योजना चांगल्या प्रकारें लागू पडते. पाऱ्याचें मलम, रसकापूर ह्यांनींही ह्या प्राण्यांचा फडशा उडतो. तांबड्या मिरच्या कुवळून तें पाणी खुर्च्यांतून वगैरे ओतलें असतांही हे प्राणी मरतात.

ढेंकणांमध्यें मनुष्यांना चावणाऱ्या जाती दोन आहेत. एक जात आहे तीं घरांतील फटींतून राहते. पण दुसरी आहे ती नेहेमीं सखल भागावरून फिरत असते. ते जमून राहत नाहींत, एकएकटेच सारी दिवसरात्र फिरत असतात. ह्यांची चोंच किंवा नांगी लांब असते. व ते ढेंकूण साधारण ढेंकणांहून रंगारूपांतही फार भिन्न असतात. ह्यांच्या दंशापासून अतिशय वेदना होतात. आणि फार मोठी गांद येते. फ्रान्समध्यें एक प्रकारचे उडते ढेंकूण आहेत. ते बहुतकरून चुली व धुराडीं ह्यांच्या नजीक असतात. ह्या ढेंकणाची लांबी पाऊण इंच असते. शरीर दीर्घवर्तुळ, वरून सपाट व पंख सुरेख उडण्यास उपयोगी पडण्यासारखे असतात. मस्तक चिंचोळें असून त्यावर दोन मिशा व वाटोळे काळे कुळकुळीत डोळे असतात. ह्याला रात्रीं फारच सुरेख दिसतें. हे साधारण प्रयत्नानें कधीं सांपडत नाहींत. हे उन्हाळ्यामध्यें रात्रौ दिव्याभोंवतीं जमतात. ह्यांस धरणें तर फार जपून धरलें पाहिजे; नाहींतर ते चावतात. आणि त्यांच्या दंशापासून अतिशय वेदना होतात. इतक्या कीं, त्यांजपुढें मधमाशीच्याही वेदना कांहीं नव्हेत. आणखी, त्यांच्या दंशापासून तत्काल सूज येते.

हे ढेंकूण लहान लहान कीटक, तेव्हांच मारून खातात. हे कधीं कधीं कोळयांच्या जाळयामध्यें सांपडतात. परंतु कोळी त्यांस शिवत सुद्धां नाहींत. त्याच्या नांगीला तो फार भितो. कारण, ह्या ढेंकणाच्या नांगीमध्यें विष असतें. पण तें कोणत्या ठिकाणीं असतें, तें ठिकाण प्राणिशास्त्रवेत्त्यांसही अद्याप मुकरर झालेलें नाहीं. पंख फुटण्यापूर्वीं हा ढेंकूण अतिशय कुरूप व घाणेरा दिसतो. असे प्राणी निर्माण करण्यांत परमेश्वराचा हेतु कोणता, हें जाणणें हें मानवी शक्तीच्या पलीकडे आहे.

# जीवितौघ.

## श्लोक.

हे आयुःसरिता भयप्रद महा, वाहे प्रवाहें कशी
आह्मी जात असों, वहात मधुनी झाडें पुरानें जशीं ।
आधीं पाट, पुढें अफाट सरिता, लागे पुढें सागर
ज्याचा अल्प न पार कल्पकवरां, गंभीर भव्योदर ॥ १ ॥
नौका हा नरदेह सुंदर गमे, आह्मी उतारू वरी
साहित्यें, विधिनिर्मितें निजसवें, घेवोनि नानापरी ।
चाले धांवत नाव ही सरसरां, आयुःप्रवाहांत या
शोभे पात्र लहान कीं तरुलता, नौकाहि तैशी तया ॥ २ ॥
पाणी निर्मळ वाहुनी झुळझुळां, मंजुध्वनी होतसे
हर्षे चित्त रमे निरंतर गमे, येथें रहावें असें ।
पंक्ती, चित्रविचित्र रम्य हिरव्या, बालतृणाच्या किती
झाल्या शोभित काय दोनहि थडी, आंखोनियां भोंवतीं ॥ ३ ॥

उदक शुद्ध शरद्गगनासम
खळखळे खडकांवरि उत्तम ।
उडत खेळत खेळत चालला
सरळ रम्य तदौघ दिसे भला ॥ ४ ॥
वस्तू अपूर्व मृदु मंद लहान सर्व
तीरीं बघोनि घन वर्षत हर्षपर्व ।
सौंदर्यतेज चमके नव तें विचित्र
बालस्थिती वरुनि दावित दिव्यचित्र ॥ ५ ॥
धरुनि वृक्षलता नव मोहर
अहह या दिसतात मनोहर ।
धरिति शीतल छत्र शिरावरी
गमत सौख्य धनाढ्य नृपापरी ॥ ६ ॥

अहह रम्य दलें नव मंजिऱ्या
दिसति सान तरूवरि गोजिऱ्या ।
मधुरसें गळती सकलांवरी
त्यजुनि मत्सर ते लुटती झरी ॥ ७ ॥
लघु लघू तरुच्या फुलल्गीं शिरीं
किति सुगंधितशीं सुमनें बरीं ।
खुलति रंग विचित्र परोपरी
घडिघडी गमतें धरुं तीं करीं ॥ ८ ॥

हातांनीं शीघ्र तोडूं, सुरुचिर सुमनें, कष्ट थोडे सहातां
आतां चाखूं रसातें, मधुर मधुरशा, पावलें दोन जातां ।
आशापाशा वहातां, पळपळ निघुनी, काल जातो पहातां
थांबेना लेश नौका, परि घडिभरिही, त्या प्रवाहीं वहातां ॥ ९ ॥

कैसा तो रमणीय काल भुवनीं, बालस्थितीचा अहा
सारे सृष्टपदार्थ पाहुनि रमे चित्त प्रमोदें महा ।
राहे रिक्तकर स्वयें जिरुनि तें, औत्सुक्य ती आवडी
हा! हा! हा! खल जीवितौघ नच दे, राहोनि एक्या थडी ॥ १० ॥
जातां नित्य पुढें पुढेंच सगळी, ती रम्यता अंतरे
तों तारुण्यनदी, विशाल दिसते, पूर्णोदकानें स्फुरे ।
होते विस्तृत रुंद रुंद पुढती, तत्पात्र वेगें महा
येतां यौवनकाल तूर्ण सकलां, पूर्णत्व ये नेम हा ॥ ११ ॥
भोंतालीं दिसती वनें उपवनें, विस्तीर्ण रम्याकृती
क्षेत्रें सुंदर दाट येउनि पिकें, गोंडे तुरे दाविती ।
शोभे कीं, तरुवृंद रुंद फुटुनी, खाशी नवी पालवी
येवोनी, परिपक्क घोंस लवले, लाली फळांना नवी ॥ १२ ॥
आतां उंच तरू पहा चहुंकडे, वाटे नभा भेदिती
छायामंडप भव्य घालुनि अहा, संतोष देती किती ।

आलिंगोनि पति स्वरज्जुवलयें, घेतात ज्या चुंबनें
वल्लींचे घनदाट कुंज बघुनी, तल्लीन होती मनें ॥ १३ ॥

विकसलीं कमलें विमलें किती
भ्रमर लोलुप तद्रस सेविती ।
धवल हंस, विराजति गोजिरे
अहह सुंदर काय सरोवरें ॥ १४ ॥

तया स्थानीं खाणी, सुजनगुणसंपन्न भरल्या
कदा यत्नें रत्नें, धनकनक नेतां न सरल्या ।
महत्तेजानें त्या, प्रखरतर तीरीं विलसती
प्रभा ती पाहोनी, तपनकिरणें, न्यून दिसती ॥ १५ ॥

नभश्चुंबी ज्याच्या, दिसत शिखरें सुप्रभ वन
विसांवा घ्याया तें, सकल फलद, ज्ञानभवन ।
वसे विद्या तेथें, कनकखचिता दिव्य रमणी
करी तत्सेवा जो, परमपद घेतो नरमणी ॥ १६ ॥

तिच्या दासी तीरीं अमित फिरती दासजन कीं
अहा सर्वां ठायीं, करिति ममता, जी न जनकीं ।
तयांच्या हातांनीं, अगणित लतावृक्ष रुजले
फळांनीं पुष्पांनीं, सकल भरले, शिंपुनि जलें ॥ १७ ॥

सदा ऋद्धी सिद्धी, बहु सदय, तीरावर सती
उतारूची सेवा, झटुनि करण्या सिद्ध असती ।
सुधाधारें स्वर्णी कलश भरिती कोमल करीं
लुटी ब्रह्मानंदा, मधुर रस जो प्राशन करी ॥ १८ ॥

ह्मणे जाऊं घेऊं, अनुपम थडी, लाभ सकल
परी होतो नौकागति खुटुनियां, जीव विकल ।
महा विघ्नें मार्गी, अगणित पहा आड पडूनी
उतारूचें जातें, बल झगडतां, सर्व झडुनी ॥ १९ ॥

आतां ये, घनघोर गर्जत महा, संसार हा भोंवरा
माया मोह, अपार थोर वळसे, कीं खोल झाला दरा ।
पाहोनी थरकांप, होय गरका, त्याचा महा भ्यासुर
जाते नाव बुडीं गमे हरघडी, राहे न चित्त स्थिर ॥ २० ॥

हा! हा! वेगें, जवन सुटतें, हें अहंभाव-वारें
मध्यें, कांताकनक, उडती, जे विषाचे फवारे ।
आशा आणि प्रबळ हिमती, मेघतुल्य प्रचंड
लाटा मोठ्या, वरि उसळुनी, होतसे खंड खंड ॥ २१ ॥

मध्यें थोर मनोविकार, सुटतें मोठेंच कीं वादळ
वाढोनी, घनदाट कुंदपटलें, हें माजवी कंदळ ।
होती धुंद भयाणशा दशदिशा, तो तीर जातो बरें
सारासार विचार नीट धरिजे, हें तों सुकाणूं त्वरें ॥ २२ ॥

देखों येति पुढें कुशाग्रखडपें, तीं दुःखशोकादिकें
लोंढे कैक उफाळती झरझरां, तेथें न कोणी टिके ।
त्यांचे अग्र समग्र भंग करिती, नौका गमे तत्क्षणीं
सारासार विचार नीट धरिजे हें तों सुकाणूं झणीं ॥ २३ ॥

रंगें जीं व्यसनादि मोहक फुलें, तीं पाडिती कीं भ्रम
आहे घात परंतु त्यांत समजे, त्याला न होती श्रम ।
जाळ्या दाट अचाट खोल भरल्या, त्यांच्या जलाभीतरीं
गुंता तो पडतां निघे न कधिंही, प्राणांत झाला तरी ॥ २४ ॥

ज्वलित उग्र कली वडवानळ
सकळ भस्म घडींत करी खळ ।
लघुलघू मद मत्सर हीं भुतें
भयद नाचति घेउनि कोलितें ॥ २५ ॥

तया ठाया प्राणी, बहु भयद, एकेक विचरे
अति क्रूर स्वैर, प्रबळ फिरताती जलचरें ।

महोग्रदृष्टीनें, भुजग जलभागीं विहरती
अहा कोणाचेही, सहज डसुनी प्राण हरती ॥ २६ ॥
कामक्रोधभुजंग दारुण महा, फूत्कार तों टाकिती
एकाकी कवळोनि नाव करिती, मार्गांत तोटा किती ।
भाजोनी गरळानळें प्रथम तों, अर्धांग ती काढिली
होतां हीनबला अपाप पुढती, नोहे गती कां ढिली ॥ २७ ॥
आनंदें टपतात तों जलचरें, भक्षावया यावरी
आतां नाव धरीन एक ह्मणती मी मीच आधीं खरी ।
तों विक्राळ मुखें जळीं पसरती, सारीं करोनी जुटी
आधिव्याधि समस्त मीन–मगरी, घालूं पहाती मिठी ॥ २८ ॥
आला पूर खळाळ फार उदका, धादंत वाहे नदी
लागे दूर दिसावयास उसळें, काळ प्रचंडोदधी ।
होतो संगम तो क्षणैक सगळीं, जाती अरिष्टें जरा
सर्वत्र दृढ शांतता पसरते, वारा सुटोनी बरा ॥ २९ ॥
येते शुभ्र छटा, प्रकाश चमके, नौकेवरी यापुढें
वाटे झुंजुक अल्प अल्प पुढती, अत्युच्च ये सांकडें ।
भासे स्पष्टचि ये पुढें हळुहळू, आहे गिरी कीं उभा
ज्याचीं दुर्घट उंच उंच शिखरें, भेदोनि जाती नभा ॥ ३० ॥
मृत्यू, जीवित लोहचुंबकगिरी, तो ये पुढें आडवा
त्याचा ओघहि रोगरूप जबरा, एकेक येतो नवा ।
लागोनी अनिवार ओढ उदका, होतें सुकाणूं ढिलें
तेव्हां निश्चित पर्व सर्व कळतें, जें शेवटीं राहिलें ॥ ३१ ॥
तीराची, तरुची स्मृतीहि न उरे, जातात केव्हां कसे
खालीं तेंचि वरीहि तेंचि पुढती, सारा गिरी तो दिसे ।
आतां एक पळांत नाव थडके, होणार कीं शेवट
तेव्हां दुर्धर टाळणें व्यसन तें, ब्रह्मासही दुर्घट ॥ ३२ ॥

पऱ्याला पडती घड्या बहुत कीं, तद्वर्णही ओसरे
होती सद्दढ खांबही खिळखिळे, वांकोनि जाती पुरे।
भोंकेंही पडती पहा हळुहळू, नाहीं गिरीला दया
सारी जर्जर नावही करुनियां, सर्वस्व नेतो लया ॥ ३३ ॥

फळ्या आलिंगाया, गिरिस भिडुनी बंध तुटती
खिळे सारे त्याला, झरर निसटोनी चिकटती।
किती येती लाटा, प्रलयसमयींच्या उलटुनी
तडाख्यानें वाटे, खचित बुडते नाव फुटुनी ॥ ३४ ॥

पुढें हाय कोणां कळे काय होतें
खरा जाणता सर्वसाक्षी अहो तें।
असे गर्द अंधार कीं सुप्रकाश
नसे शुद्धिही होतसे बुद्धिनाश ॥ ३५ ॥

विरचितो कृति पोतक आवडीं
करिल रंजन अल्प घडी घडी।
रसिक वाचक पद्य तुकावुनी
सरस नीरस घेउत मानुनी ॥ ३६ ॥

# लोकोत्तर चमत्कार.

## लुटारूंचा प्रसाद!

खरोखर 'लुटारू' व 'दरवडेखोर' ह्यांची गणना दुष्ट, नीच व हलकट लोकांत आहे. तथापि अशांतील पुढाऱ्यानेंही कधीं कधीं दयार्द्रतेचीं, औदार्याचीं कृत्यें केलेलीं आढळून येतात. पण ह्यांत मोठेंसें नवल नाहीं. कारण, दरवडा ही जरी भयंकर, अनीतीची व क्रूरपणाची कृति आहे, तरी नूतन राज्यसुमनाच्या कलिकेचें तें एक स्वरूप आहे हें विसरतां कामा नये. ह्मणूनच त्या ठिकाणीं औदार्याचा परिमळ उत्पन्न होतो. आलीकडील दरवडेखोरांत, तंट्या भिल्लाचें नांव तर अगदीं जगजाहिर आहे. कारण, त्या बहाद्दरानें मी मी ह्मणवि-

णाऱ्या इंग्रज सरकारासही दहा अकरा वर्षें झुलवून सोडलें होतें! त्यानेंही एक दोन औदार्याचीं मोठीं चमत्कारिक कृत्यें केल्याचें त्याच्या चरित्रावरून दिसून येतें.

एक वेळ तंट्या भिल्ल आपल्या साथीदारांसहवर्तमान हत्यारबंद होऊन एका डोंगराच्या पायथ्यानें चालला होता. त्यास मार्गावर एक गरीब भिक्षुक ब्राह्मण आढळला. तो अतिशय खिन्न आणि प्रवासाच्या श्रमामुळें थकलेला दिसत होता. त्यास तंट्यानें "तुह्मी कोण? कोठें जातां?" वगैरे प्रश्न विचारून चौकशी केली. तेव्हां तो ह्मणाला "मी एक गरीब ब्राह्मण आहें. घरांत दारिद्र्य फार. एक मुलगा मुंजीस आला आहे. त्याकरितां देशावर फिरतों, परंतु कांहीं प्राप्ति होत नाहीं. त्या काळजींत आहें." तेव्हां तंट्या भिल्ल ह्मणाला "भटजीबुवा, तुह्मी कांहीं काळजी करूं नका. तुमचें घर कोठें आहे तें मला सांगून ठेवा, आणि घरीं स्वस्थ बसा जा. मी तुमच्या मुलाच्या मुंजीची तजवीज करतों." त्याप्रमाणें त्या ब्राह्मणानें आपलें नांव, गांव सांगितलें, आणि तो घरीं जाऊन बसला. बिचारा तंट्याला पाहून घाबरून गेला होता. कारण, तंट्याच्या व त्याच्या बरोबरच्या जामानिम्यावरून ते दरवडेखोर असावेत अशी त्याची खात्री झालीच होती. व तंट्याचें नांव त्या वेळीं त्या प्रांतीं तर महशूरच होतें. तेव्हां त्या काळस्वरूप्यांकडून प्राप्ति व्हावयाची तर लांबच, पण प्राणानिशीं सुटतों किंवा नाहीं, ह्याचाच त्या ब्राह्मणाला संशय वाटत होता. तरी आपण निष्कांचन असल्यामुळें बचलों येवढीच मिळविली असें त्यास वाटलें. परंतु चमत्कार हा कीं, हे भटजीबुवा आपल्या घरांत दुसऱ्या दिवशीं जों हरि हरि ह्मणत बसले आहेत, तों दोन चार मनुष्य बैलांवर गोण्या घातलेले भटजीबुवांचें घर शोधीत आले. आणि भटजींस ह्मणाले "भटजी! आपणांस तंट्या भिल्लानें ह्या गव्हांच्या गोण्या पाठवून दिल्या आहेत, ह्या घ्या." हें ऐकून भटजीबुवा फार विस्मित झाले. आणि त्यांनीं ते गहूं ठेवून घेऊन त्यांची रास केली. पहातात तों बावीस खंडी भरले! बिचाऱ्याच्या मुलाची मुंज होऊन एक दोन वर्षांचा प्रपंच सुद्धां भागला असेल!

तंट्याविषयीं दुसरीही अशीच एक औदार्याची गोष्ट मोठी चमत्कारिक आहे. एके दिवशीं रात्रीं खानदेशांतील एका गांवांत तंट्या भिल्लाचा दरोडा गेला. तंट्याची—किंवा प्रसिद्ध दरोडेखोर जे प्रसिद्ध होऊन जातात त्यांचीही अशीच चाल असते कीं, ज्या गांवांत दरोडा घालावयाचा असेल, तेथील श्रीमान् गृहस्थाकडे किंवा पाटील कुळकरण्याकडे आधीं एक चिट्ठी पाठवून तींत कांहीं मोठ्या रकमेची मागणी करावयाची; आणि हे रुपये न आल्यास आह्मी रात्रीं हत्यारबंद येऊन लूट करूं असा धाक घालावयाचा व त्याप्रमाणें करावयाचें. तंट्यानें ह्या गांवाला पूर्वीं अशीच चिट्ठी पाठविली होती; व त्याप्रमाणें गांवकऱ्यांनीं ऐवज कांहीं पाठविला नव्हता; व गांवांत विशेष दहशतही नव्हती. कारण, असा सांगून सवरून कोणी दरवडा घालावयास येतो कीं काय, अशी त्या गांवकऱ्यांची समजूत झालेली होती. ती चिट्ठी ह्मणजे कोणी तरी वात्रट मनुष्यानें केलेली टवाळी होय, असें समजून सारा गांव स्वस्थ होता. इतक्यांत तंट्याच्या दरवड्याचा दिवस येऊन ठेपला. त्या दिवशीं सदरहू गांवांतील एका गृहस्थाच्या घरीं लग्नसमारंभ असून रात्रौ नवरानवरी पालखींत बसवून वाजत गाजत वरातीची मिरवणूक चालली होती. इतक्यांत तंट्या व तंट्याचे लोक हत्यारबंद झालेले गांवांत येऊन दाखल झाले. मग काय विचारावें! कोठची वरात आणि कोठचें काय! सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें! जो तो आपला प्राण घेऊन धांवत सुटला! कोठचें वाजंत्री आणि कोठचे मशालजी! साऱ्यांची मनांतल्या मनांत तिरपिट उडून गेली. नवऱ्यामुलीच्या अंगावर तर दागिने होते. ह्मास्तव भोयांनीं पालखी रस्त्याच्या एका बाजूस ठेवून तिच्यावर एक पडदा झांकण घातला, आणि तेही पळावयाच्या बेतांत होते. इतक्यांत तंट्या भिल्ल स्वतःच तेथें गेला, आणि त्यानें त्यांस विचारलें कीं काय आहे? कोठें चाललां तुह्मी? तेव्हां त्या भोयांची तर बोबडीच वळली. ते कांपत कांपत हात जोडून ह्मणाले "ही एका गृहस्थाची वरात जात आहे." तंट्यानें विचारलें "नवरानवरी कोठें आहेत?" तेव्हां भोयांनीं नाइलाजास्तव पालखीवरचा बुरखा काढून नवरानवरींस दाखविलें. तेव्हां तंट्यानें जवळ मशाल आणवून त्या नवरींच्या मुखाकडे पाहिलें, आणि मोठ्या

संतोषानें तो ह्मणाला "वः! नवरी मुलगी फार चांगली आहे. कोण आहे रे तिकडे? कालच्या दरवड्यांतले सारे दागिने घेऊन या." असें ह्मणतांच त्यांच्यापैकीं एका मनुष्यानें सुमारें २००० चे दागिने आणून पुढें ठेविले. तें पाहून तंख्या भिल्लानें ते सर्व दागिने स्वतः त्या मुलीच्या अंगावर घातले आणि वाजंत्री, भोयी, ह्या सर्वांस हाक मारवून आश्वासन दिलें कीं, तुह्मी कांहीं भीति बाळगूं नका. तुमची वरात खुशाल जाऊं द्या. हा तंख्या भिल्ल आहे. हा गरीबगुरिबांचा कधींही छळ करावयाचा नाहीं हें ध्यानांत असूं द्या. असें ह्मणून ती वरात पूर्ववत् त्यानें रवाना केली, तेव्हां त्यास संतोष झाला. नवरी मुलीचा बाप जातांना तंख्यास मुजरा करावयास आला, त्यास तो ह्मणाला 'ती मुलगी माझीच आहे असें मी समजतों. तिच्या अंगावर घातलेले अलंकार मीं खुषीनें तिला दिले आहेत.' हें ऐकून तिच्या बापास काय वाटलें असेल, हें सांगणें नकोच.

ही आमच्या देशांतील लुटारूंची गोष्ट झाली. पण युरोपांतील लुटारूंमध्येंही अशाच प्रकारच्या चमत्कारिक गोष्टी घडल्याचे दाखले आहेत. मेकॉले आणि इतर इंग्लिश ग्रंथकार ह्यांनीं प्रसिद्ध रस्त्यावर लूट करणाऱ्या लोकांच्या अनेक कृत्यांचें वर्णन केलें आहे; व ह्या कायद्यांत न सांपडणाऱ्या भामट्यांच्या कृष्णकारस्थानांचा पुष्कळच परिस्फोट केलेला आहे; व त्यांतच अशा लोकांनीं औदार्य व सुशीलता दाखविल्याचीं मोठीं चमत्कारिक उदाहरणें आहेत. तीं सारीं सांगत बसण्यास अनुकूलता नाहीं. तथापि त्यांतील एक चमत्कारिक गोष्ट मासल्यासाठीं दाखल करतों.

इंग्लंडमध्यें इ. स. १८७६ मध्यें आगष्ट महिन्यांत एक बाई घोड्यावर बसून डब्लीनजवळच्या फिनिक्सनामक बागेंत एका चाकरासहवर्तमान सहल करीत असतां एक मनुष्य पायानें चालत आला. त्यानें सफेत पोषाख करून डोकीला रेशमी जरीची टोपी घातली होती. तो त्या बाईच्या जवळ आला, आणि त्यानें एकदम तिच्या घोड्याचा लगाम धरून 'तुमच्याजवळ जें काय असेल तें टाका ह्मणाला.' तेव्हां त्या बाईनें तिच्याजवळ असलेल्या सव्वीस गिनी त्याच्या हवालीं केल्या. तें नाणें ठेवण्याकरितां त्या गृहस्थानें एका

खिशांत हात घातला. आणि त्याच खिशांतून एक हिऱ्याची आंगठी काढून त्या बाईस नजर केली! आणि ह्मणाला 'मी जरी एक चोर आहें, तरी आपल्यासारख्या सुंदर स्त्रियांकडून मी अधिक घेऊं इच्छीत नाहीं.' इतकें बोलून मोठ्या नम्रतेनें त्यानें तीस मुजरा केला, आणि आपण तटावरून उडून जाऊन दिसेनासा झाला!

---

## जलचरांची महाभयंकर वाढ.

जीवोत्पत्तीची वाढ इतक्या झपाट्यानें होत आहे कीं, तिचा संहार जर मुळींच झाला नाहीं, तर पृथ्वीवर मोठाच अनर्थ ओढवेल. नुसत्या माशांचीच वाढ आपण पाहूं गेलों, तर त्यांचीं जितकीं अंडीं, तितकींच पुरोपुर पोरें बाहेर पडून, सुरक्षित राहूं लागल्यास, कांहीं कालानें सर्व प्रचंड समुद्रोदरें तरी त्यांस रहावयास पुरतील कीं नाहीं, हा एक संशयच पडेल. पण परमेश्वराची केवढी कृपा पहा बरें! कीं तो असा अनर्थच होऊं देत नाहीं. वेळोवेळीं तो त्यांचा सप्पा उडवीत असतो. हीं मनुष्येंच घ्या. ह्यांजकरितां, न्यू फाउंडलंडास वेढा देऊन बसलेल्या समुद्रोदरांतून प्रतिवर्षी ६०,०००,००० किंवा ७०,०००,००० सहा सात कोटी कॉड नांवाचे मासे ओढओढून, मोक्षास पाठवावे लागतात. पण हा संहार त्यांच्या उत्पत्तीपुढें कांहींच नव्हे. प्रत्येक [illegible]त कॉड माशाची मादी सुमारें ४५,०००,०० ह्मणजे पंचेचाळीस लाख अंडीं घालते, आणि केव्हां केव्हां तर ८०,००,००० ह्मणजे ऐशीं लाखही घातल्याचे दाखले आलेले आहेत. न्यू फाउंडलंडच्या किनाऱ्यापासून नरमादीच्या तीन कोट जोड्या घेऊन त्यांची उत्पत्ति वाढवावयास लागलें तर तीन कोट माद्या प्रत्येक वर्षास एकेकीचीं पन्नास कोट अंडीं याप्रमाणें दरसालची १५०,०००,०००,०००,००० इतकी भर घालतील! केवढी ही भयंकर वाढ!

बफन, ह्यानें हेरिंग नांवाच्या माशाच्या उत्पत्तीचा हिशोब करून ठेवला आहे. तो ह्मणतो, "हेरिंगच्या एका जोडीपासून उत्पत्ति वाढावयास लागली, व ती वीस वर्षेंपर्यंत गणितश्रेढीनें अप्रतिहत चढत चा-

लली तर आपण राहतों ह्या भूगोलाचें विशाल उदर व्यापून जाईल, इतकी माशांची संख्या होईल."

स्क्रेडन, जलतंतूंच्या उत्पत्तीविषयीं येणेंप्रमाणें लिहितोः—"एका वर्षांत दोनशें अंडीं घालणारी एखादी कोंबडी पाहिली ह्मणजे आपणांस केवढें आश्चर्य वाटतें, आणि तेंच जर एखाद्या माशाचीं अंडीं हजारोंच्या हजारों दृष्टीस पडलीं, तर आपणांस केवढें बरें आश्चर्य वाटेल? देवमासा आपल्या उपजीविकेचें साधन ज्या लहान लहान मासळ्या, त्याच आधीं हजारोंच्या हजारों गिळून फडशा पाडतो. ग्रीनलंडच्या किनाऱ्यावर १०।१९ मैल रुंदीचा व १९०।२०० मैल लांबीचा समुद्राचा भाग, बहुधा नेहमीं, ग्रेडुसी नामक लहान लहान जलस्थ जीवांनीं बुजबुजलेला असतो. अशा तऱ्हेचे प्राणी एकच घनफूट जलभागावर १,१०,५९२ इतके पसरलेले असतात. आणि अशा एका पट्टीवर—रांगेवर—निदान नव्वद हिश्शांनीं १,६००,०००,०००,००० इतके प्राणी असतातच असतात."

अशी जेथें अनर्थ वाढ आहे, तेथें मनुष्याच्या आहारानें कितीसा संहार होईल? तर मनुष्यें मत्स्याहार करतात ह्मणूनच हा होणारा अनर्थ टळतो, व या कारणासाठींच मत्स्याहार करणें अवश्य आहे, हें ह्मणणें अगदींच चुकीचें होईल. तर अशा प्रकारची प्राणिमात्रांची होणारी भयंकर वाढ व तिजपासून होणारा अनर्थ हीं निवारण्याकरितां, परमेश्वरच निरनिराळे प्रसंग व कारणें योजतो व त्यांचा संहार करतो, ही त्याची कृपा समजून, त्याचेच गुणानुवाद गाणें फार चांगलें.

---

## पुस्तकपरीक्षा.

**कन्याविक्रयदुष्परिणाम नाटक**—हें लहानसें पुस्तक व निबंध रा. रा. **मोरो विनायक शिंगणे व बाळकृष्ण बापू आचार्य**, मुंबईचा वृत्तांत, माझें प्रिय पुस्तक अथवा 'व्यवहारदर्पण, यशवंतविजया नाटिका, सुलभ प्रसूति, ऋणविमोचन वगैरे पुस्तकांचे कर्ते ह्यांनीं तयार करून तें श्रीमंत सरकार गायकवाड ह्यांच्या आश्रयाखालीं छापलें आहे; व त्यास दक्षिणाप्राइज कमेटीकडून बक्षीस मिळालें आहे. शिवाय रावबहादुर हरिलाल एच्. ध्रुव, नवसरी

येथील जज्ज, तसेंच न्यायमूर्ति रावबहादुर महादेव गोविंद रानडे ह्या उभय न्यायमूर्तींनीं हें पुस्तक वाचून पुस्तककर्त्यांस " कांहीं योग्य सूचनाही केलेल्या आहेत." ह्याशिवाय दिवाण बहादुर मणीभाई जसभाई, शेट मूळजी जेठा इत्यादि पांच पंचवीस श्रीमान् गृहस्थांची आश्रय दिलेली यादी वगैरे आहेच.

इतक्या सर्वांचा व मुंबईचा वृत्तांत वगैरे पुस्तकाचे कर्ते ह्यांनीं हें लिहिलें असा विचार मनांत आणला ह्मणजे सदरहू पुस्तक हें एक अति उत्तमांपैकीं असून मोठें रसभरित व चटकदार असावें, अशी सहज कल्पना होते. रा. आचार्य व रा. शिंगणें यांसारख्या मेहनती व दक्ष ग्रंथकर्त्यांकडून खरोखरच उत्तमच पुस्तक तयार व्हावयाचें, पण वास्तविक प्रकार तसा नाहीं. हें पुस्तक साधारण मध्यम पुस्तकांपैकींच आहे. नाटक ह्या दृष्टीनें विचार केला तर त्याची योग्यता बऱ्याच कमी प्रतीची ठरेल. कारण, नाटक ह्या नांवाला शोभण्यासारखी त्यांत दृश्यकाव्यास अनुसरून रसांची व गुणांची योजना केलेली दिसत नाहीं. मनोरंजकता आहे, पण ती फारच थोडी आहे. दोन तीन पात्रांच्या आंगचे गुण स्वाभाविक रीत्या वठले आहेत येवढाच काय तो गुण नांवाजण्यासारखा आहे. शिवाय 'कन्याविक्रय' हा विषय अत्यंत करुणास्पद असल्यामुळें हें नाटक उपयुक्त हें तर सर्वांसच कबूल केलें पाहिजे.

आतां ह्यांत काय काय उणिवी आहेत त्या संबंधानें विचार करूं. प्रथमतः एकच ग्रंथ दोघांदोघांनीं किंवा तिघांनीं कसा लिहावयाचा ह्याबद्दल आह्मांस वारंवार विस्मयच वाटतो. त्यांतून एखादें पुस्तक भाषांतररूप असेल, तर एकदोघांनीं मिळून संपविलें ह्मटलें तर बरेंच शोभण्यासारखें आहे. कारण, पूर्वार्ध एकानें संपविला, व उत्तरार्ध दुसऱ्यानें संपविला तर काम लौकर आटोपेल, व परस्परांनीं परस्परांची कृति एक वेळ नजरेखालून घातली, तर कदाचित् तसें होण्याचा संभव आहे. तरी सुद्धां एकाची भाषाशैली दुसऱ्यास साधणें कठीण; पण स्वतंत्र नाटकासारख्या स्वरचित विषयांत दोघांनीं दायविभाग कसे करावयाचे ? किंवा हिस्सेरशी तरी कशी पाडावयाची ? एक वाक्य एकानें लिहून, दुसरें दुसऱ्यानें लिहावयाचें, कां एक प्रवेश एकानें लिहून दुसरा दुसऱ्यानें लिहावयाचा, कां एका पात्राचें भाषण एका व्यक्तीनें लिहून, दुसऱ्या पात्राचें भाषण दुसऱ्या व्यक्तीनें लिहावयाचें, कां काय करावयाचें ? ह्याचा आमच्यानें तर उलगडा होत नाहीं. मग प्रस्तुत नाटकांतील भाग, रा. शिंगणे यांनीं कोणता लिहिला, व रा. आचार्यांनीं कोणता

लिहिला, हें त्यांचें त्यांसच माहित. तो गुलदस्त इतरांस समजण्यास कांहीं साधन नाहीं. असल्या हिस्से रशींत सत्कीर्तीची ओढाताण, आणि अपकीर्तीची ढकलाढकल करण्याला मात्र चांगली संधि असते ! असो. तर अशा प्रकारें एकाच छोट्याशा पुस्तकावर दोन दोन गृहस्थांचीं नांवें घालण्यांत, किंवां परस्परांची मदत घेण्यांत कोणताच अर्थ नाहीं. येवढेंच नव्हे, तर त्यापासून किंचित् कमीपणाच येतो ह्मटलें, तरी सुद्धां बाध येणार नाहीं.

इतर गुण विशेष नसले, तर भाषापद्धति तरी मनोरम पाहिजे. परंतु प्रस्तुत नाटकांतील शब्द व वाक्यें तर जणू काय विलायतेहून आणलेलीं दिसतात. त्याच्या मासल्यासाठीं खालीं दिलेलीं वाक्यें पहावींत:—

'**मध्यस्थि** लोक'—ह्यांत मध्यस्थ असें पाहिजे.

'कांहीं **गुणशेष** असल्यास'—सर्वांचा गुणलेश आणि प्रस्तुत पुस्तककारांचा 'गुणशेष !'

'मंडळी **हवी लागेल.**' ध्यानांत ठेवण्यासारखें वाक्य !

'तुझी **पण बरीच** खोडकी जिरवीन एका क्षणांत.'—तुझी खोडकी (?) एका क्षणांत जिरवीन, असें वाक्य केलें असतें तर रागाच्या आवेशाचें थोडेंसें स्वरूप तरी व्यक्त झालें असतें. 'पण बरीच' हे निरर्थक शब्द ढकलल्यानें बेंगरूळपणा मात्र उत्पन्न झाला.

'मी ह्मणून नाहीं**चा** हो ह्मणावयाची नाहीं.'—'चा' च्या ठिकाणीं 'चें' पाहिजे, ह्मणजे सरळ वाक्य झालें.

'**भेटी घाटी** खाल आणि जावयांत गर्क व्हाल!'—कितीपण सरळ आणि शुद्ध वाक्य ? 'घाटी' तें काय ? जावयांत तें गर्क कसें व्हावयाचें ? जावईपणांत ह्मटलें असतें, तर त्यांत राम होता.

'पण कोणी तरी **मामेलेक** उपयोगी पडावयाचा होता ?'—'मायेचा पूत' असें ह्मणण्याचा परिपाठ आहे. ह्मणजे त्यांत एक प्रकारची ऐट साधते.

'**बच्चा**' हें संधान जुळवलेंस तर तुला पन्नास रुपये हे ठेवलेच आहेत.'—वाक्यांत मजा नाहीं; शोभा नाहीं; आणि बच्चा शब्द कोठें वापरावा, ह्याचें तारतम्य नाहीं.

'ह्याची **ददाती** नाहीं.'—ददात हा मूळ शब्द. 'ददातीं' नव्हे !

'तुह्मी दोघेंही **समवयस्कर होतींत.**'—मराठी भाषेचें निष्कलंक स्वरूप तें

येथील जज्ज, तसेंच न्यायमूर्ति रावबहादुर महादेव गोविंद रानडे ह्या उभय न्यायमूर्तींनीं हें पुस्तक वाचून पुस्तककर्त्यांस "कांहीं योग्य सूचनाही केलेल्या आहेत." ह्याशिवाय दिवाण बहादुर मणीभाई जसभाई, शेट मूळजी जेठा इत्यादि पांच पंचवीस श्रीमान् गृहस्थांची आश्रय दिलेली यादी वगैरे आहेच.

इतक्या सर्वांचा व मुंबईचा वृत्तांत वगैरे पुस्तकाचे कर्ते ह्यांनीं हें लिहिलें असा विचार मनांत आणला ह्मणजे सदरहू पुस्तक हें एक अति उत्तमांपैकीं असून मोठें रसभरित व चटकदार असावें, अशी सहज कल्पना होते. रा. आचार्य व रा. शिंगणे यांसारख्या मेहनती व दक्ष ग्रंथकर्त्यांकडून खरोखरच उत्तमच पुस्तक तयार व्हावयाचें, पण वास्तविक प्रकार तसा नाहीं. हें पुस्तक साधारण मध्यम पुस्तकांपैकींच आहे. नाटक ह्या दृष्टीनें विचार केला तर त्याची योग्यता बऱ्याच कमी प्रतीची ठरेल. कारण, नाटक ह्या नांवाला शोभण्यासारखी त्यांत दृश्यकाव्यास अनुसरून रसांची व गुणांची योजना केलेली दिसत नाहीं. मनोरंजकता आहे, पण ती फारच थोडी आहे. दोन तीन पात्रांच्या आंगचे गुण स्वाभाविक रीत्या वठले आहेत येवढाच काय तो गुण नांवाजण्यासारखा आहे. शिवाय 'कन्याविक्रय' हा विषय अत्यंत करुणास्पद असल्यामुळें हें नाटक उपयुक्त हें तर सर्वांसच कबूल केलें पाहिजे.

आतां ह्यांत काय काय उणिवी आहेत त्या संबंधानें विचार करूं. प्रथमतः एकच ग्रंथ दोघांदोघांनीं किंवा तिघांनीं कसा लिहावयाचा ह्याबद्दल आह्मांस वारंवार विस्मयच वाटतो. त्यांतून एखादें पुस्तक भाषांतररूप असेल, तर एकदोघांनीं मिळून संपविलें ह्मटलें तर बरेंच शोभण्यासारखें आहे. कारण, पूर्वार्ध एकानें संपविला, व उत्तरार्ध दुसऱ्यानें संपविला तर काम लौकर आटोपेल, व परस्परांनीं परस्परांची कृति एक वेळ नजरेखालून घातली, तर कदाचित् तसें होण्याचा संभव आहे. तरी सुद्धां एकाची भाषाशैली दुसऱ्यास साधणें कठीण; पण स्वतंत्र नाटकासारख्या स्वरचित विषयांत दोघांनीं दायविभाग कसे करावयाचे ? किंवा हिस्सेरशी तरी कशी पाडावयाची ? एक वाक्य एकानें लिहून, दुसरें दुसऱ्यानें लिहावयाचें, कां एक प्रवेश एकानें लिहून दुसरा दुसऱ्यानें लिहावयाचा, कां एका पात्राचें भाषण एका व्यक्तीनें लिहून, दुसऱ्या पात्राचें भाषण दुसऱ्या व्यक्तीनें लिहावयाचें, कां काय करावयाचें ? ह्याचा आमच्यानें तर उलगडा होत नाहीं. मग प्रस्तुत नाटकांतील भाग, रा. शिंगणे यांनीं कोणता लिहिला, व रा. आचार्यांनीं कोणता

लिहिला, हें त्यांचें त्यांसच माहित. तो गुलदस्त इतरांस समजण्यास कांहीं साधन नाहीं. असल्या हिस्से रशींत सत्कीर्तीची ओढाताण, आणि अपकीर्तीची ढकलाढकल करण्याला मात्र चांगली संधि असते ! असो. तर अशा प्रकारें एकाच छोट्याशा पुस्तकावर दोन दोन गृहस्थांचीं नांवें घालण्यांत, किंवा परस्परांची मदत घेण्यांत कोणताच अर्थ नाहीं. येवढेंच नव्हे, तर त्यापासून किंचित् कमीपणाच येतो ह्मटलें, तरी सुद्धां बाध येणार नाहीं.

इतर गुण विशेष नसले, तर भाषापद्धति तरी मनोरम पाहिजे. परंतु प्रस्तुत नाटकांतील शब्द व वाक्यें तर जणू काय विलायतेहून आणलेलीं दिसतात. त्याच्या मासल्यासाठीं खालीं दिलेलीं वाक्यें पहावींत:—

'**मध्यस्थि** लोक'–ह्यांत मध्यस्थ असें पाहिजे.

'कांहीं **गुणशेष** असल्यास'–सर्वांचा गुणलेश आणि प्रस्तुत पुस्तककारांचा 'गुणशेष !'

'मंडळी **हवी लागेल.**' ध्यानांत ठेवण्यासारखें वाक्य !

'तुझी **पण बरीच** खोडकी जिरवीन एका क्षणांत.'–तुझी खोडकी (१) एका क्षणांत जिरवीन, असें वाक्य केलें असतें तर रागाच्या आवेशाचें थोडेंसें स्वरूप तरी व्यक्त झालें असतें. 'पण बरीच' हे निरर्थक शब्द ढकलल्यानें बेंगरूळपणा मात्र उत्पन्न झाला.

'मी ह्मणून नाहीं**चा** हो ह्मणावयाची नाहीं.'–'चा' च्या ठिकाणीं 'चें' पाहिजे, ह्मणजे सरळ वाक्य झालें.

'**भेटी घाटी** खाल आणि जावयांत गर्क व्हाल!'–कितीपण सरळ आणि शुद्ध वाक्य ? 'घाटी' तें काय ? जावयांत तें गर्क कसें व्हावयाचें ? जावईपणांत ह्मटलें असतें, तर त्यांत राम होता.

'पण कोणी तरी **मामेलेक** उपयोगी पडावयाचा होता ?'–'मायेचा पूत' असें ह्मणण्याचा परिपाठ आहे. ह्मणजे त्यांत एक प्रकारची ऐट साधते.

'**बच्चा**' हें संधान जुळवलेंस तर तुला पन्नास रुपये हे ठेवलेच आहेत.'—वाक्यांत मजा नाहीं; शोभा नाहीं; आणि बच्चा शब्द कोठें वापरावा, ह्याचें तारतम्य नाहीं.

'ह्याची **ददाती** नाहीं.'–ददात हा मूळ शब्द. 'ददाती' नव्हे !

'तुझी दोघेंही **समवयस्कर होतींत.**'–मराठी भाषेचें निष्कलंक स्वरूप तें

हें ! समवयस्क हा मूळशब्द त्याचें 'समवयस्कर' ! आणि 'होतींत' ह्या क्रियापदाबद्दल तर काय बोलणेंच नाहीं.

'जंग ह्मातारा'—जख्ख ह्मातारा असें ह्मणतात. पण जख्ख काय, आणि जंग काय ? दोहोंतही आद्यवर्ण कायमच आहे !

'दोघांचे ग्रहही मिळते आले होते, जोडतेंही नीट आलें होतें.'—ह्यांत 'जोडतें' तें काय ?

'नाहीं तर हेलपाट्यावरी **खासडे** मात्र आमच्या पदरीं पडावयाचे.'—खासडे तें काय ?

'आह्मी संध्याकाळीं **निखालस** येतों.'—येथें 'खचित' 'निश्चयानें' असा कांहीं शब्द पाहिजे होता. तेथें दिला ठेवून निखालस !

'आज येवढीं वर्षें कोंकणांत काढलीं पण असें **रंडकीचें** गाणें कधीं नव्हतें ऐकलें.'—शब्दशास्त्राची आणि सभ्यशास्त्राची दोहींचीही कमाल झाली खरी.

आतां सरतेशेवटीं मराठी भाषेचा अपूर्व नमुना व उभय ग्रंथकारांच्या कौशल्यांतील 'गुणशेष' ह्यांचें स्मारक ह्मणून खालचें वाक्य वाचण्याची तसदी घ्यावी ह्मणजे बस्स:—

**" आमचा वेद किती पवित्र. त्यांत का ह्या गोष्टी आहेत. पैसे देणारे किती तरी मूर्ख. रांडच्या पोरांनींच जर विद्या सोडून दिली आणि त्यांत लग्न कसें तरी एकदां झालेंच पाहिजे ही फारा दिवसांची समजूत हाडीं खिळलेली, मग लोक पैसे न भरून तरी काय करतील?**

हा उतारा जशाचा तसा घेतला आहे. ह्यावरून ग्रंथकारांच्या विरामचिन्हांच्या माहितीचा सहज वाचकांस निर्णय करतां येईल, पण अर्थाची गुंतवळ उकलणें दुरापास्तच आहे. पण ह्याच्या पुढील वाक्यें ह्मणजे एक कोळ्याचें जाळें आहे. त्याचा चमत्कार थोडासा दृष्टीस पडावा ह्मणून पुढची आणखी कांहीं वाक्यें द्यावींशीं वाटतात. तीं हीं:—

**"पण आमच्या वेदविद्येच्या पाठीमागें जर हे शंख लागते तर असले घाणेरडे विचार कधींही त्यांच्या मनांत आले नसते. पण ती दिली सोडून नि लागले विंग्रजीच्या मागें. ती रांडची** (हा शब्द कवींच्या अगदीं पांचवीस पूजला आहे.) **विद्या भिकारीच. तिनें का कोठें तेज येतें. त्या विद्येनेंच तर हा सगळा गोंधळ उडवून दिला आहे."**

आमच्या मतें वरील वाक्यापुढें त्याची कांहींच मातब्बरी नाहीं! ह्या वाक्यांत पुस्तककर्त्यांना काय सांगावयाचें होतें तेंच आह्मांला समजत नाहीं. 'हे शंख जर वेदविद्येच्या पाठीमागें लागते तर असले घाणेरडे विचार कधींही त्यांच्या मनांत आले नसते.' घाणेरडे विचार कोणते? तेंच मुळीं समजत नाहीं. कन्याविक्रयाचे कीं काय? तसें असेल तर 'विंग्रजी'विद्येचा गोंधळ खराच! 'विंग्रजी' विद्येला भिकारी ह्मणतो, व तिनें का कोठें तेज येतें? असें विचारतो तो कोण? तर अव्वलपासून अखेरपर्यंतही ज्याचें कोठें नांव नाहीं व तो कोण ह्याचाही उल्लेख नाहीं, असा नारायण भट! बिचाऱ्याची कल्पनाशक्ति व विचार उदात्तच खरे! कोणत्याही नाटकांत प्रथम पात्रें देऊन त्यांचे संबंध दाखविण्याची चाल आहे. पण तिला ह्या उभय नाटककर्त्यांनीं तर अजिबात फांटा दिला आहे.

आणखी, सर्वांत मजेची गोष्ट ही कीं, ह्या उभयतां पुस्तककर्त्यांस छापखान्यानें जी कांहीं मदत केली आहे ती तर अगदीं मनोभावेंकरून! ऱ्हस्व दीर्घ ह्यांचा मुळींच भेद ठेवला नाहीं; अनुस्वाराची क्षिति बाळगली नाहीं; आणि रूपांची पर्वा केलेली नाहीं. वर्षामध्यें तीनशेंपांसष्ट जरी समारंभ झाले, तरी प्रश्नचिन्ह ह्मणून तोंड दाखवावयाचें नाहीं, हा तर बाणा! मग ही मंडळी पुस्तककर्त्यांकडे शिल्लक नव्हती, कां छापखान्यांत दुर्भिक्ष होतें कोण जाणे? आणि यदाकदाचित् ही प्रश्नचिन्हांची स्वारी तोंड दाखवायाला आलीच, तर अशा सुमुहूर्तावर यावयाची कीं, त्या वेळेस कोणत्याच चिन्हाची जरूरी नाहीं!!

अशा पुस्तकास न्यायमूर्ति रावबहादुरासारख्यांनीं "I find it very interesting. The subject has been very ably and instructively treated," असा अभिप्राय दिलेला पाहून मोठा चमत्कार वाटतो. न्यायमूर्तींसारख्या महात्म्यांचें अंतःकरण नेहमींच दयेनें आर्द्र असतें; व याचकाप्रीत्यर्थ आपल्या पदरास झीज लागली तरी सुद्धां ते सोसण्यास तयार होतात. मग चार ओळींच्या अभिप्रायानें जर एखादा ग्रंथकार तृप्त होत असेल, तर ते थोडक्यासाठीं त्याचा अवमान कां करतील? असले अभिप्राय ग्रंथाबद्दलचे नसून ग्रंथकारांविषयींचे होत (?) पण अशा सढळपणानें उभयतांचें माहात्म्य कमी होतें, व 'टक्काशेर भाजी, टक्काशेर खाजा' असा प्रकार जनांस वाटतो. ही गोष्ट ग्रंथकारानें व अभिप्राय देणारानेंही ध्यानांत ठेविली पाहिजे. रावबहादुर ध्रुवांनीं न्यायमूर्ति रानड्यांप्रमाणें जर कांहीं ग्रंथकारांस सूचना केल्या असत्या, तर त्यांचा रसिकपणा आणि थोरवी चांगली व्यक्त झाली असती. वरील

अभिप्राय ह्मणजे ग्रंथकारांच्या आत्मप्रौढीच्या जल्पनांचीच एक तऱ्हा होय. स्वतः-सिद्ध ग्रंथाच्या योग्यतेवरून लोक जी कीर्ति गातात, ती निष्कलंक असून अत्यंत भूषणावह होते. 'फाटकी गोधडी' 'तुटकी वाकळ' 'फटवे वैद्य' 'भुरटे वकील' इ. इ. पुस्तकांचे ह्मणे कर्ते! अशी नामावळ पुढें मांडणें ह्मणजे गोवऱ्याचे, राखेचे व कोळश्याचे ढीग दारांत रचून 'श्रीमंत' 'नवकोट नारायण' ह्मणून ढोलगें पिटविण्यापैकींच उपहासास्पद होय. अशा पोरचेष्टांनीं असलेल्या संपत्तीकडे सुद्धां कोणी ढुंकून पहात नाहीं.

तथापि साधारणपणें पाहिलें तर, हें पुस्तक टाकाऊपैकीं नव्हे हें आनंदानें सांगितलें पाहिजे. घेण्यासारखे गुण ह्या लेखांत बरेच आहेत. गोविंदरावाची ठकबाजी व लफंगेपणा ध्यानांत ठेवण्यासारखा; हरभटाची चिकाटी अनुभविक; नायकिणीच्या गाण्याचा थाट, मारवाड्याच्या भाषणाची नक्कल हीं अगदीं हुबेहुब व मनोरंजक; पोलिस व सेशनकोर्ट ह्यांचा देखावा कोणाचेंही क्षणभर समाधान केल्यावांचून रहाणार नाहीं. शेवटीं निबंध किंवा व्याख्यान आहे. त्यामध्यें शास्त्रीत्या हा विषय चांगलाच प्रतिपादन केला आहे.

ह्यावरून सदरहू पुस्तकांतील लेखांत गुणांचा अंश अधिक आहे हें उघड आहे; व विषय तर असा कीं, त्याची चर्चा होईल तेवढी बरी. ह्यास्तव सदरहू पुस्तक सवडीप्रमाणें संग्रह करावें, किंवा निदान एक वेळ वाचावें हें इष्ट आहे. पुस्तककर्त्यांनीं सदरहू पुस्तकाच्या १५० प्रति 'केरळकोकिळा'च्या वाचकांस बक्षीस देण्यासाठीं दिल्या आहेत. ह्याकरितां जे कोणी वर्गणीदार मागील बाकी पूज्य करतील, किंवा वर्गणी आगाऊ देऊन नवे वर्गणीदार होतील, त्या प्रत्येकास एक एक प्रत आमच्या केरळकोकिळच्या मुंबईच्या ऑफिसांतून (ज० म० गुर्जर, दुकान रामवाडी मुंबई यांजकडून) बक्षीस मिळेल. प्रती वांटावयाच्या खलास झाल्यानंतर पुढें अर्थातच हें बक्षीस मिळणार नाहीं. तरी सदरहू संधि आमचे वाचक फुकट जाऊं देणार नाहींत, होईल तितकी त्वरा करतील, अशी आशा बाळगून व उभय ग्रंथकारांनीं आह्मांवर व आमच्या वाचकांवर येवढी मेहरबानी केल्याबद्दल फार फार उपकार मानून दुसरीकडे वळतों.

---

**मराठी भाषेची लेखनपद्धति**—हा षोडशपत्री निबंध रा. रा. काशिनाथ नारायण साने, रामचंद्र परशुराम गोडबोले, व शंकर रामचंद्र हातवळणे, पुणें—ह्यांनीं प्रसिद्ध करून बऱ्याच लोकांकडे अभिप्रायार्थ पाठविला अहे. हा निबंध थोडक्यांत परंतु मोठ्या मार्मिकतेनें व शोधक बुद्धीनें लिहिला आहे. आणखी,

मराठी भाषेविषयीं आस्था, कळकळ व सरलता हीं फारच तारीफ करण्यासारखीं आहेत. मराठी भाषेमध्यें कितीएक शब्दांचीं रूपें अनेक लोक अनेक प्रकारानें लिहितात; ऱ्हस्वदीर्घांच्या संबंधानें मतभेद करतात; कित्येक शब्दांवर कोणी अनुस्वार देतात, कोणी देत नाहींत. ह्यामुळें फार घोंटाळा होतो. ती अडचण दूर होण्यासाठीं शब्दांस कांहीं ठरींव नियम असावेत हें ह्यांचें ह्मणणें आहे. व ते कसे असावेत, तें त्यांनीं आपल्या मतानें सुचविलें आहे. तरी त्यांत कांहीं फेरफार असूं नये, किंवा तेच प्रचारांत असावेत असाही त्यांचा दुराग्रह नाहीं. पण शिष्य, शिक्षक, ग्रंथकार, वर्तमानपत्रकार, व सामान्य लोक ह्या सर्वांस हितावह होईल अशी कांहीं निश्चित पद्धति असणें मात्र त्यांस अत्यावश्यक वाटतें. आतां हा हेतु स्तुत्य आहे, हें तर उघड आहे. पण तो साध्य होणार कसा? येवढाच काय तो प्रश्न.

कोणी डोकीस पागोटें घालतो, कोणी पगडी घालतो; कोणी रुमाल घालतो, कोणी टोपी घालतो; कानांत कोणी भिकबाळी घालतो, कोणी चौकडा घालतो; गळ्यांत कोणी गोफ, कंठी घालतो, कोणी रुद्राक्ष घालतो; आंगांत कोणी आंगरखा घालतो, कोणी कोट घालतो, कोणी सदरा घालतो; हातांत कोणी सल्कडें घालतो, कोणी आंगठ्या घालतो, कोणी सल्ले घालतो; कोणी धोतर नेसतो, कोणी पाटलोन घालतो, कोणी लंगोटी घालतो; पायांत कोणी जोडा घालतो, कोणी बूट घालतो, कोणी खडावा घालतो, कोणी अनवाणीच चालतो. हें बरोबर नाहीं. सर्वांचे पोषाख एकसारखे असावेत; सर्वांची एकवाक्यता व्हावी; ह्मणजे सोयीचें होईल. ह्मणून कायमचा एक पोषाख ठरवावयास जर कोणी प्रयत्न करूं लागला, तर तो जितपत तडीस जाईल, तितपतच ह्या वरील विद्वान्त्रयाच्या ह्या खटपटीस यश येण्याचा संभव आहे.

अगोदर अशी एकवाक्यता होण्याला, हा निश्चय ठरविणारांच्या आंगीं कांहीं सत्ता पाहिजे, किंवा लोकांत वजन तरी पाहिजे. नाहींतर नवी पद्धति लोक स्वीकारतील कसे? नवी सुधारणा ह्मटली—मग ती कोणत्याही बाबतींत असो—कीं लोकांचा उपहास ठेवलेलाच. ह्यापेक्षां मराठी भाषेची चालू लेखनपद्धति आहे ती बरीच ठरलेली, व सुधारलेली आहे. आणि यद्यपि थोडासा मतभेत असला, तरी लोक समजून आहेत. सुधारलेल्या इंग्रजी भाषेंतही लेखनपद्धति—स्पेलिंग—अनियमित असल्याचें, निबंधकारांसही जर संमत आहे, तर मराठी भाषेंतील कित्येक शब्दांबद्दल त्यांस येवढें कां वाईट वाटावें? निबंधका·

रांनीं कितीही नियम बांधले, तरी इंग्रजीसारख्या निकट सान्निध्याच्या नव्या भाषेंतून येणाऱ्या शब्दांस ते काय करतील? एवंच कांहीं शब्दांचीं रूपें तरी अनियमित राहणारच. सर्व व्यापक नियम करणें, व ते अमलांत येणें—सर्वांनीं ग्रहण करणें—केवळ अशक्य होय. ह्यास्तव सांप्रत प्रचलित असलेल्या लेखनपद्धतींत ढवळाढवळ करण्याची निदान तूर्त तरी आमच्या मतें आवश्यकता दिसत नाहीं.

निबंधकारांनीं तरी बहुतेक नियम कायम ठेवलेलेच आहेत. थोडा बहुत कोठें फेरबदल करून नवे नियम सांगितले आहेत. त्याप्रमाणें शब्द ल्याहावयाचे तर—**रवी, कवी, बंधू, कीर्ती, भक्ती, मूर्ती, नीती;** आणि **ओंबण, कोंबट, इंबला, लांबणदिवा** असें लिहावयाचें! ह्मणजे विचित्रच दिसतें! आणि असें कां? तर 'पोचट'च्या ऐवजीं कानांना ते 'ठसठसीत' लागतात ह्मणून!! हें कोणी ग्रहण करणार नाहीं; अशानें भाषेला शोभा यावयाची नाहीं; आणि अशानें मराठी भाषेंतील घोटाळा मोडावयाचा एका बाजूस राहून अधिक मात्र माजेल, येवढाच आमचा अभिप्राय आहे.

---

# राजयोग

(अं० ४ पृ० ९६ पुढें चालू.)

अध्यात्मशास्त्राशीं प्राणायामाचा काय संबंध? तर तेंही एक प्राणायामाचेंच स्वरूप आहे. मृताचे आत्मे अस्तित्वांत असतात हें जर खरें आहे—मात्र इतकेंच कीं, ते आपणांस दिसत नाहींत.—तर हें अगदीं शक्य आहे कीं, जे आह्मांला दिसत नाहींत; जाणतां येत नाहींत; आणि हातालाही पण लागत नाहींत, असे शेंकडो—लाखों—मृतांचे आत्मे असतील. आह्मी वारंवार त्यांच्या देहांतून जात येत असूं. आणि हेंही शक्य आहे कीं, ते आह्मांला पहात नसतील व जाणतही नसतील. ह्मणजे वर्तुळांत वर्तुळ किंवा ब्रह्मांडांत ब्रह्मांड असल्याप्रमाणेंच. जे एका मंडळांत—एका वर्तुळांत—असतात, तेच एकमेकांस पाहूं शकतात. आह्मांला पांच ज्ञानेंद्रियें आहेत, आणि आमचा प्राण एका विवक्षित चैतन्यस्थितींत आहे त्याच चैतन्याच्या स्थितींतील सर्व प्राणी एकमेकांस दिसतील. पण जे प्राणी आपला प्राण ह्याहून उच्च प्रतीच्या चैतन्यानें व्यक्त करीत असतील ते आह्मांस दिसणार नाहींत. प्रकाशाची प्रखरता आह्मांस इतकी वाढवितां येते कीं, शेवटीं तो आपणांस मुळींच दिसे-

नासा होतो. परंतु कित्येक प्राणी अशा शक्तिमान् डोळ्यांचे आहेत कीं, तसला प्रकाशही ते पाहूं शकतात. तसेंच, प्रकाशलहरी जर अगदीं मंद असल्या तर प्रकाश आह्मांला दिसणारच नाहीं. पण तो पहाणारे मांजर, घुबड इत्यादि प्राणी आहेतच. आमच्या दृष्टीचा पल्ला हा प्राणलहरीचा एक थर आहे. उदाहरणार्थ हें वातावरण घ्या. ह्याचे थरावर थर रचलेले आहेत. परंतु पृथ्वीच्या जवळजवळचे थर वरील थरापेक्षां अधिक अधिक घन आहेत. आपण जर वर वर जाऊं लागलों, तर वातावरण अधिक विरल होत गेलेलें दिसतें; किंवा समुद्राचें उदाहरण घ्या. आपण समुद्राच्या आंत आंत जाऊं लागलों, तर पाणी अधिक अधिक दाट लागूं लागतें, आणि जे प्राणी समुद्राच्या तळीं रहातात, ते वरती येऊं शकत नाहींत. आले तर, त्यांचे फुटून तुकडे तुकडे होतील.

समजा कीं, प्राणाच्या सत्तेखालच्या चैतन्यांत हें सर्व ब्रह्मांड ईथरचा समुद्र आहे. आणि त्या चैतन्याचे पायरीपायरीनें दाट पातळ असे थरावर थर आहेत. अधिक बाहेरचे जेवढे थर आहेत, तेवढे विरळ विरळ आहेत आणि मध्याच्या जवळजवळचे थर जाड जाड होत गेले आहेत. एक एक चैतन्याचा जुडगा एक एक थर बनलेला. समजा कीं, सबंध वस्तु हें एक वर्तुळ, आणि परिपूर्णता हा त्याचा मध्यबिंदु. मध्यबिंदूच्या पुढें पुढें आपणाला अधिक जड जड हेलकावे आढळतात. जड तत्व हें अगदीं बाहेरचें कवच; मन आणि आत्मा हा मध्यबिंदू. नंतर कल्पना करा कीं, ह्या दृश्य शृंखला कापून त्यांचे थर केले. एक एक थर लक्षावधि मैल लांबीचा असून एकजातीच्या चैतन्याचा आहे. आणि तसाच त्याच्यावर दुसरा त्याहून उच्च प्रतीच्या चैतन्याचा तसाच लक्षावधि मैल; ह्याप्रमाणें सारी रचना आहे. ह्यावरून हें खचित आहे कीं, एका जातीच्या चैतन्यांतील प्राणी, एकमेकांस ओळखतील. पण त्याच्या खालच्या थरांतील किंवा वरच्या थरांतील प्राण्यास ओळखतां येणार नाहीं. तरी दुर्बिणीनें आणि सूक्ष्मदर्शक यंत्रानें आह्मांला आमची दृश्यशक्ति वाढवितां येते. आणि उच्च प्रतीच्या चैतन्यांतील किंवा नीच प्रतीच्या चैतन्यांतील शोध करतां येतो. तसेंच प्रत्येक मनुष्याला स्वतःला उंच प्रतीच्या चैतन्यांची किंवा खालच्या प्रतीच्या चैतन्यांची स्थिति आणतां येते, आणि त्यांत काय चाललें आहे, तेंही जाणतां येतें. कल्पना करा कीं, ही खोली आपल्याला दिसत नाहींत अशा प्राण्यांनीं भरलेली आहे. ते एका विवक्षित चैतन्याच्या प्राणांचीं स्वरूपें आहेत. आणि आह्मी दुसऱ्या चैतन्याच्या प्राणांचीं स्वरूपें आहोंत. कल्पना करा कीं, ते अधिक बु-


द्धिमान् आहेत, आणि आह्मी मंद आहोंत. ते जसे प्राणाचे घडलेले आहेत, तसेच आह्मीही प्राणाचेच घडलेले आहोंत. प्राण समुद्रांतलेच सारे भाग; चैतन्याच्या जातीमध्यें काय तो फरक. मला जर बुद्धिमान् चैतन्यामध्यें येतां येईल, तर तो माझ्याकरितां तत्काल बदलेल. मग मी तुह्मांस पहाणार नाहीं; तुह्मी नाहींसे व्हाल; आणि ते दिसूं लागतील. ही गोष्ट खरी असल्याचें कदाचित् तुमच्यापैकीं पुष्कळांस माहित असेल. चैतन्याच्या उच्च प्रतीमध्यें मनाला नेण्याचा जो सारा प्रकार, त्याला योगशास्त्रामध्यें एकच शब्द आहे. त्याला **समाधि** असें ह्मणतात. उच्च प्रतीच्या चैतन्याची स्थिति, मनाच्या परिपूर्ण ज्ञानाची स्थिति, ह्या सर्वांचा **समाधि** ह्या शब्दांतच समावेश होतो. समाधीच्या खालच्या ज्या स्थिति, त्यांच्या योगानें आह्मांस ह्या प्राण्यांचें दर्शन होतें. सत्यवस्तूचें ज्ञान होणें, ही समाधीची अति उच्च स्थिति होय. ह्या प्राण्यांच्या निरनिराळ्या प्रति ज्या तत्वाच्या बनलेल्या आहेत, त्या चिखलाचा गोळा समजला, कीं ब्रह्मांडांतील सर्व चिखलाचें ज्ञान झालें.

ह्यावरून आपणांस कळतें कीं, ह्या प्राणायामांत खरें अध्यात्मशास्त्र ह्मणजे काय, त्याचाही समावेश होतो. तसेंच आपणांस हेंही आढळून येईल कीं, जेथें जेथें ह्मणून धर्मपंथ किंवा मनुष्यें एखादें गुप्त, गूढ, अज्ञात असलेलें व्यक्त करण्याची खटपट करतात, तेथें तेथें हा योगच असतो. ती खटपट ह्मणजे प्राणावर सत्ता चालविणें. आपणांस हेंही आढळून येईल कीं, जेथें शक्तीचा अद्भुतपणा दिसून येतो, तेथें प्राणाचें स्वरूप असतें. वैद्यशास्त्राचा सुद्धां ह्या प्राणायामांतच समावेश होतो. आगगाडीचें एंजिन कसें चालतें? वाफेच्या द्वारें प्राण कार्य करतो. विजेपासून होणारे नाना प्रकारचे अद्भुत चमत्कार वगैरे प्राणाशिवाय काय आहेत? वैद्यशास्त्र ह्मणजे तरी काय? बाह्य साधनांनीं प्राणायाम करणें. प्राण हें मानसिक शक्तीचें स्वरूप असल्यामुळें, मानसिक शक्तीनेंच ताब्यांत येऊं शकतें. प्राणायामाचा जो भाग शारीरिक साधनांनीं प्राण्याच्या शारीरिक स्वरूपावर सत्ता चालविण्याची जी खटपट, तिला वैद्यशास्त्र असें ह्मणतात. आणि जो भाग मानसिक शक्तीनें प्राणाच्या मानसिक स्वरूपांवर सत्ता करण्याची खटपट करतो, त्याला '**राजयोग**' असें ह्मणतात.

**तिसरें प्रकरण समाप्त.**

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar at JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

# श्रीमन्महाराज करवीर आणि ह्मैसूरसरकार यांचे आश्रयाखालीं.




## स्वधर्माभिमानी यांकरितां हिंदु वॉचेस.

हीं वॉचेस दिखाऊ, मजबूत, वजनांत हलकीं, मध्यम आकार, बरोबर वेळ दाखविणारीं, पांढऱ्या मिन्याचे प्लेटवर सुंदर प्रेक्षणीय हिंदु पूज्य दैवतांचीं चित्रें वगैरे. हें वॉच एकवार घेतल्यास १०,२० वर्षें दुसरें घ्यावयास नको.

**हिंदु युनिव्हर्सल वॉच.**

ग्यारंटी ३ ते ६ वर्षें. रोमन आंकडे असून मध्यभागीं फक्त शंकरपार्वती व गजानन. निकलसिल्व्हर वॉच किं. रु. १६. चांदीचें वॉच किं. रु. ३०, सोन्याचें वॉच किं. रु. २५०.

**हिंदु प्राईज वॉच**—ग्यारंटी २ ते ५ वर्षें. मराठी व रोमन आंकडे असून चित्रें १६ आणि मध्यभागीं **श्रीमहादेवपार्वती.**

**निकल सिल्व्हर वॉच**—किं. रु. १५, चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३०, सोन्याचें किं. रु. १५०.

**हिंदु प्रिव्हलन्स वॉच**—ग्यारंटी १ वर्ष ते ४ वर्षेंपर्यंत—डबल आंकडे, चित्रें १५ असून मध्यभागीं दरबारी थाटानें **श्री. शिवाजी छत्रपतिमहाराज.** नि. सि. वॉच किं. रु. १०, १५. चांदीचें किं. रु. २५-३०.

**हिंदु आर्मी वॉच**—डबल आंकडे असून चित्रें २२. मध्यभागीं **श्री. शिवाजी महाराज** घोड्यावर बसलेले. निकल सिल्व्हर वॉच कि. रु. १० ते १५. चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३०. शिवाय **वेस्टंड रिलायन्स जॉन ड्यारेल, कुरवायझर** वगैरे प्रसिद्ध मेकरांचीं लहानमोठीं वॉचेस आमचेकडे विकत मिळतील.

जुलै, आगष्ट, सप्टंबर. (वर्षाची वर्गणी १८३ ट. खर्चासह.) १८९८.

# केरळकोकिळ.

वर्षारंभ जानेवारी.

पु० १२] [अं० ७।८।९

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्तवापराधः ।
सहकारतरौ चकार यस्ते सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

महादेव गुर्जर बुकसेलर आणि
रामवाडी
मुंबई.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

प्याकिंग पोस्टेज निराळें, वॉचबरोबर एक शेडा, पेटी, काच आणि स्प्रिंग मिळेल. व्ही. पी. पार्सलनें पाठवूं.

सर्व प्रकारचे वॉचेसची दुरुस्तीकामें माफक आकारानें ग्यारंटीसह करून देऊं.

सचित्र क्याटलाग फुकट. [४–१२

जी. बी. नाईक आणि कंपनी,

भायखळा, मुंबई आणि पुणें.

---

# धि इंडियन म्यारेज ऍण्ड डेथ बेनिफिट फंड लिमिटेड, मुंबई.

डिरेक्टर्स.

रावसाहेब दलपतराम प्राणजीवन खक्कर जे. पी.

बद्रुद्दिन अब्दुल्ला कूर एस्कायर जे. पी.

रुस्तम बी. पेमास्तर एस्कायर बी. ए. एल्. एल्. बी.

धनजीशा फ्रामजी चिनाय एस्कायर.

विष्णु नारायण परुळकर एस्कायर ( एक्स आफिशिओ ).

मध्यम स्थितींतील मनुष्यांस आपल्या मुलांमुलींच्या लग्नाचे वेळीं व आपल्या मरणानंतर आपल्या वारसांकरितां पैशाचा संग्रह करून ठेवितां यावा ह्मणून हा फंड १८९४ मध्यें स्थापन झाला आहे. इतक्या अवधींत ३००० पेक्षां जास्त मेंबर झाले असून सरासरी १५० मेंबरांस फायदा मिळाला आहे. लग्नफंडाची वर्गणी दर महिन्यास १। पासून ६। रु. पर्यंत आहे.

**मरणफंडाची वर्गणी फक्त १ रुपया आहे.**

व या मरणफंडांतील मेंबरांच्या पश्चात् त्यांच्या वारसांस २००० रुपयेपर्यंतची रक्कम फायद्यादाखल मिळेल. जास्त माहिती खालील पत्त्यावर एक आण्याचें तिकिट पाठविल्यानें मिळेल. [७–१२

आफीस—५ कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

परुळकर ऍण्ड कं०
एजंट्स.

---

जुलै, आगष्ट, सप्टंबर. (वर्षाची वर्गणी १८३ ट. खर्चासह.) १८९८.

# केरळकोकिळ.

वर्षारंभ जानेवारी.

पु० १२] [अं० ७।८।९

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्तवापराधः ।
सहकारतरौ चकार यस्ते सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

महादेव गुर्जर बुकसेलर आणि
रामवाडी
मुंबई.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

## जुलै, आगष्ट, सप्टेंबर या अंकांतील विषयांची अनुक्रमणिका.


| जुलै. | पृष्ठ. | आगष्ट. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| डांस. ... ... ... | १४५ | गिलेडा.... ... ... | १६९ |
| लोकोत्तर चमत्कार (बुऱ्याचीं झाडें.)... ... ... | १५५ | घोलवडची अंबा. ... | १७६ |
| लोकोपयोगी कृत्यांत व उद्योगधंद्यांत मानापमान खुंटीस लावला पाहिजे.... ... ... | १५८ | पुस्तकपरीक्षा ... ... | १७८ |
| | | सप्टेंबर. | पृष्ठ. |
| | | आनंदाची पर्वणी.... ... | १९३ |
| | | आनंदोत्सव ... ... | २०५ |
| पश्चात्ताप–सद्गुरूस प्रार्थना | १६८ | पुस्तकपरीक्षा .... ... | २०९ |


## पुस्तकांची पोंच.

१ लोकमतविजय–अथवा केवळ सुष्टदुष्ट मनोविकारांचा एक विचित्र खेळ.

२ अव्यक्तबोध.

---

१ कोल्हापूर इलाख्याचा औद्योगिक पाहणीचा रिपोर्ट. २ मुलामुलींस खाऊ. पुष्प. १।२।३. ३ मालविकाग्निमित्र नाटक. ४ शेवटचा शूर वावेर. ५ मराठी ग्रंथसंग्रह–ठाणें. रा. रा. वि. कों. ओक ह्यांचें भाषण. ६ मराठी ग्रंथसंग्रह–ठाणें–चौथा वार्षिक रिपोर्ट. ७ कोन्हेरकृत व्याकरणसार. ८ पद्यात्मक मद्यनिषेध. ९ प्रिन्सिपाल गो. ग. आगरकर ह्यांचें चरित्र. १० औषधें घेण्याची रीति–श्रीधूतपापेश्वर आरोग्यमंदिर–पनवेल. ११ अहिल्याचरित काव्य. १२ मराठी ग्रंथसंग्रह–ठाणें–पांचवा वार्षिक रिपोर्ट. १३ अगदींच नवीन. १४ ना० बाळ गंगाधर टिळक यांच्या चरित्रावर पोवाडा. १५ हिंदुस्थानचा इतिहास–मुसलमानी रियासत. रा. रा. मो. ग. लोंढेकृत पुस्तकें–१६ बोधसुधा. १७ बोधमाला. १८ शतकत्रय. १९ ऐतिहासिक संगीत. २० बोधामृत. २१ नशीब आणि उद्योग. २२ पुष्पमाला. २३ पुष्पगुच्छ. २४ पुष्पावली. २५ बोधशतक. २६ मुलांचें प्राथमिक शिक्षण.

हीं पुस्तकें पाठविणारांचे फार आभारी आहोंत. लौकर अभिप्राय येण्याविषयीं प्रत्येकाची उत्कंठा सारखीच. सर्व पुस्तकें लक्ष्यपूर्वक वाचावयाचीं; नंतर अभिप्राय लिहावयाचा; इतर विषयांकडे लक्ष्य पुरवावयाचें; कोकिळाचा सांचा लहान; ह्या सर्व गोष्टी ध्यानीं आणून विलंबाबद्दल पुस्तकें पाठविणारांनीं आम्हांवर

थोडीशी मेहेरनजर करावी. तथापि, ह्या वर्षी पुस्तकपरीक्षेकडे अधिक पानें करून होतील तितके लौकर अभिप्राय संपविण्याचा विचार आहे.

## जिनसांची पोंच व अभिप्राय.

रा. रा. यशवंत बाळकृष्ण क्षीरसागर–गिरगांव, मुंबई, यांजकडून १ ब्लाटिंगपेपरचें पुस्तक–चार आण्यांच्या किंमतीला ही फारच सुरेख व अत्युपयोगी वस्तु आहे. पुट्ठा जाड व सुरेख; आकार सुबक; टिपकागद चांगले. ह्यामुळें पुष्टिपत्राच्या पुष्टिपत्र होऊन पत्र वगैरे लिहितांना हात खोळंबावा लागत नाहीं, आणि कागद शोधावा लागत नाहीं. हें पुस्तक आह्मांस आवडलें आणि पुष्कळ उपयोगी झालें.

२ श्रीमच्छत्रपती महाराजांची तसबीर–ही लिथोग्राफावर एकरंगी उत्तम प्रतीची तयार केलेली असून, तींत उपलब्ध तसबिरीची साम्यताही यथातथ्य उतरली आहे. छाया भरणाराची कुशलता तारीफ करण्यासारखी आहे.

३ राष्ट्रीयसभेचा जन्म–हीही लिथोग्राफाचीच एकरंगी भव्य तसबीर आहे. हिच्यामध्यें आर्यमाता आपल्या नूतन राष्ट्रीयसभारूप कन्येस हातावर घेऊन आपल्या पुत्रांस दाखवीत आहे असा देखावा आहे व सभोंवार बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी वगैरे पुरस्कर्ते आनंदातिशयानें तिजकडे पहात आहेत. प्रत्येकाच्या चेहेऱ्यांत साम्यता आहे ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. आपल्या देशांतील चित्रकलेच्या मानानें हेंही चित्र बऱ्यांपैकीं आहे. परंतु डिझाइन, व परस्पेक्टिव्ह ह्या संबंधानें त्यास तितका मान देतां येणार नाहीं.

रा. रा. कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य, आंजर्लें–यांजकडून:—

१ उत्तम सुगंधी अत्तरें वगैरे सामानाची पेटी–दोन पेट्यांची शास्त्रीबुवांनीं मुद्दाम दिपवाळीकरितां भेट पाठविली आहे. ह्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें जिन्नस आहेत:—

१ लांकडी पेटी आंगच्या कुलपाची–चांगली आहे. २ गुलाबी अत्तराची कुपी. ३ केवड्याच्या अत्तराची कुपी. ४ मोतिया. ५ हीना. ६ मेलिया.

हीं सर्व अत्तरें उत्तम आहेत. भेसळ वगैरे नाहीं.

७ ओलें कुंकू–रंग चांगला व चिकटपणाही बेताचा आहे. ८ रवे–चांगले लाल आहेत. ९ कातगोळ्या–(कस्तुरीमिश्रित.) तारीफ करण्यालायक. १० कस्तुरीमिश्रित अंबरची डबी–सुवास उत्तम पण चिकटपणा कां? ११ तंबाकूच्या गोळ्या–अंहः!–तद्भक्तांचें हाणणें खुमासदार आहेत खऱ्या.

शास्त्रीबुवांचा वैद्यकीचा पूर्वापार धंदा सर्वविश्रुतच आहे. आतां 'सुगंधी पेट्यांची' त्यांनीं व्यवस्थित नवी टूम काढिली आहे. ...च्या लोकांकडून भेसळ अत्तर घेण्यापेक्षां ही तीन रुपयांची पेटी घेणें बरें. हें मनांत आणून सर्व लोक शास्त्रीबुवांस आनंदानें आश्रय देतील अशी आशा करितों.

एडिटर्स एण्ड प्रोप्रायटर्स.


यांचा कदाचित् गुण नच आल्यास पैसे परत देऊंच.

## मंत्रसिद्ध ताईत व दोरे.

हिमालयावरील एका महान् तपस्वी (सिद्ध) पुरुषानें आमच्या निःसीम भक्तीस तुष्ट होऊन आपला अत्यंत उपयोगी असा जो पिशाचबाधा व दुसरे अनेक विकार दूर होणारा अद्भुत मंत्र तो ताईत व दोरे मंत्रून देण्यास शिकविला आहे; व त्या योगानें खालील विकार फार त्वरित बरे होतात. पिशाचादि पीडेनें मुलें, स्त्रिया किंवा पुरुष झोंपेंत अगर जागृतावस्थेंत घाबरतात, कंप सुटतो, वेड लागतें, दांतओंठ चावतात, दचकून उठतात, व कधीं ज्वरादि विकार उत्पन्न होतात आणि कित्येक प्रसंगीं अपस्मार, भ्रम वगैरे अत्यंत वाईट रोग उत्पन्न होतात. कित्येक स्त्रियांस पिशाचादि पीडेनें संतती होत नसते व झालीच तर वांचत नसते. कित्येकांस स्वप्नामध्यें स्त्रीचा भास होऊन धातुपात होतो; कित्येक स्त्रीपुरुषांमध्यें व कित्येक मित्रांमध्यें वैमनस्यें उत्पन्न होतात, इत्यादि अनेक विकार या आमच्या अद्भुत मंत्रसिद्ध ताईत व दोरे यांनीं फार त्वरित खात्रीनें बरे होतात. गुणाबद्दल हजारों सर्टिफिकिटा मिळाल्या व मिळत आहेत. थोड्याच काळांत याचे अपूर्व गुण या देशाच्या आसमंताद्भागीं ब्रह्मदेश, सिलोन, बनारस, पंजाब, मद्रास, मुंबई, कानडा, इत्यादि ठिकाणीं अतिशय पसरले आहेत; सबब जास्त वर्णन करीत नाहीं. सिद्धमंत्र खोटे ह्मणणारांनीं एकवार अनुभव घेऊन पहावा, ह्मणजे ते नेहमींच ग्राहक बनतील. पुरुषांचे विकारांस दोरा, किं० ८ आणे. स्त्रियांचे विकारांस ताईत १ रु०; रुप्याचा २ रु०; सोन्याचा ६; कित्येक रोगांस दोन वस्तू घ्याव्या लागतील. दोन वस्तू घेणारास ४ आणे, टपालखर्च माफ. एकवार अनुभवानेंच पूर्ण खात्री होईल. माहितीखर्डा सोबत पाठविला जाईल. व्ही. पी.नें पाठवूं. पत्ता स्पष्ट व पूर्ण लिहावा.

विष्णुबोवा सिद्धमांत्रिक,

५–१२] पत्ता—पोष्ट हर्णै, जिल्हा रत्नागिरी

# डांस.




डांस हा एक सूक्ष्म जंतु असून तो कानांपाशीं गुणगुणतो, व दंश करून अतिशय त्रास देतो. इतकीच काय ती ह्या प्राण्याविषयीं आह्मांस माहिती असते. परंतु सूक्ष्मदर्शक यंत्रांतून याच्या शरीराचें निरीक्षण केलें तर त्याच्यांतील अनेक अद्भुत चमत्कार दृष्टिगोचर होतात. तो एक अस्सल शिकारी आहे. त्याच्या भात्यांत तरवार, करवत, भाला, बर्ची इत्यादि फारच तीक्ष्ण आयुधें असतात. शिवाय, त्याचीं जीं रूपांतरें होतात, तीं तर फारच विलक्षण! ह्या सर्वांवरून सूक्ष्म प्राण्यांच्या शरीररचनेंतही, विधात्यानें किती दूरवर दृष्टि पोंचविली


आहे, व केवढें अप्रतिम चातुर्य खर्च केलें आहे, ह्याचा अंतःकरणांत प्रकाश पडतो, आणि त्याच्या ठिकाणीं पूज्यबुद्धि वाढते. ह्यास्तव तीच हकीगत साद्यंत सांगण्याचें येथें योजिलें आहे.

डांस हा शब्द 'दंश' ह्या शब्दावरून निघाल्याचें उघड दिसतें. डांस हे कांहीं मनुष्याच्या रक्तावर, कांहीं जनावरांच्या रक्तावर, कांहीं बारिक बारिक किड्यांवर, व कांहीं फुलांतील मधावर उपजीविका करून राहतात. सर्व हवेंत, सर्व देशांत, रानांत, वनांत, घरांत सुद्धां हे प्राणी हिंडतांना, चावतांना, व घोंगावतांना दृष्टीस पडतात. ह्यांतील कित्येकांस रक्त काढून खाण्यासाठीं परमेश्वरानें सहा, व कित्येकांस पांच, व कित्येकांस दोन शस्त्रें दिलेलीं आहेत. लांब भाला असतो तो शिवाय. प्राणिशास्त्रवेत्त्यांनीं डांसाचा इतिहास फारच मौजेचा लिहून ठेवलेला आहे. खरें ह्मटलें तर, डांस हा एक त्रासदायक जंतु आहे. तथापि त्याचें वर्णन ऐकणें हें एक अत्यंत मनोरंजनाचें साधन आहे. तें ऐकलें ह्मणजे आपला जीव आश्चर्यानें थक्क होऊन जातो.

डांसाचें शरीर लांबट असून नळीसारखें असतें. तो विश्रांति किंवा झोंप घेत असला ह्मणजे त्याचे दोन्ही पंख एकमेकांवर अगदीं आडवे (+) फुलीप्रमाणें पडतात. हा एक त्याच्यांत—किंवा त्याच्या पंखांत ह्मणा—विशेष धर्म आहे. हे पंख, व त्याजवरील चित्रविचित्र रंगांची जाळी, हीं सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिलीं ह्मणजे अतिशयच मनोरम दिसतात. त्याच्यांतील ज्ञानतंतु, त्याच्या कडा हीं अत्यंत सूक्ष्म व पारदर्शक पापुद्र्यानें मढविलेलीं असतात. ह्यामुळें तो सर्व देखावा एखाद्या पैलू पाडलेल्या झुंबरावर सूर्यकिरण पडल्याप्रमाणें मनाला ल्हादक दिसतो. त्यांची आकृति बदामी असून पुढें शंकाकार असते. हे पडदे सर्व शरीराच्या भागावरही पसरलेले असतात. डांसांच्या मिशा—किंवा स्पर्शेंद्रियें—विशेषेंकरून नरांचीं, परांनीं युक्त असतात ह्मणजे नारळीच्या झांपाप्रमाणें त्यांस अत्यंत सूक्ष्म केंसाचे दोहों बाजूंस सारखे झुबके लागलेले असतात. हें इंद्रिय बाजूस दिलेल्या आकृतींत दाखविलें आहे.


डांसाचें स्पर्शेंद्रिय.

ह्यांच्या डोळयांवर जाळें पसरलेलें असतें, आणि ते डोळे येवढे मोठे असतात कीं, बहुतेक मस्तक त्यांनींच व्यापलेलें असतें ह्मटलें तरी चालेल. कित्येकांच्या डोळयांचा रंग सुंदर हिरवा असतो. पण कांहीं विवक्षित प्रकाशांत ते तांबडे लाल दिसतात! बाजूस दिलेल्या आकृतींत डांसाचें मस्तक दाखविलें आहे. त्यांत हत्तीच्या गंडस्थळाप्रमाणें जे दोन वाटोळे गोळे दिसतात, ते डोळे होत. दोहों बाजूंस दोन मिशा, व मध्यें त्याचा भाला किंवा बर्ची हें हत्यार दाखविलें आहे.




डांसाचे डोळे, मिशा आणि बर्ची.

डांसाला आमचें चामडें फाडण्यासाठीं परमेश्वरानें जो अवयव दिला आहे, त्यास आह्मीं भाला किंवा बर्ची असें नांव दिलें खरें. पण तेंच कांहीं त्याचें प्रत्यक्षतः शस्त्र नव्हे. वरून दिसण्यांत मात्र तेंच शस्त्र असावें असें वाटतें. पण खरा प्रकार अगदीं निराळा आहे. हा सुईसारखा अवयव ह्मणजे, शस्त्रवैद्यापाशीं जशी शस्त्र ठेवण्याची चामड्याची सुंदर पेटी असते, त्याप्रमाणें ह्या डांसमहाराजांची आयुध ठेवण्याची ती एक—कर्णाच्या जन्मकवचाप्रमाणें—स्वयंभू संदूक आहे. तिच्यावर मखमालीप्रमाणें बारीक केंसांचें आच्छादन असतें. ह्या पिशवींत त्याचीं निरनिराळ्या आकाराचीं पांच सहा शस्त्रें असून त्यांचीं टोंकें पुढील अणकुचीजवळ एकत्र झालेलीं असतात; व सहापाती चाकूप्रमाणें तीं त्यास पाहिजे तेव्हां पाहिजे तशीं उघडतां येतात. किंवा ही त्याची संदूक ह्मणजे एक न्हाव्याचीच धोकटी ह्मटलें तरी शोभेल. कारण हिच्या मध्यें वस्तरे, चिमटा, कात्री, नाचकण सर्व कांहीं असतें. येवढेंच नव्हे, तर त्याहूनही अधिक हत्यारें असतात.


त्याच्या इतक्या सर्व हत्यारांचा जुडगा ह्या चिमुकल्या ईश्वरनिर्मित पिशवीमध्यें राहिलेला असतो. हीच त्याची नांगी होय. दंश करतांना डांस हा, ही नांगी $\frac{3}{4}$ आंत जाईल इतकी चामडीमध्यें खुपसतो. नंतर ती धनुष्याकार वळवून, तिच्या मुळांत असलेलें दुसरें सुईसारखें

शस्त्र दुसरीकडून खुपसून पहिल्या टोंकास मिळवितो. नंतर कर्वत, चाकू, इत्यादि दुसरीं शस्त्रें असतात त्यांच्या साह्यानें मांसाचा तुकडा पाडतो, आणि मग चिमट्यानें उचलून तो मुखांत घालतो. पण ही इतकी क्रिया एका निमिषार्धांत होऊन जाते. परंतु जर का इतक्यां-तच मनुष्याची एखादी तीव्र चापटपोळी बसली, आणि हे शस्त्रवैद्य त्या तावडींत सांपडले, तर त्यांच्या त्या धुरंधर शस्त्रांसह त्यांच्याच प्राणांची शिकार होते, हें सांगणें नकोच !

ह्या डांसाच्या संदुकींत किती शस्त्रें असतात, ह्याचा अद्याप पुरता शोध लागला नाहीं. कित्येक शोधकांनीं मुद्दाम डांस धरून ते आपल्या आंगास चावून घेऊन प्रयोग करून पाहिले. तरीही सर्व शस्त्रांचा बरोबर शोध लागला नाहीं. ह्याचें कारण, तो ज्या वेळेस हीं शस्त्रें बाहेर काढतो त्या वेळेस तीं, आपल्या मांसांत बहुतेक रुतलेलीं असतात; व बाहेर येतांना तीं चटकर आपोआप त्या पिशवींत—किंवा भात्यांत—गुप्त होतात. ह्यामुळें पहावयाला अशक्य होत. एक शस्त्र तरवारीप्रमाणें बांकदार पात्याचें असतें. एक शस्त्र तरवारीच्या पात्यासारखें असून त्याच्या दोहों बाजूंसही तीक्ष्ण धारा असतात. एक



शस्त्रकोश व शस्त्रें.



शस्त्रांच्या जाती व पातीं.

भाल्यासारखें असून पुढें त्रिकोणी टोंक असतें, आणि एकास हुबेहुब कर्वताप्रमाणें दाते असतात. एक चिमटा व एक कातर असते. ह्यां-पैकीं पहिलीं तीन शस्त्रें वरील चित्रांत दाखविलीं आहेत.


हीं शस्त्रें इतकीं बारिक असतात कीं, अतिशय बारिक सुईच्या

अग्राची आणि त्यांची तुलना करणें ह्मणजे, सुईच्या अग्राची आणि तरवारीच्या पात्याची तुलना करण्यासारखें आहे. डांसाचीं शस्त्रें इतकीं बारिक व तीव्र आहेत, व दंशामध्यें इतकी जबरदस्त क्रिया घडते, तर त्यापासून येवढी मोठी इजा व वेदना कां होत नाहीं? दंशाच्या ठिकाणीं एकदम भली मोठी सूज कां येत नाहीं? लहान लहान गांदीच कां उठतात? पण खरोखर तशा दुःसह वेदना उठतील, व तशी मोठी भयंकर दुखापत होईल, तर ह्या राजेश्रींना कोणताही प्राणी, थाऱ्यामोऱ्यास उभा करणार नाहीं, आणि बहुतकरून फांके मारण्याचीच पाळी येईल. ह्याकरितां जगन्नियंत्यानें योजना केली आहे, ती केवळ अजब आहे. ह्मणजे डाक्टर डांस ह्यांनीं आपल्या पोटापुरतें मांस कांढून घेतल्यानंतर ती जखम धुवावी, किंवा तींत लगेच औषध भरावें येवढी कामगिरी त्यांजवर सोंपविली आहे. ती ते इमानें इतबारें बजावतात.

ह्मणजे ह्याचा अर्थ इतकाच कीं, डांसाची जी हत्यारांची संदूक असते, तींतच एक, एका प्रकारच्या रसानें भरलेली पिशवी असते. हीच ह्या छोट्या डाक्टराची 'ड्रापिंगबॉटल' होय. प्राण्याच्या मांसाचा तुकडा तोडून घेतला, कीं त्या जखमेंत औषध भरावें, किंवा धुऊन काढावी, त्याप्रमाणें डांस तींत आपल्या नळींतील रसाचा एक थेंब टाकतो. पण ही योजना औषधाची आहे कीं धुण्याची आहे हें पक्केपणीं सांगवत नाहीं. कारण, ह्या रसाच्या घटकद्रव्यांचा कोणीं बरोबर शोध लावल्याचें अद्याप दिसत नाहीं. हा रस शुद्ध पाण्यासारखा असतो येवढें मात्र कळलें आहे; आणि त्यावरून दोन्हीं कार्यें त्याजकडून होतात असें दिसतें. कारण, तो पातळ असल्यामुळें जखम धुण्याचें कार्य होतें, हें तर उघडच आहे. शिवाय, डांसाच्या दंशावर औषध ह्मणून जें आहे, तें पाणीच आहे. कितीही डांस चावले, कितीही मोठ्या गांदी उठल्या, तरी, त्याजवर पाणी लावावें, त्या पाण्यानें धुऊन टाकाव्यात, किंवा फार तर त्यांवर पाण्याची धार धरावी. ह्मणजे तत्काळ वेदना, आग, कंडू हीं नाहींशीं होतात, आणि चामडी थोड्याच वेळांत पूर्ववत् होते, हा अनुभव आहे. तेव्हां त्या रसांत बहुधा विशेष कांहीं औषधी नसून फक्त शुद्ध पाण्याचीच तजवीज परमेश्वरानें ठेवलेली असावी असें वाटतें. किती अपूर्व आणि अतर्क्य योजना ही!!!

येथपर्यंत डांसाच्या दंशाची, त्याच्या हत्यारांची, व त्याच्या साधनांची माहिती सांगितली. पण त्याच्या रूपांतरांत जो चमत्कार दृष्टीस पडतो, तो ह्याहूनही विशेष आहे. डांस आमच्या रक्तावर जेव्हां धाड घालतो, तेव्हां तो सपक्ष प्राणी आहे असें वाटतें. पण मूळ स्वरूप त्याचें तसें नाहीं. तो मूळचा एक किडा असतो, आणि सपक्ष हें त्याचें रूपांतर होय. डांस खरी आह्मांला सारखे बारमहा चावत नाहींत. तर आह्मांला विश्रांति देण्याचाही त्यांचा एक हंगाम आहे. हा हंगाम ह्मणजे त्यांची बाल्यदशा, किंवा पूर्वस्वरूप होय. हें स्वरूप ह्मणजे एक जातीचा किडा होय. हे किडे फार करून पाण्यांत—व विशेषेंकरून खातेऱ्यांत फार असतात; व ते मे महिन्यापासून हिंवाळ्यापर्यंत घाणपाण्यांत पहाण्यांत येतात.

डांसाचें स्थित्यंतर किंवा रूपांतर पाहणें असेल तर, घाण—पाण्याच्या डबक्याकडे दररोज लक्ष्यपूर्वक पहात बसावें. ह्मणजे थोड्याच दिवसांत तें सर्व पाणी डांसाच्या अंड्यांनीं व पिलांनीं भरलेलें दिसेल. अंडीं असतात तीं फार बारिक असतात. परंतु तीं फुटलीं ह्मणजे बराच मोठा किडा दिसूं लागतो. हीं पिलीं लांबट आकाराच्या किड्यासारखीं दिसतात, व त्यांस श्वासोच्छ्वास घेण्याकरितां वारंवार पाण्याच्या सपाटीवर यावें लागतें. ह्या पिलाचें, ह्मणजे डांसाच्या पूर्व स्वरूपाचें चित्र बाजूस दिलें आहे. हा किडा पाण्याच्या सपाटीजवळ येऊन आपल्या श्वासोच्छ्वासनलिकेचें तोंड पाण्याच्या सपाटीवर काढतो. बाजूचें चित्र पहा. त्यांत अ ही त्याची श्वासोच्छ्वासाची नळी आहे. ती शरीराच्या मागच्या भागाकडे असून तिचें तोंडही मागेंच असतें. ही नळी मस्तकावरील



डांसाचें पूर्वरूप.

शिंगाप्रमाणें, त्याच्या शरीराच्या सपाटीहून किंचित् उचललेली असते. ह्यामुळें श्वासोच्छ्वास घेतांना त्यास आपलें डोकें खालीं,—पाण्याच्या तळाकडे—करावें लागतें. श्वासोच्छ्वासनळीच्या शेजारींच दुसऱ्या टोंकाला एक दुसरी ब नळी आहे. ही पहिलीहून आंखूड, आणि शरी-

राशीं बहुतेक लंब अशी असते. ह्या नळीचें तोंड, तें त्याच्या पचनक्रियेच्या नळीचें टोंक—अर्थात् गुदद्वार—होय. ह्या द्वाराच्या सभोंवार कमळाच्या पाकळयांप्रमाणें लांब लांब केंसांची झालर असते. त्यामुळें पाण्यांत असतांना हा अवयव फनेलाप्रमाणें दिसतो. ह्या नळीच्या शेवटाला आणि केंसाळ फनेलाच्या आंतल्या बाजूस पातळ, पारदर्शक खवल्यांचीं चार पातीं असतात. तीं माशांच्या कल्ल्यासारखीं दिसतात. तीं जोडीजोडीनें बसविलेलीं असतात. दोन जोड्या डाव्या बाजूनें निघालेल्या असतात, व दोन जोड्या उजव्या बाजूनें निघालेल्या असतात. ह्या चार पात्यांना—किंवा पंखांना—परस्परांपासून वेगळें होतां येतें.

ह्या किड्याच्या शरीराला मणके मणके असतात; आणि प्रत्येक मणक्याच्या डाव्या बाजूला एक, व उजव्या बाजूला एक, असे दोन दोन, गोंडेवजा, केंसांचे झुबके असतात; आणि गळयापाशीं, दोन वर एक खालीं असे तीन असतात. मस्तक वाटोळें व चपटें असून त्यावर पिंगट रंगाचे दोन डोळे असतात. तोंडाभोंवतीं तर केंसांचे झुबके अनेक असतात. पैकीं दोन पुढें आलेले असून, त्यांचा आकार हुबेहुब चंद्राच्या कोरांसारखा असतो. तोही चित्रांत दाखविला आहे. हे झुबके सारा दिवस लुव् लुव् लुव् करून एकसारखे हालत असतात. ह्याचा उद्देश, त्या प्राण्याच्या तोंडांतून पाण्याचे बारिक बारिक प्रवाह चालू रहावेत हा आहे. त्यास अवश्य लागणारें भक्ष्य—सूक्ष्मदर्शक यंत्रांतून मात्र दिसणारे सूक्ष्मजंतु—आणि मृत्तिकेचे व वनस्पतीचे अत्यंत सूक्ष्म परमाणु हे त्याच्या योगानें धरले जातात.

ह्या स्थितीत असतांना, सर्पानें कांत टाकल्याप्रमाणें त्याला आपलीं कवचें अनेक वेळां टाकावीं लागतात. पंधरा किंवा वीस दिवसांत त्याला तीन वेळ कवचें टाकावीं लागतात. चवथ्यांदा कवच टाकलें, ह्मणजे मग ह्या स्थितींत त्याला फार दिवस रहावें लागत नाहीं. मग त्यास निराळेंच स्वरूप प्राप्त होतें. पहिलें लांबट शरीर जाऊन त्याचा आकार आंखूड होतो. गुरें निजतांना जसे आपले पाय, मस्तक, शेंपूट एकत्र करून आंगाचें गाठोळें बनवितात, त्याचप्रमाणें ह्या प्राण्याची स्थिति ह्या रूपांतरामध्यें होते. त्याच्या आंगाभोंवतालचे केंसांचे झुबके वगैरे सर्व दुमडतात; शेंपूट पोटाकडून वळून मस्तकास भिडतें, व सर्व

अवयव संकोचित होऊन झुरळासारखा एक प्राणी बनतो. तरी त्याला हालतां येतें, व पोंहतांही येतें. ह्मणून ह्या दुसऱ्या रूपांतरांतही तो पाण्यामध्यें सुखानें विहार करतो.

ह्या स्थितीमध्यें तो कांहींएक खात नाहीं. कारण, त्यास पचनेंद्रियच उत्पन्न झालेलें नसतें. पण एका गोष्टीची त्याला विशेष जरूर असते. ती गोष्ट ही कीं, वातावरणांतून श्वासोच्छ्वास करतां यावा. ह्या दुसऱ्या रूपांतरांत तो आपलें शेंपूट वळवून मस्तकाकडे गुंडाळतो, हें वर सांगितलेंच आहे. तेव्हां अर्थात्‌च त्याची श्वासोच्छ्वासाची पूर्वींची नळी ही, त्या शेपटाबरोबर गुंडाळली जाऊन ती बंद होते. पण विधात्याची तर्तूद त्याच्याही आधीं! ती काय चुकणार? हें दुसरें रूपांतर होण्याचा समय येऊन ठेपला, कीं लगेच गाढवाच्या कानाप्रमाणें, ह्या प्राण्याच्या मस्तकावर दोन शृंगाकृति कोंभ फुटतात. ते पोकळ असतात. त्यांतून त्यास श्वासोच्छ्वास घेतां येतो. हे कोंभ मस्तकावरच असल्यामुळें, ह्या दुसऱ्या रूपांतरांत तो आपलें तोंड, पहिल्या रूपाप्रमाणें पाण्याकडे न करितां वर करतो, आणि त्या कोंभाचीं तोंडें पाण्याच्या सपाटीवर राखून श्वासोच्छ्वास घेतो. ह्या स्थितींतील प्राण्यापासूनच खरा डांस उत्पन्न होतो. तो हळूहळू वाढत असतो. आणि वरील देहावरून आंतील प्राणी ओळखतां येतो. कारण, वरच्या बाजूनें त्याच्यावर पातळ पारदर्शक चामडी मात्र असते.

दुसऱ्या स्थितींतून मुक्त होण्याचा समय आला ह्मणजे, हा प्राणी पाण्याच्या सपाटीवर येतो, आणि मागचा भाग सरळ वर उंच करून आपण पाण्यावर पडतो. अशा रीतीनें क्षणभर गेला ह्मणजे, श्वासोच्छ्वास घेण्याच्या ज्या दोन नळ्या असतात त्यांच्या मधोमध वरील कवच किंवा चामडी फाटते. आणि भराभर उकलत जाऊन त्याची लांबीरुंदी वाढते; व आंतून निघणाऱ्या नव्या डांसाचा भाग दिसूं लागतो, व तो ताज्या रंगावरून सहज ओळखतां येतो. हा रंग हिरवाचार असतो. पूर्वीं तो ज्या कातडींत असतो, तिच्याहून तो फार भिन्न दिसतो.

पडलेली चीर मोठी होत होत एका क्षणांत तो बाहेर निघण्याच्या बेताची होते. नव्या प्राण्याचा लांबडा भाग दिसूं लागतो, आणि मग मस्तक वर येतें. त्या भोंकांतून वर येतांना व पुढील सर्व देह बाहेर

पडतांना—संपूर्ण बाहेर येईपर्यंत फारच पहाण्यासारखा देखावा असतो. ह्या प्राण्याची मुक्तता होतांना त्याला फारच मोठा धोका असतो. तो प्राणी हा वेळपर्यंत जरी पाण्यांत राहतो तरी, उपजतांच त्याला पाण्यासारखें दुसरें भयच नाहीं. तो जर पाण्यावर पडला, किंवा पाण्याचा त्याला स्पर्श झाला, तर आटोपलेंच! त्याचीं बारा वर्षें पूर्ण भरलीं ह्मणून समजावें. ह्याकरितां तो बाहेर पडतांना होईल तितका उंच उंच उभा राहतो. ह्या सर्व गोष्टी आरंभींच्या मोठ्या चित्रावरून चांगल्या लक्ष्यांत येतील. नंतर मग आपल्या शरीराचा भाग हळू हळू पुढें ओढून घेतो, आणि पुन्हा थोडासा उंच होतो. ह्या कामास वरील आच्छादनाच्या खरबरीतपणानेंही त्यास चांगली मदत होते.

अशा रीतीनें डांसाचा बहुतेक भाग उघडा होऊन मस्तक पुढें पुढें येत जातें; आणि तो जसजसा पुढें येतो, तसतसें त्याचें मागचें कवच रिकामें पडत जातें. नंतर त्या पहिल्या कवचाची एक होडीच तयार होते, ह्मटलें तरी चालेल; आणि त्या होडींत पाणीही येऊं शकत नाहीं; आणि आलें तर त्याचा नाश झालाच. डांस हा त्या चिमुकल्या होडीचें शीड बनून राहतो. मोठमोठ्या होड्या, एखाद्या पुलाखालून जाऊं लागल्या ह्मणजे आपलीं शिडें उतरतात, आणि होडी पुलाच्या बाहेर पडली ह्मणजे तीं चढवीत चढवीत पुन्हा ताठ उभीं करतात. डांसही आपलें देहरूपी शीड असेंच चढवीत चढवीत अगदीं ताठ करतो. पण त्याला तें कसें करतां येतें, आणि तो ताठ कसा राहतो, हें सांगतां येणें कठीण आहे. शिडाकडच्या भागाकडे ओझें अधिक असतें ही गोष्ट खरी, पण त्या बाजूला होडीची रुंदीही मोठी असते. ज्यांना होडींत बसण्याचा प्रसंग असेल, त्यांना होडीचा पुढचा भाग किती दबलेला असतो, आणि तिकडच्या कडा पाण्याच्या किती जवळ असतात, हें सांगणें नको.

डांसाचा हा जन्म पाहतांना त्याचें प्रारब्ध मोठें बलवत्तर असें वाटल्यावांचून राहत नाहीं. आणि त्यांतूनही वारा सुटला असला, व पाण्याला खळबळ असली, ह्मणजे तर फारच. पण कित्येकांच्या मनांत अशी कल्पना येईल कीं, त्या लहान जीवाला हवा काय करणार? फार तर त्याची होडी ह्या कडेहून त्या कडेला नेत असेल. तरी, ही एक

गोष्ट लक्ष्यांत घेण्यासारखी आहे कीं, तें कवच होडी होतें तरी, शिडांत फार फरक असतो. ह्मणजे ह्या स्थितींत त्याचीं पंखें त्याच्या आंगाला चिकटलेलीं असतात. तेव्हां तें शीडही कांहीं योग्य होत नाहीं. अवजारें गुंडाळून ठेवलेल्या शिडाप्रमाणें होतें. आणखी ती होडी पालथी होतांना संरक्षण करणारेंही कोणी नसतें. होडी बुडाली, किंवा डांस पाण्यावर पडला, तर त्याला वांचण्याला कांहींच साधन नसतें. पुष्कळदां जन्मतःच मेलेल्या डांसांनीं तलाव भरून गेलेले दृष्टीस पडतात. तथापि डांस हा आपलें बाळंतपण आपण स्वतःच होईल तितक्या नीट रीतीनें जपून करतो, आणि अद्भुत चमत्कार हा कीं, एका क्षणांत त्याचीं सर्व भयें दूर होतात, आणि सुखानें त्याची सुटका होते.

डांस ताठ उभा राहिल्यानंतर प्रथमतः आपले पुढचे दोन पाय ओढून घेतो, आणि मग हळूच मागचेही दोन्ही ओढून घेतो. मग अशा अवघड स्थितींत फार वेळ राहत नाहीं. हलकेंच पाण्याकडे वळण्याचा प्रयत्न करतो. तें लागलें कीं, बेतानेंच त्या पाण्यावर आपले पुढचे दोन पाय टेंकतो. पाण्याचा आश्रय व जडत्व त्या लहान जीवास टेंकावयास पुरे होतात. अशा प्रकारें पाण्यावर तो टेंकला, ह्मणजे पार पडला. इतक्यांत त्याचे पंख सुटतात, व उडण्यासही समर्थ होतो. ही सर्व क्रिया थोड्या मिनिटांतच होऊन जाते. आणि कोणी त्या नव्या प्राण्यास धरावयास गेला तर तो भुर्कन् उडून निघून जातो. तेव्हां तर पहाणारांस फारच चमत्कार वाटतो. कित्येक डांसांचे जन्म वर्षांतून एकदांच होतात. कित्येकांचे तीन चार आठवड्यांतच होतात.

हिंदुस्थानाहूनही अमेरिकेमध्यें डांसाचा उपद्रव फार आहे. तेथील प्रवाश्यांमध्यें गप्पा सुरू झाल्या, ह्मणजे बहुतकरून डांसाचा विषय पहिला. उन्हाळ्यांत स्पेनमध्यें, साऱ्या इतालींत, व फ्रान्साच्या दक्षिणभागांत डांसाचा उपद्रव मनस्वीच असतो. धुरी वगैरे घातल्याच्या योगानें ह्यांचा बराच उपद्रव कमी होतो. परंतु रात्रौ उजेडानें हे प्राणी फार जमतात. ह्यासाठीं झोंप पाहिजे असेल त्यानें जवळ आसपास उजेड ठेवूं नये हा एक मार्ग. किंवा मच्छरदाणी हेंच त्याचें रामबाण औषध. दुसरा कांहीं ठाम उपाय ऐकिवांत नाहीं.

# लोकोत्तर चमत्कार.

## बुऱ्याचीं झाडें.

प्राणी आणि वनस्पति ह्यांचीं स्वरूपें व व्यापकता किती आहे, हें गहन विचाराशिवाय लक्ष्यांत यावयाचें नाहीं. आणि आलें तरी तें इतकें अल्प येईल कीं, त्याची मर्यादा मानवी बुद्धीपलीकडे किती आहे, ह्याची कल्पना सुद्धां व्हावयाची नाहीं. गजापासून मशकापर्यंत प्राणी व कृमिकीटक आमच्या नजरेनें आह्मी पहातों. अत्यंत सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर, खरजेंतील अति सूक्ष्म जंतूही आमच्या डोळयांस दृश्य होतो. पण ज्याची कोणत्याही प्रकारें डोळयांस कल्पना होत नाहीं, असे लक्षावधि जीव सूक्ष्मदर्शक यंत्रांच्या सहायानें आपणांस हल्लींच्या काळीं पहातां येतात. आणखी ह्याहून सुधारलेलीं सूक्ष्मदर्शक यंत्रें निघालीं, तर ह्यांच्याहूनही सूक्ष्म असे लक्षावधि—किंवा कोट्यवधि जीवही कदाचित् मनुष्यमात्रास मिळतील. पण त्याच्याही पलीकडे अज्ञात असे अनंत रहाणारच! तशीच गोष्ट वनस्पतींची आहे.

सृष्टिक्रमाचा सूक्ष्म विचार केला तर असें दिसून येतें कीं, सूक्ष्मापासून मनुष्याच्या अवस्थेप्रमाणेंच—हळूहळू स्थूळ पदार्थ बनले आहेत. अगदीं लहान जीवापासून मोठा जीव, किंवा अत्यंत सूक्ष्म वनस्पतीपासून मोठा वृक्ष बनतो असें विचाराअंतीं दिसून येतें. ह्मणजे बेडूक झाल्याबरोबर लागलाच हत्ती; किंवा कांगुणीचें झाड झाल्याबरोबर लागलाच वटवृक्ष असें झालें नसावें. तर आधीं मासे; किंवा त्याहूनही सूक्ष्म जीव,—जसे कालवें वगैरे—नंतर बेडूक; बेडूक झाल्यावर कासवें; मग सुसरी; तदनंतर चतुष्पाद. आणि त्यानंतर तशाच क्रमानें हत्ती, मेमोथ वगैरे. वनस्पतीकोटीसही तोच नियम लागू. प्रथम शेवाळ; नंतर कमळें; नंतर पेरू; शिताफळी; नंतर मग आंबे, फणस, ताड, माड, किंवा वड, पिंपळ. असा किंवा अशाच प्रकारचा क्रम असला पाहिजे. अशाला बरींच प्रमाणें आढळतात. पण तीं येथें सांगत बसण्याचें प्रयोजन नाहीं. ह्या लेखांत फक्त ज्या वनस्पति आपल्या नुसत्या नेत्रांस दिसत नाहींत, त्यांच्याविषयीं कांहीं थोडीबहुत माहिती सांगावयाची आहे.

गोष्ट लक्ष्यांत घेण्यासारखी आहे कीं, तें कवच होडी होतें तरी, शिडांत फार फरक असतो. ह्मणजे ह्या स्थितींत त्याचीं पंखें त्याच्या आंगाला चिकटलेलीं असतात. तेव्हां तें शीडही कांहीं योग्य होत नाहीं. अवजारें गुंडाळून ठेवलेल्या शिडाप्रमाणें होतें. आणखी ती होडी पालथी होतांना संरक्षण करणारेंही कोणी नसतें. होडी बुडाली, किंवा डांस पाण्यावर पडला, तर त्याला वांचण्याला कांहींच साधन नसतें. पुष्कळदां जन्मतःच मेलेल्या डांसांनीं तलाव भरून गेलेले दृष्टीस पडतात. तथापि डांस हा आपलें बाळंतपण आपण स्वतःच होईल तितक्या नीट रीतीनें जपून करतो, आणि अद्भुत चमत्कार हा कीं, एका क्षणांत त्याचीं सर्व भयें दूर होतात, आणि सुखानें त्याची सुटका होते.

डांस ताठ उभा राहिल्यानंतर प्रथमतः आपले पुढचे दोन पाय ओढून घेतो, आणि मग हळूच मागचेही दोन्ही ओढून घेतो. मग अशा अवघड स्थितींत फार वेळ राहत नाहीं. हलकेंच पाण्याकडे वळण्याचा प्रयत्न करतो. तें लागलें कीं, बेतानेंच त्या पाण्यावर आपले पुढचे दोन पाय टेंकतो. पाण्याचा आश्रय व जडत्व त्या लहान जीवास टेंकावयास पुरे होतात. अशा प्रकारें पाण्यावर तो टेंकला, ह्मणजे पार पडला. इतक्यांत त्याचे पंख सुटतात, व उडण्यासही समर्थ होतो. ही सर्व क्रिया थोड्या मिनिटांतच होऊन जाते. आणि कोणी त्या नव्या प्राण्यास धरावयास गेला तर तो भुर्कन् उडून निघून जातो. तेव्हां तर पहाणारांस फारच चमत्कार वाटतो. कित्येक डांसांचे जन्म वर्षांतून एकदांच होतात. कित्येकांचे तीन चार आठवड्यांतच होतात.

हिंदुस्थानाहूनही अमेरिकेमध्यें डांसाचा उपद्रव फार आहे. तेथील प्रवाश्यांमध्यें गप्पा सुरू झाल्या, ह्मणजे बहुतकरून डांसाचा विषय पहिला. उन्हाळ्यांत स्पेनमध्यें, साऱ्या इतालींत, व फ्रान्साच्या दक्षिणभागांत डांसाचा उपद्रव मनस्वीच असतो. धुरी वगैरे घातल्याच्या योगानें ह्यांचा बराच उपद्रव कमी होतो. परंतु रात्रौ उजेडानें हे प्राणी फार जमतात. ह्यासाठीं झोंप पाहिजे असेल त्यानें जवळ आसपास उजेड ठेवूं नये हा एक मार्ग. किंवा मच्छरदाणी हेंच त्याचें रामबाण औषध. दुसरा कांहीं ठाम उपाय ऐकिवांत नाहीं.

# लोकोत्तर चमत्कार.

## बुऱ्याचीं झाडें.

प्राणी आणि वनस्पति ह्यांचीं स्वरूपें व व्यापकता किती आहे, हें गहन विचाराशिवाय लक्ष्यांत यावयाचें नाहीं. आणि आलें तरी तें इतकें अल्प येईल कीं, त्याची मर्यादा मानवी बुद्धीपलीकडे किती आहे, ह्याची कल्पना सुद्धां व्हावयाची नाहीं. गजापासून मशकापर्यंत प्राणी व कृमिकीटक आमच्या नजरेनें आह्मी पहातों. अत्यंत सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर, खरजेंतील अति सूक्ष्म जंतूही आमच्या डोळयांस दृश्य होतो. पण ज्याची कोणत्याही प्रकारें डोळयांस कल्पना होत नाहीं, असे लक्षावधि जीव सूक्ष्मदर्शक यंत्रांच्या सहायानें आपणांस हल्लींच्या काळीं पहातां येतात. आणखी ह्याहून सुधारलेलीं सूक्ष्मदर्शक यंत्रें निघालीं, तर ह्यांच्याहूनही सूक्ष्म असे लक्षावधि-किंवा कोट्यवधि जीवही कदाचित् मनुष्यमात्रास मिळतील. पण त्याच्याही पलीकडे अज्ञात असे अनंत रहाणारच ! तशीच गोष्ट वनस्पतींची आहे.

सृष्टिक्रमाचा सूक्ष्म विचार केला तर असें दिसून येतें कीं, सूक्ष्मापासून मनुष्याच्या अवस्थेप्रमाणेंच-हळूहळू स्थूळ पदार्थ बनले आहेत. अगदीं लहान जीवापासून मोठा जीव, किंवा अत्यंत सूक्ष्म वनस्पतीपासून मोठा वृक्ष बनतो असें विचाराअंतीं दिसून येतें. ह्मणजे बेडूक झाल्याबरोबर लागलाच हत्ती; किंवा कांगुणीचें झाड झाल्याबरोबर लागलाच वटवृक्ष असें झालें नसावें. तर आधीं मासे; किंवा त्याहूनही सूक्ष्म जीव,-जसे कालवें वगैरे-नंतर बेडूक; बेडूक झाल्यावर कासवें; मग सुसरी; तदनंतर चतुष्पाद. आणि त्यानंतर तशाच क्रमानें हत्ती, मेमोथ वगैरे. वनस्पतीकोटीसही तोच नियम लागू. प्रथम शेवाळ; नंतर कमळें; नंतर पेरू; शिताफळी; नंतर मग आंबे, फणस, ताड, माड, किंवा वड, पिंपळ. असा किंवा अशाच प्रकारचा क्रम असला पाहिजे. अशाला बरींच प्रमाणें आढळतात. पण तीं येथें सांगत बसण्याचें प्रयोजन नाहीं. ह्या लेखांत फक्त ज्या वनस्पति आपल्या नुसत्या नेत्रांस दिसत नाहींत, त्यांच्याविषयीं कांहीं थोडीबहुत माहिती सांगावयाची आहे.

मृत्तिका असें ज्याला ह्मणतात, ज्याच्या योगानें हा सर्व भूगोल बनला आहे, ती सेंद्रिय पदार्थांची बनलेली आहे. ह्मणजे कोटिशः प्राणी व वनस्पति ह्यांच्या कलेवरांच्या समुदायाचें तें एक रूपांतर बनलेलें आहे. ह्याचा खुलासा शब्दार्थांतच होतो. मृतापासून झालेली ती मृत्तिका होय. तसेंच, हिरवा, पिंवळा, निळा, जांबळा इत्यादि सर्व प्रकारचे रंग मिळून सूर्यप्रकाश जसा पांढरा झालेला आहे, त्याचप्रमाणें सर्व प्रकारचे रस एकत्र विलय पावून मृत्तिकेचे घटकावयव झाले आहेत. ह्मणूनच तीस 'रसा' असें ह्मणतात. हे रस पाहिजे तसे पृथक्करण करून निरनिराळ्या प्रकारांतरानें जमिनींतून बाहेर काढण्याचा धर्म निरनिराळ्या बीजांच्या ठिकाणीं आहे. चिंचोका जमिनींत पडला, तर तो तिच्यापासून चिंचेचें झाड, चिंचा इत्यादि उत्पन्न करून आम्लरस निराळा करतो. उंसाचें बीं शर्करा किंवा गोड रस निराळा करतें. काजऱ्याचें बीं कडू रस बाहेर काढतें. इत्यादि.

कित्येक वनस्पतींचीं बीजें आपल्यास दृष्टिगोचर होतात, परंतु कित्येक इतकीं सूक्ष्म असतात कीं, तीं आपल्या डोळ्यांस दिसतही नाहींत. उदाहरणार्थ गवत वगैरे बारिक वनस्पति. कित्येक वनस्पति उत्पन्न होण्याला प्रत्यक्ष बीजाची गरजही लागत नाहीं. वनस्पतीच्या भागापासूनच त्या उत्पन्न होतात. कलमी आंब्यासारखीं झाडें एखाद्या ढाळीपासून तयार होत असलेलीं आपण पहातोंच. पण ह्याहूनही वनस्पति उत्पन्न होण्याचा निराळा प्रकार आहे. तो हा कीं, त्या प्राण्यांच्या किंवा वनस्पतींच्या अवयवांपासूनच उद्भवतात. मग तो भाग सजीव असो, कीं मृत झालेला असो. ह्याचीं स्पष्ट उदाहरणें दोन आहेत. पावसाळ्यांत केरकचऱ्यामध्यें छत्राकार उगवणारी 'कुत्र्याचें मूत' नांवाची वनस्पति हें एक. ह्या वनस्पतीला कुत्र्याचें मूत हें किळसवाणें नांव कशावरून पडलें असावें, ह्याचा कांहींच तर्क होत नाहीं. खरें ह्मटलें तर, कुत्र्याच्या मुताशीं ह्या वनस्पतीचा अर्थाअर्थी सुद्धां कांहीं संबंध नाहीं. ही वनस्पति कुजलेल्या लांकडावर पाऊस पडल्यानें उत्पन्न होते. ह्यावरून बृहद्वनस्पतीच्या कलेवरापासून लघु वनस्पति उत्पन्न होतात हें उघड दिसून येतें. ह्या वनस्पतींत घाण येण्यासारखा कोणताच धर्म नाहीं. पुष्कळ लोक हिची भाजी करून खातात. आणि

तिच्या रुचीविषयीं मनापासून तारिफ करतात. ह्या वनस्पतीचें आयुष्य घटकेवारी असल्यामुळें तिचा उपयोग करणें तर, ताजेपणींच—ह्मणजे ती उत्पन्न होतांच—करावा लागतो. दुसरें उदाहरण जनावरांच्या शिंगांचें. जनावराचें शिंग जर जमिनींत पुरून ठेवलेलें असलें, आणि त्याचा शेंडा वर असला, तर पावसाळ्यांत त्याला कोंब फुटून पानें येतात. आणि जमिनींत मुळें पसरतात! ह्यावरून प्राण्यांच्या मृत अवयवांपासूनही वनस्पति उगवतात, हें सिद्ध होतें. इतकेंच नव्हे, तर सेंद्रिय पदार्थांपासून जशा वनस्पति उगवतात, तसेच प्राणीही पण उत्पन्न होतात. ह्या सर्व गोष्टींचा विचार केला ह्मणजे प्राणी व वनस्पति ह्यांचीं मूलबीजें कशीं चमत्कारिक आहेत, व तीं किती व्यापकतेनें पसरलीं आहेत, ह्याचें बरेंच अनुमान होतें.

अगदीं सूक्ष्मापासून स्थूलापर्यंत कोट्यवधि प्राणी वनस्पति असलेल्या आपण डोळ्यांनीं पहातों. डोळ्यांनीं पण ज्यांचें स्वरूप आपणांस दिसत नाहीं, असे प्राणी व वनस्पतिही पण कोट्यवधि आहेत. थोडीशी हवा सर्द झाली, कीं पुस्तकावरून बुरा आलेला आपण पहातों. फार कशाला? भाकरी जर एक दोन दिवसांची शिळी असेल, आणि ती सर्द हवेंत असेल, तर तिच्यावरही बुरा चढतो. हा बुरा ह्मणजे काय? ह्याचा शोध करण्याकरितां आपण जर सूक्ष्मदर्शकयंत्रांतून पाहिलें, तर तीं सर्व निरनिराळया प्रकारचीं झाडें आहेत असें दिसून येतें. आपल्याला दिसणाऱ्या वृक्षांमध्यें जशा नारळ, पेरू, फणस, वड, पिंपळ इत्यादि जाति आहेत, तशाच बुऱ्यांच्या झाडांतही अनेक जाती आहेत. पुस्तकावर जो बुरा येतो, त्याच्या डाहळया लिंबाऱ्याच्या डाहळयांसारख्या असतात. आणि त्याचें मधील खोड लिंबाऱ्याप्रमाणेंच सुळसुळीत असतें. त्यास फळें फुलें कांहीं नसतात. पण भाकरीवर जो बुरा येतो, त्याचीं झाडें हुबेहुब नारळीसारखीं असतात. त्याच्या खोडावर नारळीप्रमाणें खवले असतात. त्यांच्या शेंड्यास पातीपातीप्रमाणेंच पानें असून शिवाय त्यास नारळासारख्याच फळांचे घोंसच्या घोंस लागलेले दृष्टीस पडतात! हीं फळें अगदीं वाटोळीं गरगरीत असून त्यांच्यावर कठीण कवच असतें. दुसऱ्या कितीएक जातींच्या बुऱ्यामधील झाडांस निरनिराळया प्रकारचीं फुलें गजबरलेलीं असतात. कि-

त्येक झाडांचे वेल दोरखंडाप्रमाणें लांबच लांब पसरलेले असतात. कित्येक झाडांवर ताडपत्राप्रमाणें वर्तुलाकार चक्रेंच गजबरलेलीं असतात. ह्या सर्वांचा विचार केला ह्मणजे आपल्या चर्मरूप इंद्रियांचें ज्ञान किती संकुचित आहे, व ज्ञानेंद्रियांचा पल्ला केवढा अगाध आहे ह्याची थोडी तरी कल्पना मनांत आल्यावांचून रहात नाहीं.

---

# लोकोपयोगी कृत्यांत व उद्योगधंद्यांत मानापमान खुंटीस लावला पाहिजे.

## अभंग.

मानापमानाचें गोवें । अवघें गुंडाळुनि ठेवावें ॥

(तुकाराम.)

साधारणपणें दुनियेंत अशी चाल आहे कीं, आपण मोठें आहों, आपला मान श्रेष्ठ प्रतीचा आहे, आपल्यापेक्षां कमी प्रतीचे लोक हे! त्यांना आपण मदत करणें हें अगदीं कमीपणाचें, मानहानीचें, नीच व हलकें काम, असें बहुतेक मनुष्यांस वाटत असतें. पण ही त्यांची केवढी बरें चूक आहे? आपण मोठे झालों, सरकारदरबारांत आपली मानमान्यता होऊं लागली, आपला दर्जा वाढूं लागला, व लोकांतही चांगलें वजन बसलें, तर आपण आपल्यापेक्षां कमी प्रतीच्या–हाताखालच्या–लोकांच्या काडीमात्रही उपयोगास पडूं नये काय? त्यांस हातभार लावूं नये काय? हाय! हाय! सगळींच जर एक जातीचीं मनुष्येंच आहेत, तर त्यांच्यामध्यें हा भेद–मी मोठा व तो लहान, मी श्रीमंत व तो गरीब, मी बडा व तो हलका हा तिडा कां बरें असावा? परमेश्वरानें मानवी प्राण्यास इतर सर्व–भूचर, खचर, जलचर–प्राण्यांहून बुद्धि, ज्ञान, वाचा, चातुर्य वगैरे अमोलिक देणग्या बहाल केल्या आहेत. त्या कोणास कमी, कोणास जरा जास्ती, कोणास परिपूर्ण अशा कमीजास्ती प्रमाणानें प्रत्येकाच्या ठायीं वास करीत असल्याकारणानें, कोणी उंच पदास पोंचतो, कोणी त्याच्या जरा खालीं राहतो, कोणी अगदीं शेवटच्या पायरीवर लोळत पडतो. तरी जे उच्चपदाप्रत पोंचले आहेत, त्यांनीं इतरांची मुळींच काळजी घेऊं नये काय? आपल्याच वैभवांत, आपल्याच ऐषआरामांत, व आपल्याच आढ्यतेंत गर्क होऊन जावें काय?

गरीबांकडे मुळींच पाहूं नये ! छे ! छे ! थोर लोक जर इतरांकडे कानाडोळा करतील, त्या बिचाऱ्यांची वास्तपुस्त न घेतील, जेथें तेथें त्यांस पायधुळीं लोटतील, तर त्या बिचाऱ्यांची उन्नति कशी व्हावी ? व प्रत्येक देशांत बहुतेक अशाच लोकांचा भरणा जास्त असल्यामुळें, त्यांची जर अशी अवस्था झाली, तर देशाचें तरी कल्याण कसें व्हावें ? तर थोर लोकांनीं असें करणें हें त्यांस चांगलें नव्हे.

बरें, ह्या भेदभावाचें मूळ कशास जखडलें आहे ? मानापमान हा ह्याच्या मुळाशीं आहे. हें एवढें मूळ तोडून टाकलें तर सर्वांचें कल्याण होईल. पण हेंच मुळीं कोणास तुटत नाहीं. त्यामुळेंच देशाची हानि होते. शिरोभागीं दिलेली **तुकारामाची** उक्ति फार प्रगल्भ आहे. मान अगदींच सोडून द्यावा, असें त्याचें ह्मणणें नाहीं. जेथें राखावयाचा, तेथेंच—योग्य ठिकाणींच—तो राखला पाहिजे, हें खरें; 'पायींची वहाण पायीं बरी' हेंही तत्व विसरतां कामा नये हें खरें; सांखळी पायांतच शोभेल, हातांत घालून कोंपरापर्यंत चढविली तर विशोभित दिसेल, शिवाय चारचौघे हांसतील हें खरें; व शिरोभूषण तें शिरोभूषणच, तेथें इतर भूषणें धारण करणें हें गैर, ह्या कविवचनाची पायमल्ली करूं नये हेंही खरेंच. यजमानांच्या लोडाशीं तीन कपड्यांचे आचार्य—आचारीबुवा—खुशाल झोंकांत टेंकून, हातवारे लोकांपुढें यथेच्छ नाचवूं लागतील, तर त्यांस चवदाव्या रत्नाची चमक दाखवून, जरब देणें अगदीं जरूर, हेंही खरेंच. एखादे हरीचे लाल अद्वातद्वा तोंड सोडून, पाणउतारा करतील, तर त्यांची यथायोग्य पूजा केली पाहिजे हेंही खरेंच, त्याविषयीं कांहीं ह्मणणें नाहीं. तथापि इतरांवर दया करण्याची पाळी येऊन ठेपली असतां, किंवा गरीबांचें ओझें हलकें व्हावें—उतरावें—ह्मणून हात लावण्याचा प्रसंग प्राप्त झाला असतां, किंवा एखाद्या लोकोपयोगी कृत्यांत किंवा एखाद्या धंद्यांत उदारपणानें साह्य, मग तें द्रव्यद्वारा किंवा शारीरिक, करण्याची वेळ आली असतां, कांकूं करणें, मागें घेणें, किंवा शेवटची मानापमानाची जाहिरात ठोकणें—आपली प्रतिष्ठा कमी होते ह्मणून टाहो फोडणें—हें मात्र फार लाजिरवाणें होय.

एखादा मोळीविक्या एखाद्या हमरस्त्यानें जात असावा, व त्यानें एखाद्यास "दादासाब ! रावसाब ! वाइच वझ जड झालंया उतरू लागावो धनीसाव" ह्मणून डोकीवरच्या जडभारानें, टांगलेल्या मानेनें, काकुळतीनें—दीनवाण्या स्वरानें, त्या वेळेस रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या शेंकडों माणसांपैकीं एखाद्यास विचारावें ! मग उगीच मजा पहावी. कोणी एखाद्यानें त्याचा स्वर ऐकून, जें

जरासें मार्गें तोंड वळविलेलें असतें, तें तो लगेच फिरवून पुढेंच्या पुढेंच सोसाट्यानें निघून जातो; कोणी त्याच बाजूनें जात असले तरी, मुद्दाम त्याजकडे न पाहतां, आपल्याच ऐटींत छत्री व रुमाल फडकावीत फडकावीतच जोरानें निसटून जातात; मग जे कोणी गाड्या, टांगे, रथ वगैरे वाहनांतून जाणारे बडे लोक असतील, त्यांची आढ्यता तर कांहीं विचारावयासच नको, ते त्याजकडे उगीच ओझरता डावा डोळा करून तरी पहात असतील कीं नाहीं, याचा वानवाच. 'ए चलो चलो' 'पैस पैस' ह्मणत ह्मणतच घोडे उधळीत निमिषार्धांत मैल दोन मैल निघून जावयाचे. मग एखादा कोणी बापडा त्याच्यासारखाच हात लावावयास मिळाला तर मिळावयाचा. बाकी सगळा शून्याकार. जो तो आपल्याच प्रौढींत. अगोदर कोणाचें तिकडें लक्षच जावयाचें नाहीं. बरें यदाकदाचित् गेलेंच तर जो तो मनांत ह्मणणार 'मी मोठा विद्वान्, मी मोठा धनाढ्य, मी मोठा सावकार, मी मोठा व्यापारी, मी मोठा हुद्देदार कामगार, मी राव, तो रंक,' ह्यामुळें त्यास हात लावणें ह्मणजे अपमान होय, लांछन होय, बेचाळीस पिढ्या नरकांत लोटून देणें होय; असें जणूं काय ज्यास त्यास वाटत असतें. ह्यांत त्यांस अप्रतिष्ठा वाटते. पण उलट ह्यांत त्यांस प्रतिष्ठा वाटावी, कीं आपण गरीबांस साह्य केलें. आणि असें जो बडा गृहस्थ करील, त्याची कीर्ति अधिक उज्ज्वल होईल. कारण लोक त्याची उलटी जास्त महती गातील कीं, "काय हो, तो पहा एवढा थोरला बडा कीर्तिमान् गृहस्थ, पण त्यानें मोळीविक्यासही हातभार लावला. एकूण धन्य त्याची." ह्मणून उलट अशा गोष्टीचा त्यांस अधिक अभिमान वाटावा. त्यांत अपमान तो कसचा ? एकदां वॉशिंग्टनानें कांहीं लोकांस स्वतः हातभार लावल्याविषयीं एक गोष्ट प्रसिद्ध आहे. ती येणेंप्रमाणें:—

**अमेरिकन् वार** (अमेरिकेंतील लढाई) चालली असतां, एकदां एका लहानशा पोलिस शिपायांच्या टोळीवरचा एक नाईक, आपल्या हाताखालच्या शिपाईलोकांना एक जंगी तुळवंड, एका उंचशा लष्करी जाग्यावर चढवावयाचें होतें, तें चढविण्याविषयीं सारखा हुकूम देत उभा होता. त्या लष्करी लोकांनीं तें उचलण्याविषयीं खूप खटपट चालविली होती, ते अगदीं मेटेकुटीस आले होते. पण तें तुळवंड अतिशय जड असल्याकारणानें, त्यांस कांहीं केल्या हालेना. पण तें काम त्यांच्या आहाराबाहेर आहे, हें कोण पाहतो ? ह्याची—नाइकाची—चाललीच होती एकसारखी झक्कड. त्याचें आपलें प्रत्येक खेपेला "अरे

हूं! उचला! उचला, द्या वर चढवून, द्या झोंकून, तें पहा चाललें वर, हूं! अरे! लावाकी नेट, हूं! जाऊं द्या वर, अरे! काय तरी माणसें हीं!" असें एकसारखें हुकुमाचें ओरडणें—नव्हे त्याचा कंठशोष चाललाच होता.

तों तिकडूनच एक अगदीं साधा पेहराव केलेला कामगार मनुष्य घोड्यावर बसून चालला होता. त्याच्या तें नजरेस पडतांच, त्यानें त्या नाइकाकडे वळून ह्मटलें "आपण कां त्या तुळवंडास हात देऊन, त्यांस थोडीशी मदत करीत नाहीं?" तेव्हां नाइकानें चकित मुद्रा करून गरकन् मान फिरवून आपल्या लष्करी थाटानें उत्तर दिलें "कां ह्मणजे, नाईक तो मी." "हं! हं! नाईक ह्मणतात ते आपण! आपणच काय? नाईकसाहेब, मला तर मग हें माहीत नव्हतें." असें ह्मणून त्या कामगारानें आपल्या डोकीवरची टोपी काढून, मोठ्या नम्रतेनें त्याच्या इभ्रतीस शोभेसा लवून मुजरा करून "तर नाईकसाहेब, अपराधाची माफी असावी" ह्मणून त्याची माफी मागितली; आणि आपण स्वतः घोड्यावरून खालीं उतरून त्या शिपायांस त्या गृहस्थानें अगदीं कपाळावरून घामाच्या धारा लागे तोंपर्यंत, व अंगांतील कपडे भिजून चिंब होईपर्यंत, तें चढविण्यास मदत केली.[१]

---

१. अशीच एक गोष्ट कै. श्री. **खंडेराव महाराज गायकवाड** यांजविषयींची सांगतात. ती येथें आमच्या देशांतील राजाची ह्मणून खालीं देतों. ती अशीः—

एकदां महाराज शिकारीचा पोषाख करून, सडेच शिकारीस जात असतां, वाटेंत कोणीएक वृद्ध बाई, कांहीं जड ओझें डोक्यावर घ्यावयाचें होतें, ह्मणून त्या वाटेनें एकाद्या जाणाऱ्या माणसास हात लावावयास सांगण्याच्या विचारांत होती. तिला तो एक साधाच मनुष्यसा वाटून, तिनें ह्मटलें "दादासाब, वाइच वझ उचलूं लागावो." असें ह्मणतांच, महाराज शरीरकाठीनें भक्कम असल्याकारणानें, त्यांनीं झटकन् एका हातानेंच ओझ्याची पाटी उचलून डोक्यावर दिली व आपण चालते झाले. दुसरे दिवशीं त्या बाईला वाड्यांतून बोलावणें गेलें. बाई, वाड्यांतून बोलावणें कां आलें, ह्मणून गोंधळांत पडली व तेथें गेली. तों महाराजांनीं तिला दयाळूपणानें सांगितलें कीं, "माझा हात तुझ्या पाटीला लागल्यावर, तुझी दरिद्रदशा रहावी, हें मला बरोबर वाटत नाहीं. सबब आजपासून तूं ओझीं वाहूं नको. तुला दरमहा दहा रुपयेप्रमाणें देणगी देण्यांत आली आहे. आतां स्वस्थ घरीं बैस. कष्ट करूं नको." त्या बाईलाही काल हात लावलेले, ते हेच महाराज, हें पाहतांच मोठें आश्चर्य वाटलें, तिनें क्षमा मागितली; व गरिबास देणगी दिल्याबद्दल आनंद वाटून निघून गेली. ह्यावरून महाराजांची गरिबांविषयीं किती ही कळकळ! केवढी ही उदार बुद्धि! व काय ही दयाळुत्वाची देणगी!

शेवटीं बऱ्याच आयासानें व बऱ्याच वेळानें तें वर चढल्यावर, तो त्या नाइकाकडे वळून ह्मणाला "रामराम, नाईकसाहेब, येतों मी आतां. पण आपणास जेव्हां जेव्हां पुढें असेंच एखादें आडकाम पडेल, व मनुष्यें पुरेशीं नसतील, तेव्हां तेव्हां मला पुनः बोलवीत चला, ह्मणजे मी येऊन आपणास पुनः मदत करावयास लागेन. आपल्या सेनाध्यक्षांना (एवढा शब्द त्याच्या तोंडांतून बाहेर पडतांच, नाईकसाहेबांची स्वारी चपापली व त्यांची अगदीं पांचांवर धारण बसली.) लिहून कळवा, ह्मणजे माझा पत्ता लागेल व मी येईन. बरें येतों आतां. नाईकसाहेब! रामराम." असें ह्मणून तो गृहस्थ निघून गेला. हाच **वाशिंग्टन** होता. हें पुढें त्या नाइकास कळल्यावर त्याची काय बरें अवस्था झाली असेल! असो.

**वॉशिंग्टना**सारख्या थोर पुरुषाला हें कृत्य किती बरें शोभेल! बरें त्या वेळेस आपली ओळख देऊन, त्या नाइकाचें कांडात जर त्यानें काढलें असतें, तर का त्याजवर कोणाची ब्र काढण्याची छाती होती! परंतु तितकें सामर्थ्य असतांनाही तसें न करतां, त्यानें आपण दिसण्यांत हलकें—कमी प्रतीचें—असें काम, जातीनें मदत करून, तडीस नेलेलें दाखवून उलटा खऱ्या थोरपणाचा व शांतीचा धडा लोकांस घालून दिला. अशा तऱ्हेचा गुण त्याच्या अंगीं वसलेला होता, ह्मणूनच तो नांवारूपास येऊन, त्याची दिगंत कीर्ति झाली, ह्यांत शंका नाहीं. हाच गुण **पाश्चिमात्य** बड्या लोकांतही बऱ्याच अंशानें वास करीत आहे, ह्मणूनच तेथें ज्ञानाचा उदय, व्यापारधंद्याचें पुढें पाऊल, कलाकौशल्याची चढती कमान, ह्या गोष्टी प्रधानत्वेंकरून, नांदत आहेत.

एखादी नवीनच गोष्ट प्रचारांत आणणें, हें काम सामान्य मनुष्य प्रचारांत आणूं ह्मणेल तर त्याची लोक फजीती करतील, शेणमार करतील, हंसतील, व नाना तऱ्हेनें त्याचा अपमानही करतील. पण तीच गोष्ट एखाद्या राजानें किंवा एखाद्या बड्या गृहस्थानें कंबर बांधून व 'मानापमानाचें गोवें गुंडाळून ठेवून' करावयाचें मनांत आणलें तर त्याच्या हातून तें काम सहज तडीस जाईल. त्यावर एक चकारशब्द सुद्धां काढण्याची कोणाची प्राज्ञा नाहीं. **फ्रान्सचा राजा सोळावा** लुई[१] ह्याच्या हातून बटाटे लावण्याचा क्रम जिकडे तिकडे कसा बरें सुरू झाला! नाहींतर एका सामान्य गृहस्थानें बटाट्यांचा प्रसार व्हावा ह्मणून जो

१ ह्याची कारकीर्द इ. स. १७५४ पासून १७९३ पर्यंत होती. ह्याचा त्रास सहन न होऊन फ्रान्सच्या लोकांनीं इ. स. १७९३ त त्यास शिरच्छेद करून ठार मारिलें.

प्रयत्न चालविला होता, त्याचा लोकांनीं कसा काय उपहास केला, लोक कसे बरें त्यास हंसले ! पण खुद्द राजानेंच जेव्हां ह्मटलें कीं, बटाटे खाणें चांगलें, तेव्हां सगळ्या निंदकांचीं तोंडेंच बंद झालीं, आणि जो तो बटाटा कसा काय लागतो, हें चाखून पाहूं लागला. आणि अशा रीतीनें सर्व देशभर हळू हळू बटाटे लावण्याचा क्रम सुरू झाला.

**इंग्लंदांतील** लोकांची उद्योगशीलता इतकी वाढण्याला देखील अशाच प्रकारचें कारण असलें पाहिजे. आमचें हल्लींचें **आंग्ल राजकुल** अशाच प्रकारें उद्योगशीलतेनें ओतप्रोत भरलेलें आहे. तेथें ऋद्धि सिद्धि दासी होऊन, जणूं काय पाणी भरीत आहेत. आमच्या **मलिकामाआझमा** दयाळू **चक्रवर्तिनी विक्टोरिया महाराणीसाहेब** ह्या तरी उद्योगी काय कमी आहेत ? आमच्या इकडच्या कांहीं राजेरजवाड्यांना राज्याधिकार मिळाला कीं, अल्प ऐश्वर्य कां असेना, तरी नानातऱ्हेचे विलास, सारंग, ऐषआराम ह्यांतच गुंग राहावयास पाहिजे; पण आमच्या प्रजाजनांच्या केवळ जननीच अशा **महाराणीसाहेब**, ह्यांना अचाट शक्ति, अफाट राज्य, अपार वैभव, भरपूर संतति इतकें यथानुकूल असतांना, तशा प्रकारचे विलास, छेः ! छेः ! त्यांचें तर नांवच नको, उलट त्यांस नानाप्रकारच्या कला साध्य कराव्याशा वाटतात. मग कितीही हलक्या प्रतीची ती कला असो, ती साध्य करावयाचीच. त्यांस कपड्यांस तूण घालावयाचा धंदा मनापासून आवडतो. **युवराज प्रिन्स ऑफ् वेल्स** हे बाल्यावस्थेपासूनच स्टॉकिंग तयार करावयास शिकले आहेत. त्यांचे पुत्र **ड्यूक ऑफ् यॉर्क** ह्यांनीं दोऱ्या वळविण्याचा अभ्यास केला आहे. अशा तऱ्हेनें हें राजकुल कलांचें भोक्तें, पुरस्कर्तें आहे. एकंदरींत धन्य त्या राजकुलाची ! असें असून आह्मी—त्याचीच **हिंदुस्थानां**तील प्रजा—पहा कसे आहों ते !

पूर्वीं असे पुरुष नव्हते असें नाहीं. ज्यांनीं केवळ प्रजाजनांच्या हिताकरितां राज्यसुखावर लाथ मारिली, व जे केवळ सुतार, मजूर वगैरे कमी प्रतीच्या लोकांसारखे खपले, असेही पुरुष इतिहासपटावर विराजमान आहेत. **इंग्लंडचा** राजा **आल्फ्रेड दि ग्रेट** ह्यास **ड्यानिश** लोकांनीं 'दे माय धरणी ठाय' असें करून सोडल्यावर अरण्यवासांतील एका झोंपड्यांत आश्रय धरून, झोंपडीवाल्या बाईच्या भाकरींवर लक्ष ठेवावें लागलें व त्या करपल्या ह्मणून तिचें बोलून घ्यावें लागलें. ह्यांत त्याचा खरोखर केवढा बरें अपमान झाला. पण तो सर्व त्याच्या खिजगणतींतही आला नाहीं, उलटें त्यानें तिला इनाम देईन ह्मणून आश्वासन दिलें. ही केवळ साधारण प्रतीची गोष्ट झाली. पण केवळ

प्रजाजनांच्या हिताकरतां, देशाच्या प्रगतीकरतांच ज्यानें आपला देह खर्चीं घातला, असा **पीटर दि ग्रेट, रशियाचा झार,** हा होय. त्यानें परदेशीं जाऊन सुतारकाम, लोहारकाम, वगैरे कामधंद्यांत उत्तम प्रकारचें प्राविण्य संपादन केलें. हें तर इतिहासज्ञ वाचकांस महशूरच आहे. येथें आतां मानापमान कोठें राहिला ?

आमच्या इकडेही केवळ लोककल्याणार्थ मानापमानावर पाणी सोडून, देह खर्च करणारे मुळींच आढळणार नाहींत असें नाहीं. **गुलाम**घराण्यांतील एका **बादशहानें**, पुस्तकें विकून आपलें पोट चालविण्याचा क्रम चालविला होता. प्रजेच्या वसुलाच्या पैशाला तोशीस लावली नाहीं. अशी इतिहासांतरीं कथा आहे. **श्रीमंत नानासाहेब पेशव्यांनीं, सुजाउद्दवल्यानें** काशींतील ब्राह्मणांस **पेशवे** चालून आल्यास, मुसलमान करीन ह्मणून जरब देतांच, त्या बिचाऱ्यांवरचें संकट टाळण्याकरितां, ढाला मागें फिरवून आपण सडे गंगास्नानास गेले. ज्यांस पालखी, अंबारीशिवाय फिरावयाचें माहीत नाहीं, त्यांनीं इतर साधारण ब्राह्मण लोकांच्या मेळ्याबरोबर चालत जावें, हा केवढा वरें वरवर दिसणारा अपमान ? पण त्यास एकीकडे झुगारून, केवळ लोककल्याणार्थ पायीं चालले.

हा गुण **शिवाजीमहाराजां**च्याही अंगीं होता.

आमच्या देशांतील समजुतीप्रमाणें, जीं कामें थोर लोकांनीं करण्यास योग्य नव्हत, ह्मणजे हलकीं अशीं समजलीं जातात, तींच कामें **पाश्चात्य** देशांतील राजेरजवाडे, बादशहा वगैरे सुद्धां करतात. **जर्मनी**चे माजी **बादशहा,** ह्मणजे **विक्टोरिया महाराणीसाहेबां**चे जामात, हे छापण्याची—खिळे जुळविण्याची—कला संपादन करून, त्यांत प्रवीण होऊन बसले होते. आमच्या इकडे जोडे हे चर्मकाराशिवाय इतर उच्च जातीनें तयार करणें ह्मणजे निंद्य समजतात. पण **पाश्चिमात्य** देशांत पहा. तेथें प्रत्यक्ष थोर लोक ह्या धंद्यांत प्रवीण बनलेले असतात. **राजे हंबर्टसाहेब** हे उत्तम जोडे शिवतात.

शेतकीचें काम आमच्या इकडे शेतकरीलोकच तेवढे करणार, इतर सुशिक्षितांनीं किंवा थोर लोकांनीं त्यांत मन घातल्यास, तो हलकेपणा किंवा अपमान समजला जातो. पण इतर देशांकडे पहा. **चीनचे बादशहा** स्वतः नांगर धरतात. दुसरा **निकोलस झार** यांस जमीन नांगरणें, पेरणें हे धंदे चांगले करतां येत असत. आमच्या इकडे थोर लोकांच्या बायकांनीं इकडची काडी इकडे करणें, ह्मणजे अगदीं डोक्यावरून उद्योगाचें पाणी गेलें ह्मणून समजावें. पण **चीनची राणी** स्वतः रेशीम काढते—तयार करते. हीच उद्योगधंद्यांची आवड आमच्या थोर लोकांत फैलावली पाहिजे.

आमच्या जातिभेदानें मानापमानाचें प्रस्थ फार माजून राहिलें आहे. त्यामुळें व्यवहारांत हरहमेशा मोठमोठाल्या अडचणी येतात, हें तर येथें सांगावयास नकोच. हल्लीं आमच्या इकडे साधारणपणें कांहीं लोकांचा असा एक कल झालेला दिसतो कीं, उच्च प्रतीचें शिक्षण प्राप्त करून घेतल्याखेरीज, पोट चालावयाचें नाहीं, ह्मणजे इंग्रजी विद्या शिकल्याखेरीज, ' हायस्कुलें ' व 'कॉलेजें' ह्यांच्या द्वारापर्यंत रोज पायपिटी केल्याखेरीज कोठें नोकरी मिळणार नाहीं, व पोटही भरणार नाहीं. एकदां पाश्चात्य विद्याज्ञानानें मंडित होऊन, दोन अक्षरी सुके किताब घेऊन, एकदां कोठेंतरी नोकरी मिळून, पोटाची ददात चुकली, कीं ' कृतकृत्यश्च भारत ' झालें ह्मणून समजावें. ह्याशिवाय–शिकल्याशिवाय किंवा नोकरी लागल्याशिवाय–दुसरा पोट भरण्याचा मार्गच कोणास दिसत नाहींसा झालेला आहे. ह्यांस द्विजवर्ण तर शिक्षणाचा पिच्छा पुरवीत आहे तो आहेच. शिवाय, शेतकरी, माळी, सुतार, वगैरे अन्य जातींनींही तो भाग आटोपण्याचें मनावर घेतलें आहे, आणि त्या लोकांना देखील हल्लीं दुसरा धंदा दिसेनासा झाला आहे, असें दिसतें. अशा तमाम झुंडी गोळा होऊन, नोकऱ्यांवर उड्याच्या उड्या पडूं लागल्यामुळें नोकरी कोणास द्यावी व कोणास मिळावी, ही पंचाईत उभी राहूं लागली आहे. बहुतेक सगळया जागा जिकडे तिकडे भरून गेलेल्या असतात. मग आपलें उगीच टपत बसावें, कीं कोणाची जागा खालीं होईल, व मी तेथें जाऊन चिकटेन–ह्मणजे जागा खालीं व्हावयाला नको, व ह्यांस नोकरी मिळावयास नको. मग बसले स्वस्थ माशा मारीत. असे युनिव्हर्सिटींतील टांकसाळी नाण्यांचा टिळा लावून फिरणारे कांहीं होतकरू रिकामे हात हालवीत पडलेले, कोठें कोठें दृष्टीस पडतात. इंग्रजी भाषा व तींतील ग्रंथ हीं केवळ भरगच्ची व बिनमोल ज्ञानभांडारें होत. ह्मणून त्या भाषेचें ज्ञान करून घेणें, व शिकणें हेंही आवश्यक आहे. पण सुशिक्षित झालें कीं, लागलीच पोट भरण्यासाठीं नोकरीच धरली पाहिजे, असें का एखाद्या शास्त्रात सांगून ठेवलें आहे ? उलट हल्लींचीं सर्व शास्त्रें धुंडाळलीं तर असें दिसून येईल कीं, नानातऱ्हेचे धंदे करावेत. इंग्रज लोकांचा इतिहास धुंडाळला तर असेंच दिसून येईल कीं व्यापारधंदा करावा. इंग्रजलोकचसे काय पण बहुतेक पाश्चिमात्य राष्ट्रांतील लोक व्यापारानेंच उदयाला व भरभराटीला पोंचले आहेत. हें आमच्या आलीकडच्या बहुतेक अल्पवयस्क सुशिक्षित मंडळीला माहीत नसेल काय ? त्यांनीं शास्त्रें व इतिहास वाचले नसतील काय ? आमच्या प्राचीन शा-

सद्ग्रंथांत श्रेष्ठ जो वेद, तोही ज्यांस थोडाबहुत चांगला अवगत झालेला असतो, हजार हजार पानांचे रोमचे, ग्रीसचे, इंग्लंडचे, व हिंदुस्थानचे प्रचंड इतिहासग्रंथ ज्यांना वाचावे लागतात,–नव्हे ज्यांना त्यांचा उरस्फोड करून –छातींतून रक्त फुटेपर्यंत दोन दोन वर्षे सारखा अभ्यास करावा लागतो, फुसकें गणितशास्त्रचसें काय पण ज्यांना 'ट्रिगूनॉमेट्रि' (त्रिकोणमिती), 'फिझिक्स' (सिद्धपदार्थविज्ञान), 'केमिस्ट्री' (रसायनशास्त्र) 'ऑप्टिक्स' (दर्शनानुशासनशास्त्र), 'साउंड' किंवा 'अकौस्टिक्स' (ध्वनिशास्त्र), 'हैड्रोस्टॅटिक्स' (जलशास्त्र), 'हीट' (उष्णताशास्त्र), 'फिजियॉलॉजि ऑफ् दी ह्यूमन् बॉडी' किंवा 'ऑनॉटमी' (शारीरशास्त्र), 'झूलॉजी' (प्राणिशास्त्र), 'बॉटनी' (वनस्पतिशास्त्र), 'जिऑलॉजी' (भूदरशास्त्र), 'अॅस्ट्रॉनॉमी' (ज्योतिषशास्त्र), तसेंच लॉजिक् (तर्कशास्त्र) वगैरे वगैरे अनेक शास्त्रें निदान थोडींबहुत तरी वाचून अवगत करून घ्यावीं लागतात, त्यांच्या हातून अशी गोष्ट होईल कशी ? पण इतकें असूनही 'मी एवढी परीक्षा पास होईन; व कोठेंतरी नोकरी धरून पोट भरीन,' ह्या सरशहा ओरडीचें तोंड बंद ह्मणून होतच नाहीं.

"बरें हें जर नाहीं, तर आह्मीं करावें काय ?" असा एक त्या मंडळीकडून प्रश्न येतो. त्यावर कोणी कोणी "व्यापारधंद्यांत मन घालावें" असें उत्तर देतात. आणि हें खरेंच कीं, सुशिक्षितांनीं व्यापारधंदा व शेतकी ह्यांत मन घालावें ह्मणजे फार उत्तम होईल, शेतकी चांगली सुपीकदशेस येईल. कारण त्यांतल्या सर्व तत्वांचा अभ्यास त्यांनीं चांगला केलेला असतो. परंतु त्यांस 'मानापमान' आडवा येतो. "आह्मी एवढे थोरले सुशिक्षित झालों असून, आह्मीं वाणीउदमी, कुणबी लोकांनीं करण्यासारखीं कामें कशीं करावीं ?" ह्मणजे त्यांत मानहानि होते, किंवा हीं कामें अगदीं कमी प्रतीचीं–हलकीं–आहेत, असें कित्येकांस वाटत असतें. पण ही त्यांची मोठी चूक आहे, असें वाटतें. त्यांनीं पाश्चिमात्य थोर लोकांच्या कृत्यांवर नजर द्यावी. मोठी जागा मिळाली ह्मणजेच लोकप्रियता अधिक प्राप्त होते, किंवा पैसा पुष्कळ मिळतो असा केवळ नियम नाहीं. इतर धंद्यांपासून ती होणार नाहीं, असेंही नाहीं, किंबहुना एखादे वेळीं अधिकही होईल. त्यांतही थोर लोकांना ही गोष्ट जास्ती लागू पडते. आमच्या इकडे एकाददुसरें राजकुल क्वचित्–राजा रविवर्मा प्रसिद्ध चित्रकार, हे ह्या ह्मणण्यास अपवादक होत–सांपडलें तर सांपडेल. पण युरोपांत ह्याचीं उदाहरणें अधिक. प्रुशियाचें (जर्मनी) राजकुल तर उद्योगधंद्यांत मोठें

नामांकित आहे. तेथील माजी **बादशहा फ्रेडरिक** ह्यांजविषयीं मागें सांगितलेंच आहे. त्यांचे पुत्र देखील सुतारकाम चांगलें करतात. आमचें **ब्रिटिश राजकुलही** अशाच प्रकारचें आहे, हेंही मागें सांगितलेंच आहे. **बव्हेरियाचे ड्यूक म्यागिझमिलियन** ह्यांचे दोघे पुत्र–ह्मणजे **आस्ट्रियाच्या बादशाहिणीचे** बंधु–आजकाल निढळींच्या घामानें–स्वतः उद्योगधंदा करून, जो पैसा येतो, त्यावर आपला 'उदरंभरणा'चा व्यवसाय चालवीत आहेत. त्यांपैकीं थोरले **राजपुत्र** (बादशाहिणीचा थोरला भाऊ) एक प्रकारच्या हाटेल (खाणावळी) वर मुख्य आहेत. **प्रिन्स ऑफ् वेल्स युवराज,** यांचे पुत्र **प्रिन्स जॉर्ज फ्रेडरिक ड्यूक ऑफ् यार्क** हे नौकानयनविद्येंत मोठे तरबेत आहेत. **स्वीडन्‌चे ऑस्कर** हे लांकूडतोड्याच्या कामांत कुशल आहेत. खुद्द **ख्रिस्त्यांचा प्रभु येशू ख्रिस्त** हा सुतार होता, ह्मणून ज्यू (यहुदी) लोकांत त्याची प्रसिद्धी असे. **लिव्हिंगस्टोन**–प्रख्यात प्रवासी–हा शिंप्याचा धंदा करीत असे. **विलियम् क्यारे** हा जोड्यांस ठिगळें देत असे, असें तो स्वतःच ह्मणतो. **मिचेल फरडे** हा सर **हंफ्रे डेव्हि** यांच्या येथें बाटल्या धुवावयाचें काम करीत असे. **एलिहू बरिट** हा लोहारकाम करी. आणि प्रख्यात **आब्राहाम लिंकन** लोखंडी गज तोडण्याचा धंदा करीत असे. असो. ह्यावरून पाहतां काय बरें निष्पन्न होतें ? कोणताही धंदा असो, व तो कोणीही करो, तो करणारा निरंतर कीर्तीस व सुखास पात्र होतो. मात्र मान आणि अपमान हे शत्रू टाळावेत.

परंतु आमच्या इकडे जिथें नोकरीमध्येंच "आह्मांस उत्तम तऱ्हेची नोकरी हवी, फार कष्ट न पडावेत, ती दगदगीची नोकरी कोण धरतो" ह्मणून निवडक मान हवा लागतो, व काबाडकष्ट–नव्हे नव्हे अल्पही कष्ट करावयास नकोत, तेथें इतर धंदे कसे व्हावेत. कारण धंद्यांत एकसारखें खपावें लागतें, पुष्कळ कष्ट करावे लागतात, तेव्हांच पैसे मिळणार. "घनांबु न पडे मुखीं, उघडिल्याविना पाखरें" हें तत्व ते बिचारे विसरून जातात, मग ते उद्यमसुरतरूला मनापासून पाणी ते काय पाजणार ! बरें इतकेंही करून एखादा तयार झालाच तर धंद्याची निवड करावी लागते, आणि ती करावयास लागलें ह्मणजे पराक्रमाचा भोंपळा फुटतो. "शिंप्याचा शिवणकामाचा धंदा ना, तो काय आह्मीं करावयाचा." आह्मी ब्राह्मण किंवा इतर उच्च प्रतीच्या जातीचे असेंच जो तो ह्मणणार. ह्मणजे येथें जातीचा मानापमान आडवा आला. तो छाटून टाकला ह्मणजे सहजीं सुरेख काम होईल. एखाद्या उच्च जातीच्या मनुष्यानें

हलका धंदा काढल्यास आमचे लोक त्यास नुसतीं नांवेंच ठेवण्यास तयार होतात असें नाहीं, तर "काय जात बुडविली" असेंही उद्गार त्यांच्या तोंडून ऐकूं येतात. पण ही समजूत अगदीं कोतेपणाची आहे. कोणत्याही प्रकारचा–हलक्या प्रतीचाही कां असेना–धंदा कोणीही करणारा असेना कां–तो अगदीं उच्च वर्णाचाही जरी असला–तरी तो त्यास भूषणभूतच समजला पाहिजे.–"उंच नीच वर्ण ह्मणावा न कोणी" हें **भगवद्भक्त तुकारामाचें** उदात्त वचन सर्वांनीं–लहानथोरांनीं ध्यानांत धरून चालावें. व वेळीं पडेल किंवा येईल तो धंदा शिकावा, करावा, व त्याची मनापासून आवड धरावी. अशा प्रकारें मानापमान सोडून जेव्हां योग्य धंदे सर्व लोक–थोर, श्रीमंतही आमच्या देशांत करूं लागतील व ते इतरांस तसें करण्याचा, स्वतःच्या कृत्यानें धडा घालून देतील, तेव्हांच ह्या कंगाल स्थितीप्रत पोंचलेल्या **आर्यमातेच्या** अखंड सौभाग्याचे भक्कम दरवाजे खुले होतील, हें पक्कें ध्यानांत असलें पाहिजे.

---

रा. रा. केरळकोकिळकर्ते यांस प्रार्थना–खालील प्रार्थना घेण्याची कृपा व्हावी, अव्हेर होऊं नये.

## पश्चात्ताप—सद्गुरूस प्रार्थना—(चाल–साधी).

**नाहीं मजला कळतच कांहीं वळत न बुद्धी गुरुराया ।**
**त्रिविध जनाचे बोल टाकिती खोल अशा भ्रमडोहीं या ॥**
**मोल कशाचें न कळुन वाटे फोल सर्व, मी थोर खरा ।**
**आलों कोठुनि जाणें कोठें ह्याची अक्कल नाहिं जरा ॥**
**परनिंदा हा धंदा वाणी करि सोडि हरिवरि पाणी ।**
**उपकाराचा लेश न घडला जेंवि उपजला तरु रानीं ॥**
**सर्व जगाची काळजि वाटे फाटे अंतर दिवसनिशी ।**
**सार्वभौमसा भार शिरावरि अभिमानाची घेत उशी ॥**
**अजिंक्य ऐसा काळ तयाला घालवावया चुकवाया ।**
**श्रीरघुनाथा कांहिं न केलें आजवरीचा शिण वाया ॥**
**नाहीं शक्ती स्वतनूवरचें मजला संकट वाराया ।**
**ह्मणुनि दास हा चरण शरण तुज तार तार अर्पित काया ॥**

**त्रिमूर्ति.**


---

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar at JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

# केरळकोकिळ.

पु० १२ ] [अं० ८

## गिलेडा.




**गिलेडा** हा एक वानराच्या जातीचा प्राणी आहे. आणि चौऱ्यायशीं लक्ष योनींत, वानराची किंवा माकडाची योनी कायती मनुष्यजातीशीं साम्य किंवा जवळ जवळ आहे; मुद्रेनें जवळ जवळ असल्यामुळें अर्थातच कृतीनेंही जवळ जवळ आहे. त्यांतही उच्च प्रतीच्या ह्मणून ज्या जाती गणलेल्या आहेत, त्यांच्यांतील पुष्कळ कृति मनुष्याशीं सारखवट असतात. आणि त्यांचें बुद्धिचातुर्यही चतुष्पाद प्राण्यांहून पुष्कळ पटीनें अधिक असतें. **गिलेडा** हा उच्च जातीचा वानर असल्यामुळें, त्याच्या कृतिही अशाच चमत्कारिक आहेत.

**गिलेडा** दिसण्यांत उग्र, भयंकर असून शरीरानेंही खूप मजबूत असतो. उभा राहिला ह्मणचे त्याची उंची तीन फुटींत कांहीं कमी नसते. ह्याच्यामध्यें इतर वानरांहून व माकडांहून विशेष गोष्ट असते. ती ही कीं, त्याच्या गळ्यांभोंवतीं सिंहाप्रमाणें लांबलचक आयाळ असतें. ह्याचे दंत इतके तीक्ष्ण असतात कीं, चित्त्याचीही त्यांच्यापुढें मातब्बरी नाहीं. शियाय दंतपंक्तीची ठेवण अशी कांहीं विचित्र असते कीं, तिच्या योगानें पाहिजे त्या प्राण्याला सहज फाडतां येतें. सुळेदांतांच्या अणकुच्या केवळ सुईसारख्या असून त्यांच्या आंतील खडा अशा तीक्ष्ण असतात, कीं जणों काय सुरीचें पातें! त्यानें कापावयाचें काम पोलादी हत्याराहूनही सफाइदार होतें.

परमेश्वरानें दिलेल्या ह्या स्वयंभु हत्यारांचा प्रभाव त्याला पक्का माहित असल्यामुळें, तो चवताळला ह्मणजे शत्रूच्या अंगावर बेलाशक तुटून पडतो. आणि हातापायांनीं त्यास गच्च मिठी मारून त्याच्या मानगुटींत इतके खोल दांत खुपसतो कीं, दांतांच्या दोन्ही पंक्ती एकास एक मिळतील. नंतर जोरानें एक हिसडा मारतो, ह्मणजे त्याच्या मांसाचा लपकाच्या लपका बाहेर पडतो. त्याची जखम एवढी मोठी होते कीं, त्या प्राण्याला मरावयास बहुधा एक क्षणही लागत नाहीं!

शिकारीमध्यें नवखा अडाणी कुत्रा असला, कीं **गिलेडानें** त्याची चांदी आटवलीच ह्मणून समजावें. तो त्याच्या तावडींतून सुटावयाचा ह्मणून नाहींच. परंतु जे जुने–वहिवाटलेले–असतात, ते मात्र ह्याला पक्के ओळखून असतात. ह्याचा कावा त्यांना माहित असतो, आणि त्यांचा कावा ह्याला माहित असतो. शिकारी लोक, शिकारी कुत्रें ह्या दोघांच्याही हातांवर तुरी देण्याच्या कामांत **गिलेडा**इतका वस्ताद प्राणी दुसरा क्वचित् आढळेल. वर्ष सहा महिने बंदुका भरून व कुत्रे सजवून प्रत्यहीं जरी शिकारीस गेले, तरी एक **गिलेडा** हातीं पडेल किंवा नाहीं ह्याचा वानवाच आहे. शिकारी लोकांची चाहूल त्यास तेव्हांच कळते. आणि तो मग त्यांच्या थाऱ्यामोऱ्यास सुद्धां उभा रहात नाहीं. त्याची उडी अतिशय पल्लेदार असते. तिच्या सहाय्यानें तो हां हां ह्मणतां गोळीच्या टप्यांतून पार होतो. तसेंही करण्यास संधि न मिळेल, आसोपास घनदाट वृक्ष नसतील, एकाच वृक्षावर सांपडण्याची

पाळी आली, तरी सुद्धां तो कुत्र्याच्या तावडींत कीं बंदुकीच्या मारांत सांपडत नाहीं. तो चट्कर सर्वांचीही नजर चुकवून एकाद्या डहाळीच्या किंवा पानांच्या आड असा मुरून बसतो कीं, कोणास मागमूस न लागे. अशा स्थितींत बराच वेळ लोटल्यावर ज्या बाजूस कुत्र्यांची व मनुष्यांची नजर नाहीं, अशा बाजूकडून हलकेच उतरून एक पान न वाजवितां, कीं गवताची एक काडी न हालवितां, भुईसरपटत लोळण घेत, गोळीच्या टप्प्यांतून पार होतो, आणि दुसरें झाड गांठून निघून जातो. लपत छपत जाण्याचें कौशल्य, **गिलेडा**प्रमाणें इतर प्राण्यांस साधावयाचें नाहीं. हिकडे कुत्रे आणि शिकारबहाद्दर त्याच झाडावर **गिलेडा** आहे म्हणून कोकलत कोकलत, आणि अखेर हिरमुसल्या तोंडानें निघून जातात. ही स्वारी धुलाटणी देऊन केव्हांच निघून गेलेली असते, त्यांची त्यांना दादही असत नाहीं !

चोरी करण्याच्या कामांत ह्यांचा अगदीं हातखंडा आहे. आणि त्या कामीं ते जी युक्ति योजतात ती विलक्षण असते. एखाद्याच्या घरांत पुष्कळ फळें असलीं, आणि त्यांच्यावर डल्ला मारावयाचें ह्यांच्या मनांत आलें; तर ह्यांस पक्कें माहित असतें कीं, आमचा सारा कळपच्या कळप तेथें गेल्यास, मनुष्यांची बंदूक आपणांस चुकवितां येणार नाहीं, आणि कुत्र्यास आपली चाहूल लागल्याशिवाय रहाणार नाहीं. म्हणून अशा वेळीं कळपांतील एका म्होरक्यास ते पुढें करतात. तो हळूच दबत दबत कुंपणावर चढतो आणि तीं फळें हातास येतील अशा ठिकाणीं, पण कोणास न दिसेल, कोणास यत्किंचितही चाहूल न लागेल अशा बेतानें, बसतो. दुसरा कुंपणाच्या बाहेरच्या बाजूस मुळाशीं असा बसतो कीं, त्यास पहिला वानर दिसावा, पण इतर कोणास तो मात्र दिसूं नये. नंतर तिसरा, चौथा ह्याप्रमाणें माळकाच्या माळका बसते. आणि शेवटचा वानर अगदीं नित्रास झाडींत किंवा सुरक्षित ठिकाणीं बसलेला असतो. ह्याप्रमाणें सर्व तयारी झाली म्हणजे पहिला वानर हळूच झाडाचें एक फळ, सवड होईल त्याप्रमाणें तोडून किंवा दांतानें डेंख चावून हातांत घेतो, आणि हलकेंच दुसऱ्याकडे फेंकतो. दुसराही तशाच बेतानें हळूच तिसऱ्याकडे फेंकतो. तिसरा चवथ्याकडे, चवथा पांचव्याकडे, पांचवा सहाव्याकडे, ह्याप्रमाणें—आगीच्या बंबाला लोक जशी पा-

ण्यानें भरलेल्या घागरींची माळ लावतात, तसें तें फळ क्षणांत त्यांच्या सुस्थळीं जाऊन पडतें. हें त्यांचें कृत्य कितीही वेळ चाललें, व त्या आ-वारांत कुत्रा अगदीं कान टवकारून बसला, तरी त्यास सुगावा ह्मणून लागूं देत नाहींत. लूट पुरेशी झाली ह्मणजे जेथें कोठार असेल तेथें, सारा कळपच्या कळप जमतो, व ती लूट सारे मिळून वांटून घेतात. त्या वेळीं लठ्ठालठ्ठीही होत नाहीं असें नाहीं; परंतु ती बहुतेक विनोदपर असते. ओझीं पोंचविणारी मंडळी काम चालतांना सुद्धां आपआपली दलाली काढून घेण्यासही कमी करीत नाहीं. प्रत्येक असामी आपल्या हातां-तील फळ दुसऱ्याकडे फेंकतांना एक लचका तोडतो, व तो तुकडा आपल्या गालफडांत सांठवून मग पुढें फेंकतो. परंतु सबंध फळच्या फळ कोणी दडपून ठेवीत नाहीं. अशा प्रकारें आपआपलें फळ दुस-ऱ्यास देणें, तीं एकत्र राखणें, सर्वांनीं वांटून घेणें, ह्या सर्व कृति, ह्या सर्व कल्पना, व हें सर्व चातुर्य मनुष्याच्या अगदीं खालोखाल—नव्हे तोडीचें आहे ह्मटलें तरी सुद्धां बाध येणार नाहीं.

**गिलेडा** लहानपणापासून पाळला तर चांगला माणसाळतो. त्याचा स्वभाव जात्याच खेळाडू व चेष्टेखोर असल्यामुळें, तो आपल्या धन्यास व सभोंवतालच्या मंडळीस नेहेमीं करमणूक करतो. एखादें हेंगाडें, वेडेंविद्रें, काळें, कुरूप माणूस पाहिलें कीं त्याची कुचेष्टा करावयाला **गिलेड्याला** कांहीं शिकवावें लागत नाहीं. आपल्या धन्याला एखाद्या मनुष्याची कुचाळकी करणें आवडतें, येवढें समजलें कीं पुरे. ह्या स्वा-रीनें त्याचा पिच्छा पुरविलाच. शुद्ध अंगदाची प्रतिमा !

एका आगबोटीवरच्या कप्तानानें एक **गिलेडा** बाळगला होता. तो त्याचें आणि आगबोटीवरील साऱ्या उतारूंच्या करमणुकीचें स्थानच हो-ऊन बसला होता. एकदां त्या आगबोटीवर एक शिद्याची स्त्री आली. मग काय? त्या **गिलेड्याला** तो बऱ्याच दिवस विषय पुरला. ती पुढें आली, कीं हा तिच्यापुढें नाक खाजवी; दांत विचकी; डोळे व कान पिंजरून कधीं कधीं 'वॉव्' करून भेवडावून सोडी; कधीं तोंडें वेडींविद्रीं करून मान वांकडी करून तिच्याकडे पाही, कधीं खु-ळ्यासारख्या बरगड्या खाजवून दाखवी; कधीं तिचें वस्त्र धरून तिला जवळ बसवी; तिच्या अंगावरून हात फिरवी; उडी मारून खांद्यावर

बसे; पण इतकें झालें तरी तिला इजा ह्मणून त्यानें कसली ती केली नाहीं. तिला प्रथम प्रथम त्याचें भय वाटे, परंतु मग तिलाही त्याची चेष्टा आवडूं लागली.

एक वेळ कांहीं मंडळीनें ह्या **गिलेडा**स रानांत सोडून एक कुत्रा मागें लावला. आणि काय मजा होते ती पहाण्यासाठीं ती अगदीं आतुर होऊन बसली. **गिलेडानें** प्रथमतः कुत्र्यास दहापांच हुलकावण्या देऊन पाहिल्या. परंतु त्यांतून आपला निभाव लागेल असें दिसेना. तेव्हां त्यानें एका झाडाचा आसरा पाहिला, आणि पटकन् उडी मारून त्याच्या वरील दुबेळक्यांत ही स्वारी जाऊन बसली, आणि शेपटीचा गोंडा खालीं सोडून दिला. पण तो इतक्या बेतानें सोडला कीं, कुत्र्यानें अगदीं जीवापलीकडे उडी मारली, तर त्याचें तोंड त्यास जेमतेम पुरेल न पुरेल. कुत्राही धांवत धांवत झाडाखालीं जाऊन उभा राहिला. व त्याच्या शेपटाकडे पाहून त्याच्या मनांत आशाही उत्पन्न झाली कीं, आपण एक खचून उडी मारावी, आणि शेपूट धरून आपल्या शत्रूस खालीं ओढावें. ह्या उमेदीनें जीव ताणून ताणून तो उड्या मारूं लागला. त्यानें उडी मारली, ह्मणजे **गिलेडानें** अमळसा आपला गोंडा वर उचलावा; कुत्र्याचे पाय जमिनीस टेंकले कीं, पुन्हा पूर्ववत् सोडावा. आतां शेपूट सांपडतें, मग सांपडतें, ह्मणून कुत्रा जीव तोडीतच होता. हे राजेश्री एका ढापीवर पाय ताणून एका ढापीवर पाठ टेंकून खुशाल पडले होते. तो घटकेंत आकाशाकडे पाही; घटकेंत सभोंवार नजर टाकी; घटकेंत खालीं कुत्र्याकडे पाही. जणों काय, आकाशाची शोभा कशी आहे? सृष्टिसौंदर्य किती विचित्र आहे? कुत्रा हा किती विचित्र, आणि खुळसट प्राणी आहे? ह्याचाच विचार करीत आहे! कुत्र्यानें हवी तितकी पराकाष्ठा केली; जहांग जहांग तोडले; पण कांहीं नाहीं. 'कुक्' करून एकदां वर उडी मारी? पुन्हा खालीं पडे. पुन्हा गुरगुरे; पुन्हा भोंके. ह्याप्रमाणें तास, दीड तास सारखा त्याचा क्रम सुरू होता. कुत्र्याची आशा, आणि **गिलेडा**ची खात्री. ह्यांपैकीं कोणीच हार जाण्यासारखें नव्हतें. अखेरीस उड्या मारून मारून कुत्रा थकला; त्याच्या तोंडास फेंस आला. उडी मारण्याची तर काय, पण पाऊल टाकण्याची सुद्धां शक्ति राहिली नाहीं. तेव्हां 'कां हौस पूर्ण झाली

कीं नाहीं?' असेंच जणों काय विचारित आहे, अशा मुद्रेनें मंडळीकडे एक वेळ पाहून **गिलेडानें** एकदम झाडावरून उडी टाकली. आणि दिग्विजय केलेला राजा सिंहासनावर बसल्याप्रमाणें, पांचचार उड्डाणांत मंडळी गांठून तो मोठ्या उल्हासवृत्तीनें आपल्या धन्याच्या स्कंधावर विराजमान झाला!!

**गिलेडा** हा नुसत्या करमणुकीच्याच उपयोगीं आहे असें नाहीं, तर दुसऱ्याही पुष्कळ कामास त्याचा उपयोग होतो. शिकारी लोकांस त्याचा फार मोठा उपयोग होतो. तो त्यांस शिकार धरण्यांतच मदत करतो असें नाहीं. तर तशा प्रसंगीं अन्नपाण्याचाही मोठा पुरवठा करतो. खाण्याचें भक्ष्य, आणि पिण्याचें पाणी आसपास कोठें आहे, त्याचा सुगावा काढण्यांत **गिलेडा** हा अगदीं निष्णात आहे. गाजरें, मुळें, रताळीं, बटाटे, भुईमुगाच्या शेंगा अशासारखीं कंदमुळें तो शोधून काढून आपण खातो येवढेंच नव्हे, तर धन्यासही त्याची मेजवानी करून सोडतो! उन्हाच्या तापांत सोयीवार भांडें दिलें तर तें पाण्यापर्यंत जाऊन भरून तोंडांत धरून घेऊन येतो. ह्यावरून हा प्राणी केवढा बुद्धिवान्, किती स्वामिभक्त, व कसा उपयोगी आहे, ह्याची कल्पना सहज होण्यासारखी आहे.

पण ह्या सर्वांहूनही, त्याच्या अंगीं दुसरी एक अप्रतिम शक्ति आहे. ती कोणती? तर त्याच्या डोळ्यांची. **गिलेडाचे** डोळे इतके तीव्र आहेत कीं, जणों काय दुर्बीण! ह्याचा अनेक शोधक लोकांनीं अनुभव घेतला आहे. ह्यासाठीं त्यांनीं एक चमत्कारिक प्रयोग करून पाहिला. **गिलेडाला** एका उघड्या जाग्यावर बांधून ठेवलें आणि त्याचा धनी व दुसरी कांहीं मंडळी सुमारें पांच मैल अंतरावरच्या डोंगरावर जाऊन तो प्राणी दिसेल अशी दुर्बीण लावली. आणि आपण येथें केलेल्या कृतींत तेथें त्या प्राण्याच्या मुद्रेंत काय काय फेरफार होतो हें पाहूं लागले. तेव्हां असा चमत्कार दृष्टीस पडला. धनी पुढें आला ह्मणजे तो आनंदानें नाचूं लागे; तो लपून बसला, ह्मणजे तो कावराबावरा होई; त्यानें फळें दाखविलीं ह्मणजे तो जिभल्या चाखूं लागे; आणि त्याजवर बंदूक रोखली ह्मणजे भयानें घाबरून दबून बसे!! हा प्रयोग संपल्यानंतर मंडळी जेव्हां परत त्याच्या जवळ गेली, तेव्हां तो **गिलेडा** आ-

पण दुरून पाहिलेलीं फळें घेण्यासाठीं आपल्या धन्याचे खिसेच खिसे चांचपूं लागला, व तीं दिल्यावर मोठ्या आनंदानें तो खात बसला !

ह्याच्या अंगीं आणखी एक चमत्कारिक गुण आहे. तो इतर कोणत्याही वानरांत आढळला नाहीं. तो गुण हा कीं, तो जेव्हां निजतो, किंवा विश्रांति घेतो, तेव्हां त्याच्या त्या बसण्याची ढब अशी कांहीं विलक्षण दिसते कीं, जणों काय एखादा जटिल ऋषीच मुद्रा घालून योगाभ्यासाला बसला आहे. किंवा एखादा विरक्त महामुनी समाधिसुखांत निमग्न झाला आहे. ह्या मुद्रेस त्याच्या मस्तकाभोंवतालची आयाळ तर विशेषच भूषणभूत होते. हेंच ध्यान प्रथमारंभींच्या चित्रांत दाखविलें आहे. तें पाहून स्वामिनामोच्चारांत तंद्री लावलेल्या श्रीहनुमंताचें स्मरण झाल्यावांचून कोणास राहील ? इतकेंच नव्हे, तर ह्याच पद्धतीनें त्या रघुवीरसेवकाची प्रतिमा तयार केली, तर ती अतिशय रम्य व यथार्थ होईल ह्यांत तिळमात्र संदेह नाहीं. प्रसिद्ध चित्रकार भिवा सुतार ह्यानें औंधास जें अद्वितीय मनमोहक श्रीरामपंचायतन काढलें आहे, त्यांतील मारुति केवळ अशाच स्वरूपाचा आहे. ह्मणून सर्व लोक त्याजवर तल्लीन होतात आणि तारीफ करतात.

**मार्कोपोलो** ह्या नांवाचा **व्हेनिस** शहरचा एक व्यापारी तेराव्या शतकांत ह्या देशांत प्रवास करित होता. तो पूर्व व पश्चिम ह्या दोन्ही किनाऱ्यांवरून प्रवास करीत फिरला; व शेवटीं कन्याकुमारी येथें मुक्काम करून त्यानें आपलें प्रवासवृत्त लिहिलें. त्यांत त्यानें असें ह्मटलें आहे कीं "कन्याकुमारीच्या आसोपास एका विशिष्ट प्रकारचीं माकडें आहेत. तीं अगदीं मनुष्यासारखीं दिसतात." ही जात हल्लीं त्या प्रांतांत नाहीं पण जी होती ती गिलेंडासारख्या जातीची होती कीं काय ? असल्या जातीच्या वानरांचे कळपांच्या कळप जर हुकमांत वागतील, तर लंका जाळणें, सेतु बांधणें, शिष्टाई करणें, राक्षस मारणें, इत्यादि गोष्टी विशेष अशक्यच आहेत असें कांहीं ह्मणतां येणार नाहीं. कालाचा फेरफार, हा मनुष्यमात्राच्या तर्काबाहेर आहे. तो कोणीकडे आणि कसा झुकेल हें कोण सांगणार ?

( एका वर्गणीदाराकडून. )

# धोलवडची अंबा.

*साक्या.

बहु नभचुंबित सुगंध तरुवर वेष्टित रम्य गडाला ।
सोडुनि भक्तास्तव जगदंबा आली धोलवडाला ॥ १ ॥
परी न गेली गांवामाजी बसली सन्निध रानीं ।
भक्त येउनी करिति अलंकृत कंठ पुष्प—हारांनीं ॥ २ ॥
भरे तियेची यात्रा चैत्रीं शुक्लपक्ष पुनवेला ।
धांवति दर्शन सुधारसाचा प्राशाया जन पेला ॥ ३ ॥
कोणी अपुल्या खंद्या वारूवरती बसोनि येती ।
कोणी गोऱ्हे जुंपुनि तांगे दवडित दडदड नेती ॥ ४ ॥
प्रेमानंदें चरणतलांनीं कोणी पथ आक्रमिती ।
मार्गि दिसे ती शोभा स्वमुखें वर्णूं कितीक मी ती ॥ ५ ॥
गोजिरवाणीं कितिक बालकें जाती मौज पहाया ।
विडा दक्षणा जवळि घेउनी जगदंबेस वहाया ॥ ६ ॥
कितिक सुंदरी तरुण कन्यका तैशा वृद्धहि बाया ।
बसोनि यानीं जाती होतिल कीं श्रम कोमल पायां ॥ ७ ॥
येतां नगराबाहिर लागति उंच आम्रतरु वाटे ।
जातां ज्याच्या शीतल छाये—खालुनि सुख बहु वाटे ॥ ८ ॥
तेथुनि पुढती जातां लागे इस्कनबनची झाडी ।
जींत असे जरिपटका आंबा बहुत जयाला गोडी ॥ ९ ॥
असति लागले जेथें सुंदर आम्रवृक्ष घनदाट ।
नसे जयामधिं रविकिरणांतें तिळहि रिघाया वाट ॥ १० ॥

---

* सदरहू कवितेंत छंदाच्या संबंधानें पुष्कळच फेरफार करावा लागला. तथापि त्यांतील सरलता, व सृष्टिसौंदर्यवर्णनाची हातोटी हीं सुश्राव्य आहेत.

अंबराइच्या मधेंच आहे तुडुंबलेली वापी ।
घट घट घट घट शीतल जल तें करुनि तृषित जन आ पी ॥११॥
सुगंध शीतल वाहति झुळुका मंद मंद पवनाच्या ।
हृदयकमल तैं प्रफुल्ल होतें पाहुनि श्रीस वनाच्या ॥ १२ ॥
पुढती जातां वाडी लागे जवळ पानसाऱ्यांची ।
हरी तृषा पुष्करणी जेथें मधुर जलें साऱ्यांची ॥ १३ ॥
अश्वत्थाचा जवळचि तेथें एक सुबक तरु आहे ।
उभारूनि जो उंच आपुलें कर पथिकांतें बाहे ॥ १४ ॥
असे तयातें बांधियलेला लांब रुंद जो पार ।
बसावयाला देउनि आसन सतत करी सत्कार ॥ १५ ॥
पाच हिऱ्यासम रविकिरणांनीं ज्याचें शिखर झळाळीं ।
दक्षिण भागीं दिसति जयाच्या थोर बावरें काळीं ॥ १६ ॥
उत्तरेस ओहोळ जयाच्या वाहे झुळ झुळ पाणी ।
करिती जेथें लोक आपुलें प्रक्षालन पदपाणी ॥ १७ ॥
चुंबिति नभ तरु विशाळ ऐसे असती जवळ जयाचे ।
जणों आदरातिथ्य करीती जे कां श्रांत जनाचें ॥ १८ ॥
सुंदर मंदिर पाषाणाचें समीप ये अंबेचें ।
तों जन दर्शन घ्याया उत्सुक होती जगदंबेचें ॥ १९ ॥
भुवनमंडपासमीप जातां अन्योन्यांचे हात ।
धरुनि उतरती चिरेबंदिच्या जाति पायऱ्या आंत ॥ २० ॥
गाभाऱ्यामधिं जाउन अंबे हळदकुंकुमा वाहोनी ।
वंदिति चरणां विडा दक्षणा सर्व पुढें ठेवोनी ॥ २१ ॥
पीत वसन कटिं नील कंचुकी आंगीं सुंदर, भाळां ।
कुंकुम मळवट शोभति कंठीं रक्त झेंडुच्या माळा ॥ २२ ॥
निरखुनि ह्यापरि ध्यान प्रार्थिती जोडुनियां कर भावें ।
सदा सर्वदां असेंच माते तव दर्शन लाभावें ॥ २३ ॥
असें प्रार्थुनी पुनरपि वंदुनि येती मग बाहेर ।
ह्मणती माते; जाउ सासरीं सोडुनि हें माहेर ॥ २४ ॥

वदोनि ऐसें सद्गद चित्तें घालुनि प्रदक्षणेला ।
निघति जावया उत्तरपंथें सोडुनि दक्षणेला ॥ २५ ॥
भरे रम्य विस्तीर्ण देविच्या जो भुवनाशेजारीं ।
नंतर येती सकल लोक त्या लगबगिनें बाजारीं ॥ २६ ॥
कलिंगडें परिपक्क खरबुजें कवठें कोणी घेती ।
करिति खरेदी कोणी केळीं कोणी मौज बघे ती ॥ २७ ॥
शुभ्र साबण्या कडक रेवड्या पेढे बरफी ताजी ।
घेती कोणी दुधेंभोपळें पान तमाखू भाजी ॥ २८ ॥
कोणी पायीं कोणी वहनीं बैसुनियां जन गांवां ।
निघति जावया काय तेथचा समारंभ सांगावा ॥ २९ ॥
हसतिल पाहुनि कोणी कृति ही निरस रामचंद्राची ।
केंवि करिल हो रंकसाम्यता सांगा त्या इंद्राची ॥ ३० ॥

—रामदीक्षित—

---

# पुस्तकपरीक्षा.

## पंचवटीस्थलनिर्णय.

कै० रा. रा. **वामन दाजी ओक** 'महाराष्ट्र काव्यसंग्रह' मासिक पुस्तकाचे कर्ते—किंवा दुय्यम संपादक—ह्यांनीं आपल्या मासिकपुस्तकाच्या माहे अक्टोबर इ. स. १८९२ इसवीच्या ३४ व्या अंकांत मोरोपंतकृत 'पंचशती रामायण' छापून त्यांतील युद्धकांड पान ८२ ह्यांतील साकी ४२० वी:—

**"पाहुनि नमुनि ह्मणे प्रभु, 'देसी सद्गति गोदावरि! ती।"**

हिच्यांतील गोदावरी शब्दावर एक टीप दिली आहे. तींत गोदावरीच्या उगमाजवळ नासिकामध्यें जी पंचवटी आहे, तेथें राम राहिले नसावेत, तर गोदावरीच्या मुखाजवळ दुसरें एक जनस्थान आहे तेथें राहिलेले असावेत असें अर्वाचीन शोधकांचें मत आहे. सांप्रत नासिकाला जनस्थान समजतात, ती भ्रांति होय, अशा अर्थाचा मजकूर आहे.

श्रीमंत गणपतराव हरिहर ऊर्फ **बापूसाहेब** कुरुंदवाडकर हे विद्वान्,

कवि, शोधक रसिक असून बहुश्रुत असलेले वाचकांस माहित असणारच. ह्या सद्‌गृहस्थांनीं वरील टीपेवर ता० १७ एप्रिल १८९५ रोजीं एक आक्षेपयुक्त पत्र लिहून तें वर निर्दिष्ट केलेल्या मासिक पुस्तककारांकडे अर्थात् रा. ओक ह्यांजकडे पाठविलें. तें पत्र त्यांनीं आपल्या मासिकपुस्तकाच्या ७४ व्या अंकांत छापलें आहे. ह्या पत्रांत श्रीमंतांनीं असें ह्मटलें कीं "आपण केलेलें विधान अगदीं विसंगत दिसतें. हें शोधकांचें मत नसून केवळ अशोधकांचें आहे असें ह्मणावें लागतें."

हें ह्या वादाचें मूळ. ह्याप्रमाणें श्रीमंत बापूसाहेबांनीं 'बाप दाखीव, नाहीं तर श्राद्ध कर' अशा प्रकारें 'अर्वाचीन शोधकांस' 'पेंचांत' धरल्यामुळें रा. रा. ओक ह्यांस साहजिकच साधार उत्तर द्यावें लागलें. तें त्यांनीं त्याच अंकांत दिलें आहे. ओकांची विद्वत्ता, वाचन, रसिकता, व वाद करण्याची हातोटी हीं तर निबंधमालेपासूनच लोकप्रसिद्ध आहेत. आणि प्रस्तुत प्रसंगीं तर त्यांचें घोंगडें त्यांच्या गळ्यांत येऊं लागलेलें, तेव्हां ते काय स्वस्थ बसणार ? त्यांनीं तब्बल ३२ पेजांचें एक लांबच लांब पत्र लिहून आपल्या मताला पुष्टी दिली आहे. त्यांचा तो प्रयत्न पाहून जीव अगदीं थक्क होऊन जातो. आणि त्या अचाट उद्योगाबद्दल तारीफ केल्यावांचून रहावतच नाहीं. त्यांनीं प्रथमतः वाल्मिकी रामायणाच्या आधारें रामाचा मार्ग, प्रवास, व मुक्काम आपल्या मताप्रमाणें निश्चित करून त्याचा एक नवा नकाशा ह्या पत्रास जोडला आहे. नंतर तोच नकाशा, व त्याच नकाशांतील स्थलनिर्देश खरा हें सिद्ध करण्यासाठीं (१) प्राचीन संस्कृत ग्रंथ, नाटकें, वगैरे; (२) अर्वाचीन शोधक लोकांचे लेख; (३) नासिक हें रामायणीय जनस्थान नव्हे अशा प्रकारचीं बाधक प्रमाणें; (४) लोकवार्ता व दंतकथा; अशा प्रकारचे चार (आपल्या मताप्रमाणें) 'भक्कम' व 'सत्य' पुराव्यांची रेलचेल करून दिली आहे. आणखी संस्कृत, प्राकृत व इंग्रजी अशा साठ सत्तर ग्रंथांची आपल्या तर्फेची ह्मणून यादी दिली आहे ती वेगळीच.

येवढ्या जय्यत तयारीनें बाहुटा चढवून प्रतिपक्षानें जेव्हां मोर्चा बांधला, तेव्हां अर्थातच रणदुंदुभी पुढें करून आपली बिनी अघाडीस चढविण्याचा बोजा श्रीमंतांवर येऊन पडला. श्रीमंतांच्या अनेक गुणांबद्दल, संस्कृत परिचयाबद्दल, विद्वत्तेबद्दल आमचे महाराष्ट्र वाचकही कांहीं अनभिज्ञ नाहींच. तेव्हां त्याप्रमाणें आपल्या समानशील सबळ प्रतिपक्षांस पाहून श्रीमंतांसही स्फुरण चढलें

व त्यांनींही आपली करामत दाखविण्याचें मनांत योजिलें; व त्याप्रमाणेंच मुद्देसूद व शेरास सव्वाशेर असें सुमारें ४५ पानांचें पत्र लिहून तयार केलें. आतां पाठविणार, इतक्यांत महद्दुःखाची गोष्ट! कीं असलें विद्वद्रत्न जें रा. रा. ओक तें कैलासवासी झाल्याची वार्ता श्रवणीं पडली! त्यामुळें श्रीमंतांच्या मनाचा उत्साहभंग झाला, ह्यांत मोठेंसें नवल काय? परंतु सर्व महाराष्ट्रांतील जिज्ञासु व रसिकांचाही उत्साहभंग झाला! ईश्वराची इच्छा! 'ठेवीलें अनंतें तैसेंची रहावें, चित्तीं असों द्यावें समाधान ॥' असाच प्रसंग आला. हें श्रीमंतांचें उत्तर जर ओकांनीं पाहिलें असतें, तर ते स्वस्थ बसले नसते, येवढेंच नव्हे, तर आकाशपाताळ एक करून सोडलें असतें. व त्यावर पुन्हा चाल करून धुमाकूळ उडविण्यास श्रीमंतही असमर्थ होते असें नाहीं. त्यांनींही आपलें समरकौशल्य, व युद्धचापल्य दाखवून प्रतिपक्षीयांस सुद्धां क्षणभर आश्चर्यचकित करून सोडलें असतें. आणि दोन मदोन्मत्त हत्तींच्या टकरा व्हाव्यात, किंवा दोन मल्लांच्या कुस्त्या लागाव्यात; किंवा दोन रणधुरंधर वीर कडनिकडीस यावेत; किंवा दोन बृहस्पतीसारख्या बारिस्टरांचा कडाक्याचा वाद व्हावा; त्याप्रमाणें ह्या विद्वद्वीरांच्या वाग्युद्धपटुत्वाच्या रमणीयतेनें सर्व महाराष्ट्र देश डुलत राहिला असता; व सांप्रतचे जिज्ञासु व शोधक लोक ह्यांचीं अंतःकरणें प्रफुल्लित झालीं असतीं. ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. तो लाभ खरोखरच फार अप्रतिम, अपूर्व, केवळ अद्वितीय असा झाला असता. पण त्या सर्वांस आह्मी निखालस आंचवलों! मग श्रीमंतांच्या मनाचा उत्साहभंग होईल, उदासीनता प्राप्त होईल, ह्यांत आश्चर्य तें कोणतें? ते तर बोलून चालून खुद्द प्रतिपक्षी पडले. आणि प्रतिपक्षी ह्मटला कीं, त्यास आपल्या आक्षेपावर उलट पक्षाकडून काय उत्तर येतें, हें ऐकण्याची उत्कंठा व लालसा मोठी व त्यापासून होणारा आनंद केवळ अप्रतिम. येवढेंच नव्हे तर, उलटपक्षाचा कोटिक्रम ऐकला, कीं आपल्या सर्व श्रमांचें सार्थक झालें असें वाटतें. श्रीमंतांस प्रत्युत्तर ऐकण्याचा प्रसंग येणें तर लांबच, पण इतका वेळ, इतकें चातुर्य, इतका शोध, इतके परिश्रम करून तयार केलेली कृति, ती त्यांच्या 'एकांत मित्राच्या'—कानावरही गेली नाहीं! तेव्हां सहजच ह्या दुर्दैवी पत्राला गांठ मारलेल्या दप्तरांत आजपर्यंत तोंड लपवून बसावें लागलें! तरी आमची—आह्मां महाराष्ट्रीयांची पूर्व पुण्याई थोडीशी शिल्लक होती. ह्मणून श्रीमंतांचं दुःख जनरीतीप्रमाणें हळू हळू कमी होऊन 'आमचे एकांतमित्र विद्वद्वर्य ओक गेले; त्यांच्याकडून उलट उत्तर मिळण्याची आशा खुंटली; तरी वाचक

आहेत; त्यांना तरी आपला पक्ष कळेल व ते तरी आहे एवढ्यांत सत्यासत्याचा निर्णय करतील' असा विचार सुचून सुदैवानें आपला पक्ष लोकांपुढें आणण्याची त्यांच्या अंतःकरणांत प्रेरणा झाली. त्याप्रमाणें त्यांनीं वादाची मूळ साकी, तिच्यावर रा. ओकांनीं दिलेली टीप, त्यावर आपण काढलेले आक्षेप, त्यापुढें ओकांनीं केलेलें सविस्तर प्रतिपादन, व त्यावर आपल्या पक्षाचा भक्कम पुरावा हीं सर्व एकाच पुस्तकांत छापून 'पंचवटीस्थलनिर्णय'! ह्या नांवाचें पुस्तक छापून प्रसिद्ध केलें, व त्याची एक प्रत कृपा करून आमच्याकडे पाठविली. तो आह्मांवर अनुपम प्रसाद झाला असें आह्मी समजतों; व त्याबद्दल श्रीमंत बापूसाहेब ह्यांचे शतशः उपकार मानतों.

आतां रीतीप्रमाणें ह्या पुस्तकावर अभिप्राय देणें हें आमचें कर्तव्य होय. तें करावयाचें. परंतु सदरहू पुस्तकावर अभिप्राय द्यावयाचा ह्मणजे सत्यासत्याचा निर्णय करावयाचा, किंवा एकाचा पक्ष सबळ व दुसऱ्याचा दुर्बळ ह्मणून सांगावयाचें. अर्थात् एकाचा जय व दुसऱ्याचा अपजय हें सिद्ध करायाचें. हें काम अत्यंत बिकट आहे. कारण, एका बाजूला श्रीमंतांसारखें विद्वान् प्रस्थ; आणि दुसऱ्या बाजूला ओकांसारखें विद्वान् प्रकर्ण. तेव्हां ह्यांपैकीं एकास श्रेष्ठ ठरविणें ह्मणजे उजवा हात व डावा हात; उजवा डोळा व डावा डोळा; तंतुवाद्य व गायन; किंवा चंद्र आणि सूर्य ह्यांची प्रतवारी लावण्याप्रमाणेंच दुर्घट होय. किंवा एकीकडे सार्जंट बालेंटाईन व एकीकडे ऑनस्टी; एकीकडे वसिष्ठ व एकीकडे विश्वामित्र; एकीकडे बृहस्पती व एकीकडे शुक्राचार्य असे पूर्वपक्षीं उत्तरपक्षीं असले, ह्मणजे न्यायाधीशास न्याय तोडण्याचें जसें संकट, तद्वतच आमच्यावर आज पाळी आहे. खरा विचार ह्मटला ह्मणजे कसेंही असलें तरी यथाशक्त्या यथामत्या आह्मीं आपला अभिप्राय सादर करावा हें उचित होय. पण तसें करावयाचें मनांत आणलें कीं, दोन संकटें पुढें दत्त करून उभीं राहतात. तीं हीं कीं, एका पक्षाकडे विद्वान्, रसिक, शोधक आणि श्रीमंत आहेत, आणि दुसऱ्या पक्षाकडे विद्वान्, रसिक, उद्योगशील असा विद्वान् असून तो इहलोकपरित्यागी आहे. तेव्हां रा. ओकांच्या पक्षाकडे आमच्या मनाचा कल धांवला, तर त्यांत कांहीं वावगें होणार नाहीं. कारण, ओकांसारख्या विद्वानाच्या पश्चात् त्यांची थोडीशी बाजू राखिली, कृतज्ञताबुद्धीनें त्यांच्या गुणानुवादांत अल्पस्वल्प भर घातली, व पूज्यबुद्धीनें यत्किंचित् सेवा करून तरी येवढ्या सन्मान्य गृहस्थाचे आह्मी उतराई झालों असें होईल. पण असें न होतां, आमचा कल जर

उलटपक्षाकडे फिरला, तर मात्र मोठी पंचायती होईल. कारण, तसें झालें तर 'कोकिळ' हा तोंडाकडे पाहून अभिप्राय देतो, श्रीमंतलोकांची हांजी हांजी करतो, असा आरोप आणावयासही कित्येक मंडळी चुकावयाची नाहींत; व तशा प्रकारच्या कांहीं कुरकुरी उडत उडत आमच्या कानापर्यंतही आलेल्या आहेत, नाहींत असें नाहीं, पण त्यासही आह्मी इतकें मीठ घालित नाहीं. कारण, श्रीमंतांच्या पुस्तकांवर अभिप्राय देण्याचे प्रसंग पूर्वी येऊन गेलेले आहेत. आणि त्या वेळच्या आमच्या क्रमाचें वाचकांस इतक्यांतच विस्मरण होईल असें आह्मांस वाटत नाहीं; व अशा ह्मणण्याची मातब्बरीही लोक तितपतच समजतील. पण दुसरा जो आरोप येणारा आहे तो मात्र फार भयंकर आहे. तो असा. श्रीमंतांचा पक्ष सबळ ह्मटलें ह्मणजे त्यांचा विजय झाला व प्रतिपक्षाचा—अर्थात् रा. ओकांचा—पक्ष दुर्बळ ठरला. ह्मणजे त्यांचा पराजय झाला; ते हरले; त्यांचीं मतें खोटीं—किंवा चुकीचीं ठरलीं असें होणार. ते विद्वत्तेनें वादविवाद करण्यास समर्थ होते, हें तर सर्वविश्रुत आहे. आणि सांप्रत तर ते हयात नाहींत, तेव्हां आतां त्यांच्या पश्चात् त्यांचे दोष किंवा चुक्या दाखविण्याचा प्रसंग आला, तर लोक कदाचित् **'परलोकं गतवतो, हरेरग्रद्वारे शिव शिव शिवानां कलकलः'** अशा कोटींतही आमची गणना करतील. पण लोकांपेक्षां आमचें मनच आह्मांस खाऊं लागेल. अशा अनेक अडचणी आहेत. तरी स्वमताप्रमाणें अभिप्राय देणें हेंच इष्ट. ह्याला दोन तीन कारणें आहेत. पहिलें, तें आमचें कर्तव्य असल्यामुळें बजावलेंच पाहिजे. त्यावांचून सत ना गत. दुसरें, श्रीमंतांचे पहिल्या चार ओळींबद्दलच कोटिशः धन्यवाद गाणारे, आपल्या लेखावर खंडन असो कीं मंडन असो; आक्षेपकाचे आभार मानणारे; व अशा प्रकारचा वाद आपल्या लोकांत सुरू झाल्याबद्दल आनंदानें उचंबळणारे त्यांचे प्रतिपक्षी तर त्यांचें प्रत्युत्तरावर उत्तर न देतां—इतकेंच नव्हे, तर तें कानांवरही न घेतां इहलोक सोडून गेले! त्यामुळें, आपला पक्ष खोडणारा कोणी नाहीं, पाहणारा व ऐकणारा गेला इत्यादि कारणांनीं श्रीमंतांचा उत्साहभंग तर झालाच आहे. तरी तितक्यांत धैर्य धरून त्यांनीं महाराष्ट्र वाचकांवर भिस्त ठेवली आहे. अशा स्थितींत आह्मी सारेच जर मूकव्रत धारण करूं तर, त्यांस काय बरें वाटेल? गुणग्राही सारेच अस्तास गेले; व आमचे श्रम ओकांच्या पश्चात् निवळ पाण्यांत पडले, असें नाहीं का वाटणार? ह्यास्तव त्यांच्या श्रमांची, त्यांच्या विद्वत्तेची, त्यांच्या गुणांची, त्यांच्या सरलतेची, त्यांच्या जिज्ञासुपणाची थोडी तरी चीज करणें हेंच ह्या प्रसंगीं

आह्मांस उचित आहे. असें न करूं तर कृतघ्नतेस पात्र होऊं. तिसरें कारण हें कीं, कै० ओक ह्यांची मनापासून अशी इच्छा होती कीं, आपले लेख लोकांनीं मन:पूर्वक अवलोकन करावेत, त्यांची चर्चा व्हावी, त्यांजवर आक्षेप काढावेत, व आपल्या लोकांत सद्वादविवादाची पद्धति निदान जागृत तरी असावी. मग अन्यांचीं मतें आपल्यास अनुकूल असोत कीं नसोत. तेव्हां आमचा हा क्रम कसाही त्यांस साधक बाधक असला तरी, त्यांच्या हेतूस अनुसरूनच होईल; व ह्या कर्तव्यास आह्मी विन्मुख झाल्यास ओकांच्या परलोकांतील आत्म्यासही संतोष होणार नाहीं. इत्यादि विचारांचें पाठबळ घेऊन आह्मी आपल्या कामास सुरवात करतों.

प्रथमत: वादी व प्रतिवादी; त्यांचें सामर्थ्य व योग्यता; वादाचा उपस्थित विषय व त्यावरील आक्षेप; त्याबद्दल थोडक्यांत–संक्षेपत:–परंतु एकवार पुनरुच्चार करून नंतर पूर्वपक्षानें दाखविलेल्या आधारांचा क्रम; व त्यावरील उत्तरपक्षाचें खंडन, व सामील केलेले जादा ग्रंथ हीं प्राधान्यत्वेंकरून दाखल करून त्यावर त्याच क्रमानें साधक बाधकांचा विचार करावयाचा असें योजिलें आहे.

ह्यांत कै० रा. रा. वामन दाजी ओक हे पूर्वपक्षी किंवा वादी होत हें पूर्वीं सांगितलेंच आहे. हे रायपुरास हायस्कुलावरील हेड मास्तर होते. ह्यांस इंग्रजी, संस्कृत व मराठी ह्या भाषा उत्तम प्रकारें अवगत होत्या. मराठी कवितांवर त्यांचा दृढतर व्यासंग होता. ते मोठे रसिक व मार्मिक असून स्वत: कवि होते. वि. ज्ञा. वि. मासिक पुस्तकांत 'श्रीमन्माधवनृपनिधन' काव्य ह्यांनीं रचलेलें छापून प्रसिद्ध झालें आहे. तें फार रसभरित, सरळ, व गोड असून प्रसादानें भरलेलें आहे. ह्याशिवाय 'काव्यमाधुर्य' गणपतिनिधनकाव्य, लार्ड बेकनचें चरित्र, नानकचरित्र वगैरे दुसरेही ग्रंथ उत्तमांपैकीं आहेत. प्रसिद्ध निबंधमालाकारांशीं मोरोपंतांच्या कवितासंबंधानें ह्यांनीं बराच कडाक्याचा वाद केला होता, व त्यांत त्यांची शोधकता, वाचनव्यास, विद्वत्ता, मार्मिकता, हीं उत्तम प्रकारें व्यक्त झालीं. कै. जावजी दादाजी ह्यांनीं सुरू केलेलें सुंदर मासिक पुस्तक 'महाराष्ट्रकाव्यसंग्रह' हें प्रथम रा. रा. जनार्दन बाळाजी मोडक हे चालवित असत. त्यांच्या पश्चात् तें काम त्यांच्याहून उत्तम रीतीनें आपल्या हयातीपर्यंत रा. ओक ह्यांनीं चालविलें. त्यांतील विपुल टीपांवरून संस्कृतांतील व आँग्लभाषेंतील अलंकारशास्त्र, प्राचीन अर्वाचीन मतें, स्थल व कालनिर्णयात्मक कल्पना इत्यादि-

कांशीं त्यांचा परिचय उत्तम प्रकारचा असल्याचें स्पष्ट दिसून आलें; व वादाचा मुद्दा ह्याच पुस्तकांत उत्पन्न झाला.

श्रीमंत गणपतराव हरिहर ऊर्फ बापूसाहेब हे उत्तरपक्षाचे अध्वर्यु; हें वर सांगण्यांत आलेंच आहे. ह्यांचें शिक्षण जुन्या पद्धतीप्रमाणें झालें आहे. त्यांचें संस्कृत ज्ञान उत्तम प्रतीचें आहे. इंग्लिशभाषाज्ञान नाहीं असें नाहीं, पण थोडें. महाराष्ट्रकवींशीं ह्यांचा अतिपरिचय. विद्याव्यासंग दांडगा. बहुश्रुतपणा, आणि शोधक स्वभाव फार नांवाजण्यासारखा. हे स्वतः उत्तम कवि असून त्यांनीं गणेशपुराणावर आर्या, विनायकस्तव, भट्टवंशकाव्य वगैरे ग्रंथ तयार केलेले आहेत. आक्षेप घेऊन सत्तत्त्व काढण्याकडे ह्यांची प्रवृत्ति मोठी. निबंधमालाकारांशीं ह्यांचेही दोन हात झालेले आहेत. तत्व जाणण्याकडे ह्यांची प्रवृत्ति फार. सारासारविचाराची आवड. जुन्या पक्षाचा दुराग्रह, व नव्या पक्षाचा तिरस्कार, किंवा आत्मप्रौढीची झांक हीं ह्यांच्या आंगीं मुळींच दिसून येत नाहींत. ह्यांच्या लेखांत सरलता व निरभिमानपणा हे गुण स्पष्ट दिसून येतात. ह्या गोष्टीही पुढील विवेचनांत स्पष्टपणें दिसून येतील.

येवढ्यावरून दोहों पक्षांकडील धुरंधरवीर कसे आहेत हें लक्ष्यांत येईलच. आतां मोरोपंतांच्या साकींतील 'गोदावरी' शब्दावर ओकांनीं दिलेल्या टीपेंतील वादविषयक विधानांतील मुद्याचे शब्द:—

"ही गोदावरी प्रसिद्ध नासिकाजवळची नव्हे. राजमहेंद्रीच्या पश्चिमेस ७५।१०० कोसांचे सुमारास जी गोदावरी आहे ती येथें घेतली पाहिजे. हल्लींचें सिंहलद्वीप हें जर लंका बेट असेल तर येथें प्रसिद्ध नासिकाजवळच्या गोदावरीचें ग्रहण करणें सयुक्तिक होणार नाहीं...............नासिकाला जनस्थान ह्मणतात ही भ्रांति आहे. .........गोदावरीच्या मुखाशीं जें पंचवटीस्थान आहे तें रामाचें निवासस्थान असावें असें अर्वाचीन शोधकांचें मत आहे.'

ह्यावर श्रीमंतांच्या आक्षेपांतील मुद्याचे शब्द:—

"......नासिकाजवळील पंचवटींत (राम) होते असें ह्मणणें भ्रांतिमूलक असें अलीकडील शोधकांचें मत असल्याचें आपण दर्शविलें आहे, परंतु हें अगदीं विसंगत दिसतें. हें शोधकांचें मत नसून केवळ अशोधकांचें मत आहे, असें ह्मणावें लागतें.......तसेंच सिंहलद्वीपही लंका नव्हे. सिंहलच्या दक्षिणेस लंका असली पाहिजे.

"......लंका सांप्रत उपलब्ध नसेल हें निराळें. पण लंका सिंहलद्वीपाहून वेगळी हें खास वाटतें."

ह्यावरून—लंका हेंच सिंहलद्वीप, व राम राहिलेलें जनस्थान नासिकाजवळील पंचवटी असें ह्मणतात ती भ्रांति आहे. राम हे गोदावरीच्या मुखाजवळील पंचवटींत ( राजमहेंद्रीजवळ ) होते.—हें अर्वाचीन शोधकांचें मत ओक सांगतात येवढेंच नव्हे, तर 'अर्वाचीन शोधक ग्रंथकारच' त्यांस 'विशेष मान्य आहेत.' व त्यांचे पुरावेच 'सत्य' असें त्यांच्या मनानें गृहीत धरलें आहे. श्रीमंतांचें ह्मणणें—हें मत शोधकांचें नसून अशोधकांचें आहे. राम राहिलेली पंचवटी नासिकाजवळचीच गोदेच्या उगमाजवळचीच खरी. मुखाजवळची बनावट पंचवटी धरल्यास सारें विसंगत होतें. प्राचीन सर्व कवि अडाणी ठरतात, आणि रामयात्रेचा क्रमही बिघडतो. आणि सिंहलद्वीप ही लंका नव्हे. लंका निराळी असली पाहिजे.

ही पूर्वपक्षाची आणि उत्तरपक्षाची मूळ पीठिका झाली. ह्यानंतर पूर्वपक्षसमर्थनार्थ ओकांनीं ३२ पृष्ठांचें एक लांबचलांब पत्र व एक नकाशा दिल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे; व त्यावर श्रीमंतांचें भक्कम पुराव्याचें खंडनपर ४५ पृष्ठांचें प्रत्युत्तर आहे. ओकांनीं आपल्या तर्फेच्या ह्मणून ६०।७० इंग्रजी, मराठी व संस्कृत ग्रंथांची यादी वाचकांपुढें टाकिली आहे. श्रीमंतांनीं ती सर्व लक्ष्यपूर्वक चाळून आणखी आपल्या पुराव्याचे १०।११ जादा ग्रंथ पुराव्यांत दाखल केले आहेत.

तेव्हां एकानें ५०।६० ग्रंथ, तर दुसऱ्यानें ते सर्व धुंडाळून आणखी दहा बारा वर लादले; अशीं घेंडें जेथें वादास प्रवृत्त झालीं आहेत, तेथें त्यांच्या वादांचा निर्णय करणारानें निदान पांच चारशें तरी ग्रंथ धुंडाळले पाहिजेत हें उघड आहे असें सकृद्दर्शनीं वाटतें. परंतु आमच्या मतें तशी कांहीं आवश्यकता नाहीं. कारण, ह्यांत सत्य निवडून काढण्याचा उद्देश आहे, विद्वत्ता प्रदर्शित करण्याचा उद्देश नाहीं. अनुकूल प्रतिकूल ग्रंथ होते नव्हते तेवढे धुंडाळण्याचें काम डोळ्यांत तेल घालून उभय पक्षकारांनींही केलें आहे; व साधक बाधक वचनें पुढें आणून ठेविलीं आहेत. त्यांत सयुक्तिक कोणतीं व अयुक्तिक कोणतीं तें ठरविलें ह्मणजे झालें. आणि तेवढें काम करावयाला आंगांत साधारण सारासारविवेचनशक्ति असली ह्मणजे पुरें होईल असें आ-

१ 'पंचवटीस्थलनिर्णय' पान २८ (ब) ओळ ५।६ व ९ पहा.

मचें मत आहे. आतां खरें ह्मटलें ह्मणजे उभयपक्षीं पुराव्यांत आलेले समग्र ग्रंथ निर्णय करणारानेंही पुनरपि चाळावेत, बारकाईनें मागें पुढें आणखी कांहीं साधकबाधक वचनें आहेत कीं काय तें पहावें, व कोणीं कांहीं आपल्या तर्फेनें दडपादडपी केली आहे कीं काय, ह्याचाही तल्लास लावावा हें योग्य आहे. परंतु ती गोष्टही केवळ अशक्य होय. कारण, ओकांनीं ज्या ग्रंथांची यादी पुढें केली आहे, त्यांपैकीं कित्येक ग्रंथ श्रीमंतांसारख्यांस सर्व अनुकूलता असूनही उपलब्ध झाले नाहींत, मग आमच्या सारख्या दूरदेशीं राहणाऱ्यांस ते मिळावेत कसे? तेव्हां समग्र ग्रंथ पहावयास मिळणें हेंच आधीं दुरापास्त आहे. दुसरें तें सारें लक्ष्यपूर्वक चाळावयाचें ह्मणजे कसलाही उद्योगी व रिकामा माणूस असला तरी, त्याची छाती दडपल्यावांचून रहावयाची नाहीं. आमच्या कोकिळाची प्लेग वगैरे संबंधानें आधींच तारांबळ झालेली, आणि तशांत हें काम अंगीकारलें, ह्मणजे मग पहावयास नकोच. तेव्हां हें सर्वच आहाराबाहेरचें आहे. पण आह्मांस वाटतें तसें करण्याची इतकी जरूरही पण नाहीं. कारण, दोन्हीही पक्षकार सत्याचे चहाते व असत्याचा अपलाप न करणारे असे आहेत. तेव्हां अशा क्षुद्र कल्पना मनांत आणल्यास आमच्याकडेच न्यूनता येईल. ह्यास्तव तशा प्रकारच्या कोणत्याही भानगडींत न पडतां, ओकांच्या पूर्वपक्षाकडील वचनें देऊन त्यापुढें श्रीमंतांच्या उत्तरपक्षाचें खंडन, व त्यानंतर त्यांचीं अधिक वचनें देऊन त्यांतील सत्यासत्याचें विवेचन करतों. परंतु हीं सर्व वचनें देणें, ह्मणजे तें सबंध पुस्तकच उतरून घेणें होईल. ह्याकरितां त्या वचनांचें संक्षेप—नव्हे अतिसंक्षेप—करणें अवश्य आहे. प्रधान वचनें तेवढीं घेऊं, आणि लहान सहान वर्ज्य करूं. आणखी, प्रधान वचनें घ्यावयाचीं तीं सुद्धां सबंध उतरून न घेतां, त्यांतील मुख्य मुद्याचें व सारांशाचें वाक्य तेवढेंच घेऊं. अधिक मौज पहाणें असेल त्यांनीं हें 'पंचवटीस्थलनिर्णया' चें पुस्तक अवश्य पहावें. वरील वादाचीं साधक बाधकें येणेंप्रमाणें आहेत:—

१. हल्लींचें सिंहलद्वीप हीच लंका होय. हें सिद्ध करण्याकरितां रा० ओक ह्यांनीं कै० ज. बा. मोडककृत 'भास्कराचार्य व तत्कृत ज्योतिष' ग्रंथांतील '**निरक्षदेशात् क्षितिषोडशांशे**' इत्यादि श्लोक व त्याजवरील मोडकांच्या टीपा दिल्या आहेत. श्रीमंतांचें ह्मणणें 'क्षितिषोडशांशे' ह्याचा अर्थ १६ अक्षांशावर असा केला आहे ती चूक आहे. पृथ्वीच्या सोळाव्या अंशावर असा पाहिजे. ह्याला दुसरें प्रत्यक्ष प्रमाण त्यांच्याच श्लोकाच्या उत्तरार्धाचें. त्यांत 'त्याला १६ नीं गुणलें असतां

सर्व पृथ्वीचा परिघ येईल' असें साफ ह्मटलें आहे. ह्यावरून हल्लींचें सिंहलद्वीप ही लंका नसून, लंका ही त्याच्या दक्षिणेस सात अंशांवर असली पाहिजे, ही गोष्ट निर्विवाद झाली हें सांगणें नकोच. ती खोडून काढण्याला ब्रह्मदेवालाही मार्ग उरला नाहीं.

येवढ्या घोडचुक्या—ओक व मोडक—ह्या उभय विद्वानांच्या हातून कशा राहिल्या ह्याचें नवल वाटतें. क्यांडी शहर हीच लंका ह्यास कोणतेंही प्रमाण नसतां तो सिद्धांत गृहीत धरावयाचा, 'क्षितिषोडशांशे' याचा अर्थ सोळा अक्षांश करावयाचा, आणि तेथून उजयनी प्रस्तुत १६ अंशांवरच असून भास्कराचार्य तेवीस अंशांवर मानतात ह्मणून, व उज्जयनीवरून नेलेलें याम्योत्तर तिरकस होतें, ह्मणून त्यांस अडाणी ठरवावयाचें या धाष्टर्यास काय ह्मणावें? त्यापेक्षां लंका हें प्रस्तुतचें क्यांडी शहर नव्हे, तर त्याच्या पलीकडे सात अक्षांशावर कोणतें तरी एक शहर पूर्वीं असावें असें धरल्यानें जर उजयनीचें अंतर, व याम्योत्तरवृत्ताचा तिरकसपणा मोडतो आहे, तर हेंच सयुक्तिक नव्हे काय? पण त्यांत अर्वाचीन शोधकांची थोरवी व दुराग्रहाची झांक राहणार कशी? 'हल्लींचें सिंहलद्वीप हें जर लंका बेट असेल, तर जेथें प्रसिद्ध नासिकाजवळच्या गोदावरीचें ग्रहण करणें सयुक्तिक होणार नाहीं.' असें ओकांचें वाक्य आहे. तेव्हां तसें नसेल तर नासिकाजवळच्या गोदावरीचें ग्रहण सयुक्तिक होईल असा त्यांचाच ध्वनितार्थ झाला. आणि त्यांच्याच ह्मणण्याप्रमाणें त्यांचा पक्ष खोटा पडला हें उघड दिसतें. 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' ह्या न्यायानें पहिल्या पवित्र्याबरोबरच ओकांची पाठ जमिनीस लागावी, ही अत्यंत खेदाची गोष्ट होय. असो. पण पुढें पाहूं या.

२. नंतर आरंभींच रा. ओक ह्यांनीं आपण किती ग्रंथ चाळले, किंवा आपल्या पक्षास किती ग्रंथांचें पाठबळ आहे, हें दाखविण्याकरितां 'कांहीं मित्रांच्या सूचनेवरून' सुमारें ३०।४० ग्रंथांची यादी दिली आहे. तिची वासलात श्री० नीं येणेंप्रमाणें लावली आहेः—

१७ ग्रंथ (प्रयत्न करूनही) मिळत नाहींत याबद्दल वाईट वाटतें. ६ ग्रंथांत पंचवटीसंबंधानें एक अक्षर सुद्धां नाहीं. 'मेघदूत' 'प्रसन्नराघव नाटक' 'भारतस्थलादर्श' इत्यादि ग्रंथ आह्मींही चाळून पाहिल्यावरून श्रीमंतांप्रमाणें आमचीही पण खात्री झाली आहे. १० ग्रंथांत दंडकारण्य, जनस्थान, पंचवटी, येवढीं नांवें आढळतात. स्थलनिर्देश करण्याला कांहींएक साधन नाहीं. बाकी उरलेल्या ग्रंथांचा विचार श्रीमंतांनीं पुढें केलाच आहे.

३. वाल्मिकी रामायणाच्या आधारानें ओक ह्यांनीं दिलेला रामयात्राक्रम, व तदनुरोधानें तयार केलेला नकाशा ह्यांवर श्रीमंतांचें ह्मणणें—ओकांच्या ह्या परिश्रमाबद्दल बहुत उपकार आहेत. यात्राक्रम बरोबर आहे. परंतु स्थलदर्शक नकाशा मात्र आह्मांस बिलकूल संमत नाहीं. जनस्थान किंवा पंचवटी हीं स्थळें, गोदेच्या

मुखाजवळ, राजमहेंद्रीजवळच असावींत ह्याला वाल्मिकी रामायणांत मुळींच आधार नाहीं. ह्यास्तव व नासिकाजवळ तीं स्थळें धरून नकाशा तयार करतां येईल; व त्यांसही कोणाच्यानें दोष देववणार नाहीं. ह्यास्तव ओकांनीं आपल्या ह्मणण्याला पुष्टि आणण्यासाठीं पुरावे दाखल केले आहेत तेः–

४ प्राचीन ग्रंथ—'**जनस्थानं मलयाद्रिसमीपे रक्षोवासस्थानम्**' असें अनर्घराघवटीकाकार रुचिपति आपल्या टीकेंत ह्मणून रामाचा प्रवास पूर्व-भागांतून सुचवितो.

'**गद्गदनदद्गोदावरीवारयः**' हें भवभूतीचें वाक्य आहे. यावरून नासिका-जवळील गोदावरी कवीच्या मनांत नसून पुढें जेथें गोदावरी मोठी झाली आहे त्या गोदावरीचें स्वरूप, भवभूतीच्या हें वाक्य लिहितांना डोळ्यांपुढें खास असावें. ह्यावर श्रीमंतांचें उत्तर–दशरथराजा राम वनवासास गेल्यानंतर सहाव्या दिवशींच मेला, असें वाल्मिकी, अग्निपुराण सांगत असतां राजशेखर कवि त्यास १३ वर्षें जिवंत ठेवून रामाच्या वनवासांतील कथा त्यास खुशाल ऐकावयास लावतो. इत्यादि असंबद्ध वर्णनें भवभूत्यादिकांच्या नाटकांतूनही आढळतात. नाटककर्त्यांचें काम प्रकृतरस पो-षण करण्याचें आहे. तादृश खरें खोटें पहाण्याचें नाहीं. खरें खोटें पाहण्याचें काम इतिहासकाराचें आहे. तात्पर्य, नाटकांतील लेख सर्वत्र प्रमाणभूत मानतां येणार नाहींत. तथापि नाटकांस ओक हे उरावरील हात मानित असल्यामुळें आह्मी त्यांचाही विचार करतों. असें ह्मणून श्रीमंतांनीं उत्तरें दिलीं आहेत. 'गद्गदनदद्गो-दावरीवारयः' ह्यावर श्रीमंतांनीं असें ह्मटलें आहे कीं, कवि हे नेहमीं अतिशयोक्ति करित असतात. लहानशा ओढ्याला पूर आलेला पाहून सुद्धां वरील विशेष लावून ते मोकळे होतील. मग नासिकाजवळची गोदावरी पर्जन्यकालांतील एक दोन महिने तरी तशा विशेषणास पात्र आहे.

परंतु आमचें मत वरच्या वाक्यासंबंधानें उभयतांहूनही भिन्न आहे. 'गद्गदनद-द्गोदावरीवारयः" ह्या वाक्यांत घोघो शब्दानें पाणी उंचावरून धांवत येतें असा रोंख आहे. ह्मणजे पाण्याला उसळी पाहिजे. त्यासाठीं ओकांनीं मुखाकडचें रुंद पात्र घेतलें आहे हें केवळ विरुद्ध आहे. पाणी उसळणें, वरून खालीं पडणें, खळखळ वाजणें ह्या सर्व क्रिया उगमाकडे व्हावयाच्या. कारण उगम हा पर्वतांतूनच असतो. मुखाकडे संथ, रुंद व खोल पाण्याकडे तसें होण्याचा मुळींच संभव नाहीं. ह्याकरितां भवभूतीच्या डोळ्यांपुढें गोदावरीचा उगम असून नासिकाजवळची पंचवटी असावी हें उघड दिसतें. ह्यासाठीं आह्मी 'गद्गदनदद्गोदावरी' हें वाक्य ओकांच्या पुरा-व्यांतून काढून बेलाशक श्रीमंतांकडच्या फायलांत ओवतों.

यापुढें ब्रह्मपुराणांतील गौतमी माहात्म्यापैकीं कांहीं किरकोळ भासमान आधार दाखवून ओक ह्मणतात. 'या गौतमीमाहात्म्यांत लक्षांत ठेवण्याजोगी एक गोष्ट

आहे ती ही कीं, हजारों तीर्थांचीं त्यांत नांवें दिलीं असून पंचवटीतीर्थांचें नांव कोठेंही नाहीं.' ह्यावर श्रीमंतांचा उत्तरपक्षः—

"परंतु सुदैवानें ह्याच माहात्म्यांतील १८ व्या अध्यायांत पंचवटीचा निर्णय आहे. तो असा. सूर्याचें तेज असह्य झाल्यामुळें त्याची पत्नी घोडीचें स्वरूप घेऊन वनांत तप करीत होती. सूर्य घोडा होऊन तेथें आले. सूर्य न जाणून आपल्या पातिव्रत्याचा भंग होईल ह्या भयानें ती फिरत फिरत जनस्थानांत आली; व तेथील पांच ब्राह्मणांच्या बटूंनीं घोड्यास मागें परतविलें. ह्मणून सूर्यांनीं त्यांस वट व्हा असा शाप दिला. त्याप्रमाणें जेथें पांच वट झाले ती पंचवटी. असें असून ओक नाहीं ह्मणतात तेव्हां ओकांनीं हें माहात्म्य किती काळजीपूर्वक तरी वाचलें!" ह्यावरून ओकांच्या पक्षाची काय दशा झाली, हें कांहीं निराळें सांगणें नको.

५ आतां दुसऱ्या प्रकारचा पुरावा ह्मणजे अर्वाचीन शोधक लोकांच्या लेखांचा. ह्या संबंधानें ओक ह्मणतात "या पुराव्यासंबंधानें श्रीमंतांची कितपतशी मान्यता पडेल हें सांगवत नाहीं. कारण, त्यांच्या पत्राच्या झोंकावरून ते या अर्वाचीन शोधकांस 'अशोधक' समजतात असें दिसतें. परंतु प्रथम प्रकारच्या पुराव्यांतील ग्रंथकारांपेक्षां हे अर्वाचीन शोधक ग्रंथकार आह्मांस विशेष मान्य आहेत." ह्यावर श्रीमंतांचें उत्तर:—"आमचें मत असें असल्याचें ओकांनीं कशावरून गृहित केलें? आमच्या पत्रांत राम राहिलेली पंचवटी, नासिकाजवळची नव्हे, असें ह्मणणाऱ्यांच्या मतास 'अशोधकांचें' मत ह्मटलें आहे. 'पुराणमित्येव न साधु सर्वं' इत्यादि वाक्यें माहित असूनही भलतेंच विधान आह्मीं केलें, तर मोठाच प्रमाद होईल. आतां एवढेंच सांगतों कीं, जुन्या किंवा नव्या अशा कोणत्याही वर्गास अनुलक्षून आह्मीं लिहिलेलें नाहीं. फक्त भद्राचलंजवळच्या पंचवटींत राम होते हें ह्मणणें अप्रमाण आहे, एवढें आमचें मत आहे. ओकांनीं मात्र जुन्या ग्रंथकारांपेक्षां अर्वाचीन ग्रंथकार आपल्यास जास्त मान्य असल्याचें साफ कबूल केलें आहे."

ओकांनीं अर्वाचीन शोधकांचा 'विशेषमान्य' ह्मणून जो पुरावा दिला आहे, त्यांतील गुरुवर्य डा० **भांडारकर** ह्यांच्या 'दक्षिणच्या इतिहासांतील' एक इंग्रजी उतारा हा मुख्य आहे. त्यांतील सारांशः—

"जेथें राम रहात होता ती पंचवटी ह्मणजे नासिक; परंतु कवीनें आपल्या नायकाला विंध्यापासून नासिकाइतक्या दूरस्थळीं पश्चिमेस नेलें असेल, असें फारसें संभवत नाहीं. रामायणांत तसेंच उत्तररामचरितांत, जें वर्णन आहे त्यावरून पाहतां राम ज्या पंचवटीमध्यें राहत होता, तिच्या जवळ गोदा पुष्कळ रुंद असली पाहिजे. नासिक गोदेच्या उगमापासून फार जवळ आहे. तेथें ती रुंद असण्याचा संभव नाहीं."

ह्यावर श्रीमंत ह्मणतात "त्याच्याच खालच्या आणखी चार ओळी देण्याची ओकांनीं कां बरें तसदी घेतली नाहीं? त्या ओळी अशा आहेत."

"दुसऱ्या पक्षीं पहातां सह्याद्रीच्या उत्तरभागाच्या आसमंतांतला प्रदेश, पृथ्वीवर अत्यंत रम्य आहे असें पुराणांत लिहिलेलें आहे. त्या स्थळीं रामाला संतोषविण्यास आणि सीतेला रमविण्यास भारद्वाजमुनीनें स्वर्गांतल्या सारखे वृक्ष आणि वनस्पति उत्पन्न केल्या आणि त्यांचें एक रम्य उपवन बनलें. मार्कंडेयपुराणांत गोवर्धन हें शहर आहे असें लिहिलें आहे; परंतु वायुपुराण आणि मत्स्यपुराण ह्यांचें ह्मणणें गोवर्धन पर्वत होता असें आहेसें दिसतें. याप्रमाणें गोवर्धनाचा जो स्थलनिर्देश केला आहे त्यावरून गोवर्धन या नांवाचें नासिकाजवळ जें खेडें आहे तेंच तें असावें. आणि याप्रमाणें पहातां पंचवटी ह्मणजे नासिक असेंच तिन्ही पुराणांचें ह्मणणें आहे असें समजलें पाहिजे."

ह्यावरून ओकांच्या—अर्थात् अर्वाचीन शोधकांच्या—पक्षाची काय दशा झाली, व त्यांच्या परिशीलनाची कशी त्रेधा उडाली, हें वाचकांस आणखी व्यक्त करून सांगण्याची तादृशही आवश्यकता राहिली नाहीं.

ह्यापुढें बाबू आनंदराम बोरुवुवा बी. ए. इ. ह्यांच्या भवभूतीवरील निबंधांतील एक इंग्रजी उतारा आहे. त्यांतील सारांश:—

"पूर्वेकडील घाटाच्या ज्या रांगेंतील ज्या भागांतून गोदावरी वाहत वाहत मैदानांत येते, त्या पर्वताच्या रांगेपैकींच प्रस्रवण हा एक पर्वत आहे. आणि या गोदावरीच्या उत्तरेस जवळच पंचवटी आहे."

ह्यावर श्रीमंतांचें ह्मणणें "इतकेंच लिहून हे निबंधकार उगे बसते, तर निदान **बोरुवुवांचें** मत तरी ओकांस अनुकूल आहे असें आह्मांस निमूटपणें कबूल करणें भाग होतें. परंतु आमच्या सुदैवानें **बोरुवुवांनीं** याच्याच पुढें:—

"ऋष्यमूक आणि पंपा हीं पूर्वेस आहेत आणि यांचीं हींच नांवें-जरी तीं नकाशांत दिली नाहींत तरी अद्याप कायम आहेत." या लिहिण्यानें बोरुवुवांचा लेख त्यांसच विरुद्ध झाला. एवढेंच नव्हे, ओकांचा पक्ष ठार बुडाला असें ह्मणावें लागतें.

'इम्पीरिअल् ग्याझेटर' 'व्हीलर साहेबकृत हिंदुस्थानचा इतिहास' 'वुईलसन्कृत संस्कृत डिक्शनेरी' इत्यादिकांतीलही असेच ओकांनीं दिलेले पुरावे, सर्वस्वीं विरुद्ध असल्याचें श्रीमंतांनीं स्पष्ट दाखविलें आहे.

६ येथपर्यंत ओकांच्या पुराव्यांतील 'मी मी' ह्मणविणाऱ्या सरदारांची कशी काय त्रेधा झाली तें सांगितलें. आतां कांहीं किरकोळ किरकोळ मासले वाचकांपुढें ठेवूं.

"खारियाल" ह्मणून एक जागा रायपूर जिल्ह्यांत आहे. अर्थात् भद्राचलंकडे असून, 'खरालय' ह्या शब्दाचा हा अपभ्रंश आहे. यावरून राम राहिलेली पंचवटी भद्राचलंजवळीलच असें ठरविलें":—

"ठीक आहे. पण नासिकाजवळही एक खरादिकांची राहण्याची जागा प्रसिद्ध आहे. त्यास हल्लीं 'तीवधा' ह्मणतात. मिळून ओकांच्या विरुद्धही एक जागा आहे. ह्मणून हा सत्प्रतिपक्ष झाला."

"भद्राचलंकडे असलेलीं जगद्दलनपूर, राकापल्ली, राक्षसभुवन वगैरे राक्षस राहिलेल्या द्योतकांचीं गांवें आहेत.:—"

"होय. पण तशींच नासिकाकडेही राक्षसभुवन वगैरे गांवें आहेत."

"रथबगूता नांवाची एक टेंकडी आहे. [ही भद्राचलंकडे असावी.] रथबगूता याचा अर्थ तैलंगी भाषेप्रमाणें रथाचा पहाड असा होतो. या टेंकडीवरून रथांत घालून रावणानें सीतेस नेलें. त्याच्या चाकोऱ्या पडलेल्या अद्यापि दिसतात असें लिहिलें आहे."

"होय, असतील. पण इकडेही नासिकाजवळ जटायूनें रावणाचा रथ मोडला. असलेले गाढवमुखी घोडे मारले. त्यांचे सांपळे अद्यापि पडलेले लोक दाखवितात. ते खोटे कां? आणि ओकांचा रथबगूताच खरा कां? मिळून हाही सत्प्रतिपक्षच झाला."

"पर्णशाळेजवळ रावण गोदा उतरला."

"हें मात्र ओकांनीं साफ खोटें लिहिलें आहे. रामायणांत रावण आकाशमार्गानें गेला असें स्पष्ट आहे."

**पूर्वपक्षः**—"राम चित्रकूटाहून थेट नासिकास येता तर त्यास प्रथम दशार्ण, मग चेदिमंडल, नंतर दक्षिण कोसल, नंतर विदर्भ वगैरे देश लागतात, तर या देशांतून राम कधींच आला नसता." कारण काय तर ह्मणे "हे सर्व देश रामाच्या आप्तांचे, कोणी अजोळ, कोणी पणजोळ अशांच्या देशांतून स्वप्रतिज्ञाभंग केल्यावांचून रामास जातांच आलें नसतें."

"व: ! काय तर्क हा! प्रथम या ठिकाणीं ओकांची केवढी चूक झाली पहा. मुळीं कौसल्या ही दक्षिण कोसल राजाची कन्या नसून ती उत्तर कोसलच्या राजाची कन्या. उत्तर कोसल देश अयोध्येजवळच आहे; व उत्तर कोसल तर ओलांडलाच पाहिजे होता. आणि तो उत्तर कोसल ओलांडण्यास रामास तीन चार दिवस लागले, असें प्रसन्नराघवांत स्पष्ट आहे तर या उत्तर कोसलांतून जातांना रामास प्रतिज्ञाभंग करावा लागला नाहीं. मग पणजोळांत तरी कां प्रतिज्ञाभंगाचें भय रामास वाटावें कळत नाहीं."

अशा प्रकारें पूर्वपक्षाचें खंडन केल्यानंतर ज्यांत जनस्थानासंबंधानें स्पष्ट उल्लेख आहे अशा १ **श्रीगणेशपुराण**, २ **श्रीमुद्गलपुराण** इत्यादि १० ग्रंथांतील वाक्यें दाखल करून श्रीमंतांनीं आपला पक्ष दृढ केला आहे.

वर दिलेल्या गोष्टवाऱ्यावरून रामायणीय जनस्थान कोणचें, नासिकाजवळील गोदावरीच्या उगमाजवळचें,—कां राजमहेंद्रीच्या जवळील गोदावरीच्या मुखाजवळचें?—सत्पक्ष कोणचा व असत्पक्ष कोणचा? ह्याचा निर्णय केवळ आह्मींच सांगितला पाहिजे असें नाहीं. आमचे वाचक सुद्धां सहज सांगूं शकतील. ह्याशिवाय श्रीमंतांनीं इतर कितीएक लहान मोठ्या मुद्यांवर जी मौज केली आहे ती फारच मनोरंजक आहे. ह्यास्तव तें मूळ पुस्तकच वाचण्याविषयीं आमची सर्वांस आग्रहपूर्वक विनंती आहे. मोठमोठ्या रणधुरंधरांची जर श्रीमंतांनीं अशी दाणादाण करून राठोड मारवाड्याप्रमाणें—'मोटेच्या बैलासारखे' मागें सरकावयास लावलें, तर इतर बिचाऱ्या बाजारबुणग्यांची दशा काय? 'तिमिरातूळा रविप्रभावात्या' किंवा 'बळ उडविलें तिहीं खगपतिपक्षांहि तें सहज मशक' हीच!

असो. वादाचा निकाल बहुतेक लागलाच. ह्यांत 'अर्वाचीन' शोधकांचा पक्ष उचलण्यांत व त्यांचें मंडण करण्यांत ओकांच्या अपरिहार्य चुका होत गेल्या आहेत. आणि त्या भरून काढण्याला आमच्या मतीनें तरी काडीइतका मार्ग दिसत नाहीं. त्यांच्या पश्चात् असें ह्मणण्याला आह्मांलाही खरोखर फार वाईट वाटतें. इतक्या उप्पर श्रीमंतांच्या ह्मणण्यांत व आमच्या समजांत जर कांहीं गैरवांका असेल तर तो आमच्या पदरांत घालण्याला कोणी पुढें सरसावेल, व आपलें बोलणें सिद्ध करून देईल तर आह्मांस अत्यंत संतोष होईल. येथपर्यंत एक गोष्टीचा निकाल लागला. परंतु दुसऱ्या एका महत्वाच्या गोष्टीचा विचार करणें राहिला आहे. विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे कागद तपासून उरकले, विषयाच्या संबंधानें त्यास 'मार्क' वगैरे देऊन झालें, तरी दुसरी एक योग्यता मनांत आणून त्याची योग्यता ठरवावी लागते. ती योग्यता ह्मणजे त्याचें अक्षर कसें आहे? शुद्धलेखनपद्धति कशी आहे? त्याचे स्वतःचे विचार कसे आहेत? इत्यादि गोष्टी मनांत घेऊन त्यास आणखी अधिक 'मार्क' द्यावे लागतात. व त्यांतच वरिष्ठ प्रत, सुवर्णपदकें वगैरे मिळतात. न्यायकोर्टांतही अशीच चाल आहे कीं, खटल्याचें स्वरूप व्यक्त झाल्यानंतर वादीप्रतिवाद्यांच्या चाली रीती, वर्तन, देश, काल इत्यादिकांचा विचार करून निकाल करावा लागतो.

(पुढें चालू.)

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar at JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

# केरळकोकिळ.

पु० १२ ] [अं० १

## आनंदाची पर्वणी.

### नामदार टिळक ह्यांची मुक्तता.





आमचे कट्टे स्वदेशाभिमानी, निस्सीम लोकसेवक, अस्सल लेखन-पटु, पुरे विद्याविशारद, भले सत्यशोधक, अप्रतिम लोकप्रिय, प्रसिद्ध

'केसरी' व 'मराठा' पत्रांचे कर्ते, नामदार **बाळ गंगाधर टिळक** ह्यांच्या कांहीं लेखांवरून सरकारास मोठा संशय उत्पन्न होऊन बऱ्याच कालपर्यंत त्यांस कारागृहवास भोगावा लागला. त्या वेळीं यच्चयावत् स्वदेशबांधवांसच नव्हे, तर वेदमूर्ति **मोक्षमूल्लर** भट्टांसारख्या परकीयांस सुद्धां परम दुःख झालें. सारा महाराष्ट्रदेश हळहळला. परंतु सुदैवानें अनेक कारणें घडत घडत अखेर सरकारच्या मनांतील संशय दूर होत होत, त्यानें सदय अंतःकरणानें परवां नुकतीच त्यांची मुक्तता केली. तेव्हां सर्व महाराष्ट्र देशांतच नव्हे—तर आसेतुहिमाचल—आनंदीआनंद झाला—किंवा नवाच दिपावलीचा सण झाला—अहेरांचे व देणग्याभेटींचे नामदारचरणीं ढीग पडले; शेंकडो रुपयांच्या तारा खेळल्या; हजारों लोक दर्शनास आले; कथा काय, कीर्तनें काय, सत्यनारायण काय, मेळे काय, भजनें काय, सारी गर्दीच गर्दी. फटाके, दीपोत्सव, पेढे, बर्फी ह्यांची तर मितीच नव्हती. गाडीवानांच्या गाड्या फुकट, दुकानदारांचे पेढे फुकट; फार तर काय, पण न्हाव्याची हजामत सुद्धां फुकट ह्मणून ऐकतों. हे सर्व प्रकार व सोहळे प्रत्यक्ष दर्शनानें व वर्तमानपत्रद्वारें सर्व विश्रुत झालेच आहेत. तथापि नामदारांच्या पुण्याईची सद्दी केप कन्याकुमारीपर्यंतही कशी जबरदस्त आहे, ह्याचा मासला कळावा ह्मणून आज आह्मी मलबारांतील—कोची येथील—लोकांनीं तो आनंदोत्सव कशा काय थाटानें केला हें आनंदानें आमच्या वाचकांस कळवीत आहों. आतां येवढें खरें कीं, महाराष्ट्रांतील उत्सवांपुढें ह्या उत्सवाची मोठी मातब्बरी आहे असें नाहीं. तथापि ही स्फूर्ति दूर अंतरावरच्या—सहाशें मैलांवरच्या—लोकांची आहे, हें ध्यानांत धरून विचार केला ह्मणजे हाही गौरव कमी योग्यतेचा आहे असें सहसा ह्मणवणार नाहीं. असो. कोचींतील उत्सव चार दिवस झाला. ह्यास्तव प्रत्येक दिवसाची हकीकत संक्षेपतः दिली असतां बरें पडेल.

नामदारांची सुटका विशेष ध्यानीं मनीं नसतां, मंगळवारीं[1] रात्रीं

---

1 ह्या मंगलाच्या योगाचा चमत्कार फार ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. केसरी पत्र प्रसिद्ध होतें मंगळवारीं; ऱ्यांड, आयर्स्टचे खून झाले मंगळवारीं; ना० टिळकांस धरलें मंगळवारीं; जामिनीवर सुटले मंगळवारीं; शिक्षा झाली मंगळवारीं; आणि अखेर मुक्तता झाली मंगळवारीं. तेव्हां ह्या मंगलास मंगल ह्मणावें कीं अमंगल ह्मणावें ! !

अकस्मात् झाली. तो सुगावा महाराष्ट्रमंडळास सुद्धां फारसा लागलेला नव्हता. तेव्हां तो मलबारस्थ लोकांस लौकर न लागणें हें साहजिकच आहे. पाण्यासारखा पैसा तारांसाठीं खर्चीं घालूनही पुण्यांतील बातमी मुंबईस जावयास पहांट झाली ! व ती अनेक तारा एकत्र होईपर्यंत तेथील लोकांनाही विश्वसनीय वाटली नाहीं. तसा प्रकार कोचीस होणें हेंही साहजिकच आहे. कोचीसही दुसऱ्या दिवशीं एक दोन तारा आल्या होत्या, परंतु त्या कितपत खऱ्या असाव्यात ह्याचा कोणासच उलगडा होईना. कारण, ह्याच्या पूर्वीं अनेक प्रसंगीं नामदार मुक्त होणार, झाले, अशा प्रकारच्या वदंता उठल्या होत्या, व त्यांत निराशेवांचून दुसरें कांहीं हातीं लागलें नव्हतें. ह्यामुळें ह्या समयींही कोणाचें मन उत्सव घेईना. एक दोन इंग्रजी पत्रांत ही बातमी प्रसिद्ध झालेली लोकांच्या कानांवर आली. तथापि साशंक वृत्तीची निवृत्ति होईना. अखेर जेव्हां शनिवारीं प्रत्यक्ष केसरीच येऊन धडकला, तेव्हां एकदम सर्व जनांचीं मुखकमलें विकसित झालीं, आणि आनंदमकरंदानें दाही दिशा भरून गेल्या. खरोखर ना० **टिळक** हे महाराष्ट्रीय आहेत, तेव्हां त्यांचें नांव महाराष्ट्रांत सर्वतोमुखीं असणें ह्यांत नवल नाहीं. परंतु मद्रास इलाख्यांत सुद्धां त्यांचें नांव आणि कीर्ति सर्वत्र प्रसिद्ध आहे. आतां इतकें मात्र खरें, कीं त्यांची इत्थंभूत माहिती असलेले लोक फारच थोडे असतील. तरी, त्यांची अर्धीमुर्धी कीर्ति, गुण, ऐकलेली मंडळी फार. आणि नांव माहिती असलेली मंडळी बहुतेक सारीच ह्मटलें तरी चालेल. ही सर्व कीर्ति त्यांस इंग्रजी लेखांवांचून दुसरीकडून मिळालेली नाहीं हें उघडच आहे. त्यामुळें आह्मांस विचारतांना त्यांची जी त्रेधा उडते, ती कांहीं विचारूं नये. मराठा प्रवाशी मद्रास इलाख्यांतील स्टेशनावर आला कीं पुरे. त्याच्या भोंवतीं स्टेशनमास्तर, वगैरे मद्रासी कामगारांची झुंडच्या झुंड जमते. आणि 'तुह्मी मराठे काय?' 'तुमचे टिळक हल्लीं कसे आहेत?' 'त्यांची सुटका होण्याची कांहीं आशा आहे काय?' 'वः ! खरोखर फार थोर !' 'केवढा बाणेदार, केवढा परोपकारी, आणि केवढा विद्वान्' इत्यादि टिळकांच्या कळकळीचे मद्रासी लोकांचे उद्गार ऐकून, महाराष्ट्रीय गृहस्थाविषयीं त्यांची येवढी पूज्यबुद्धि पाहून आपलें अंतःकरणही सद्गदित

झाल्यावांचून रहात नाहीं. धन्य तो महात्मा! कीं ज्याची मद्रास इलाख्यांत–परकीय भाषाभिज्ञांवर–सुद्धां येवढी छाप!

ह्यांच्या ह्या प्रश्नांत एक मात्र विशेष मौज असते. ती कोणती? तर 'टिळक' ह्या नामोच्चाराची[१]. कोणी मिस्तर '**टिल्याक**' ह्मणतो; कोणी '**टेल्याक**' ह्मणतो; कोणी '**टिलाका**' ह्मणतो; कोणी '**टेल्याग**' ह्मणतो; तर कोणी '**टालिक**' ह्मणतो. उच्चाराची गोष्ट कशीही असो. प्रत्येकाच्या मनांत त्यांचा जो अभिमान व पूज्यबुद्धि असते, ती अवर्णनीय असते, ह्यांत शंका नाहीं.

**कोचीं**मध्यें ना० टिळकांच्या मुक्ततेची बातमी ता० १७ सप्तंबर शनिवार रोजीं दुपारीं सर्वतोमुखीं पसरली. आणि तेथपासून लोक आनंदोत्सवाच्या तयारीस लागले. शनिवारीं दिवसा कोणासच कांहीं करण्यास वेळ झाला नाहीं. तरी त्या रात्रीपासून एक एक समारंभास सुरवात झाली.

## दिवस पहिला.

### शनिवार ता० १७ सप्तंबर.

रात्रौ परळ गांवांतील रा. रा. गोविंद पंडित ह्यांच्या श्रीगोपाळ-

---

१ मद्रास इलाख्यांतील लोक उच्चाराच्या बावतींत अगदींच पेबळट आहेत. ह्याची मौज पाहणें असेल तर एखाद्या हिकडच्या इंग्रजी शाळेंत जाऊन तेथील विद्यार्थ्यांशीं किंवा मास्तरांशीं हिस्टरीसंबंधानें प्रश्न काढावेत. ह्मणजे बाबरचे–बेबर–बाजिरावाचे–बेजिराव–डेहली ह्मणजे दिल्ली; एकबरा–ह्मणजे अकबर, पिशवा–ह्मणजे पेशवे इत्यादि अनेक चमत्कार दृष्टीस पडतात. इंग्रजी एस् अक्षराचा उच्चार ते भला लांब लचक 'स' करतात. त्यांत 'ज' चा संपर्क मिळावयाचा नाहीं. 'जेथें जातो तेथें हत्ती जातो; नाहीं तेथें मुंगी शिरकावयाची नाहीं' ही ह्मण इंग्रजींत 'Where goes goes elephant goes, where cant go ant cant go' अशी ह्मणावयाची तर तिचा उच्चार ते खालीं लिहिल्याप्रमाणें करतात:—

"वेर गोस गोस एलेफंट गोस; वेर क्यांट गो अँट क्यांट गो!"

ही तारांबळ केवळ इंग्रजी भाषेंतच आहे असें नाहीं. संस्कृत भाषेचा मासलाही असाच. नव्हे ह्याहून थोडीशी कडी वरच ह्मटलें तरी चालेल. वस्तुत: इंग्रजी व संस्कृत ह्या दोन्ही भाषा महाराष्ट्राहून मद्रास इलाख्यांत विशेष प्रचारांत असतां, अशी दशा कां असावी समजत नाहीं!

कृष्णाच्या देवालयांत उत्सवास प्रारंभ झाला. देवाची पालखी निघाली; दीपोत्सव, मंत्रपुष्प, आरती, धुपारती करण्यांत आली. नंतर केरळकोकिळांचे माजी म्यानेजर रा. रा. बाळकृष्ण अनंत शास्त्री गोरे ह्यांचें कीर्तन झालें. समारंभास महाराष्ट्र ब्राह्मणसमुदाय बराच जमला होता. परंतु बातमीचा प्रसार व्हावा तितका न झाल्यामुळें, व उत्सवसमारंभाचे नियमही, त्या दिवशीं न ठरले गेल्यामुळें अन्य गृहस्थांस येण्यास संधि मिळाली नाहीं. कीर्तनामध्यें कांहीं आर्या वगैरे तत्काळ वक्त्यांनींच तयार केलेलीं पद्यें ह्मणण्यांत आलीं; व पांडवांचा अज्ञातवास, व टिळकांस कारागृहवास ह्यांची तुलना हा विशेष प्रतिपादनाचा भाग होता. अखेर पांडवांच्या मुक्ततेपासून जसा जनांस आनंद झाला, तसाच टिळकांच्या मुक्ततेनें सर्वांस आनंद झाला आहे, इत्यादि विषयाचें निरूपण होऊन कीर्तन समाप्त झालें. नंतर पेढे, पानसुपारी, पुष्पें वगैरे वांटून दिवस साजरा करण्यांत आला.

## दुसरा दिवस, रविवार.

### जाहिरसभा.

रविवारीं प्रातःकाळीं तर अधिकच हालचाल दिसूं लागली. रस्तोरस्तीं व गल्लोगल्लीं 'टिळक' 'टिळक' ह्या नामोच्चाराचा ध्वनि ऐकूं येऊं लागला. मुलांची धांवाधांव; खटपट्यांच्या खेपा; अज्ञलोकांची विचारपूस करण्याची तारांबळ इत्यादि पाहून केवळ लगिनघाईच आहे असें वाटूं लागलें. कुशल कारागीर रा. गोपाळ हरी जोशी ह्यांनीं तयार केलेला एक भव्य बोर्ड समारंभानें बाहेर पडला. हा बोर्ड अतिशय शोभिवंत होता. मध्यभागीं नामदार टिळकांची तसबीर असून दोन गोजिरवाणीं मुलें त्यांच्या गळयांत पुष्पांचे हार घालित आहेत असें दाखविलें होतें. सभोंवार सुंदर अशा फलपुष्पयुक्त लता काढलेल्या होत्या, व मध्यभागीं 'आनंदाची पर्वणी! ना० टिळकांची मुक्तता!!" "Joy! unbounded joy! Release of Mr. Tilak" अशीं इंग्रजी, मराठी व मलबारी ठळक अक्षरांनीं दाखविलेलीं वाक्यें तर सर्वांच्या चित्तवृत्ति जणों काय जागृतच करित आहेत असें वाटे. बोर्डाच्या सभोंवार रंगीबेरंगी तापत्यांचीं निशाणें फडकत होतीं. हा बोर्ड अबदागिरीप्रमाणें उंच स्थाना-

वर धरलेला असून त्याच्या पुढें अनेक मंगलवाद्यांचा गजर चालू होता. त्याच्या बरोबरच इंग्रजी, मराठी, मलबारी जाहिरातींचीं पुडकीं घेतलेलीं मुलें, रंगीबेरंगी छापील जाहिराती वांटीत चाललीं होतीं. ही मिरवणूक तमाम रस्त्यांनीं गेली.

जाहिरातींमध्यें ना० टिळकांच्या गुणांचें, लोकसेवेचें, धैर्याचें व दुर्धर प्रसंगाचें थोडेंसें दिग्दर्शन असून त्यांची मुक्तता झाल्याबद्दल सर्वत्र आनंदोत्सव कसा झाला तेंही थोडक्यांत सांगितलें होतें, व आह्मी त्यांचे थोडेसे देशबंधु दक्षिणेच्या एका टोंकास आहों तरी, त्यांचा आनंदोत्सव व अभिनंदन करणें आमचें कर्तव्य आहे. करितां आज सायंकाळीं चार वाजतां श्रीबालाजीच्या हायस्कुलांत जाहिरसभा भरणार आहे. तेथें सर्वांनीं आपआपल्या मित्रमंडळीसह अगत्य अगत्य येण्याची कृपा करावी. अशी विनंती होती. ह्या हस्तपत्रकावर श्री. रा. रा. हरी शणै; रा. रा. धारशीशेट; रा. रा. रामचंद्र महादेव गांवसकर; रा. रा. विष्णु केशवशेट सांपळे; रा. रा. जनार्दन गोविंद गोखले; रा. रा. विनायक अनंत गोरे; रा. रा. दामजी उरवा, इत्यादि दहा बारा थोरथोर व प्रमुख गृहस्थांच्या सह्या होत्या; व त्यांत सभेमध्यें काय काय होणार. भाषणें, कविता वगैरे कोणकोणाच्या ह्याच्या कार्यक्रमाचाही उल्लेख होता. एका दिवसांत सर्वांनीं एक होऊन येवढी तयारी केली, व सर्व जातींनीं एकदिलानें अभिनंदन करण्याचें मनावर घेतलें, ही गोष्ट खरोखरच फार भूषणावह आहे ह्यांत शंका नाहीं.

दोन प्रहरीं श्रीबालाजीहायस्कुलांत जारीनें तयारी सुरू झाली. महाद्वारामध्यें पुष्पफलयुक्त कर्दळी उभ्या करण्यांत आल्या; आम्रपल्लव, नारिकेलपल्लव इत्यादि मंगलतोरणें बांधण्यांत आलीं. मोगरा, सोनचांफा इत्यादि पुष्पांच्या दुरड्यांच्या दुरड्या भरभरून येऊं लागल्या. हारांचे ढिगांचे ढीग लागले. पेढ्यांचीं तबकें भरभरून येऊं लागलीं. गालिचे, संतरजा येऊन पडल्या. मधील दिवाणखान्यांत खुर्च्या, बाकें वगैरे बैठकी शिस्तीनें लावल्या. अध्यक्षांसाठीं मध्यावर एक उच्च जागा तयार करून त्यापुढें टेबल ठेवलें. त्यावर उत्कृष्ट चादर, पुष्पपात्रें वगैरे सामान व्यवस्थित रीतीनें मांडलें. समोरच्या भिंतीवर एक मोठें भव्य व सुंदर हत्तीचें चित्र लावून त्याच्या पाठीवर ना० टिळकांची आरशांत बसविलेली

तसबीर टांगली, व तिच्या गळयांत मोगऱ्याचे हार घातले. सभोंवार सोनचांफ्याचीं फुलें बसविलीं होतीं. जाहिरातीचा बोर्ड ग्रामप्रदक्षिणा करून महाद्वारापाशीं येऊन उभा राहिला. चौघडे वगैरे वाद्यें झडतच होतीं. तीन वाजतांना हळू हळू मंडळी येण्यास सुरवात झाली. साडे-चार वाजण्याच्या सुमारास धारशीशेट, गांवसकर, सांपळे वगैरे मोठ-मोठ्या मंडळीच्या गाड्या येऊन थडकल्या; आणि उत्तरोत्तर लोकसमुदाय वाढत चालला. एकंदर सुमारें तीनशें लोक असावेत असा अदमास आहे.

मंडळी जमल्यानंतर रा. रा. बाळकृष्ण अनंत गोरे, ह्यांनीं 'बहुतेक मंडळी आली. ह्यासाठीं आतां सभेच्या कामास सुरवात व्हावी' ह्मणून सभेस विनंती केली. तेव्हां 'आजच्या सभेचें अध्यक्षस्थान भाऊसाहेब गांवसकर ह्यांनीं सुशोभित करावें,' अशी 'कोकिळा' कडून सूचना पुढें आली. तीस रा. रा. विनायक शास्त्री गोरे, रा. रा. विष्णुशेट सांपळे इत्यादि सद्गृहस्थांनीं अनुमोदन दिल्यानंतर रा. रा. रामचंद्र महादेव गांवसकर हे अध्यक्षांच्या स्थानावर जाऊन विराजमान झाले. इतक्यांत बाहेर दहा खोदन्यांची सरबत्ती झाली, व सर्व लोकांनीं आनंदप्रदर्शक टाळ्यांचा गजर केला. अध्यक्षसाहेबांनीं सभा भरण्याचा उद्देश कळवून हस्तपत्रकांतील सारांश सांगितला; व आतां ठरल्याप्रमाणें आपणांस नामदार टिळकांची माहिती वक्त्यांकडून मिळेल, ती श्रवण करण्याविषयीं सर्वांस विनंती केली. नंतर '**केरळकोकिळ**[1]'च्या भाषणास सुरवात झाली.

'कालचक्र हें एक रहाटगाडगें आहे. दिवसामागून रात्र, आणि रात्रीमागून दिवस; सुखामागून दुःख, दुःखामागून सुख; अशींच हीं सारीं द्वंद्वें फिरत रहावयाचीं. त्यांस कधीं खळ ह्मणून नाहीं. चढणें आणि पडणें हें जसें रहाटगाडग्याच्या मागें लागलेलें आहे, तसें तें जगाच्या आणि मनुष्याच्या मागें लागलेलें आहे. तें कधीं टळावयाचें नाहीं. आजचा हा समारंभ आनंददायक आहे खरा, तरी त्याच्या मागें दुःख होतें

---

१ ही हकीकत लिहितांना 'कोकिळा'कडे कोणी आत्मस्तुतीचा दोष लावतील. पण त्यांस निरुपाय आहे. ही गोष्ट मनीं आणून तशी कल्पना करणारे वाचक त्यास क्षमा करतील अशी आशा आहे.

तें विसरतां कामा नये. तथापि तेवढ्यावरून ह्याची किंमत कमी तर नाहींच, पण उलटी अधिक मात्र आहे. कारण, उन्हांत तापलें ह्मणजे छाया अधिक शीतल वाटते; क्षुधेनें व्याकुळ झालें ह्मणजे कोंड्याचें अन्न मांड्याप्रमाणें लागतें; तान्हेनें जीव सुकला ह्मणजे उदकही अमृताप्रमाणें लागतें. ह्या गोष्टी अनुभवसिद्ध असल्यामुळें, आजच्या आनंदाचें माहात्म्य विशेष आहे हें उघडच होतें.' इत्यादि प्रस्ताव करून नंतर टिळकांच्या चरित्रास सुरवात झाली.

बालपण व विद्या; एल्. एल्. बी ची परीक्षा व नामदारपदाची प्राप्ती; त्यांची लेखनशैली व ओरियान्; पुण्यांतील विद्वन्मंडल व त्यांची निस्पृहता; न्यू इंग्लिशस्कुलचा जन्म व शिक्षणपद्धति; केसरीमराठ्यांचे जन्म व बाणेदारपणा; त्यांजवर आलेलीं संकटें व निराकरण; कन्सेंटबिल् व त्यांत टिळकांनीं केलेले परिश्रम; प्लेगचें भयंकर स्वरूप व त्यांत टिळकांनीं सोसलेले कष्ट, व केलेले परोपकार; ज्युबिलीचा महोत्सव व त्याच रात्रीं झालेलें अघोर कृत्य; टाइम्स ऑफ् इंडियाचें विधान, व जस्टिसचें अनुमोदन; सरकारची खप्पा मर्जी व संशय.

मन संशयग्रस्त झालें ह्मणजे अंतःकरणाची स्थिति कशी होते, ह्यावर ज्ञानेश्वरीचे दृष्टांत; नामदारांचा प्रतिबंध, व मित्रांचे प्रयत्न; टिळकांची चौकशी व धैर्य; त्यांची शिक्षा व जनांचें दुःख; कारागृहांतील उद्योग व वेदाध्ययन; तुरुंगाचें भाग्य व फायदे; सर्व यत्नांची निराशा व मोक्षमुल्लरांसारख्यांची कळकळ; खुनी मनुष्याचा शोध व सरकारची संशयनिवृत्ति; टिळकांची आकस्मिक सुटका व सर्वत्र झालेला आनंदोत्सव.

इत्यादि विषयांचें सुमारें अडीच तास भाषण झालें. सर्व लोक एकाग्रचित्तानें ऐकत होते, व प्रेमभरानें डुलत होते. सरतेशेवटीं दयाळु चक्रवर्तिनी महाराणीसाहेबांच्या नांवानें व नामदार टिळकांच्या नांवानें जयघोष करीत, टाळ्यांच्या गजरांत भाषणाची समाप्ति झाली. नंतर रा. विष्णु कृष्ण आठल्ये, ह्यांनीं विषयास अनुसरून थोडेंसें भाषण केलें व, स्वतः रचलेल्या कविता ह्मटल्या. त्याही टाळ्यांच्या गजरानें मानवल्याचें सर्वांनीं प्रदर्शित केलें. ह्या कवितांस दुसरीकडे स्थळ दिलें आहे. त्यावरून त्यांची रचना वाचकांस कळून येईल.

नंतर रा. रा. एस्. के. आठल्ये, फर्स्ट असि० श्री बाळाजी हाय-

स्कूल, ह्यांनीं लिहून आणलेल्या इंग्रजी निबंधाचें वाचन व्हावयाचें होतें. परंतु तो निबंध बराच विस्तृत असल्यानें, व सभेमध्यें इंग्रजी भाषाभिज्ञ मंडळी फारच थोडी असल्यानें अध्यक्षांनीं तो बेत पुढें केव्हां तरी करावा हें बरें असें सांगितलें. व त्यास सर्व सभासदांनीं अनुमति दिली.

नंतर संस्कृत, गुजराथी, हिंदुस्थानी, मराठी भाषावेत्ते दामोदरशास्त्री या नांवाचे गुर्जर गृहस्थ उठले, व त्यांनीं हिंदुस्थानी भाषेंत टिळकांचें चरित्र, गुण व दुर्धर प्रसंग यांचें वर्णन केलें. श्रीबालाजीचे कारभारी नरशिंगप्रभु ह्यांनीं मलबारी भाषेमध्यें थोडक्यांत टिळकांची मलबारी बंधूंस ओळख करून दिली. बाळकृष्णशास्त्री गोरे, विनायकशास्त्री गोरे, शिवराम कृष्ण थत्ते, वगैरे मंडळींनींही समयास उत्तेजनपर अशीं मराठीमध्यें भाषणें केलीं. डाक्टर अप्पाराव श्रीबालाजीच्या हायस्कुलाचे म्यानेजर ह्यांनीं टिळकांच्या चरित्रापासून कोणतें शिक्षण घेण्यासारखें आहे, तें इंग्रजींत अतिशय गंभीर व अस्खलित भाषेनें सांगितलें. नंतर पुन्हा कोकिळानें रचलेला पोवाडा व कांहीं कविता ह्मणण्यांत आल्या.

अशा प्रकारें सर्व भाषणें संपल्यानंतर अध्यक्षसाहेब बोलावयास उठले. तेव्हां मोठ्या उल्हासानें टाळयांचा गजर झाला. थोडक्यांत पण समयास शोभेल असें चटकदार अध्यक्ष ह्यांचें भाषण झालें. त्यांत टिळकांनीं केलेली लोकसेवा, व तिच्याबद्दल बहुत सांगून 'टाइम्स'च्या स्वभावाचें वर्णन मोठ्या मजेनें केलें होतें. तेव्हां पुन्हां टाळयांचा गजर झाला. नंतर सभेची हकीकत पुणें व मुंबईच्या दहा बारा वर्तमानकर्त्यांस कळविण्यासाठीं तारेचा मसुदा तयार केला होता तो सर्वांस वाचून दाखवून सर्वांच्या पसंतीनें तें काम सेक्रेटरींकडे सोंपविण्यांत आलें; व नामदारच्या मूर्तीपुढें ठेवलेल्या तबकांत ठेवलेले पेढे, पोष्टांतून त्यांस अर्पण करण्याचा, व एक अभिनंदनपर पत्र पाठविण्याचा ठराव केला. तसेंच उद्यीक सायंकाळीं चार वाजतां घैलाशेटींच्या बंगल्यांत 'केरळकोकिळ'चें कीर्तन होईल, त्यास सर्वत्रांनीं आप्तइष्टांसह येण्याची कृपा करावी अशी विनंती करून चक्रवर्तिनी महाराणीसाहे-

---

१ हा निबंध फार वाचनीय आहे. त्यांत नामदार टिळकांच्या मतांचें विवेचन फारच मार्मिकतेनें केलें आहे. हा निबंध 'मराठ्या'सारख्या पत्रांत छापून प्रसिद्ध होईल तर पुष्कळ उपयोग होण्यासारखा आहे.

बांच्या व नामदार टिळकांच्या जयघोषांत सभा विसर्जन केली. त्या वेळीं पुन्हां खोदन्यांची सरबत्ति, वाद्यें, व टाळया ह्यांचा एकच गजर उडाला.

नंतर, पेढे, पुष्पें, पुष्पगुच्छ, हार, तुरे, अत्तरगुलाब, पानसुपारी यच्चयावत् सर्वांस वांटून आनंदाच्या भरांत सर्व लोक आपआपल्या घरीं गेले. पेढे हा पदार्थ मलबारामध्यें आजपर्यंत ठाऊकच नव्हता ह्मटलें तरी चालेल. त्याची ही कोचींत नवीच टूम !

ह्याच दिवशीं रात्रीं अमरावतींत श्रीहनुमंताच्या देवालयांत रुद्राभिषेक, दीपोत्सव, आरती धुपारती, व नृत्यगायन होऊन आनंदीआनंद करण्यांत आला.

## तिसरा दिवस–सोमवार.

सायंकाळीं चार वाजतां घेलाशेटींच्या बंगल्यांत कीर्तनाची तयारी झाली. चटया, सतरंजा, गालिचे, तक्ये, लोडें वगैरे बिछायती घालून कीर्तनास योग्य अशी बैठक घातली होती. मोठमोठ्या समया लावून रोषनाई करण्यांत आली होती. मध्यभागीं नामदारांची तसबीर ठेवून तीस हार, तुरे, पुष्पें वाहिली होतीं. उदबत्त्या, चंदन वगैरे साहित्यही जवळ होतें. कीर्तनाच्या पाठीमागें साथ करण्यास सूत्रधारबुवा,–सीताराम रत्नाकर जोशी, सखाराम विष्णु फाटक, गोपाळराव जोशी, व गोविंदा सारंगीवाला हे आपआपलीं आयुधें घेऊन तयार होते. नाहींतर कोकिळ हा नांवचाच. त्याची गायनकलेंत प्रवीणता ह्मणजे बहुतेक वडिल घराण्याइतकीच ! पण अशा प्रसंगीं वरच्या सारखी गुणी मंडळी मनोभावें साह्य करतात–सांभाळून घेतात–ह्याबद्दल कोकिळ त्यांचा खरोखरच फार उपकारी आहे. असो.

कोचीचे तहशीलदार व त्यांचे वडील; भाऊसाहेब गांवसकर, सखाराम बापू गांवसकर, धारशीशेट, विष्णुशेट सांपळे, पंडित व त्यांचें मंडळ, विनायकशास्त्री, व शेवडे मंडळी, देवजी भीमजींचे म्यानेजर गणपतसिंग, दामोदर शास्त्री, व आणखीही कितीएक शेट सावकार इत्यादि लोक मोठ्या उत्सुकतेनें कीर्तनश्रवणास आले होते. मंडळी जमल्यानंतर कीर्तनास सुरवात झाली.

**'हिरा ठेवितां ऐरणीं वांचे मारितां जो घणीं'** हा मूळ अभंग

होता. ह्यावर साधूचीं लक्षणें कोणतीं? मंबाजीबुवानें तुकारामाचा छळ केला; ब्राह्मणांनीं ज्ञानेश्वराचा छळ केला; त्यांतून ते कसे पार पडले. साक्रेटिसाची मनोरम कथा, अनुपम शांति व धैर्य; लेडी जेन ग्रेची हृदयद्रावक गोष्ट, स्वधर्माभिमान व दृढतर निश्चय इत्यादि पूर्वरंग झाल्यानंतर टिळकांच्या चरित्रास सुरवात झाली.

आरंभ साकी वृत्त; बाल्यदशा व विद्यार्जन, आर्याछंद; पुण्यांतील प्लेगचा गहजब, सर्चपार्टी, टिळकांचा परोपकारीपणा, दिंड्या; टिळकांस पकडणें, कारागृहांत नेणें, पोषाख बदलणें, कामदावृत्त; इत्यादि निरनिराळ्या रसांस निरनिराळीं अनुकूल अशीं पद्यें योजलेलीं होतीं. तीं सर्व देण्यास येथें सवड नाहीं. तथापि ज्यानें श्रोत्यांचा प्रेमसागर उचंबळलेला दिसला, तेवढें पद येथें आमच्या वाचकांस सादर केल्यावांचून आमच्यानें पुढें जाववत नाहीं. तें पद हें:—

**टिळकदर्शनासि चला, लाभ हा भला ।**
**उक्त राजभक्त ह्मणुनि मुक्त जाहला ॥ ध्रु० ॥**
**कीर्ति जशी रम्य तशी मूर्ति गोजिरी ।**
**सद्गुणमणिहार फार शोभला ॥ १ ॥ टिळकदर्श०**
**सुमनयुक्त सुमनतुल्य, मृदुलभाषणीं ।**
**पहावया महानुभावजीव लोभला ॥ २ ॥ टिळक०**
**खष्ट नष्ट परम दुष्ट तुष्टती जया ।**
**गोड असा कष्ट करुनि रोड जाहला ॥ ३ ॥ टिळक०**
**सक्तमजुरि करुनि रक्त आटवी किती ।**
**ठरुनि राजभक्त परी मुक्त जाहला ॥ ५ ॥ टिळक०**
**स्तवन कवन सुखद भवन, पठण करित दुरितशमन ।**
**स्मरुनि टिळक करुनि नमन, कृष्ण राहिला ॥५॥ टिळक०**

अशा प्रकारें आनंदाच्या भरांत महाराणीसाहेबांच्या व टिळकांच्या नामोच्चारगजरांत आरती वगैरे होऊन कीर्तन आटोपलें.

नंतर दामोदरशास्त्री यांनीं गुजराथी भाषेंत टिळकांचें चरित्र समजून दिलें, त्यांचे गुण आंगीं आणण्याविषयीं सर्वांस उपदेश केला, व कीर्तनांतील पद्यांची त्यांनीं फारच प्रशंसा केली. त्यांची जडणी, अनुप्रास

व अर्थलाघव हीं अतिशयच उत्कृष्ट साधलीं आहेत असें ते ह्मणाले; व त्याचें गुजराथी भाषांतर करून प्रसिद्ध करण्यासाठीं त्यांनीं तीं मागून घेतलीं. नंतर विनायकशास्त्री गोरे ह्यांनीं शुद्ध, अस्खलित असें गुजराथी भाषण करून टिळकांची ओळख करून दिली, व गुजराथी लोकांनीं व महाराष्ट्रीयांनीं असेंच एकदिलानें नेहमीं जमावें ह्मणजे अनेक फायदे होतील असें सांगितलें. नंतर दुसरे दिवशीं आपआपले घरीं शक्त्यनुसार दीपोत्सव करण्याचा ठराव करून तो समारंभ समाप्त झाला.

ह्याच रात्रीं कोचीच्या उत्तरेस वायपी नांवाचें बेट आहे. तेथील श्रीमल्लिकार्जुनाच्या देवालयांत दीपोत्सव, खिरापत वगैरे समारंभ कुणबी लोकांनीं केला! आणि हे कुणबी ह्मणजे मलबारांतील होत, ही गोष्ट विसरतां कामा नये!

## चवथा दिवस–मंगळवार.

ह्या रात्रीं कोचीच्या मंटचेरी नांवाच्या बाजारांत फारच प्रेक्षणीय थाट झाला. केवळ प्रतिदिवाळी दिसत होती. बहुतेक दुकानांपुढें केळी उभ्या केल्या होत्या, व तोरणें बांधलीं होतीं. ठिकठिकाणीं हंड्या, झुंबरें, दिवे वगैरे लावून चकचकाट केलेला दिसत होता. सांपळयांच्या वखारींत पणत्यांच्या रांगाच्या रांगा लागल्या होत्या. शेवड्यांच्या वखारींतही तसाच थाट होता. धारशी शेटींच्या वखारींत झुंबर व ग्लास; गांवसकरांच्या वखारींत हंड्या; ह्याचप्रमाणें मूळजी जेठा, रायशीशेट, दामजी उखा, घेला नेनशी, माकाशेट, हरजीवन पाच्छा, धनजीशेट, हंसराज, देव्हरचंद, दादाशेट आरवारी, वगैरे तमाम लोकांनीं रोषनाई केली होती. इतर छोट्या दुकानदारांनींही शक्त्यनुसार कांहींना कांहीं केलें होतेंच. दिपवाळींतील लक्ष्मीपूजनाप्रमाणें मोठमोठाले सभ्यगृहस्थ सात वाजल्यावासून प्रत्येक पेढीवर पानसुपारी घेत फिरत होते. प्रत्येक पेढीवर टिळकांची तसबीर, तिची पूजा, व त्यांचे गुणानुवाद हे असावयाचेच. ह्याशिवाय कोणी केळीं, कोणी खडीसाखर, कोणी द्राक्षें, कोणी चहा, कोणी काफी, कोणी फुलें, कोणी हार हे वांटीतच होते. ह्याप्रमाणें ठिकठिकाणची पानसुपारी, अत्तरगुलाब, हारतुरे घेत घेत व आरास पहात पहात मंडळीला घरीं यावयास ते दिवशीं बारा वाजले!

ह्याप्रमाणें कोचींतील मंडळींनीं एकदिलानें व हौसेनें हा आनंदोत्सव साजरा केला, ह्याबद्दल सर्वांचे आभार मानणें अवश्य आहे. त्यांतूनही विशेषतः रा. रा. बाळकृष्ण अनंत गोरे ह्यांचे विशेष आभार मानले पाहिजेत. कारण, अथपासून तों इतिपर्यंत त्यांचे श्रम अगदीं अश्रांत होते. आणि त्याचेंच हें सर्व फळ होय. असो.

नामदार टिळक ह्यांच्या अति दूरस्थ थोड्याशा देशबंधूंनीं यथाशक्त्या यथामत्या हा आनंदोत्सव सादर केला आहे. त्यानें नामदारांच्या दुःखाच्या विस्मृतींत किंचिन्मात्र तरी भर पडो येवढीच इच्छा आहे. आतां सरतेशेवटीं ह्या आनंदोत्सवाचा ज्या दयावंत सरकारच्या कृपेनें योग घडून आला, त्या सरकारचें राज्य आह्मांवर चिरस्थायी होऊन त्याची बोलबलाय व्हावी, व नामदार टिळकांस लोकसेवा करण्यास उत्तरोत्तर अधिक सामर्थ्य यावें, येवढें जगदीशापाशीं मागणें मागून, कीर्तनांतीलच शेवटच्या आर्येनें हा लेख आमचे अप्रतिम लोकप्रिय **मित्र नामदार बाळ गंगाधर टिळक** ह्यांस समर्पण करतों.

**आर्या.**

**सद्गुरु आपण अमुचे शिष्यत्वाचेंचि सर्वदां नातें ।**
**ध्यावी स्वभक्तसेवा सेवी रवि जेंवि अर्घ्यदानातें ॥ १ ॥**

---

# आनंदोत्सव

## अथवा

# आमचे कट्टे स्वदेशाभिमानी व परम देशहितैषी नामदार टिळक ह्यांची कारागृहवासांतून सुटका.

**श्लोक.**

बांधी सुंदर धैर्यकंकण करीं, लोकांस दावी धडा
सत्याचा दृढनिश्चयें उचलिला, ज्यानें सुखानें विडा ।

---

१ ही उपमा दूरत्वसंशयनिरसनार्थ आहे. हिच्यावर कीर्तनांत बरीच मौज केलेली होती.

प्रेमें देशहितार्थ देह झिजवी, जो चंदनाचे परी
आनंदें मज वाटतें सहज तो, गावा महात्मा तरी ॥ १ ॥
हा सत्यास्तव देह सिद्ध करि जो, काळास दे आहुती
सत्याचा वध होउं दे न परि या, देहार्थ जो सन्मती।
साधूसंतमहंतमंडळपदीं, [1]जो जाउनी बैसतो
तत्सत्कीर्तिपटांत नांव चिर जो, नोंदावया पाहतो ॥ २ ॥
मारी राज्यसुखास लाथ अवघ्या, आलें जरी चालुनी
इच्छी केवळ जो निरंतर सुधी, सेवा जनांची मनीं।
'राष्ट्रांचा[2] जनिता' जनाकडूनि हें, जो नाम संपादितो
तत्सत्कीर्तिपटांत नांव चिर जो, नोंदावया पाहतो ॥ ३ ॥
तों सत्यव्रत धर्मराज ढळला, ज्याला रणीं एकदां
झालें कीं वश राजबाळ[3] वधितां, जें न्यायमंत्रीपदां[4]।
तें, जें सत्य अखंड निर्मल असें, तें नीतिधैर्य स्वयें
नेमें साध्य करोनि कीर्तिसदनीं, जो राहिला निश्चयें ॥ ४ ॥
ऐसा थोर गुणें अमूल्य पुतळा, जो मान्य सर्वांसही
दुर्दैवें पडला अचानक कसा, जावोनि कारागृहीं।
एकाकी, सुटला परंतु, अमुच्या पूर्वैकभाग्योदयें
साधें वर्तन तें प्रभूंस रुचलें, आली दया निश्चयें ॥ ५ ॥
जरठ भरतभू जी, **बाळ** जो थोरतीतें
तिलक खुलत भाळीं, भव्य जो भार तीतें।
सुरभवनिं दया ये कां न **गंगाधरा**ला
**टिळक** झळकती हे आज येतां घराला ॥ ६ ॥

१ सत्यासाठीं स्वतःचा देह खर्चीं घालणारा साक्रेटिस महासाधु.

२ अमेरिकेस स्वातंत्र्य देणारा जार्ज वाशिंग्टन महात्मा, Father of the Nation.

३ नारायणराव पेशवा मारला गेल्यानंतर.

४ न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे ह्यांनीं राघोबादादास देहांत प्रायश्चित्त पाहिजे असें सांगितलें. अशा शब्दांनीं जे न्यायाधीश पदाला वश झालेले.

सोन्याचा दिन आज हा, उगवला दाही दिशा फांकल्या
झाल्या ज्या लपल्या तमांत घन त्या, आनंदराशी खुल्या ।
प्रेमोद्गारजलें, तुडुंब भरलें, जें हृत्स्वरूपी सर
वाहे फोडुनि पाट तें खळखळां, काढोनि मंजुस्वर ॥ ७ ॥
लोकांचा जयघोष सर्व घुमला, ह्या आर्यभूमीवरी
वांटी साखर कोण हारगजरे, कोणी मिठाई बरी ।
दीपोत्साह, अरास, मंगल उभें केलें गुढ्या तोरण
आनंदोत्सव गाजला प्रति दुजा, दीपावळीचा सण ॥ ८ ॥
त्या मानास भला खरोखर दिसे, हा पात्र आहे बरें
कांहीं वर्तन साधुतुल्य जगतीं, केलें खरें हो खरें ।
आह्मी सर्वहि 'धन्य धन्य' ह्मणुनी, त्याचा करूं गौरव
आनंदें जयघोषसूचक सदा, काढूं मुखानें रव ॥ ९ ॥
जो कां शुद्ध सुरेख लेखनपटू, जो दिव्य विद्वन्मणी
यद्वाणी रमणीय होय सकलां, वाग्देवतेची खनी ।
लोकांचें, अपुल्या निरंतर मनीं, कल्याण जो इच्छितो
अश्रांत श्रम घेइ लोकविषमीं, साधू महा धन्य तो ॥ १० ॥
येतां दुर्धर संकटें तनुवरी, सोशी स्वदेशास्तव
त्याचा गर्जुनियां त्रिवार न कसा, लोकांत व्हावा स्तव ।
होती थोर जगद्धितार्थ, जगतीं, साधू विभूती भल्या
कां हो धन्य ह्मणूं नये, मग तसा, हा मोहरा लाभल्या ॥ ११ ॥

असे थोर सिद्धांत हा माणसाला
महा संकटें लाविती कीं कशाला ।
हिरा कोणता, कोणती गारगोटी
कळे तैं विभूती खरी आणि खोटी ॥ १२ ॥

आरंभीं संकटाच्या, अति कठिण जया शेवटीं तोहि साच
आला कीं योग सारा, झरर जुळुनियां मंगलाचा तसाच ।

त्याला साधू ह्मणोनी, तरि सकल जनीं, कां न सांगा गणावें
आनंदोद्गारघोषें, गजर करुनियां, धन्य त्याला ह्मणावें ॥ १३ ॥
निजजनपदसेवा, आणखीही घडावी
सुयशशशिकलाही, तत्करानें चढावी ।
त्रिभुवनपति, देवो, त्यांस कार्यांत सिद्धी
सकलसुखसमृद्धी, आयुरारोग्यवृद्धी ॥ १४ ॥
उसळत लहरीनें थोर आनंदसिंधु
कवनकुसुमवृष्टी, त्यांत हा अल्पबिंदु ।
विबुधजन कृतीची, आवडी या करोत
सविनय विनती ही, बालकाची वरोत ॥ १५ ॥

कीर्तनाच्या शेवटीं जयजयकारास्तव केलेलें.

**पद.** ( 'माझा कृष्ण देखिला काय' ह्या चालीवर. )

आह्मी टिळक गाउं या आज । सारे प्रेमभरें ॥ ध्रु० ॥
मंगलमूर्ती मंगलधाम । त्रिभुवनिं गाजे ज्याचें नाम ।
निरंतर देशहिताचें काम । क्षण विश्राम ज्यास नसे ॥ आह्मी० ॥
केवल भारतिचा जो बाल । प्रेमल विघ्नहराचा लाल ।
त्याचा भाग्यशशीचा काल । तुह्मी सजवाल काय ह्मणूं ॥ आह्मी० ॥
हातीं घेउनि टाळ मृदंग । नाचूं रंगणिं होउनि दंग ।
प्रेमें तद्गुण गाउं अभंग । गुंगत भृंग यशकमलीं ॥ आह्मी० ॥
'टिळक' सुमंगल गांवोगांव । जयजय शब्दें गर्जूं नांव ।
देवो सिद्धि गजाननराव । निर्मळ भाव पाहोनी ॥ आह्मी० ॥
धनसंतति आयुर्दाय । वाढो क्षेमसुखाचा ठाय ।
त्याचा राहु निरोगी काय । करो गणराय मंगल कीं ॥ आह्मी० ॥
विनवी कृष्णतनय हा फार । ऐका सभ्य सभ्य सरदार ।
बोला 'टिळक टिळक' जयकार । गजर त्रिवार सर्व करा ॥
आह्मी टिळक गाउं या आज । सारे प्रेमभरें ॥ ध्रु० ॥

# पुस्तकपरीक्षा.

## पंचवटीस्थलनिर्णय.

मागील अंकावरून पुढें चालू.

युद्धांतील गोष्टही तशीच. जय किंवा विजय प्राप्त होणें, हें कांहीं अंशीं सेनेवर, कांहीं अंशीं धैर्यावर व कांहीं अंशीं प्रारब्धावर अवलंबून असतें. परंतु धर्मयुद्ध कोणीं केलें? ह्याकडे लोकांचें लक्ष फार वेधलेलें असतें. त्याचप्रमाणें वाग्युद्धांतही ह्या गोष्टीचा विचार करणें आवश्यक दिसतें. ह्मणून ह्या वादांतही अधिक सरलता, सत्य समजण्याचीच इच्छा कोणाची आहे? पक्षाभिमान कोणामध्यें अधिक दिसून येतो? आपली विद्वत्ता दाखविण्यांत व कोटिक्रम लढविण्यांतच कोणास भूषण वाटतें? ह्याचाच विचार करूं या.

कै० ओक हे जाडे विद्वान्; अचाट उद्योगी; अत्यंत विद्याव्यसनी; अप्रतिम रसिक; भले शोधक होते हें सर्वमान्यच आहे. परंतु त्यांच्या लेखांत—अर्थात-स्वभावांतही—दोन गोमी स्पष्ट दिसून येतात. पहिली ही कीं लार्ड बेकननें ह्मटल्याप्रमाणें 'कित्येकांस सत्य समजून घेण्यापेक्षां आपली विद्वत्ता दाखविण्यांत आणि कोटिक्रम लढविण्यांतच विशेष भूषण वाटतें.' तसाच प्रकार ओकांमध्यें बऱ्याच अंशानें दिसून येतो. आणि दुसरी अर्वाचीन शोधकांकडे दृढतर ओढा. हें आमचें विधान ऐकून कित्येक वाचक आह्मांवर रुष्ट होतील; कित्येकांस त्याचा अचंबा वाटेल; व किती एक साशंक मुद्रेनें पाहतील. पण ह्या गोष्टी सिद्ध करावयाला फारसे प्रयास नकोत. पहिलीला 'काव्यसंग्रह' मासिकपुस्तक हेंच उत्कृष्ट साक्ष आहे. त्याचें स्वरूप कसकसें बदलत गेलें ह्याकडे थोडीशी नजर फेंकली ह्मणजे हें कार्य सहज होईल.

महाराष्ट्र कवितांचें आद्य मासिकपुस्तक 'सर्वसंग्रह' हें होय. ह्यांतील कवितांवर प्रसिद्ध रसिकवर्य परशुरामपंत तात्या गोडबोले, हे टीपा देत असत. त्यांत कठीण शब्दांचे अर्थ, दूरान्वय वगैरे असल्यास तो, क्वचित्स्थळीं समजून सांगण्यासारखा अर्थ असेल तो, द्यावयाचा इतकाच त्यांचा परिपाठ होता. त्यानंतर प्रस्तुतचा 'काव्यसंग्रह' कै० जनार्दन बाळाजी मोडक ह्यांनीं सुरू केला. त्यांचेंही टीपा देण्याचें धोरण परशुरामपंत तात्यांसारखेंच, परंतु कांहीं अधिक होतें. हे फक्त शब्दाचे अर्थ, पाठभेद, विशिष्ट नामांची फोड, ह्याच्या पलीकडे अगदीं पाऊल ठेवीत

नसत. तरी, ह्याहून किंचित् अधिक माहिती असावी, असें सर्वांस वाटत असे. दुर्दैवानें थोडक्याच महिन्यांत मोडकांवर काळाची झडप पडली. तेव्हां आतां त्यांच्या तोडीचा गृहस्थ तेंच काम पुढें रेटण्यास कोण मिळतो, ह्याची पुष्कळांस जिज्ञासा उत्पन्न झाली. परंतु योग्य कामावर योग्य मनुष्याची निवड करणें, हेंच कायतें 'निर्णयसागर' चें प्रधान कौशल्य आहे. त्यानें हंसचंचुवत् अचानक त्या कामावर ओकांची योजना केली. ओक हे आधीं जात्याच हुशार; आणि त्यांत काव्यसंग्रहासारखें जोखमाचें काम त्यांच्या गळयांत पडलें. तेव्हां मोडकांच्या मृत्यूनें झालेली हानी, व पडलेली उणीव भरून काढली पाहिजे, येवढेंच नव्हे, तर त्यांच्या पश्चात् काव्यसंग्रहाचा लौकिक अधिक वाढविला पाहिजे, अशी ईर्ष्या त्यांच्या अंगीं उद्भवणें साहजिकच आहे; व त्याच उत्सुकतेनें त्यांनीं आपलें काम मोठ्या नेटानें व उत्साहानें चालविलें. त्यांच्या टीपांमध्यें शब्दाच्या टीपा विस्तृत असून कोठें रूपकें, कोठें श्लेषचमत्कार, अलंकार, इत्यादि येऊं लागले. ते सर्व लोकांस अतिशय पसंत पडले; व मोडकांच्या टीपांहूनही ओकांच्या टीपा फार आवडल्या. तेव्हां शेंकडों लोकांकडून त्यांस अभिनंदनपर व उत्तेजनपर पत्रें येऊं लागलीं. त्यांचा परिणाम खरोखर इष्ट व्हावा, परंतु तसें न होतां भलताच झाला. टीपा होतां होतील तितक्या विस्तृत देणें, दाखवितां येईल तितकी विद्वत्ता दाखविणें, घेववतील तितक्या ग्रंथांचे उतारे घेणें हेंच आपलें कर्तव्य असा ओकांच्या मनाचा ग्रह होत गेला. आणि त्या अनुरोधानें उगमाकडून मुखाकडे नदीचा प्रवाह वाढत वाढत शेवटीं समुद्रमय व्हावा, त्याप्रमाणें स्थिति झाली. प्रथम शब्दांचे अर्थ एक एक देण्याची चाल होती, ते दोन दोन झाले. मग एकच वाक्य उलटें सुलटें करून ओळी भरल्या. नंतर उपमा, उत्प्रेक्षांस सुरवात झाली. त्यापुढें अलंकार, ते एकाच तऱ्हेचे पुरेनात, तेव्हां इंग्रजी तऱ्हेचे आणण्यास सुरवात झाली. त्यापुढें भारत, भागवत, अग्निपुराण, पद्मपुराण, इतर कवि ह्यांचे उतारे; मग ही उपमा आहे; हा अलंकार आहे; असें होतां होतां अखेर 'लोकहितवादी' कृत इतिहासांतील पानेंच्या पानें खुशाल येऊन वामन मोरोपंतांच्या पंक्तीस बसूं लागलीं! 'वामन पंडितकृत कवितासंग्रह, भाग पहिला' हें बांधीव पुस्तक हातांत घ्यावें, आणि पानें परतावयास लागावें, म्हणजे ह्याची प्रचीती तत्काल येते. ह्या पुस्तकांत ९६ पृष्ठापर्यंत मोडकांच्या टीपा आहेत व पुढें ओकांच्या आहेत. मोडकांच्या टीपा १ ओळ, दोन ओळी, क्वचित् ठिकाणीं ४।५ ओळींपर्यंत गेल्या आहेत.

ओकांनीं उगमापाशीं मोडकांचाच क्रम धरलेला आहे. ९७ पानावरील टीप अवघी २ ओळीची आहे. परंतु तो प्रवाह वाढण्यास सुरवात झाली. १५७ पानांत १२ ओळी झाल्या; १८७ पान १३; १९१ पान २२; ४९७ पान २५, ह्याप्रमाणें हा प्रवाह उत्तरोत्तर दांडगा होत चालला. ज्या मोरोपंताच्या आर्या एका पेजांत निदान १२ तरी व्हावयाच्या त्या सरासरी १।२।३ फार ५ किंवा ६ झाल्यास पराकाष्ठा होऊं लागली. पण ह्यामुळें सहा वर्षांत भारत संपावयाचें त्याचीं वर्षें १२ झालीं, हें कांहीं ओकांच्या लक्षांत राहिलें नाहीं. कित्येकांनीं त्यांस अन्योक्तीनें सुचवून पाहिलें; कित्येकांनीं कुरकूर करून पाहिलें; व कित्येकांनीं तर 'हें तुमचें मारुतीचें शेंपूट आतां अंमळ आवरून घ्या' असें स्पष्टपणें ह्मणण्यासही कमी केलें नाहीं! पण ओकांनीं कोणासही मीठ घातलें नाहीं. 'आपल्या विरुद्धही पुष्कळ लोकांच्या तक्रारी आहेत' येवढी ह्याकी मात्र उडवून दिली. ही कुरकूर श्री० बापूसाहेबांच्या कानापर्यंतही गेली होती; व त्यावर श्रीमंतांनीं "बुभुक्षितः किं द्विकरेण भुंक्ते" हें समाधान सांगितलें आहे. परंतु बायजाबाईच्या समाराधनेप्रमाणें भुकेनें कळवळलेल्या ब्राह्मणांपुढें पानें मांडून गार पाणी, पाट, रांगोळ्या, पंखे, धूप, दीप, ह्याखालींच सायंकाळचे चार वाजवून मग मीठ यावयाला दोन घटका; मेतकूट यावयाला चार घटका असें होत होत, रात्रीचें दीपदर्शन झालें तरी भाताच्या मुदीला जर ठिकाण नाहीं तर, त्या जेवणारांनीं काय करावें? पोटाचें अगत्य असेल तर पान सोडून घरीं जावें, रुपया दक्षणेचें अगत्य असेल तर प्रारब्धावर हवाला ठेवून बसावें, दुसरा मार्ग नाहीं! असा हा टीपारूप ओकांचा प्रवाह ओढे, नाले जमा करीत करीत फोपावून अखेर भागीरथी जशी सुंदरीबनावर भडकून कोठें जावें व कोठें न जावें असें होऊन हजारों फांट्यांनीं समुद्रमय झाली, त्याप्रमाणें हाही प्रवाह एकदांचा 'केकावली' वर जाऊन आदळला, आणि त्या बिचारीला अगदीं पुरे पुरे करून सोडलें!

केकावली ही मयूरपंतांसारख्या कुलवंताची कन्या, तिचें रूप आणि गुण केवळ अप्रतिम, आणि अलंकारांचें सारें भांडार ओकांच्या हातांत, मग काय? साधारण श्रीमंतांच्या बायकांस सुद्धां दोन दोन जोड, तीन तीन जोड अलंकारांचे असतात. हिऱ्यांचे निराळे; मोत्यांचे निराळे; जडावाचे निराळे, त्याप्रमाणें हे आमचे ओक तरी कां कमी करतात? त्यांनींही तिच्या नाकाला, कानाला, हाताला, पायाला, गालाला, भोकें पाड पाडून मराठी पद्धतीचे अलंकार काय,

संस्कृत तऱ्हेचे अलंकार काय, इंग्रजी रीतीचे अलंकार काय, उपमा काय, दृष्टांत काय, उत्प्रेक्षा काय सारी गर्दीच गर्दी करून दिली ! तेव्हां अशा ह्या नववधूच्या दर्शनार्थ उत्सुक झालेल्या लोकांचा तोब्यावर तोबा उसळला. जवळ जाऊन पाहत तों काय ? सारा मराठमोळा ! टीपांचा भरजरी शालू असा कांहीं पायघोळ पसरलेला, कीं नख दृष्टीस पडण्याची मारामार, मग मुख पाहण्याइतकी पुण्याई कोणाची ? मग कोठें नख, कोठें एक चरण, कोठें दोन चरण ओझरते नजरेस पडावयाचे ! जणों काय हपशी देशांतून बुरखा पांघरूनच आली आहे ! 'केकावली' वर पहिली टीका ह्मणजे 'यशोदा पांडुरंगी' ती ह्याच वर्गांतल्या नमुन्याची, हरि ह्मणजे सिंह; हरि ह्मणजे घोडा; हरि ह्मणजे इंद्र; हरि ह्मणजे चोर; हरि ह्मणजे विष्णु; ही तिची धाटी. व हेंच नीट समजूत देण्यासाठीं 'केकादर्शानें' परशुराम तात्यांच्या पोटीं जन्म घेऊन 'पांडुरंगीचें' अस्तित्वच बहुत करून नाहींसें करून टाकलें, व तिचा अजागळपणा तिच्या पदरांत घातला ! ह्या सर्व गोष्टी ओकांसारख्या रसिकवर्यांस माहित असूनही, हा असा प्रकार झाला किती आश्चर्याची गोष्ट ! 'सोळा किंवा सतरा पानांत राहणाऱ्या केवळ १२१ श्लोकांनीं २३२ पानें व्यापिलीं' येवढी प्रौढीच जर जाहिरातीला पाहिजे होती, तर त्याला ओक व प्रो. परांजपे तरी कशाला पाहिजेत ? आमच्या सारख्या एखाद्या प्राकृत जनास सांगितलें तरी तो सुद्धां 'पृथ्वीवृत्ताचें लक्षण 'वृत्तरत्नाकरांत' असें आहे; 'सुवृत्ततिलकांत' असें आहे; 'पिंगलांत' असें आहे; 'वृत्तदर्पणांतही' असेंच आहे; अक्षरें १७; गण अमुक अमुक; ( टीपाकार जणों काय बाळयाला चवथी यत्ताच शिकवावयाला बसले आहेत ! ) ह्या काव्यांत 'प्रकट' शब्द ८ वेळां आला आहे; सदा शब्द ५३ वेळां आला आहे; मेघ शब्द ८७ वेळां आला आहे; ( केवढें अगाध ज्ञान, आणि किती अचाट शोधक बुद्धि ! ) माता, जननी, माय, आई; दयाळ, दयावंत पुरुष; अंतःकरणांत कळवळा उत्पन्न होणारा, करुणेनें ज्याच्या अंतःकरणास पाझर फुटतो असा मनुष्य—मानवी प्राणी ! अशा टीपांनीं दोनशें तर काय, पण दोन हजार बत्तीस पानें सुद्धां खुशाल भरून देईल !! अशा प्रकारें ह्या टीपांचें प्रस्थ दिवसानुदिवस माजत गेल्यामुळें काय परिणाम झाला पहा. मोरोपंतांचें रसाळ भारत ऐकण्याच्या इच्छेनें जे प्रथम वर्गणीदार झाले असतील, ते प्रथमच्या अदमासावरून पांच सहा वर्षांत तरी तें संपूर्ण हातीं येईल ह्या आशेवर चातकाप्रमाणें वाट पहात बसून अखेर ह्या सात आठ वर्षांत कोणी मृत्युमुखीं पडले असतील; कोणी

हांथरुणास खिळले असतील, व कोणी चाळशी येऊन वाचण्याच्या कामास निरुपयोगीही झाले असतील! आणि हाच क्रम पुढेंही चालू राहिला, तर पुढील सात आठ वर्षांतही हीच गत होऊन, तेवढ्यांत तरी दुर्योधन महाराजांचा कुलक्षय होईल किंवा नाहीं ह्याचा वानवाच! आणखी निरनिराळे टीपाकार होऊन 'काव्यसंग्रहाचें' स्वरूप प्रौढपणांत कसें काय बदलेल तो भाग निराळाच.

एका अंगावर मनुष्य जास्त नजर देऊं लागलें, ह्मणजे दुसऱ्या अंगावरची नजर कमी होते, आणि अर्थातच तें ढिलें पडतें. महाराष्ट्र काव्यसंग्रहामध्यें वाचकांस कवितेचा अर्थ समजून देणें ही प्रधान गोष्ट; आणि त्यास होईल तितकें सहाय करणें येवढें टीपाकाराचें कर्तव्य. तें परशुरामपंत तात्या व मोडक पूर्णपणें जाणत. आणि ह्मणूनच आपला रस्ता सोडून कणसें जमा करण्याचें काम करीत नसत. त्यांना अलंकार समजत नव्हते, मूळ भारतादि ग्रंथांतले उतारे देतां येत नव्हते, नामदेवाचे अभंग अवगत नव्हते, असें समजणें ही मोठी चूक होईल. ओकांचा समज अगदीं भिन्न. टीपा होतील तितक्या विस्तृत करावयाच्या, त्यांत इंग्रजी, मराठी, संस्कृत ग्रंथ जितकें दडपवेल तितके ग्रंथ दडपून देऊन, आपल्या विद्वत्तेनें व बहुश्रुतपणानें होईल तितकें लोकांस दिपवून सोडावयाचें. ह्यामुळें मूळ आर्येच्या अर्थाकडे त्यांचें बहुतेक दुर्लक्षच होतें ह्मटलें तरी चालेल. सर्व पद्यें त्यांस समाधानकारक लागलीं असतीलच असें ह्मणणें बरेंच जड जाईल. ह्यांजविषयीं आह्मांस बरेंच लिहावयाचें असल्याबद्दल आह्मीं आपला हेतु 'काव्यसंग्रहा' वर अभिप्राय देतांना व्यक्त केलेला आमच्या वाचकांसही आठवत असेलच. परंतु आमचा आळस असा मड्ड पडला कीं, ओक कैलासवासी झाले तरी त्याच्यानें आपली जागा सोडवली नाहीं! व आतां तसें करीत बसण्याचें स्थळ नव्हे हें उघडच आहे.

तथापि हा ओकांचा कित्ता पुढील टीपाकारांस सुद्धां मोठा बाधक झालेला आहे. कारण, 'यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः' ह्या न्यायानें त्यासच नव्या मनुष्यानें मान देणें उक्त आहे. बरें; कदाचित् टीपा कमी कराव्यात असें त्याच्या मनांत असलें तरी सुद्धां त्यास तसें करतां येणार नाहीं. कारण, विस्तृत टीपांवर नजर बसली असल्यामुळें, त्या कमी होतांच "ओकांची विद्वत्ता केवढी, त्यांची परिचालनशक्ति काय, त्यांचें ग्रंथावलोकन किती! तें दुसऱ्याला काय साधतें! महिना दोन महिने गेले नाहींत तों आलें संपुष्टांत!" असें ह्मणावयास

ही मंडळी कांहीं चुकावयाची नाहीं. तेव्हां पहिलें नांव सांभाळून त्यावर छाप बसविण्याचा प्रयत्न करणें हें नव्या संपादकांस उक्तच आहे. ह्मणूनच हल्लींच्या संपादकांनाही 'ही आर्या उत्तम आहे; ही उपमा फारच उत्कृष्ट; हा शब्द योग्य नाहीं असें कोण ह्मणेल ?' इतकेंच नव्हे तर 'ही उपमा आहे; हा दृष्टांत आहे; ही उत्प्रेक्षा आहे' इत्यादिकांनीं पानें भरावीं लागतात. पण अशी टीपांवरच झोड उठविण्याचें मनावर घेतल्यामुळें, मूळ पद्याकडे अगदींच दुर्लक्ष होत चाललें आहे. येवढेंच नव्हे, तर कितीएक पद्यें छिन्नविच्छिन्न होऊन त्यांस विद्रूपता प्राप्त झाली आहे. हें पहावयासाठीं विशेष मागें जावयास पाहिजे असेंही नाहीं. परवांचा ताजा 'महाराष्ट्र काव्यसंग्रह' चा ९० वा अंक पाहिला तरी पुरे. हा अंक येतांच सहज पाहावयासाठीं ह्मणून उलगडला. तों द्रोणपर्वांतील १०० वी आर्या दृष्टीस पडली. ती ही:—

**करिते झाले युद्ध क्रुद्ध शरभसिंह देवदानवसे, ।**
**मानवले, गमले न, स्नेहकणहि तन्मनीं तदा न वसे ॥ १०० ॥**

ही आर्या जशी आमच्या पाठांतील आहे, तशीच ती बहुतेकांच्याही पाठांतली असेलच. तेव्हां 'मानवले' हा पाठ वाचून आह्मी अगदीं भ्रमांत पडलों. कारण, ज्याला ह्मणून किंचित् रसिकता आहे, ज्याला थोड्या बहुत कविता करण्याचा किंवा वाचण्याचा तरी नाद आहे, मोरोपंतांच्या आर्यांशीं ज्याचा यत्किंचित् तरी परिचय आहे, त्याच्या सुद्धां ही गोष्ट सहज लक्ष्यांत येईल कीं तिसऱ्या चरणाचा आरंभ 'मानवसे गमले न' असाच असला पाहिजे. 'मानवले' ह्या शब्दानें त्या आर्येला कसा पेंवळटपणा आला, व तिच्या गौरवाचा कसा सत्यनाश झाला हें तत्काल ध्यानांत येतें. प्रथमतः आमचा तर्क असा धावला कीं 'स' च्या ठिकाणीं 'ल' चा टाइप चुकून पडला असावा. कंपाझिटरकडून अशी चूक होणें शक्य आहे. संपादकांकडून अशी भलतीच चूक होणें नाहीं. व तशी ती झाली असती, तर क्षम्य वर्गांत ढकललीच पाहिजे. परंतु खालीं पहातों तों 'मानवले' व 'गमले' ह्या शब्दांवर घडघडीत दिलेल्या टीपा! जणों काय आपल्या हेळसांडीचा व अरसिकतेचा मूर्तिमंत साक्षीदारच! ह्मणून आह्मीं मुद्दाम नवनीत पाहिलें, तों त्यांत 'मानवसे' असाच पाठ. पुनरपि संशय येऊन सर्वसंग्रहाची मूळ प्रत पाहिली, तों त्यांत तसेंच! तेव्हां ह्या नव्या संपादकांनीं केली कीं नाहीं ओकांच्याही वर ताण! तर हें कसें घडलें असावें?

आमच्या मतें प्रथमतः मूळ प्रतीवरून कंपोझ करावयाला छापखान्यांत फर्मांविलें, टाईपांच्या केसेमध्यें टाईपांचें डिस्ट्रिब्यूशन करतांना 'ल' च्या घरामध्यें 'स', 'स' च्या घरामध्यें 'ल' पुष्कळ वेळ पडत असतात. तेव्हां कंपोझ करतांना प्रुफामध्यें 'स' च्या ऐवजीं 'ल' पडून प्रूफ संपादकांकडे गेलें असावें. त्यांनीं खरें ह्मटलें ह्मणजे मूळ प्रत ताडून पहावयाची. परंतु तें काम आपलें नव्हे; टीपा ल्याहावयाच्या येवढेंच काम कायतें आपलें अशी समजूत त्यांच्या ह्मडीं खिळलेली; तेव्हां कशाला येवढी तसदी घेतात ? मूळ आर्या पाठ नाहीं. अर्थाकडे लक्ष्य पुरवावयाचें स्वप्नांत नाहीं. तेव्हां उरलें काम काय ? तर शब्दार्थाच्या टीपा द्यावयाच्या. तें त्यांनीं पट्कर करून सोडलें. 'मानवलें' ह्मणजे काय तर 'हृष्ट झालें!' पण 'गमलें' ह्याचें काय करावयाचें, ह्याची पडली पंचाईत.- हें: ! पण त्यांत काय आहे ? 'खेळले नाहींत !!!' ह्मणून दिलें ठोकून आणि झाले मोकळे न् काय ! एवंच एखाद्या लाडक्या मुलीचा एखादा हात पाय तोडून, किंवा डोळा फोडून किंवा नासिकाच्छेदन करून तिला नखशिखांत अलंकारानें मढवून काढण्याचाच हा प्रकार होय. हें मोठ्या दिलगिरीनें ह्मणावें लागतें.

रा. रा. तुकाराम जावजी, ओक, व 'महाराष्ट्र काव्यसंग्रह' ह्यांचे आह्मां महाराष्ट्रीयांवर स्मरणीय व चिरंतनचे उपकार झालेले जसे खरे आहेत, तसाच वर सांगितलेला प्रकारही कांहीं खोटा नाहीं. आणि इतक्या सर्वांस कारण काय तर ओकांस स्तुतीनें घातलेली मोहनी, व विद्वत्वदर्शनाची हौस. श्रीमंत बापूसाहेबांच्या पत्रोत्तरांतही हाच त्यांचा स्वभाव व्यक्त झाला आहे. स्वमतपुष्ट्यर्थ जे जे आधार लागतील, तीं तीं वाक्यें जेथल्या तेथें देऊन तीं तीं कोणत्या ग्रंथांतील आहेत, येवढें दर्शविलें ह्मणजे आपण किती परिश्रम केले, किती ग्रंथ चाळले हें लोकांस सहजच कळतें. तें सोडून ज्या ग्रंथांत जनस्थानासंबंधाचें एकही अक्षर नाहीं, असल्या भाराभर ग्रंथांची यादी प्रतिपक्षापुढें फेंकणें हें लक्षण कशाचें ? आणखी हा आक्षेप कोणी काढतील तर त्यावर पांघरूण घालण्यासाठीं वर सांगावयाचें कीं 'कांहीं मित्रांच्या सूचनेवरून !' छापून प्रसिद्ध होण्यापूर्वी सांगावयास येणारे जे मित्र ते कोण ? अर्थात् खासगी मंडळी ! अशा यादीनेंच जर आपला पक्ष खरा होत असता, तर एखाद्या 'सरस्वतीमंदिराचा' भला मोठा क्याटलाग पुढें केला असता तर त्याहून लवकर काम होतें, आणि नासिकांतले राम पट्कन जाऊन गोदावरीच्या मुखाकडे बसते !

दुसरी गोम ह्मणजे दुराग्रह किंवा एका पक्षाचा फाजील अभिमान. हा दोष वादामध्यें अत्यंत विघातक होय. वादामध्यें सत्याकडे विशेष ओढा असावा लागतो. आणि त्याला पुरेपूर सरलता अंगीं असली पाहिजे. परंतु ओकांचीं खालील वाक्यें पहा:—

"ही टीप लिहिली तेव्हां बराचसा विचार केला असल्यामुळें:—"

"अर्वाचीन शोधकांचाच पक्ष सबल व खरा आहे."

"त्यांच्या पत्राच्या झोंकावरून ते या अवार्चीन शोधकांस 'अशोधक' समजतात असें दिसतें. परंतु प्रथम प्रकारच्या पुराव्यांतील ग्रंथकारापेक्षां हेच आह्मांस विशेष मान्य आहेत."

ह्यावरून ओकांचा कल, प्रथमपासूनच 'अर्वाचीन शोधक' पक्षाकडे झुकला होता हें सहज दिसून येईल. गौतमी माहात्म्याच्या १८ व्या अध्यायांत 'पंचवटी' च्या उपपत्तिसहवर्तमान साद्यंत कथा असतां, 'त्यांत पंचवटीसंबंधानें एक अक्षर सुद्धां नाहीं, असें छातीला हात लावून सांगणें, डा० भांडारकर, बोरबुवा ह्यांच्या इंग्रजी ग्रंथांतील आपणास अनुकूल तेवढींच चार चार वाक्यें घेऊन, त्याच्याच खालचीं प्रतिकूल वाक्यें सोडून देणें, हें कशाचें द्योतक ?

'अहं' आलें, कीं त्याच्या पाठोपाठ दुसऱ्याविषयीं तुच्छ बुद्धि असावयाचीच. ओकांनीं जनरीतीप्रमाणें श्रीमंतांच्या गुणज्ञतेचा अत्यंत गौरव केला आहे, व कोटिशः धन्यवादही गाइले आहेत हें खरें. तथापि 'जनस्थानावर जे आक्षेप आहेत ते निर्मूळ, निराधार व हिंदुस्थानचे भूगोलाचा विशेषसा परिचय नसल्यामुळें केलेले आहेत' इत्यादि वाक्यांवरून त्यांचा समज असा कीं "श्रीमंत हे काय आपल्या राजमंदिरांत बसलेले; जुन्या पद्धतीचें शिक्षण; धड भूगोलाची माहिती नाहीं; इंग्रजी विद्येचा संस्कार नाहीं; शोधकतेचा अभ्यास नाहीं; रसिक मात्र आहेत. ह्याकरितां शेंपन्नास इंग्रजी संस्कृत ग्रंथांची गुंडाळी दिली एकदां अंगावर फेंकून कीं होतील दिप्प !"

(पुढें चालू.)

---

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar at JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

आर्यमहौषधालय मु० आंजर्ले.

या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् झाला नाहीं तर पैसे परत देऊंच व त्याशिवाय त्यांच्या आरोग्यार्थ एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकटच देऊं.

# मदनविलासामृतसंजीविनी.

## वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहक, बुद्धि—कांतिवर्धक व धातुपौष्टिक सुवर्णमाक्षिक मौक्तिक कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्त्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्वभागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, छातींतील रोग, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, वातरोग, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, हात, पाय, मूत्रमार्ग, व शरीर यांचा दाह, व अरुचि, इ० अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास नवीन किंवा जुनाट असले तरी खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस शारीरिक व मानसिक श्रम फार पडतात, त्या सर्वांच्या आंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो व सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें. कोठशुद्धि होते. या अप्रतिम गुटिका अत्यंत शोधानें केल्या असून त्यांच्या अप्रतिम गुणका-


रित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं, असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी इटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळया रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळया घेणारांस मंगीचा सर्व टपा-लखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळयांस १ रु. ७० गोळयांस २ रु. १६० गोळयांस ४ रु. २६० गोळयांस ६ रु. ५२० गोळयांस १० रु.

**थंडगार नेत्रांजन**—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळयांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार, तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळयांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

**विशेष सूचना.**—अलीकडे आंजर्लें व मुर्डी वगैरे गांवांतील औष-धांच्या बऱ्याच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष सं-भव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें "**कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य, मु० आंजर्लें, ता० दापोली, जि० रत्नागिरी**" याच पत्त्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपानपत्रक सोबत असतेंच.

५—१२]

# श्रीमन्महाराज करवीर आणि ह्मैसूरसरकार यांचे आश्रयाखालीं.




## स्वधर्माभिमानी यांकरितां हिंदु वॉचेस.

हीं वॉचेस दिखाऊ, मजबूत, वजनांत हलकीं, मध्यम आकार, बरोबर वेळ दाखविणारीं, पांढऱ्या मिन्याचे प्लेटवर सुंदर प्रेक्षणीय हिंदु पूज्य दैवतांचीं चित्रें वगैरे. हें वॉच एकवार घेतल्यास १०,२० वर्षे दुसरें घ्यावयास नको.

**हिंदु युनिव्हर्सल वॉच.**

ग्यारंटी ३ ते ६ वर्षे. रोमन आंकडे असून मध्यभागीं फक्त शंकरपार्वती व गजानन. निकलसिल्व्हर वॉच किं. रु. १६. चांदीचें वॉच किं. रु. ३०. सोन्याचें वॉच किं. रु. २५०.

**हिंदु प्राईज वॉच**—ग्यारंटी २ ते ५ वर्षे. मराठी व रोमन आंकडे असून चित्रें १६ आणि मध्यभागीं श्रीमहादेवपार्वती.

**निकल सिल्व्हर वॉच**—किं. रु. १५, चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३०, सोन्याचें किं. रु. १५०.

**हिंदु प्रिन्हलन्स वॉच**—ग्यारंटी १ वर्ष ते ४ वर्षेपर्यंत—डबल आंकडे, चित्रें १५ असून मध्यभागीं दरबारी थाटानें श्री. शिवाजी छत्रपतिमहाराज. नि. सि. वॉच किं. रु. १०, १५. चांदीचें किं. रु. २५-३०.

**हिंदु आर्मी वॉच**—डबल आंकडे असून चित्रें २२. मध्यभागीं श्री. शिवाजी महाराज घोड्यावर बसलेले. निकल सिल्व्हर वॉच किं. रु. १० ते १५. चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३०. शिवाय वेस्टंड रिलायन्स जॉन ब्यारेल, कुरवायझर वगैरे प्रसिद्ध मेकरांचीं लहानमोठीं वॉचेस आमचेकडे विकत मिळतील.

प्याकिंग पोस्टेज निराळें, वॉचबरोबर एक शेडा, पेटी, काच आणि स्प्रिंग मिळेल. व्ही. पी. पार्सलनें पाठवूं.

सर्व प्रकारचे वॉचेसचीं दुरुस्तीकामें माफक आकारानें ग्यारंटीसह करून देऊं.

सचित्र क्याटलाग फुकट. [४-१२

**जी. बी. नाईक आणि कंपनी,**

भायखळा, मुंबई आणि पुणें.

---

# हरएक प्रकारचा माल

मुंबईंत मिळणारा, व्यापारी व ग्राहक यांस रोख पैसे आल्यास पाठवूं.

**नियम व माहिती अर्धा आणा आल्यास मिळेल.**

व्यापारी व ग्राहक यांकरितां. **हरएक प्रकारचा माल मुंबईंत** मिळणारा वक्तशीर बाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय.

D. K. SANDU, RAMWADI & THAKURDWAR, BOMBAY.



**दत्तात्रेय कृष्ण सांडू यांचीं** हरएक प्रकारचा माल मिळणारीं, आणि माफक अडत घेऊन माल रवाना होणारीं दुकानें:— रामवाडी आणि ठाकुरद्वार, मुंबई.

**खरा हस्तिदंती माल**—फण्या ।८ ते १ रु., कंगवे ।८ ते ।१२ आ., फांसे जोड २ ते ७॥ रु., नाटाचे फांसे ।६ ते ।१२ आणे.

पनवेल आर्यौषधी कारखान्यांतील सर्व औषधें वरील दोन्ही दुकानीं विकत मिळतात. अर्धा आणा आला तर यादी पाठविण्यांत येईल.


## औषधयोजना.

रोग्याचें प्रकृतिमान बरोबर कळावें म्हणून पनवेल आर्यौषधी कारखान्यांत रुग्णपत्रिका नांवाचा एक नमुना छापून तयार केला आहे. अर्धा आणा आल्यास तो पाठवूं; त्यांत अगर पत्रानें रोग्याचें प्रकृतिमान कळवून औषध पाठविण्यास लिहिलें तर त्यावर औषधयोजना करून औषधें पाठवूं. पत्रव्यवहार दत्तात्रय कृष्ण सांडू, ठाकुरद्वार, मुंबई, या पत्त्यावर करावा.

**रामवाडी**
दुकानदार:—बा. कृ सांडू.

**ठाकुरद्वार**
दुकानदार – ह. कृ. सांडू

अक्टोबर, नवंबर, डिसेंबर. (वर्षाची वर्गणी १८३ ट. खर्चासह.) १८९८.



# केरळकोकिळ.

वर्षारंभ जानेवारी.

पु० १२] . [अं० १०।११।१२

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्तवापराधः ।
सहकारतरौ चकार यस्ते सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

... महादेव गुर्जर बुकसेलर आणि ...
रामवाडी
मुंबई.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

अक्टोबर, नवंबर, डिसेंबर या अंकांतील विषयांची अनुक्रमणिका.


| अक्टोबर. | पृष्ठ. | | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| लेडी जेन ग्रे. ... ... | २१७ | वेदांतपर संवाद. ... | २५१ |
| कविता—साखरेची बाहुली. | २२७ | गुरुशिष्यसंवाद. ... | २५३ |
| लो. च. सुरवंटांवर फिर्याद. | २३३ | काफर लोक. ... ... | २५५ |
| पुस्तकपरीक्षा—पंचवटीस्थलवर्णन. ... ... | २३७ | गोमांतकी आरती. ... | २५७ |
| | | काव्यकूट. ... ... | २५७ |
| पत्रव्यवहार. ... ... | २३८ | पत्रव्यवहार. ... ... | २५८ |
| सद्गुरूस प्रार्थना. ... | २४० | **डिसेंबर.** | |
| **नवंबर.** | | राजयोग प्र. ४ थें. ... | २६५ |
| सामोयिड लोक. ... | २४१ | प्रेतांचे मक्तेदार. ... | २७३ |
| कविता—खरें आणि खोटें. | २४६ | पुस्तकपरीक्षा. ... ... | २७९ |
| लंका सिंव्हलद्वीप. ... | २४८ | | |


## आश्रयदात्यांकरितां.

ज्यांकडे केरलकोकिळची वर्गणी येणें आहे त्यांस या अंकांसोबत नंबर व बाकी कळविली आहे. कृपा करून ज्यांस वर्गणी मनिआर्डरनें पाठविणें सोईचें असेल त्यांनीं ती मनिआर्डरनें पाठवून कूपनवरती **नंबर लिहावा;** व ज्यांस **व्हा. पे.** नें पाठविणें सोईचें वाटेल त्यांनीं अंक पोंचतांच नंबर कळवून अंक **व्हा. पे.** नें पाठविण्यास लिहावें ह्मणजे कन्याविक्रयदुष्परिणाम नाटक बक्षीस पाठवून वर्गणीबद्दल अंक व्हा. पे. करूं.

### पत्रव्यवहार नंबर दर्शवूनच करावा.

नंबर न दर्शविल्यानें लिहिल्याप्रमाणें लवकर व्यवस्था होण्यास फार गैरसोईचें होतें. नांवें नंबराच्या क्रमानें देण्यांत येऊन नंबरवारीनें सर्व व्यवहार ठेवलेला आहे.

वर लिहिल्याप्रमाणें ( १ ) **मनिआर्डरनें** किंवा ( २ ) **व्हा. पे.** नें **वर्गणीची बाकी फेब्रुवारी १८९९ अखेर** ज्यांकडून चुकती होत जाईल, त्यांस दक्षिणा प्राईज कमेटीनें बक्षीस दिलेलें

## कन्याविक्रयदुष्परिणाम नाटक.

अर्धा आणा पोस्टेज आला असतां पाठविण्यांत येईल. रा. रा. मो. वि.

शिंगणे व बा. वा. आचार्य ह्यांनीं हें सद्यस्थितीस अनुरूप व अत्युपयोगी नाटक मुद्दाम तयार करून स्वतः छापून कोकिळच्या आश्रयदात्या बंधुवर्गप्रीत्यर्थ त्याच्या १५० प्रती अर्पण केल्या. कोकिळच्या वर्गणीची बाकी चुकती करून अर्धा आणा पोस्टेज पाठविणारास हें फुकट द्यावयाचें. अशा रीतीनें पदरची घीस सोसून कोकिळावर निर्हेतुक प्रेम करणारे असे कोकिळचे आश्रयदाते पाहून साहासाहा सातसात वर्षांची वर्गणी येणें असणाऱ्या वर्गणीदारांस काय सुचवावें व काय लिहावें हें त्यांचें त्यांनीं मनांत जाणावयाचें आहे. **मार्चअखेर** बाकी राहाणाऱ्या लोकांचें लक्ष या सोबतच्या अंकास जोडलेल्या सूचनेकडे पुरलें नाहीं असें समजून

**कोकिळचीं कांहीं पृष्ठें नंबर, नांव व वर्गणी**

ह्यांची सुनावणी करण्याकडे देणें भाग पडतील. असा अलौकिक प्रसंग ईश्वर-कृपेनें न येवो.

बाकी देणें असणाऱ्या वर्गणीदारांनीं ह्या लिहिण्याचा राग न करितां इतकेंच समजावें कीं अंक वेळेवर न आल्यानें ताबडतोब रागीट शब्दांनीं कार्ड लिहावयाचें त्यापेक्षां हें–वर्गणी वेळेवर नव्हे, ह्या वर्षाची त्या वर्षास राहिलेली बाकी मागण्याचें–लिहिणें क्षम्य आहे. असें मनाचें खरें सांत्वन करून कृपादृष्टीनें बाकी पाठवावी ही आश्रयदात्यांस प्रार्थना.

ज. म. गुर्जर, रामवाडी मुंबई.

---

# ग्राहक व व्यापारी ह्यांस माहिती.

१ गव्हर्नमेन्ट सेन्ट्रल बुक डेपो, गणपत कृष्णाजी, निर्णयसागर, जगदीश्वर, गोपाळ नारायण कंपनी, राधाबाई आत्माराम सगुण, बी. एस्. वैद्य आणि कंपनी, हरिप्रसाद, गंगाविष्णु, ज्येष्ठाराम मुकुंदजी, डी. व्ही. साधले आणि कंपनी, आनंदाश्रम पुणें, इत्यादि कारखान्यांच्या मालकांनीं प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें, तशींच इतर मुंबई व पुणें येथील छापखानेवाले आणि बुकसेलर्स ह्यांनीं छापून प्रसिद्ध केलेलीं व वासुदेव मोरेश्वर पोतदार वगैरे व्यापारी ह्यांचीं पुस्तकें त्याच किंमतीनें आमचे दुकानीं विकत मिळतात व बाहेरगांवच्या ग्राहकांस व व्यापा

त्यांस पाठविण्यांत येतात याबद्दलचा आमचा **"क्याटलाग"**–पुस्तकांची यादी, **पत्ता स्पष्ट** व अर्धा आणा पोस्टेज पाठविला कीं फुकट पाठवूं.

२ ग्राहक किंवा व्यापारी ह्यांस त्यांच्या मागणीबरोबर तयार असलेला माल हिशोबाच्या यादीसह ताबडतोब आणि होतां होईल तों वेळेवर व व्यवस्थित रवाना होतो, हें सर्वांच्या अनुभवास येत आहेच.

३ पुस्तकांचा **नवीन व्यापार करूं इच्छिणाऱ्यांस**—आमच्या नव्या क्याटलॉगांतील नियमांनुरूप—**मदत** देण्यास व **उत्तेजन** देण्यास कधींही हयगय व्हावयाची नाहीं; मोठ्या आनंदानें व मेहनतीनें होण्यासारखी तजवीज व खटपट करूं. कलम १ यांत लिहिल्याप्रमाणें आमच्याकडे बहुतेक माल मिळत असल्यामुळें व आह्मांकडून बाहेरगांवीं रवाना होत असल्यामुळें व्यापारी लोकांस फार सोयीचें झालें आहे. कारण एके ठिकाणींच व्यवहार चालविणें उभयपक्षीं फार श्रेयस्कर होतें.

४ ह्मणून अशा लोकांनीं व **लायब्ररीच्या सेक्रेटरींनीं** बेलाशक पुस्तकांची यादी, पत्रासोबत, स्वतंत्र रीतीनें, स्वच्छ, खुलासेवार करून पाठवावी. ह्मणजे रीतीप्रमाणें व शेंकडों व्यापारी लोकांस देतों त्या मानानें करतां येईल तितकी **कमिशनची सवड** करून,—मनिआर्डर अगर दुसऱ्या रीतीनें पैसे आले नसल्यास—**व्हाल्युपेएबलनें** माल रवाना करूं (क्याटलाग नियम ३,४,५,१० पहा).

५ आमचीं खासगी पुस्तकें एकदम दहा १० रुपयांचीं घेतल्यास **शेंकडा पंचवीस टक्के कमिशन** देऊं. जास्त रकमेसही ह्याच नियम. इतर पुस्तकांस अमुकच कमिशन देऊं असें सांगवत नाहीं. कारण तीं निरनिराळ्या प्रकारचीं व निरनिराळ्या मालकांचीं असल्यामुळें कमिशनचे दर निरनिराळे असतात. ह्मणून आपल्यास पाहिजे असतील त्या पुस्तकांची यादी पाठवून मागणी करावी; ह्मणजे त्या त्याप्रमाणें कमिशन देण्यांत येईल. तरी इतकें खचित कीं, आमची घाऊक खरेदी असल्यामुळें व्यापारी लोकांस होतां होईल तों फायदा करून देण्यांत दक्षता ठेविली जाईल.

**६ विशेष सोय**—" आह्मी स्वतः छापून प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें **केरळको-किळच्या** वर्गणीदारांनीं एकदम पांच रुपयांचीं घेतल्यास तीं साडेतीन रुपयांस देऊं. मात्र वर्षांतून एका वर्गणीदारास एक वेळ."

ज. म. गुर्जर,
दुकान, रामवाडी, मुंबई.

# केरळकोकिळ.

पु० १२ ] [अं० १०

## लेडी जेन ग्रे.



संपदो महतामेव महतामेव चापदः
वर्धते क्षीयते चंद्रो न तु तारागणः क्वचित् ॥ १ ॥

कोमल आणि पवित्र अंतःकरण; निरपराधी आणि सद्गुणी; सुविद्य आणि सुशील; अशा मनुष्यांवरही कधीं कधीं दुर्दैव हें काळाचा घाला घालून फार भयंकर रीतीनें त्याचा अंत करतें. अशीं जीं कोणी हतभागी मनुष्यें जगावर होऊन गेलीं, त्यांतच **लेडी जेन ग्रे** हिची

१ थोरांस जशी संपत्ति, तशीच विपत्तिही प्राप्त होते. • चंद्राची जशी वृद्धि होते, तसाच क्षयही होतो. नक्षत्रांना काय? हेंही नाहीं, आणि तेंही नाहीं!

गणना आहे. हिच्या चरित्राइतकें करुणास्पद चरित्र इतिहासांतही क्वचित्च आढळेल.

**लेडी जेन ग्रे** ही, इंग्लंडचा राजा आठवा **हेन्री**, ह्याच्या धाकट्या बहिणीची नात, आणि **मार्किस आफ् डार्सेट**–नंतर जो **सफोकचा ड्यूक** झाला–त्याची वडील मुलगी होती. हिचा जन्म १५३७ मध्यें झाला. ही लहान असतां, हिच्या बापानें मुलें शिकविण्यासाठीं घरीं एक मास्तर ठेविला होता. त्याच्याजवळ तिनें फारच उत्कृष्ट व अतिशय लौकर अभ्यास केला. ह्यामुळें, आणि तिचा स्वभाव अत्यंत सत्यप्रिय व नम्र असल्यामुळें, आणि तिचें सौंदर्यही परम रमणीय असल्यामुळें, तिला पाहतांच कोणालाही समाधान होत असे.

एके दिवशीं आठव्या **हेन्रीची** राणी **काथेराइन पार** हिनें **जेन ग्रेस** पाहिलें, तेव्हां तीस तिच्या गुणांचें मनस्वीच कौतुक वाटलें. तें इतकें कीं, त्या राणीनें तत्काल तिच्या आईबापांस सांगितलें कीं, **जेन ग्रेला** माझ्याबरोबर राजवाड्यांत राहण्यासाठीं पाठवून द्या. तिचा अभ्यास तसाच पुढें चालविण्याचीही तिनें कबुलायत केली. तेव्हां तिच्या आईबापांसही तो शब्द मोडवेना, रुकार देणें भाग पडलें. त्याप्रमाणें **जेन ग्रे** राजवाड्यांत रहावयासही गेली, व तेथें तिचा अभ्यास उत्तम प्रकारें चालला होता. पण इतक्यांत तिचें दुर्दैव तिच्या मार्गांत आडवें पडलें आणि ती राणीच अकस्मात् निवर्तली. ह्मणून **लेडी जेन ग्रे** हीस पुन्हा आपल्या आईबापांच्या घरीं परत यावें लागलें.

त्या कालीं आपल्या देशांतील आईबापांप्रमाणेंच तिकडचीं आई-बापेंही मुलांविषयीं फार कडक असत. आणि त्यांतून **जेन ग्रेचीं** आईबापें तर विशेषच कडक होतीं. तिला तीं नेहमीं हिडिसपिडिस करीत, नांवें ठेवीत, घटघटकेला तिचा तिरस्कार करीत, गालगुच्चे घेत, व कधीं कधीं मारीत सुद्धां! पण तिला शिकवावयाला येत असलेला मास्तर मोठा विद्वान् असून फार मायाळू असे. ह्मणून शिकण्याच्या कामांत तिला नेहमीं उल्हास वाटत असे. आणि शिकणें संपलें कीं, ती नेहमीं रडूं लागे. कारण, बाकीचें सर्वच तिला भयंकर आणि त्रासदायक वाटत असे.

**जर्मन, फ्रेंच, लाटिन** आणि **ग्रीक** इतक्या भाषा तिला समजत होत्या येवढेच नव्हे, तर त्यांमध्यें ती उत्तम तऱ्हेनें लिहीतही असे. ती सुंदर कशीदा काढी, आणि गायनवादनांत तर ती चांगलीच प्रवीण होती. एके दिवशीं **ऱ्याजर अशाम** ह्या नांवाचा **इलीजाबेथ** राणीचा एक विद्वान् शिक्षक **ग्रे**च्या बापाच्या किल्ल्यांत रहावयास आला होता. तो बागेंतून सहज फिरत असतां, वाड्यांत कोणी दिसेना. ह्मणून घरांतील मंडळी कोठें गेली, ह्याची त्यानें चौकशी केली. तेव्हां तीं सारीं शिकारीस गेलीं आहेत असें समजलें. त्यावर त्यानें विचारलें कीं, '**लेडी जेन ग्रे**' कोठें आहे? हें ऐकून कोणीं नोकरानें सांगितलें कीं, 'ती आपल्या खोलींत आहे.' ह्मणून तो तिच्या खोलीकडे गेला, तों ती तेथें एक **प्लेटो**चें मोठें पुस्तक वाचीत बसलेली आढळली. तेव्हां मोठ्या विस्मित अंतःकरणानें तो तीस ह्मणाला, "सारीं माणसें शिकारीस गेलीं, आणि तूं कां गेली नाहींस?"

तेव्हां ती चौदा वर्षांची मुलगी प्रसन्नमुखानें वर पाहून ह्मणाली "ह्या **प्लेटो**च्या पुस्तकांत मला जो आनंद वाटतो, त्यापुढें त्या बागेंतील शिकारीचा आनंद तुच्छ आहे! खरोखर आनंद व करमणूक कशांत आहे, हें त्यांस कळत नाहीं!"

ती सालस आणि बुद्धिमती असल्यामुळें सर्व लोक तिजवर ममता करीत. तिच्या शिक्षकांना तर, ह्या आपल्या अल्पवयी विद्यार्थिनीचा मोठा अभिमान व भूषण वाटत असे. तिचें भाषाविषयक ज्ञान खरोखरच फार वर्णनीय होतें. **ग्रीक** भाषेचा अभ्यास तिला फार आवडत असे. **क्याथेराइन** ह्मणून तिची एक बहीण होती. तिला तिनें जें शेवटचें पत्र लिहिलें आहे, तें **ग्रीक** भाषेंतच लिहिलें आहे. **अशाम** आणि दुसऱ्याही कितीएक विद्वानांना तिनें **ग्रीक** भाषेमध्यें लांबलचक पत्रें लिहिलीं होतीं तीं अद्याप जपून ठेविलेलीं आहेत.

**जेन ग्रे**च्या बापाला दोन वडील भाऊ होते ते वारले. त्यामुळें तो उच्च पदवीस चढला. ह्मणजे **सफोक**चा **ड्यूक** झाला. त्या समयीं **इंग्लंड**चा सहावा **एडवर्ड** राजा वयानें लहान होता. ह्याकरितां तो वयांत येऊन राज्य करण्यास समर्थ होईपर्यंत, **नार्थंबर्लंड**च्या **ड्यूक**नें राज्य चालवावें; हा ठराव पास करून घेण्यांत त्या **ड्यूक**ला

ह्यानें चांगलीच मदत केली होती. परंतु **एडवर्ड** हा अजारी असून तो फार दिवस वांचेल अशीही आशा नव्हती. ह्यामुळें त्याच्या पश्चात् वारस कोण होतो, ह्याची **ड्यूकां**मध्यें चर्चा सुरू झाली. **जेन ग्रे**च्या बापाच्या—ह्मणजे **सफोक**च्या **ड्यूक**च्या—मनांत होतें कीं, आपल्या मुलीनें राणी व्हावें. आणि **नार्थबर्लंड**च्या **ड्यूक**च्या मनांत होतें कीं, आपल्या मुलानें राजा व्हावें. ह्या महत्वाकांक्षेच्या लोभास गुंतून त्या उभयतांनीं एक मसलत काढिली कीं, **नार्थबर्लंड**च्या **ड्यूक**चा मुलगा—**गिल्बर्ड ड्यूड ले**—ह्मणून होता, त्याचें आणि **जेन ग्रे**चें लग्न करून टाकावें ह्मणजे उभयतांचेही हेतु सिद्धीस जातील. नंतर सहाव्या **एडवर्ड**चें सिंहासन, त्याच्या सख्ख्या बहिणी **मेरी** व **इलिझाबेथ** ह्या असतांना, त्यांस न देतां, आपल्या पुतणीस—ह्मणजे **लेडी जेन ग्रे** हीस—देण्याविषयीं त्यांचें मन वळविलें. परंतु वास्तविक पाहतां हा अधिकार त्या बिचाऱ्या बालराजाकडे कांहींच नव्हता. लोक करतील तें खरें. त्यांच्यावरच अधिक भिस्त होती. ह्याचा विचार त्या उभयतांही **ड्यूकांनीं** केला नाहीं. खरेंच आहे. लोभाच्या सपाट्यांत मन सांपडल्यानंतर मनोराज्यांतील हर्षातिरेकांत हे विचार सुचणार कोठून ?

**गिल्बर्ड ड्यूड ले** हा मनुष्य उंच असून सुंदर, होतकरू व हुशार होता. इ० स० १५५३ च्या जूनमध्यें त्या उभयतांचें लग्न झालें त्या वेळीं **एडवर्ड** राजाच्या हुकुमावरून सरकारी खजिन्यांतून अतिशय मोल्यवान् अहेर, जडजवाहीर, वस्त्रालंकार, नवरानवरींस नजर करण्यांत आले. सारा समारंभ फार मोठ्या थाटानें व डामडौलानें साजरा करण्यांत आला. ह्या मंगलकार्याला मोठमोठे सरदार व राजेरजवाडे सुद्धां हजर होते.

नंतर लौकरच **लेडी जेन ग्रे** सासरीं असतांना, एके दिवशीं तिच्या सासूनें तिला कळविलें कीं, "तूं आतां इंग्लंदची राणी होणार. तयारींत अस. सहाव्या **एडवर्ड** राजानें इहलोकांतून प्रयाण केलें." ह्या भाषणानें त्या **जेन ग्रे**ला अतिशय दुःख मात्र झालें. कारण, राणी **मेरी** ही **इंग्लंड**च्या राज्याची खरी वारसदारीण आहे, हें ती पक्केपणीं समजून होती. तेव्हां तिचें सिंहासन आपण घेणें, हा केवळ

अन्याय–निखालस जुलूम–होय. तें तिला मुळींच रुचलें नाहीं. शिवाय, तसें केल्यानें ज्या लोकांवर आपण राज्य करणार, ते लोक आपणास एक अनाथ अबला न समजतां, मी ह्मणजे राज्य हिसकावून घेणारी जुलमी स्त्री असें समजतील. ह्या योगानें तिचें दुःख इतकें वाढलें कीं, ती तत्काल अजारी पडली, आणि हवा बदलण्यासाठीं तिला परठिकाणीं न्यावें लागलें.

इकडे बापास आणि सासऱ्यास तर काय, स्वर्ग सारा तीन बोटें उरला होता. ते आनंदानें मनांत मांडे खात, राजवाड्यांतील मनुष्यें अनुकूल करून घेऊन, राज्याभिषेकोत्सवाच्या तयारीच्या धामधुमींत होते. **जेन ग्रे**च्या दुःखाची त्यांच्या अंतःकरणांत तिलमात्रही कल्पना नव्हती. सर्व सिद्धता झाल्यानंतर **जेन ग्रे**चा बाप, सासरा व नवरा हे त्रिवर्ग एक सुंदर होडी तयार करून इ० स० १५५३ तील जुलई महिन्याच्या १० व्या तारखेस तिला **लंदन**च्या किल्ल्यांत घेऊन जाण्यासाठीं येऊन दाखल झाले. आणि **लेडी जेन ग्रे**ला 'हूं, चल चल!' ह्मणून त्यांनीं अगदीं घाई लाविली. चाललेला हा प्रकार केवळ उतावळीचा व घातक आहे हें मात्र तिला समजत होतें. तरी बापापुढें व सासऱ्यापुढें त्या कोमल व भिडस्त मुलीच्यानें कांहीं उत्तर देववेना. ती कांहीं वेळ तटस्थ राहिली, आणि पुन्हा हुंदका येऊन रडूं लागली. तरी त्यांनीं तिला हाताला धरून बळें बळें होडींत नेऊन बसविलीच. राज्ञीपदास शोभेल, अशी होडीही मोठी शृंगारलेली होती. तिच्या मध्यावर तिला बसण्यासाठीं उच्च सिंहासन तयार केलें होतें. मस्तकावर बहुमोल चांदवा असून त्यास मौक्तिकें लटकावलीं होतीं. तिच्या पाठीमागें सेवेसाठीं दासदासी तत्पर होत्या. तरी **जेन ग्रे**च्या डोळ्यांतील अश्रु कांहीं खळेनात. ती एकसारखी रडत होती. डोळे व गाल अगदीं लालभडक होऊन गेले होते. तिचा पति, तिच्या शेजारीं बसून वारंवार तिचें सांत्वन करीत होता. बाप आणि सासरा हेही कांहीं समजुतीच्या गोष्टी सांगत, व पुढील बेत करीत त्या होडींत जवळच बसले होते.

अशा स्थितीनें **लेडी जेन ग्रे लंदन**च्या किल्ल्यांत येऊन दाखल झाली. तिनें किल्ल्यांत पाय ठेविला तेव्हां, हे दोघे ड्यूक, व इतरही

अनेक सरदार व मानकरी ह्यांनीं तिच्यापुढें होऊन लवून तिला मुजरे केले. पण तिचा चेहरा अगदीं निस्तेज होऊन छाती धडधडत होती. तरुण राजपुत्र पूर्वींच मरण पावला होता, ह्मणून सर्व लोकांनीं हिलाच नेऊन तेथील तक्तावर बसविलें, व रीतीप्रमाणें पट्टाभिषेकसमारंभ झाला. दरबारास जमलेल्या सर्व लोकांनीं हीच **इंग्लंद**ची राणी ह्मणून मान्य केली. व तिचें संरक्षण करण्याबद्दल त्यांनीं शपथाही घेतल्या. पण तेंच तिच्या मनाला व काळजाला धक्का बसण्यास कारण झालें. तिनें एकदम मोठ्यानें हंबरडा फोडिला, व त्यासरशीं ती धाडकर जमिनीवर पडली. ती बराच वेळ निचेष्ट होती. तिचा चेहरा अगदीं पांढरा फटफटीत दिसत होता, व डोळे मिटले होते. शुद्धीवर आल्यानंतर ती उठली, तिनें गुडघे टेंकले, आणि हात जोडून परमेश्वराची प्रार्थना केली कीं, "जर माझा ह्या सिंहासनावर बसण्याचा हक्क न्याय्य असेल, तर हे प्रभो! मला हें राज्य न्यायानें आणि नीतीनें करण्याचें सामर्थ्य दे."

येणेंप्रमाणें पट्टाभिषेकसमारंभ तर आटोपला. पण तें केवळ शिराळशेटीचें राज्य होतें. कारण, हें सिंहासन कांहीं एकट्या **लंदन** शहराचेंच नव्हतें; तर सर्व **इंग्लंद** देशाचें होतें. तेव्हां एका **लंदन** शहरांतलेच लोक अनुकूल करून घेण्यांत कांहीं अर्थ नव्हता. ते उभयतां व्याही व्याही, आनंदाच्या भरांत आणि मनोराज्याच्या धांदलींत ही मुद्याचीच गोष्ट विसरले. आणि त्याचें फळ बिचाऱ्या त्या निरपराधी व सत्त्वस्थ तरुण दंपत्यास भोगावें लागलें. **मेरी** राणी, ही राजाची सख्खी बहीण असून राज्याची खरी वारसदारीण ही गोष्ट साऱ्या **इंग्लंद** देशाला माहीत होती. तेव्हां हा येवढा धडधडीत अन्याय त्यास कसा सहन होणार? किल्ल्यांत जरी हा प्रकार झाला, तरी सर्व देशभर **मेरी** राणीचें नांव दुमदुमत राहिलें होतें. त्याचा प्रतिध्वनि हां हां ह्मणतां **लंदन** शहरांत येऊन पोंचला. जिकडे तिकडे वाटाघाट चालू झाली. सभांवर सभा भरूं लागल्या. व अखेर **मेरी** राणीला सिंहासनावर स्थापन करण्यासाठीं किल्ल्यावर लोकांचा हल्ला आला. तेव्हां ह्या व्याह्याव्याह्यांचे डोळे उघडले. परंतु पश्चात्बुद्धीचा उपयोग तो कितीसा होणार!

हें सर्व पाहिल्यावर **जेन ग्रे**चा बाप घाबऱ्या घाबऱ्या तिच्या महालांत गेला आणि ह्मणाला "झालें. सर्वस्वी घर बुडालें! तुझा **लंदन**च्या राणीपणाचा अवतार संपला. तूं आतां **इंग्लंद**ची राणी नव्हेस येवढेंच नव्हे, तर तुजवर मोठें अरिष्ट कोसळणार!!" त्यास शांत वृत्तीनें त्या मुलीनें उत्तर दिलें कीं "ह्यांत विशेष तें काय? ही गोष्ट ठरलेलीच होती; व ती मी जाणूनही पण होतें. मी केवळ तुमच्या आग्रहास्तव तुमच्या आणि आईच्या आज्ञेस मान दिला. मी मनामध्यें पक्की खूण गांठ बांधून ठेवली होती कीं, मी माझ्या मनाविरुद्ध, केवळ तुमच्या इच्छेनें व सत्तेनें जरी राज्यसूत्र हातीं घेतलें आहे, तरी सुद्धां मजवर तोहमत येईल. असो. ईश्वराची इच्छा!"

हें संभाषण पुरें होतें न होतें तोंच किल्ल्यामध्यें लोक घुसले. आणि सारी धुमश्चक्री सुरू झाली. सरकारी **ग्यारिसन**चे लोक येऊन त्यांनीं **लेडी जेन ग्रे**ला व तिच्या भ्रताराला पकडून चतुर्भुज केलें, आणि परस्परांची ताटतूट करून राजकीय तुरुंगांत नेऊन कोंडून टाकलें!! **मेरी** राणीस मोठ्या समारंभानें सिंहासनावर बसवून आनंदाच्या जयघोषानें **लंदन** शहरच नव्हे, तर सारा **इंग्लंद** देश दणाणून गेला. आणि उभयतां कारस्थानी **ड्यूकां**ची जिकडे तिकडे नाचक्की होऊन फटफजिती उडाली. शिक्के, मोर्तब, द्वाही, ध्वज, सर्व **मेरी** राणीच्या नांवानें सुरू होऊन जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला.

ह्या नव्या राज्यक्रांतीची स्थिरस्थावर झाल्यानंतर नोवेंबर महिन्यांत **लेडी जेन ग्रे** व तिचा नवरा ह्या उभयतांवरील आरोपाची चौकशी न्यायकोर्टापुढें प्रसिद्धपणें सुरू झाली. तींत उभयतांवरही राजद्रोहाचा गुन्हा शाबित होतो असें ठरलें; व देहांताची शिक्षा कायम झाली. तत्काल '**लेडी जेन ग्रे**, व तिचा भ्रतार ह्या उभयतांचे ता० १२ फेब्रुवारीं रोजीं शिरच्छेद करण्यांत येतील' असेंही कोर्टानें सुनावलें!! त्या वेळीं दुःखपर्वताच्या शिखरावरून त्या पतिपत्नींनीं परस्परांकडे शेवटचें पाहून घेतलें! इतकें झालें तरी, **जेन ग्रे**चा धीर ह्मणून सुटला नाहीं! केवढें आश्चर्य हें!

राणी **मेरी** ही **रोमनक्याथालिक** धर्मानें जखडलेली होती; आणि

त्याचा तिला विलक्षण अभिमान होता. **जेन ग्रे** ही **प्राटेस्टंट** धर्माची असून तिला तो अगदीं जीव की प्यार होता. **मेरी** राणीच्या मनांतून **जेन ग्रे**ला जीवदान द्यावें येवढेंच नव्हे, तर निखालस मुक्त करावें असें सुद्धां होतें. पण तिची एक अट होती कीं, **ग्रेनें प्रॉटेस्टंट** धर्म सोडून **रोमनक्याथालिक** धर्मांत यावें. ह्यासाठीं तिनें हीं सर्व आश्वासनें देऊन एक दोन धर्माध्यक्षांना तिची समजूत घालण्यासाठीं **लेडी जेन ग्रे**कडे पाठविलें. परंतु सत्यनिष्ठ; दृढनिश्चयी; अशीं जीं थोर अंतःकरणाचीं माणसें असतात, तीं अशा थापांस भुलून भलतेंच कर्म करण्याला कधींही प्रवृत्त होत नाहींत. सत्यापुढें त्यांना आपला जीव केवळ तृणप्राय वाटतो. एका संस्कृत कवीनें ह्मटलें आहे.

**वनेपि सिंहा मृगमांसभक्षिणो बुभुक्षिता नैव तृणे चरंति ।**
**एवं कुलीना व्यसनाभिभूता न नीचकर्माणि समाचरंति ॥ १ ॥**

"वनांतील सिंह कितीही क्षुधेनें व्याकुळ झाला तरी, गवत खावयाचा नाहीं; त्याप्रमाणें कुलीन असतात ते, केवढ्याही संकटांत पडले तरी नीच कर्माला प्रवृत्त व्हावयाचे नाहींत." अशीच स्थिति **लेडी जेन ग्रे**ची होती. 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः' हें तत्त्व तिच्या अगदीं हाडीं खेळलेलें होतें. तेव्हां ती असल्या भटजीबावांना मीठ घालणार थोडीच! तिनें त्या धर्माध्यक्षांबरोबर स्वधर्मासंबंधानें पुष्कळ वादविवाद करून आपल्या गहन विद्वत्तेनें चांगलीच षोडशोपचार पूजा केली. आणि अखेर वाटाण्याच्या अक्षता कपाळास लावून त्यांची बोळवण केली. तेव्हां त्यांनीं हिरमुसल्या तोंडानें जाऊन राणीपुढेंही तसाच नन्नाचा पाढा वाचला. प्राण गेला तरी बेहत्तर, परंतु धर्मभ्रष्ट होणार नाहीं, असा जेव्हां **लेडी जेन ग्रे**चा दृढनिश्चय बाहेर पडला, तेव्हां अर्थात्च तिचा जीव वांचावयाला कांहीं मार्ग राहिला नाहीं, व त्याप्रमाणें तीही आपल्या नेहमींच्या शांतवृत्तीप्रमाणें शेवटच्या निरवानिरवीस लागली.

शिरच्छेदाच्या आधीं थोडा वेळ, तिनें आपल्या बापास एक पत्र लिहिलें. त्यांत असा उल्लेख आहेः—

"ज्याच्याकडून माझें आयुष्य थोडेंबहुत तरी वाढण्याचा संभव,

त्या ईश्वरालाच ज्या अर्थी तुमच्या मार्फत माझा मृत्यु लौकर आणण्याचें आवडलें, त्या अर्थी मी तो शांतपणानें पतकरतें. आणि दीर्घायू होऊन माझ्यासारख्या अल्लड पोरीच्या हातांत सारें जग राहण्यापेक्षां, परमेश्वरानें माझें आयुष्य कमी केलें, ह्याबद्दल अंतःकरणपूर्वक त्याचे आभार मानतें."

अशा प्रसंगीं सुद्धां **मेरी** राणीचा आणि तिचा पत्रव्यवहार चालू होताच. तिच्या एका पत्रांत, आपल्या विरुद्ध शिक्षा झाली होती तरी झालेला न्याय तिनें मान्य केलाच. पण एवढें लिहिलें:—

"तथापि माझी बालंबाल खात्री आहे कीं, परमेश्वरापाशीं, मीं ज्या स्थितींत राज्यपदाचा उपभोग घेतला, तो अपराध अतिशय क्षुल्लक आहे. कारण, मला बलात्कारानें दिलेल्या मानमरातबांचा संस्कार देहालाच काय घडलेला असेल तेवढा; बिचाऱ्या अंतःकरणाला त्याचा विटाळही झालेला नाहीं."

ह्याशिवाय, तिनें आपल्या इष्ट आप्तांसही अनेक पत्रें लिहिलीं. त्यांत तिनें आपल्या बहिणीलाही एक पत्र **ग्रीक** भाषेंत लिहून त्यांत 'झालेल्या इन्साफाबद्दल धैर्य सोडूं नको; खेद करूं नको; दुःखानें विव्हळ होऊं नको,' इत्यादि उपदेश केला होता. **लाटिन** भाषेंत तिनें चार पत्रें लिहिलीं, तीं शिरच्छेदाच्या आदल्या रात्रीचीं आहेत. त्यांत **ग्रीक**च्या रिवाजाप्रमाणें मृत्युलेख लिहिलेला आहे.

तिला एक वेळ शेवटची भेट देण्याविषयीं तिच्या प्रियपतीनें विनंति केली होती. पण तिनें त्याला परत निरोप असा पाठविला कीं, "हें थोडेंसें वियोगजन्य दुःख धीरानें सहन करावें. कारण कीं, जेथें दुर्दैव आड यावयाचें नाहीं; निराशा पुढें उभी रहावयाची नाहीं; मृत्यूची केंसास सुद्धां धक्का लावण्याची मगदूर नाहीं; अशा स्थळीं आपण आतां लौकरच भेटूं आणि मग खुशाल एकत्र राहूं."

ती किल्ल्यावरच्या खिडकींत उभी होती. इतक्यांत तिचा प्रियपति शिरच्छेदास जात असलेला तिच्या दृष्टीस पडला. त्यास तिनें मनांतल्या मनांतच वंदन केलें, आणि हातरुमालानें "तुम्ही चला पुढें, मीही आलेंच !" अशा अर्थाची खूण केली आणि 'अहो **गिल्फर्ड** ! अहो **गिल्फर्ड** !' येवढेच शब्द तोंडांतल्या तोंडांत म्हणाली. ह्या

गोष्टीस सुमारें एक तास लोटल्यानंतर तीही वधस्थानाकडे निघाली. तों वाटेंत पतीचें प्रेत घेऊन येत असलेली गाडी तिच्या दृष्टीस पडली. तेव्हां मात्र तिच्या डोळ्यांतून खळकर अश्रु आले! तरी ते लगेच तिनें धैर्यानें व नित्याभ्यासानें सुकवून टाकले.

**सर जॉन गेज्** ह्मणून तेथील किल्लेदार होता. त्यानें तीस 'आपली कांहीं तरी मजजवळ आठवण असावी' ह्मणून प्रार्थना केली. तेव्हां त्यास तिनें, तिच्याजवळ नेहेमीं असणारी तिची लिहिण्याची फळी दिली. तिच्यावर तेथल्या तेथेंच **ग्रीक, ल्याटिन** व **इंग्रजी** ह्या तीन भाषेंत आपल्या पतीचें प्रेत दृष्टीस पडलेल्या अर्थाच्या दिग्दर्शनाचीं तीन वाक्यें लिहिलीं, त्यांचें तात्पर्य—"ज्याला मनुष्यांच्या कायद्यांनीं दोषी ठरविलें, त्याचें संरक्षण करण्याला परमेश्वराची दया समर्थ आहे."

वधस्थानीं पोंचल्यावर आपणास झालेल्या कडक शिक्षेबद्दल तिनें आपल्या तोंडांतून एक चकार शब्दही काढिला नाहीं. तर 'जाणून बुजून कोणताच अपराध मजकडून घडला नसल्यामुळें मी निरपराधी आहें' एवढाच शेरा मारून मुकाट्यानें वारंटावर तिनें सही केली.

तोंडानें इतकें मात्र ह्मणाली कीं, "माझा अपराध महत्वाकांक्षेनें कांहीं झालेला नाहीं. तर ज्यांनीं आपणावर पूज्यबुद्धि ठेवण्याबद्दल, व आपली आज्ञा पाळण्याबद्दल मला संवय लावून दिली होती, त्यांचा अत्याग्रह मोडण्याइतकें धैर्य माझ्या आंगीं नव्हतें ह्मणून घडला. ही गोष्ट परमेश्वर स्मरून खरी आहे." इतकें ह्मणून तिनें स्तोत्रपाठ ह्मणण्यास सुरुवात केली.

तिच्या गळयावरचा पदर काढण्याचें धारिष्ट, तिच्या दासींच्यानें कांहीं होईना. त्यांचे हात थरथर थरथर कापूं लागले. ह्मणून तिनें आपणहूनच तो दूर केला! शिरच्छेद करण्याच्या कामांत खाटकावरही तान करणारा मांग, आपली कुऱ्हाड पाजळून जवळच उभा राहिलेला होता. **लेडी जेन** ग्रेची कांति, तिची कोमलता व साधुस्वभाव पाहून त्या पाषाणहृदयी मांगाच्या हृदयासही पाझर फुटल्यावांचून राहिला नाहीं. त्याचाही गळा भरून आला. त्यानें तिच्यापुढें गुडघे टेंकून अति नम्रपणानें क्षमा मागितली. ती तिनें मोठ्या

उल्हासवृत्तीनें दिली. आणि ह्मणाली, "बाबा! तुझ्यापाशीं माझें एक मात्र मागणें आहे, तें एवढेंच कीं, 'एक घाव दोन तुकडे' कर."

नंतर तिनें आपल्या हातरुमालानें डोळे बांधले, आणि जवळच्या एकाला 'कृपा करून मला वधस्थानीं नेऊन पोंचवा' ह्मणाली. त्यानें तिला तेथें नेल्यावर तिनें त्या फळीवर आपलें मस्तक आडवें ठेविलें. आणि मोठ्यानें दीन स्वर काढून ह्मणाली, "जगदीश्वरा! माझा आत्मा मीं तुला अर्पण केला आहे!!!" झालें. डोळयाचें पातें लवतें न लवतें तों कुऱ्हाडीचा घाव पडला. आणि सारा कारभार आटपून सामसूम झालें! जमलेल्या यच्चयावत् मंडळीच्या तोंडावर प्रेतकळा दिसूं लागली, व जो तो, हळहळत, अश्रु ढाळीत, व डोळे पुसीत आपआपल्या स्थानीं निघून गेला, आणि इतिहासांतील हृदयद्रावक गोष्टींमध्यें लेडी जेन ग्रेची गोष्ट प्रधानत्वेंकरून चिरंजीव झाली.

---

# साखरेचीं बाहुलीं.

## श्लोक.

ये बाळा! चिमण्या असा जवळ तूं, ये बैस येथें जरा
खाऊ घे बहु गोड चाखुनि पहा, हा लागतो कां बरा।
प्रेमें ठेव जपून फार नियमें, घालून पाहे मुखीं
ह्याची आवड लागली तर तुला, देईन मी आणखी ॥ १ ॥
चित्रें साखर घालुनी बनविलीं, ये ये दुकानीं पहा
बाळा हीं दिसतात सुंदर किती, आनंददायी अहा।
हा हत्ती, रमणीय झाड बघ हें, हा मोर हीं बाहुलीं
मल्लांची, दिसते किती तरी पहा, झोंबी मजेची भली ॥ २ ॥
उचलुनि जवळी घे, चित्र एकेक हातीं
वरिवरि निरखोनी, आवडीनें पहा तीं।
तुजसि सकल चित्रें, वाटती रम्य कां हीं?
हळु हळु तरि नांवें, सांगतों ऐक कांहीं ॥ ३ ॥

**विद्या** हें झाड मोठें सरळ विलसतें, आपुल्या वैभवानें
शाखा ह्या उंच गेल्या, कितितरि भरलीं, त्यावरी रुंद पानें ।
छाया खाशी रमाया, ह्मणुनिच बसतो, येथ **आनंद** मोर
नाचे थैथै करोनी, बहर उसळतो, थोर दृष्टी समोर ॥ ४ ॥

मोठीं गोड फळें, मनोहर फुलें, आहेत वृक्षावरी
हौसेनें बघ वाटतात सगळीं, तोडून घ्यावीं खरीं ।
लागे साधनही परंतु वरतीं, जायास कांहीं बुडीं
केली येथ उभी पहा ह्मणुनि ही, **अभ्यास** त्याला शिडी ॥५॥

झरझर चढतांना पायरीही चुकेल
सहज पडुनि खालीं इष्ट हेतू मुकेल ।
ह्मणुनि **नियम** दोरी बांधिली हो वरोनी
जपुनि जपुनि जावें तीस हातीं धरोनी ॥ ६ ॥

**कीर्तीचे** वर बाहुटे फडकती, दाही दिशांला भले
वाटे शुभ्र झळाळती ह्मणुनियां, वृक्षावरी शोभले ।
यत्नानें चढती, अनेक पडती, दुःखें किती साहती
चित्रें कैक झटून झोंबुनि परि, ते घ्यावया पाहती ॥ ७ ॥

धारा या दिसती किती, तरुतळीं, एकेक ती पांढरी
कारंजीं उडतात, गुप्त मधुनी, वाटे **सुखाचीं** खरीं ।
खालीं कुंभ तुडुंब कैक भरले, आश्चर्य कैसें तरी
वाहे वृक्षफलांतुनी सतत ही, **ज्ञानामृताची** झरी ॥ ८ ॥

दिसे 'राजरस्ता' पुढें जावयाला
असे नांव **सन्मार्ग** मोठें तयाला ।
खरा हाच कीं, मार्ग जाया सुखाचा
भयाच्या मुळीं येथ नाहींत खांचा ॥ ९ ॥

कोणी चुकोनि जरि जाइल आड रानीं
त्रासेल हिंसक अनेक जनावरांनीं ।

दावावया सुखद सुस्थल मार्ग चार
हा सिद्ध सेवक सदा, **सदसद्विचार** ॥ १० ॥
किति तरि बघ खालीं, बाहुलीं साउलीला ।
बसुनि हंसुनि, त्यांची चालली काय लीला ।
सरलतर गुणांचीं, देखणीं तीं सुशील
बघुनि बहु मजेचीं, तूं सुखें डोलशील ॥ ११ ॥
मधें बाई आई सम दिसतसे, भव्य बसली
छटा आनंदाची, वदनिं खुलते, रम्य कसली ।
जिचें, वाटे चंद्रासम, चमकतें तेज वरलें
अहाहा ! प्रेमाचे बहुलतर बिंदू डवरले ॥ १२ ॥

हिला **शांती** कांती, सुखद बघुनी सर्व ह्मणती
गुणांची, तोंडानें, करितिल, हिच्या, कोण गणती ।
स्वभावें ही साधी सदय सरळी शांत, दुसरी
न पावे कोणीही, असुनि कितिही सुंदर, सरी ॥ १३ ॥

तिला बाळा साजे लखलख गळां जें वळख तें
सुवर्णाची कंठीं, सुरुचिर सरी ती झळकते ।
**क्षमा** ऐसें देती, सकल जगतीं, नांव तिजशी
जपे शांती तीतें, जपति मनुजें, जीवित जशीं ॥ १४ ॥

**शांती**च्या जवळी सुरेख चिमणीं, तीं जीं मुलें गोजिरीं
हर्षें खेळति खेळ सुंदर भले, लीलेंत नानापरी ।
ज्यांचे गोंडस हात पाय मृदु जे, पद्मापरी कांतिला
**चित्तस्वास्थ्य, परोपकार, करुणा,** हीं तीन बाळें तिला ॥ १५ ॥
पाहे ती **करुणा,** सुरम्यवदना, शोभे कशी भूषणें
आईची प्रतिमा सुरेख दुसरी, कांहीं न कोठें उणें ।
पाठीं राहुनियां उभी निरखिते, कीं कोण दुःखी दुरी
ढाळी अश्रु करोनि कींव बहुधा, तद्दुःख यत्नें हरी ॥ १६ ॥

**चित्तस्वास्थ्य** लहान बाळ किति तें, संतोषदायी मुख
आहे आसन तेंच सुंदर ह्मणे, तें त्यांत मानी सुख ।
आनंदें, हसुनी सदा जननिच्या मांडीवरी बैसलें
'आई मीच तुजा गळे बघ बलें,' बोले न केव्हां हले ॥ १७ ॥
कैसा सान कुमार हा लुटलुटां, रांगे पहा अंगणीं
शोभे पिंपळपान **दान** शिरसीं, स्वर्णी खचोनी मणी ।
केला हांसत उंच हात बघ हा, दीना अनाथा त्वरें
द्याया, साह्य, **परोपकार** धरि तो, तें बाळलेणें, करें ॥ १८ ॥
ही, जी, गाय गरीब **नीति** ह्मणती, शांत स्वभावें खरी
शांती तों कुरवाळिते कर हिच्या, टाकोनि आंगावरी ।
चाटी वत्स लहान एक जवळी, शांतीस जें गोजिरें
मौजेचें विलसे **सदाचरण** हें, प्रख्यात नामें बरें ॥ १९ ॥
दासी जोडुनि हात एक दिसते, सर्वांपुढें राहिली
आज्ञा, सोडुनि राग, घेत शिरसीं, ती शुद्धचित्तें भली ।
सांगो दुर्धर कोण कामहि कसें, ती सिद्ध ऐशी दिसे
**आज्ञाधारकता** तिला सकलही, हें नांव देती असें ॥ २० ॥
बाळा रम्य सुवर्णपात्र बघ हें, आहे तुझ्या जें पुढें
त्याचा घांट किती मनोरम पहा, सर्वांस हें आवडे ।
बा एकत्र जमोनि दुष्ट सुमती, यानें सुधा प्राशिती
नामें **प्रेम** ह्मणोनि सर्व जगतीं, लोकें तया बोलती ॥ २१ ॥
छाती काढुनि भव्य जो तुजपुढें, काचा कसोनी अहा
हातीं सज्ज धनुष्यबाण धरुनी, ठाके उभा वीर हा ।
हा तों, रक्षक **धैर्य**राज ह्मणती, ह्यालाच पृथ्वीवर
झुंजाया निधडा अनेक रिपुंशीं, शौर्यें सदा तत्पर ॥ २२ ॥
पार्थाला समरीं सुशोभित करी, गांडीव त्याचें जसें
ह्यालाही सजवी धनुष्य बरवें, **नम्रत्व** नामें तसें ।

राहे कांब सदा सुरेख लवली, आधींच त्याची किती
रे शोभेल कशी खरोखर तरी, होतां टणत्कार ती ॥ २३ ॥

असे रोंख ज्याचा सदा नीट एक
कुशाग्रें क़सा युक्त तो बाण देख ।
तयाला असे नांव बा **सत्य**बाण
घडेना इजा कीं भल्यालागिं जाण ॥ २४ ॥

अशीं आयुधें घेउनी वीर सिद्ध
कराया उभा संकटालागिं युद्ध ।
करी नित्य सांभाळ सर्वांजणांचा
किती वीर खंबीर बा हा मनाचा ॥ २५ ॥

हा मोठा गज यास **गर्व** ह्मणती, हा फार उच्छृंखळ
बांधोनी दृढ ठेविली ह्मणुनियां, **सद्बुद्धि**ची सांखळ ।
शुंडादंड कसा प्रचंड फिरवी, उन्मत्त कैसा दिसे
मी मी सुंदर दांडगा सकळिकीं, ह्याला असे हें पिसें ॥ २६ ॥

ह्याचें बंधन सोडितां क्षणभरीं, राहे न ठाणावरी
झाडें मोडुनि झोडुनी सकळिकां, हा फार मस्ती करी ।
युक्तीनें चढुनी तयावर करी, **सद्बोध** हा अंकुश
घेवोनी गजगंड टोंचुनि झणीं त्याला करावा वश ॥ २७ ॥

दोघे झुंजति मल्ल हे बघ तरी, आहेत जे शेवटीं
हातें ठोकुनि दंड हे कवळिती, घालोनि कंठीं मिठी ।
नेटानें हटवूं भिडूस ह्मणती, रेटोनि जेठीं मनीं
कीर्तीनें नटवूं, स्वदेह पटवूं, साक्षी बळाची जनीं ॥ २८ ॥

आहे मत्त गजापरी जड बहू, जो धुंद ऐसा दिसे
दृष्टी अंध, असोनि नेत्र बरवे, देखे न कांहीं कसें ।
ज्ञानें जो मतिमंद काळ दवडी, झोंपेंत जो वाउगा
नामें **आळस** पीडितो बहुजणां, तो फार बा दांडगा ॥ २९ ॥

आतां तो दुसरा पहा चपळ जो, मुद्रा गमे पाहतां
अश्रांत श्रम घे प्रसन्न करण्या, तो सद्यशोदेवता ।
उत्साहें मतिनें अनेक लढवी, युक्ति प्रयुक्ती गमे
त्याचें पाहुनि युद्धलाघव कसें, त्वच्चित्त तेथें रमे ॥ ३० ॥

एकाकी चुकतां करी फिरुनियां, जो डाव पाडावया
तो पाडूनि भिडूस आज गमतो, निःसंशयें घे जया ।
हा **उद्योग** तयास साह्य करणें, हें योग्य सर्वांजनां
काढूं आळस तो समूळ खणुनी, व्हावी अशी वासना ॥ ३१ ॥

खुले दिव्य जें वस्त्र सर्वांस आतां
असे **स्वच्छता** शुभ्रवर्णी पहातां
तयांच्या दिसे, दोन नेत्रांत पाणी
खरी **दक्षता, धूर्तता,** हेंच मानी ॥ ३२ ॥

यथाबुद्धि हीं यापरी अल्पचित्रें
करोनी मुला! दाविलीं मीं विचित्रें ।
खरें सार तें खोल काढोनि जाण
धरी सर्व कार्यांत बाळा! प्रमाण ॥ ३३ ॥

**जगा**चा असे भव्य बाजार बाळा!
भल्या **साधुवाणी,** तिथें पाकशाळा।
जिथें यापरी चित्रभांडार कोटी
दुकानें अशीं **संतपेठें**त मोठीं ॥ ३४ ॥

सुखें होउनी **पोत** हा हालवाई
करी साखरेचीच मेवामिठाई ।
कधीं रम्य चित्रें खवा गोड केव्हां
मिळे ह्या दुकानीं हवा त्यास तेव्हां ॥ ३५ ॥

**गोडी**ची पडली असेल कमती, चित्रांत या साखर
कौशल्यांत उणें असेल पडलें, कीं अल्पधीचा कर ।

हाताची कटुता मिळेल भय हें, मेवेकरी ओंगळ
घ्यावें मान्य करोनि तेंहि सकलीं, सारा धुवोनी मळ ॥ ३९ ॥

# लोकोत्तर चमत्कार.

## सुरवंटांवर फिर्याद !

'सुरवंटांवर फिर्याद' हें सदर पाहून आमचे वाचक प्रथमतः ही कांहीं तरी एक 'पंचोक्ती'सारखी थट्टा असेल अशी कल्पना करतील. किंवा कोणी 'केरळकोकिळ हा गप्पा मारणार मोठा वस्ताद आहे,' असेंही ह्मणण्यास चुकणार नाहींत. परंतु सुरवंटांसारख्या किड्यांवर प्राचीन काळीं कित्येक राष्ट्रांमध्यें न्यायासनांसमोर फिर्यादी होऊन त्यांचे फैसले होत होते, ही गोष्ट सरकारी कागदपत्रांवरून सिद्ध होते. आणि ह्या गोष्टी सुद्धां युगांतरींच्या नव्हेत, तर गेल्या शतकाच्या अखेरपर्यंत त्या अमलांत होत्या. हें खालच्या विलक्षण खटल्यांवरून प्रत्ययास येईल.

**'चीनदेशाचें वर्णन**—किंवा इतिहास' आमच्या वाचकांस आह्मीं सादर करतांना त्या देशांतील सांप्रतचा न्यायाचा प्रकार सांगितलाच आहे. एखाद्या गांवांत सांत आली, तर ती अमक्या अमक्या देवांनीं आणली ह्मणून ठराव करणें, त्यांच्यावर वारंटें काढणें, त्यांच्या देवालयांची जप्ती करणें, त्यांस बेड्या ठोकणें, न्याय कोण करतो तें दृष्टीस पडूं नये ह्मणून मूर्तीस पिंजऱ्यांत आणून उभी करण्यापूर्वीं तिचे डोळे काढणें, व शेवटीं त्यांस नेऊन पाण्यांत बुडविण्याचा ठराव करणें इत्यादि गोष्टी त्या देशांत राजरोस चालतात. तेव्हां सुरवंटांवर फिर्यादी व्हाव्यात ह्यांत विशेष आश्चर्य मानावयास नको. त्याची हकीगत अशी आहे:—

**मारियन** शहरानजीक, **सेव्हाय**मध्यें **सेंट ज्युलीयन** नांवाच्या गांवांत द्राक्षांचे मोठमोठाले मळे होते. आणि **मारियन** शहरचा **बिशप** नांवाचा जो धर्माध्यक्ष तोही तेथेंच राहत असे. आणि त्याच्या देवस्थानासंबंधीही कांहीं बागा असत. इ. स. १५४५ मध्यें ह्या बागांमध्यें अतिशय सुरवंट उत्पन्न झाले, आणि त्यांनीं त्या द्राक्षांच्या वे-

लांचा अगदीं फडशा पाडला. पण त्यांत एक चमत्कार हा कीं, त्या बागांत कितीएक देवस्थानांच्या व कांहीं वकिलांच्या बागा होत्या त्यांत मात्र हे प्राणी मुळींच शिरले नाहींत. ह्यांची सारी धाड काय ती ग्रामस्थांच्या बागांवर.

तेव्हां गांवच्या लोकांनीं कट करून सुरवंटांनीं केलेलें नुकसान भरून द्यावें ह्मणून गांवच्या पंचांपुढें सुरवंटांवरच फिर्याद लावली. परंतु तींत कांहीं निष्पन्न झालें नाहीं. ह्मणून त्यांनीं **'मारियन'**च्या जज्जकोर्टांत अस्सल दावा आणला. गांवचे मळेकरी हे वादी; आणि प्रतिवादी कोण? तर लक्षावधि सुरवंट! अशी विलक्षण फिर्याद कोर्टांत दाखल होतांच, ज्यांच्या उत्पन्नास त्या प्राण्यांनीं धका लावला नव्हता, असे दोन वकीलही प्रतिवादींच्या तर्फेनें हजर झाले. हे वकील मोठे कायदेपंडित असून उत्तम वक्ते होते. ही फिर्याद दाखल होतांच जज्जानें एक नोटीस लिहिली, आणि वकिलांच्या मार्फत प्रतिवादींस कळविलें कीं, तुह्मी आपआपसांत तोड जोड कराल तर बरें होईल. परंतु दुसरे दिवशीं प्रतिवादींच्या वकिलांनीं येऊन कळविलें कीं, आमचें कूळ आपसांत तोडण्यास खुषी नाहीं! तेव्हां वादीचें खरोखर नुकसान किती झालें, ह्याचा अंदाज करण्याकरितां कोर्टानें एक कमिशन नेमून त्यास पाहणी करून नक्की किती नुकसान झालें ह्याचा रिपोर्ट करण्याविषयीं फर्मावलें. त्याप्रमाणें रिपोर्टही येऊन दाखल झाला; तेव्हां तो रिपोर्ट बरोबर आहे किंवा नाहीं, ह्याबद्दल वादीप्रतिवादींच्या वकिलांत बोलाचाली सुरू झाली. तेव्हां जज्जानें आपलें मत असें दिलें कीं, सुरवंटांच्या विरुद्ध डिक्री करण्यामध्यें इतकी घाई करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण, प्रतिवादींच्या कांहींतरी पातकास शासन व्हावें ह्मणूनच परमेश्वरानें त्यांस पाठविलें असावें. परंतु तें कोणाच्या मनास आलें नाहीं. तें भिजत घोंगडें तसेंच पडलें. शेवटीं ह्या इ. स. १९४५ मध्यें सुरू झालेल्या खटल्याचा इ. स १९४६ च्या मे महिन्यामध्यें एकदाचा निकाल झाला. जज्जाचा ठराव येणेंप्रमाणें होता "दावा लावण्यासारखी ही फिर्याद दिसत नाहीं. सुरवंटांना इतके दिवस विनाकारण कोर्टांत रखडावें लागलें. ह्याकरितां प्रतिवादीचा झालेला सारा खर्च वादींनीं द्यावा, व पुन्हां अशा भानगडींत पडूं नये." ह्या ठरावा-

प्रमाणें सुरवंटांच्या वकिलांनीं आपले फीचे वगैरे सर्व पैसे वसूल करून जिकडच्या तिकडे झाले. आणि सुरवंटही हळू हळू नाहींसे झाले.

इ० स० १५८७ मध्यें पुन्हां सुरवंटांची फौज आली. आणि पूर्वीप्रमाणेंच द्राक्षांच्या मळयांचा सप्पा उडविला. शेतकऱ्यांनीं पुन्हां जज्जकोर्टांत दावा आणिला. तेव्हां जज्जानें, वादींनीं प्रतिवादींची, ह्मणजे सुरवंटांची विनाकारण पुन्हां आगळीक केली असें ठरविलें. वादींनीं अशी विनंति केली कीं, "सरकार जर सर्व प्रतिवादींस हांकून लावील, व पुन्हां ते आमचें नांव न काढतील अशी तजवीज करील, तर त्यांस आह्मी निराळी जमीन देऊन तेथें त्यांस खाण्याच्या सामुग्रीची वगैरे सर्व तजवीज करून देऊं." परंतु तें कांहींएक मनास न आणतां जज्जांनीं त्या झालेल्या आगळिकीबद्दल वादींना दंड ठरविला तो असा. "वादींनीं प्रतिवादींस विनाकारण त्रास दिल्याबद्दल आपल्या उत्पन्नापैकीं दहावा हिस्सा द्यावा; कोर्टांत झालेला सर्व खर्च भरून द्यावा व झालेल्या पातकाच्या निरसनार्थ साऱ्या सुरवंटांस पूर्वापार चालीप्रमाणें तीन प्रदक्षिणा घालाव्यात."

त्याप्रमाणें सर्व झालें. दशांश उत्पन्नाचा हवाला पटविला; कोर्ट-खर्चाची रक्कम भरली; व प्रदक्षिणेचें प्रायश्चित्तही घेतलें. परंतु तेवढ्यानेंच कांहीं संपलें नाहीं. प्रतिवादींची—अर्थात् सुरवंटांच्या तर्फेची—जी वकिलांची जोडी होती, त्यांतील एक **रेमबाड** ह्मणून होता. तो मोठा हुशार व तरतरीत दिसे. तो एवढ्यासही मान्य होईना. त्यानें आणखी चमत्कारिकच तक्रार काढिली. तो ह्मणाला "जगांतील सर्व प्राणिमात्रांमध्यें अत्यंत सुशील जें माझें कूळ सुरवंट त्याच्या तर्फेनें आपल्यासच नव्हे—तर सामान्य प्रतीच्या—मनुष्यास सुद्धां हें दिसून येईल कीं, पशू—पक्षी—सुरवंटांसारखे कृमिकीटक, ह्यांस कांहीं प्रत्यक्ष रीतीनें कोर्टापुढें हजर होतां येत नाहीं. तरी धर्मपुस्तकाच्या आधारावरून एवढें सिद्ध होतें कीं,—वनस्पति—अर्थात् द्राक्षीचे वेल, हें जसें मनुष्याचें भक्ष्य आहे, त्याचप्रमाणें इतर पशुपक्ष्यांचें—कृमिकी-टकांचेंही—भक्ष्य आहे. ह्याकरितां प्रतिवादींनीं वादींच्या मळयांतील द्राक्षींचे वेल खाल्ले ते कायदेशीर रीतीनें व न्यायाच्या हक्कानेंच खाल्लेले आहेत. ह्यास्तव प्रतिवादींकडे कोणताही अपराध नसल्यामुळें, हा

खटला काढून टाकण्याविषयीं माझी विनंति आहे. एवढेंच नव्हे, तर वादींनीं प्रतिवादींची विनाकारण आगळिक केल्याबद्दल, त्यांनीं त्यांस मोल्यवान् जडजवाहीर नजरनजराणा देऊन त्यांचा सत्कार केला पाहिजे."

ह्यावर कोर्टानें 'तुमचें ह्मणणें काय आहे?' ह्मणून वादींस विचारिलें. तेव्हां त्याचा जबाब देण्याकरितां कोर्टापासून वादींनीं एक महिन्याची मुदत मागून घेतली; व तेवढ्यांत असें सिद्ध केलें कीं, किडे हे मनुष्यांच्या उपयोगाकरितांच ईश्वरानें निर्माण केले आहेत. ह्याकरितां त्यांनींही आह्मांपासून विशेष जबर करभार घेऊं नये. व त्याकरितां त्यांनीं आपआपसांतच तोंड केली. सार्‍या शेतकर्‍यांनीं मिळून एक पडित जमिनीचा तुकडा सुरवंटांच्या नांवानें सोडिला; व त्यांत त्यांनीं—ह्मणजे सुरवंटांनीं—मर्जी वाटेल तर जाऊन रहावें ह्मणून ठराव केला!

इ० स० १५८७ तील डिसेंबर महिन्याच्या २० व्या तारखेस ह्या खटल्याच्या खर्चाबद्दल १९ **फ्लोरिन्स** शेतकर्‍यांस भरावे लागले. कारण, सुरवंटांकडे कांहींच इस्टेट नव्हती! ह्या कालीं कायदा फार स्वस्त होता; आणि शेतकरी लोकही सुखी होते, ह्मणून अशा मौजा चालत. ह्या किड्यांवरच्या फिर्यादींस अकराव्या शतकापासून प्रारंभ झाला. आणि इ० स० १७३१ मध्यें—ह्मणजे गेल्या शतकांतच—ह्या संबंधाचा शेवटला खटला होऊन हा खुळयांचा बाजार उलगडला!! **डाउन** शहरामध्यें ह्या पशुपक्ष्यांच्या व कृमिकीटकांच्या फिर्यादीचा निकाल करण्यासाठीं एक कौन्सिलच नेमलेलें होतें. तें अर्जदाराची जमीन पाही; नुकसानीचा अंदाज करी; व आपला अभिप्राय जज्जास कळवी. **पोप** महाराज कधीं कधीं ह्या किड्यांस पिटाळून लावण्याचा हुकूम फर्मावीत, किंवा कधीं कधीं कांहीं ठरींव दरानें नुकसानीही भरून देत.

# पुस्तकपरीक्षा.

## पंचवटीस्थलनिर्णय.

मागील अंकावरून पुढें चालू.

पण तेंच श्रीमंतांकडे वळा ह्मणजे सरलता, निरभिमानपणा, आणि सत्याची जिज्ञासा हे गुण कसे मूर्तिमंत पुढें उभे राहतात.

"तथापि स्वमताचा दुराग्रह न धरितां तत्त्वबुभुत्सूनें, त्यांतून चांगल्या गृहस्थांशीं शंकासमाधानस्वरूपानें वाद केला असतां वरील नियमाचें उल्लंघन केल्याचा दोष येईल असें वाटत नाहीं."

"आह्मी तर तसें ह्मणणाऱ्यांच्या मतास अशोधकांचें मत ह्मटलें आहे. ते प्राचीन असोत किंवा अर्वाचीन असोत. 'पुराणमित्येव न साधु सर्वं' इत्यादि वाक्यें माहित असूनही भलतेंच विधान आह्मीं केलें तर मोठाच प्रमाद होईल. आतां येवढेंच सांगतों कीं, जुन्या किंवा नव्या अशा कोणत्याही वर्गास अनुलक्षून आह्मीं लिहिलें नाहीं."

तसेंच 'भूगोलाचा विशेषसा परिचय नसल्यामुळें' हें वाक्य धडधडीत वरच असतां श्रीमंत ह्मणतातः—

"आह्मी खरोखर सांगतों कीं, तसा एकही शब्द आह्मांस आढळला नाहीं. मग माफी करावयाची कसली? आह्मीही तसेंच सुचवितों कीं, ओकांनीं आह्मांसही क्षमा केलीच पाहिजे."

इत्यादि वाक्यांवरून श्रीमंतांची सरलता, निरभिमानपणा, व सत्यजिज्ञासा कशी आहे हें वाचकांस सहज दिसून येईल व तेही त्यांचा धन्यवाद गाइल्यावांचून राहणार नाहींत. शिवाय, नकाशासंबंधानें झालेली एक चूक बिनतक्रार आपणहूनच त्यांनीं पदरांत घेतली आहे. तशीच ओकांची झालेली त्यांच्या पदरांत टाकली आहे. ह्यावरून सदरहू वाग्युद्धांत धर्मन्यायानें व अविकृत अंतःकरणानें युद्ध केलें असें श्रीमंत बापूसाहेबांनींच. तेव्हां 'यतो धर्मस्ततो जयः' ह्या न्यायानें विजयश्रीनें त्यांसच माळ घातली ह्यांत नवल नाहीं. ओक ह्यांस अशा प्रकारें सत्यासत्यनिर्णयाचे वाद आपल्या देशांत सुरू व्हावेत, अशी दृढतर इच्छा होती, व त्यांनीं निबंधमालेपासून कित्ता घालून दिला होता. त्याची चीज श्रीमंतांनीं करून दाखविली. 'रामायणाची उत्पत्ति कधीं?' 'भारताचा

काल कोणता?' हे वाद विलायतेंतील लोक नेहेमीं मोठ्या कडाक्यानें करित असतात. अशा वादकर्त्यांस प्रसिद्ध मोक्षमुल्लर साहेबांनीं एकदां उत्तर दिलें होतें कीं "हे वाद तुह्मी हिंदुस्थानांतील जुन्या पंडितांशीं करा; ह्मणजे तुमचा पोकळपणा किती आहे तो तुह्मांस कळून येईल." त्याचीही श्रीमंतांनीं सार्थकता केली. हा श्रीमंतांचा विजयध्वज सदासार्वकाल फडकत राहील व त्यास रतिमात्र मागें सारणाराही कोणी मिळणार नाहीं. पण हें आह्मांस सांगण्यास व श्रीमंतांस ऐकण्यास आनंदोत्सुकता नाहीं हें उघडच आहे. कारण, आमचे उभयतांचेही सन्मान्य मित्र विद्वद्वर्य ओक हे हयात नाहींत! हें मनांत आलें ह्मणजे वारंवार दुःखानें व प्रेमानें गळा दाटून येतो, अश्रूंनीं डोळे भरून जातात! ह्यास्तव ह्या सुखदुःखमिश्रित पुराणाची नाडी येथेंच बांधून पोथी गुंडाळतों.

विस्तार फार झाला खरा, तरी एका गोष्टीचा उल्लेख केल्यावांचून आमच्यानें लेखण खालीं ठेववत नाहीं. ती गोष्ट ह्मणजे प्रस्तुत पुस्तक जें "**पंचवटीस्थलनिर्णय**" त्याच्या छपाईसंबंधाची. पुस्तकाची छपाई कांहीं इतकी नांवें ठेवण्यासारखी नाहीं. पण अशुद्धांसंबंधानें जी कांहीं दशा आहे ती विचारूं नये. विरामांना ठिकाण नाहीं; प्यारेग्राफांचा पत्ता नाहीं; हें तर काय पण 'र' च्या ठिकाणीं 'च'; 'ड' च्या ठिकाणीं 'प'; कोठें अधिकच अक्षरें, कोठें मुळींच नाहींत, असा जो सांवळा गोंधळ झाला आहे, त्यामुळें पुस्तक धडपणीं वाचतां सुद्धां येत नाहीं. श्रीमंतांनीं ट्यूटर साहेबांचे व खासगी कारभाऱ्यांचे आभार मानले आहेत, त्यांनीं एकवार सुद्धां बुकावर नजर टाकूं नये काय? ह्या दुर्लक्षामुळें ह्या सुंदर पुस्तकाचें अगदींच मातेरें होऊन गेलें आहे. ह्याचा श्रीमंत कांहीं तरी विचार करतील अशी आशा आहे. तरी सदरहू पुस्तक अतिशय महत्त्वाचें असल्यामुळें जिज्ञासु, रसिक, व शोधक लोकांनीं त्याचा अवश्य आदर करावा येवढी मनःपूर्वक सूचना करून, कलम खालीं ठेवतों.

---

# पत्रव्यवहार.

"रा. रा. **केरळकोकिळ**कर्ते यांसः— झांशी, एन्, डब्ल्यू, पी.

प्रियमहाराज, २२ अक्टोबर. ९८

मला मराठी लिहितां येत नाहीं. ह्यास्तव माझें ह्मणणें आपणास मला इंग्रजींतच कळविणें भाग आहे. आपले लेख मला फारच पसंत आहेत. आ-

पल्या 'केरळकोकिळ' मासिकपुस्तकांतील पु० १२ अंक ६ वा ह्यामध्यें प्रसिद्ध झालेली कविता पाहूनही मला फार संतोष झाला. ही कविता ह्मणजे 'जीवितौघ' ह्या सदराखालीं आलेली होय. आतां तिच्या संबंधानें आपणाकडून मला माहिती पाहिजे ती:—

| | | |
|---|---|---|
| वालतृणाच्या किती | ... ... ... ... ... | श्लोक–३ |
| महोग्र दृष्टीनें | ... ... ... ... ... | ,, २६ |
| सर्वत्र दृढ | ... ... ... ... ... | ,, १९ |
| होती सदृढ | ... ... ... ... ... | ,, ३३ |

वरच्या अक्षरांत ज्यांच्या मस्तकावर फुली घातली आहे, तीं अक्षरें आपण 'संयुक्तवर्ण' धरलीं आहेत, असें दिसतें. नाहीं तर तीं 'कोमल' होऊन मागील अक्षराला द्वित्व येणार नाहीं.

माझी तर आजपर्यंत अशी समजूत आहे कीं, दृ आणि तृ ह्या अक्षरांत एक स्वर आहे आणि एक व्यंजन आहे. ऋ हा त्यांतील स्वर होय. द्+ऋ मिळून दृ होतो, आणि त्+ऋ मिळून तृ होतो हें आपण जाणतच असाल. प्राचीन संस्कृत कवींचीं काव्यें जर आपण अवलोकन कराल, तर त्यांनींही तृ आणि दृ ह्या अक्षरांची गणना 'संयुक्तवर्णांत' केलेली नाहीं, हें दृष्टत्पोत्तीस येईल. आणि ह्याकरितां तीं ज्यांच्यापुढें येतील, तीं अक्षरें दीर्घवर्ण होणार नाहींत, व त्यांचा उच्चारही तसा करतां येणार नाहीं.

श्रीहर्ष कवीच्या 'नैषधचरितां' तून तृ आणि दृचीं कांहीं उदाहरणें मी खालीं दाखल करतों:—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कृततदन्तरगस्वदृढव्यथः | सर्ग | ४ | श्लोक | १९ |
| क सदृगस्तु वियोगनिमग्नया | ,, | ४ | ,, | २१ |
| प्रशमनाय विधाय तृणान्यसून् | ,, | ४ | ,, | २२ |
| ऋजुदृशः कथयन्ति पुराविदः | ,, | ४ | ,, | ६६ |
| रुचिफलं सखि दृश्यत एव तत् | ,, | ४ | ,, | १०६ |
| षड्तवः कृपया स्वकमेककम् | ,, | ४ | ,, | ९२ |
| बभार शास्त्राणि दृशं द्वयाधिकम् | ,, | ४ | ,, | ६ |

ह्यावरून आपणांस दिसून येईलच कीं, तृ आणि दृ हीं अक्षरें त् आणि ऋ (र् नव्हे) आणि द् आणि ऋ (र् नव्हे) मिळून झालेलीं आहेत. तेव्हां त्यांस 'संयुक्तवर्ण' असें मानतां येणार नाहीं हें उघड आहे. तेव्हां अर्थातच त्यां-

च्या योगानें मागील अक्षरास द्वित्व येणार नाहीं. कारण, ऋ हा स्वर आहे, व्यंजन नव्हे. वर दिलेल्या उदाहरणांतील 'षडृतवः' ह्यानें सर्वांचा स्पष्ट उलगडा होतो.

इतक्या उपरही माझ्या समजांत कांहीं चूक आहे असें वाटत असेल,–कारण न जाणों तसें असण्याचाही संभव आहे,–तर त्याबद्दल कृपा करून मला पत्रोत्तरीं कळवावें. तसें नसेल तर, काव्यनिर्णयार्थ आपल्या मासिक पुस्तकाच्या पुढील अंकांत आपण आपली चूक कबूल कराल अशी मी आशा करतों.

हिकडे हिंदीभाषेंत केरळकोकिळांत घडलेल्या दोषासारखे दोष चालतात. पण मराठी भाषा बरीच सुधारलेली असल्यानें असले दोष खपतील असें वाटत नाहीं. अशा संबंधांतील माझ्या लेखानें आपल्या मनास कांहीं लागणार नाहीं, अशी माझी आशा आहे." "आपला विश्वासास पात्र,

**महावीरप्रसाद द्विवेदी."**

ह्यावर **पोतक** ह्यांजकडून आलेलें उत्तर स्थलसंकोचास्तव पुढील अंकीं देऊं.

---

## सद्गुरूस प्रार्थना.

**पद**– ( चाल–रामकृष्ण नरहरे अथवा कांहो धरिली अढी ).

नाथ श्रीरघुनाथ, गुरुवर, नाथश्रीरघुनाथ ॥ हे करुणाकर दीनजनांवर काळ मारितो लाथ ॥ ध्रु० ॥ काय करावें तात, सांगा, काय करावें तात ॥ षड्रिपु गांजिति विषय पाजिती, न चले त्यांवर हात ॥ आयुष्याची वात, जळतसे, आयुष्याची वात ॥ तव सेवेचें तेलहि तिळभर नाहिं काय दीपांत ॥ २ ॥ विषयसुखेंही मनांत, घोळति, विषयसुखेंही मनांत ॥ हें मज नाहीं तें मज नाहीं मोठेपणही जनांत ॥ ३ ॥ वाटे जावें वनांत, सद्गुरु, वाटे जावें वनांत ॥ पळांत कामानळ पेटुनियां, मन जाई उपवनांत ॥ ४ ॥ अंतर पडतां सुखांत दुःखी, अंतर पडतां सुखांत ॥ कशास सेवन देव नको ह्या येइ असें चित्तांत ॥ ५ ॥ दुष्कर्में छळतात, मला हीं, दुष्कर्में छळतात ॥ संशय नाहीं यांत ह्मणुनियां, शरण तुला होतात ॥ ६ ॥ मन रमवी नामांत आपुल्या मन रमवी नामांत ॥ खेळपूजनीं वेळहि भजनीं कराच हें रघुनाथ ॥ ७ ॥ तळमळ तुजविण जगांत, सद्गुरु, तळमळ तुजविण जगांत ॥ हेंच मागणें देच मागतो दास असो तुज गात ॥ ८ ॥

त्रिमूर्ति.

---

Printed and published by Janardan Mahadeo Gurjar at Javaji Dadaji's "Nirnaya-sagara" Press, Bombay.

# केरळकोकिळ.

पु० १२ ] [अं० १


## सामोयिड लोक.



सर्व प्राण्यांमध्यें मनुष्यप्राणी हा ज्ञानानें श्रेष्ठ असें मानतात. तथापि देश, काल, संगति, संस्कार ह्यांच्या संबंधानें त्याच्यामध्यें सुद्धां जमीनअस्मानाचा फरक असतो. त्याचप्रमाणें त्याची रहाटी, त्याची आवड, त्याची समजूत इतकी कांहीं विचित्र असते कीं, त्याच्याच जातिबांधवांस त्याचें कौतुक व आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं. सांप्रतकाळीं सर्व पृथ्वीमध्यें अफाट व विस्तीर्ण राज्य असें रशियाचें

आहे. त्याची व्याप्ती एकाच खंडांत नाहीं. तर युरोप खंडांतील अर्धा अधिक भाग व शिवाय **एशिया** खंडांतीलही अर्धा अधिक भाग त्यानें व्यापलेला आहे. त्याचें उत्तर टोंक उत्तर ध्रुवाला व दक्षिण टोंक **हिमालया**च्या एका टोंकाला लागलें आहे ह्मटलें तरी चालेल. ह्यामुळें त्या राष्ट्राच्या एका टोंकाला दहा व चवदा तासांचे रात्रदिवस, आणि दुसऱ्या टोंकाला दोन चार महिन्यांचे रात्रदिवस हा चमत्कार दृष्टीस पडतो. तसेंच एका टोंकास रखरखित उन्हाळा व दुसऱ्या टोंकास इतकी थंडी कीं, समुद्राचें पाणी गोठून त्यावरून चालतां येतें, व घरें बांधावयाचीं तीं सुद्धां बर्फाचीं बांधावीं लागतात! मनुष्यांना वर्षानुवर्ष स्नानाचा प्रसंग येत नाहीं, व आयांना आपलीं मुलें मांजराप्रमाणें किंवा गायीप्रमाणें चाटून स्वच्छ करावीं लागतात! हेंच त्यांचें न्हाणमाखण! ह्या सर्व स्थित्यंतरावरूनच ह्या टोंकाच्या लोकांमध्यें व त्या टोंकाच्या लोकांमध्यें केवढें अंतर असेल ॰ ह्याचें अनुमान वाचकांनींच करावें.

आज आह्मी ज्या लोकांचें वर्णन देणार आहों, ते लोक **रशिया**च्या उत्तर टोंकास अर्थात् उत्तर समुद्राच्या जवळ राहणारे आहेत. ह्या लोकांचें मुख्य उदरनिर्वाहाचें साधन **'सामोय'** ह्या नांवाचे तिकडे एक जातीचे ससे आहेत तें असल्यामुळें ह्या लोकांस **'सामोयिड'** लोक असें ह्मणतात. **अर्चांगल**पासून पूर्व**सैबिरां**तील **लेना**पर्यंत ह्यांची वस्ती आहे.

**सामोयिड** लोक छातीकडून रुंद, अंगानें स्थूल, चपट्या चेहऱ्याचे, जाड ओठ, नाकपुड्या पसरट, दाढी अगदीं थोडी; विरळ, परंतु लांब खरबरीत व केंस काळे असे असतात. शरीराचा बांधा अगदीं ठेंगू, परंतु मजबूत असून स्नायु तर अतिशयच भक्कम असतात. पुरुषांचा पोषाख ह्मणजे माथ्यावर **रेनदीर** नांवाच्या हरणाच्या कातड्याचा केंसासहवर्तमान एक उंच टोप; अंगांत एक तसाच डगला. त्याला सरासरी एक एक दोन दोन टांके दिलेले. कमरेला त्याच कातड्याचा एक कमरपट्टा. हातांत हातमोजेही त्याचेच. परंतु त्याला बोटें वगैरे बहुतकरून कांहीं नसतात. फक्त नुसत्या पिशव्या असायाच्या. पायांत तशाच रीतीचा चोळणा व खालीं बुटासारखे जोडे.

कमरेपासून गुडघ्यापर्यंत लिंब नेसल्याप्रमाणें किंवा कलावंतिणी झगा घालतात त्याप्रमाणें लांब लांब केंसांच्या चामड्यांच्या तुकड्यांची झालर.

बायकांच्या पोषाखामध्यें बरीच इष्की असते. इष्की ह्मणजे येवढीच कीं, त्यांच्या पोषाखांतील चामड्यांचे तुकडे रंगारंगांचे शिवलेले असल्यामुळें, आमच्या हिकडच्या कुणब्याच्या वाकळीप्रमाणें दिसतात. त्यांच्या मस्तकावरचें आच्छादन आमच्या हिकडील कानटोपीप्रमाणें किंवा मुलाच्या टोपऱ्याप्रमाणें असतें. त्या आपल्या केंसांची वेणी घालून ती पाठीवर मोकळी सोडतात, व तिच्या शेवटाला गोंडे फुलें घातल्याप्रमाणें केंसांचे झुबके असलेले चामड्याचे तुकडे व शिंपा वगैरे बांधतात. येवढेंच नव्हे, तर त्या वेणीला आणखी कितीएक प्राण्यांचीं लांबच लांब शेपटें गांठवून तेही सदर मोकळे सोडतात. किंवा एखाद्या तरुणीला थोडासा नखरा ह्मणून करावासा वाटला तर तीं सर्व शेपटें ती मुरडून आणून छातीवर सोडते! आणि तिचें अंग हिकडे तिकडे हालूं लागलें ह्मणजे त्यांतील शिंपांचा खुळ खुळ ध्वनी निघूं लागला ह्मणजे त्यांतील चैनी मंडळी अगदीं खुष! जणों काय, गजगामिनीच्या चरणांतील नूपुरेंच रुणझुणत आहेत!

ह्या लोकांना स्थायिक घरदार बांधून राहण्याचें कधीं माहीतच नाहीं. डोंबाऱ्याप्रमाणें ह्यांचें बिऱ्हाड सदान्कदा पाठीवर. दहा पांच काठ्या आणि **रेनदीर**चीं चामडीं वगैरे शिवून तयार केलेल्या पालपट्ट्या. हें ह्यांचें घर, ह्या घरांत निजावयाला प्रत्येक मनुष्याला एक खाटलें व पांघरावयाला एक चामडें असतें. चार काठ्यांना चामड्याचीं चार टोंकें गुंतवलेलीं हें खाटल्याचें स्वरूप! प्रत्येकाचा बसावयाचा ओटा, निजावयाचा पलंग सारें कायतें तेंच. डोंबाऱ्यांचीं जशीं गाढवें आणि डुकरें, तशीं ह्यांचीं **रेनदीर** व कुत्रीं हीं जनावरें. पाण्याच्या फेंसाप्रमाणें **'स्नो'** ह्या नांवाचा बर्फ तिकडे नेहेमीं पडलेला असतो, आणि त्यानें सर्व जमीन आच्छादून जाते. त्यांच्यावरून जाण्यासाठीं त्यांनीं एक प्रकारच्या लांबट आकाराच्या टोपल्या केलेल्या असतात. त्यांत बसून त्याला **रेनदीर** किंवा पांच सहा कुत्रे जोडतात. ह्मणजे ती टोपली त्या गुळगुळीत बर्फावरून भरारा निसरत जाते. हीं त्यांचीं वाहनें व प्रवासाची तऱ्हा.

एका प्रवाश्याला 'सामोयिड'च्या एका कुटुंबांत कांहीं दिवस राहण्याचा प्रसंग आला होता. तो एके ठिकाणीं ह्मणतो "मला त्यांनीं टोपलींत बसवून निसरत्या गाडीप्रमाणें आपल्या मुक्कामास नेलें. आमची टोपली एक **रेनदीर** झपाट्यानें ओढीत असे, व एक पाठीमागून आपोआपच पळत येत असे. ह्या कुटुंबात सहा मनुष्यें होतीं; व त्यांचें बाडबिछाइत सर्व त्यांच्या बरोबरच होतें. एका टोपलीस सहा कुत्रे जोडलेले होते. ह्या टोपलींत त्यांचे खावयाचे मासे भरलेले असून शिवाय एक मनुष्य बसत असे. मी कांहीं वेळ ह्याही टोपलींत बसलों होतों. मुक्कामास गेल्याबरोबर त्यांनीं काठ्या रोवून लागलीच तंबू उभा केला. तंबूच्या आंतील जमीन '**स्नो**'नें आच्छादलेली तशीच होती. मी पाणी मिळेल तर बरें होईल असें ह्मणतांच घरांतील मुख्य बाईनें तेथीलच **स्नो** एका मडक्यांत जमा करून लगेच शेगडी पेटविली, व त्यावर त्यास थोडी ऊब देऊन पाणी करून दिलें. नंतर मध्यें शेकोटी करून तिच्या भोंवतीं घरांतील सर्व मंडळी बसून त्यांचें भोजन उरकलें, व गप्पागोष्टी सुरू झाल्या. ह्यांच्या भोजनांत कच्चे मासे व ताजें रक्त हेच पदार्थ मुख्य असतात. ह्यांच्यामध्यें एक दोन वर्षांचें मूल होतें. त्याच्या हातावर मीं थोडीशी साखर ठेवली. पण त्यानें ती '**स्नो**' असें समजून दूर झुगारून दिली. तेव्हां मीं त्याच्या तोंडांत घातली. मग मात्र तें प्रत्येक दिवशीं मी चहा करतांना जवळ येऊन साखरेसाठीं हात पसरी. ह्या मुलाला रात्रीं एका टोपलींत निजवीत; व त्यावर उबदार केंसांच्या चामड्यांच्या तुकड्यांचें पांघरूण घालीत. ह्या लोकांना धान्य व वस्त्र ह्मणून कसलें तें माहित नाहीं."

ह्याच प्रवाश्यानें **सामोयिड** लोकांची एक मेजवानी पाहिली. तिचें वर्णन तो येणेंप्रमाणें करतो. "त्या दिवशीं एक **रेनदीर** आणून त्यांनीं तंबूच्या दारापुढेंच मारलें; व तेथेंच तें सोललें. आणि तसाच तो रक्तानें भरलेला सांगाडा आंत आणून सर्वांनीं तें कच्चेंच मांस खाण्यास सुरवात केली. हाडें हातांत घेऊन तोंडानें मांस कुरतडून खाण्याची जी त्यांची तऱ्हा आहे ती फारच भयंकर होय. त्या सर्वांचीं तोंडें लाल रक्तानें माखलेलीं होतीं. तें लहान मूलही त्यांतलेंच हिरवें

मांस घेऊन खात होते. तो त्यांचा प्रकार पाहून आमच्या हिकडील लोकांस तर मूर्च्छाच येईल. **रेनदीर** मेजवानीसाठीं आणून उभें केलें ह्मणजे कधीं कधीं लहान लहान मुलें तें जिवंत असतांनाच हातामध्यें सुरी वगैरे घेऊन त्याच्या मांसाचे तुकडे काढकाढून खाण्यास सुरवात करतात!!"

हे लोक इतके घाणेरे असतात कीं, त्यांच्या जवळ बसणें सुद्धां इतर लोकांस दुःसह वाटतें. त्यांच्या अंगावर उवा किती असतात ह्याची तर क्षितीच नाहीं. ह्या लोकांचा मुख्य धंदा शिकार करणें आणि मासे मारणें हा. त्यांत ते तरबेज असतात. धनुष्य, बाण, आणि भाला हीं त्यांचीं मुख्य हत्यारें. ह्यांचीं धनुष्यें फार लांबलचक व भक्कम असतात. प्रत्येक धनुष्याची लांबी सहा फूट! ह्मणजे तें वागविणाराहूनही कितीतरी मोठें! त्यांचे बाण चार चार फूट लांब असतात. ह्या बाणांत तीन प्रकार असतात. एक पोलादी पात्यांचे. हे मोठ्या जनावरास मारतात. कित्येकांस पुढें बारीक बारीक गोळ्या, व माशाच्या गळ्यांसारखे बारीक आंकडे किंवा हूक बसविलेले असतात. एखादा पक्षी किंवा प्राणी अतिशय लहान असला, तर तो मारतांना त्याचें चामडें फार फाटलें जाऊं नये ह्मणून ह्या बाणांचा उपयोग करतात. तेथें लांडग्यांचा मनस्वी उपद्रव असतो. ते रात्रीचे येऊन त्यांच्या जनावरांवर हल्ला करतात, व **रेनदीर**, कुत्रीं वगैरे जनावरें घेऊन जातात. ह्मणून एक दोन मनुष्यांस हातांत एक दोन मोठमोठाले भाले घेऊन रात्रभर पहाऱ्यावर बसावें लागतें.

काळें अस्वल हें एक मोठें बलाढ्य जनावर आहे अशी त्यांची समजूत आहे. त्याच्यावर त्यांची इतकी श्रद्धा असते कीं, **सामोयिड** लोक त्याला एक देवता मानतात. न्यायाधीशाच्या कोर्टांत ह्या लोकांची साक्ष घेण्याचा प्रसंग आला तर, अस्वलाच्या मस्तकाची शपत घेण्याची चाल आहे; व ख्रिश्चियन लोक बायबलाची शपत घेतांना जसें त्या ग्रंथाचें चुंबन घेतात, त्याप्रमाणें त्यांनीं जिभल्या चाटून कांहीं गिळलें असा अभिनय करावा लागतो. ह्यांतील उद्देश असा कीं, आपण खरें सांगितलें नाहीं तर, तें अस्वल मला असें गिळून टाको!

# खरें आणि खोटें.

**श्लोक. ( भुजंगप्रयात. )**

फिरे सूर्य हें पाहुनी नित्य डोळां
सदां चालतो भूमिचा हाच गोळा ।
असे सांगती जाणते मोठमोठे
जगीं कोण जाणे खरें आणि खोटें ॥ १ ॥
धरा वर्तुलाकार तीतें न शींव
दुजा बोलतो प्राणि आहे सजीव ।
दिसे सारखी शब्द काढा न ओठें
जगीं कोण जाणे खरें आणि खोटें ॥ २ ॥
वरी पांच भर्ते धरी चित्त कर्णीं
तरी ती सती द्रौपदी व्यास वर्णी
जिचें नांव घेतां घडे पुण्य मोठें
जगीं कोण जाणे खरें आणि खोटें ॥ ३ ॥
असंख्यात नारी परस्त्रीस भोगी
महा ब्रह्मचारी तरी कृष्ण योगी ।
नये फोडितां गुप्ततेचे लखोटे
जगीं कोण जाणे खरें आणि खोटें ॥ ४ ॥
गळा कापुनी भोगितो चैन खाशी
दुजा दीन सत्वस्थ तो जाय फांशीं ।
प्रभूचा तिथें राहतो न्याय कोठें
जगीं कोण जाणे खरें आणि खोटें ॥ ५ ॥
करी एक पत्नीप्रती मारहाण
चिनी ठेविती बायकोला गहाण ।
विवाहाविना नायरां काय तोटे
जगीं कोण जाणे खरें आणि खोटें ॥ ६ ॥

मुसलमान पत्नीस झांकून ठेवी
युरोपामध्यें बायको हीच देवी ।
धरोनी फिरे जोडपें हात बोटें
जगीं कोण जाणे खरें आणि खोटें ॥ ७ ॥

पती सांगतो हेंच माझें कलत्र
पुढें रांगतो हाहि माझाचि पुत्र ।
तदा जारिणीच्या मनीं हास्य लोटे
जगीं कोण जाणे खरें आणि खोटें ॥ ८ ॥

क्षणार्धामधें होतसे रंक राव
नको युद्ध लागे चमूचें न नांव ।
रिकामीं सदा कष्टुनी कैक पोटें
जगीं कोण जाणे खरें आणि खोटें ॥ ९ ॥

स्तुती गाउनी मानिती एक धन्य
तया बोलती पातकी नीच अन्य ।
तुकारामही गायसा खाय सोटे
जगीं कोण जाणे खरें आणि खोटें ॥ १० ॥

करी वैद्यही औषधें यत्न कोटी
परी शेवटीं मृत्युच्या जाय भेटी ॥
वनीं वांचतो ज्यास पाणी न घोटे
जगीं कोण जाणे खरें आणि खोटें ॥ ११ ॥

जगीं गाजती तत्त्ववेत्ते सुविद्य
जना बोधिती प्राशिती तेचि मद्य ।
बरे तेच ज्यांचे बुडाले न घोटे
जगीं कोण जाणे खरें आणि खोटें ॥ १२ ॥

कला शास्त्र सिद्धांत जे सर्व "पास"
कसे तेच होतात दासानुदास ।

जणों कष्टती जुंपले बैल मोटे
जगीं कोण जाणे खरें आणि खोटें ॥ १३ ॥
अह्मां ओंखटें द्वाड जें कां उलूक
तया आदरें पूजिती ग्रीक लोक ।
थवाच्या थवा दर्शनालागिं लोटे
जगीं कोण जाणे खरें आणि खोटें ॥ १४ ॥
ह्मणे द्रव्य वेदांत तें दुःखदायी
परी अर्जिती लोक नाना उपायीं ।
गणी हेम माती मणी साधु गोटे
जगीं कोण जाणे खरें आणि खोटें ॥ १५ ॥
परब्रह्म हें सत्य मिथ्या पसारा
परी व्याधिनें आरडे लोक सारा ।
भ्रमाचेच हे बांधिले लर्व ओटे
जगीं कोण जाणे खरें आणि खोटें ॥ १६ ॥

# लंका सिंहलद्वीप.

( मा० पु० चालू. )

**दुत्तुगिमुनूनें** मारलेल्या लढाईंत मृत्युदेवतेस, असंख्य मानवी जीवितांची आहुती पडली, ही गोष्ट त्याच्या मनाला फार खात असे. आणि ह्या अघोर पापाबद्दल आपणास स्वर्गीं काय प्रायश्चित्त मिळेल, ह्याविषयीं त्याला मोठी हुरहुर लागून राहिली. ह्याकरितां त्यानें 'दगोबा' व 'विहार'[1] बांधण्यामध्यें आपला सर्व काल व संपत्ति ह्यांचा व्यय केला. तथापि तो अशा कृत्यांनीं सुकृत व पापपरिहार निरर्थक शोधीत बसला.

**दुत्तुगिमुनूनें** पुष्कळच टोलेजंग बांधकामें करून ठेविलीं. त्यांपैकीं सर्वांत जंगी इमारत ह्मटली ह्मणजे, **अनुराधापुरा**जवळ बांधलेला **लोकमहाशय** अथवा **पितळेचा राजवाडा** हा होय. तो २७० चौरस फूट लांब असून, उंचीनेंही तितकाच आहे. ही इमारत सोळाशें पा-

१ भिक्षुक लोकांस रहावयाकरितां बांधलेले मठ.

पाणस्तंभांवर उभारली असून, त्या स्तंभांची रचना अशी मजेदार केलेली आहे कीं, एकेका रेषेंत चाळीस चाळीस खांब, अशा चाळीस समांतर रेषेंत ते गोंवले आहेत. हल्लीं बहुतेक पडझड झाली आहे तरी अद्याप मधले खांब जमिनीवर जवळ जवळ बारा फूट उंच आहेत. मधले स्तंभांवर नाजूक नकासकाम केलें आहे, परंतु बाहेरचे खांबांवर नक्षी वगैरे कांहीं नाहीं. त्यांचे पाचरटिले होऊन, ढलपे ढलपे उडून जाऊन, अगोदर निम्मा जीव झाला आहे. त्यांची उंची सारी निम्मी—सहा फूट राहिली आहे. ह्या खांबांवर नऊ मजले चढविले होते, त्यांत नऊशें दालनें होतीं, आणि त्या सर्वांवर धात्वाच्छादन होतें. ह्यावरूनच ह्या वाड्यास 'पितळेचा राजवाडा' असें नांव पडलें असावें.

ह्या इमारतीचा अंतर्भाग फारच रमणीय होता. अगदीं मध्यभागीं एक प्रशस्त दिवाणखाना असून, त्यांत सोन्याचें पाणी दिलेले सिंहाचे व हत्तीचे शोभिवंत पुतळे होते. दुसऱ्या बाजूला एक सुंदर कळाकुसरीचें सिंहासन मांडून ठेविलेलें असे. प्रतिष्ठित उपाध्यायांकडे अगदीं वरचे मजले असत, आणि ज्यांना याज्ञिकीच्या कामांत तितका अधिकार नसे, ते अगदीं तळच्या मजल्यावर राहत असत. **सिंहली** लोकांचे जिने अगदीं सुळक्यासारखे असतात. ह्या चालीमुळें ते नऊ जिने चढून जाणें ह्मणजे उतारवयाच्या प्रतिष्ठत उपाध्यायांच्या जिवाचीच परीक्षा होत असे. त्या चालीच्या ह्या दोषामुळें जरी सदोदित कमी प्रतीच्या लोकांपेक्षां ह्या वरिष्ठ जातीस उच्चस्थान मिळे, तरी तें त्यांस त्याच्या दसपटीनें त्रासदायक होत असे.

**अनुराधापूरचा रुवनवेलाशय** नांवाचा 'दगोबा' २७० फूट उंच असल्याचें लोक सांगतात. हल्लीं येथें सभोंवार विटांचा ढीग मात्र पडलेला आहे. त्यावर गवत गजबरून गेलें आहे आणि त्याची उंची १८९ फूट आहे. त्या इमारतीच्या त्या औरस चौरस ढिगाच्या तळाचा—पायाचा परीघ २००० फूट होता, त्याला मोठमोठाले दगड घातले होते, आणि त्यांभोंवतीं जो चर खणलेला होता, त्याची रुंदी १७ फूट होती. चौथऱ्याच्या चारी बाजू दगडांत हत्तींचीं गंडस्थळें खोदून सुशोभित केल्या होत्या.

**दुत्तुगिमुनू**च्या मनानें असें घेतलें कीं, हीं पवित्र कामें ओढून ताणून जबरदस्तीनें होणें चांगलें नव्हे. त्यांतही आणखी लढाईपासून लोकांना फार त्रास भोगावा लागला आहे. ह्मणून त्यानें मोलमजुरी देऊन मनुष्यें कामावर लावलीं. वर सांगितलेला 'दगोबा' त्याच्या हातून तडीस गेला नाहीं. ह्मणून त्याच्या समाधानासाठीं, त्याच्या भावानें एक इमारतीचा लांकडी सांचा तयार करून, इमारतीचें काम पुरें झालें, असें दाखविण्याकरितां, राजाकडे पाठवून दिला. **दुत्तुगिमुनू** अत्यावस्थ पडला असतां, त्याजकडून 'दगोबा'भोंवतीं प्रदक्षिणा घालविली, व 'दगोबा' जेथून चांगला दृष्टीस पडेल, अशा ठिकाणीं, त्यास बिछायत घालून दिली. तो आपल्या एका सेनापती–(प्रतिष्ठित उपाध्यायाच्या पदवीस पोंचलेला) ला उद्देशून ह्मणालाः—"गतकाळीं, माझ्या दहा योद्ध्यांनीं मला मदत दिल्याकारणानें मी युद्धास प्रवृत्त झालों खरा, पण आतां एकाकी–एकटाच काळाशीं झगडा करण्यास जात असतां, ह्या माझ्या अंतकाळच्या वैऱ्याचा पराजय करण्याचा अखत्यार मला मुळींच नाहींना?"

त्या आसन्नमरण झालेल्या राजाच्या आज्ञेवरून, त्यानें केलेल्या धर्मकृत्यांची नांवनिशी वाचण्यांत आली. त्यानें ९९ 'विहार' किंवा भिक्षुकांकरितां मठ बांधिले; एकेका उपाध्यायास तीन तीन झगे ह्याप्रमाणें तीन वेळ सर्व उपाध्येमंडळास पोषाख वांटले, दोन बहुमूल्य कर्णभूषणें दुष्काळपीडितांस धान्य घेण्याकरितां देऊन टाकलीं; चहूंकडच्या भिक्षुकवर्गांपैकीं बायकापुरुषांना दोघांनाही कोणास न वगळतां धर्मादाय केला; प्रत्येक खेपेला उपाध्यायांना सात दिवसपर्यंत, असें निरनिराळ्या पांच खेपेला सर्व सिंहलद्वीपाचें राज्यदान दिलें; बारा निरनिराळ्या ठिकाणीं शुभ्र तूपवातीचे ७०० दीप लावले, १८ दवाखाने उभारून, प्रत्येकांत औषधें व वैद्य यांची समृद्धि करून, रुग्णजनांची शुश्रूषा चालविली, ४४ ठिकाणीं तांदूळ, साखर, व मध यांचा पुरवठा केला, प्रत्येक महिन्यास आठवडाभर ह्याप्रमाणें सर्व लंकेंतील देवालयांतील दीपांना, नंदादीपांना तेल पुरविलें; आणि धर्मोपदेशकांना तूप व वस्त्रंप्रावर्णें ह्यांचें वर्षासन करून देऊन 'विहार' मंदिरांत धर्मग्रंथ ठेवण्याची प्रवृत्ति पाडिली. इतकें झाल्यानंतर तो काळाच्या दाढेंत सांपडलेला राजा असें

बोलला:-"माझा ज्या वेळीं भरभराटीचा काल होता, त्या वेळीं मी हें सर्व करून चुकलों. मला आतां हात देणारा कोणीही नाहीं; तथापि मीं जीं काय दोन दानें केलीं, तीं तरी माझ्या अंतकाळच्या यातनेंत, माझ्या आत्म्यास 'सुखशांति' देतील." त्यानंतर त्यानें एकदां 'दगोबा'-कडे नजर फेंकून प्राण सोडला. ही गोष्ट इ. स. १४० व्या वर्षीं घडली. अंतकाळचे त्याचे शब्द असे होते. "मी **बौद्धधर्मो**पाध्यायांचा वंदा गुलाम आहें." असो.

**दुत्तुगिमुनू**च्या मागून त्याचा भाऊ **सैदैलिस** हा गादीवर बसला. त्यानें रुहूण येथें राज्य करीत असतां, **यतार**प्रांतांत **मलिगरिंगल**नामक 'विहार' बांधिला. त्यानें आपल्या राज्यारोहणानंतर **रुनवेली**चा 'दगोबा' कडेवर नेला, आणि पुष्कळ सरोवरें बांधिलीं. ह्याच्या मागून जे राजे गादीन्शीन झाले, त्यांच्या कारकीर्दींत महत्वाच्या गोष्टी मुळींच घडून आल्या नाहींत, ह्मटलें असतां चालेल.

(पुढें चालू.)

# वेदांतपर संवाद.

**गृहस्थ**—आलीकडे येरे धाकट्या मुला.
**मुलगा**—कशानें थोरपणा आला तुला ?
**गृहस्थ**—इवलेसें किरे दिसतें पोर.
**मुलगा**—ब्रह्मीं नाहीं लहान थोर.
**गृहस्थ**—ब्रह्म तुला ठाउक आहे ?
**मुलगा**—सर्वां घटीं तूंच पाहें.
**गृहस्थ**—ब्रह्मीं नाहीं भेदाभेद ?

१ वेंगुर्लें मुक्कामीं वे. रा. रा. पुरुषोत्तम सीतारामबुवा पुनाळेकर ह्या नांवाचे एक हरिदास आहेत. हे मोठे रसिक आणि प्रेमळ आहेत. ते आपल्या कीर्तनांत 'केरळकोकिळांतील' पद्यें वगैरे ह्मणून मोठी करमणूक करितात. सदरहू बुवांचे कांहीं वेदांतपर संवाद आहेत. ते मोठे मजेचे आहेत. त्याचा थोडासा मासला आह्मी आपल्या वाचकांसही आज सादर करीत आहों.

मुलगा—ऐसें बोलती चारी वेद.
गृहस्थ—तुझा भेद गळाला ?
मुलगा—सद्गुरूनें बोध केला.
गृहस्थ—बोध ह्मणजे कायरे गड्या ?
मुलगा—आत्मस्वरूपीं पाहीं रे वेड्या.
गृहस्थ—इवलेसें पोर पर बाट मोठें!
मुलगा—थोरपणा असून चाट खोटें.
गृहस्थ—माझें काय चाट झालें ?
मुलगा—ज्ञानामुळें गर्व आलें.
गृहस्थ—गर्व जाईल कैशापरी ?
मुलगा—सद्गुरूचें दास्यत्व करी.
गृहस्थ—सद्गुरुकृपा झाली तुला ?
मुलगा—कृपेंवांचून बोलवेल मला ?
गृहस्थ—सद्गुरुकृपा तुलाच झाली ?
मुलगा—भूतमात्रें भरून उरली.
गृहस्थ—धालेपण फार केलें.
मुलगा—सद्गुरुसंगत घडली.
गृहस्थ—संगतीनें कोण तरले ?
मुलगा—महापातकी उद्धरले.
गृहस्थ—पहिला तो कोळयाचा पोर.
मुलगा—अजामिळ चोख्या ह्मार.
गृहस्थ—ऐसे किती तरले पोरा ?
मुलगा—मिती नाहीं रे गव्हारा.
गृहस्थ—तर कां इतके यमें नेले ?
मुलगा—अविश्वासें बुडून मेले!
गृहस्थ—विश्वास काय थोर झाला ?
मुलगा—हा तों निश्चय पुराणीं ठेला.

**गृहस्थ**—भजन तरी करावें केव्हां ?
**मुलगा**—सोहं मंत्रीं नाहीं गोवा.
**गृहस्थ**—भजन करावें कोणे दिवशीं.
**मुलगा**—नेम नाहीं दिवसनिशीं.
**गृहस्थ**—ज्ञातारपणीं भक्ति करूं.
**मुलगा**—आयुष्य काय तुझें आज्ञाधारू
**गृहस्थ**—बोलतें तेंच किरे बोलतोस !
**मुलगा**—जाबास जाब फार देतोस.
**गृहस्थ**—ऐसें बोलतां देइन काठ्या.
**मुलगा**—अहंकारें होतिल खोट्या.
**गृहस्थ**—तुझा माझा वाद झाला फार.
**मुलगा**—पांच पोरांनीं घेतलें घर.
**गृहस्थ**—पांच पोरें कोणाचीं ?
**मुलगा**—आत्माराम गड्याचीं.
**गृहस्थ**—सारा खेळ त्याचाच किरे ?
**मुलगा**—खेळ खेळून निराळाच नारे ?
**गृहस्थ**—हा खेळ तुला कशानें कळला ?
**मुलगा**—निवृत्तिप्रसाद फळास आला.

---

# गुरुशिष्यसंवाद.

**शिष्य**—गुरुजीबुवा, उपदेश करा.
**गुरु**—आत्मा आपण, मौन धरा.
**शिष्य**—शुकादिकीं धरिलें मौन.
**गुरु**—त्यांचें बोलणेंच मौनाचें मौन
**शिष्य**—असे ते हो कैसे बोल ?.
**गुरु**—स्वानुभवाचे सहजीं डोल.

शिष्य—स्वानुभव तो कैसा भेटे?
गुरु—सद्गुरुकृपेनें संशय फिटे.
शिष्य—सद्गुरुकृपा होइल कैशी?
गुरु—त्याच्या घरची व्हावें दासी.
शिष्य—दासीपणा तो कठीण आहे.
गुरु—उगीच द्वारीं पडून राहें.
शिष्य—द्वारीं पडून होईल काय?
गुरु—येतां जातां लागतील पाय.
शिष्य—पाय लागल्यानें कोणती सिद्धि?
गुरु—प्रपंचांतून फिरेल बुद्धि.
शिष्य—बुद्धि फिरली कैशी कळे?
गुरु—जें संताचें मिळणें मिळे.
शिष्य—संत सांगा कैसे दिसती?
गुरु—लोक स्तवनें संत ह्मणती.
शिष्य—लोक स्तवनें होय संत?
गुरु—स्वयें परिक्षुनी पहावा अंत.
शिष्य—अंत लावल्या कार्य झालें?
गुरु—त्यांचीं सेवावीं पाउलें.
शिष्य—पाउलें करिती देव ठावा?
गुरु—लवून प्रश्न करीत जावा.
शिष्य—प्रश्न केल्या देव दिसे?
गुरु—जनीं वनीं तोचि भासे.
शिष्य—तोच भासल्या आपण कोण?
गुरु—आपण देव नाहीं दोन.

---

# काफर लोक.

**काबूल ( अफगाणिस्थान )**च्या ईशान्य दिशेस **काफरिस्थान** नांवाचा एक लहानसा डोंगराळ प्रदेश आहे, तेथें राहणाऱ्या लोकांस मुसलमान लोक काफर असें ह्मणतात. असें ह्मणण्याचें कारण, हें आहे कीं, **इस्लामावर** त्यांचा विश्वास नाहीं. हे लोक बकऱ्यांच्या काळया लोंकरीचा पोषाख करतात. ह्यावरून त्यांस **'शियाहपोश'** अथवा "कृष्णवस्त्री–काळें वस्त्र पांघरणारे–" असें ह्मणतात.

हा कालपर्यंत त्या देशाविषयीं अगदीं थोडकीच माहिती सांपडते. इ० स० १८८३ सालापर्यंत एकाही युरोपियनाचें पाऊल तेथें पडलें नव्हतें. त्यांत विशेषतः मुसलमान लोकांची तेथें गति होण्याची मारामारच. भोळसर मुसलमान लोकांत, एखाद्या **काफराचा** शिरच्छेद करणें, हें एक मोठें पवित्र कृत्य समजतात. तसेंच **काफरिस्थानचे** लोक, त्यांच्यापैकीं एखाद्यानें निदान एकतरी महमदी धर्माचा मनुष्यबळी घेतल्याशिवाय, त्यास कोणत्याही प्रकारानें विचारीत नाहींत. त्यांचीं जीं कांहीं आवडतीं गाणीं आहेत, त्यांपैकीं एका गाण्यांत, एका **काफर** मनुष्यानें आपला मुलगा एका मुसलमानास कसा विकला, ह्याविषयीं वर्णन आहे. पुढें तो मुलगा वयांत आल्यावर, त्यानें चौदा मुसलमान बळी घेऊन, आपल्या घराला तो जीव घेऊन परत आला. तेव्हां त्या विजयानंदांत त्याची आई गाणें ह्मणते. त्यांतील आशय असाः—

## पद.

('दुःशासन बाळक माझें' ह्या चालीवर.)

**तूं धन्य ! धन्य ! मम बाळा ! समरीं तव तेज विराजे ॥ध्रु०॥**
**शौर्याचा पर्वत जो तूं; जनकें तव विक्रय केला ।**
**मम वृद्ध जीव हा तेव्हां । त्वद्दुःखें तिळतिळ तुटला ।**
**परि चवदा यवनरिपूंचीं, शिरकमळें तोडुनि आला ।**
**घंटिका किणी किणि वाजे । तव पायीं फारचि साजे ।**
**परतोनि सदन हें माझें । झालें रे बाळा ताजें ॥ १ ॥**
**तूं धन्य ! धन्य ! मम बाळा ! समरीं तव तेज विराजे ॥ध्रु०॥**

आपण किती शत्रु मारले, हें दाखविण्याकरितां, काफर लोक गांवाबाहेरच्या शिवेवर एक जंगी स्तंभ उभारतात. त्याच्या माथ्यावर एक ओबडधोबड मनुष्याची आकृति काढतात. आणि मग प्रत्येक मनुष्य, एक मनुष्य मारला असेल तर एक भोंक पाडून, त्यांत एक मेख मारून ठेवतो. जर त्यानें एखादी स्त्री मारिली असेल तर मेख वगैरे न मारतां नुसतें भोंक तेवढें राखतात.

असें सांगत असत कीं, काफर लोक युरोपियन लोकांसारखे सुंदर असत, व त्यांचे डोळे त्यांसारखेच निळे* असत. पण ही गोष्ट निवळ खोटी आहे, असें आतां कळून चुकलें आहे. ते अवांतर डोंगरी लोकांसारखेच असतात. त्यांची भाषा संस्कृत भाषेपासूनच झालेली आहे. हे लोक दांडगे, छातीचे, पण अतिशय सुस्त, व चैनी असतात. ह्यांना पावलोपावलीं दारू प्यावयास हवी. बाबर ह्यांजविषयीं असें ह्मणतो कीं, त्यांचें पाणी पिणें तेंच सुरापान; प्रत्येक काफराच्या गळ्याभोंवतीं एक चर्मी दारूची पिशवी असावयाचीच.

ते मूर्तिपूजक असून, आपल्या देवास कोंबडीं बदकीं वगैरे प्राणी बळी देतात.

---

* निळे डोळे असणें हें एक युरोपियन लोकांच्या सौंदर्याचें लक्षण समजतात. आमच्या इकडे ज्याप्रमाणें 'तामरसाक्ष,' 'राजीवाक्ष,' 'कमलाक्ष किंवा आरक्त नयन' हें नेत्रांचें उत्तम सौंदर्य मानितात, त्याप्रमाणें युरोपांत नीलाक्ष हे मानले जातात. वरील वर्णनांत मूळांत 'Blue eyes' निळे डोळे असा शब्द आहे.

"Then would Philip his blue eyes all flooded with the helpless wrath of tears." Tennyson's Enoch Arden.

"Blue were her eyes like the fairy flax." The wreck of the "Hesperus."

(Longfellow.)

अशीं 'blue eyes' किंवा निळे डोळे ह्मटलेल्याचीं कैक उदाहरणें इंग्रजी काव्यांतून सांपडतात.

# गोमांतकी

## आरती.

भवतेक बगले देव परि नाहीं ही धर्ती ।
मातर चाकरी चुकल्या तदवांच ते धर्ती ॥
त्याचें सुमरन केल्या पराणी उद्धरती ।
चाकर तूजो मी कुर्पा कर पर्ती ॥
जयदेव जयदेव केसरिच्या सायबा ।
आरत ओवाळुन तूजे सावळेक आसैं बा ॥ ध्रु०
तूजों अपार महिमो कोन वर्णिल बटक्यो ।
जानै हुन्ती तरी त्यो गोष्टी ह्यो लटक्यो ॥
कुडीचा नाय भरांवसो जशो फुटतिल मडक्यो ।
अवखाच्यो दोरयो तुजबगार कोन सांदिल तुटक्यो ॥
जयदेव जयदेव केसरिच्या सायबा ।
आरत ओवाळून तूजे सावळेक आसैं बा ॥ २ ॥
गंगा पार्वति स्वामी गनपत न्हानगो झील ।
तेचो बसवोयेचो हुंदिर काळो भिल्ल ।
त्याचें सुमरन कैल्यार काळाक कडे काडिल ।
बळवंत हुनता मीयां फळणीकराचो झील ॥
जयदेव जयदेव केसरिच्या सायबा ।
आरत ओवाळून तूजे सावळेक आसैं वा ॥ ३ ॥

---

# काव्यकूट.

## श्लोक.

मी तों, एकलता दिसेन नयना, पर्जन्यकालाविना
कोणा भूमितळीं कदापि न दिसें, धुंडोनि रानावना ।

किंवा मी गिरिकंदरींहि न मिळें, नाहीं समुद्रोदकीं
आहें दृश्य तरी अदृश्य असतें, सांगा अशी कोण कीं ॥ १ ॥
माझें चिन्ह अपूर्व शक्ति अतुला, अन्यांहुनी भिन्नता
मी विश्वद्युमणिप्रभा दिपवितें, संफुल्ल तेजें स्वतां ।
केव्हांही विरलप्रकाशपटलीं, दृष्टीं नये मी बरें
माझें ठावठिकाण नांव बुध हो, पोतास सांगा त्वरें ॥ २ ॥

# पत्रव्यवहार.

मागील अंकांतील रा० द्विवेदी ह्यांच्या पत्रावर 'पोतक' ह्यांजकडून आलेलें उत्तर.

"रा. रा. 'केरळकोकिळ'कर्ते यांसः—

आपणाकडून आलेली झांशीच्या पत्राची नक्कल साद्यंत अवलोकन केली. रा. द्विवेदी ह्यांनीं माझ्या अल्पकृतीचा गौरव केला, येवढेंच नव्हे, तर त्यांतील आक्षेपही कळविले, ह्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. तृ आणि दृ हीं अक्षरें त्+ऋ व द्+ऋ अशीं झालेलीं मला मान्य आहेत. पण ते संयुक्तवर्ण नव्हेतच असें ह्मणण्यास माझा सूर वाहत नाहीं. कारण, ऋॠ व ऌॡ हे शुद्ध स्वर मानावेत किंवा कसे ह्याचाच मुळीं संशय दिसतो. प्राचीन कवींनीं जरी त्यांची गणना स्वरांत केलेली आहे, तरी अनुभव त्याच्या उलटही येतो. ह्मणजे ते ऱ्हस्व अक्षरांच्या पुढें योजिले तर, मागच्या अक्षरावर थोडा तरी आघात झाल्यावांचून रहात नाहीं. मुळींच आघात न होता, तर तशी योजना करण्याचें, ह्मणजे ऱ्हस्व अक्षरापुढें तृ, दृ इत्यादि अक्षर घालून दीर्घत्व आणण्याचें त्यांच्या मनांतच आलें नसतें. परंतु वामन पंडितासारख्या संस्कृतज्ञ कविवर्यांनींही तृ किंवा दृ हीं अक्षरें पुढें योजून मागील अक्षरांस द्वित्व आणलें आहे. ह्याचीं उदाहरणें:—

प्रकटतील शरदृतु यामिनी, तईं तुह्मी मजशीं व्रजकामिनी ।

वामनपंडित–रासक्रीडा.

---

१ संस्कृतांतील कूट, अंतर्लापिका वगैरे करमणुकीच्या प्रकरणांसारखा हा 'पोतक' कवीचा प्रयत्न आहे. हा असाच चालू ठेविल्यास कवीची कविता सरस निपजूं लागेल.

वरील काव्यकूटाचें उत्तर विशेषेंकरून पद्यांत द्यावें, अशी 'पोतकाची' फार इच्छा आहे. उत्तराचीं पद्यें चांगलीं दिसून आल्यास प्रसिद्ध करूं. कोचीस पाठवावीं.

अदृश्य त्यांच्या नयनांसि जाला, कीं गर्व सोसे न अधोक्षजाला ।

—सदर—

ह्यावरून तृ व द्द ह्यांना संयुक्तवर्ण ह्मणावें किंवा स्वरयुक्तवर्ण ह्मणावें ह्याचा निर्णय आपणच सांगा, ह्मणजे सर्वांसच ऐकावयास मिळेल. कृ. लो. अ. ही विनंती.

अमरावती
२८।१०।९८ पोतक.

## आमचें उत्तर.

रा. रा. द्विवेदी ह्यांच्या ह्मणण्याप्रमाणें तृ आणि द्द हे संयुक्तवर्ण नव्हेतच असें ह्मणतां येत नाहीं. कारण, प्राचीन संस्कृत कवींनीं वगैरे ऋॠ व ऌॡ हे जरी स्वर मानलेले आहेत, तरी त्यांची गणना शुद्ध स्वरांत होत नाहीं. ह्यास प्रमाणें:—

(१) ऋच्या उच्चारामध्यें—थोड्या अंशानें कां होईना—पण र्कार उत्पन्न होतो, हें उघड आहे. आणि र्काराची गणना व्यंजनांत आहे. तेव्हां अर्थात ऋ ह्या अक्षरांत कांहीं अंशानें तरी व्यंजन मिश्र आहे हें सिद्ध.

(२) स्वर ह्मटले कीं त्या सर्वांचे उच्चार निर्विकार—जिव्हा वर न उचलतां—झाले पाहिजेत. व तसेच सर्वांचे होतात. (अं, अः, चे मात्र होत नाहींत. कारण त्यांत अनुक्रमें म् व ह् हीं व्यंजनें संयुक्त होतात. अंचा उच्चार करतांना तोंड मिटतें तें मकार असल्यामुळें; आणि ह्याकरितांच 'पुढें अनुस्वार विसर्ग येतो, संयोग ऱ्हस्वास गुरुत्व° देतो, असे नियम बांधलेले आहेत.) ऋचा उच्चार दंततालव्य होतो. ह्यावरून तो स्वर—निदान शुद्धस्वर—तरी नव्हे हें उघड ठरतें.[1]

(३) ऋ हा स्वर आहे का व्यंजन आहे, त्याच्या योगानें मागील ऱ्हस्व अक्षरास दीर्घत्व येतें किंवा नाहीं, ह्याचा उलगडा परभाषेंत—(हिंदुस्थानांतील भाषांत नव्हे, कारण, त्यांचें संस्कृताशीं निकट सान्निध्य आहे. आणि त्यामुळें

---

१ "स्वराचा उच्चार करण्याकरितां कंठांतून निघणाऱ्या ध्वनीस कांहीं विकृति करावी लागत नाहीं; पण क. च. ट. त. प इ. वर्णोच्चार करतांना दंतोष्ठ्यकंठ तालवादिक स्थानांत विकृति करावी लागते. कंठांत कांहीं विकृति न करितां जो स्वरोच्चार होतो तोच स्वरविकृतीची उपाधि लागतांच वर्णरूप होतो."

श्री. रा. रा. रामराव कृष्ण जठार, मुमताजु दौलाबहादरकृत

अव्यक्तविचार.

त्यांतील बहुतेकांनीं ऋ, ॠ, ऌ, ॡ हे स्वर गृहीतवत् घेतल्यासारखें झालेलें आहे.) फार चांगला होतो. उदाहरणार्थ, इंग्रजीमध्यें ऋ लिहावयाचा तर ri, असें लिहावें लागतें. कृष्ण, पितृ, शरदृतु, हे शब्द लिहावयाचे तर *Kri*shna, Pi*tri*, Shara*dri*tu असे लिहावे लागतात. र ह्यांत R हें व्यंजन आहे. तें घातल्यावांचून ऋ ह्या स्वराचा उच्चार होत नाहीं ! हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

ह्याच भाषेवरून र् किंवा ऋकार हें कठोरव्यंजन असून ह्याच्या योगानें मागील ऱ्हस्व अक्षरास दीर्घत्व येतें हीही गोष्ट सिद्ध होते. उदाहरण, Clerk ह्मणजे कारकून हा शब्द. ईचा उच्चार कोठेंही आ असा होत नाहीं. परंतु पुढें R हें कठोर व्यंजन आल्याच्या योगानें वरील शब्दांत ई स्वरावर आघात होऊन 'आ' उच्चार होतो. आणि त्यामुळें सी, एल्, ई, आर्, के अशीं अक्षरें असतांही त्याचा उच्चार 'क्लार्क' असा झाला आहे.

(४) मलबारी भाषेमध्यें—किंवा वर्णांमध्यें—ऋ व ऌ ह्या अक्षरांच्या मध्योच्चारार्चे एक अधिक अक्षर असून त्याची गणना व्यंजनांत केलेली आहे. हिंदी भाषेमध्यें तृ आणि दृ ह्यांनीं पूर्वाक्षरास द्वित्व येत असल्याचें मान्य असल्याबद्दल रा. द्विवेदी ह्यांची वरच्याच पत्रांत साक्ष आहे.

(५) प्राचीन लोकमान्य महाराष्ट्र कवींना तृ आणि दृ ह्यांच्या योगानें आद्याक्षरास दीर्घत्व येतें, हें मान्य असल्याबद्दल उदाहरणें, वर पोतकांनीं दोन दिलींच आहेत, आणखीही आढळतात. तीं अशीं:—

(सवाई.)

**अमृत** मानस मान सुमानस राजस राजसभार्य खरा हो !
भारत वंशज भारत अंशज हा गत भ्रंशज जगन्मुखरा हो ॥ ४५

वामनपंडित—विराटपर्व.

मनीं जड प्रीतिस वास नाहीं। न लिंगदेहकृतवासना हीं।

वामन—योगवासिष्ठ—

नभीं मोकली **अमृतें** मेघधारा; सुवर्णांबुजें सांडिती रत्नगारा ॥ ५१

मुक्तेश्वर—रामायण—

नव्हे राजयाची खरी भाष माझी; जगीं धन्य तो वेंचला **पितृ**काजीं ॥ ५१

—किता—

अहो पितृनेत्रोदकें तृप्त झाला; मनें मुक्त सायुज्यब्रह्मीं मिळाला ॥ ११३

—किता—

निशी आंत वेशींत गोपगृहीं तो, प्रवेशींत अंतर्गृहीं आग्रही तो ॥ ६

आनंदतनय—गोरसक्रीडा.

लोपोनि आठरुप दावित एकलाची, ने स्वगृहासि गति धन्य तया लिलांची ॥

आनंदतनय—नवरसचरित्र.

तृ किंवा हृ हे जर शुद्ध स्वरच असते, त्यांच्या योगानें मागील अक्षरावर कांहींच आघात न होता, त्यांस दीर्घत्व न येतें, तर वरच्यासारख्या कवींना अशी योजना करण्याचें कांहींच कारण नव्हतें हें उघड आहे.

(६) आतां ह्याच्या उलट उदाहरणें—ह्मणजे कवितेंत तृ किंवा हृ आणून त्याच्या मागील अक्षरास द्वित्व येत नाहीं असें मानलें, तर ती कविता ह्मणावयाला कशी जड जाते तें सहज समजेल. प्राचीन संप्रदायास विरुद्ध न जाणारा, व शुद्धाशुद्धाविषयीं अत्यंत लक्ष्य पुरविणारा महाराष्ट्र कविवर्य ह्मटला ह्मणजे मोरोपंत होय. परंतु ह्या कवीचें श्लोकबद्धकाव्य फारच थोडें आहे. आणि तृ, हृच्यासंबंधानें उलगडा होण्याला श्लोकाशिवाय नीटसा मार्ग नाहीं. ह्यामुळें मोरोपंताच्या कवितेंत तृ किंवा हृच्या योगानें मागील अक्षरास द्वित्व आलेलें उदाहरण बहुधा कोठें आढळत नाहीं. पण तृ किंवा हृनें मागील अक्षरास द्वित्व न आणल्याचीं उदाहरणें बरींच आढळतात. त्यांची, तो तो छंद ह्मणतांना कशी दशा होते पहा:—

गुरुपितृपतिसुतऱ्हे ते, भूषण ह्मणती कुलस्त्रियांस, तऱ्ही तें. ॥ ३७

कृष्णविजय.

आह्मी दैवहतांनीं, निजपितृगृहवास बहु सुखत्वहतांनीं ॥ १०

"

वामन पंडितांनीं व मुक्तेश्वरांनीं तृ आणि हृ ह्या अक्षरांनीं त्याच्या मागील अक्षरास दीर्घत्व येतें असें मानून केलेल्या कवितांचीं उदाहरणें वर दिलींच आहेत. परंतु ह्याच कवींनीं जुनाट संप्रदाय अंगिकारून ह्मणजे तृ व हृ ह्यांनीं मागील अक्षरास द्वित्व येत नाहीं असें मानून—ह्मणजे वरच्या उलट—ही कविता केलेल्या आहेत. पण त्या ह्मणतांना कशी त्रेधा उडते ती पहावी:—

त्यजुनि सुहृद माया, चालिला रामभेटी ॥

—मुक्तेश्वर—

सत्यें करूनि करितों पितृतर्पणातें ।
कारणें अमृत दोनिहि जेव्हां ।

—वामन—

मुक्तेश्वर, व वामन हे दोघेही चांगले संस्कृतज्ञ असून त्यांची गणना उत्तम कवींत आहे. त्यांनींही जर दोन्ही पंथ–तृ आणि दृ ह्या अक्षरांनीं मागील अक्षरांस द्वित्व येतें, व येतही नाहीं–असें मानलें आहे, तर ह्या दोन्ही पद्धतींना निर्दोष तरी ह्मटल्या पाहिजेत, किंवा दोन्हीही सदोष ह्मटल्या पाहिजेत. अर्थात् ऋ ह्या वर्णाची गणना स्वरांतही होऊं शकेल व व्यंजनांतही होऊं शकेल.

(७) वरचीं उदाहरणें किंचित् लांब लांब झालीं. ह्याकरितां तृ, दृ हीं अक्षरें ज्यांत आहेत, व ज्यांत नाहींत असे कांहीं श्लोकांचे चरण अगदीं निकट सान्निध्यानें देतों. ह्मणजे छंदःशास्त्राचें घोडें कसें अडतें तें स्पष्ट दृष्टीस पडेल:—खालचे दोन चरण मालिनीवृत्ताचे आहेत:—

सुरस कवन चित्ता देतसे तोष फार ।
इतर पितर हर्षें नाचती स्वर्गलोकीं ।

ह्यांत तृ, दृ हीं अक्षरें नसल्यामुळें हे चरण किती सरळ ह्मणतां येतात तें पहा, आतां तृ, दृ अक्षरें घातलेले चरण:—

पितृसदन बरें हें वाटतें सर्व लोकां ।
विसदृश दिसतें हें स्पष्ट कीं लोचनाला ।
सुनृपति करि लोकीं लोककल्याण नित्य ।

ह्यांत तृ, दृ, नृ अक्षरांपाशीं येतांच छंदःशास्त्राचें घोडें कसें बाचकतें, तें लक्ष्यांत येईलच. तें कां बाचकतें? तर दृ ह्या अक्षराचा थोडा तरी आघात मागील र्‍हस्व अक्षरावर होतो ह्मणून. नाहींतर असें होण्याचें कांहीं कारणच नाहीं. ही गोष्ट अगदीं अनुभवसिद्ध दिसत असल्यामुळें, पृथ्वीच्या अंगांत आकर्षणशक्ति असो, कीं पदार्थांच्या अंगांत पतनधर्म असो, कसेंही असलें तरी, घरावरून उडी टाकणाराचा जसा पाय मोडावयाचा तो मोडावयाचा, त्यांत कांहीं कमी व्हावयाचें नाहीं. त्याप्रमाणें ऋ हा स्वर असो कीं व्यंजन असो; तृ आणि दृ हे संयुक्तवर्ण असोत, कीं स्वरमिश्रितवर्ण असोत; त्यानें मागल्या अक्षरांवर थोडें तरी द्वित्व यावयाचें तें यावयाचेंच, त्यांत चूक नाहीं.

ह्यावरून पक्षी ह्मणावें तर पिलें अंगावर पिवात; जनावर ह्मणावें तर पंख आहेत. तशा वाघळाच्या स्थितीप्रमाणें ह्या ऋ, ॠ व ऌ अक्षरांची

स्थिति आहे. ह्मणजे इंग्रजींतील W ह्या अक्षराप्रमाणें त्यांस स्वरही ह्मणतां येतील, व व्यंजनेंही ह्मणतां येतील. ऋ हें व्यंजन असें ह्मणण्याला फक्त एकच प्रमाण आहे. तें हें कीं, त्यांतील रकाराचा उच्चार किंचित् ऱ्हस्व होतो. द्विवेदी ह्मणतात त+ऋ (ऱ्ह नव्हे) मिळून तृ होतो. होय. परंतु ऋमध्येंच रकार आहे हें विसरतां कामा नये. आणि त्यांतील रचा मागील ऱ्हस्व अक्षरावर आघात होतो, ह्यांतही कांहीं संशय नाहीं. ह्या सर्वांचा विचार केला ह्मणजे तृ, दृच्या पाठीमागच्या ऱ्हस्व अक्षरास द्वित्व देणार कवि दोषास तर पात्र होत नाहींच; पण न देणारा कवीच एका अर्थानें अधिक दोषी होईल. आतां कर्मनिष्ठ ब्राह्मणांप्रमाणें ज्यास आपल्या काव्यांत येवढाही दोष ठेवणें इष्ट वाटत नसेल, त्यानें तृ, दृ इत्यादि ऋकारयुक्त अक्षरें ऱ्हस्व अक्षरापुढें कधींच आणूं नयेत हा मार्ग उत्तम होय. इतकाच आमचा अभिप्राय आहे. रा. द्विवेदी ह्यांनीं आमच्या लेखांचें व कवितांचें अभिनंदन केल्याबद्दल आह्मी त्यांचे उपकारी आहोंत; व त्यांनीं असेंच मार्मिक अवलोकन करून कमीजास्त कळवित जाण्याविषयीं त्यांस प्रार्थनाही आहे. वादग्रस्त गोष्टींचा ऊहापोह होणें, दोषांचा खल होणें ह्या गोष्टी सदासर्वदा उपयुक्तच आहेत.

—ए० के० को०—

---

# राजयोगाबद्दल.

रा.रा. रघुनाथ केशव खरे; 'केरळकोकिळ'वर्गणीदार—गुलसराई—हे लिहितात:—

"सा. वि. वि. चालू वर्षाचे 'कोकिळ'चे अंक पोंचले. फार दिवसांपासून

---

१. रसिकवर्य कै. परशुरामपंत तात्या गोडबोले, ह्यांनीं शब्दांच्या गुरुत्वाविषयीं छंदःशास्त्राचा जो नियम 'वृत्तदर्पणां'त सांगितला आहे, त्यावरूनही वरील प्रकाराचा चांगला निर्णय ठरतो. त्यांनीं येणेंप्रमाणें ह्मटलें आहे:—

"प्राकृतांत तुह्मी ह्या शब्दाचे दोन उच्चार आहेत, ह्मणजे एक 'तु' वर आघात देऊन आहे, व दुसरा त्याशिवाय आहे. जेव्हां आघात असतो, तेव्हां 'तु' ह्या ऱ्हस्वाक्षराला गुरुत्व येतें, आघात नसतो तेव्हां येत नाहीं. तात्पर्य कीं, संयुक्ताक्षराच्या योगानें मागील ऱ्हस्वाक्षराला गुरुत्व येणें हें त्याच्या आघातावर आहे—प्राकृत शब्दांत कित्येक ठिकाणीं आघात येतो आणि कित्येक ठिकाणीं येत नाहीं ह्मणून गुरुत्व निश्चित नाहीं."

'कोकिळ' न आल्यानें अशी शंका साहजिकच उत्पन्न झाली होती कीं तें बंद-पडलें असावें. परंतु त्याचें इतके दिवस न येण्याचें कारण कळल्यानें त्या शंकेची निवृत्ति होऊन परमानंद झाला. आणि विशेष आनंददायक गोष्ट ही कीं, त्यांत आपण राजयोगासारखा सर्वोत्तम विषय देण्यास आरंभ केला आहे. ह्या-पूर्वी राजयोग माझे हातीं पडून त्याचें मराठी भाषांतर यथामति करावें अशी मला साहजिकच इच्छा उत्पन्न झाली. परंतु तो विषय गहन असल्यानें, माझ्यासारिख्या अल्पमतीच्या हातून हें काम नेटानें शेवटास कसें जाईल इत्यादि विचार प्रथमतः मनांत आले होते. तथापि यथामति त्याचें भाषांतर करण्याचें योजून तसें करण्यास प्रारंभ केला. ४०।५० पानांचें भाषांतर झालें. इतक्या-मध्यें कोकिळानें येऊन भेट दिली. आणि त्यांत तो विषय पहातांच फार आ-नंद झाला. कारण, जसा विषय असतो, तसाच जर त्यास भाषांतरकर्ता मिळाला तरच त्याच्या योग्यतेचें भाषांतर होऊन त्यांत वाचकांस मजा वाटते. हें आपण हातीं घेतल्यानें मलाच एकट्याला आनंद होत आहे असें नाहीं. तर ज्यांनीं ज्यांनीं त्या जगद्विख्यात पुरुषाचीं 'लेक्चर्स' पाहून आपलें भाषांतर पाहिलें आहे, त्यांस देखील फार आनंद झाला. त्या विषयाला भाषा जितकी सुगम पाहिजे, तितकी भाषांतरांत ठेवण्याला आपण प्रयत्न केला आहे."........


इत्यादि सांगून त्यांतील चार वाक्यांबद्दल संशय प्रदर्शित केला आहे. परंतु चूक राहून गेल्याबद्दल आह्मांसही वाईट वाटतें. आमच्यामध्यें व आमच्या छापखान्यामध्यें फार अंतर असल्यामुळें प्रुफें पहाण्यास अडचण पडते, आणि त्यामुळें अशा चुका घडतात, उपाय नाहीं. अंक छापून प्रसिद्ध झाल्यानंतर त्या आमच्याही लक्ष्यांत आल्या होत्या. सदरहू विषय रा. खरे यांनीं बारकाईनें वाचून आह्मांस कळविल्याबद्दल आह्मी त्यांचे बहुत आभार मानून पुढील अंकीं दुरुस्ती करतों. आह्मी केलेल्या पुस्तकांची माहिती रा. रा. ज० म० गुर्जर–'केरळकोकिळ'चे मालक–रामवाडी–मुंबई, यांजकडेस मिळेल. बाकी पत्राचें उत्तर खासगी पत्रानें कळविलें आहेच. —ए० के० को०—

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar at JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

# केरळकोकिळ.

पु० १२ ] [अं० १२

## राजयोग.



## प्रकरण चवथें.

### अध्यात्मिक प्राण.

योग्याच्या मताप्रमाणें पाठीच्या कण्यामध्यें ज्ञानतंतूंचे दोन प्रवाह आहेत. त्यांस '**इडा**' आणि '**पिंगळा**' असें ह्मणतात. तेथेंच आणखी एक पोकळ नळी असते, तीस '**सुषुम्ना**' असें ह्मणतात. ही नळी पृष्ठरज्जूंतून गेलेली असते. योगी '**कुंडलिनीचक्र**' ह्मणून ह्मणतात, तें ह्या पोकळ नळीच्या शेवटच्या टोंकाला असतें. त्याचा आकार तिकोनी असून त्यामध्यें, योग्यांच्या सांकेतिक भाषेनें जिला '**वेटाळें घालून बसलेली कुंडलिनी**' ह्मणतात, ती शक्ति असल्याचें वर्णन करितात. ती **कुंडलिनी** जागृत झाली ह्मणजे ह्या पोकळ नळींतून झपाट्यानें जाऊं लागते; आणि ती जसजशी घर चढूं लागते, तसतसे मनाचेही पदर एकामागून एक खुले होत जातात असें वाटतें. हे सारे निरनिराळे साक्षात्कार व अलौकिक शक्ति योग्यांस प्राप्त होतात. ती मेंदूला जाऊन पोंचली कीं, योगी हा शरीर व मन ह्यांपासून अगदीं अलग होतो. आत्म्याचें शुद्ध स्वरूप दिसून येतें. पृष्ठरज्जूची रचना एका विशेष रीतीची असल्याचें आपणांस माहित आहे. आपण **ळ** हें अक्षर घेतलें, तर त्यांत दोहोंकडे दोन भाग असून मध्यंतरीं ते सांधलेले दिसतात. आतां समजा कीं हे **ळ** त्याची ओळ, व तिच्याशीं संयुक्त झालेला सांधा सोडून—एकावर एक ठेवले, आणि त्याची उतरंडी रचली, तर तो पृष्ठरज्जूचा आकार झाला. डाव्या बाजूची **इडा**; आणि उजव्या बाजूची ती **पिंगळा** होय. आणखी, पृष्ठरज्जूच्या मध्यांतून जाणारी जी पोकळ नळी ती **सुषुम्ना** होय. ज्या थोड्याशा मज्जातंतूमध्यें पृष्ठरज्जू समाप्त होते, तेथून एक सूक्ष्मज्ञानतंतू खालीं गेलेला असतो. त्यांत सुद्धां ही नळी असते. पण ती अत्यंत सूक्ष्मरूपानें असते. ह्या नळीचें खालचें तोंड—शेवट—बंद असून तें, '**मज्जाकंद**' असें ज्याला ह्मणतात, त्यालाच लागून असतें. अर्वाचीन शास्त्राप्रमाणें ह्या मज्जाकंदाचा आकारही तिकोनीच आहे. भिन्न भिन्न कंद—ज्यांचीं मुळें किंवा देंठ—पृष्ठरज्जूमध्यें आहेत, तेच योग्यांच्या निरनिराळ्या चक्रांच्या ऐवजीं घेतले, तर उत्तम शोभतील.

आरंभींच्या मूलाधार चक्रापासून तों, मेंदूमध्यें असणारें जें **'सहस्रार'-सहस्रदलकमल**-तेथपर्यंत योगी अनेक चक्रें असल्याचें कल्पितो. ह्याकरितां, त्या चक्रांच्या ऐवजीं आपण निरनिराळे मज्जाकंद घेतले, तर योग्याची कल्पना अर्वाचीन शारीरशास्त्रभाषापद्धतीप्रमाणें सुद्धां अगादीं सहज ध्यानांत येईल. ज्ञानतंतूंच्या प्रवाहामध्यें दोन तऱ्हेच्या क्रिया असलेल्या आपणांस माहितच आहेत. एक केंद्रोद्वाहक आणि दुसरी केंद्राभिवाहक किंवा एक ग्राहक आणि दुसरी प्रतिसारक. एक बाहेरील ज्ञान मेंदूकडे घेऊन जाते, आणि दुसरी मेंदूंतील ज्ञान शरीराच्या बाह्य प्रदेशावर आणते. हे सारे ज्ञानरसप्रवाह एका लांब ज्ञानतंतूंतून जाऊन मेंदूस मिळालेले असतात. पुढील विवेचनाचा मार्ग अधिक खुला होण्यासाठीं आपणांस आणखीही कित्येक गोष्टी ध्यानांत ठेवल्या पाहिजेत: ह्या पृष्ठरज्जूच्या वरचा शेवट, मेंदूजवळ मगजामध्यें एक प्रकारचा गोळा आहे, त्यांत असतो. हा गोळा मेंदूला लागलेला नसतो. तर मेंदूंतील एका प्रकारच्या रसांत तरंगत असतो. असा कीं, मस्तकावर एखादा तडाका बसला तर, त्याच्या आघाताचा लय त्या रसांत व्हावा, आणि त्या गोळ्याला इजा होऊं नये. पुढील विवेचनामध्यें ही गोष्ट फार महत्वाची असल्याचें दिसून येईल. दुसरें, साऱ्या चक्रांचीही आपणांस माहिती असली पाहिजे. विशेषेंकरून तीन तर ध्यानांत पाहिजेतच. तीं तीन ह्मणजे एक **मूलाधार** ( खालचें चक्र ), दुसरें **सहस्रार** ( मेंदूंतील सहस्रदलकमल ) आणि तिसरें **स्वाधिष्ठान** ( नाभिचक्र ) हीं होत. नंतर पदार्थविज्ञानशास्त्रापैकींही एक तत्त्व आपणांस लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. विद्युत् आणि तिच्याशीं संयुक्त असलेल्या इतर शक्तींविषयींही आपण सारे ऐकतों. विद्युत् ह्मणजे काय आहे हें कोणासच कळलेलें नाहीं. तरी जेथपर्यंत तिचा शोध लागलेला आहे, तेवढ्यावरून ती एक तऱ्हेची शक्ति आहे इतकें मात्र समजतें.

परंतु जगामध्यें दुसऱ्याही अनेक शक्ति आहेत. तेव्हां त्यांच्यामध्यें आणि विजेमध्यें भेद काय? समजा; कीं हें टेबल हालतें; ह्याचें कारण, तें ज्या परमाणूंचें बनलेलें आहे, ते परमाणू भिन्न भिन्न दिशेनें जाऊं लागतात. ते सारे एकाच दिशेनें जाऊं लागतील तर, ती वीज

होईल. सारे परमाणू एकाच दिशेनें जाऊं लागणें हीच विद्युत् किंवा विद्युच्छक्ति होय. एका खोलींतील हवेचे सारे परमाणू जर एकाच दिशेनें जातील असें केलें, तर तीच त्या खोलींतील विद्युत्‌ची एक प्रचंड **ब्याटरी** होईल. शारीरशास्त्रांतील आणखी एक मुद्दा आह्मांस ध्यानांत ठेवला पाहिजे. तो हा कीं, श्वासोच्छ्वासक्रिया नियमित चालविणारें जें चक्र, त्याच्या अंगीं ज्ञानरसप्रवाहाच्या व्यवस्थेवर अंमल चालविण्याजोगी थोडीशी शक्ति असते. आणखी, हें श्वासोच्छ्वासावर सत्ता चालविणारें चक्र, छातीच्या समोरीनें पाठीच्या कण्यामध्यें असतें. तें चक्र श्वासोच्छ्वास इंद्रियांना व्यवस्थित रीतीनें चालवून शिवाय इतर त्याच्या खालच्या चक्रांवरही थोडीशी सत्ता चालविण्याचा प्रयत्न करतें.

ह्यावरून श्वासोच्छ्वासाचा—प्राणायामाचा—अभ्यास कां करावा तें आपल्या लक्ष्यांत येईल. प्रथमदर्शनीं, नियमबद्ध श्वासोच्छ्वासांच्या योगानें शरीरांतील दरोबस्त परमाणूंची प्रवृत्ति एका दिशेकडे होते. मन जेव्हां इच्छारूप बनतें, तेव्हां ज्ञानप्रवाहासही विद्युच्छक्तीप्रमाणें एक शक्ति प्राप्त होते. कारण, विद्युत्प्रवाहाच्या क्रियेनें ज्ञानतंतूंना ध्रुवोत्सारक गति प्राप्त होत असल्याचें सिद्ध झालें आहे. ह्यावरून दिसून येतें कीं, इच्छाच जेव्हां ज्ञानतंतूरूप बनते, तेव्हां तिला कांहीं अंशीं विद्युत्स्वरूप येतें. शरीरांतील सर्व शक्ति नियमसूद झाल्या, ह्मणजे शरीर हें जणों काय इच्छेची एक मोठी जबरदस्त—**ब्याटरी**—खजिनाच बनून राहतें. ही जबर इच्छा हीच काय ती योग्याला मुख्य हवी असते. ह्मणून प्राणायामाच्या अभ्यासाचा प्राणिधर्मशास्त्राप्रमाणेंही ह्यांतच उलगडा झाला. त्याच्या योगानें शरीरांतील सर्व क्रिया नियमसूद चालतात; आणि श्वासोच्छ्वासचक्रांकडून इतर चक्रांवर सत्ता चालविण्याच्या कामींही मदत होते. प्राणायामाचा मुख्य उद्देश, **मूलाधार** चक्रांतील **कुंडलिनी**नामक शक्ति, जी वेटाळें घालून बसलेली असते, ती जागृत करणें हा होय.

प्रत्येक गोष्ट जी आह्मी पहातों; किंवा जिची आह्मी कल्पना करतों; किंवा जी स्वप्नांत आपल्या दृष्टीस पडते; तिला पहावयाला आमच्यापाशीं एक स्थान असलें पाहिजे. हें स्थान हेंच नेहमींचें आकाश

किंवा **महदाकाश** होय. योग्याला जेव्हां दुसऱ्या व्यक्तीचे अंतर्गत विचार कळूं लागतात, किंवा दिव्य—अगम्य—पदार्थ जेव्हां तो पाहूं लागतो, तेव्हां ते त्याला दुसऱ्याच एका पोकळींत दिसतात. त्या पोकळीला '**चित्ताकाश**' किंवा मानसिकस्थान असें ह्मणतात. ज्ञान जेथें ज्ञेयरहित होतें; चैतन्य जेथें निर्हेतुक होतें; आणि आत्मा जेथें स्वयंदीप्तीनें झळकूं लागतो, त्याला '**चिदाकाश**' किंवा ज्ञानस्थान असें ह्मणतात. **कुंडलिनी** जागृत होऊन जेव्हां सुषुम्नेंत प्रवेश करते, तेव्हां सर्व ज्ञान चित्ताकाशामध्यें असतें. आणि ती जेव्हां मेंदूंत असलेल्या आपल्या शेवटाच्या तोंडाला जाऊन पोंचते, तेव्हां निर्विषयज्ञान **चिदाकाशा**मध्यें असतें. तारायंत्राच्या सादृश्यावरून आपणास असें वाटतें कीं, तार असेल तेथपर्यंतच प्रवाह पाठवितां येईल. परंतु सृष्टविद्युत्‌ला आपला प्रचंड प्रवाह पाठविण्याला तारांची मुळींच जरूर नाहीं. ह्यावरून असा सिद्धांत निघतो कीं, खरोखर तारांचीही कांहीं गरज नाहीं. परंतु तारेशिवाय प्रवाह चालूच करतां येणार नाहीं, हा जो आमचा कमकुवतपणा, तोच आह्मांस तारेचा उपयोग करणें भाग पाडतो.*

अशाच रीतीनें ह्या ज्ञानतंतूंच्या द्वारें सर्व शारीरिक ज्ञान आणि गति देणारे पृष्ठरज्जूंतील ज्ञानतंतूंचे जे दोर त्याच योग्याच्या **इडा** व **पिंगला** होत. ह्या दोन मोठ्या नळांतून **उत्सारक** आणि **अभिसारक** प्रवाह खेळत असतात. पण मनानें ज्ञानतंतूंशिवायच कां बातमी पाठवूं नये? किंवा कोणत्याही तंतूंवाचून किंवा तारांवांचूनच ती कां घेऊं नये? सृष्टीला ही गोष्ट शक्य आहे हें आपणांस माहितच आहे. योगी ह्मणतो हें जर तुह्मांला करतां आलें, तर तुह्मी मायाबंधांतून मुक्त झालांच. तर मग तें करावें कसें? पाठीच्या कण्याच्या मध्यावर असलेली पोकळ नळी जी सुषुम्ना, तींतून ज्ञानरसाचा प्रवाह जर तुह्मांला खेळवितां आला, तर तुह्मांला हें गूढ सुटलें. हें ज्ञानतंतूंचें जाळें जर मनानेंच विणलेलें आहे, तर तें त्यानेंच तोडलें पाहिजे. ह्मणजे ज्ञान-

---

* 'केरळकोकिळ' पुस्तक ३ अं० १० पान २३० ह्यामध्यें 'गोगलगायीचें तारायंत्र' ह्यासंबंधानें अपूर्व माहिती दिली आहे. ती अवश्य पहावी. ह्मणजे तारेच्या साह्यावांचूनच केवळ तादात्म्यशक्तीनें बातमी पाठवितां येते, ही गोष्ट समजून येईल.

—ए० के० को०—

तंतूंवांचूनच सर्व व्यापार सुरळित चालेल व तारांची जरूर रहणार नाहीं. असें झालें तरच ज्ञान हें आपणांकडे येईल. मग त्याला शरीराच्या आधीन राहण्याचें कारण नाहीं. सुषुम्नेला कह्यांत आणण्याची आवश्यकता फार मोठी आहे, ह्याचें कारण तरी हेंच. तारांप्रमाणें ज्ञानतंतूंच्या साह्यानें जो प्रवाह चालतो, तो जर आपणांस त्यांच्यावांचून ह्या पोकळ नळींतूनच मानसिक शक्तीनें चालवितां येईल, तर हें गूढ सुटलें; आणि तसें करतांही पण येईल असें योगी ह्मणतो.

साधारण व्यक्तिमात्रांतही सुषुम्ना खालच्या बाजूनें बंद असते, व तिच्यांतून कोणताही प्रवाह जात नाहीं. योगी असें प्रतिपादन करतो कीं, तें तोंड अभ्यासानें उघडतां येतें, आणि त्यांतून ज्ञानरसाचा प्रवाह सोडतां येतो. कोणताही विकार एकाद्या मज्जातंतूकडे गेला, कीं चक्रांत प्रतिक्रिया सुरू होते. आपोआप चालणाऱ्या चक्रांमध्यें प्रतिक्रियेनंतर लगेच गति सुरू होते. आणि सज्ञान चक्रामध्यें प्रथमतः जाणीव उत्पन्न होतें, आणि मागाहून गति चालू होते. बाह्यक्रियेची प्रतिक्रिया हेंच सारें जाणीव आहे. तर स्वप्नामध्यें जाणीव कसें उत्पन्न होतें? तेथें तर, कोणतीच बाह्यक्रिया असत नाहीं. ह्यावरून निरनिराळ्या चक्रांमध्यें गति देणाऱ्या शक्ति जशा निद्रिस्त असतात, असें सिद्ध झालें आहे, त्याचप्रमाणें भावनाशक्तीही. कोठें तरी निद्रिस्त असल्या पाहिजेत. उदाहरणार्थः—मी एक शहर पाहतों, त्या शहराचें ज्ञान होणें ह्मणजे त्या शहरांत अंतर्भूत वस्तूपासून उद्भवलेला जो ज्ञानरसप्रवाह—त्याची प्रतिक्रिया किंवा प्रतिबिंब होय. ह्याचा स्पष्ट अर्थ इतकाच कीं, त्या शहरांतील दृश्य वस्तूंनीं माझ्या ज्ञानतंतूंत क्रिया सुरू झाली, व ह्या क्रियेस अनुसरून मेंदूच्या परमाणूंत एक तऱ्हेची गति उत्पन्न झाली. ह्यालाच मी माझें शहरसंबंधीं ज्ञान ह्मणतों. आतां त्यास पुष्कळ काळ गेल्यानंतरही, मला त्या शहराची आठवण करतां येते. आणि त्या आठवणींत अगदीं हुबेहूब तोच देखावा दिसतो. मात्र इतकेंच कीं, तो थोडासा अंधुक असतो. पण हा अंधुक आकार—त्याच्याच सारखा ज्ञानप्रवाहाचा ठसा—तरी आला कोठून? तो पूर्वीसारखा जाणीवापासून आलेला नव्हे, हें तर खचित आहे. तर मग हें ज्ञान कोठें तरी वेटाळून बसलेलें होतें, असें ह्मटलें पाहिजे.

आणि त्यानें आपल्या कृतीनें प्रतिबिंब किंवा प्रतिक्रिया उत्पन्न केली. ह्यालाच आपण स्वप्नज्ञान असें ह्मणतों. तर असें, जणों काय सांठवून ठेवल्याप्रमाणें सारें ज्ञान ज्या चक्रामध्यें राहिलेलें असतें, त्यासच 'मूलाधार'—ज्ञानकंद—किंवा मूलस्थान असें ह्मणतात. आणि क्रियांचें वेटाळून बसलेलें जें ज्ञान—शक्ति—तीच वेटाळें घातलेली कुंडलिनी होय. हें बरेंच संभवनीय दिसतें कीं, स्वयंचलित इंद्रियशक्तींचा सांठा ह्याच चक्रांत असला पाहिजे. कारण बाह्य पदार्थांचें पुष्कळसें चिंतन किंवा अभ्यास केला ह्मणजे मूलाधार चक्राजवळचा शरीराचा भाग (माकडहाडाजवळ) तप्त होतो. आतां ही वेटाळून बसलेली शक्ति जर जागृत केली आणि झपाट्यानें कार्यास लावली आणि तिला मुद्दाम सुषुम्नेच्या नळींत ढकलली, आणि ती एकामागून एक चक्रें सर करीत गेली तर तींत विलक्षण प्रतिक्रिया सुरू होईल. ह्या क्रियाशक्तीचा एक लहान—अगदीं क्षुल्लक अंश—जर ज्ञानतंतूंमध्यें शिरला, तरी सुद्धां चक्रांतून त्याची प्रतिक्रिया सुरू होते, आणि स्वप्न किंवा कल्पनातरंग उत्पन्न होतात. तर मग चिरंतन अंतर्ध्यानसामर्थ्यानें—अनंत जन्मींचा—जो ह्या शक्तीचा प्रचंड सांठा—समुद्र—त्याचा लोंढा जर सुषुम्नेतून निघाला, आणि चक्रांवर आदळत चालला, तर त्याची क्रिया फार विलक्षण, स्वप्नाच्या आणि कल्पनेच्या प्रतिक्रियेहून पुष्कळ उच्च प्रतीची, साधारण ज्ञानाच्या प्रतिक्रियेपेक्षां अतिशय टिकाऊ—शाश्वतची—अशी होईल. अंतर्ज्ञान तें हेंच. ह्याच स्थितीला मन पोंचलें ह्मणजे तें ज्ञानसंपन्न किंवा ज्ञानमय झालें, असें ह्मणतात. आणि सर्व ज्ञानाच्या राजधानीचें शहर जें मेंदू, तेथें जेव्हां तें पोंचतें, तेव्हां जणों काय सारा मेंदू, जणों काय शरीरांतील प्रत्येक परमाणु, प्रतिक्रिया सुरू करतो, असें वाटतें. आणि अखेरीस परमात्मज्ञानप्रकाशाची पूर्ण—देदीप्यमान ज्वाला दिसूं लागते. ही **कुंडलिनी** जेव्हां एका पाठीमागून एक चक्रें सर करीत जाते, तेव्हां जणों काय मनाचे पदर एकामागून एक उलगडत जाऊन योग्याला, सूक्ष्म व व्यक्त अशीं विश्वाचीं दोन्हींही रूपें स्पष्ट दिसूं लागतात. तेव्हां ज्ञान आणि प्रतिक्रिया हीं जीं ह्या विश्वाचीं दोन कारणें तींच केवळ यथातथ्य रीतीनें कळूं लाग-

तात, आणि त्यापासून सर्व ज्ञान प्राप्त होतें. कारणें समजलीं ह्मणजे त्यांच्या कार्यांचें ज्ञान त्याच्या पाठोपाठ यावयाचेंच.

परमात्मज्ञान, अतींद्रियशक्ति, आणि आत्म्याचें सत्यस्वरूप ह्यांची प्राप्ती करून घेण्याला कुंडलिनी जागृत करणें हाच एक मार्ग आहे. परमेश्वरभक्ति, सद्गुरुकृपा, तत्त्ववेत्त्याचें तत्त्वशोधनइच्छासामर्थ्य इत्यादि दुसऱ्याही कितीएक मार्गांनीं ह्या गोष्टी साध्य होऊं शकतील. तथापि जिला अलौकिक शक्ति किंवा अलोट बुद्धि असें नेहेमीं ह्मणतात, तिचा जेथें जेथें प्रभाव दिसून येतो, तेथें तेथें सुषुम्नेंत शिरलेल्या **कुंडलिनी**च्या प्रवाहाचा थोडा तरी अंश असलाच पाहिजे. इतकेंच कीं अशा दैविक चमत्कारांपैकीं बहुतेकांमध्यें चुकून—त्या लोकांस न कळतांच—अशा प्रकारचा कांहीसा अभ्यास घडलेला असतो. आणि तेणेंकरून **कुंडलिनी**च्या वेटाळ्यांपैकीं एखादा लहानसा पदर सुटतो. सर्व प्रकारचीं भजनपूजनें—मग तीं जाणून झालेलीं असोत, किंवा अजाणतेपणानें घडलेलीं असोत—तीं अखेर पोंचवितात येथेंच. आपल्या प्रार्थनेचें प्रतिफल आपण घेत आहों असें ज्या मनुष्यांस वाटतें, त्यांना हें कळत नाहीं कीं, आपल्याच अंतर्गतशक्तीनें ही सिद्धि प्राप्त झालेली आहे. कारण, स्वतःच्या देहांतच ही वेटाळें घालून वसलेली जी अगाध शक्ति, तिच्यांतील यत्किंचित् अंश जागृत होण्याला जी मनोमुद्रा किंवा धारणा लागते, ती आपोआप—न कळतच—त्यास साध्य झालेली असते. योगी अशी खातरी करितो कीं, ज्याला मनुष्यें भीतीच्या वेळीं व संकटाच्या वेळीं अशा प्रकारें अज्ञानपणानें नानाविध नांवांनीं भजतात, तीच **कुंडलिनी**शक्ति प्रत्येक जीवमात्रांत वेटाळें घालून वसलेली असते. सनातन ब्रह्मसुखाची जन्मदात्री तीच. मात्र ती साध्य—जागृत—कशी करावी येवढें कळलें पाहिजे. आणखी **राजयोग** हें धर्माचें सर्व प्रकारचीं भजनपूजनें, प्रार्थना, विधि, उत्सव आणि साक्षात्कार ह्यांच्या यथातथ्य प्रतिपादनाचें शास्त्र आहे.

# लोकोत्तर चमत्कार.

## प्रेतांचे मक्तेदार.

प्रत्येक मनुष्याचा प्रयत्न आणि इच्छा सुखासाठीं; आणि तें सुख पैशानें मिळतें अशी समजूत. ह्मणून तो मिळविण्याविषयीं मनुष्य नाना तऱ्हेचे यत्न करतो. सरळ रीतीनें यश न आलें तर, तो वांकड्यांत शिरतो. त्यांत आपण काय करतों आणि काय नाहीं, ह्याचीही त्यास शुद्ध राहत नाहीं. दुसऱ्याचे गळे कापणें, प्राण घेणें अशीं घातक कर्मे करण्यासही तो मागें सरत नाहीं. अशा प्रकारचे दुष्ट व अधम लोक ह्मणजे मनुष्यरूपानें उत्पन्न झालेले राक्षसच होत. असे नराधमही पृथ्वीवर कधीं कधीं उत्पन्न होतात, आणि त्यांचीं कृत्यें ऐकून अंगावर कांटा उभा राहतो. बर्क आणि हेअर हे दोन पुरुष—पुरुष कशाचे? राक्षसच—अशा प्रकारचे पाश्चात्य देशांत होऊन गेले. त्यांनीं आपल्यासच नव्हे, तर यच्चयावत् मानवी स्वभावासही कलंक लावून इतिहासामध्यें आपलीं नांवें काळ्याकुट्ट रंगानें नोंदवून ठेवलीं आहेत. तीं त्यांचीं कृष्णकारस्थानें सांगण्याचा आज संकल्प केला आहे.

पाश्चात्य देशामध्यें मनुष्याची प्राणहानि होण्याला हल्लींच्या काळांत एक मोठें चमत्कारिक साधन निघालें आहे. तें कोणतें? तर आयुष्याचा विमा उतरणें. ज्याच्या नांवचा विमा उतरलेला असतो, तो मयत झाला ह्मणजे त्याच्या पश्चात् त्याच्या वारसाला, किंवा तो ज्याचें नांव दाखल करून ठेवील त्याला ठरलेली रक्कम मिळते. हेंच तोंडाला पाणी सुटण्याचें कारण. ह्यामुळें अनेक अनर्थापात होत असल्याचें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत आहे. कित्येक, नीच, दरिद्री, लोभिष्ठ आईबापें आपल्या लहान लहान मुलांचा विमा उतरतात, आणि मग त्यांचे—प्रत्यक्ष पोटच्या गोळ्याचे—हाल हाल करून, त्यांस उपासमार घालून ठार मारतात! आणि लागलीच मोठ्या आनंदानें जाऊन त्यांच्या विम्याचे पैसे घेऊन खुशाल आपलीं पोटें जाळतात!! तेव्हां आईबापांच्या ममतेची, मानवी स्वभावाची, आणि धनलोभाची कमाल आहे कीं नाहीं? मग कन्याविक्रयालाच कां हांसावें? हेंच बीज सांप्रत आमच्या देशां-

तही पसरून त्याचे तरु उगवत चालले आहेत. मुंबईस नुकतेच एका विमा उतरून ठेवलेल्या गृहस्थाच्या मित्राला, एका विमा उतरणाऱ्या कंपनीनें फांसावर चढविल्याचें आमच्या कितीएक वाचकांना कदाचित् माहितही असेल. परंतु आह्मीं वर सांगितलेल्या दुकलीची कडी ह्याहूनही वरची आहे, करितां त्यांचेंच आख्यान आतां सुरू करूं.

इ० स० १८२८ त स्कॉटलंडमध्यें वैद्यशास्त्राची चांगली भरभराट झाली. तेथील शस्त्रवैद्यांनीं मनुष्यांचीं प्रेतें फाडून पाहून नव्या नव्या शोधांनीं शारीरशास्त्रामध्यें भर घालण्याचें मनावर घेतलें होतें. पण अशी शरीराची विटंबना करण्यास रोज रोज प्रेतें देणार तरी कोण? आणि तीं मिळणार तरी कशीं? तेव्हां तीं त्यांनीं विकत घेण्याचें ठरविलें. उन्हाळ्यामध्यें प्रत्येक प्रेतास ते ८ पौंड देत, व हिंवाळ्यांत मृत्युसंख्या कमी असल्यामुळें प्रेतांची जरा चणचण असे, ह्मणून त्या दिवसांत ते दर प्रेतामागें १० पौंड देत. तरीही प्रेतें पुरेशीं मिळण्याची मारामारच पडे. कारण, उघडच आहे कीं, आपल्या जिवलगाच्या मृतदेहाला कां होईना? पण छिन्नभिन्न केलेलें मायेच्या माणसाला कसें खपणार? तेव्हां अर्थातच ह्या कामाला प्रेत मिळावयाचें तें, ज्याचे आप्त दारिद्र्यानें गांजलेले असतील त्याचें, किंवा जो कोणी अनाथ असेल त्याचें मिळावयाचें. त्यावांचून दुसरा मार्ग नाहीं. तेव्हां अर्थातच वरील शस्त्रवैद्यांना आणखीही प्रेतांची किंमत वाढविणें भाग पडलें. प्रत्येक प्रेताची किंमत दहा पौंड होती ती त्यांनीं बारा पौंड केली. ह्मणजे प्रत्येक प्रेतामागें सव्वाशें रुपयांच्याही वर किंमत मिळूं लागली. तेव्हां हा धंदा बरा आहे असें मनांत आणून बर्क व हेअर ह्या दोन गृहस्थांनीं ह्या ठरविलेल्या दराप्रमाणें प्रेत पुरविण्याचा त्या शस्त्रवैद्यांकडून मक्ताच घेतला आणि त्या कामास लागले.

हे दोन गृहस्थ आयर्लंडांतले राहणारे होते. तरी त्यांनीं एडिंबरो शहरांतील ओल्डटाउनमध्यें आपला धंदा सुरू केला. प्रथम प्रथम त्यांना गरीबगुरिबांचीं बरींच प्रेतें मिळत. परंतु पुढें पुढें त्यांचाही तुटवडा पडूं लागला. तेव्हां त्यांनीं बिनदिकत दुसऱ्याचे जीव घेण्याचें काम सुरू केलें! एखादा अप्रसिद्ध, ज्याची वास्तपुस्त करणारें नाहीं, एखादा भिकारी, घरांतून बाहेर पडलेली उंडगी बायको,

किंवा ज्याचे इष्ट आप्त जवळसार नाहींत असा एखादा पुरुष, अशांच्या ते नेहेमीं टेहळणीवर राहीत. आणि तसें कोणी सांपडलें कीं, त्याच्याशीं ते मैत्री करून त्यास मोठ्या आदरसत्कारानें आपल्या बिऱ्हाडीं आणित. त्यांचें बिऱ्हाड तरी एखाद्या लहानशा गल्लीकुचींत होतें असेंही नाहीं. तर तें भरवस्तींत अगदीं शहरच्या मध्यावर एका मोठ्या वाड्यांत होतें. तेथें त्या बिचाऱ्यास व्हिस्की नांवाची खूपशी कडक दारू पाजीत; तो चांगला झिंगला ह्मणजे त्याला नेऊन बिछान्यावर निजवीत; आणि मग त्याचा जीव घेण्याचें काम उरकीत! ह्यावरून ह्या कर्मचांडाळांनीं मनुष्यमात्रासाठीं जाळेंच पसरलें होतें, हें दिसून येईल; व दीन दुबळीं असत तीं त्यांत सांपडत.

त्यांनीं पहिला केलेला खून एका स्त्रीचा होता. ही स्त्री, त्यांच्या नादास लागून त्यांच्या बिऱ्हाडीं गेली होती. तिचा त्यांनीं जीव घेऊन तें प्रेत एका पेटींत घातलें, आणि एका मजुराकडून डाक्टराकडे नेलें. दुसरा एक बिऱ्हाडकरू सांपडला. हा आला तेव्हां त्या घरांत दुसरें कोणाचेंच बिऱ्हाड नव्हतें. घर अगदीं रिकामें होतें. तो मनुष्य सांसर्गिक रोगानें आजारी आहे, अशी लोकांची समजूत होती. त्याच्या कपाळींही हाच सोहळा भोगावयाचें आलें. तिसऱ्या वेळीं बर्कला एक पोलिस शिपायी भेटला. तो एका दारू पिऊन झिंगलेल्या बायकोला घेऊन पोलिसचौकीवर जात होता. बर्क थोडासा त्याच्या मागोमाग चालत जाऊन, जणों काय करुणा आली अशा मुद्रेनें त्यास ह्मणाला "शिपाईबुवा! कशाला बिचारीच्या पाठीस लागतां? जाऊं द्या तिला घरीं. गरीब आहे." अशा प्रकारें त्याचें मन वळवून तिला ह्या कर्मचांडाळानें आपल्या बिऱ्हाडीं आणली, आणि तिचीही नेहेमींच्या पद्धतीप्रमाणें वाट लावली! ह्याप्रमाणें त्यांचा हा गळेकापीचा धंदा जारीनें चालू झाला. पुढें पुढें ते दोघे इतके धीट झाले कीं, त्या वाड्यांत अनेक बिऱ्हाडकरू असतांही, हे आपलें अघोर कर्म तेथें खुशाल चालवीत. पहिल्यापहिल्यानें प्रेतें रात्रीच्यारात्रीं ते रवाना करीत. पण पुढें पुढें त्यांचा धीटपणा इतका वाढला कीं, ते आपला माल उचलावयास दिवसाढवळ्या मजूर बोलावूं लागले. प्रेताच्या पेटींत भोंवतीं थोडेंसें गवत, चहाचे डबे, किंवा रिकाम्या बाटल्या भरीत, आणि तोच माल

भरलेला आहे असा बहाणा करीत. हे खून करण्यांत ह्यांच्या दोन बायका व आणखीही थोडींबहुत माणसें सामील असत. ह्मणूनंच निर्धास्तपणें हा धंदा चाले.

एक वेळ त्यांच्या खोलींत मोठी गडबड उडाली. हेअरच्या बायकोनें एक खुळसर मुलगा फुसलावणीनें बिऱ्हाडीं आणून ठेवला होता. त्यांची नेहेमींची रीत ह्मणजे कडक दारू पाजून त्यास आंथरुणावर निजवावयाचें आणि मग आपलें काम साधावयाचें; पण ह्या खेपेस तें जसें साधावें तसें साधलें नाहीं. त्या मुलानें ह्या काळांच्या हातून सुटण्याविषयीं फारच मोठी गडबड केली. ही गोष्ट सकाळच्या नऊ वाजतांची होती. तरी त्यांनीं सारी स्थीरस्थावर करून आपली शिकार साधली, आणि त्याच दोनप्रहरीं तें 'प्रेत डाक्टराकडे रवाना करण्यांत आलें! दुसरे जे कित्येक मागाहून मृत्युमुखीं पडले, त्यांत एक गरीब **आयरिश** स्त्री, व तिची एक बहिरी व मुकी नात होती. ही स्त्री त्यांच्या मानभावी आदरआतिथ्यांत गुंतून त्यांच्या जाळयांत सांपडली. लौकरच तीस कैफ चढला, व लागलीच ती मारली गेली! दुसऱ्या दिवशीं तिच्या नातीचाही खून करून तिचें प्रेत एका पिपांत भरण्यांत आलें. व मासे विकण्याच्या गाडीवर चढवून तें पीप डाक्टराकडे रवाना करण्याची तयारी केली. पण त्या गाडीचे घोडे पाऊलच पुढें टाकीनात. जणों काय त्यांतील भयंकर वस्तूचें स्वरूपच त्यांच्या डोळयांपुढें राहिलें! तेव्हां तें पीप मजुराकडूनच त्यांस उद्दिष्टस्थानीं नेणें भाग पडलें. दुसऱ्या एका प्रसंगीं तर त्यांचें कृष्णकारस्थान अगदीं उघडें पडण्याच्याच बेतांत आलें होतें. तें असें. ह्यांची प्रेताची गाडी चालू असतां, कांहीं टवाळ पोरें त्या गाडीच्या पाठोपाठ चालत होतीं. त्यांनीं त्या पेटीच्या एका फटींतून हात घालून थोडेंसें गवत बाहेर काढलें. तेव्हां आंतील प्रेताच्या अवयवांचे किंचित् किंचित् भाग उघडे पडले. तें पहातांच जमलेल्या पोरांनीं 'प्रेत! प्रेत!' ह्मणून बरीच आरडाओरड केली. परंतु तोही प्रसंग ह्यांनीं कसाबसा मारून नेला. आणि त्यांच्या त्या धंद्यांत ईश्वरदयेनें (!) चांगली बरकतही येऊं लागली!!! असो.

अखेर सर्व पापांचे घडे परिपूर्ण भरले. त्या चांडाळांच्या सहस्र अपराधांची अगदीं तोंडोतोंड भरती झाली. त्याचा प्रकार असा. शि-

रस्त्याप्रमाणें त्यांनीं एका स्त्रीला फुसलावून आपल्या बिऱ्हाडीं आणलें. आणि रात्रौ खाणें, दारू पिणें, गाणें, बजावणें सुरू केलें. अनाथ बिचारी बाई! आपल्या बरोबर सारीं गोड बोलतात ह्मणून तीही त्या आनंदांतच मग्न झाली होती. आपलीं शंभर वर्षें भरलीं, आपल्या गळयाला तांत लागणार, हें त्या बिचारीच्या ध्यानींमनींही नव्हतें. परंतु मध्यरात्रीच्या सुमारास ह्यांच्या खोलींत बरीच मोठी गडबड व आरडाओरड झाल्याची ऐकून कांहीं बिऱ्हाडांतील लोक जागे झाले. एकानें दुसऱ्यास उठीव, दुसऱ्यानें तिसऱ्यास उठीव असें होतां होतां बराच जमाव जमला; व त्यांनीं कोठून शब्द येतो व कसला दंगा आहे हें पाहण्यासाठीं हेअरच्या व बर्कच्या दारास आंगच्या कुलपांतून आंतील थोडेंसें दिसण्यासारखी फट होती, तींतून डोकावून पाहिलें. तों बर्कची बायको एका स्त्रीच्या तोंडांत व्हिस्की ओतीत आहे येवढेंच त्यांच्या दृष्टीस पडलें. पुन्हा मंडळीची एकत्र बसून कांहीं वाटाघाट चालली तों, जिवाच्या आकांताची एक आरोळी ऐकूं आली. त्याची त्यांनीं विशेष चौकशी केली नाहीं, परंतु एका बिऱ्हाडकरूनें जाऊन पोलिसचौकींत वर्दी मात्र दिली. परंतु पुन्हा येऊन पहातो तों जिकडे तिकडे सामसूम झालें. तेव्हां हा सर्व दारूच्या अमलांतला तंटा आहे, येवढीच कल्पना करून सारी मंडळी आपआपल्या ठिकाणीं निजावयास गेली. परंतु सकाळीं सर्वांस संशय उत्पन्न झाला. ह्मणून त्यांनीं पोलिसास बोलावून आणलें. ह्या काळस्वरूप्यांच्या बिऱ्हाडाचा झाडाही घेतला. पण त्यामध्यें कांहींएक निघालें नाहीं, किंवा रक्त वगैरेही कोठें सांडलें संवरलेलें दृष्टीस पडलें नाहीं. तरी मंडळीमध्यें पुन्हा रात्रीच्या गोष्टीची चर्चा सुरू झाली. होतां होतां एका बिऱ्हाडवाल्यानें अशी पैज मारली कीं, त्या बाईचें प्रेत ह्यांच्या बिऱ्हाडांत असलेंच पाहिजे. असें होतांच सर्व मंडळी पोलिसासह पुन्हा त्यांच्या बिऱ्हाडांत शिरली, आणि बारकाईनें एक एक वस्तु तपासूं लागली. तेथें एक पेटी बंद केलेली होती. तींत प्रेत असेल अशाविषयीं कोणाचीच कल्पना नव्हती. तथापि उगाच फोडून पहाण्याची कल्पना येऊन ती तत्काल फोडण्यांत आली. तेव्हां ह्या यमदूतांचा अस्सल माल बाहेर पडला!! मग काय

भरलेला आहे असा बहाणा करीत. हे खून करण्यांत ह्यांच्या दोन बायका व आणखीही थोडींबहुत माणसें सामील असत. ह्मणूनच निर्धास्तपणें हा धंदा चाले.

एक वेळ त्यांच्या खोलींत मोठी गडबड उडाली. हेअरच्या बायकोनें एक खुळसर मुलगा फुसलावणीनें बिऱ्हाडीं आणून ठेवला होता. त्यांची नेहेमींची रीत ह्मणजे कडक दारू पाजून त्यास आंथरुणावर निजवावयाचें आणि मग आपलें काम साधावयाचें; पण ह्या खेपेस तें जसें साधावें तसें साधलें नाहीं. त्या मुलानें ह्या काळांच्या हातून सुटण्याविषयीं फारच मोठी गडबड केली. ही गोष्ट सकाळच्या नऊ वाजतांची होती. तरी त्यांनीं सारी स्थीरस्थावर करून आपली शिकार साधली, आणि त्याच दोनप्रहरीं तें प्रेत डाक्टराकडे रवाना करण्यांत आलें! दुसरे जे कित्येक मागाहून मृत्युमुखीं पडले, त्यांत एक ग़रीब **आयरिश** स्त्री, व तिची एक बहिरी व मुकी नात होती. ही स्त्री त्यांच्या मानभावी आदरआतिथ्यांत गुंतून त्यांच्या जाळ्यांत सांपडली. लौकरच तीस कैफ चढला, व लागलीच ती मारली गेली! दुसऱ्या दिवशीं तिच्या नातीचाही खून करून तिचें प्रेत एका पिपांत भरण्यांत आलें. व मासे विकण्याच्या गाडीवर चढवून तें पीप डाक्टराकडे रवाना करण्याची तयारी केली. पण त्या गाडीचे घोडे पाऊलच पुढें टाकीनात. जणों काय त्यांतील भयंकर वस्तूचें स्वरूपच त्यांच्या डोळ्यांपुढें राहिलें! तेव्हां तें पीप मजुराकडूनच त्यांस उद्दिष्टस्थानीं नेणें भाग पडलें. दुसऱ्या एका प्रसंगीं तर त्यांचें कृष्णकारस्थान अगदीं उघडें पडण्याच्याच बेतांत आलें होतें. तें असें. ह्यांची प्रेताची गाडी चालू असतां, कांहीं टवाळ पोरें त्या गाडीच्या पाठोपाठ चालत होतीं. त्यांनीं त्या पेटीच्या एका फटींतून हात घालून थोडेंसें गवत बाहेर काढलें. तेव्हां आंतील प्रेताच्या अवयवांचे किंचित् किंचित् भाग उघडे पडले. तें पहातांच जमलेल्या पोरांनीं 'प्रेत! प्रेत!' ह्मणून बरीच आरडाओरड केली. परंतु तोही प्रसंग ह्यांनीं कसाबसा मारून नेला. आणि त्यांच्या त्या धंद्यांत ईश्वरदयेनें (!) चांगली बरकतही येऊं लागली!!! असो.

अखेर सर्व पापांचे घडे परिपूर्ण भरले. त्या चांडाळांच्या सहस्र अपराधांची अगदीं तोंडोंतोंड भरती झाली. त्याचा प्रकार असा. शि-

रस्त्याप्रमाणें त्यांनीं एका स्त्रीला फुसलावून आपल्या बिऱ्हाडीं आणलें. आणि रात्रौ खाणें, दारू पिणें, गाणें, बजावणें सुरू केलें. अनाथ बिचारी बाई! आपल्या बरोबर सारीं गोड बोलतात ह्मणून तीही त्या आनंदांतच मग्न झाली होती. आपलीं शंभर वर्षें भरलीं, आपल्या गळ्याला तांत लागणार, हें त्या बिचारीच्या ध्यानींमनींही नव्हतें. परंतु मध्यरात्रीच्या सुमारास ह्यांच्या खोलींत बरीच मोठी गडबड व आरडाओरड झाल्याची ऐकून कांहीं बिऱ्हाडांतील लोक जागे झाले. एकानें दुसऱ्यास उठीव, दुसऱ्यानें तिसऱ्यास उठीव असें होतां होतां बराच जमाव जमला; व त्यांनीं कोठून शब्द येतो व कसला दंगा आहे हें पाहण्यासाठीं हेअरच्या व बर्कच्या दारास आंगच्या कुलपांतून आंतील थोडेंसें दिसण्यासारखी फट होती, तींतून डोकावून पाहिलें. तों बर्कची बायको एका स्त्रीच्या तोंडांत व्हिस्की ओतीत आहे येवढेंच त्यांच्या दृष्टीस पडलें. पुन्हा मंडळीची एकत्र बसून कांहीं वाटाघाट चालली तों, जिवाच्या आकांताची एक आरोळी ऐकूं आली. त्याची त्यांनीं विशेष चौकशी केली नाहीं, परंतु एका बिऱ्हाडकरूनें जाऊन पोलिसचौकींत वर्दी मात्र दिली. परंतु पुन्हा येऊन पहातो तों जिकडे तिकडे सामसूम झालें. तेव्हां हा सर्व दारूच्या अमलांतला तंटा आहे, येवढीच कल्पना करून सारी मंडळी आपआपल्या ठिकाणीं निजावयास गेली. परंतु सकाळीं सर्वांस संशय उत्पन्न झाला. ह्मणून त्यांनीं पोलिसास बोलावून आणलें. ह्या काळस्वरूप्यांच्या बिऱ्हाडाचा झाडाही घेतला. पण त्यामध्यें कांहींएक निघालें नाहीं, किंवा रक्त वगैरेही कोठें सांडलें संवरलेलें दृष्टीस पडलें नाहीं. तरी मंडळीमध्यें पुन्हा रात्रीच्या गोष्टीची चर्चा सुरू झाली. होतां होतां एका बिऱ्हाडवाल्यानें अशी पैज मारली कीं, त्या बाईचें प्रेत ह्यांच्या बिऱ्हाडांत असलेंच पाहिजे. असें होतांच सर्व मंडळी पोलिसासह पुन्हा त्यांच्या बिऱ्हाडांत शिरली, आणि बारकाईनें एक एक वस्तु तपासूं लागली. तेथें एक पेटी बंद केलेली होती. तींत प्रेत असेल अशाविषयीं कोणाचीच कल्पना नव्हती. तथापि उगाच फोडून पहाण्याची कल्पना येऊन ती तत्काल फोडण्यांत आली. तेव्हां ह्या यमदूतांचा अस्सल माल बाहेर पडला!! मग काय

विचारावें? बर्कसाहेबांची स्वारी चतुर्भुज होत्साती, हातापायांत सांखळयावाळे घालून कोर्टामध्यें समारंभानें दाखल झाली!

किती केलें तरी मनुष्याचें अंतःकरण! स्वहस्तानें केलेल्या साऱ्या हत्त्या बर्कच्या डोळयांसमोर उभ्या राहिल्या. कृतकर्माचा त्यास पश्चात्ताप झाला. त्याला आपल्या मरणाबद्दल कांहींच दुःख वाटलें नाहीं. आपल्या गुप्त गोष्टी सांगण्यास त्यानें यत्किंचित्ही आढेवेढे घेतले नाहींत. त्यानें कोर्टापुढें यच्चयावत् गोष्टी कबूल केल्या. आपण व हेअर ह्या पातकांचे भागीदार असून आमच्या उभयतांच्या बायकांचें आह्मांस सहाय्य होतें, असें स्पष्ट सांगितलें. आणि कोर्टामध्यें एक एक खुनाचा पाढा वाचण्यास सुरवात केली. कोर्टामध्यें हा भयंकर मनुष्य व खटला पाहण्यास हजारों मनुष्यांची गर्दी उडाली. पहिल्या दिवशीं त्यानें बऱ्याच खुनांची हकीगत सांगितली. ती संपल्यावर कोर्टानें आणखी किती खून सांगावयाचे राहिले ह्मणून विचारलें. बर्क ह्मणाला 'अझून पुष्कळ सांगावयाचे आहेत.' तेव्हां सर्वांस काय वाटलें असेल, हें सांगत बसण्यापेक्षां तें काम वाचकांवरच सोंपवावें हें बरें. ही खुनांची हकीगत बर्क कित्येक दिवस सांगत होता, व कोर्ट आणि प्रेक्षक ऐकत होते. असो. ही उलट्या काळजाची पाषाणहृदयी कृति ऐकून कोर्टापेक्षांही लोकांस अतिशय संताप आला. ते चवताळून अगदीं बेफाम झाले. बर्कचें व हेअरचें काय करावें आणि काय न करावें असें त्यांस होऊन गेलें. बर्कला पोलिसानें पकडलें होतें; पण हेअर कांहीं अद्याप तावडींत सांपडला नव्हता. त्यास शोधून काढावें व त्याचे फाडून तुकडे करावेत ह्यासाठीं सारी मंडळी धांवली. त्यांनीं हेअर ह्यास शोधून तर काढलाच. पण त्यांची मनीषा मात्र तृप्त झाली नाहीं. तो तितक्यांतूनही निसटून पळाला, व लंडनशहरांत जाऊन वेष पालटून एका चांभाराच्या घरीं जोडे शिवावयास राहिला. बर्कनें कृतापराधाबद्दल आपल्या संतप्त देशबांधवांसमक्ष मोठ्या संतोषानें देहांत प्रायश्चित्त घेतले; व हजारों लोकांनीं तो त्याचा समारंभ मोठ्या उत्सुकतेनें पार पाडला! थोडे दिवस गेल्यावर हेअरच्या ओळखीचीही फूट पडली. परंतु लोकांच्या मनांतील राग तेथपर्यंत बराच कमी झाला होता, व आठवणही मागें पडली होती. तरी हेअर उमगला हें समजतांच लोकांचा त्याच्या भोंवतीं

पाळा पडला. त्यांनीं त्यास यथेच्छ बुकलेला व अखेर त्याच्या डोळ्यांत झणझणीत चुना घालून त्यास आंधळें करून टाकलें. मोठ्या पराकाष्ठेनें जीव मात्र वांचला. मग तो मोठ्या कष्टानें **कानडा**देशांत जाऊन तेथेंच हालअपेष्टेंत मेला असें ह्मणतात. ह्या पाश्चात्य राक्षसांपुढें आमचे बिचारे ठग कांहींच नव्हेत! **बर्क**च्या कैफियतीपुढें आमच्या 'ठगाच्या जबानी'-ची मातब्बरी ती कसली?

वरच्या दुष्कर्मांचें आश्चर्य वाटण्यापेक्षां आमच्या वाचकांना ह्या अशा अर्वाचीन कालांत, अशा मोठ्या शहरामध्यें, भरवस्तींत धडधडीत खुनांचें काम व व्यापार चालून त्याचा इतक्या कालपर्यंत सरकारास सुगावा लागूं नये, ह्याचें मात्र आश्चर्य वाटेल खरें. ह्याचा जेव्हां गवगवा झाला, तेव्हां झालेल्या हयगयीच्या, व आंधाराच्या निरसनार्थच जणों काय, त्याच्या पुढील वर्षींच पार्लमेंटमध्यें ह्या संबंधाचें एक बिल निघालें. असो. तात्पर्य काय, कीं 'दिव्याखालीं आंधार' हा कांहीं केलें तरी चुकावयाचा नाहीं.

---

# पुस्तकपरीक्षा.

## हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास.

### भाग पहिला.

### (मुसलमानी रियासत.)

हा सुंदर व अत्युपयोगी, सुमारें ८०० पानांचा ग्रंथ अत्यंत परिश्रमानें रावसाहेब **गोविंद सखाराम सरदेसाई**, शिक्षक, राजपुत्रविद्यालय, बडोदें, ह्यांनीं तयार करून मेसर्स **दामोदर सांवळाराम आणि मंडळी** ह्यांनीं छापून प्रसिद्ध केला, व त्याची एक प्रत आह्मांस पाठविली, ह्याबद्दल कृतज्ञतापूर्वक आभार मानून आज त्यांतील गुणदोषविवेचनास प्रारंभ करतों.

रावसाहेब सरदेसाई ह्यांची, आह्मांपुढें आलेली ही दुसरी कृति होय. पूर्वीं ह्यांनींच केलेल्या "**इंग्लंददेशाचा विस्तार**" नामक ग्रंथावरील कोकिळांत आलेला अभिप्राय आमच्या वाचकांच्या स्मरणांत असेलच. त्या ग्रंथापेक्षां ह्या ग्रंथाचे परिश्रम व महत्त्वही विशेष–पुष्कळपटीनें अधिक–आहे. कारण, तो

ग्रंथ निव्वळ इंग्रजी ग्रंथाचेंच भाषांतर असल्यामुळें भाषासौष्ठवाखेरीज इतर गुण व्यक्त करण्यास कांहींच मार्ग नव्हता. ह्या ग्रंथाची गोष्ट त्याहून फार भिन्न आहे. ह्या ग्रंथालाही अनेक परकी ग्रंथांचा आधार आहे खरा; परंतु ते केवळ साक्षीभूत आहेत. आणखी, हा विषयही असाच आहे कीं, ह्यास प्राचीन ग्रंथांचें साहाय्य घेतल्यावांचून कोणासच कांहीं लिहितां येणार नाहीं. 'इतिहास' हा विषय आधींच मोठा गहन, अत्यंत महत्त्वाचा, लोकोपयोगी, विशाळ, व भानगडीचा असा आहे. आणि त्यांतून आमच्या ह्या हतभाग्य देशाच्या संबंधानें तर त्याची स्थिति खरोखरच फार शोचनीय आहे. पण 'आहे' ह्मणण्यापेक्षां 'होती' असें ह्मणण्यासही आह्मांस कांहीं दिकत वाटत नाहीं. कारण रावसाहेब **सरदेसाई** ह्यांनीं 'मुसलमानी रियासती' च्या रूपानें–समग्र नसला तरी–पुष्कळ अंशानें तिचा उद्धार केला असें ह्मणण्यांत अतिशयोक्ति होईल असें ह्मणण्यास फारसें कोणी धजेल असें वाटत नाहीं.

सांप्रत आमच्या देशाचें कांहीं दुर्दैव ओढवलेले आहे कीं, त्यानें प्रत्येक बाबतींत दुसऱ्याच्या तोंडानें पाणी प्यावें. परंतु आर्यावर्त व सुवर्णभूमी अशा थोर मातापितरांच्या पोटीं आह्मी राजबिंडे निपजलों असल्यामुळें **'डॉन क्विग्झोट्'** सारखा शिलेदारी बाणा पतकरून, 'रुंदीशिवाय लांबी' अशा खंद्या वारूवर आरूढ होऊन वासराच्या घोट्यानें ताक पोहे प्यावेत हेंही साहजिकच आहे! श्रीमंतांच्या मुलांनीं खुशालचेंडू बनणें, पूर्वजांचा नांवलौकिक राखण्यासाठीं सरदार लोकांनीं मिशांस तूप लावून बाहेर पडणें, प्रभूस कारागृहांत सोडून 'गादीचें संरक्षण करण्यासाठीं' राजवाड्याभोंवतीं प्रदक्षिणा घालणें, हा आलीकडे आमचा सांप्रदायच बनून गेलेला आहे. **बाबर**बादशहा घोड्यावर बसून दोन दिवसांत १६० मैल जात असे. दोन वेळ तर गंगानदीचें विशाल पात्र बाहुबलानें तरून गेला. पण त्याच्याच पांचव्या वंशजाची ह्मणजे **औरंगजेबा**ची स्थिति पहा! त्याच्या सरदाराला मलमलीचा पोषाख जड वाटूं लागला. स्वारींत जातांना सरदार लोक मेचा ओढीत पलंगावर निजावयाचे, आणि नोकरांनीं पलंगच्या पलंग वाहून न्यावयाचे! अशी ही परंपराच आहे. आमची दृष्टि इतकी मंद झाली आहे कीं, विलायती चष्मा लावल्यावांचून आह्मांस कोणताच पदार्थ नीट न्याहाळत नाहीं. आमच्या घरांतला–अगदीं परसांतला जिन्नस असला तरी, पाश्चात्य लोकांनीं दाखवून दिल्यावांचून, त्याची किंमत सांगितल्यावांचून, त्याची आह्मांस ओळख होत नाहीं. फार तर काय? पण आमचे बापजादे कोण आहेत,

हें सुद्धां आह्मांस पाश्चात्यांनीं दाखवून दिलें पाहिजे. तेव्हांच ते आमचे वडील असें समजून आह्मी त्यांच्या पायांवर मस्तक ठेवूं. येरवीं, घटके घटकेला जरी ते आमच्या पायांस लाथळले, तरी त्यांचा आह्मांस विधिनिषेध नाहीं, किंवा ओळख नाहीं. **मोक्षमुल्लरासारख्या तमसा** नदीतीरस्थ गौरकाय आचार्यांनीं तपेंच्या तपें वेदाचें अध्ययन करून त्यांतील रहस्यांचा कंठशोष करावा, तेव्हां तीं आह्मांस समजावयाचीं; **ब्लाव्हाटस्की, ॲनि बिझांट** सारख्या 'पाताळस्थ नागकन्यांनीं' अवतार घेऊन येऊन 'तुमचा धर्म थोर' ह्मणून जेव्हां आमच्या कानीं-कपाळीं आरडावें तेव्हां आह्मांस त्याची महती कळावयाची; **श्रीमद्विवेकानंदा**-सारख्या महात्म्यानें **पातालभुवनांत** व **मेरुप्रदेशांत** आपल्या योगमार्गाची महती गाऊन परदेशीयांनीं मान डोलविल्यानंतर आह्मी त्याचा विचार करूं लागावयाचें; असा 'दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याचा' आमचा स्वभावच बनून गेला आहे. मग ग्रंथांच्या संबंधांत तरी तो कमी प्रमाणानें कां असावा? तो कमी नाहीं, येवढेंच नव्हे, तर उलट कांकणभर अधिकच आहे. ह्याची उत्तम साक्ष,'व मौजेचा मासला पाहिजे असेल तर, मराठी भाषेंतील 'वेताळपंचविशी' ग्रंथाची प्रस्तावना वाचावी ह्मणजे बस्स. ह्या प्रस्तावनेंत ग्रंथकार त्या ग्रंथाच्या जन्मांतरांची कथा अशी सांगतातः—"हा मूळ ग्रंथ संस्कृत भाषेंत आहे. तींतून तो आरबी भाषेंत गेला. नंतर पर्शियनभाषेंत त्याचें भाषांतर झालें होतें.त्यावरून फलाण्या फलाण्या गृहस्थांनीं फलाण्या वर्षीं इंग्रजी भाषेंत त्याचें भाषांतर केलें. त्यावरून हा मराठी तर्जुमा केला आहे. ! !" ह्मणजे घरांतील आजीबाईची ओळख करून घेण्यास विलायतेहून ब्यारिस्टर बोलावणें, किंवा कलकत्त्यांतील तारमास्तरानें आपल्याच ऑफिसांतील **'डाउन'** लाइनचा दुसरा मास्तर निद्रा-सुखाचा अनुभव घेत आहे ह्मणून चीन, न्यूयार्क, लंडन, मुंबई ह्या मार्गानें पृथ्वीप्रदक्षणा करवून विद्युद्घंटानादानें त्यास जागृत करण्याप्रमाणेंच हा द्राविडी प्राणायाम नव्हे काय? किंवा **दशाश्वमेध** घांटावर राहून पायऱ्या उतरून जाण्याच्या श्रमाकरितां, एखादा, पवित्र भागीरथीच्या प्रवाहाचें निर्मल जलपान सोडून, म्युनिसिप्यालिटीनें आणलेल्या नळाचें, आरोग्यसंरक्षक जलसेवन करूं लागला तर तें कृत्य कितीसें समंजसपणाचें होईल? असें केल्यांत उसासाचा गाळ, नळांतील शेवाळ, तुरटीचा गंध, आणि गोवापावडरचें सत्त्व ह्यांचा कषाय मात्र पोटांत जाऊन कायमचा वतनदार होऊन बसावयाचा! असो.

वरच्या सर्व प्रतिपादनावरून ही गोष्ट लक्ष्यांत येऊन चुकलीच असेल कीं,

आळसामुळें ह्मणा–अडचणीमुळें ह्मणा–किंवा इतर कांहीं अपरिहार्य कारणामुळें ह्मणा–आह्मांस निदान तूर्तच्या काळीं हरएक शास्त्रांच्या संबंधानें पाश्चात्यांच्या तोंडाकडे पहाण्याचा प्रसंग आला आहे, ह्यांत संदेह नाहीं. त्यांत इतिहाससंबंधानें तर हा प्रसंग विशेषच आहे. कारण, प्राचीनकालीं इतिहासाचें खरें महत्व कळलेलें नव्हतें; परमार्थिक विषयांत प्रगति असल्यानें ऐहिक विषयाची पर्वा नव्हती; पाठांतराचें माहात्म्य कमी पडून ज्यांचीं कवनें त्यांच्या बरोबर लयास गेलीं. बादशाही कारकीर्दीपासून बखरी सुरू झाल्या पण त्यांपैकीं कित्येक द्वीपांतरांस गेल्या; कित्येक बंदिशाळेंत पडल्या; कित्येकांची कसरींनीं वाट लावली; कित्येकांनीं वाण्यांस उदार आश्रय दिला; व कित्येकांनीं आपल्या प्रभूबरोबर सहगमन केलें! इतक्या टोळधाडींतूनही ज्या बचावल्या, त्या आमच्या आळसराजाच्या मराठमोळ्यांत पडदनशीन होऊन बसल्या! त्यांची ही उत्तर ध्रुवाची दीर्घकालिक रात्र संपून नुकतीच कोठें तांबड फुटत चालली आहे. तेव्हां अर्थात्च आजपर्यंत इतिहासशास्त्राची तहान आह्मांस पाश्चात्यग्रंथांनींच भागवावी लागली. आणि त्यांतच वर दिलेल्या गंगोदकाच्या दृष्टांताप्रमाणें पाश्चात्य नळांतून आलेला एकदेशीय खळमळ आमच्या विद्यार्थ्यांच्या पोटांत जाऊन तो पचनींही पडला ह्मटलें तरी चालेल. पण हा दोष लौकरच आमच्यांतील पुष्कळांस उमगला व त्याच्या निरसनार्थ अनेक उपाय सुरू झाले.

मुसलमान लोक, आणि इंग्लिश लोक हींच आमच्या राष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासाचीं मुख्य द्वारें होत. बाबरसारख्या कितीएक बादशहांनीं आपलीं आत्मचरित्रें व 'तवारिखा' आरबीभाषेंत व पार्शीभाषेंत लिहून ठेवल्या आहेत. त्यांचाच आधार घेऊन, परदेशीयांचीं प्रवासवृत्तें जमेस धरून, व त्यांत स्वानुभवांची भर घालून इंग्लिशांनीं अनेक इतिहास तयार केले आहेत. ज्याची भाषा भिन्न; ज्याचे आचारविचार भिन्न; अशा राष्ट्राचा इतिहास परकीयांनीं लिहिला तर त्यांत ठिकठिकाणीं मतविपर्यास व हेतुविपर्यास व्हावा, हें अगदीं साहजिक आहे. व त्यांत आत्मश्लाघेचें व परहीनत्वाचें दिग्दर्शन होणें, हेंही मानवी स्वभावास विपरीत नाहीं. कसेंही असलें तरी इंग्रज ग्रंथकारांनीं आमच्या राष्ट्राचे इतिहास परोपरीनें लिहून ठेवले आहेत, ही गोष्ट कांहीं सामान्य नव्हे. पण त्यांतला एखादा सोपासा व मनोरंजक इतिहास तरी आमच्या विद्यार्थी मंडळाच्या वांट्यास येतो काय? छे! नांव नको. आमच्या शाळेंतला पहिला इतिहास ह्मणजे 'मारिसकृत!' मारिसच्या इतिहासाला इतिहास ह्मणण्या

पेक्षां 'बाल्यदशेंतला सुरवंट' ह्मटलें तर मात्र खासें शोभेल ! बिचाऱ्याचें स्मरण झालें कीं अद्याप सुद्धां अंगावर कांटा उभा राहतो. त्याच्या आलीकडची पुस्तकें कांहींशीं बरीं आहेत, पण तीं अगदींच संक्षिप्त आहेत. हा विषय पाहिजे तितका विस्तृत व गोड करून मुलांच्या मनांत बिंबवून देण्यासारखा आहे खरा. पण इतके परिश्रम किती शिक्षक घेत असतील, ह्याचाही संशयच. सामान्य शिक्षकांस तशीं साधनें अनुकूलही पण नसतात, ही गोष्ट विसरतां कामा नये. ह्या सर्व स्थितीचें वर्णन ग्रंथकारांनीं आपल्या प्रस्तावनेंत फारच सुरेख केलें आहे. आणि तें अक्षरशः खरें आहे. अस्तु.

ही सारी दैन्यावस्था दूर करावी ह्मणून बडोदें येथें **'दामोदर सांवळाराम आणि मंडळी'** स्थापन झाली आहे. तींत मोठमोठे श्रीमान् व विद्वान् सभासद् सुमारें १६ असून श्री. रा. सा. **संपतराव गायकवाड** ब्यारिस्टर ॲट लॉ हे अध्यक्ष आहेत. ह्या मंडळीनें ग्रंथसंपादकत्वाचें व प्रकाशकत्वाचें काम अंगिकारलें आहे. तेव्हां ती चांगलें यश संपादन करील असा भरंवसा वाटतो. प्रस्तुतचा 'मुसलमानी रियासत' हा ग्रंथ तिचेंच एक अपत्य आहे. ह्याचे जनक रा. सा० सरदेसाई हें वर सांगण्यांत आलेंच आहे. त्यांस इतिहास हा विषय प्रिय आहे, आवडता आहे; त्याची त्यांस हौस आहे येवढेंच नव्हे, तर त्याविषयाशीं ते अगदीं तद्रूप झाले आहेत, असें त्यांच्या कृतीवरून स्पष्ट दिसून येतें. ह्याच ग्रंथासोबत, प्रस्तुत ग्रंथकारांनीं बडोद्याच्या 'सहविचारिणी' सभेमध्यें 'इतिहास' ह्या विषयावर दिलेल्या दोन व्याख्यानांचा सारांश छापून आलेला आहे. तेवढा जरी कोणी अवलोकन केला, तरी सुद्धां आमच्या ह्मणण्याची सत्यता सहज कळून येईल. राव० सरदेसाई ह्यांस इतिहासविषयाची केवढी उत्सुकता व कळकळ आहे, आणि त्यामध्यें ते कसे रात्रंदिवस पोहत आहेत तें वाचकांस कळण्यासाठीं, त्यांच्या प्रस्तावनेंतील कांहीं वाक्यें खालीं उतरून घेतों:—

"पंतोजी ह्मणजे कान पिळवटणारा; नेमलेलीं पुस्तकें मुलांकडून पाठ करवून परीक्षेंत जास्त मुलें उत्तीर्ण करण्यासाठीं हापापलेला. ...... ह्याचा दोष सर्वस्वीं पंतोजीकडेच आहे असा माझे ह्मणण्याचा उद्देश नाहीं. आमच्या इकडील शिक्षणक्रमाचे अनेक वाईट परिणाम आतां बहुतेकांस कळूं लागले आहेत. ...... निरुपायास्तव पंतोजीचा अथवा वर्तमानपत्रकाराचा धंदा पत्करावा लागतो. ...... पंतोजीच्या अंगीं हौस मात्र पाहिजे. पंतोजीनें आपलें काम समाधानकारक केलें असतां मानसिक आनंदाच्या रूपानें जो मोबदला त्यास मिळतो, त्याचें महत्त्व

अवर्णनीय आहे. हें मी स्वानुभवावरून सांगूं शकतों. गर्वोक्तीची माफी मागून मला एवढेंच कळवावेंसें वाटतें कीं; पंतोजीचा धंदा मला प्राप्त झाल्याबद्दल मी स्वतःस फार धन्य मानित आहें. ...... मुलांस एखादा विषय कंटाळवाणा अगर त्रासदायक वाटल्यास त्याचा दोष बहुतांशीं गुरूकडे आहे, असें मी समजतों. गुरूला तो विषय समजला तरी नसेल, किंवा तो मुलांस मनोरंजक होईल अशा रीतीनें समजून देण्याची शक्ति त्याच्या आंगीं नसेल. ...... 'पुष्कळ मुलांस इतिहास व भूगोल त्रासदायक वाटतात. आयत्या वेळीं थोडीशी घोकंपट्टी करून पास होण्यापुरते मार्क मिळविले ह्मणजे पुरे, असें त्यांस वाटतें. पण वास्तविक रीत्या अत्यंत उनाड मुलाचें मन तल्लीन करून टाकण्याची शक्ति इतिहासाचे आंगीं आहे. ...... इतिहासाचें अध्ययन करणारास हीन मानिलेल्या आपल्या इतिहासांतही शेंकडों प्रसंग असे आढळतील, कीं नीतिमत्ता व बुद्धिमत्ता वाढविण्यास त्यांची शक्ति इतर देशांच्या इतिहासांपेक्षां कांहीं कमी नाहीं. ...... जो शिक्षक विषय शिकवितांना स्वतः तद्रूप होत नाहीं, त्याच्या हातून मुलांच्या ठिकाणीं तल्लीनता उत्पन्न व्हावयाची नाहीं. रसाळ वाणीनें केलेल्या विषयविवेचनानें मुलें आणि गुरु ह्यांची सरूपता झाली पाहिजे."

हे इतिहासशिक्षणसंबंधानें त्यांचे विचार झाले. आतां त्या विषयाची त्यांची पारंगतता किती आहे, त्यांचें अवलोकन व प्रयत्न केवढे दांडगे आहेत, आणि पुढील उद्देश कसा विशाल आहे हें खालच्या उताऱ्यावरून लक्ष्यांत येईल. ते ह्मणतातः—

"सुदैवानें या विषयाचें थोडेंबहुत अध्ययन करण्याचा मला प्रसंग आला. साधनेंही मुबलक मिळालीं, व त्यांचा उपयोग करून लहानसें शालोपयोगी पुस्तक लिहावें असें मनांत आलें, आणि सवडीप्रमाणें उद्योग करून तें बहुतेक तडीस नेलें. इतक्यांत कांहीं एका गोष्टीची माहिती मिळविण्याकरितां बडोदें येथील श्रीमंत संपतराव गायकवाड यांनीं स्थापिलेल्या श्रीसयाजीपुस्तकालयांत मी गेलों. इतके पुष्कळ ग्रंथ मला तेथें आढळले, कीं ते सर्व वाचल्याशिवाय त्या गोष्टीचें विवेचन पुरे झालेंसें वाटेना. येणेंप्रमाणें हळू हळू मीं तयार केलेल्या पुस्तकाचें वैय्यर्थ्य मला कळून येऊन शेवटीं असेंही वाटलें, कीं त्या पुस्तकालयांतील सर्व ग्रंथ वाचल्याशिवाय, व निदान **पंधरा वर्षें अध्ययन केल्याशिवाय,** हिंदुस्थानचा इतिहास लिहूं पहाणें हें विलक्षण साहस होय. ...... इतक्यांत प्रकाशकांचा व कित्येक स्नेही मंडळीचा विशेष आग्रह पडल्यामुळें लिहिलेलें पुस्तक तूर्त कसें तरी छापून काढावें, व पुढं जास्त अनुकूलता प्राप्त झाल्यास ह्या पुस्तकाचा केवळ काष्टमय सांगाडा इतक्या पुरताच उपयोग करून त्याजवर पुढें मोठी इमारत रचावी, असा मीं संकल्प केला, व तदनुसार पुस्तक छापण्यास दिलें."

वरील उताऱ्यावरून जसें इतिहाससमुद्राचें अनंतत्व दिसून येतें, तसाच ग्रंथकाराचा त्या विषयावरील व्यासंगही दृष्टिगोचर होतो. अशांच्या हातून उत्कृष्ट ग्रंथ निपजावा, ह्यांत नवल तें काय ? असो. आतां हा प्रस्ताव पुरे करून प्रस्तुत ग्रंथांत मुख्य मुख्य गुण कोणते, व दोष कोणते, ह्या प्रधान विषयाकडेच वळूं.

कोणताही विषय संगतवार दुसऱ्याच्या मनांत बिंबवून देण्याला, त्याचे यथावत् विभाग पाडतां येणें हें मोठें कौशल्याचें काम आहे. आणि इतिहासासारख्या व्यापक व भानगडीच्या विषयांत तर तें फारच कठीण. तथापि सांगण्यास मोठा संतोष वाटतो कीं, रावसाहेब सरदेसाई ह्यांस तें कौशल्य बिनमोल साधलें आहे. त्यांनीं प्रस्तुत विषयाचे विभाग इतक्या ठाकठिकीनें केले आहेत कीं, तेवढ्यावरून सुद्धां त्यांच्या बुद्धिमत्तेची तारिफ केल्यावांचून कोणी राहणार नाहीं. प्राचीन इतिहासाचा भाग त्यांनीं सोडून दिला आहे; व अर्वाचीन इतिहासांत (१) **'मुसलमानी रियासत'** (२) **'मराठी रियासत'** आणि (३) **ब्रिटिश रियासत**, असे तीन भाग करून त्यांपैकीं प्रस्तुत ग्रंथ पहिला भाग जो 'मुसलमानी रियासत' तो प्रसिद्ध केला आहे. व पुढील दोन भागही असेच प्रसिद्ध करण्याचा त्यांचा विचार आहे. प्रस्तुत भागांतील विषयरचना कशी केली आहे, हें वाचकांस समजणें अत्यंत इष्ट वाटल्यावरून तिचें थोडेंसें दिग्दर्शन करतों.

ही 'रियासत' मुसलमानांचीच असल्यामुळें, प्रथमतः **महंमद** पैगंबरापासून त्यांची पूर्वपीठिका दिली आहे. त्याच्या मागून झालेले **खलिपा** इत्यादिकांची थोडक्यांत माहिती देऊन अखेर **हसेन हुसेन** ह्यांचे मृत्यु व त्यांचें हिंदुस्थानांत ताबुतरूपानें राहिलेलें स्मारक ह्याची उत्पत्ति, येथपर्यंत एक प्रकरण संपविलें आहे. तिसऱ्या प्रकरणांत मुसलमानांचा हिंदुस्थानाकडे रोंख कसा फिरला त्याचीं कारणें दिलीं आहेत. त्यानंतर **गझ्नी, घोरी, गुलाम, खिलजी, तघलख्**, इत्यादि घराणीं व वंश ह्यांचें प्रत्येक कारकीर्दीवार वर्णन आहे. ह्यानंतर **तैमूरलंगाची** स्वारी. इतकें झाल्यावर गतकालाचें पर्यालोचन केलें आहे. ह्यापुढें गुजराथेशीं व रजपूतसंस्थानाशीं संबंध आला, ह्मणून त्याही प्रत्येक घराण्याचें थोडक्यांत परंतु सुंदर वर्णन केलें आहे. ब्राह्मणी राज्य, निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही ह्यांचीं वर्णनें ह्यापुढें आहेत. हें झाल्यावर मोंगल घराण्यांतील प्रत्येक बादशहाची कारकीर्द सविस्तर नमूद केली आहे. ह्यांत बाबरबादशहापासून तों तहत दिल्लीचा शेवटचा नामधारी बादशहा बाहदुरशहा हा सन १८५७ च्या

बंडांत सामील झाल्यामुळें इंग्रजांनीं दिल्ली घेतली, व त्याच्या पुत्रांस व नातवांस ठार मारून बहादुरशहास ब्रह्मदेशांत काळ्या पाण्यावर पाठविलें, आणि दिल्लींतील मोंगल वंशाचा मागमूसही ठेवला नाहीं, येथपर्यंत पल्ला पोंचवून हा भाग समाप्त केला आहे. ह्यांत आलेल्या राजघराण्यांची परंपरा एकदम ध्यानांत यावी, ह्मणून ह्यापुढें सुमारें ५० पानें जोडून प्रत्येक राजघराण्याचा वंशवृक्ष दिला आहे, व त्यापुढें ह्या भागांत आलेला प्रत्येक पुरुष, स्त्री, शहर, धर्म, गोष्ट, किल्ला, वस्तु-जसें मुल्क-इ-मैदान नांवाची तोफ—इत्यादिकांचें वर्णन ताबडतोब सांपडण्यासाठीं १४ पानांचा वर्णानुक्रम कोशही जोडला आहे. प्रत्येक कारकीर्दींतील पोटविभागही असेच सुव्यस्थित आहेत. प्रथमतः राज्यारोहण-पद्धति, नंतर बंडावे वगैरे, राज्याची व्यवस्था, त्याच्या कुलघोताचें वर्णन, सभोंवारची स्थिति, स्वारीचा थाटमाट, अंतकाल, व शेवटीं त्याच्या वर्तणुकीवर परकीयांचीं व आपलीं मतें अशा तऱ्हेचा क्रम धरलेला आहे.

येवढ्यावरून आह्मीं पूर्वीं वर्णन केलेला संगति लावण्याचा जो ग्रंथकाराचा प्रधान गुण त्याची साक्ष पटण्यास कांहीं नड नाहीं. आतां दुसरा गुण ह्मणजे वर्णन करण्याची हातोटी हा होय. वाचकांचीं मनें तल्लीन करणारा, दुसऱ्या विषयावर आपलें वर्चस्व स्थापन करणारा, नीरसत्वाला सरसत्व देणारा गुण हाच. ह्याबद्दल राव० सरदेसाई ह्यांची जितकी ह्मणून आह्मी तारिफ करूं तितकी खचितच थोडी होईल. पंचानें व शुष्क वृक्षांनीं भरलेल्या इतिहासरूप परड्याचा सरदेसाई ह्यांनीं मनोरम बाग बनविला ह्यांत तिलमात्र संदेह नाहीं. ह्यांत गजबरलेल्या फलपुष्पांचें काय काय ह्मणून वर्णन करावें? नानाप्रकारच्या मधुराम्लरसांनीं थबथबलेलीं व नेत्रयुगुलांस आपल्या मनोरम वर्णांनीं गारीगार करणारीं फलें ह्यांत ओथंबलीं आहेत; चित्रविचित्र रंगांनीं, व अंतःकरणांस प्रसन्न करणाऱ्या परोपरीच्या सुगंधांनीं आल्हाद उत्पन्न करणारीं पुष्पें ह्यांत विकसित झालीं आहेत; तप्त अंतःकरणास निववणारे अनेक घनदाट वृक्ष आपल्या शाखा पसरून शीतल छाया व मंद वायु देण्यास ह्यांत तत्पर होऊन उभे राहिले आहेत; निर्मल जलांनीं व प्रफुल्ल कमलांनीं सुशोभित सरोवरें ह्यांत तुडुंबलीं आहेत; क्रूर, महाभयंकर, हिंस्र पशूंचीं पेंढा भरलेलीं कलेवरें येथें सांठवून ठेवलेलीं आहेत, ह्मणजे 'निरो' बादशहाच्या राजवाड्याप्रमाणें, ह्या 'मुसलमानी रियासत' रूपी बागेंत कोणताही नमुना नाहीं असें नाहीं. नवरसांचा समुद्र तर एका भागांतील एका कोंपऱ्यांत सुद्धां सांपडेल! ह्मणजे सदरहू 'रियासत' हें एक

मानवी स्वभाववैचित्र्याचें मनोरम प्रदर्शन आहे ह्मटलें, तर त्याहून विशेष शोभेल. ह्यांत जसे पुरुषांचे तसेच स्त्रियांचेही नानाविध चमत्कार दृष्टीस पडतात.

अकबर, नासरुद्दीन, गवान, राजसिंहसारखे पुरुष व त्यांचें वर्तन हीं ह्या बागेंतील निर्मल सरोवरें होत. व महंमद तघ्लख, औरंगजेब, गुलाम कादर हे सिंह, वाघ व लांडगे होत. पण तीं आतां पेंढा भरलेलीं कलेवरें असल्यामुळें करमणुकीचा विषय होऊन बसलीं आहेत. नाहीं तर अशांच्या पुढें जाणार कोण? काय ह्या नराधमांचीं कृत्यें! कोणी दहा लक्ष मनुष्यांचे शिरच्छेद केले ह्मणतो, तर कोणी कोटि मनुष्यांचे बळी घेतल्याचा डौल मारतो; कोणी मानवी शिरांचे मनोरे बांधतो, तर कोणी जनावरांप्रमाणें प्रजेखातर त्यांची शिकारच करतो; कोणी हजारों मनुष्यांवरून हत्ती चालवीत नेतो, तर कोणी त्यांस भिंतींतच चिनून टाकतो! कोणी सर्पदंश करवितो, तर कोणी कुत्र्याकडून फाडवितो; कोणी हत्तीखालीं चिरडवितो, तर कोणी निःशस्त्र मनुष्याची वाघाबरोबर कुस्ती लावतो! कोणी शत्रूला जिवंत सोलतो, तर कोणी मद्यप्राशनाला त्याच्या कवटीचा पेलाच करून शेखी मिरवितो! कोणी भावाचा जीव घेतो; तर कोणी बापाचा जीव घेतो. कोणी मुलीला विष देतो, तर कोणी मुलाला मातेच्या मांडीवरून ओढून त्याचीं आंतडीं बाहेर काढतो. डोळे काढणें हें तर काय पांचवीला पूजलेलें! तो विधि उरकल्यावांचून जणों काय पान परतावयाला सुद्धां परवानगी नाहीं. अन्नांत विष; पोषाखांत विष; औषधांत विष; गोळ्यांत विष; पानसुपारींत विष!! हायहाय! केवढी ही राजतृष्णा, आणि काय हा बलवत्तर धनलोभ! कनकासाठीं जर हा प्रकार, तर कांतेविषयीं काय विचारावें? कोणी सुंदरीचा थुंका झेलतो, तर कोणी खडेसाखरेच्या खड्याला सव्वालाख रुपये देतो. कोणी आरशांतील प्रतिबिंब पहाण्यासाठीं आतुर होतो, तर कोणी प्रधानाच्या स्त्रीवरच जुलूम करतो. कोणी कन्येला मागणी घालतो, तर कोणी तुझीच बायको दे ह्मणतो; कोणी आपल्या कन्येवर डोळा ठेवतो, तर कोणी भावजयेबरोबर लग्नच लावून सोडतो. कोणी सुनेशीं विवाह करण्याचें धर्मशास्त्र काढतो, तर कोणी सापत्न मातांना जनानखान्यांत दडपून यथेच्छ विलास भोगतो!! प्रभो रामचंद्रा! हे पुण्यश्लोकाग्रणी निषधपते! तुमच्याच पुत्रपौत्रांनीं आपल्या सुकुमार कन्या शिखानष्टांस देऊन स्वकुल पवित्र करावें ना!! धिक्कार असो मानवीस्वभावाला, आणि त्याच्या सौख्यलोलुपतेला!

कित्येकांची दयाशीलता, मुलांविषयीं प्रेम, शासन करण्याची तऱ्हा, व लहरी स्वभाव हींही ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत. एका बादशहानें आपल्या लहान मुलांस सिंहाच्या तोंडावर हात ठेवण्यास सांगितलें, आणि तें त्यानें केलें नाहीं ह्मणून त्याला जन्मभर अंधारकोठडींत कोंडून ठेविलें! अकबरबादशहानें मनुष्यांचा उपजत धर्म कोणता, हें समजून घेण्याकरितां कांहीं लहान लहान अर्भकांस एकांतस्थळीं ठेवून त्यांस मुकींच करून सोडलें! एकानें आपल्या मुलाच्या प्रारब्धाची परीक्षा पहाण्यासाठीं, युद्धाच्या घनचकरींत तोफेचा गोळा लागतो किंवा नाहीं हें पहाण्यासाठीं, किल्ल्याच्या तटावरच उभें केलें! कोणी कलावंतिणीला येण्याला अंमळ उशीर लागला ह्मणून तिचा तत्काल शिरच्छेद करविला! कित्येक बादशहा तर नटव्यासारखा वेष घालून कसबिणींबरोबर दुसऱ्यांच्या घरीं नाचावयास जात असत! केरळ देशच्या नरसिंह रायानें आपली मुलगी बादशहाच्या जनानखान्यांत घातली! शाबासरे बहादूर! स्त्रियांच्या संविधानेंही असेच अनेक चमत्कार दृष्टीस पडतात. **कृष्णाकुमारी, पद्मिनी, कमलादेवी, देवलदेवी, नूरजहान, अर्जुमंदबानु** ह्या स्त्रीरत्नांचें लोकोत्तर लावण्य, व त्यांचे करुणास्पद शेवट, **चांदबिबीचें** अप्रतिम शौर्य व **नूरजहानचें** राजकारण, **दाहिर** राजाच्या मुलीचा कावा, व दृढनिश्चय हे भाग वाचून कोणास कौतुक वाटणार नाहीं?

आजपर्यंत आपल्या देशाचे मराठी इतिहास ज्यांनीं वाचले आहेत, त्यांस ह्या नूतन ग्रंथांत नवीन माहिती व मनोरमपणा किती भरला आहे, ह्याची थोडीशी तरी कल्पना यावी, ह्मणून येवढा विस्तार करून त्यांतील थोडेंसें दिग्दर्शन केलें आहे. ह्या अनुपमेय बागेंतील कांहीं थोड्या तरी फलपुष्पांचे नमुने अंशतः तरी आपल्या वाचकांस देण्यासाठीं कोकिळाचा जीव फार हुटहुटतो, परंतु उपयोग काय? एकाची निवड केली, तर दुसऱ्याला गौणत्व येणार, आणखी, जेथें एकसारखें रमणीयत्व एकवटलें आहे, तेथें निवडानिवड तरी काय करावी? आणि कोकिळाच्या टीचभर चोंचेंत राहणार तरी काय? ह्यास्तव थोड्याशा नामावलीवरच बोळवण करणें भाग आहे.

(पुढें चालू.)

---

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar at JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

## आर्यमहौषधालय मु० आंजलें.

या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊंच व त्याशिवाय त्यांच्या आरोग्यार्थ एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकटच देऊं.

# मदनविलासामृतसंजीविनी.

## वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहक, बुद्धि-कांतिवर्धक व धातुपौष्टिक सुवर्णमाक्षिकमौक्तिक कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्त्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्वभागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, छातींतील रोग, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, वातरोग, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, हात, पाय, मूत्रमार्ग, व शरीर यांचा दाह, व अरुचि, इ० अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास नवीन किंवा जुनाट असले तरी खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस शारीरिक व मानसिक श्रम फार पडतात, त्या सर्वांच्या आंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो व सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें. कोष्ठशुद्धि होते. या अप्रतिम गुटिका अत्यंत शोधानें केल्या असून त्यांच्या अप्रतिम गुणका-

रित्वाबद्दल इजारों सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं, असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस वंगीचा सर्व टपालखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळ्यांस १ रु. ७० गोळ्यांस २ रु. १६० गोळ्यांस ४ रु. २६० गोळ्यांस ६ रु. ५२० गोळ्यांस १० रु.


**थंडगार नेत्रांजन**—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, मोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार, तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

**विशेष सूचना.**—अलीकडे आंजर्लें व मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या बऱ्याच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष संभव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें **"कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य, मु० आंजर्लें, ता० दापोली, जि० रत्नागिरी"** याच पत्त्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपानपत्रक सोबत असतेंच.

५–१२]

# श्रीमन्महाराज करवीर आणि म्हैसूरसरकार यांचे आश्रयाखालीं.

SPECIAL FOR INDIA.




## स्वधर्माभिमानी यांकरितां हिंदु वॉचेस.

हीं वॉचेस दिखाऊ, मजबूत, वजनांत हलकीं, मध्यम आकार, बरोबर वेळ दाखविणारीं, पांढऱ्या मिन्याचे प्लेटवर सुंदर प्रेक्षणीय हिंदु पूज्य दैवतांचीं चित्रें वगैरे.

हें वॉच एकवार घेतल्यास १०,२० वर्षे दुसरें घ्यावयास नको.

**हिंदु युनिव्हर्सल वॉच.**

ग्यारंटी ३ ते ६ वर्षे. रोमन आंकडे असून मध्यभागीं फक्त शंकरपार्वती व गजानन. निकलसिल्व्हर वॉच किं. रु. १६. चांदीचें वॉच किं. रु. ३०. सोन्याचें वॉच किं. रु. २५०.

**हिंदु प्राईज वॉच**—ग्यारंटी २ ते ५ वर्षे. मराठी व रोमन आंकडे असून चित्रें १६ आणि मध्यभागीं श्रीमहादेवपार्वती.

**निकल सिल्व्हर वॉच**—किं. रु. १५, चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३०, सोन्याचें किं. रु. १५०.

**हिंदु प्रिन्हलन्स वॉच**—ग्यारंटी १ वर्ष ते ४ वर्षेपर्यंत-डबल आंकडे, चित्रें १५ असून मध्यभागीं दरबारी थाटानें श्री. शिवाजी छत्रपतिमहाराज. नि. सि. वॉच किं. रु. १०, १५. चांदीचें किं. रु. २५-३०.

**हिंदु आर्मी वॉच**—डबल आंकडे असून चित्रें २२. मध्यभागीं श्री. शिवाजी महाराज घोड्यावर बसलेले. निकल सिल्व्हर वॉच किं. रु. १० ते १५. चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३०. शिवाय **वेस्टंड रिलायन्स जॉन ब्यारेल, कुरवायझर** वगैरे प्रसिद्ध मेकरांचीं लहानमोठीं वॉचेस आमचेकडे विकत मिळतील.

प्याकिंग-पोस्टेज निराळें, वॉचबरोबर एक शेडा, पेटी, काच आणि स्प्रिंग मिळेल. व्ही. पी. पार्सलनें पाठवूं.

सर्व प्रकारचे वॉचेसचीं दुरुस्तीकामें माफक आकारानें ग्यारंटीसह करून देऊं.

**सचित्र क्याटलाग फुकट.** [५-१२

**जी. बी. नाईक आणि कंपनी,**

भायखळा, मुंबई आणि पुणें.

---

# हरएक प्रकारचा माल

मुंबईत मिळणारा, व्यापारी व ग्राहक यांस रोख पैसे आल्यास पाठवूं.

**नियम व माहिती अर्धा आणा आल्यास मिळेल.**

व्यापारी व ग्राहक यांकरितां. **हरएक प्रकारचा माल मुंबईत** मिळणारा वक्तशीर बाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय.

D. K. SANDU, RAMWADI & THAKURDWAR, BOMBAY.



**दत्तात्रेय कृष्ण सांडू** यांचीं हरएक प्रकारचा माल मिळण्याचीं, आणि माफक **अडत** घेऊन माल रवाना होणारीं दुकानें:— रामवाडी आणि ठाकुरद्वार, मुंबई.

**खरा हस्तिदंती माल**-फण्या ८ ते ३ रु., कंगवे ८ ते ८१२ आ., **फांसे जोड** २ ते ७॥ रु., **नाटाचे फांसे** ८६ ते ८१२ आणे.

**पनवेल आर्यौषधि कारखान्यांतील सर्व औषधें** वरील दोन्ही दुकानीं विकत मिळतात. अर्धा आणा आला तर त्या औषधाची यादी पाठविण्यांत येईल.

## औषधयोजना..

रोग्याचें प्रकृतिमान बरोबर कळावें म्हणून पनवेल आर्यौषधि कारखान्यांत **रुग्णपत्रिका** नांवाचा एक नमुना छापून तयार केला आहे. अर्धा आणा आल्यास तो पाठवूं; त्यांत अगर पत्रानें रोग्याचें प्रकृतिमान कळवून औषध पाठविण्यास लिहिलें तर त्यावर औषधयोजना करून औषधें पाठवूं.

पत्रव्यवहार:—

**औषधयोजनेविषयीं**:—दत्तात्रेय कृष्ण सांडू, ठाकुरद्वार, मुंबई, आणि **हरएक प्रकारचा माल मागविणें तो**, दत्तात्रेय कृष्ण सांडू, रामवाडी, मुंबई, या पत्त्यावर करावा.

**रामवाडी**
दुकानदार:—**वा. कृ. सांडू.**

**ठाकुरद्वार**
दुकानदार:—**ह. कृ. सांडू.**